ISSN 2349-638x
IMPACT FACTOR 7.367

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's

# Smt. Akkatai Ramgonda Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji

Tal-Hatkanangale, Dist- Kolhapur, Maharashtra- 416115
Affiliated to Shivaji University, Kolhapur
Reaccredited by NAAC with 'B+ Grade (2.57 CGPA)

## ONE DAY NATIONAL MULTILINGUAL SEMINAR

on

# 'Socio-Cultural Context in 21st Century English, Hindi and Marathi Literature'

Saturday, 30th September, 2023

## ORGANISED BY

Departments of Marathi, Hindi, English and IQAC

## Chief Editor

Dr. Pramod P. Tandale

## Executive Editor

Prof. (Dr.) Trishala Kadam

## Editors

Prof. (Dr.) Subhash Jadhav (Marathi)
Mr. Sudhakar Indi (Hindi)
Mr. Dipak Sarnobat (English)
Minaj Naikawadi

Special Issue Published by.

# Aayushi International Interdisciplinary Research Journal

ISSN 2349-638x Impact Factor 7.367

Peer Review and Indexed Monthly Journal

Website :- www.aiirjournal.com

Chief Editor :- Pramod P.Tandale

Email:- aiirjpramod@gmail.com

Mob.No.9922455749

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

**Peer Reviewed And Indexed Journal**

**ISSN 2349-638x**

**Impact Factor 7.367**

**Website :- www.aiirjournal.com**


## Theme of Special Issue

## Socio-Cultural Context in 21st Century English, Hindi and Marathi Literature

**( Special Issue No.128 )**


## Chief Editor

**Dr. Pramod P. Tandale**

## Executive Editor

**Prof. (Dr.) Trishala Kadam**

## Editors

**Prof. (Dr.) Subhash Jadhav (Marathi)**

**Mr. Sudhakar Indi (Hindi)**

**Mr. Dipak Sarnobat (English)**

**Minaj Naikawadi**

No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc.; Without prior permission.

**Aayushi International Interdisciplinary Research Journal**

**ISSN 2349-638x**

Special Issue No.128

Sept. 2023

**Disclaimer**

Research papers published in this Special Issue are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the Editor of this special Issue are not responsible in any form.

# Section Editors:

**1) Dr. Vitthal Naik (Hindi)**

**2) Mrs. Rameshwari Kudale (English)**

**3) Mr. Sandip Patil (English)**

**4) Mrs. Sunita Powar (English)**

**5) Dr. Priyanka Kumbhar (Marathi)**

**6) Mrs. Pratibha Pailwan (Marathi)**

# Foreword



I feel proud that my institution is organizing a one day national multilingual Seminar on 'Socio-Cultural Context in 21st Century English, Hindi and Marathi Literature' and the participants across the country have positively responded to it. I am extremely glad as you have decided to join your colleagues across the nation to explore 'Socio-Cultural' ideas. The present seminar received an overwhelming response from the participants in the form of 145 Research Papers.

The socio-cultural context often has a strong impact on a person's behavior and thoughts and shapes his codes, norms, practices and traditions. It refers to the idea that language is closely linked to the culture and society in which it is used. This means when language is learnt, the socio-cultural context in which it is used needs to be taken into consideration. The topic of the seminar is very interesting and reflective. It needs to be focused in the present time as we have completed two decades of the 21$^{st}$ century. All the aspects of life are greatly influenced by culture and now it is time to examine objectively how social aspects, culture and literature are related to one another. Globalization has given more importance to 'Connectivity', but the sensible man is concerned with the 'Sensitivity we are losing every day'. This sensitivity is always reflected in Literature in the form of socio-cultural aspects.

Now it is proper time for all the scholars in India to think about the socio-cultural aspects and their impact on literature. I hope the present national multilingual seminar will address some serious issues regarding the socio-cultural aspects in 21$^{st}$ century English, Hindi and Marathi Literature. The proceeding of this seminar will naturally assist the research guides and scholars to re-think and to look at it in the new perspective for the better Indian Society.

I thank all the contributors for their intellectual exercise on this challenging issue. I also thank the resource persons in the seminar for their scholarly guidance and inspiration.

**Prof. (Dr.) Trishala Kadam**,
I/C Principal,
Smt. Akkatai Ramgonda Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji



प्रिय वाचक हो,
सप्रेम नमस्कार

महात्मा जोतिराव फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा घेऊन 'सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणुकीस आळा' ही पंचशील तत्वे अंगीकृत करून आणि श्री स्वामी विवेकानंद यांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी "ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार" हे ब्रीदवाक्य घेऊन सन १९५४ साली 'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थे'ची स्थापना कराड येथील मुरलीधराच्या मंदिरात केली. गोरगरिबांच्या मुलांना, सर्व जाती-धर्माच्या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे. यासाठी त्यांनी खेडोपाडी, दुर्गम व शहरी भागात प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांची स्थापना करून घरोघरी ज्ञानाचा प्रकाश पोहोचविला. हे कार्य करीत असताना संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे यांनी बापूजींना खंबीरपणे साथ दिली. मी प्रथम त्यांना विनम्र अभिवादन करतो.

'श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर' ही गेली ६९ वर्षे शिक्षण क्षेत्रात ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. या शिक्षण संस्थेअंतर्गत अनेक गुरुदेव कार्यकर्ते विविध संस्कार केंद्रातून ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. या संस्कार केंद्रातील एक संस्कार केंद्र म्हणजे श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय हे होय. महाराष्ट्राचे 'मँचेस्टर' असलेल्या इचलकरंजी या नगरीमध्ये कष्टकऱ्यांच्या खेड्यापाड्यातील मुलींना शिक्षण मिळावे या हेतूने डॉ. बापूजी साळुंखे यांनी सन १९८४ साली स्वतंत्र कन्या महाविद्यालयाची स्थापना केली.

या कन्या महाविद्यालयात आज जवळ जवळ तेराशे पेक्षा अधिक विद्यार्थिनी ज्ञानार्जन करीत आहेत. कन्या महाविद्यालयात शनिवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी "२१ व्या शतकातील इंग्रजी, हिंदी आणि मराठी साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ" या विषयावर इंग्रजी, हिंदी आणि मराठी विभागाच्या वतीने तसेच इंग्रजी, हिंदी, मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले. या राष्ट्रीय चर्चासत्रातील विषयाला अनुसरून अनेक अभ्यासकांनी - संशोधकांनी १४५ संशोधन पेपर पाठवून दिले. हे सर्व पेपर आम्ही एकत्रित करून त्याची पुस्तिका करून आपणास देत आहोत. पुस्तिका देताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे कारण साहित्य संशोधन क्षेत्रात भर घालण्याचा आमचा हा छोटासा प्रयत्न आहे. आम्हास याचे समाधान वाटते.

२१ व्या शतकातील इंग्रजी, हिंदी आणि मराठी साहित्यातील चित्रित झालेले सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ भिन्न भिन्न स्वरूपाचे आहेत. राष्ट्रीय चर्चासत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक इत्यादी अशा

अनेक राज्यातून संशोधन पेपर आले. इंग्रजी, हिंदी आणि मराठी साहित्यातून विविध वाङ् याच्या प्रकारातून सामाजिक प्रश्न चित्रित झालेले आहेत. तसेच विविध भूप्रदेशातील संस्कृती भिन्न भिन्न स्वरूपाची दिसून येते. एकूणच काय तर कोणत्याही भाषेतील साहित्य घेतले तर त्यातून सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ हे वेगवेगळे चित्रित झालेले दिसतात. समाज आहे म्हणून साहित्य निर्मिती होते आणि साहित्य निर्मिती होते म्हणून समाज टिकून आहे.

साहित्य हे समाजाचा आरसा आहे असे म्हणतात ते काही खोटं नाही कारण लेखक समाजात रहातो. तो समाजात अनुभव घेतो. स्वतःला आलेले अनुभव तो नांव, गांव, स्थळ बदलून साहित्यातून मांडत असतो. त्यामुळे समाजात जागृती निर्माण करण्याचे कार्य साहित्याच्या माध्यमातून होते. २० व्या शतकानंतर २१ व्या शतकात नव्याने सामाजिक संदर्भ व सांस्कृतिक संदर्भ साहित्य निर्मितीत येत असताना कसे बदलले गेले आहेत याचा आढावा घेणे ही काळाची गरज ओळखून "२१ व्या शतकातील इंग्रजी, हिंदी आणि मराठी साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ" हा विषय घेतला आणि आपण सर्वांनी या विषयाचे स्वागत करून भरघोस प्रतिसाद दिला. वेगवेगळ्या अंगानी संशोधन पेपर लिहून दिले. त्यामुळे संशोधन क्षेत्रात अधिकच भर पडली आहे असे आम्हास वाटते. साहित्य लेखनात काळानुरूप बदल घडत असताना प्रत्येक वीस-पंचवीस वर्षांनी साहित्य लेखनात मोठी स्थित्यंतरे घडत असतात. त्याचा अभ्यास नवीन पिढीने/ संशोधकांनी करणे आवश्यक असते. म्हणूनच अशा विषयाच्या अनुषंगाने राष्ट्रीय चर्चासत्र घेणे महत्त्वाचे ठरते. इंग्रजी, हिंदी, मराठी आणि इतर भाषांच्या माध्यमातून लिहिलेले साहित्य हे अभ्यासाच्या अनुषंगाने महत्त्वाचे ठरते. बहुभाषेतून चित्रित झालेले सामाजिक संदर्भ आणि सांस्कृतिक संदर्भ हे वेगवेगळे अनुभव विश्व वाचकांना देतात यात शंका नाही. एकूणच मुख्य संपादक या नात्याने या राष्ट्रीय चर्चासत्रासाठी आपण संशोधन पेपर देऊन सहकार्य केले याबद्दल आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार !!

सदरचे राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यासाठी आमच्या महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रा.(डॉ.) त्रिशला कदम यांनी बहुमोल मार्गदर्शन केले त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार !! हे राष्ट्रीय चर्चासत्र यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहसमन्वयक म्हणून डॉ. विठ्ठल नाईक, श्री सुधाकर इंडी, श्री. दीपक सरनोबत, डॉ. प्रियांका कुंभार, श्रीमती प्रतिभा पैलवान, श्री. संदिप पाटील, श्रीमती. रामेश्वरी कुदळे, श्रीमती सुनिता पोवार यांचेही सहकार्य लाभले त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार !! याबरोबरच महाविद्यालयातील इतर सर्व गुरुदेव कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले त्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार!!!

**प्रा.(डॉ.) सुभाष जाधव**

(मुख्य संपादक)

# २१ व्या शतकातील मराठी, हिंदी व इंग्रजी साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**डॉ. सोमनाथ कोमरपंत**
(गोवा )

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच जागतिकीकरणाची प्रलयंकारी लाट आली. हे शतक सर्वार्थाने प्रमाथी शतक मानले जाते. आपल्या राष्ट्रात मुक्त अर्थव्यवस्थेमुळे पाश्चात्यीकरणाची प्रक्रिया फार मोठ्या प्रमाणात सुरू झालेली आहे. त्यामुळे भारतीय जनमानस हवालदिल झालेले आहे. त्याच्या भवितव्याच्या दिशा अंधारमय झालेल्या आहेत. कधी नव्हती अशाप्रकारची किंकर्तव्यमूढता येथील जनसामान्यांच्या वाट्याला आलेली आहे. पूर्वीच्या समाजव्यवस्थेत खेडे आणि शहर येथील जीवनमनात मूलतः फरक आढळून येत असे. सुधारणावादाचे वारे सर्वत्र वाहत असले तरी खेड्यातील संथ, शांत आणि पारंपरिक वळणाच्या जीवनाला त्याची बाधा होत नसे. तेथील शेतकरीवर्ग आपल्या दैनंदिन कृषिकर्मात गडून जात असे. बारा बलुतेदारांची जीवनपद्धती कधीच लयास गेलेली असली तरी त्यांची जीवनशैली गतिमानतेच्या धबडग्यात पूर्णतः बदलून गेली नव्हती. पूर्वापार चालत आलेल्या रीतीरिवाजांनुसार आणि जीवनमूल्यांवर अधिष्ठित अशी जीवनशैली तेथील समाजमाणसाने अवलंबिली होती. या नव्या शतकातील पावशतकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या काळात येथील जीवनमान कमालीचे बदलून गेले आहे.

शहरवासियांची आणि महानगरीय जीवनाची रीतच निराळी झालेली आहे.होऊ घातलेल्या आत्मकेंद्रीत जीवनपद्धतीचा परिस्फोट तेथे झालेला आहे. आपण भारतीय संघराज्यात रहात नसून जणू काही इंग्लंड-अमेरिकेसारख्या अतिप्रगत राष्ट्राचे नागरिक असल्याच्या थाटात येथील नागरिक वावरायला लागले आहेत. आपल्या बालकांच्या ओठांवर आपल्या भाषा न खेळता इंग्रजीच असावी असा अट्टाहास येथील आई- वडिलांच्या मनात असतो. सुधारणेचा वारू तिथे द्रुतगतीने यावा ही त्यामागची आकांक्षा. त्यानंतर के.जी. पासून पी.जी.पर्यंत शिक्षणाचे माध्यम इंग्रजीत असावे हे ओघाने आलेच. चौकोनी कुटुंबामुळे आजी- आजोबांनी केलेले संस्कार शहरी जीवनात दुरापास्त. शिवाय आई- वडील दोघेही नोकरी व्यवसायात. त्यामुळे त्यांचे आबाळ होणे ही बाब अपरिहार्यच. आजकालची खेडीदेखील शहरी जीवनाचे भ्रष्ट अनुकरण करायला लागली आहेत. गतिमान युगातील ज्ञान-विज्ञानाधिष्ठित समाजजीवन प्रणाली आणि तिच्यातून उदयास आलेली सांस्कृतिक मूल्ये एवढ्यापर्यंत हे ठीक होते. पण एकविसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच तंत्रज्ञानाचा प्रभाव इतका वाढलेला आहे की, येथील तिसऱ्या पिढीचे डोळे इंग्लंड, अमेरिका, जर्मनी (आणि आता ऑस्ट्रेलिया) या राष्ट्रांकडे लागलेले आहेत. शिक्षण घ्यायचे आपल्या भारतीय विद्यापीठात आणि युवा पिढीची प्रज्ञा- प्रतिभा- परिश्रम खर्ची पडते ती अन्य राष्ट्रांच्या अभ्युदयासाठी. त्याबद्दल तरुण पिढीला ना खंत ना खेद! हे मत व्यक्त करताना याचेही भान ठेवायला हवे की, आपल्या तरुण पिढीतील या ऊर्जेचा विनियोग आपले राज्यशासन पुरेशा प्रमाणात करू शकलेले नाही. परदेशी जाणाऱ्या या तरुण पिढीची लाट थोपवू शकलेले नाही. समाज, संस्कृती आणि त्यांच्या समवायातून निर्माण होणारे साहित्य या त्रयीमध्ये अन्योन्यसंबंध असतो. सामाजिक अधिष्ठान आणि सांस्कृतिक मूल्य हे मानवी समाजधारणेला आशय पुरविते. या मूल्यसरणीमुळे प्रभावित झालेल्या आणि अनुभूतींमुळे भावसमृद्ध झालेल्या संवेदनशील मनाची निर्मिती म्हणजे साहित्य. समांतर प्रक्रियेने आपल्या भूमीतील माणसांची मने घडविणारे वैचारिक वाङ्मयही निर्माण होत असते. या दोहोंमुळे पौनःपुन्येन समाजमानसावर पुढच्या कित्येक पिढ्यांवर दृढ संस्कार होत असतात. सशक्त विचारांची कोनशिला बसविली जाते. संस्कृतिविकासाची प्रगमनशील पावले त्यातूनच पडत असतात. संस्कारबहुलत्व हे आत्मशबल करणारे नसून उज्ज्वल भविष्यकालाची हमी देणारी ती महान शक्ती आहे. आपल्या पूर्वसूरी याच संस्कारांमधून मोठ्या मोठ्या होत

गेल्या. त्या दृढ पायावर आपण उभे आहोत याचे विस्मरण एकविसाव्या शतकात वाटचाल करणाऱ्या तरुण पिढीला पडलेले आहे. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा केलेल्या आणि आशिया खंडातील महान लोकशाही राष्ट्रात असे घडायला नको होते. आपण राजकीय दृष्ट्या स्वतंत्र झालो; पण मनाने स्वतंत्र झालो का? आपले लोकतंत्र योग्य रीतीने चालले आहे का ? आपली शिक्षणपद्धती 'उत्पादक शक्ती' निर्माण करीत आहे की 'माणूस' बनवीत आहे ? प्रश्नांमागून प्रश्न निर्माण होतात. प्रश्नोपनिषद निर्माण होते. इमर्सननं म्हटले होतं: ''विद्यापीठ हा क्षितिज घडविणारा नवा नेत्र आहे.'' आपल्या देशातील विद्यापीठे या दिशेने मार्गक्रमण करीत आहेत का? निराशा होण्याचे कारण नाही. अपवादभूत उदाहरणे आहेत. आशावादाचे दीप नव्याने प्रज्ज्वलित करण्याची वेळ मात्र येऊन ठेपलेली आहे.

म्हणूनच येणाऱ्या कालखंडात समाज- संस्कृती आणि साहित्य यांचे अंतरसंबंधांचे प्रगल्भ आकलन करून घेण्याची आवश्यकता आहे. सद्यःकालीन सामाजिक स्थित्यंतराच्या परिपेक्ष्यात आणि सांस्कृतिक परिवर्तनाच्या उंबरठ्यावर स्थायी मूल्यांची जोपासना करणाऱ्या साहित्याची प्रतिष्ठा वाढविणे अत्यावश्यक आहे. सहस्त्रावधी वर्षांच्या कालखंडानंतर रामायण- महाभारतसारख्या महाकाव्यांनी भारतीयांची मने घडविण्याचे सामर्थ्य अबाधित आहे. जीवनाच्या समरप्रसंगांत कर्तव्यनिष्ठेचा दीपस्तंभ दृढतेने उभी करणारी श्रीमद्भगवतगीता भारतीय युद्धभूमीवरच जन्मास आली.''सत्य आणि असत्य यांच्या संघर्षात अखेर सत्याचाच विजय होतो.'' हे औपनिषदिक वचन आपण शिरोधार्य मानलेले आहे.व्यक्ती  आणि कृती यामधील विसंवाद हा भारतीय समाजाला जडलेला मोठा शाप आहे. म्हणून यापुढे चांगल्या उक्तीचे रूपांतर चांगल्या कृतीत करण्याची किमया नव्याने प्राप्त झालेल्या ज्ञानसाधनांनी आपल्याला साधता आली पाहिजे. जागतिक इतिहासाचा तसा निर्वाळा आहे. फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात रुसो, व्हाल्तेर, माँटेस्क्यू, दिदैरो इत्यादींनी केवळ विचारशलाका समाजमानसास पुरविल्या नाहीत तर प्रत्यक्ष यज्ञकुंडात समर्पणशील वृत्तीने ते वावरले. त्यातून तेथील ऊर्जस्वल आणि सर्जनशील साहित्याचा नवा कालखंड निर्माण झाला. अनुकरण करायचेच तर अशा श्रेष्ठ असामींचे व श्रेष्ठ साहित्यकृतींचे करावे. विश्व साहित्यातील उत्तमोत्तम साहित्यकृतींचे अनुवाद करणे हेही येणाऱ्या कालखंडात आपले लक्ष्य असावे. आत्मिक अभिव्यक्तीसाठी जाज्वल्य राष्ट्रनिष्ठेची आणि जाज्वल्य मनोवृत्तीची आवश्यकता आहे. ब्रिटिशांच्या दमनप्रक्रियेने हतबल झालेल्या समाजाला इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांच्यासारख्या व्रतस्थ इतिहाससंशोधकाने याची आवर्जून आठवण करून दिली होती.

आजच्या सामाजिक आणि सांस्कृतिक अराजक पसरलेल्या आपल्या समाजात पुनश्च त्यांचे उद्गार आठवतात. प्राणांचे पलिते करून राष्ट्राभिमान जागवणाऱ्या भारतीय भूमीवरील विविध भाषांमधील कवी- लेखकांची यासंदर्भात आठवण होते. मैथिलीशरण गुप्ता, जयशंकर प्रसाद, सुमित्रानंदन पंत, रामधारी सिंह 'दिनकर', सुब्रह्मण्यम् भारती, कुसुमाग्रज,बा. भ. बोरकर, कुंजविहारी, वा. रा. कांत, श्रीकृष्ण ऐवळे व वसंत बापट या पूर्वकालीन कवींचे येथे स्मरण होते. रवींद्रनाथ टागोर, बंकिमचंद्र, शरच्चंद्र, अनंत गोपाळ शेवडे आणि क्रांतिवीर रामप्रसाद 'ब्रिस्मिल'या प्रज्ञावंत- प्रतिभावंतांचे स्मरण राष्ट्रीय जागरणाच्या संदर्भात आठवते. कवींचे उद्गार हेच स्फुल्लिंगासारखे असतात. संवेदनशील मने घडविण्यासाठी ते स्फूर्तीदायक आणि कार्यप्रेरक ठरतात. जॉन मिल्टनने कवींचे कार्य हे एक अत्यंत पवित्र कर्तव्य मानलेले आहे. जागतिक कीर्तीचे विचारवंत रोम रोला यांनी साहित्यिक हे जीवनसंगरातील सर्वश्रेष्ठ सैनिक होत असे म्हटलेले आहे. राष्ट्रीय संचितांचे रक्षण, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रीय जीवनमूल्यांचे संवर्धन राष्ट्रधारणा आणि नवनिर्माण प्रक्रिया यांसाठी साहित्य हे महत्त्वाचे माध्यम ठरते. समांतर प्रक्रियेने शाश्वत जीवनमूल्यांसाठी आणि मानवतेसाठी ते दिवा दाखवू शकते. म्हणूनच पूर्वसुरींनी म्हणून ठेवले आहेः

*जिथे आदित्य नाही; तेथे अंधकार ।*
*जिथे साहित्य नाही; तिथे कुविचार ॥*

कोणत्याही श्रेष्ठ साहित्यिकृतीत  जीवनाची समग्रता सामावलेली असते.

सामाजिक न्याय, संस्कृतिविकास आणि स्वतंत्र्य प्रज्ञा- प्रतिभेची अभिव्यक्ती या त्रयीत एक अंतःसूत्र सामावलेले आहे. ते आहे 'स्वातंत्र्य' या मूल्यसंकल्पनेचे स्वातंत्र्य नसेल तर सारे फोल ठरेल. आत्माभिव्यक्तीच्या आड कोणत्याही विघातक शक्ती आड येणार नाहीत याची काळजी एकविसाव्या शतकाच्या या भयावह आणि दहशतवादी जागतिक पर्यावरणात घेण्याची अत्यंत आवश्यकता निर्माण झालेली आहे. ही परिस्थिती येणाऱ्या कालखंडात प्रलयावह होणार नाही यासाठी डोळ्यात तेल घालून जपायला हवे.

'ऑन लिबर्टी' या १९५९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या महत्त्वाच्या ग्रंथात जॉन स्टुअर्ट मिल्ल यांनी व्यक्तीस्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार केला. विसाव्या शतकातील सामाजिक, सांस्कृतिक आणि वाङ्मयीन घटनांवर या विचारसरणीचा प्रभाव पडला आहे. सद्य:कालीन युगमानसात देखील वाङ्मयीन अभिव्यक्तीच्या संदर्भात मिल्ल यांची विचारसरणी क्रांतिकारी स्वरूपाची मानली जाते. कारण ती आधुनिक मानवाच्या मूल्यासरणीची आणि मूलभूत स्वातंत्र्याची ग्वाही देणारी आहे. वाङ्मयाला आवश्यक असणारी आत्मनिर्भर वृत्ती या ग्रंथात अधोरेखित झालेली आहे. त्यांच्या विचारात द्रष्टेपणाचा प्रत्यय येतो .

जे. एस.मिल्ल उद्गारतो:

"जो मार्ग स्वतःशीच केवळ संबंधित असतो अशा मार्गात, त्यांना पाहिजे असेल तसे जगायला मोकळे ठेवले नाही तर संस्कृतीची प्रगती होणार नाही. मतामतांमध्ये मुक्त स्पर्धा झाली नाही तर सत्य काय आहे हे प्रकाशात येणार नाही. उत्स्पुर्तता मौलिकता, प्रतिभा, मानसिक ओज, नैतिक धैर्य ह्या गुणांना अवसर राहणार नाही. सामान्यांच्या सामूहिक भाराखाली समाज दडपला जाईल. संस्कृतीत जे जे संपन्न आणि विविधतापूर्ण आहे ते रूढींच्या प्रस्थापितांशी जुळवून घेण्याच्या, माणसाच्या नित्य प्रवृत्तीच्या दडपणाखाली चिरडले जाईल.ह्या प्रवृत्तीमुळे माणसाच्या शक्ती सुकून जातात.आपल्या अस्मितेचा उत्कर्ष साधण्याच्या ग्रीक महापुरुषांच्या आग्रही वृत्तीचे स्वतःची अस्मिता विसर्जित करण्याच्या ख्रिश्चन शिकवणी इतकेच मोल आहे."

साहित्य ही समाजात कार्य करणारी एक महत्त्वाची संस्थाच मानली गेली पाहिजे अशी विचारसरणी आजकालच्या विचारवंतांकडून आणि समीक्षकांकडून मांडली गेली आहे. ललित वाङ्मयाचा लेखक हा एका परीने सामाजिक भाष्यकार असतो. या संदर्भात मिलिंद बोकील यांचे विचार मननीय वाटतात.

" ज्या एका गोष्टींशी साहित्याला सतत भिडावे लागते किंवा ज्या संदर्भात आपली भूमिका सतत मांडावी लागते, ती गोष्ट म्हणजे सामाजिक विचार. हा घटक वेगवेगळ्या प्रकारांनी व्यक्त होतो. सामाजिक बांधिलकी, सामाजिक जबाबदारी, सामाजिक परिवर्तन, सामाजिक भान इत्यादी. त्याचा ढोबळमानाने अर्थ असा असतो की, साहित्याला समाजातील अन्याय, दुःख, विषमता याची जाणीव असली पाहिजे. ज्या लोकांना हे सोसावे लागते त्यांच्याप्रती सहानुभूती असली पाहिजे आणि हा अन्याय मिटविण्यासाठी समाजात जे उपक्रम/ कृतीकार्यक्रम/ चळवळी चाललेल्या असतात, त्यांच्या बाजूने साहित्याने उभे ठाकले पाहिजे. व्यापक अर्थाने बोलायचे तर समाजसुधारणेच्या किंवा समाज परिवर्तनाच्या कामात साहित्याचा सक्रिय सहभाग असला पाहिजे."

(साहित्याची भूमिका/ साहित्य, भाषा आणि समाज/ मौज प्रकाशन गृह/ मुंबई २०१६, पृ. १७)

या विचारांशी आपणास सहमच होता येईल. मात्र ओढून ताणून समाजपरिवर्तन करण्यासाठीच आपली साहित्य निर्मिती आहे ही भूमिका स्वीकारणे योग्य ठरणार नाही.

या संदर्भात विचार करताना सहजत स्मरण होते ते विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' या कादंबरीचे. या कादंबरीचे आशयद्रव्य काय आहे? या कादंबरीत धरणामुळे विस्थापित होणाऱ्यांच्या होरपळीचा आणि तदनंतरच्या वेदनेचा प्रत्यकारी हुंकार आहे. ज्या मातीशी आपला कायमचा अनुबंध आहे, तेथील आपली पाळेमुळे कायमची उखडून टाकून निघून जायचे म्हणजे यातना होतात. मने उध्वस्त होऊन जातात. या साहित्यकृतीच्या जन्मकाली प्रस्तुत लेखकाचे संवेदनशील मन जागृत होते. समूहाचे मानसशास्त्र कसे असते याचा प्रत्यय त्याला आलेला असतो. मोठाच मन:संघर्ष कलावंत या नात्याने त्यांच्या मनात जागा होतो. त्यांच्या मानसप्रतिक्रिया तीव्रतेने व्यक्त होतात. त्याला

कलात्मक पातळी लाभते. विस्थापितांच्या संघर्षमय जीवनाचे तपशील त्यात येऊन जातात. मोठा चित्रफलक आकारास येतो. कादंबरीचा पट अशा प्रकारे विणला जातो. मानवी व्यथा- वेदनांचा हा एक प्रत्ययकारी अनुबोधपट तयार होतो. कमालीची अंतर्मुखता वाचकांच्या मनात निर्माण होते...विस्थापितांच्या वेदनेचे, विविध प्रकारच्या ताण-तणावांचे पदर 'झाडाझडती'मुळे उघडले जातात. विकासाचे भकास चित्र डोळ्यांसमोर उभे राहते. झाडाझडती या शीर्षकाची अन्वर्थकता पटते.

'रारंग ढंग' ही प्रभाकर पेंढारकर यांची वेगळ्या अनुभूतींची कहाणी. दुस्तर, दुर्गम अशा हिमालयातून राष्ट्रीय हमरस्ता कसा साकार होतो. याचा भव्यपट येथे विणला जातो. भारतीयांच्या अभंग जिद्दीची,अथक परिश्रमांची आणि एकूणच मानवाच्या विजीगिषू आकांक्षांची ही कहाणी आहे. ती संवेदनशील मनाला खिळवून ठेवते. भाक्रा-नानगल धरणाच्या उभारणीचा भव्य प्रकल्प कसा साकार झाला याची 'आम्ही भगीरथीचे पुत्र' या बृहद्कादंबरीत गो. नी. दांडेकर यांनी तन्मयतेने घेतलेला वेध चित्ताकर्षक वाटतो. राष्ट्रीय अभिमानाने प्रेरित होऊन लेखकाने लिहिलेली ही कादंबरी पण लेखकाला एवढीच सामग्री पुरत नाही. या धरणबांधणीच्या काळात विविध घटकांना प्रतिकूलतेतून वाट कशी काढावी लागली याचे तपशील या कादंबरीत आढळतात. अभ्यासाधिष्ठित बैठक या कादंबरीला लाभलेली आहे. शिवाय आज कालच्या आत्मकेंद्रिततेच्या जगात वावरत असताना स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेल्या राष्ट्रीय अभ्युदयाचा विषय एका सर्जनशील लेखकाच्या मनात यावा,त्या प्रमेयाशी त्याने झोंबी घ्यावी हा विस्मयकारी अनुभव आहे.

'सर्वे जन्तु निराशयाः' अशा काळ्याकुट्ट कालखंडात अखंड आशवादाचा दीप अशा प्रकारच्या साहित्यकृतीतून प्रज्ज्वलित होतो. एकविसाव्या शतकातील व्यामिश्र प्रश्नांना सामोरे जाताना, जटिलतेशी सामाना करताना सामाजिक जीवनाची उजळ बाजू समाजमानसासमोर यावी ही जमेची बाजू आहे असे मला वाटते. येऊ घातलेल्या आव्हानांशी तोंड देण्यासाठी आपणास लाभलेले हे पाथेय आहे.

विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात आणि एकविसाव्या शतकाच्या गेल्या दोन दशकांत विज्ञानयुगाने आणि तंत्रज्ञानाने आपल्या देशात मुसंडी मारली आपल्या राष्ट्रातील आण्विक शक्तीचा प्रत्यय आपल्या वैज्ञानिकांनी आणून दिला. मंगळावर यशस्वीरित्या यान पाठविले. आता तर इस्त्रो तर्फे नुकतीच चांद्रायण -३ या यानातर्फे चांद्रमोहीम नुकतीच यशस्वी झाली. राष्ट्रीय पुरुषार्थाचे दर्शन घडविणाऱ्यां या घटना खचितच सर्जनशील लेखक-कवींना नवी चेतना देणाऱ्या आहेत. डॉ.बी.जी. व्हर्गिज, डॉ एम.एस. स्वामिनाथन, डॉ. होमी जे. भाभा, डॉ. विक्रम साराभाई, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ ए.पी.जे अब्दुल कलाम, डॉ. वसंत गोवारीकर आणि डॉ. एस.सोमनाथ हे विज्ञान-तंत्रज्ञानयुगातील विक्रमी यशाचे मानदंड आहेत. यातील कृतिशील लिहित्या हातांनी स्वानभवकथन करून भोवतालच्या काळ्या ढगांवर रूपेरी महिरप निर्माण केलेली आहे. नेत्रदिपक वैज्ञानिक प्रगतीचा आलेख आपल्यासमोर त्यामुळे दृग्गोचर झालेला आहे. सकस विज्ञानसाहित्याची निर्मिती ही एकविसाव्या शतकाची मोठी देन आहे.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे wings of fire (अनुवादः अग्निपंख, अनु.डॉ.माधुरी शानभाग), 'Reinventing India' हा डॉ. रघुनाथ माशेलकरांचा भारतीयांना दीपस्तंभसारखा प्रकाशवाटा दाखविणारा आशावादी विचार देणारा भाषणांचा संग्रह, हर्ष हळदकर आणि डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी मिळून लिहिलेला, 'Exprovement: Exponential Improvement Through Converging Parallels' हा राष्ट्रबांधणीसाठी अभिनव संकल्पना सहजतेने सांगणारा स्फुर्तिदायक ग्रंथ ही सारी ग्रंथसंपदा म्हणजे कृतिशील प्रज्ञावंतांनी विज्ञान-तंत्रज्ञानयुगातील भारताला महाशक्ती बनविण्यासाठी आपल्या अनुभवसंपन्नतेचा दिलेला मौलिक दस्तऐवज आहे. आखिल मानवजातीच्या उन्नयनासाठीही तो तितकाच महत्वाचा आहे. अलीकडच्या कालखंडात आपल्या भारतात कोकण रेल्वेचा महत्वाकांक्षी प्रकल्प साकार झाला. भारतीयांसाठी ते एक स्वप्नच प्रत्यक्षात उतरले आहे. अत्याधुनिक यंत्रसामग्री आणि अद्ययावत तंत्रज्ञान यामुळे अनेक बोगद्यांतून वाट काढीत हा रेल्वेमार्ग दृढ प्रयत्नमुळे आकारास आला. कोकण रेल्वेचे 'चीफ इलेक्ट्रेकिल इंजिनियर' ईश्वरदास चोप्रा यांचा 'Building India –

Konkan Railway: My Golden Memories’ यांचा आत्मचरित्रात्मक ग्रंथ या भव्य प्रकल्पाचा खडतर प्रवास आकलन करून घेण्यासाठी अत्यंत उद्‌बोधक ग्रंथ ठरला आहे. कोकण रेल्वेचे मुख्य आधारस्तंभ ठरलेले राजाराम बोज्जी यांचा Future of Land Transportation हाही यासंदर्भात महत्त्वपूर्ण ग्रंथ ठरतो. कोकणरेल्वेचे ‘Master mind’ म्हणून गौरविले गेलेले ई. श्रीधरन् यांचे अखंडित परिश्रम शीघ्रगतीने ‘कोकणरेल्वे प्रकल्प’साकार करण्यास कारणीभूत ठरलेले आहेत. म्हणूनच तर राष्ट्रीय दळणवळणास सुविधा पुरविणाऱ्या आणि राष्ट्रीय एकात्मतेस कारणीभूत ठरलेल्या या शिल्पकाराचा मडगाव येथे भरलेल्या २२ व्या ‘गोमंतक मराठी साहित्यसंमेलना’ ने आवर्जून गौरव केला होता. हा क्षण या प्रसंगी स्मरणोज्जीवित करावासा वाटतो. एकविसाव्या शतकातील पुढील कालखंडात ज्ञानक्षेत्राबरोबर आपल्या राष्ट्रजीवासास नवीन आयाम प्राप्त करून देणारे विज्ञानयुग आणि तंत्रज्ञानयुग हे सर्जनशील साहित्यनिर्मितीचे नवीन क्षेत्र उपलब्ध होण्याची मोठी शक्यता निर्माण झाली आहे

एकविसाव्या शतकातील मराठी, हिंदी व इंग्रजी साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भाचा शोध घेताना भोवतालच्या दाहक वास्तवाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. वैषम्य वाटणारे अनेक घटक आपल्या समाजजीवनात आहेत. आपली मने कोंझी ठेवायची की मानवतेच्या उन्नयनासाठी आपली मने विशाल बनवायची हा विवेक आपल्याला जागवायचा आहे. ही विशाल भावना केवळ सर्जनशील साहित्यच निर्माण करू शकते.

एकविसाव्या शतकाच्या या वादळी वातावरणात माणूस एक बाजारपेठ बनला आहे. जगात परिवर्तन होत आहे. पण समाजात सुधारणा न होता कुधारणाच वाढत चालली आहे. अनेक सामाजिक प्रश्न सुटलेले नाहीत. जातीयता, धर्मांधता वाढत चाललेली आहे. शैक्षणिक दर्जा घसरलेला आहे. शिक्षणाचे माध्यम कोणते असावे याविषयी समाजाची एक वाक्यता झालेली नाही. समाजात सर्व थरांवरची शोषणप्रक्रिया चालली आहे. भाषाभेद, प्रांतभेद यामुळे भारतीय समाजास ग्रासलेले आहे. कुपोषणाची समस्या आहे. स्त्रियांचा होणारा अमानुष्य छळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, स्वतंत्र्य देशातही आदिवासींचे न सुटलेल्या समस्या, दहशतवादाचे उग्र स्वरूप, सामान्य माणसांचे जगण्याचे प्रश्न हे आजचे कठोर वास्तव आहे. ‘रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग’ या तुकारामांच्या अर्थपूर्ण वाणीत आजच्या सामाजिक जीवनातील संघर्षाचे स्वरूप प्रकट झालेले आहे.

पण या सर्वव्यापी दु:खावर मात करूनही लोकशाही मार्गाने वाटचाल करीत नवा भारत घडत आहे. जागतिक पातळीवर भारतीय संघराज्याने प्रगतीची घोडदौड चालवली आहे. सूत्रमय शब्दांत समर्थ भारताची मुद्रा कोणत्या क्षेत्रात उमटविली आहे, याचा उल्लेख येथे करणे आवश्यक आहे:

१) अवकाश संशोधन

२) आण्विक शक्ती

३) माहिती तंत्रज्ञान

४) कमी खर्चात उपलब्ध होणारी उत्तम औषध सामग्री

यावरून एकविसाव्या शतकाच्या पुढील कालखंडात भारतीय संघराज्य डॉ. रघुनाथ माशेलकरांसारख्या अनेक थोर वैज्ञानिकांनी भाकीत केल्यानुसार महासत्ता होईल यात तीळ मात्र शंका वाटत नाही. भारतीय समाजाला उन्नयनाची दिशा लाभेल. हे राष्ट्र बलशाली बनेल.

डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या ‘तरुणाईचे गाणे’, ‘मी व माझा देश भारत’ या कवितेतील ओळी उद्धृत करून या निबंधाचा शेवट करायचा आहे:

*या देशातील अब्ज लोकांपैकी मी एक*
*ही दृष्टी फक्त आता माझ्यात आलेली...*
*आणि या दृष्टीची ज्योत*
*थेट आत्म्यात आत पेटलेली...*
*असा आत्मा ही जगातील*

*सर्वात मोठी शक्ती असते...*
*आणखी कोणतीही शक्ती*
*तिच्यापुढे फिकीच पडते...*
*ही ज्योत मी सतत तेवती ठेवणार*
*देशाला माझ्या महाशक्ती बनविणार...*

**संदर्भसूची**


१. साहित्य,भाषा आणि समाजः मिलिंद बोकील, मौज प्रकाशन गृह, मुंबई २०१६
२. कला- समाज- संस्कृतीः दीपक घारे, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, मुंबई २०२३
३. कोवळी पानगळः डॉ. किशोर सानप, विजय प्रकाशन, नागपूर २०१३

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Dr. Kalpana Girish Gangatirkar | Socio-cultural Context in Perumal Murugan's One Part Woman: A Critique | 1 |
| 2 | Dr. Sanjay Pandit Kamble | Gender Discrimination in Shobhan Bantwal's The Forbidden Daughter | 4 |
| 3 | Dr. Girijashankar Mane<br>Dr. Mahadev Mokashi | Exploring the Interplay of Culture, Gender, Language, and Literature | 7 |
| 4 | Arun Duryodhan Pachore | Socio-Educational Vision in 21st Century as Reflected in Chetan Bhagat's Novel "Five Point Someone" | 10 |
| 5 | Dr. Suvarna Prakash Patil | Literature, Culture and Gender - 21st Century | 12 |
| 6 | Dr. K. Hanumantha Reddy<br>Dr. K. Ravi Sankar | Socio - Cultural Conflicts in the Novels of Kamala Markandaya | 16 |
| 7 | Dr. Siddeshwar Kamati | Gender Dynamics in Dystopian Indian Web Series | 19 |
| 8 | Mr. Sandeep Sambhaji Dhore | Popular Culture in the Age of Globalization : A Comprehensive Analysis | 24 |
| 9 | Mrs. Basawwa S. Bhagoji | Reader Reception of Graphic Novels in India: Exploring the Intersection of Visual Storytelling and Cultural Context | 27 |
| 10 | Dr. Manasi Gangadhar Swami | Understanding the Significance of Socio-cultural Values of Peace, Harmony and Tolerance in Sudha Murty's Old Man and His God | 32 |
| 11 | Mrs. Sunita J. Velhal | Socio-cultural Approach to Language | 35 |
| 12 | Anita Mukund Powar | Kavita Kane's Karna's Wife: Self-discovery of 'her' Through Cultural Conflict | 37 |
| 13 | Mr. Dipak Sitaram Sarnobat | Socio-Cultural Conflicts in Kiran Desai's Novel 'The Inheritance of Loss' | 39 |
| 14 | Mr. Sandip Ananda Patil | Socio-Cultural Diversities Reflected in Elif Shafak's Honour & The Forty Rules of Love | 43 |
| 15 | Mrs. Sarojini Bhupal Divekar | Chetan Bhagat's '2 States': Depiction of Strain in Diverse Cultures and Traditions | 47 |
| 16 | Smt. Rameshwari Avinash Kudale | Struggle of 'Self' in Traditional and Modern Culture in One Arranged Marriage Murder: A Psychoanalytical Exploration | 51 |
| 17 | Dr. Pushpa Govindrao Patil | Cultural Hegemony in Shashi Deshpande's Roots and Shadows | 54 |
| 18 | Mr. Dipak Chandrakant Devkar | Racism in Paul Beatty's novel 'The Sellout' | 57 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 19 | Shaikh Shaphik K. | The Portrayal of 21st Century Society and Culture in Novels | 59 |
| 20 | Dr. Suresh Tukaram Telvekar | Socio-Cultural Context in the Novels of Durjoy Datta | 62 |
| 21 | Umesh S. Desai | Subaltern Voice in Mahasweta Devi's Draupadi | 66 |
| 22 | Mrs. Sunita Amar Powar | A Study of Women Empowerment in the Novel 'One Indian Girl' of Chetan Bhagat | 68 |
| 23 | Mr. Sandeep Sitaram Hargane | Mental Illness: A Journey from the Circumference to the Centre of English Literature | 71 |
| 24 | Mr. Kiran Sampat Patil<br>Dr. P.N. Gore | Socio - Cultural Aspects In The Novels Of Alex Miller With Reference To Migration | 74 |
| 25 | Miss. Parit Rupali Mahadev<br>Dr. Kalpana Girish Gangatirkar | Socio Cultural Context Reflected in Mitali Perkins Young-Adult Fiction 'You Bring the Distant Near'. | 77 |
| 26 | Sugandha Agnihotri<br>Dr.Tanveer Khadija | Unquenched Thirst for Self Acceptance - An Insight Into The Works Of Kamala Das | 81 |
| 27 | Archana Singh<br>Rajendra Sarode | A Study of Psychosocial Analysis of Women characters in Anita Nair's 'Ladies Coupe' | 84 |
| 28 | Mr. Thombare Mansing Vitthal | Intersectionality in Dalit Literature with Special Reference to the Select Biographies - Bhimayana and Kanshiram | 88 |
| 29 | Ms.Rupali Gorakh Waghmare<br>Dr. Anil S. Sugate | Socio-Cultural Diversities Reflected in John Lanchester's 'Capital' | 91 |
| 30 | Swati Suresh Patil<br>Dr. Sonali Rode | Cultural Problems in Translation of Marathi Dalit Poems And Their Solutions | 93 |
| 31 | Miss. Saisimran Hidayat Ghashi | The Role of Literature in Shaping Socio-Cultural Norms in the 21st Century in India | 96 |
| 32 | Swati Eknath Kamble | Multiculturalism in Chetan Bhagat's One Night at the Call Centre and Two States: The Story of My Marriage | 98 |
| 33 | Ms. Archana Bhupal Nandagave | Changing Social And Cultural Scenario As Reflected In Sudha Murthy's Selected Works | 100 |
| 34 | Miss. Mukta Dattatray Patil | Socio-Cultural Context in Khushwant Singh's 'Train to Pakistan' | 102 |
| 35 | Smt. Shraddha Baburao Toraskar | Reflection of Gender Issues in Shashi Deshpande's Novels | 105 |
| 36 | Mrs. Vidya Vasant Bhosale<br>Mr. Mansing Vitthal Thombare | Knowledge and Imagination in Biography and Autobiography | 108 |
| 37 | Mr. Sourav Shamrao Desai | William Shakespeare's Hamlet and Vishal Bhardwaj's Haider Movie : A Compartive Study | 113 |
| 38 | Ganesh Jayvant Patankar | Socio- Cultural Context in Chetan Bhagat's Novel 'One Indian Girl' | 115 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 39 | Karishma Amir Jamadar | Literature , Culture and Gender | 119 |
| | | **Hindi Language Papers** | |
| 40 | डॉ. शोभा माणिक पवार | 21 वी सदी की कहानी साहित्य में सामाजिक एवं सांस्कृतिक संदर्भ | 123 |
| 41 | डॉ.विट्ठल शंकर नाईक | इक्कीसवी सदी की हिंदी कहानियों में लोक संस्कृति | 126 |
| 42 | डॉ. संगीता ठाकुर | 21 वीं सदी की हिंदी कविता में चित्रित मानव जीवन | 133 |
| 43 | डॉ. कल्पना पाटोळे | इककीसवी सदी के हिंदी उपन्यासों मे सामाजिक एंव सांस्कृतिक परिदृश्य | 137 |
| 44 | डॉ. सुनीता रावसाहेब हुन्नरगी | मनमोहन सहगल के उपन्यासों में चित्रित सांस्कृतिक परिदृश्य | 140 |
| 45 | डॉ. अशोक मोहन मरळे | 21 वीं सदी के हिंदी काव्य में सामाजिक एवं सांस्कृतिक परिदृश्य | 145 |
| 46 | श्री. मलगौडा पाटील | इक्कीसवी सदीं के हिंदी काव्य में सामाजिक और सांस्कृतिक परिदृश्य | 149 |
| 47 | प्रा. मारूफ समशेर मुजावर | इक्कीसवी सदी के हिंदी कथा साहित्य में चित्रित किन्नर विमर्श | 153 |
| 48 | प्रा. डॉ. रगडे परसराम रामजी | इक्कीसवीं सदी की आम्बेड़करवादी हिंदी कविताओं में सामाजिक परिद्रश्य | 157 |
| 49 | डॉ.रमेश शिवाजी बोबडे | इक्कीसवीं सदी के हिंदी नाटकों में सामाजिक एवं सांस्कृतिक परिदृश्य. (सर्वेश्वरदयाल सक्सेना के नाटको के संदर्भ में ) | 161 |
| 50 | डॉ. अमोल तुकाराम पाटील | 21 वीं सदी के उपन्यासों में परिवर्तित सामाजिक मूल्य | 164 |
| 51 | डॉ. माला कुमारी गुप्ता | कलि-कथा : वाया बाइपास : सामाजिक एवं सांस्कृतिक परिदृश्य | 166 |
| 52 | डॉ.सरोज पाटील | निर्मला पुतुल लिखित 'उतनी दूर मत ब्याहना बाबा' कविता का सामाजिक एवं सांस्कृतिक परिवेश | 170 |
| 53 | डॉ.प्रकाश आठवले | 'संघर्ष' में चित्रित सामाजिक संघर्ष | 174 |
| 54 | प्रो. (डॉ.) विजय महादेव गाडे | वेश्या विमर्श की पहल – कोठा नं. 64 | 178 |
| 55 | प्रा.सारिका राजाराम कांबळे | 'ग्लोबल गांव के देवता' : सांस्कृतिक परिदृश्य | 185 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 56 | डॉ. अनिता एस. कर्पूर | 'जिन्दगीनामा' उपन्यास में सांस्कृतिक परिदृश्य | 188 |
| 57 | डॉ. आरिफ शौकत महात | आदिवासी समाज जीवन में व्यक्त चेतना के विविध आयाम (आदिवासी कविता के संदर्भ में) | 192 |
| 58 | डॉ. विनोद श्रीराम जाधव | 21 वी सदी के उपन्यासों में सामाजिक व सांस्कृतिक चेतना | 200 |
| 59 | डॉ.माधव राजप्पा मुंडकर | 'शकुंतिका' उपन्यास का सामाजिक परिप्रेक्ष्य में मूल्यांकन | 205 |
| 60 | डॉ. प्रवीणकुमार न. चौगुले | इक्कीसवीं सदी के हिंदी काव्य में सामाजिक परिदृश्य | 209 |
| 61 | प्रा. संपतराव सदाशिव जाधव | 'मैं भी औरत हूँ' में समाज की संकुचित मानसिकता का भय | 216 |
| 62 | डॉ. हेमलता काटे | चंद्रकांता के उपन्यासों में चित्रित सांस्कृतिक बोध | 220 |
| 63 | डॉ. रूपा चारी | ज़ीरो रोड : एक दास्तान | 224 |
| 64 | डॉ. दीपक रामा तुपे | 'नयी सदी के स्वर' का सामाजिक परिदृश्य | 228 |
| 65 | डॉ. निशाराणी महादेव देसाई | 21वी सदी की हिन्दी कविता में चित्रित बदलते सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ | 232 |
| 66 | डॉ.महादेवी गुरव | 21वीं सदी के हिंदी उपन्यासों में सामाजिक और सांस्कृतिक परिदृश्य | 235 |
| 67 | अनिता संजय चिखलीकर | नासिरा शर्मा की कहानियों में नारी विमर्श | 238 |
| 68 | डॉ.अंजली उबाळे | अप्रवासी हिंदी उपन्यासों में सांस्कृतिक परिदृश्य | 242 |
| 69 | डॉ.भिकाजी व्हन्नाप्पा कांबळे | इक्कीसवीं सदी के हिंदी ग़ज़ल साहित्य में सामाजिक एवं सांस्कृतिक परिदृश्य | 246 |
| 70 | सुरज विठ्ठल डूरे | 21 वीं सदी के असगर वजाहत के नाटकों में सामाजिक एवं सांस्कृतिक परिदृश्य | 251 |
| 71 | अरुण विठ्ठल कांबळे | इक्किसवीं सदी के हिंदी काव्य में आदिवासी सामाजिक परिदृश्य | 254 |
| 72 | प्रमोद गणपती कांबळे | डॉ.जयप्रकाश कर्दम जी के 'तलाश' कहानी संग्रह में सामाजिक, विषमता का यथार्थ चित्रण | 258 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 73 | जहाँगिर स. शेख | इक्कीसवीं सदी के दक्खिनी हिन्दी लोक गीतों में सांस्कृतिक एवं सामाजिक परिदृश्य | 261 |
| 74 | श्रीमती वैशाली महादेव जाधव | 21 वी सदी के द्वितीय दशक के उपन्यासों में सामाजिक चेतना | 265 |
| 75 | संतोष जे सूर्यवंशी | इक्कीसवीं सदी के महिला नाटककारों के नाटकों में सामाजिक चेतना | 267 |
| 76 | सुश्री. माधुरी सचिन सोनुले | चंद्रकांत देवताले के कविताओं में सामाजिक परिदृश्य | 270 |
| 77 | सारीका शंकरराव धुमाळ | 'शिकंजे का दर्द ' आत्मकथा में चित्रित सामाजिक एवं सांस्कृतिक परिदृश्य | 274 |
| 78 | किशोरी सुरेश टोणपे | इक्कीसवी सदी के काव्य मे सामाजिक परीदृश्य | 278 |
| 79 | अनिल विठ्ठल मकर | निराशा की गर्त में फँसी पीढ़ी का हौसला बढ़ाती हुई आंतरजालीय कविताएँ | 281 |
| 80 | सुश्री. अर्चना वसंत तराळ | रजनी गुप्त के उपन्यास साहित्य में सामाजिक परिदृश्य (‘किशोरी का आसमाँ’ के संदर्भ में) | 286 |
| 81 | नम्रता नितीन काडगे | उषा प्रियवंदा की कहानियों में चित्रित नारी | 289 |
| 82 | कु.अपर्णा संभाजी कांबळे | इक्कीसवी सदी के हिंदी काव्य में सामाजिक एवं सांस्कृतिक परिदृश्य | 293 |
| 83 | डॉ. उत्तम राजाराम आळतेकर | इक्कीसवी सदी की हिंदी कविता में चित्रित समाज | 295 |
| 84 | ज्योती अरविंद देसाई | इक्कीसवीं सदी के हिंदी कहानी साहित्त्य में सामाजिक एवं सांस्कृतिक परिदृश्य | 298 |
| 85 | प्रा.डॉ. भारत बा. उपाध्य | इक्कीसवी सदी के हिंदी *कविता* में-राष्ट्रीयता,सामाजिक एवं सांस्कृतिक चेतना | 302 |
| | | **Marathi Language Papers** | |
| 86 | प्रा.डॉ. दत्ता पाटील | माध्यम संस्कृतीचा दस्तऐवज : 'काळ'मेकर लाईव्ह | 306 |
| 87 | प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील | २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकातील मराठी कादंबरीचा सामजिक आणि सांस्कृतिक अंगाने अभ्यास | 309 |
| 88 | डॉ.दीपक वळवी | आदिवासी कवितेचे सांस्कृतिक स्वरूप | 312 |
| 89 | डॉ. चंद्रकांत पोतदार भगवंत पोतदार | एकविसाव्या शतकातील मराठी कविता : सामाजिक संदर्भ | 316 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 90 | डॉ.भरत भीमराव जाधव | मराठी साहित्य आणि संस्कृती अभ्यास : एक आकलन | 322 |
| 91 | डॉ. युवराज देवाळे | मराठी कथेतील प्रगल्भ समाजभान : एक दृष्टिक्षेप | 329 |
| 91 | प्रा.(डॉ.) प्रशांत गायकवाड | गौतमीपुत्र कांबळे यांच्या कथेतील विविध कलांमधील प्रतिकात्मकता | 332 |
| 92 | डॉ.नामदेव कृष्णा मोळे | कृष्णात खोत यांच्या कादंबरीतील समाजचित्रण | 336 |
| 93 | प्रा. डॉ. नामदेव सोडगीर | एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कवितेतील कृषिविषयक जाणीवा | 340 |
| 94 | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | २१ व्या शतकातील 'अनवट वाटा' कवितासंग्रहातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 347 |
| 95 | प्रा. डॉ. राम धारासूरकर | फासेपारधी समाजाचे दु:ख उजागर करणारे आत्मकथन - "विंचवाचं तेल" | 355 |
| 96 | प्रा.डॉ. अनिल एस. कांबळे | २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 358 |
| 97 | डॉ. शिंदे दुष्यंत आनंदराव | मराठवाड्यातील नवबौद्धांच्या वेदनांची वास्तव अभिव्यक्ती : बहिष्कार | 361 |
| 98 | डॉ. पुर्णानंद च्यारी | प्रकाश वजरिकार हांच्या 'होमखण' नाटकांतले समाजीक आणी संस्कृतीक संदर्भ | 365 |
| 99 | प्रा.डॉ.रमेश पांडुरंग पोळ | चाळेगत एक सामाजिक सांस्कृतिक व्यूह | 371 |
| 100 | डॉ. विठ्ठल नामदेव रोटे | नव्वदोत्तर मराठी कथेतील वृध्दांच्या समस्यांचे चित्रण | 374 |
| 101 | डॉ. पांडुरंग गावडे | सुभाष भेंडे यांच्या कादंबरीतील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ | 377 |
| 102 | प्रा. डॉ. मीनाक्षी देव – निमकर | २१ व्या शतकातील मराठी कवितेतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ (२०११ ते २०२३ या कालखंडातील युवा साहित्य अकादमी पुरस्कार पाप्त मराठी कवी आणि त्यांच्या साहित्यकृतीच्या अनुषंगाने) | 380 |
| 103 | डॉ. विनायक शरदचंद्र राऊत | एकविसाव्या शतकातील मराठी गझलेतील सामाजिक संदर्भ | 385 |
| 104 | डॉ. बाळासो आण्णा सुतार | साहित्य, समाज आणि संस्कृती आणि नव्वोदत्तरी मराठी कविता | 392 |
| 105 | प्रा. डॉ. शहाजी ज.पाटील | एकविसावे शतक आणि मराठी ग्रामीण कवितेतील जाणीवा | 396 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 106 | प्रा. प्रदिप प्रकाश कदम | एकविसाव्या शतकातील स्त्रीमनाचे पदर उलघडणारे 'देवबाभळी' संगीत नाटक : एक चिकित्सा | 400 |
| 107 | प्रा.डॉ.पांडुरंग जगन्नाथ ऐवळे | 'एकटी ' काव्यसंग्रहातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 403 |
| 108 | डॉ संभाजी धोंडीराम कदम | राव कादंबरीतील सामाजिक संदर्भ | 407 |
| 109 | प्रा. निलेश नामदेव कांबळे | २१ व्या शतकातील दलित मराठी कादंबरीतील सामाजिकता व सांस्कृतिक संदर्भ | 410 |
| 110 | प्रा. उदय बाळासो शिंदे | २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतून येणारे धनगर समाजतील स्त्री चित्रण | 412 |
| 111 | डॉ.तुळशीराम उकिरडे | दलित कवितेतील सामाजिकता | 414 |
| 112 | डॉ. मांतेश हिरेमठ | समकालीन कवितेतील बदलते सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 418 |
| 113 | प्रा.डॉ.बाबासाहेब नाईक | 21 वे शतकातील स्त्रियांच्या समस्या (रोहिणी कुलकर्णी यांच्या कादंबऱ्यांच्या आधारे) | 422 |
| 114 | डॉ.कु.कोकिळा हनुमंत चांगण | २१ व्या शतकातील स्त्रीलिखित मराठी कथेतील काही सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 425 |
| 115 | डॉ.लक्ष्मण शिंदे | २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील सामाजिक - सांस्कृतिक संदर्भ | 428 |
| 116 | प्रा.डॉ.सविता अशोक व्हटकर | २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील शेतकऱ्यांच्या जीवनातील सामाजिक संदर्भ (बारोमासच्या अनुषंगाने) | 433 |
| 117 | डॉ प्रियांका कुंभार | व्यक्तिचित्रणात्मक ललितगद्यः 'लोकपरंपरचे शिल्पकार' | 437 |
| 118 | डॉ.वैशाली श्रीकांत गुंजेकर | २१ व्या शतकातील ग्रामीण कादंबरी | 441 |
| 119 | श्रीमती प्रतिभा भारत पैलवान | 'सीतायन' या ललित संग्रहातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 445 |
| 120 | श्री.रघुनाथ चंदर गवळी | आदिवासी कवितांमधील सामाजिक समस्यांचे चित्रण | 448 |
| 121 | प्रा.डॉ.देसाई अजित यल्लाप्पा | एकविसाव्या शतकातील शिक्षणव्यवस्थेचे वेगळे रूप दाखीवणारी कादंबरी म्हणजे निशाणी डावा अंगठा | 452 |
| 122 | प्रा. अविनाश भोरे | २१ व्या शतकातील मराठी ख्रिस्ती कथेतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 455 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 123 | प्रा.डॉ. जयकुमार चंदनशिवे | २१ व्या शतकातील स्त्रीवादी कादंबरीतील सामाजिक संदर्भ | 458 |
| 124 | प्रा. डॉ. शैलजा श्रीधर शिंदे | दलित आत्मकथनांमधील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ आत्मकथनांच्या परिप्रेक्ष्यातून | 460 |
| 125 | प्रा. अमर विलास डोणे | फिंद्री या कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 463 |
| 126 | प्रा.डॉ.शिवाजी सटवाजी वाघमारे | "माझी मुंबई अर्थात् मुंबई कोणाची" रूप आणि आविष्कार | 466 |
| 127 | डॉ. लक्ष्मण भानुदास साठे | ब, बळीचा व बारोमास या कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 469 |
| 128 | प्रा. संदीप परदेशी | “पेटलेल्या शहराच्या कल्लोळात”- अस्वस्थ वर्तमानाला शब्दबद्ध करणारी कविता | 473 |
| 129 | श्रीमती व्हसमने सुरेखा बसाप्पा | २१ व्या शतकातील मोहन पाटील यांच्या कादंबरीतील बदलते सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 476 |
| 130 | प्रा.पुरुषोत्तम प्र.सूर्य | “परोपकारी श्याम” या बालकादंबरीतील स्त्रीव्यक्तिरेखांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास | 479 |
| 131 | भरत शिवाजीराव गायकवाड | तृतीयपंथीयांच्या कवितेतील विद्रोही भूमिका ( विशेष संदर्भ : दिशा पिंकी शेख यांचा कुरूप कविता संग्रह ) | 484 |
| 132 | नर्मदा रामा कूराडे | २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 490 |
| 133 | नमिता अनिलकुमार पाटील | मराठी कवितेतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 494 |
| 134 | मयुरी ऋषिकेश मोरे | २१ व्या शतकातील मराठी साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 497 |
| 135 | शैला आनंदराव क्षीरसागर | लक्ष्मण गायकवाड यांच्या 'चिनी मातीतील दिवस' प्रवासवर्णनामधील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 499 |
| 136 | कु . आशा संभाजी पांढरे<br>डॉ .डी. आर.गायकवाड | मराठी साहित्यातील चरित्र आत्मचरित्रलेखन : एक अवलोकन | 502 |
| 137 | शीतल योगेश पाटील | ‘लमाण’ आत्मचरित्रातील सामाजिक संदर्भ | 506 |
| 138 | श्री. विलास सखाराम सुर्वे | एकविसाव्या शतकातील मराठी वैचारिक साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक कार्य | 508 |
| 139 | स्मिता कोंडिबा कालभूषण | ‘ठष्ट’ नाटकातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 512 |

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 140 | प्रा. लक्ष्मी नरहरी पवार | 'देवबाभळी' या नाटकातील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ | 517 |
| 141 | प्रा. फकरूद्दीन न. पटेल | ‘औरंगजेब आणि जोशी’ या कथासंग्रहातील सामाजिक व सांस्कृतिक समाजजीवनाचे चित्रण | 520 |
| 142 | प्रा. डॉ. विपीन नारायण वैराट | फकिरा : एक आकलन सांस्कृतिक संदर्भान्वे | 522 |
| 143 | श्री.सोमेश्वर बबन ढगे | ‘ठोंब्या’या बालकादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ | 526 |
| 144 | प्रा. मनिषा एस. पाटील | संत साहित्यातील पर्यावरण प्रेम : कुणबीपणाच्या विशेष संदर्भात | 530 |
| 145 | प्रा.डॉ.मानसी जगदाळे | शिवारमातीतल्या सुखदु:खांचे संकेतस्थळ : 'शिवार माती डॉट कॉम' | 533 |

# Socio-cultural Context in Perumal Murugan's *One Part Woman*: A Critique

**Dr. Kalpana Girish Gangatirkar,**
Associate Professor, Department of English
Mahavir Mahavidyalaya, Kolhapur Affiliation – Shivaji University, Kolhapur.

**Abstract**

*Perumal Murugan's novel One Part Woman, originally written in Tamil Madhorubagan portrays the agony of Kali and Ponna due to childless stature and the rigid societal norms and assumptions. The paper deals with the theme of socio-cultural context in which the couple suffers and the various unworthy traditions the woman has to undergo in order to keep her status intact in society. The novel explores how a community's pathological obsession estranges a loving couple and breaks up their happy marriage. The paper also throws light on right to freedom of expression of an author, as the novel has created controversy.*

***Key words***: *Socio-cultural context, gender, social stigma, tradition, rituals, freedom of expression.*

*One Part Woman*, by Perumal Murugan originally written in Tamil titled *Madhorubagan* was published in 2010. It is translated by Anirudhan Vasudevan and is published in 2013 by Penguin Publications and in 2018 in the U.S.A. by Grove Atlantic. Anirudhan Vasudevan was awarded Sahitya Academy Translation Prize (2016) for this book.

Perumal Murugan is an author, poet and Professor of Tamil. He has written twelve novels, six collections of short stories, six anthologies of poetry and thirteen non-fiction books. Ten of his novels have been translated into English.

The present novel is Murugan's fifth novel set in his native town of Tiruchengode in Tamil Nadu. It tells a tale of a couple who unfortunately fall prey to the social norms and assumptions and make their lives miserable. An individual can not live as an individual in the society. He becomes a social being. Traditions, rituals, religion, caste, class, gender and so many other things affect the individual's life. This paper aims to analyze critically the novel in the socio-cultural context.

Socio-cultural context determines the lives of human beings in a particular community. India, being a multicultural country, reflects a mosaic of different cultures. Socio-cultural context is an essential part of any society and is made up of several factors including location, background, traditions, religion and rituals, beliefs and cultural practices and the structure of the society. Each of these items affects how the writer represents world in his text and how a reader looks at and understands what is happing in that text. Socio-cultural characteristics are the forces within a society that influence the thoughts, beliefs and feelings of the individual. The writer and the reader belong to the same society. The paper meditates over the freedom of expression of the writer.

The novel is set in the Tiruchegode town in Tamil Nadu. The main characters in the novel belong to Korigu Vellalar Gounder caste. The traditional roles of this community are agriculture and cattle rearing. They belong to the lower caste in Tamil Nadu. Perumal himself belongs to the same caste. Ponna and Kali are a couple in Gounder caste married for twelve years but childless. Ponna is a doting, obedient and subservient wife and Kali treats her with utmost affection. We witness the pleasure, the intimacy, the attraction and love between Kali and Ponna but because of childlessness, their lives have become stagnant. They face societal isolation as they can not give birth to a child. They are subject of the poignant taunts of family members and neighbours. They have visited different temples and different Gods, Ponna did the difficult tasks like climbing hills of rocks to please Gods, but all their offerings and prayers have not been yet fruitful.

> *"In the matter of offering prayers, Kali and Ponna left no stone*
> *unturned. They did not discriminate between small and big*
> *temples. They promised an offering every god they*
> *encountered .... for forest gods it was a goat sacrifice ....*
> *for the temple gods it was Pongal .... for some gods*
> *the promises even doubled." (One Part Woman p.47)*

Ponna is insulted several times. She can not take part in various functions as she is barren. Once her neighbour Thangavel's wife requests her to sow seeds and unfortunately that year his land doesn't yield much. Ponna was blamed for the same. But Ponna Answers –

> *"You said you were in severe pain and begged me to go.*
> *That's why I carried the seeds. Do you think I am obliged*
> *to go and work in your field? I might be barren but*
> *nothing I have touched has ever withered. The plant*

*I planted is flowering now, the tree, I planted is bearing*
*fruit, the calf I brought has grown and birthed many of its*
*own, and the egg that I helped incubate has hatched*
*a beautiful chick ….. there is nothing I have touched*
*that has not flourished. Anything sowed in a dry land*
*will go waste, no matter who helps in carrying the seeds.*
*If you, wife and husband has taken better care of the land,*
*maybe it would have all grown." (One Part Woman p.90)*

The rath of Ponna is expressed here.

Kali has been advised by his friends, family members for a second marriage. Kali's friend says –

*"That how some cows are – No matter what they do never*
*get pregnant, just charge the cow If you say yes, I can fetch*
*you right now" (One Part Woman p.14)*

Kali is committed to Ponna and so rejects the idea of remarriage. Being childless is an Indian Society is like a curse. It is believed that a woman's life is incomplete without motherhood. In India in patriarchal societal form, there are different duties assigned to 'men and women.' And the most important role assigned to woman is being a mother. Being childless is always the blame of a woman in Indian society. Being a mother is being a complete woman. This mother metaphor is a patriarchal construct. Even Goddess is seen in the form of 'Mother.' Hence, barren women are marginalized from culture and are oppressed. In this context, Simone de Beauvoir says that woman is nothing but constituted only of womb. She states,

*"It is through motherhood that woman fully achieves*
*her physiological destiny; that her 'natural' vocation,*
*since her whole organism is directed towards the*
*perpetuation of the species" (p.597)*

Female body is seen as a reproductive machine which has to perform its function. What happens to a body when fails to adhere to the social, religious and familial expectations? So, it is essential, for Ponna to prove her woman hood only by becoming a mother.

Now the only way to become a mother is to follow the social tradition of going to the chariot festival of *Ardhanreeshawara.* (Shiva) where on 14th day of the festival societal values related to extramarital relations and social taboos are relaxed and consensual intercourse between strangers is permitted order to get a child. It is ancient cultural practice among people living around Tiruchengode. Regarding this Romia Thapar comments "This novel is a story of a childless couple with a strong desire of having a child depicted with admirable sensitivity anguish and gentleness." Kali detests this idea as he loves Ponna passionately and has possession over her. Ponna is ready to go only if Kali permits. Kali is emotionally hurt to know that Ponna is ready to follow this tradition in order to get a child.

आदिवासी कवितेच्या स्वरूपाबाबत विचार करताना पुढील काही महत्त्वाच्या विशेषांचा विचार करणे महत्त्वाचे वाटते. कारण प्रस्तुतच्या विशेषावरूनच आदिवासी कवितेचे स्वरूप खऱ्या अर्थाने स्पष्ट होण्यास मदत होणार आहे. आदिवासी कवितेच्या स्वरूपाबाबत विशेष कारणीभूत असणाऱ्या घटकांमध्ये जीवनदर्शन आणि सांस्कृतिकता हे महत्त्वाचे घटक होत. आदिवासी कवितेतून व्यक्त होणाऱ्या जीवनाचे विविध पैलू असून त्यामध्ये आदिवासींचे सामाजिक जीवन आणि सामाजिक जीवनाच्या अनुषंगाने येणारी आदिवासींची ऐतिहासिकता, प्रादेशिकता, सामूहिकता, अज्ञान, शोषण, दारिद्र्य, आगतिकता, कौटुंबिकता, आधुनिकता, संघर्ष, परिवर्तन आणि स्त्री जीवन याचा संदर्भ घेणे महत्त्वाचे वाटते. आदिवासींच्या सांस्कृतिकतेचा विचार करता आदिवासी कवितेतून चित्रित होणाऱ्या श्रद्धा, अंधश्रद्धा, लोकगीतं, लोककथा यांचा समावेश होताना पहावयास मिळतो.

आदिवासी कवितेच्या स्वरूप विशेषातील ऐतिहासिक जीवन हा महत्त्वाचा विशेष अनेक आदिवासी कवींनी स्वीकारला आहे. कारण आदिवासी रा शब्दात प्रथम वास करणारे असा अर्थ अभिप्रेत होतो. आदिवासी हे या देशाचे मूळ रहिवासी आहेत. भारतातील आर्यांचे आगमन मूळ आदिवासींवर अन्याय करणारे होते. आर्य आणि भारतातील आदिवासी यांच्यातील संघर्ष यामुळे आदिवासींना आर्यांनी जंगलात राहण्यास भाग पाडले याचे अनेक पुरावे भारतीय संस्कृतीच्या इतिहासात पहावयास मिळतात. प्रस्तुतच्या ऐतिहासिकतेच्या संघर्षाचे चित्रण अनेक आदिवासी कवींच्या कवितेत आलेले आहे. आदिवासी जीवनातील समृद्धमय वीरांचा इतिहास अनेक आदिवासी कवींनी जपून ठेवलेला आहे. परंतु काही इतिहास विद्वानांनी जाणूनबुजून लपवून ठेवलेला इतिहास पुन्हा स्मरावे. समृद्ध इतिहासाच्या आदिवासींनी विचार करावा म्हणून कृष्णकुमार चांदेकर यांची प्रस्तुतची कविता मार्गदर्शक ठरते.

*"शोधारचे आहे तुम्हाला...*
*भिलपुत्र एकलव्राच्रा अंगठ्याचे कारण"1*

आदिवासींच्या ऐतिहासिक जीवनाकडे पाहिल्यास पूर्वीच्या स्वातंत्र्यात जगणारा आदिवासी सुखाने आनंदाने जगत होता. परंतु व्यवस्थेच्या प्रवाहाबरोबर तो आपले स्वातंत्र्य हरवून गुलामगिरीत अडकला आहे. परंपरागत चालत आलेल्या गुलामगिरीतून आजही त्याची सुटका झाली नाही हे वर्तमान वास्तव जीवन लक्ष वेधून घेणारे आहे. जंगलचे राजे असलेल्या आदिवासींची खरी सत्ता जंगलावरची आहे. मात्र हाच जंगलचा राजा स्वत:च्या जंगलापासून दूर घालवलेला दिसून येतो. आदिवासींवर लादलेला वनवास स्वार्थी लोकांवर आधारित असल्यामुळे आदिवासी कवी ही आपली भावना ऐतिहासिक संदर्भ घेवून व्यक्त करतो. दारिद्र्याच्या जवळ जाण्यास कारणीभूत घटक म्हणूनही आदिवासींचा ऐतिहासिक संदर्भ महत्त्वाचा आहे. ऐतिहासिक वैभवाने जीवन जगणारा आदिवासी आजच्या काळातही तसाच जगत रहावा हा आशावाद अनेक कवींनी आपल्या कवितेतून प्रकट केलेला आहे. वर्तमान काळातील जीवघेण्या समस्यांना प्रतिकार करू न शकणारा आदिवासी आपोआपच आपल्या पूर्वजांच्या स्मृती आठवून समाधान व्यक्त करून जीवन जगतो. परंतु प्रसंगी संधी मिळताच आपला प्रतिकारही तो व्यक्त करतो.

आदिवासींच्या इतिहास संदर्भात होणारे वस्तुविनिमय व्यवहार प्रामाणिकपणे केले जात होते. ससे, होले यांच्या विक्रीनंतर त्याच्यामध्ये मीठ मिरची इत्यादी वस्तू घेतल्या जात होत्या. मात्र हाच व्यवहार आता पैशाच्या रूपात होऊ लागल्यामुळे अनेक अज्ञानी आदिवासींची यातून फसवणूक होताना दिसते. आदिवासींच्या समृद्ध इतिहासाला सुरुंग लावणाऱ्या घटनांचा वास्तव संदर्भ देताना आदिवासी कवी भुजंग मेश्राम म्हणतात,

*"ते आले तेव्हा त्यांचेकडे भटकंती होती आणि*
*आमच्याकडे इतिहास.*
*ते म्हणाले, 'आपण सर्वच करू आदलाबदल*
*अन् बदलू जग.' केला विश्वास, आता त्यांचेकडे आहे इतिहास अन्*
*आमचेकडे विमुक्ती"2*

आदिवासींच्या समृद्ध ऐतिहासिकतेचा झालेला पराभव येथे सूचित होतोच. पण त्याबरोबरच आदिवासींच्या भोळ्याभाबड्या स्वभावाचा गैरफायदा घेणारे बुद्धिजीवी वर्ग यांचे कट कारस्थानही स्पष्ट होते. आदिवासींचा हिसकावून घेतलेला परंपरागत समृद्ध इतिहास पुन्हा निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या कवींचा ध्यास महत्त्वाचा वाटतो. सूर्याच्या तेजाच्या किरणांचा इंद्रधनुष्य स्वीकारून जागृत आदिवासी कवयित्री नवा इतिहास लिहिण्याचा विचार करताना म्हणते.

*"आता मीच होणार आहे एक इंद्रधनु*
*आणि रंगवून काढणार आहे*
*माती आड दडलेली... नव्हे गाडून*
*टाकलेली माझी धर्म संस्कृती आणि*
*माझा सुवर्ण इतिहास... गोंडवनातला।"3*

आदिवासी जीवनातील प्रादेशिकतेचे काही संदर्भ कवितेतून चित्रित होतात. आदिवासी कवितेच्या स्वरूपात आदिवासींची स्वतंत्र आणि वेगळी प्रादेशिक वैशिष्ट्ये स्पष्ट होतात. आदिवासी कवींनी आपल्या कवितेतील जीवनदर्शनाची मांडणी करताना ज्या प्रादेशिक विभागात त्यांचे वास्तव्य आहे तेथील काही संदर्भ घेतले आहेत. कारण आदिवासी ज्या वस्त्यांमध्ये आपले जीवन जगतात ते जीवन म्हणजे महाराष्ट्रातील सह्याद्री, सातपुडा आणि विंध्य पर्वत रांगामधील डोंगर, दऱ्या, मैदाने, जंगले येथील जीवन होय. कवितेची मांडणी करताना प्रादेशिकतेतील जीवन अभिमानाने मांडताना पहावयास मिळतात.

आदिवासी समाज ज्या एका विशिष्ट प्रादेशिक पर्यावरणात राहणारा आहे. त्याची पार्श्वभूमी लाभलेली प्रादेशिकता, प्रादेशिकतेतील जीवन, जीवन जगणाऱ्या आदिवासींचे एकमेकांबद्दल असणारे जिव्हाळ्याचे संदर्भ, निसर्ग, निसर्गाचा आदिवासींवर होणारा अनुकूल आणि प्रतिकूल परिणाम यांचे अनेक प्रादेशिक संदर्भ आदिवासी कवींच्या कवितेत आलेले आहेत.

डोंगर, दऱ्यातील जंगलात एखादे मधाचे पोळे ज्या पद्धतीने एकाकीपणे जीवन जगते त्याच पद्धतीने आदिवासींची गावे डोंगर कपारीत वसलेली असतात. डोंगर पर्वतावरून येणारा सूर्याचा पहिला किरण त्यांच्या जीवनाची सुरुवात करतो आणि डोंगर कपारीतील सूर्यास्ताचा शेवटचा किरण त्यांची जीवन पद्धती बंदिस्त करतो. प्रादेशिक विभागाच्या आधाराने जगणाऱ्या बहुतेक आदिवासींना संबंधित परिसरातील सावकाराच्या मोलमजुरीवर अवलंबून रहावे लागते. संबंधित सावकाराने ठरवून दिलेल्या मजुरीवरच त्यांना समाधान मानून सावकाराचा अन्याय स्वीकारावा लागतो. न परवडणारी मजुरी नाकारल्यास सावकार तालुक्याच्या गावी निघून गेल्यास त्या दिवशी उपाशी रहावे लागते. कारण संबंधित प्रादेशिकतेतील शेतीच्या मजुरीवर त्याची दैनंदिनी अवलंबून असते.

प्रादेशिक जीवनातील महत्त्वाचा भाग म्हणजे परिसरात होणारे आठवडी बाजार होय. आठवड्यासाठी लागणाऱ्या वस्तूंची देवाण-घेवाण याच बाजाराच्या आधारावर चालते. आदिवासी मुलांची शिक्षणाची इच्छा असूनही आदिवासी पालक आपल्या पाल्यासाठी पाटी आणि दप्तर घेण्याबद्दल उदासीन असतात. त्यातूनही मुलांनी अधिकच आग्रह केला तर त्याच प्रादेशिक बाजारातून आदिवासी मुलगा पाटी व दप्तर खरेदी करून शाळेत प्रवेश घेताना पहावयास मिळतो.

आदिवासी कवितेच्या जीवन दर्शनातील आदिवासी समाजाची सामूहिकता लक्ष वेधून घेणारी आहे. आदिवासींची जीवनपद्धती सामूहिक स्वरूपाची असून दैनंदिनीतील प्रत्येक व्यवहार सामूहिकतेवरील विश्वासावर अवलंबून असतो. अनेक आदिवासी कवींनी आदिवासी समाजाच्या सामूहिकतेचे संदर्भ घेऊन आपल्या कवितांची मांडणी केल्याचे निदर्शनास येते.

आदिवासी समाज आपली जीवनपद्धती सामूहिकतेने जगतो. डोंगरातील भ्रमंती, मासेमारी, शेती, बाजारातील खरेदी-विक्री, श्रद्धा, अंधश्रद्धा, सण, उत्सव साजरे करताना त्यांची सामूहिकता स्पष्ट होते. परंपरागत दु:खी वेदना तो सामूहिकपणे स्वीकारून त्याचा सामूहिक पातळीवर प्रतिकार करतो. आदिवासी कवींनी आदिवासी समाजातील माणसाकडे पाहिल्यास त्याच्या चेहऱ्यावर दु:ख दारिद्र्याची भावना स्पष्ट होताना दिसते. समग्र आदिवासी समाजाने अन्याय सहन करूनच जगले पाहिजे. हे त्याच्या मनावर बिंबवल्यामुळे संघर्ष करण्याची इच्छा असताना आदिवासी समाज सामूहिक पातळीवर संघर्ष करत नाही.

सामूहिक वेदनेचे जीवन जगताना ज्या वेळी त्याची सहनशीलता संपते तेव्हा मात्र हा आदिवासी समाज सामूहिक पद्धतीने संघर्ष करण्याचा प्रयत्न करतो. तसेच बाह्य परिवर्तनामुळे दूषित झालेली आदिवासी संस्कृती पुन्हा नव्याने समृद्ध करण्याची इच्छा व्यक्त करतो. अत्याचार झालेल्या आदिवासी समाजाला पुन्हा धैर्यवान बनून सामूहिक संघर्षात सहभागी होण्याचा प्रयत्न केला जाताना पहावयास मिळतो आणि याच सामूहिकतेबद्दलच्या संघर्षासाठी भावना व्यक्त करताना उषाकिरण आत्राम म्हणतात,

*"आमचा प्रकाश आम्हीच होवू।*
*पर प्रकाशी कधी न राहू*
*गोंडवाना जगवा - परकियांना भगवा॥"4*

प्रस्तुतच्या सामूहिकतेतून कवयित्रीने आदिवासी बंधू-भगिनींना एकत्रीत येऊन सामूहिकतेची ताकद दाखवण्याचा प्रयत्न केला पाहिजे हे सांगितले आहे.

शहरी संस्कृतीतील विद्वान लोक जंगलातील पर्यावरणाचा अभ्यास करण्यासाठी जंगलात आल्यानंतर सामूहिक पद्धतीने चालणाऱ्या आदिवासी समूहाकडे पाहताच त्यांना जनावरांची आठवण होऊन प्रतिकूल प्रतिक्रिया देताना म्हणतात, 'ही माणसं आहेत का जनावरं! परंतु या आदिवासींना जनावराचं जीवन जगण्यास आपणच भाग पाडले आहे हे ते विसरतात. आदिवासी समूह त्यांच्याकडे साशंक नजरेने पाहतो आणि निघून जातो. कारण त्यांना जाणीव होते हीच माणसे आपल्या दु:खाची, वेदनेची कारणे आहेत.

परंपरागत दु:खाची आणि वेदनेची जाणीव होऊनही यांच्याकडे बघताना काहीही प्रतिक्रिया व्यक्त करत नाही. त्यामुळे आदिवासी कवी आदिम सामूहिकतेला आवाहन करून या समूहाचे प्रतिनिधित्व करताना म्हणतो,

*"म्हणूनच मी आक्रोशतोय*
*तुमच्या आकंठ वेदनांसह*
*स्वत:लाही वेदनांच्या स्वाधीन करून"5*

सुनिल कुमरे प्रमाणेच प्रत्येक आदिवासी कवी आदिवासी समाजाचे सामूहिकत्व स्वीकारून पिढ्यांपिढ्या चालत आलेल्या बंधनातून मुक्तता करण्यासाठी कवितेच्या माध्यमाचा वापर करताना दिसतात.

आदिवासी समाजजीवनाच्या अभिव्यक्तीत शोषणात्मकता हा एक महत्त्वाचा विशेष आदिवासी कवितेतून ठळकपणे दिसून येतो. परंपरागत शोषण पद्धत आजही अखंडपणे चालू असल्याची अनेक उदाहरणे पहावयास मिळतात. आदिवासींच्या स्वत:च्या मालकीची शेती असून त्याच्या अज्ञानाचा सावकाराने गैरफायदा घेऊन बळकावल्यामुळे आदिवासींना त्याच सावकाराच्या शेतीतील मजुरीशिवाय पर्याय नसतो.

आदिवासी पती-पत्नी वेगवेगळ्या ठिकाणी मजुरीसाठी जातात. मजुरीच्या ठिकाणी असलेल्या एखाद्या झाडाच्या सावलीत मजुरीचे काम अर्धवट सोडून रडणाऱ्या बालकाकडे धाव घेतल्यास कामावर लक्ष ठेवणारा सावकार मजुरी कमी देण्याची भाषा वापरतो. त्यामुळे रडणाऱ्या बालकाकडे दुर्लक्ष करूनच आदिवासी स्त्रिला मजुरी करावी लागते. आदिवासी परिसरातील प्राथमिक शाळेत जाणाऱ्या मुलांकडून संबंधित शिक्षक दिवाळी सुट्टीनंतरच्या शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांनी भुईमुगाच्या शेंगा, हुरडा, तीळ आणि हरभरा भेट म्हणून आणलेला आहे का? याची चौकशी करतात. दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या काही आदिवासी मुलांनी शिक्षकांना काही वस्तू भेट दिल्या नाही तर त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते. अशा या शिक्षण क्षेत्रातील शोषणात्मक जीवनाचे काही संदर्भ आदिवासी कवितेतून व्यक्त होतात.

पुरुषांच्या शोषणाबरोबरच आदिवासी स्त्रियांचेही अनेक प्रकारे शोषण केले जाते. आदिवासी स्त्रिया घरातील पती, जन्म देणाऱ्या वडिलांच्या मारहाणी बरोबर समाजातील काही जबाबदार सरकारी कर्मचाऱ्यांच्या शोषणाला बळी पडतात. मजुरीसाठी जंगलात गेल्यानंतर सावकार, जमीनदार, रेंजर सर्व तिला आपल्या हक्काची मालमत्ता समजून वाईट वागणूक देतात. प्रस्तुतच्या शारीरिक आणि मानसिक शोषणाबरोबरच बेकारी, दारिद्र्य, अज्ञान, व्यसनाधीनता आणि निरक्षरता ही आणखी काही आदिवासींच्या शोषणाची कारणे सांगता येतील. अशा या शोषणात्मकतेच्या विविध पातळ्यांबद्दल जीवनाचा वेध घेताना उषाकिरण आत्राम आपल्या कवितेतून मांडणी करताना म्हणतात,

*"कष्टाले सावकार, जमीनदार, रेंजराकडे जातो*
*तवा ते बी हुंकते अजुबाजुले*
*त्यांना बी वाटते मी त्याचीच...!"6*

आठवडी बाजारात जाणाऱ्या आणि मोहफुलांची विक्री करणाऱ्या स्त्रियांचे बाजारातील दलाल वेगवेगळ्या नवनवीन पद्धतीने शोषण करतात. मीठ, मिरची, जिरे, मोहरी याच्या बदल्यात दुप्पट फायद्याने चारोळे आणि मोहफुले हिसकावून घेतात. मानवतेचा लवलेशही येथील बाजारातील सावकारांच्या आणि दलालांच्या स्वभावात नसतो. शोषणाच्या या नव्या पद्धतीमुळे भारताला स्वातंत्र्य मिळूनही आदिवासींची शोषणात्मकता संपलेली नाही असे जाणवते. 15 ऑगस्ट स्वातंत्र्यदिन मुक्ततेसाठी प्रयत्न न करता त्यांना शोषणाच्या अंधारातच खितपत ठेवताना पहावयास मिळतो. हे वास्तव अनेक आदिवासी कवींनी आपल्या कवितेतून मांडले आहे. आदिवासींच्या शोषणात्मक जीवनातील महत्त्वाच्या घटकांमध्ये धरण, खाणकाम, कारखानदारी, जंगल कटाई, प्राण्यांची, पक्ष्यांची हत्या आदिवासींच्या शोषणात्मक दु:खाला कारणीभूत होतात. कोणताही मोठा राष्ट्रीय प्रकल्प उभारण्यासाठी आदिवासींच्या जंगलातील भूभागाची निवड करून तिथे व्यापारीकरण होताना दिसते. आदिवासींच्या शोषणाला कारणीभूत असणाऱ्या शोषणात्मक जीवन पद्धतीचा वेध घेताना चामुलाल राठवा म्हणतात,

*"जेथे आदिवासी तेथेच धरण*

*तेच आदिवासींचे मरण*
*जेथे आदिवासी तेथेच खाण*
*साली आदिम जीवनाची घाण*
*जेथे आदिवासी तेथेच प्रकल्प*
*तोही त्यांना मारण्याचाच संकल्प" 7*

कवी राठवा यांच्या कवितेतून आदिवासींच्या उद्ध्वस्त होणाऱ्या जमिनीचा, जंगलांचा हक्क आणि दैनंदिन जीवनाचे शोषण स्पष्ट होते. आदिवासींच्या शोषणात्मक जीवनातील अनेक संदर्भानुसार आदिवासी समाजाला दारिद्र्यात खितपत रहावे लागते. आदिवासींचे शोषण थांबल्यानंतर खऱ्या अर्थाने त्याचा काहींसा विकास होऊ शकतो. परंतु याकडे मात्र दुर्लक्ष होत आहे.

**संदर्भ**

1. विनायक तुमराम : 'शतकातील आदिवासी कविता', हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, प्रथमावृत्ती, 2003, पृ. 98.
2. भुजंग मेश्राम : 'ऊलगुलान', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीयावृत्ती, 1995, पृ. 85.
3. उषाकिरण आत्राम : 'म्होरकी', गोंडवान गोंडी साहित्य परिषद, नागपूर, प्रथमावृत्ती, 1997, पृ. 45.
4. उषाकिरण आत्राम : 'म्होरकी', तत्रैव, पृ. 61.
5. सुनिल कुमरे : 'तिरकामठा', हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर, प्रथमावृत्ती, पृ. 21.
6. उषाकिरण आत्राम : 'म्होरकी', तत्रैव, पृ. 31.
7. विनायक तुमराम : 'शतकातील आदिवासी कविता', तत्रैव, पृ. 174.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# एकविसाव्या शतकातील मराठी कविता : सामाजिक संदर्भ

**डॉ. चंद्रकांत पोतदार भगवंत पोतदार**
मराठी विभाग,
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी ,ता.चंदगड ,
जि. कोल्हापूर 416 552
मेल : cbpotdar1@gmail.com

**प्रस्तावना :**

मराठी कवितेत काळाचे आणि आपल्या वर्तमानाचे व्यापक भान ठेवून कविता लिहिणाऱ्या असंख्य कवींच्या कवितेतील स्त्री जाणिवांचा व्यापक विचार करताना कवितेतील जगण्याची असंख्य रूपे महत्त्वाचे ठरतात. केवळ शब्द म्हणजे कविता नव्हे. प्रेम म्हणजे देहाशक्ती नाही,तर देहाशिवाय कितीतरी वलये तिच्या पलीकडची असतात.मानवी जीवन सुख दुःखाने भरलेले आहे. निसर्ग जाणीव आहे, रात्रीच्या निरव गूढ अंधारातले एकाकी पण आहे ,या सगळ्यात शब्दांची एक अंतर्यामी व्यथा असते .मराठी कवितेला, विशेषतः नव्वदोत्तरी कवितेला नवा आयाम प्राप्त झाला आहे.स्वतःच्याच एका चौकटीत असहायपणे अडकून पडलेल्या स्त्री जाणीवांचा व्यापक अविष्कार असंख्य कवितेतून व्यक्त होताना दिसतो .या सर्व पातळीवर प्रस्तुत निबंधात काही ऊहापोह केला आहे.

मराठी कवितेची स्थित्यंतरे पाहताना निसर्ग -- आयुष्य- प्रेम- कौटुंबिक जीवन- समाज जीवन- मनातला एकांत या सगळ्यातून स्वतःचीच एक व्यापकता मांडण्याचा प्रयत्न अनेक स्त्रीवादी भूमिकेतून आला आहे. परिचित अशा सूत्रांबरोबरच कवितेच्या माध्यमातून रम्य आणि प्रासादिक अशी लेखन शैली स्त्रियांच्या कवितेतला समर्थ उद्गार व्यक्त करते, तेव्हा स्त्रीवादी भूमिका आणि स्त्री जीवनाची व्यथा व्यक्त होत असते. खरे पाहता कवितेची सर्जनशीलता ही अंतर्मनातून येणारी स्त्री दुःखाच्या एकटेपणाची आणि संवेदनशीलतेची तीव्र जाणीव आहे. समकालीन कवितेचा स्वर वेगळा आहे भुकेची तीव्र जाणीव आहे व्यवस्थेकडून नाकारली जाण्याची शक्यता आहे माणसा माणसांच्यातले अंतर वाढले आहे समाजव्यवस्थेच्या उतरंडीतला नवा चेहरा पारखून घ्यायला हवा या सगळ्याचा विचार केला तर कवितेत स्वकडून इतरांकडे होणारा प्रवास फार महत्त्वाचा आहे आधुनिक काळात आपली अस्तित्वाची बाजू ंना होण्याची भीती वाटते आहे नष्ट होत जाणारे माणसाचे अस्तित्व समाजशास्त्रीय समीक्षेची सूक्ष्मता या सगळ्यातून स्वतःचेच एक दैनंदिन जगणे आणि त्याचा चिरपरिचित चेहरा समोर येतो आहे.आपल्याच अनुभवाच्या गडद छटा मांडताना मनाच्या पलीकडचे विश्व समजून घ्यायला हवे.सर्जन संपत नाही म्हणूनच तर नव्या वाटा सोप्या होत जातात कारण कवी हा अंतिम सत्याचा वाटसरू असतो. माणसाच्या वेदना माणसालाच भंडावून सोडत असतात.श्वास आणि भास यातच आपले जगणे हरवले आहे. अशा काळाच्या नोंदी ठेवणाऱ्या कविता आपल्या अस्तित्वाला गडदपणे अधोरेखित करत राहतात.पी. विठ्ठल, रवींद्र लाखे, दा.गो. काळे यांच्या कवितांचा काही संदर्भ फार महत्त्वाचा वाटतो. स्वप्न आणि वास्तव यांच्या जगण्याच्या वाटा वेगळ्या असतात. जगण्याला अर्थ येतो मात्र वास्तव रेखाटतानाची घुसमट नाकारता येत नाही. सगळा सभोवतालच धूसर बनत निघालाय, याची जाणीव होते.

*आत्मविश्वासाचं अस्तर लावून पाहिलं*
*आरशाला जीव लावला*
*कीव केली पाऱ्याची*
*तरीही माझ्या प्रतिबिंबाची*
*सावलीही उमटली नाही*
*तुझ्या अस्तित्वाच्या आसमंती*
*आरशात.*

- *अरण्याहत, पृष्ठ, २०*

मानवी मनाला अशी झोंबनारी दुखरी नस केवळ कंटाळा आणते. काळ कठीण असतो. काळाची पावलं ओळखून जगता यायला हवं. बाईच्या मनाला समजून घेतलं नाही तर विचारांचा अवकाश इतका मोठा आहे, की काय निर्माण होईल सागणे कठीण आहे. शेती मातीत राबणाऱ्याला जगणं आणि मरणं म्हणजे एक कसरत वाटते. मरणाचे रस्ते बांधले आता जगण्याचे बांधा,ही कुनब्याची विनंती आतली सल व्यक्त करते.कंटाळयावर एखादी लस शोधा. हे सांगताना कवी रवींद्र लाखे लिहितात-

*प्रत्येक माणसाला कंटाळा आणा*
*म्हणजे खेळता येईल*
*एक कंटाळा झेलू बाई*
*दोन कंटाळा झेलू*
*तीन कंटाळा झेलू बाई*
*चार कंटाळा झेलू*
*सर्व्या कंटाळयांचा*
*पानोठा....*
*या पाणोठ्यावर पाणी भरायला उत्साह येईल*
*अशी व्यवस्था करा.*
*----- अवस्थांतराच्या कविता, पृष्ठ, १४९*

केवळ तात्विक चर्चा आणि बुद्धीची कसरत करून मार्ग निघणार नाही तर आपल्या जगण्याकडे जायला हवे, तरच ती भाषा अधिक समर्थ होते . सैरभैर या कवितेत गावंडे यांनी याचे वास्तवदर्शन केले आहे.

*पावसाच्या पाण्याला*
*माती घेते कुशीत*
*आईसारखं*
*पण*
*सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यावर*
*तेच हिंडतं*
*अनाथ मुलासारखं*
*सैरभैर.*
*---- कंदिलाच्या लख्ख उजेडात, पृष्ठ, ४९*

स्त्री जीवनाची कितीतरी रूपे अनेक अंगांनी व्यक्त झाली आहे केळ तात्विक चर्चा त्यातील प्रेमळता आणि जहालता त्यातील जगण्याची कुत्तरओढ, स्त्रीचे आयुष्य तिच्या आयुष्यातला आशावाद तिच्या भविष्याचा कानोसा या सगळ्या स्त्रीची असंख्य प्रकारे होणारी घुसमट आहे अशावेळी समकाळ हा सामान्यतः जगत असतो. प्रत्येक लेखकाची जातकुळी वेगळी असते काळाच्या पटलाकडे जाणाऱ्या सर्व जाणिवांचे संकेत महत्त्वाचे ठरतात वास्तवाचे भान कवितेचे तुकडे वरवरच्या स्तरावरचे जगणे आणि साध्या साध्या शब्दातली तळमळ ती विठ्ठल यांनीमांडली आहे.

*'एकदा बायको म्हणाली*
*समजा,तुम्ही कविता लिहिली नाही तर,*
*तुमचं हदय, फुफुस बंद पडेल काय?*
*मी म्हटलं*
*असं कसं होईल?*
*तर ती म्हणाली*
*मग सगळेच कवी असं का म्हणतात*
*की,कविता माझा श्वास आहे...*

*कविता नसती तर मी नसतो वगैरे.....'*

*- माझ्या वर्तमानाची नोंद, पृष्ठ,१०९*

किंवा

हीच स्त्री भावना मांडताना पाण्यासारखा गंभीर प्रश्न आणि तिथे असणारी स्त्री सुलभ भावना खूप ज्वलंतपणे दिनकर मनवर यांनी मांडले.

*एक दिवस माणसातून फुटून येईल कंटाळा*
*एक दिवस कंटळ्यातून जन्म घेईल बाई*
*एक दिवस बाईतून प्रसवून वर येईल गर्भ*
*एक दिवस गर्भातून जन्माला येईल झाड*
*-------- दृश्य नसलेल्या दृश्यात, पृष्ठ, ३०*

अशी स्त्री केवळ चौकटीत राहत नाही तर ती स्वतःचे अस्तित्व रेखाटते. बाईपणाचा जगण्यातला अर्थ आणि विश्वात्मक जाणीव खूप गंभीरपणे कवींनी मांडली आहे.केवळ चूल आणि मूल हे आता नाही तर विचारांचा अवकाश मोठा आहे. मात्र अजूनही *घुसमट मात्र थांबत नाही.*

*कूस वांझ राहिलीच तर*
*माझेरातच वाळीत पडायचं*
*परित्यक्ता नावाची पदवी घेऊन*
*मग वंशाच्या दिव्यासाठी*
*व्हायची अनेक बाळंतपणं*
*- गाऱ्हाणं, पृष्ठ, ४८*

अशी स्त्रीच्या जगण्याची कुत्तरओढ विस्तराने येते.कस्टाशिवाय भाकर नाही आणि वेदनेचा पाझर थांबत नाही. अशा दुःखाच्या ताकदीचे काही संदर्भ मोठे आहेत. नाळ तोडताना नातं अधिक मजबूत करावं लागतं, असा हा भयावह आजचा काळ आहे. हा सगळा संदर्भ ग्रामजीवनाची असंख्य रूपे मांडतो. कठीण काळात येणारी परिवर्तनाची भाषा काही प्रखरता मांडते.ही जगण्यातली नवी आसक्ती आहे. कवी आबासाहेब पाटील लिहितात-

*सात जन्माच्या गाठी*
*कधी सैल होतील नेम नाही.*
*हा हातातलाच धागा*
*आणखी थोडा लांबवून घे.*
*अजून थोडं जगायचं आहे*
*तुझ्यासोबत*
*जगणं नको झालं असलं तरीही..*
*- घामाची ओल धरून, पृष्ठ, १४३*

आपल्या दैनंदिन जगण्यातला अवकाश मांडताना आपलाच चेहरा शिरपरीचीत बनावा अशी एक आपल्याच अनुभवाची गरज या कवितेत व्यक्त होते मनाच्या पलीकडचे विश्व समजून घेताना सर्जन काही केल्या संपत नाही आणि जगण्याच्या नव्या वाटा सोप्या होतात खरे तर कवी हा अंतिम सत्याचा वाटसरू असतो मनाच्या तळात खोल रहात डोकावून बघताना श्वास आणि भास यातच आपले खरे जगणे हरवून गेले आहे मात्र स्त्रीच्या वाटेची दुःख भोगाची कहाणी काही केल्या संपत नाही हा नेमका संदर्भ लक्ष्मण महाडिक यांनी स्त्री-पुरुषाच्या कविता या कविता संग्रहात मांडली आहे स्त्रीचे आयुष्य तिच्या आशावाद आणि तिच्या भविष्याचा कानोसा या सगळ्याच गोष्टींना अभिव्यक्त करताना आयुष्याचा कोड कसा सोडवणार यासाठी महिलांनी धीट व्हायला हवं याची व्यापक अपेक्षा कवी व्यक्त करतो कवी लिहितो-

*किती युग खेळत आलीस लंगडीचा खेळ*
*म्हणून तुझ्या आयुष्याचा बसला नाही मेळ*
*याच्या त्याच्या आधाराने कशी जाशील पुढे?*
*ठेव आता विश्वासाने उंबऱ्या बाहेर पाऊल*
*लागेल तुझ्या आयुष्याला भविष्याची चाहूल*
*दैवापुढे दामट तुझं कर्तृत्वाचं घोडं*
*टाक पोरी टाक आता पाऊल थोडं पुढ*
*-- स्त्रीकुसाच्या कविता, पृष्ठ, ४०*

अशा कितीतरी गोष्टी स्त्रियांच्या जगण्याभोवती आणि कर्तृत्वाला बळ देणाऱ्या अशा आहेत .मात्र इथेही प्रत्येक स्त्रीला स्वातंत्र्य नावाची गोष्ट उरत नाही .पुरुषाला समजून घ्यायचे की पुरुषाचे चांगुलपण मांडायचे हेही अधिक महत्त्वाचे ठरते. कारण संवेदनशील नाते जपणारा आणि आयुष्याच्या कुठल्याही वळणावर आपल्या सोबत नि:शब्दपणे सोबत करणारा एखादा पुरुष हा सर्वार्थाने महत्त्वाचा ठरतो. अनेक प्रकारच्या कवींनी आणि कवयित्रींनी स्त्री-पुरुषांच्या नात्याला अधोरेखित केले आहे. स्त्रीवादी विचारसरणी, स्त्रियांच्या आयुष्याचा प्रश्न, स्त्रीस्वातंत्र्याची अनेकविध कल्पना ,स्त्री म्हणून तिच्या वाट्याला येणारे सुखदु:ख, स्वातंत्र्य लाभलेल्या, बंधनातून मुक्त होणारा तिचा अवकाश यासारख्या कितीतरी गोष्टी महत्त्वपूर्णतेने अधोरेखित होत गेले. अंजली ढमाळ यांच्या ' ज्याचा त्याचा चांदवा' या कवितासंग्रहात बाईच्या रक्षणाचे आणि तिच्या बंदिस्तपणातून मुक्त होणाऱ्या चौकटीचे कितीतरी संदर्भ आले आहेत .

*तिन्हीसांजेला खुणावते*
*खुंटी वरली दोरी*
*दावत असते आमिष..*
*की, बस्स...*
*एकदा गळ्यात घाल...*
*मग नक्की तुटेल ....*
*कणकण मरायला लावणाऱ्या जन्माची शिदोरी*
*--ज्याचा त्याचा चांदवा, पृष्ठ,३३*

किंवा

*जेवढी बुद्धीला तीव्र धार तेवढी वेदनांची चिरफाड जोरदार विखुरलेल्या तुकड्यांना कवेत घेणार अडाणीपण*
*एवढं महाग झालंय का?*
*-ज्याचा त्याचा चांदवा, पृष्ठ, १९-*

स्त्री-पुरुषाच्या नात्याला अधिक बळकट करताना आपल्या अवतीभोवतीच्या नात्याला या सगळ्यात सामावून घेणे, हेही या कवितेने अधोरेखित केले आहे. एखाद्या कवितेत किंवा एखाद्याच्या जगण्यात अशा कित्येक गोष्टी व्यक्त होताना आयुष्यभर अनेक पदरी नजरांचा चिकट थर कातडी सोलून काढावा तसा सोलून काढत असतो,तेव्हा ती स्वत:ला या सगळ्यातून सोसत सोसत आणि सोडवत असते. जन्मापासून आजपर्यंत पुरुष सत्ताक मानसिकतेचे अवशेष सापडत नाहीत, मात्र बोबड्या बोलाच्या वयापासून जगावेगळी पाऊलवाट करून जगताना अनेकदा स्वत:ला सिद्ध करावे लागते.त्यावेळी एक आश्वासक हात खांद्यावर असावा लागतो. तो बापाचा असेल- प्रियकराचा असेल -पतीचा असेल- भावाचा असेल- आजोबांचा असेल किंवा अन्य नात्यातून व्यक्त होणाऱ्या पुरुषांचा असेल. ते नाते फार महत्त्वाचे असते. हर्षदा
सुंठणकर यांच्या 'कपडे वाळत घालणारी बाई 'या कवितासंग्रहात अशा काही आशा निराशेच्या पलीकडचे शब्द व्यक्त होतात.

*कसा रे भेटणार मला माझा चंद्र ?*
*तू नुसता हसलास*
*प्रसन्नपणे*

*आणि काळभोर आकाश बनून राहिलास पसरून*
*त्या आकाशाच्या डोळ्यात*
*पाहिलं मी माझं प्रतिबिंब*
*मीच बनले होते आता*
*एक परिपूर्ण चंद्र*
*तू बनवलेला*

- *कपडे वाळत घालणारी बाई,*पृष्ठ, २४

या सर्व विवेचनाचा विचार करता,एकविसाव्या शतकातील मराठी कवितेचा सामाजिक संदर्भ शोधताना या शतकाच्या काही महत्त्वाच्या नोंदी आपल्या लक्षात येतात.

**समारोप :**

कवितेचे नेमके बलस्थान कोणते? कवितेचा आवाका कोणता ?शब्द आणि प्रतिभेच्या पंखातून येणारी व्यापकता, प्रतिमांचे जाळे ,नवनवे विचार या सगळ्यात ही कविता आशयबद्द झाली आहे .स्त्री स्वातंत्र्याच्या समानतेचे, त्यांच्या प्रतिमेचे भावनेचे आणि काळाचे स्वरूप फार मोलाचे आहे. मुक्तछंदातून येणारी कविता ग्रामीण असेल- दलित असेल किंवा महानगरीय जाणीव असेल ती प्रत्येक ठिकाणी परिवर्तनाची व्यापकता मांडते आहे .या अर्थाने या कवितेची बलस्थाने महत्त्वाची वाटतात.

**आकलन:**

एकविसाव्या शतकातील मराठी कविता आणि त्यातील सामाजिक संदर्भ या विवेचनातून काही पुढील मुद्दे आकलनाच्या दृष्टीने महत्त्वाचे वाटतात.

१. एकविसाव्या शतकातील मराठी कविता आशय संपन्न आहे जगण्याचे अनेकविध कंगोरे या कवितेला लाभले आहेत.

२.ग्रामीण ग्रामीण जीवनानुभव आणि जीवनातील दु:ख आणि संकटे झेलत आयुष्याला सामोरे जाणारी ही कविता आहे .

३.आजचे वर्तमान हे भविष्याला पूरक असणे आणि जगण्याची प्रामाणिक असणारी भाषा येणे हे कवीच्या बरोबरच कवितेतील वर्तमान आहे .

४. साध्या शब्दात व्यक्त होणारी कविता जीवनातल्या सुखापेक्षा दु:खाच्या वेना अधिक सोसणारी आहे .

५. परंपरेच्या जीवनाविषयी थेटपणे प्रतिमाबध्द होताना दिसतात.

६. पुरुषी मानसिकता ही भारतीय परंपरेत स्त्री विश्वावर हक्क सांगता सांगता आपली पुरुषी सत्ता सिद्ध करते.

७. स्त्री-पुरुष नात्याकडे निकोप आणि सुसंवादीपणे बघणे ही काळाची गरज आहे.

८.मानवी जीवनाच्या वाटेवर विचार- भावना -संवेदना आणि सूक्ष्म निरीक्षण यातून ही कविता स्वतःचा स्वतंत्र चेहरा दाखवणारी आहे .

९. कुठलीही कविता मनाच्या आरपार जाऊन समजून घेताना त्याच्या अवतीभोवतीचे प्राक्तण म्हणजे ती कविता असते. अशा कवितेला मुळासकट शोधणे ही फार गरजेची गोष्ट असते.

१०. सामान्य माणसाच्या अंतर्मनातील सृजन व्यक्त होताना सामाजिक भान जपणारी कविता महत्त्वाची वाटते.

समकालीन कवितेमध्ये स्त्रीवादी कविता, स्वतःचा स्वर जपणारी कविता, एकविसाव्या शतकातली कविता वाचक मनाला विचार प्रवृत्त करते. सामाजिक प्रश्नांना न्याय देऊ पाहते. मराठी कवितेच्या विकासात जीवनातील वास्तवता आणि यथार्थपणे व्यक्त होणारी आपल्याच अवतीभोवतीची जीवनशैली या कवितेतून वाचकाला थेट भिडणारी आहे.

**संदर्भ:**

1. काळे, दा.गो. अरण्याहत, कॉपरकॉइन, दिल्ली, द्वितीय आवृत्ती, 2021
2. लाखे रवींद्र, अवस्थांतरांच्या कविता, कॉपरकॉइन, दिल्ली, प्रथमावृत्ती, एप्रिल २०१८

3. गावंडे दिनेश, कंदीलाच्या लख्ख उजेडात, संवेदना प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, मे, 2021
4. विठ्ठल, पी.माझ्या वर्तमानाची नोंद, गोदा प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, फेब्रुवारी, 2021
5. मनवर दिनकर, दृश्य नसलेल्या दृश्यात, पापुलर, मुंबई, प्रथमावृत्ती, 2014
6. घोरपडे धनाजी, गाऱ्हाणं, ललित पब्लिकेशन, मुंबई, दुसरी आवृत्ती ऑक्टोबर 2022
7. पाटील आबासाहेब, घामाची ओल धरून, शब्दशिवार, मंगळवेढा, एप्रिल 2022
8.महाडिक लक्ष्मण, स्त्री-कुसाच्या कविता, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती, जुलै, 2021
9. ढमाळ अंजली, ज्याचा त्याचा
10. चांदवा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर 2020
11. सुंठणकर हर्षदा, कपडे वाळत घालणारी बाई, ग्रंथाली, मुंबई
प्रथमावृत्ती, जानेवारी 2022. (संपादन) सारेच पुरुष नसतात बदनाम, प्रभा प्रकाशन, कणकवली. प्रथमावृत्ती, मे, 2022

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# मराठी साहित्य आणि संस्कृती अभ्यास : एक आकलन

**डॉ.भरत भीमराव जाधव**
कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा

**प्रस्तावना**

साहित्य जीवनाची उच्चतम साधना आहे. साहित्यकार समाजाचे अंतर्मुखी व बहिर्मुखी विकास, रचनात्मक प्रवृत्ती यांचे सूक्ष्म दृष्टीने निरिक्षण करतो. सहजानुभूती भाषा व कल्पना यातून अक्षर साहित्यकृतींचे निर्माण करतो. साहित्य हे संस्कृतीचे महत्त्वपूर्ण अंग आहे. मानवी मनाचे मनोरंजन करणे हाच फक्त हेतू नाही तर मानवाच्या सर्वांगिण विकासाला साह्यभूत करणारे प्राणभूत तत्त्व म्हणूनही साहित्याचा निर्देश करावा लागेल. समकालिन साहित्याचे प्रतिबिंबच नव्हे तर 'एक्सरे' काढण्याचे कामही साहित्य करते.

इंग्रजीत Culture व Civilization हे शब्द संस्कृतीसाठी वापरले जातात. हिंदीमध्ये त्यासाठी संस्कृती आणि सभ्यता हे शब्द वापरले जातात. मराठीत मात्र दोन्ही शब्दासाठी 'संस्कृती' हा एकच शब्द वापरला जातो. वेगवेगळ्या शब्दकोशात पाहिले तर असे दिसते की अनेक वेळा हे शब्द समानार्थी वापरले जातात. Culture मध्ये कला साहित्य, काव्य, चित्र व शिल्पकला व सामाजिक आणि राजकीय संस्थांच्या कार्याचा समावेश होतो. Civilization मध्ये माणसाचा एक प्रकारे विकास अपेक्षित आहे. हा विकास सुधारलेल्या अवस्थेकडून अधिक नागर समाजाकडे होणे अपेक्षित आहे. संस्कृतीतील ही वाढ आतून व जैव प्रक्रियेतून होते तर सभ्यतेत ती बाहेरून प्राप्त प्रभावांच्या व संस्करणाच्याद्वारा होते. त्यामुळे या दोन्ही शब्दात एक प्रकारचा व्यक्तीचा आणि समाजाचा उच्चतर अशा ध्येयाकडे, अधिक नागर वा सुसंस्कृत समाजाकडे जाणारा विकास अपेक्षित आहे. मनुष्याने आपल्यात असणारे पशुत्वाचे अवशेष कमी करून अधिक मनुष्यत्व प्राप्त करावे, हिंसा, द्वेष व मत्सर यांचा त्याग करणारे विश्व निर्माण करावे हाच सांस्कृतिक विचारांचा व सभ्यतेचा आशय असतो. साहित्यातून येणारी जीवनमूल्ये आणि कलामूल्ये अशा सभ्यतेतून जन्मास येतात.प्राचीन काळातील मनुष्याच्या पशुत्वाचे अवशेष कसकसे प्रसूत होत जातात याचाही अभ्यास आपणास करावा लागतो.

**साहित्याचा सांस्कृतिक इतिहास**

मानवी जीवनातील सर्वच घटना महत्त्वाच्या आहेत असे समजले जाऊ लागल्यामुळे इतिहासामध्ये सांस्कृतिक इतिहास, स्थानिक इतिहास, स्त्रीवादी इतिहास, पर्यावरणाचा इतिहास, समकालीन इतिहास, शहरांचा इतिहास, वंचितांचा इतिहास, वासाहतिक इतिहास इ. घटकांबरोबर, घटनांच्या निव्वळ निवेदनापेक्षा; त्यांच्या अन्वयार्थावर भर दिला जात आहे. या घटनांसह त्यांच्यामागील संरचनांचा/मूल्यधारणांचा / बैठकीचा विचार केला जाऊ लागलेला आहे. असा विचार करीत असतना भाषाशास्त्र, मानवशास्त्र या शाखांमधील संकल्पना, पध्दतींची, मॉडेल्सची मदत इतिहासाला होऊ लागलेली आहे.मराठी साहित्यातील सांस्कृतिक घटकांचा विचार करावयाचा झाल्यास मराठी साहित्याचाही सांकृतिक इतिहास लिहिणे शक्य आहे.समकालीन साहित्यामध्ये अनेक साहित्यिक उपेक्षित राहिलेले आहेत.साहित्यामधून पर्यावरण, संस्कृती, भाषा, सामाजिक – राजकीय घटनांचे साद पडसाद अपरिहार्यपणे उमटत असतात. अर्थव्यवस्था, गुलामगिरी या दोन्ही गोष्टी समांतरपणे आपणास पाहता येतील. भौगोलिक दृष्टीने विचार करावयाचा झाल्यास भारतीयच नव्हे तर संपुर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर भौगोलिक घटकांचा प्रभाव पडलेला आहे. मराठी साहित्याच्या सांस्कृतिक संचिताचा विचार करताना आपल्याला वरील गोष्टी प्राधान्याने लक्षात घ्याव्या लागतील.आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन ठेऊन साहित्याचा व्यामिश्र विचार करावा लागेल. अर्थव्यवस्था आणि संस्कृती यांचा एकमेकावर मोठा प्रभाव असल्याचे आपणास दिसून येईल. या शोधनिबंधात मानवी संस्कृती आणि त्याचे मराठी साहित्यातील चित्रण या अनुषंगाने विचार केला गेला आहे.

संस्कृती या शब्दामध्ये सम् हा उपसर्ग आणि कृ हा संस्कृत धातू आहे. संस्कृतीचा अर्थ सर्वसमावेशक कृती असा होतो. धर्मासह समग्र अंतर्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द वापरला जातो. प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचा संस्कार. हा संस्कार साहित्याचा विषय जसा होतो, अगदी विकार हा विषयही साहित्याच्या आस्थेचा विषय बनून जातो.मानवी वर्तनाचा इतिहास म्हणजे एक प्रकारची

संस्कृतीच असते.मानवाच्या आसपासचे पर्यावरण त्याची धारणा, विचार, भाषा,रीतीरिवाज, रुढी- परंपरा,समज, लोकतत्त्वे,राहणीमान यातून त्याने स्वत:ची साधलेली उन्नत अवस्था मराठी साहित्यातून कशी प्रकट होत गेली त्याचा अंतर्भाव सांस्कृतिक अभ्यासात अनुस्यूत असतो.

सांस्कृतिक इतिहास ( Cultural History) चा विचार करताना मराठी साहित्याचा सांकृतिक इतिहास आपल्याला पडताळून पाहता येतो.'सांस्कृतिक इतिहास' ही संकल्पना मानवशास्त्र आणि इतिहास या दोन्ही विद्याशाखांच्या पध्दती एकत्र आणते. यामध्ये एका किंवा अनेक विशिष्ठ समूहाच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनाचा अभ्यास केला जातो, जशी भाषा,साहित्य,कला, संगीत, नृत्य, दैनंदिन जीवन, आहार-विहार निवासाच्या सवयी, उपजीविकेची साधने, त्याची आर्थिक परिस्थिती इ. एखाद्या समूहाचे दृष्टिकोन, श्रध्दाविश्व - यांचा अभ्यास होतो, जसे, वारी, समारंभ, उत्सव, देवदेवता विषयक समज आणि श्रद्धा. याबरोबरच, त्या समूहामध्ये निर्माण झालेली कला यांचा विचार याठिकाणी केला जातो. इतकेच नव्हे, तर, त्या समूहाने निर्माण केलेल्या विविध सामाजिक, राजकीय, आर्थिक संस्थांचाही विचार यामध्ये होऊ शकतो.एकूणच मानवी व्यवहार आणि वर्तन यांचा अभ्यास यामध्ये केला जातो. साधारणतः 'सांस्कृतिक इतिहासामध्ये, जसे अभिजनांच्या कला स्थापत्याचा अभ्यास केला जातो. त्याहून अधिक सामान्य लोकांच्या, सामूहिक अभिव्यक्तींचा विचार केला जातो, जसे, सणवार, वारी, जत्रा, आख्याने, भारुड-दशावतारासारखे खेळ इ. लोकांच्या आहार-विहार-निवासाच्या सवयी, वस्त्रालंकार, संगीत इ. ही बाबींचा समावेश होतो. कला-साहित्य-विज्ञानामध्ये झालेली प्रगती लक्षात घेतली जाते. त्याचबरोबर, सत्ता, वैचारिक भूमिका, सहसंबंध याचा इतिहासही अभ्यासला जातो. अशा पारंपरिक सांस्कृतिक बाबीबरोबरच टी.व्ही., रेडिओ, वृत्तपत्रे, पोस्टर्स, इंटरनेट इ. माध्यमेसुद्धा एका समूहाची विशिष्ठ सांस्कृतिक धारणा तयार करण्यासाठी अतिशय मोलाची भूमिका बजावताना दिसतात. आधुनिक तंत्रज्ञानाच्या डिजिटल युगात जग हेच एक ग्लोबल खेडे बनत चालले आहे.त्यामुळे आपले सांस्कृतिक विश्व विस्तारत चालले आहे .कधी कधी आपण संकुचित विचार करून संस्कृती या शब्दाला खुरटे करून टाकले आहे.भाषेच्या बाबतीत पहायचे झाले तर विविध परभाषिक शब्दांचा भरणा होताना दिसत आहे.आधुनिक मानवाच्या धारणा बदलताना दिसत आहेत.परिणामी साहित्यातून व्यक्त होणारे मानवी जीवन , त्याच्या कल्पना, व्यक्त होण्याची पद्धत यातून एक नवी संस्कृती उदयाला येताना दिसत आहे.कुटुंबातील विविध घटकांच्या धारणा, एकमेकांतील संबंध, ताण-तणाव, वाद-विवाद, समस्यांना प्रतिसाद देण्याची वृत्ती, लैंगीकता इत्यादी असंख्य बाबींचा धांडोळा घेतला असता सांस्कृतिक ताण – तणाव सहज लक्षात येतात. धार्मिक संकल्पना,तत्त्वज्ञान, अध्यात्म इ. संकल्पनांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. कला, स्थापत्य, साहित्य, प्रवचन, किर्तन, यात्रा, उत्सव इ. माध्यमातून धर्म हा लोकांपर्यंत पोहोचला, लोक कशा पध्दतीने धर्माकडे पाहतात, धर्माची संस्था कशी - बनत जाते, त्यातील अर्थकारण वगैरेचा अभ्यास सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात करणे महत्त्वाचे आहे. समाजातील विविध कला, (शिल्प, संगीत,नृत्य इ.) याबरोबरच, त्या कलेचे संदर्भ, ती कला ज्या लोकांतून निर्माण झाली ते सामजिक संकेत इत्यादी बाबींचा अभ्यास सांस्कृतिक अंगाने करणे गरजेचे आहे.

मराठी साहित्याचा सांस्कृतिक अभ्यास करताना वाङ्मयीन इतिहासाचे पुनर्लेखन गरजेचे ठरू लागलेले आहे. लिंगभाव, श्रध्दास्थाने, धारणा, लोकांमधील चर्चा यातून जी काही विशिष्ठ राजकीय संस्कृती निर्माण झालेली होती त्या राजकीय संस्कृतीच्या अभ्यासाकडे आपणास लक्ष दिले पाहिजे. विविध समाजाची संस्कृती ,इतिहास, साहित्य, चित्रपट, तत्त्वज्ञान, मानवशास्त्र इ. विविध अंगाने हा अभ्यास आपणास करावा लागतो. यामध्ये, एखाद्या समूहाच्या कृतीमागे, त्या समूहाच्या संस्कृतीतील विविध संकल्पना (लिंगभाव, अस्मिता, धारणा) कसे प्रभाव टाकतात हे अभ्यासले जाते.

“सांस्कृतिक इतिहासाचे धागेदोरे आपणाला 'पुनरुज्जीवन' (Renaissance) काळापर्यंत घेऊन जातात. या काळात, संस्कृती (Cultus/cultura) शब्द मुख्यत्वे पुढील धारणेतून आलेला होता. 'नागरी समाजासाठी सद्गुणांची आवश्यकता असते. हे सद्गुण साहित्य, तत्वज्ञान, कर्तृत्व, कायदा, कला, शास्त्रे यांच्या जपणूकीतून (cultivation) निर्माण होत असतात.हॉब्ज लियनिज यांनी 'आत्मा, मन, बुध्दिमत्ता आणि तर्कांची जपणूक' हे संस्कृतीचे कार्य असते हे नमूद केले. त्यानुसार एखादा समाज सुसंस्कृत (cultivated) आहे का रानटी ते विचारात घेतले गेले. ब्यूडॉसच्या मते 'एखाद्या समाजातील नैतिकता, सामाजिकता आणि आदिमतेच्या पुढे जाऊन विचार करण्याची पध्दत, हे तो समाज कितपत सुसंस्कृत आहे ते ठरवते. मेरियनच्या म्हणण्यानुसार सुध्दा आदिम / असंस्कृत समाज म्हणजे शिकारी लोक ज्यांच्याकडे कायदा नसतो, कला नसते.थोडक्यात संस्कृती किंवा असंस्कृतीची व्याख्या ही खास युरोपियन लोकांनी बनवलेली व्याख्या होती. अर्थात, ते स्वतःला सुसंस्कृत समजत होते.पुढे १८ व्या शतकाच्या

उत्तरार्थात, 'आत्मा' (Spirit) ची जागा साहित्याने घेतली. विद्वानांचे लेखन, शोध आणि कलेचा इतिहास हा 'संस्कृतीशी जोडला गेला. आता 'साहित्याचा इतिहास' म्हणजे 'सांस्कृतिक इतिहास' असे समजले जाऊ लागले."१

'भाषा आणि संस्कृती यांचा अन्योन्य संबंध याच काळात पुढे आला. जॉन ॲडलंगच्या मते 'शेती आणि खाजगी मालमत्तेच्या विकासाबरोबरच, ज्यावेळी भाषांचा उदय झाला त्यावेळी संस्कृतीची सुरुवात ', झाली.' थोडक्यात, भाषा आणि संस्कृतीचा घनिष्ठ संबंध असल्याने, भाषेचा विकास समजायचा असेल तर त्या संस्कृतीचा विकास समजणे आवश्यक असते. जॉन हर्डरच्या मतेही संस्कृतीमध्ये 'तार्किक बुध्दी' असणे अत्यावश्यक असते आणि ही बुध्दी भाषेतूनच व्यक्त होत असते.

"ॲडलंगच्या मते 'निव्वळ प्रेरणातून कृती करणाऱ्या आदिम परिस्थितीतून अधिक गुंतागुंतीची सामाजिक संबंध तयार होणे या बदलास संस्कृती' असे म्हणतात." २ १९ व्या शतकामध्ये, मानवशास्त्राच्या विकासामुळे, सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासाला चालना मिळाली. "एडवर्ड टेलरच्या म्हणण्यानुसार 'संस्कृती म्हणजे अशी एक गुंतागुंतीची रचना असते की ज्यामध्ये, एका समाजाचा घटक या नात्याने, मानवाने ज्ञान, श्रध्दा, कला, नैतिक मूल्ये, कायदा, रीतीरिवाज यांच्या क्षमता आणि सवयी यांचा समावेश होतो."३

संस्कृती म्हणजे कला, साहित्य, तत्वज्ञान, धर्म अशा गोष्टीस अधिभौतिक संस्कृती असे म्हणण्यास अडचण नाही. १९८९ मध्ये लिन हंट यानेही सांस्कृतिक चालीरिती आणि मानसिकता / दृष्टिकोण यांच्या अभ्यासाचा समावेश 'सांस्कृतिक इतिहासामध्ये केला. गुन्हा, वेडसरपणा, बालपण, वृध्दत्व, देहबोली, विनोद, गंध, अवकाश, व्यसन, विद्रोह इ. अनेक विषयांचा समावेश सांस्कृतिक अभ्यासामध्ये केला जाऊ लागला आहे.गिझच्या म्हणण्यानुसार कोणतीही संस्कृती, विशिष्ठ अशा चिन्हव्यवस्थांनी भरलेली असते. दुसऱ्या शब्दांत, त्या त्या संस्कृतीच्या विशिष्ठ अशा काही धारणा असतात. उदाहरणार्थ, एका विशिष्ठ स्थळ-काळातील एका समूहाने, वर्षानुवर्षे आपली एक संरचना / चिन्हव्यवस्था/मूल्यव्यवस्था/धारणा तयार केलेली असते. या समूहातील प्रत्येक जण, दुसऱ्यांशी वागताना, तसेच समूहाचा प्रतिनिधी म्हणून वागतानाही त्या संरचनेच्या आधारेच वागत असतो. ही धारणा आपल्याला माहिती नसते. अशावेळी, निव्वळ वर्तनाच्या अभ्यासावरुन, ती संस्कृती कशी समजून येऊ शकेल? त्यामुळे निव्वळ वर्तनाचे निरिक्षण करण्याबरोबरच; त्या-त्या वर्तनाचे संदर्भ, त्यामागील धारणा, मूल्यव्यवस्था समजून घेणे आवश्यक असते. या मूल्यव्यवस्था साहित्यातून कशा प्रकारे प्रकट झालेल्या आहेत याचा अभ्यास संकृती अभ्यासामध्ये करावा लागतो.

**मराठी साहित्य आणि सांस्कृतिक पर्यावरण**

भारतीय साहित्य एक व्यापक शब्द आहे. एका विशिष्ट भाषेचे नव्हे तर सर्वच भारतीय भाषांमधून साहित्याची निर्मिती होत आहे. विश्वातील प्राचीन साहित्य वेदांपासून ते आजच्या वर्तमान काळातील विविध वाङ्मयप्रवाह यामध्ये सामाविष्ट केले जातात. एक भाषा , एक क्षेत्र, एक जाती, एक काळ याचेच फक्त साहित्य नसते तर बहुभाषिक, सर्वजाती धर्म पंथ, सार्वकालिक अनुभवांचे सार म्हणजे भारतीय साहित्य होय. भारतीय साहित्य सभ्यता आणि संस्कृती यांचा अक्षय झरा आहे. आर्य, द्रविड या सर्व परिवारातील भाषा थोडयाफार फरकाने विभिन्न दिसल्या तरी भारतीय संस्कृतीच्या वाहक आहेत. भारतीय भाषांमध्ये विविधता असली तरी साहित्यामध्ये मात्र एकता असलेली दिसते. साहित्याचा संबंध हा फक्त भाषेशी नसतो तर समाजाशी असतो. भारतीय समाज जीवन, लोकसंस्कृती, परंपरा या सर्वांचे चित्रण भारतीय साहित्यातून येताना दिसते. 'मानवाचे अंती गोत्र एक' या उक्तीचा प्रत्यय आपणास पदोपदी येताना दिसतो.

संस्कृती आणि निसर्ग यांचा अगदी जवळचा संबंध आहे. प्रकृती व संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रकृती आधी येते व त्यापाठोपाठ संस्कृती येते. प्रकृतीपासूनच संस्कृतीची अवधारणा होते. संस्कृती ही गोष्ट मानवी भावभावना त्यांचे आचारविचार, रुढी परंपरा यांच्याशी संबंधित असते. इरावती कर्वे म्हणतात की, " संस्कृती म्हणजे सकळ इंद्रियांना लावलेले चांगले वळण होय." संस्कृती व वर्तन यांचा जवळचा संबंध असतो. मानवी वर्तनातूनच निसर्गाचा ऱ्हास किंवा जतन या दोन्ही गोष्टी होतात.

लोकसाहित्यातून निसर्गाचा गजर होताना दिसतो. परिकथा, ग्रामीण साहित्य , निसर्ग कविता , विधी नाटये, कथा, गीत, नृत्य या सर्वांतून निसर्ग संस्कृती आणि परंपरा यावर सांस्कृतिक पर्यावरण लक्ष केंद्रित करते. साहित्यिक इतिहासाचा आपण मागोवा घेतला तर आपणास असे दिसते. भिन्न-भिन्न संस्कृती आज आपल्या सीमारेषा ओलांडून एकत्रित आपणापुढे येत आहेत. सांस्कृतिक संकराची परिसिमा आज सर्वश्रेष्ठ संस्कृती म्हणून मान्यता पावलेली आहे. २१ व्या शतकात जन्म भारतात, शिक्षण

अमेरिकेत, नोकरी इग्लंड आणि निवृत्तीनंतर वार्धक्यात स्वित्झर्लंड मध्ये राहणारे लोक आपणास दिसतात. बहुसांस्कृतिकता ही या रुपाने आज आपणास पहावयास मिळते.

एकाच घरात दुहेरी नागरिकत्व असलेले व विविध भाषा बोलणारे लोक आपणास दिसतात. आईची भाषा वेगळी आणि वडिलांची भाषा वेगळी तर आजी-आजोबांची भाषा निराळीच या सर्व सांस्कृतिक संकराच्या आणि आक्रमणाच्या तडाख्यात सापडलेले बालपण,तरुणपण या सर्वांचे प्रतिबिंब साहित्यातही पडताना दिसते आहे.

मराठी साहित्याचा जरी आपण विचार केला तरी आपणास असे दिसते की, प्रमाण भाषेपासून आपण बोलीकडे वळलो आणि आता तर मिक्स लँग्वेज संकल्पना सहजपणे स्विकारतो आहोत. या 'मल्टिलिंग्वॅलिझम' बहुभाषिकतेच्या जमान्यात मराठी कवितासुध्दा बदलाकडे वळलेली दिसते. संस्कृती आणि निसर्ग,मन आणि शरीर,मानवी आणि अमानवी अशा सर्वच क्षेत्रात बदलाचे वारे वाहत आहे. साहित्य हे सांस्कृतिक पर्यावरणामध्ये शक्तीशाली माध्यम किंवा प्रतिकात्मक माध्यम म्हणून वर्णन करताना दिसते. निसर्ग हा मानवी मनाची प्रेरक शक्ती आहे. निसर्ग मानवी मनाला आवाहन करतो. अनेक निसर्ग कवितातून आपणास हे जाणवते. संस्कृतीचा सारांश आणि अभ्युदयाची आशा ही शेवटी निसर्गापर्यंतच येते आणि ती म्हणजे प्रेमाची व संस्कृतीची देवाणघेवाण!

लोकसाहित्यातील म्हणी, वाक्प्रचार,उखाणे-आहाणे, सण,व्रतवैकल्ये, विधीनाटये ही निसर्गाशी बांधलेली आहेत. गुढीपाडव्याच्या सणाला कडुनिंबाची पाने खाणे, संक्रांतीला तिळगुळ खाणे, बैलपोळयाला बैलाची पूजा करणे, घटस्थापनेला विविध धान्यांची उगवण क्षमता तपासणे, भोगी दिवशी अनेक पालेभाज्या व फळभाज्या एकत्रित करुन जेवण करणे,गौरी -गणपतीला रानावनात मिळणारी फुले,औषधी वनस्पती यांचा वापर करणे, नागपंचमीला फेरावरची गाणी असतील, किंवा हादग्याची गाणी असतील हे सर्व भारतीय संस्कृतीचे द्योतक आहे. अनेक लोककथा, लोकगीते, दंतकथा, यामधून संशोधन केल्यावर हडप्पा व मोहोंजोदाडो सारखी गडप झालेली शहरे आपणास सापडली आहेत. जात्यावरच्या ओव्यामधून तर स्त्रीमनाचे भावविश्व व त्यांचे अंतरंग उलगडताना दिसते.

धरणग्रस्त माऊली आपल्या जात्यावरच्या ओव्या गाताना म्हणते,

*" बांधिलं धरण,त्याचं पाणी आलं गळयापाशी*
*सावळा गं माझा बंधुराया झाला दरवेशी"*

अस्वलांचे खेळ करणाऱ्या दरवेशासी आपल्या भावाची तुलना तिने केली आहे याचे कारण ही ती सांगते पिण्यास व शेतीस पाणी नाही स्वतःची जमीन त्यांने सरकारला दिली पण सरकारी अनास्थेमुळे त्याला घरदार सोडून दुसरीकडे जावे लागले. तेथेही त्याला शेतजमीन मिळाली नाही. सगळं असताना सर्वस्व दुसऱ्याला देणारा दानशूर कर्णासारखा भाऊ दरवेशासारखा फिरतोय. आपल्याकडचे दुसऱ्याला देण्याची भारतीय संस्कृती आपणास या ओवीतून दिसते.

*मंगळागौरीची पूजा करणारी स्त्री म्हणते*
*"पहाटे उठू फुले आणू पाटीभर*
*आज आहे मंगळागौर उशाताईची*
*पहाटेच्या प्रहर रात्री उठोनी फुले आणू*
*मंगळागौर सजवूनी ठेवायला*
*प्राजक्तीच्या कळया करु त्यांची अब्दागीर"*

भारतीय सण समारंभ व व्रतवैकल्ये यांचा संबंध हा थेट निसर्गाशी असलेला दिसतो. सांस्कृतिक पर्यावरण अभ्यास करत असताना संस्कृती व पर्यावरण या दोहोंचा एकत्रित विचार करावा लागतो. शेतीशी संबंधित आपली भारतीय संस्कृती व त्याचा अभ्यासही सांस्कृतिक पर्यावरण अभ्यासात केला जातो. पर्यावरण प्रणाली त्याचे सिद्धांत मानवी सांस्कृतिक गटाला कसे लागू होतात याचाही अभ्यास यामध्ये केला जातो. निसर्गावर परावलंबी असणारा शेतकरी पावसाची पूजा करतो. विज्ञान या गोष्टीला भाकडकथा किंवा अंधश्रद्धा मानत असले तरी नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'पाऊस पळवून लावणारी जादू' या लेखात त्यांनी पाऊस येण्यासाठी केलेली नग्नपूजा, पाऊस मागणे, गाढवाचे लग्न लावणे, पाऊस भरपूर पडल्यांनतर पावसाला चटके देणे असे काही

विधी ग्रामीण भागात आजही केले जातात. याचे चित्रण केले आहे. या सर्व विधीमध्ये भारतीय संस्कृतीची रुपे कशी सापडतात त्याचे चित्रण कशा प्रकारे आले आहे हे शोधणे अत्यंत महतत्त्वाचे ठरते.

आज त्रिपुरारी पौर्णिमेला पाण्यात दिवे सोडण्याची संस्कृती आपण पाहतो. तिर्थक्षेत्री गेल्यांनतर जलदेवतेची पूजा केली जाते. पाण्यात दिवा सोडून ओटी खणानारळाने भरुन पूजा केली जाते. कोल्हापूरमध्ये पंचगंगेच्या काठी लाखो दिवे लावले जातात. लक्षव्दिपाची उजळण होते. हीच परंपरा थोडयाफार फरकाने जपानमध्येही दिसते जपानमध्येही पाण्यात दिवे सोडून जलाची पूजा करतात या सर्वांचे चित्रण मराठी साहित्यातून कशा प्रकारे आला आहे याचा अभ्यास सांस्कृतिक अभ्यासात केला जातो. दीपावलीमध्ये दीपप्रज्वलन केले जाते.“दिन दिन दिवाळी गायी म्हशी ओवाळी” असे म्हणून गोसंस्कृतीची पूजा केली जाते. त्या दिवशी बळीराजा,गौळणी या शेणापासून तयार केल्या जातात.एक एक करता सातव्या दिवशी डोंगर रचला जातो. ही बळीराजाची संस्कृती मराठी गीतातून व कवितेतून आपणास पहावयास मिळते. लोकसाहित्य हे सर्वांची अलिबाबाची गुहा आहे. फक्त त्यात शिरुन आपल्याला जे हवे आहे ते शोधण्याची गरज आहे. मराठी कवितेमध्ये प्राचीन काळापासून संस्कृतीचे पोवाडे गायले आहेत. ज्ञानेश्वरीमध्ये ‘मज पान फुल तोरंबावे।” असे सांगून परमेश्वर आणि निसर्ग यांच्या संबंधाचे वर्णन केले आहे. संस्कृती, नैसर्गिक संसाधने,शाश्वत सांस्कृतिक संबंध विकसित होण्यासाठी अशा अभ्यासाची गरज आहे.

सांस्कृतिक अंगाने विचार करीत असता १. संस्कृती अंतर्गत २. आंतरसांस्कृतिक ३. बहुसांस्कृतिक असा बहुविध अभ्यास मराठी साहित्यातून होत असलेला दिसतो.मराठी साहित्यातील सर्वच वाङ्मय प्रवाहातून कमी अधिक प्रमाणात संस्कृतीचे चित्रण झालेले आहे.उदाहरणादाखल आपल्याला पहावयाचे झाल्यास असे दिसून येईल की,‘हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ’ या भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीमध्ये मोहेंजोदाडो आणि हडप्पा या संस्कृतीच्या चित्रणाबरोबरच महाराष्ट्रातील सांस्कृतिक इतिहासाचा मागोवा घेण्याचे काम केले आहे. ‘सातपाटील कुलवृतांत’ या कादंबरीमध्येही कुलाचा वृतांत म्हणजे एक प्रकारे सांस्कृतिक इतिहास मांडण्याचे काम केले आहे. साहित्य सांस्कृतिक मानदंड आणि मूल्ये, श्रद्धा, वृत्ती प्रतिबिंबित करते. ही कादंबरी राजकारण, धर्मकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान, इतिहास, भूगोल, प्राणी-पक्षी, नदी, विद्यापीठ, विदेश, युद्ध, पलायन, खून, मारामाऱ्या, जंगल, पशु, वंश, देवक, गोत्र, भाषेचे मूळ, संशोधन, जातीच्या अहंपणातील फोलपणा, पोलीस, कामगार, व्यापार, गुलाम, सरंजामदार, राजे, सात-आठ शतकांचा कालावकाश अशा विविध अंगांना सामावून घेते. कादंबरीची सुरुवात १२८९मध्ये होते, तर शेवट २०१९ मध्ये. म्हणजे ७२० वर्षांचा विविधांगी पट ही कादंबरी उलगडून दाखवते. वर्गसंघर्ष आणि संघर्षाच्या समकालीन प्रक्रिया आणि ते विविध प्रकारचे सामाजिक अनुभव आणि तथ्यांमधील विविधता देखील प्रतिबिंबित करते. साहित्य हे युगाचे भावविश्व प्रतिबिंबित करते. हे त्याच्या काळातील उत्पादन मानले जाते.साहित्यात सांस्कृतिक मूल्ये लेखकाच्या माध्यमातून व्यक्त केली जातात. लेखकाची वंश, लिंग, वांशिकता, स्थान, वारसा आणि इतर घटक लेखकाला सांस्कृतिक वृत्ती, कल्पना आणि विश्वास कसे समजतात यात भूमिका बजावतात.त्यातूनच त्याची स्वत:ची म्हणून काहीएक मनोभूमिका तयार होत असते. तीच मनोभूमिका तो साहित्यातून व्यक्त करीत असतो. साहित्याचा सर्वात महत्त्वाचा स्त्रोत म्हणजे समाज आणि लोक. साहित्य हे समाजाला आवाहन करण्यासाठी आणि व्यक्त होण्यासाठी बनवले जाते. त्यामुळे साहित्य आणि समाज यांचा थेट संबंध आहे .

साहित्य लेखक लिहित असतो, परंतु ते साहित्य लेखक आणि समाजावरही प्रभाव टाकतात. म्हणून, त्या काळाचे आणि परिस्थितीचे सांस्कृतिक संदर्भ विचारात घेणे महत्त्वाचे आहे. संस्कृती एखाद्या विशिष्ट वेळी लोकांच्या विशिष्ट गटाच्या विश्वास, चालीरीती, मूल्ये आणि क्रियाकलापांचा संदर्भ घेऊ शकते .साहित्यातून समाजाच्या चांगल्या आणि वाईट दोन्ही मूल्यांचे प्रतिबिंब दिसते. वाईट मूल्ये प्रतिबिंबित करताना ते आपल्याला समस्या सुधारण्यास आणि सोडविण्यास प्रवृत्त करते. समाजातील चांगल्या मूल्यांचे प्रतिबिंब ते आपल्याला अनुकरण करण्यास प्रवृत्त करते. लोकांच्या वास्तव आणि कल्पित जीवनाचे प्रतिबिंब साहित्यातून उमटत असते त्यावरूनच साहित्यातून येणाऱ्या सांस्कृतिक संचिताचा मागोवा पुढील पिढीला घेणे सोपे होते आणि सांस्कृतिक संचिते पुढच्या पिढ्यांकडे सुपूर्द केली जातात. संस्कृती नेहमी परंपरागत व म्हणून दिक्काल निर्बंधित अशी असते. संस्कृती समाजाची असते. व्यक्तींमध्ये संस्कृती साकारते, जीवंत होते, नव्याने निर्माण होते किंवा लय पावते पण कोणतीही व्यक्ती कोणत्याही संस्कृतीचे स्वरूप पूर्णांशाने दाखवूच शकत नाही. संस्कृतीला व्यक्तिनिरपेक्ष असे एक निराळेच स्वतंत्र जीवन असते.त्यामुळेच साहित्यातून व्यक्त होणारी सांस्कृतिक रूपे पूर्णांशाने व्यक्त होतातच असे नाही.

साहित्य आणि संस्कृतीचा अभ्यास संशोधकांना लेखन, विचार आणि अभिव्यक्ती यातील अमूल्य कौशल्ये प्रदान करतो . संप्रेषण आणि आकलन नवीन सर्जनाला आणि सृजनाला आवाहन करते.विविध माध्यमांतून साहित्य अनुभवता येते; तोंडी, ऑडिओ, ऑडिओव्हिज्युअल इ. ही संस्कृतीची अभिव्यक्ती आहे कारण ती मानवी ज्ञान, विश्वास आणि वर्तन दस्तऐवजीकरण करते . साहित्याप्रमाणे, संस्कृती ही एक विकासात्मक आणि परिवर्तनशील घटना आहे ज्याचा अर्थ वेगवेगळ्या गटांद्वारे वेगवेगळ्या गोष्टी समजल्या जातात.मानवी स्वभाव, वेळ, कृती, संवाद, जागा, शक्ती, व्यक्तिवाद/सामुहिकता आणि स्पर्धात्मकता/सहकारिता ही संस्कृतीची आठ महत्त्वाची अंगे आहेत. संस्कृतीचे प्रमुख घटक म्हणजे चिन्हे, भाषा, नियम, मूल्ये आणि कलाकृती. त्यामुळे

१. भाषा प्रभावी सामाजिक परस्परसंवाद शक्य करते आणि लोक संकल्पना आणि वस्तूंच्या कल्पना कशा तयार करतात याचा भाषेवर प्रभाव पाडतो.
२. यातूनच एक चिन्हमीमांसा तयार होते.
३. नवीन नियम तयार केले जातात ते अलिखित/ लिखित अशा दोन्ही स्वरुपात असू शकतात.त्याचबरोबर जुन्या आणि नव्या मूल्यव्यवस्थेची तुलनात्मक चिकित्सा केली जाते.
४. पारंपरिक विश्वास, सामाजिक रूपे आणि वांशिक, धार्मिक किंवा सामाजिक गटाची भौतिक वैशिष्ट्ये कलाकृतीवर प्रभाव पाडतात.

भारतीय संस्कृतीचा विचार करता अनेक भाषा, अनेक जाती जमाती , विविध रुढी परंपरा आणि त्यातून साधली गेलेली भारतीय एकात्मता यांचे मिश्रण आपणास दिसते.भारतीय संस्कृती ही देशाच्या इतिहासामुळे, विलक्षण भूगोलामुळे आणि जनतेतील वैविध्यामुळे आकारास आली आहे. शेजारच्या देशांतील चालीरीती, परंपरा व कल्पना सामावून घेत, भारतीय संस्कृतीने सिंधुसंस्कृतीदरम्यान जन्माला आलेले तसेच वैदिक काळात, लोहयुगकाळात, बौद्ध धर्माच्या उद्भव आणि ऱ्हासाच्या काळात तसेच भारताचे सुवर्णयुग, मुसलमानी आक्रमण व युरोपियन देशांच्या वसाहतींदरम्यान झालेले बदल पचवूनदेखील स्वतःचे परंपरागत प्राचीनत्व टिकवून ठेवले आहे. भारतीय संस्कृतीने तिच्या इतिहासाने, अद्वितीय भौगोलिक रचनेने, वैविध्यपूर्ण लोकजीवनाने आणि शेजारील देशांच्या परंपरा व कल्पना स्वीकारून तसेच पुरातन परंपरा जपून आकार घेतला आहे. देशभरात पसरलेल्या विविध उपसंस्कृती आणि हजारो वर्षांच्या परंपरा यांची एकत्रित वळलेली मोट म्हणजे भारतीय संस्कृती. कोणत्याही संस्कृतीचे निरीक्षण आणि अभ्यास करावयाचा झाल्यास त्या संस्कृतीमध्ये समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोन होता व आहे यातूनच त्यांचे एकूण सांस्कृतिक विश्व जगासमोर उभे राहते.ब्रिटीश साम्राज्य त्यातील स्त्री पुरुष यांच्या मनोभूमिका तपासल्यावर साराह बर्टमन या आफ्रिकन गुलाम स्त्रीचा झालेला छळवाद २१ व्या शतकातसुद्धा चालू होता,यातून त्यांची असलेली विकृत मानसिकता दिसून येते. अगदी भारताचा विचार करावयाचा झाल्यास केरळमधील अगदी कालपरवापर्यंत चालू असलेला ब्रेस्ट टॅक्स नीच मनोवृत्तीचेच द्योतक आहे. अशा असांस्कृतिक प्रवृत्तींचे चित्रण मराठी साहित्यातून झाले आहे का याचाही अभ्यास आपल्याला करावा लागतो.

प्रत्येक मानवी समाज अथवा समुहाची स्वतंत्र संस्कृती असते. कारण कोणत्या ना कोणत्या प्रकारचा फरक इतर समुहाच्या बाबतीत निदर्शनास येतो. हे भिन्नत्व भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक घटकांमुळे निष्पन्न होते. एका विशिष्ट समाजाच्या संस्कृतीमध्ये असणारे ज्ञान, विश्वास, परंपरा, मूल्य, प्रमाणके संकेत हे दुसऱ्या समाजाच्या संस्कृतीमध्ये असतीलच असे नाही. म्हणून प्रत्येक समाजाच्या संस्कृतीनुसार त्याच्या ज्ञान, विश्वास, परंपरा, मूल्ये, प्रमाणके इ. मध्ये भिन्नत्व आढळून येते. जसे की भारतीय संस्कृती पाश्चात्य राष्ट्रांची संस्कृती भिन्न भिन्न असू शकते किंवा मॉरीशस देशातील संस्कृती आणि भारतीय संस्कृती एकसारखी असलेली दिसते याच्या कारणांचा अभ्यास करावा लागेल. साहित्य हे मानवी जीवनाचे प्रतिबिंब आहे'. "साहित्य हा समाजाचा आरसा आहे." "संस्कृती ही विविध लोकसमुदायाची सुजीवन पध्दती आहे". अशी विविध मते आपण ऐकतो. साहित्य, समाज आणि संस्कृती हे एकमेकांना परस्पर पूरक घटक आहेत. कला, समाज आणि संस्कृती यांच्या अभ्यासाचे 'साहित्य' हे महत्त्वाचे माध्यम आहे तर साहित्य, समाज, आणि संस्कृती यांचे अत्यंत घनिष्ट संबंध असून ते परस्परांना पूरक असतात. "साहित्यनिर्मीती हा मानवाच्या सामाजिक जीवनातील सांस्कृतिक उपक्रम आहे, तसाच तो संस्कृतीचा एक घटकही आहे. विवाह संस्थेपासून राज्यसंस्थेपर्यत सर्व सामाजिक संस्था, या संस्थाच्या लिखीत अलिखीत नियमातून निर्माण झालेल्या चालीरीती, रूढी

परंपरा आणि रिवाज तसेच कला आणि साहित्य हे संस्कृतीचे चार घटक आहेत. या चार घटकांनी मिळून 'संस्कृती' ही परिचीत झालेली आहे. पुष्कळदा 'संस्कृती' आणि 'समाज' असे म्हणतो तेव्हा आपल्याला 'लोकांचे वर्तन' अभिप्रेत असते. समाज हा ओळखता येण्यासारखा 'लोकसमुदाय' असतो. तो आदिम समाज, भटका विमुक्त समाज, खेडयातील कृषिजीवनाशी निगडीत विचार करावा लागतो. या सर्वांचे चित्रण मराठी साहित्यातून कसे आले आहे याचा विचार करणे या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

**निष्कर्ष**

१.साहित्य ही कला समाजसापेक्ष आहे.
२.समाज आणि संस्कृती याचा प्रभाव साहित्यावर पडलेला असतो.
३.संस्कृती आणि भाषा यांचाही अन्योन्य सबंध असलेला दिसतो.
४.सामाजिक परिवर्तनाचे पडसाद साहित्यावर पडत असतात.
५.पर्यावरण आणि संस्कृती याचा जवळचा सबंध आहे.
६.सांस्कृतिक अंगाने विचार करीत असता १. संस्कृती अंतर्गत २. आंतरसांस्कृतिक ३. बहुसांस्कृतिक असा बहुविध अभ्यास मराठी साहित्यातून होत असलेला दिसतो.
७.मराठी साहित्यातील सर्वच वाड्मय प्रवाहातून कमी अधिक प्रमाणात संस्कृतीचे चित्रण झालेले आहे.

**संदर्भ : -**

१. डॉ.कुलकर्णी निरंजन, इतिहास लेखनातील नवे प्रवाह , स्वयं अध्ययन साहित्य, शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर पृ.क्रं. ६
२. डॉ.कुलकर्णी निरंजन, इतिहास लेखनातील नवे प्रवाह , स्वयं अध्ययन साहित्य, शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर पृ.क्रं. ७
३. डॉ.कुलकर्णी निरंजन, इतिहास लेखनातील नवे प्रवाह , स्वयं अध्ययन साहित्य, शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर पृ.क्रं. ७

# मराठी कथेतील प्रगल्भ समाजभान : एक दृष्टिक्षेप

**डॉ. युवराज देवाळे**
कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटी

आधुनिक मराठी साहित्यातील कथा वाङ्मयाला जवळपास दिडशे वर्षांची परंपरा आहे. मौखिक लोककथेला हजारभर वर्षांचा मौखिक इतिहास लाभला आहे. आधुनिक मराठी कथेच्या आरंभ ते 2000 सालापर्यंतच्या प्रवासात आशय आणि अभिव्यक्ती अनेक रूपे लाभली ग्रामीण, दलित, आदीवासी, स्त्रीवादी, महानगरीय साहित्य प्रवाहांच्या स्वरूपानुसार ती आपली वैशिष्ट्यपूर्ण प्रकृती धारण करत गेली. आशयसूत्रे, अभिव्यक्तीच्या सर्वच घटकांतून त्यांचा प्रत्यय येतो. प्रस्तुत शोधनिबंधात इ.स.२००० नंतरच्या म्हणजेच एकविसाव्या शतकातील मराठी कथेतील सामाजिक संदर्भाचा विचार करावयाचा आहे, मात्र शोध निबंधांच्या मर्यादांचा विचार करता त्यातील सर्वच बाजूंचा अभ्यास शक्य नाही. समाजभान प्रगल्भतेने मांडणाऱ्या कथा या कालखंडात लिहिल्या गेल्या आहेत. 29 व्या शतकातील बदलत्या समाजव्यवस्थेवर संयंत कलात्मकतेने धीट मांडणी नवकथेपासून समाज आणि संस्कृतीसंदर्भात गांभीर्याने मांडणी करणा-या कसदार कथा वैपुल्याने आढळतात. अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, कमल देसाई, गौरी देशपांडे, जी. ए. कुलकर्णी, विलास सारंग, रंगनाथ पठारे, मेघना पेठे यांच्या कथांतून कलात्मक प्रतिक्रिया येते तर दलित, ग्रामीण, आदिवासी, स्त्रीवादी कथांतून समाज आणि संस्कृतीचे थेट संदर्भ येतात. प्रस्तुत शोधनिबंधात 21 शतकातील समाजभान प्रगल्भतेने व्यक्तं करणाऱ्या कथा साहित्यावर दृष्टिक्षेप टाकावयाचा आहे

**उदद्दीष्टये**

1. 21 व्या शकतकातील मराठी कथेतील सामाजिक संदर्भाचा शोध घेणे.
2. 21 व्या शतकातील मराठी कथेतील सामाजिक संदर्भाची कलात्मक मांडणी अभ्यासने .
3. 21 व्या शतकातील मराठी कथेतील सामाजिक भानाचे स्वरुप अभ्यासणे .

**गृहितके -**

1. 21 व्या शतकातील मराठी कथेत सामाजिक संदर्भाची कलात्मक मांडणी आढळते.
२. 21 व्या शतकातील मराठी कथेत समकालिन तत्वे आढळतात.
3. 21 व्या शतकातील मराठी कथेत प्रगल्भ, चिकित्सक समाजभान प्रत्ययास येते.

**संशोधन पद्धती-**

प्रस्तूत विषयाच्या तपशीलवार मांडणीसाठी विश्लेषणात्मक आणि संहितालक्ष्यी अभ्यासपध्दतीचा आवश्यकतेप्रमाणे उपयोग केला जाणार आहे.

**विषय प्रवेश :-**

प्रारंभापासून साधारणतः १९२० पर्यंत परभाषिक प्रभावात धडपडणा-या मराठी कथेने १९४५ पर्यंत स्वतः चा स्वतंत्र आकार धारण केला. १९४५ च्या नवकथेने कथेतील आशय, अभिव्यक्तीची कृत्रिमता टाकून आशयानुरूप लवचिकता धारण केली, पुढे मध्यवर्ती प्रवाहातील नागर कथेने हे रूप अधिक विकसित केले. १९६० च्या दरम्यान उद्यास आलेल्या ग्रामीण, दलित, आदिवासी आदी वाङ्मयप्रवाहातील कथा अधिक वास्तवदर्शी व जीवनाभिमुख झाली. १९८0 नंतरच्या स्त्रीवादी, महानगरीय कथेने वास्तवाला चिकित्सेचे स्वरूप दिले. साहित्य क्षेत्रात काळाची काटेकोर विभागणी शक्य नसली तरी अभ्यासाच्या सोयीसाठी काही टप्पे निश्चित मानावे लागतात. या संदर्भात 21 व्या शतकातील मराठी कथा असा विचार करावयाचा झाला तर तिची लक्षणे त्यापूर्वीच्या कथेतही सहजतेने आढळतात. प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने कथेतील सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ, समकालीन तत्त्वे यांची मांडणी 2000 पूर्वीच्या कथेत तितक्याच प्रगल्भतेने केली आहे हेही नमुद करावे लागेल.

साहित्य आणि समाज यातील परस्परसंबंध सर्वश्रुत आहेत. साहित्य हा मानवी समाजाच्या जीवनातील सांस्कृतिक उपक्रम असतो. रंजनाबरोबरच त्यातून प्रसारित होणारे सामाजिक ज्ञान हे अनुभवाधिष्ठीत असते, अधिक सूक्ष्म पातळीवर विचार केल्यास साहित्य आणि समाज यांच्यातील संबंध म्हणजे समकालीन वास्तवाच्या प्रतिमेशी सुसंवाद[1] असतो लेखक (प्रस्तुत विषयाच्या

अनुषंगाने कथाकार) म्हणून या प्रतिमा व्यवहाराच्या आधाराने आपल्या साहित्यकृतीतून आपल्या समकालाची मांडणी करत असतो. त्याची साहित्यकृती ज्या काळात व ज्या परिस्थितीत निर्माण होते त्यांचा प्रभाव कलाकृतीवर पडतो[2], तसेच अशी साहित्यकृतीही त्यावर आपली प्रतिक्रिया- नोंदवत असते. सामाजिक व सांस्कृतिक अनुबंधाने - जोडलेले साहित्य जीवनाकडे मानवतावादी दृष्टीने पाहते. त्याचा व्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन आस्थेचा असतो. मराठी कथाकारांनी अनेकविध पद्धतीने समाजजीवनाचा वेध घेतला आहे साहित्यातील कृतक कलावाद्यांचा अपवाद वगळता मराठी जनसमुदायाचा सामाजिक व सांस्कृतिक आलेख मराठी कथेतून मांडलेला दिसतो. विविध चळवळी, आंदोलने, विचारप्रवाह अशा समाजस्तरावरील बाबींपासून व्यक्तीच्या अंतर्मनाच्या पातळीवरील सूक्ष्म व्दंदा पर्यंतचे विषय या कथेने ताकदीने हाताळले आहेत. एकंदरीत स्वातंत्र्यादरम्यानच्या कथेचा आढावा घेतला तर समाजाची जाडण-घडण तिच्यातील अंतः प्रवाह, सामाजिक-आर्थिक संबंध, अशा विविध घटकांचे प्रसार संबंध, तसेच शोषण- संबंध या जाणीव प्रकट होते,[3] या मागे सामाजिक जाणीव कार्यरत असल्याचे जाणवते. इ.स. 2000 पर्यंतच्या कथेत या जाणीवेचे प्रगल्भ्, चिकित्सक रूप कमल देसाई, जी. ए. कुलकणी, गौरी देशपांडे अशा मान्यवर कथाकारांच्या रचनेतून आढळते. २१ व्या शतकातील नव्या दमाच्या कथाकारांनी त्याहून थोडे वेगळे कथारूप साकारले आहे. उपरोक्त कथाकार मूळ प्रश्न रूपक, प्रतिकात्मक पद्धतीने सोडवतात. समाजव्यवस्थेतील न्यून, खस प्रवृत्ती, दोष यासाठी ते कोणालाही खटकू नये अशा प्रतीक-प्रतिमांची योजना करून आपली कथा चिरेबंद करण्याचा प्रयत्न करतात, नंतरच्या पीढीतील भारत सासणे, जयंत पवार, जी.के. ऐनापूरे, आसाराम लोमटे, समर खडस, प्रणव सुखदेव आदी कथाकार मात्र वर्तमान समाजातील अशा बाबींना थेट पणे भिडतात. मानवी समाजजीवना समाजा बरा-वाईट प्रभाव टाकणाऱ्या बाबींना थेट मध्यवर्ती आशयसूत्राचे स्थान देतात, बदलते भारतीय व महाराष्ट्रीय समाजजीवन आणि त्यात त्यांचा मानवी समाज जीवनावर पडणारा प्रभाव हा त्यांच्या कथेच्या आरायरचनेचा केंद्रबिंदू आहे. वर्तमान जीवन व्यवहारा- पार्श्वभूमीवर मानवी अस्तित्व, दांभिकता, धार्मिक मूलतत्ववाद, आदी आशयसूत्रांची घीट मांडणी हे त्यांच्या कथारचनेचे ठळक वैशिष्ट्य ठरेल. प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय या रचनेतील प्रगल्भ समाज मानाचा आहे. आपल्या कुलाचा, वंशाचा अभिमान ही जगभर च्या मानवी समुदायात आढळणारी सार्वत्रिक बाब आहे. काळाच्या ओघात ती विकृतीकडे झुकणारी बनली आहे. आसाराम लोमटेंनी आपल्या 'चिरेबंद[4] कथेत साध्या, सरळ स्वभावाच्या प्रसाद या नायकाच्या नजरेतून अशा दांभिकतेचा वेध घेतला आहे. जमिनीच्या वादातून मृत्युमुखी पडलेल्या सावकार-जमीनदाराला स्वातंत्र्यसैनिक ठरवण्याचा खटाटोप ही नातवाची वंचनाच ठरते. आपला कौटुंबिक आब जपणारी आजी , त्यापासून दूर जाणारे वडिल आणि मुलासमोर सत्ये मांडु पाहणारी आई या सर्वात अत्यंत सरळपणे सत्यापर्यंत पोहोचणारा नायक प्रसादचा हा आत्मशोधाचा प्रवास आहे वडिलांनी अशा लुबाडलेल्या वारशाला कवटाळले नाही, तसेच ते स्वच्छपणे नाकारणारा नायक ही निर्मिती प्रगल्भ समाजभान दर्शवते.

आपल्या मूळांचा शोध हा मानवाच्या आस्थेचा विषय आहे ऐहिक सुखाच्या शोधात भौतिक प्रगतीच्या प्रदेशाकडे खेचलेला माणूस आपल्या मूळापासून तुटत गेला. सर्व काही मिळाल्यावर किंवा सर्वस्व गमावल्यावर त्याला पहिली आठवण येते ती आपल्या मूळांची. आपले गाव, घर, आप्त स्वकीय यांची ओढ रक्तात असतेच. आताच्या रासायनिक, औषधी मा-याच्या शेतीने आणि कोरोनानंतरच्या उध्वरतपणातून ही ओढ अधिकच गहिरी झाली. प्रदूषित हवा, पाणी आणि अन्नघटकांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणपूरक घटकांकडे वळणे आता अपरिहार्य आहे, 'छत्रीवाला' या फँटसीला कथेते 'आमचं गाव कदाचित तुम्हाला तेवढं छान, एक्झॉटिक वाटणार नाही, पण तरी एकदा जरूर भेट द्या,[1] असं जाहिरातीतूनच सांगणारी अगतिकता प्रणव सखदेव यांनी अत्यंत तरलतेने रेखाटली आहे. भौतिक प्रगतीच्या हव्यासात एकंदरीत सर्व प्राणीमात्रांच्या
प्राणतत्वाला नख लावण्याचे काम बिनदिक्कत सुरु 'असल्याची हताश जाणीव अशा कथांतून व्यक्त होते. कथेची रचना फॅण्टसी सदृश्य असली तरी त्यामागील कथाकार मानवी जीवनाची करुणा भाकणारा आस्थेवाईक शुभचिंतक आहे. त्यांची साहित्य निर्मिती मानवापासून सुक्ष्म जीवजंतूपर्यंत काळजी वाटणा-या समाज हितैषु भावनेतून आली आहे.

सदय़ स्थितीत धार्मिक मूलतत्ववादाने सर्वत्रच विखारी रूप धारण केले आहे. विकसित, अविकसित, दरिद्री असा कोणताच देश त्याला अपवाद राहिला नाही. अनेक धर्म, पंथ, राजकीय पक्षांनी त्याला आपला अजेंडा बनवला आहे. त्यावर उघडपणे भाष्य करण्यास कोणी फारसे उत्सूक नसताना, काही कथाकारांनी हे आव्हान आपल्या लेखनातून पेलले आहे. भारत सासणेंनी आपल्या 'अंतक आणि माझ्या दु:खाचा अंत या कथेत रोमा या चित्रकाराच्या राम-लक्ष्मण सीतेच्या चित्राच्या निमित्ताने

मूलतत्ववादाचे भीषण रूप उभे केले आहे. रामाहुन लक्ष्मण अधिक उंचीचा दाखवण्याचा तिचा गुन्हा संस्कृती रक्षकांना अमान्य आहे.[6] एका मुस्लिम कलावंताने हिंदू देवतांचे चित्रण का करावे? असा त्यांचा जाहिर आक्षेप आहे, वास्तवात ती मुस्लिम नाही हे त्यांना माहीत आहे, पण त्यांना तिच्या मुस्लिम नसण्याचा प्रश्न नाही, प्रश्न धार्मिक तेढ कशी वाढवावी याच्याशी आहे. कोणताही आक्रस्ताळेपणा न करता एका साध्या आशयसूत्रातून भारत सासणेंनी मुलतत्ववादाचे विक्राळ रूप मांडले आहे. भारत सासणेच्या कथेत एका सूत्राच्या रूपात आलेल्या कथाबीजाबरोबच समर खडस यांची 'बक-याची बॉडी'[7] ही संपूर्ण कथाच मूलतत्त्ववाद, वंश वर्चस्ववादावर भाष्य करते. दुबईला नोकरीस जाण्याची तयारी करणा-या नसीम कुलकर्णीचा पासपोर्ट पोलीस रिपोर्टसाठी येतो, आणि तिथून त्याच्या वाईट काळाला सुरुवात होते. कोकणातील एका साध्या सरळ जगणा-या कुटूंबाचा दोष इतकाच की ते संशयास्पद दृष्टीने पाहिले जाणा-या अल्पसंख्य समुदायाचे आहेत. नसीमला दुबईत नोकरी देणारी कंपनी पोलीसांना आंतरराष्ट्रीय गुन्हेगाराशी संबधित वाटते. समस्या मूळापासून सोडवण्यापेक्षा आपल्या बढ़ती - वा इतर कारणांसाठी पोलिसी यंत्रणा किती हडेलहप्पी- करू शकते त्याचे चित्रण या कथेत संयत संवेदनशीलतेले हाताळले आहे.

साहित्याचा कालखंड निश्चित तारखेपासून मांडता येत नसला तरी एका विशिष्ट कालबिंदूवर साहित्याची प्रवृत्ती आपले स्वतंत्र, स्वयंपूर्ण रूप धारन करत असते. मराठी कथेते 2000 नंतर असे पूर्वीपेक्षा थोडे वेगळे स्पष्ट, वास्तवदर्शी तरीही संयत कलात्मक रूप दर्शविले आहे. या कालखंडातील गांभीर्याने लेखन करणा-या कथाकारांच्या कथांतून समकाळाचे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ आणि त्यांची सूत्रबद्ध मांडणी कलेली आढळते. जयंत पवार, मेघना पेठे, जी. के. ऐनापूरे, समर खडस, प्रणव सखदेव अशा कथाकारांनी समकाळाला कवेत घेत वास्तवाला भिडणारी कथा लिहिली आहे प्रस्तुत सोध निबंधातून पुढील निष्कर्ष मांडता येतील.

**निष्कर्ष -**

1. २१ व्या शतकातील मराठी कयेत समकालीन तत्वे आढळतात.
2. २१ व्या शतकातील मराठी कथेत सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ आढळतात.
3. २१ व्या शतकातील मराठी कथेत वास्तवाची संयत व कलात्मक मांडणी आढळते.
4. २१ व्या शतकातील मराठी कक्षेत प्रभल्भ समाजभान प्रत्ययास येते.

एकंदरीत २१ व्या शतकातील मराठी कथांचा परामर्श घेता, ती कोणत्याही काल्पनिक व्यूहात गुंतून राहात काय नसल्याचे आढळते. समाज वास्तवातील घटकांना थेट केंद्रवर्ती स्थान देत ती मानवी अस्तित व सत्याचा शोध घेते. मानवी मनातील सनातन अहंगंडांचा मानवी जीवनावरील अनिष्ट परिणाम ती दर्शवते. धर्म, वंशाच्या वर्चस्ववादावर भाष्य करताना तीचा स्वर आक्रस्ताळा होत नाही. कथा साहित्याचे कलात्मक स्वातंत्र्य अबाधित ठेऊन ती अत्यंत प्रौढ, प्रगल्भतेने समाजातील, व्यक्तिमनातील ठसठसती भावना प्रकट करते. कोणताही अभिनिवेश न बाळगता विशिष्ट भूमिकेचा बडिवार न मिरवता सजग मानवतावादी भूमिकेतून ती आपले कार्य ठामपणे पार पाडते.

**संदर्भ:-**

१. डॉ. सदा क-हाडे, समाज आणि साहित्य, लोक वाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, व्दि. आ., १९९९ पृ. ३४
२. डॉ. अंजली सोमण, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १८८९, पृ.१२.
३. डॉ. नागनाथ कोतापल्ले, साहित्याचा अन्वयार्थ, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, व्दि. आ. २००८, पृ. 2-
४. आसाराम लोमटे, आलोक, शब्द प्रकाशन, मुंबई, व्दि. आ., २०१५, पृ. २४
५. प्रणव सखदेव, नाभितून उगवलेल्या वृक्षाचं सहस्य, रोहन प्रकाशन, पुणे, प्र.आ., २०१७, पृ. २२.
६. भारत सासणे, अदृष्ट, मौज प्रकाशन गृह, मुंबई, प्र. आ., २००९ पृ. ११७ .
५. समर खडस, बक-याची बॉडी, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ., २००९, पृ.१ ते ३४.

# गौतमीपुत्र कांबळे यांच्या कथेतील विविध कलांमधील प्रतिकात्मकता

**प्रा.(डॉ.) प्रशांत गायकवाड**
श्री.विजयसिंह यादव महाविद्यालय,पेठ वडगाव,
जि.कोल्हापूर ४१६११२
ई-मेल-drprashantgaikwad76@gmail.com

**प्रस्तावना-**

गौतमीपुत्र कांबळे हे स्वत:ची एक निश्चित वैचारिक आणि वाङ्मयीन भूमिका घेऊन जगणारे आणि लिहिणारे लेखक आहेत.फुले-आंबेडकरी विचारधारा प्रमाण मानून ते गेली अनेक वर्षे विचार आणि लेखन यांच्या माध्यमातून चळवळीला गतिमान करण्याचा प्रयत्न करत आहेत.आतापर्यंत त्यांचे 'परिव्राजक' (२००४) आणि 'जयंती' (२०२२) हे दोन महत्त्वाचे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत.या माध्यमातून त्यांनी मराठी कथाविश्वाचे लक्ष वेधले आहे. त्यांच्या कथेतील विविध कलांमधील प्रतिकात्मकतेकडे लक्ष वेधून त्यांनी मोठा परिणाम साधला आहे.त्याचा परामर्श पुढीलप्रमाणे घेऊ.

गौतमीपुत्र कांबळे यांनी 'परिव्राजक' आणि 'जयंती' या कथासंग्रहातून साहित्य,चित्रकला.संगीत,नृत्य,शिल्पकला,पोस्टर इत्यादी विविध कलांचे विश्व कथा कहाणीच्या धाग्यामध्ये गुंफले आहे.या विविध कलांची चर्चा वाचता वाचता वाचक स्वत:ला हरवून जातो.लेखकाने कथेच्या माध्यमातून विविध कलांचे केलेले चित्रण मोठे मार्मिक आहे.यातील :प्ररिव्राजक' कथासंग्रहाविषयी नितिन रिंढे लिहितात.''चित्र,शिल्प या कलांची त्याची जाण पक्की आहे.'शोध सहाव्या इंद्रियाचा' या कथेत आलेल्या नृत्यकलेविषयीच्या संदर्भासाठी या लेखकाने भारतीय नृत्यकलेवरची सगळी महत्त्वाची पुस्तकं वाचून काढली,इतकंच नव्हे, तर नृत्यशाळेत काही दिवस घालवून नृत्याचं शिक्षण कसं दिलं जातं याचंही निरीक्षण त्याने भरपूर केलं मराठीतले फार थोडे लेखक कथा,कादंब-या लिहिण्यासाठी एवढे कष्ट उपसतात. नुसते कष्ट केले म्हणून गौतमीपुत्र चांगली कथा लिहू शकले असे नव्हे,तर आपल्याला पक्कं भान असलेली विचारप्रणाली,तत्त्वज्ञान कहाणीच्या रुपात ढाळून वाचकांसमोर आणण्यात ते यशस्वी झाले आहेत''[१] हे रिंढे यांचे विधान लेखकाच्या व्यासंगाकडे व प्रतिभेकडे आपले लक्ष वेधते यावरून आपल्या निर्मितीकडे पाहण्याचा कथाकाराचा व्यापक दृष्टिकोण सूचित होतो.आपण प्रत्यक्ष कथेमध्ये आलेल्या विविध कलांचा आढावा घेऊ. गौतमीपुत्र कांबळे यांनी विविध कलांचे केलेले चित्रण कलाप्रतिमांच्या मधून परिणामकारकपणे साधले आहे. ''साहित्यामध्ये सांकेतिक अर्थापेक्षा वेगळा अर्थ सूचविणारा व्यापार चालत असल्याने प्रतीक या संकल्पनेला साहित्यव्यापारामध्ये विशेष महत्त्व प्राप्त होते.''[२] कोणत्याही संस्कृतीचे तत्त्वज्ञान त्या प्रतीकांच्या माध्यमातून अभिव्यक्त होत असते,त्यद्वारेच सांस्कृतिक मूल्यांचा शोध घेता येतो.याचा विचार करता गौतमीपुत्र कांबळे यांच्या कथेतील कला प्रतिमा या केवळ कलांचे दर्शन घडविण्यासाठी त्यांच्याविषयी ज्ञान देण्यासाठी येत नसून बौद्धसंस्कृतीशी कलेचा असणारा संबंध दर्शविण्यासाठी प्रतीके म्हणून येतात.

**साहित्य:**

'कथा' या कथेत साहित्यकलेची चर्चा येते.ही कथा साहित्यनिर्मिती प्रक्रियेची चर्चा करते.कथेसाठी आवश्यक असलेल्या ताकदवान पात्रांच्या शोधार्थ यातील 'कथाकार' असतो.'ती' पात्रे सापडल्यानंतर त्यांना बोलतं करण्यासाठी त्याची अक्षरशः दमछाक होते.ती कथापातत्रे मौनातून बोलणं पसंत करतात.कोणत्याही शब्दांच्या स्पर्शावाचून दूर राहिलेल्या पात्रांना कथेत रेखाटण्यासाठी,कोणत्याही पात्रांसाठी न वापरलेल्या शब्दांचा झरा शोधून काढण्यासाठी,ते सामर्थ्य प्राप्त करून घेण्याची त्याची इच्छा असते.त्याच्या या इच्छेवरच ही कथा संपत्,असे वाटत असले तरी साहित्यनिर्मितीचे जे पारंपरिक संकेत आहेत ते संकेत मुळापासून गौतमीपुत्रांची कथा धुडकारते.आणि साहित्यनिर्मिती प्रक्रियेकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोण देते.

**शिल्पकला:**

'शिल्पासन या कथेत शिल्पकलेचे संदर्भ आलेले आहेत. ताज आणि फिजी हे पती-पत्नी शिल्पकार आहेत.ताज मूर्तीचा सांगाडा तयार करतो तर फिजी बारीक छन्नीने त्या सांगाड्याला जिवंत करते.ते दोघे मूर्तीशी इतके समरस होतात, कि ते दगडी मूर्ती घडविता घडविता स्वत:च एक दगड बनतात.

**चित्रकला:**

'कथा' या कथेत कथाकाराचा एक महान चित्रकार मित्र असतो.तो प्रत्येक कवीची कविता आपल्या रेषा आणि रंगात बांधून ठेवतो. कथाकार आणि चित्रकार यांच्यातील चर्चा कलेकडे पाहण्याची एक समंजस,नवी दृष्टी देऊन जाते.'शिल्पासन' कथेतील अरज आणि तेजसनने काढलेल्या चित्राची सनृताने केलेली चर्चा,भिंतीवरील चित्रासाठी सनृताने उजव्या डोळ्यावर बांधलेली पट्टी,चित्राबद्द्ल संवेदनशील झालेले तेजसन यांची संपूर्ण चर्चा वाचता-वाचता आपण देखील त्या कथेचाच एक भाग कधी होऊन जातो,हे समजत नाही.'शोध सहाव्या इंद्रियाचा' या कथेतील निकाय वरती चित्रकलेचा प्रभाव जाणवतो.बालपणी त्याला शिक्षकांनी गणित सोडवायला दिल्यानंतर उरलेल्या वेळात तो गणिताच्या शिक्षकांचेच व्यंगचित्र काढतो.पुढे त्याचे काका महानगरातील एका प्रसिद्ध चित्रकला विद्यालयात त्याला दाखल करतात.येथे तो लवकर गती घेतो.याचे चित्रण करताना लेखक निवेदनातून सांगतो." रेषा,रेषांचे प्रकार,त्यांची वैशिट्ये,त्यांचं मानवीकरण,निसर्ग आणि त्याचं मानवीकरण ,रंग रेषांचं नैसर्गिकीकरण तसेच चित्रकलेतील आकार,आशय मिती,माध्यमाबद्द्ल शिकत गेला आणि हाताळतही गेला.चित्रकला आणि इतर कलांच्या संबंधाविषयी जुजबी माहिती कलेतील वाद आणि त्यांचा इतिहास हळूहळू समजू लागले."[३] पुढे चित्रकला विद्यालयातील एका विदुषीच्या व्याख्यानातील 'सहाव्या इंद्रियाच्या' विचाराने निकाय अस्वस्थ होतो.याबद्द्ल त्यांच्याशी वाद झाल्याने चित्रकला विद्यालयातून निकायची हकालपट्टी होते.त्याचे मनही हद्द्पार होते.सुट्टीच्या दिवशी एका भल्या मोठ्या झाडाच्या बुंध्याची साल काढून त्यावर एक उत्थित चित्र कोरतो व त्या चित्राला कान लावून ते चित्र ऐकण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्या शोधाच्या दिशेने प्रगती नसल्याने चित्रकला विद्यालय सोडण्याचा निर्णय घेतो.

'जयंती' या कथासंग्रहातील 'जयंती..५' या कथेत दोन चित्रांचे संदर्भ येऊन जातात.खरे तर ते विचार करायला प्रवृत्त करणारे,आणि विचार आणि संस्कृतीकडे लक्ष वेधणारे आहेत.या कथेची नायिका या विषयीचित्रशैलीत सांगते.,"..तर त्या पोस्टरमध्ये (पेंटिंगमध्ये) वरच्या आडव्या भागात सर्व धार्मिक व्यवस्थांच्या प्रतीकांची रेलचेल.त्या सर्व प्रतीकांच्या समोर म्हणजे खालच्या बाजूला भव्य असं मैदान.त्या मैदानाच्या मध्यावर साधारणत: आठ-दहा वर्षाच्या मुलीचे फाटलेले कपडे पडलेले.त्याच्याभोवती मोठ्या माणसांच्या पावलांचे ठसे.त्याच्या खालच्या बाजूने एका लहान बालकाचे चालतानाचे वाटावेत असे पावलाचे ठसे.त्यानंतर एक विहीर. ते पावलाचे ठसे विहिरीच्या कठड्यापर्यंत आलेले.तर विहिरीच्या दुस-या बाजूने एका मोठ्या माणसाचे पावलाचे ठसे. विहिरीला वळसा घालून त्या लहानमुलाच्या पायाच्या ठशाजवळ आलेले.पुढे त्या मोठ्या माणसाचे आणि त्या लहान बालकाचे ठसे पुन्हा विहिरीला वळसा घालून सर्व धार्मिक व्यवस्थांच्या प्रतिकांच्याविरूध दिशेने विहिरीच्या दुस-या बाजूने दूरवर गेलेले." [४]

एका उभ्या कॅनव्हसचे दोन भाग केलेले.डाव्या बाजूच्या अर्ध्या भागात बुद्धाचा अभयमुद्रेतील फक्त हात.आणि उजव्या बाजूच्या अर्ध्या भागात प्राचीन काळातील गदा,तलवार,भाला,कु-हाड,इत्यादी आयुधं आणि आधुनिक काळातील बंदूक स्टेनगन,बॉम्ब इत्यादी शस्त्रांचे तुकडे.बुद्धाच्या तत्त्वज्ञानाने निकामी झालेली शस्त्रास्त्र.अभयमुद्रेत सर्व जग सुरक्षिततेचा अनुभव घेत असल्याची जणू खात्री.शस्त्रास्त्रांचा वापर करून माणसे मारली जातात तर दुस-या बाजूला त्यांना अजरामर करणारे तत्त्वज्ञान.यांचा सुंदर मिलाफ.शिवाय चित्राच्या खाली लिहिलेला मजकूर दिसतो.

*"...न हि वेरेन वेरानि सम्मन्तीध कुदाचनं*
*अवेरेन च सम्मन्ति एस धम्मो सनन्तनो."*

प्रेमाचा,मैत्रीचा,कल्याणमित्रतेचा संदेश.या बौद्ध संस्कृतीच्या बोलवित्या खुणा आहेत.

याच कथेत दुसरे चित्र येते ते 'सिद्धार्थ्याच्या महाभिष्क्रमनाचे'[५] या चित्रातून केवळ इतिहास चित्रित होत नाही, तर एक महान ऐतिहासिक संदर्भ दृगोच्चर होतो.सिद्धार्थाने पत्नी यशोधरा आणि मुलगा राहूल झोपलेले असताना रात्रीच्या वेळी गुपचूपपणे गृहत्याग केलेला नाही.तर सर्वाच्या साक्षीने गृहत्याग केला. ही ऐतिहासिकता या चित्रार्थातून आविष्कृत होताना दिसते.

**संगीत :**

लहानपणापासूनच संगीतावरही निकायचे नित्तांत प्रेम असते.एके दिवशी चित्रकला विद्यालयातील सामूहिक कार्यक्रमात नियोजित सतारवादकाच्या अनुपस्थित निकाय सतारवादन करतो आणि श्रोत्यांची दाद मिळवतो.निकायचे सतारवादन ऐकून श्रोत्यांमध्ये बसलेले एक विद्यार्थ्याचे वडील त्याला म्हणतात,"तू माझ्या बरोबर चल.संगीताच्या संगीताच्या क्षेत्रात नाव

कमावशील....तुझी बोटं केवळ रंग-रेषांसाठी आहेत,असं मला वाटत नाही.''[६] केवळ सरावानेच त्याने सतारवादन केल्यानंतर सर्वजण भारावून जातात.याचरून निकायचे संगीत प्रेम दिसून येते.म्हणूनच चित्रकला विद्यालयातून संगीत शाळेत दाखल झाल्यानंतर त्याला चित्रकलेतील अवकाशापेक्षा संगीतातील अवकाश अधिक मुक्त असल्याची जाणीव होते.निकाय पूर्णपणे संगेतमय झाल्याचा अनुभव घेतो.येथेही संगीत शाळेत आलेल्या पाहुण्यांकडून तो सहाव्या इंद्रियाबद्द्ल जाणून घेण्याचा प्रयत्न करतो.त्यांचे अनुभव ऐकूनही तो अंतर्यामी अस्वस्थ होऊन संगीतशाळा सोडण्याचा निर्णय घेतो.

**नृत्यकला :**

'शिल्पासन'या कथेत नृत्याविषयी चित्रण येते.या कथेची नायिका सनृता आपल्या घरातील बंदिस्त झालेले पिवळेपण नाकारून शिलातक्षात दाखल होते.अल्पकाळात सगळे नृत्य प्रकार शिकून घेते.मुक्त नृत्यकलेविषयीच्या जिज्ञासेतून शिलातक्ष प्रमुखाकडून जाणून घेते.नृत्यलेच्या धड्यासंबंधीची माहिती सांगताना ते म्हणतात,''नृत्यकला शिलातक्षात पुर्ण होत नाही.परंतु शिलातक्षात शिकविले जाणारे धडे एवढेच आहेत.नृत्यकलेचे धडे मात्र यापेक्षा अधिक आहेत,परंतु यापुढचे धडे शिकविणारा नृत्यशिक्षक आमच्या देशात जिवंत नाही''[७] ही नृत्यशिक्षणाविषयीची माहिती जाणून घेतल्या नंतर प्रत्येक तीन वर्षातून एकदा शिलातक्षात होणा-या नृत्यस्पर्धेत सहभागी होते व ती प्रथम क्रमांक पटकविते.तिचे नाव जाहीर होताच सारे नृत्यगृह टाळ्यांनी नृत्यमय होते.'शोध सहाव्या इंद्रियाचा' या कथेत संगीत शाळा सोडल्यानंतर डोंगरपायथ्यालगत असलेल्या नृत्यशाळेत 'नृत्योत्सवाचा' कार्यक्रम असतो.या कार्यक्रमाचे वर्णण करताना लेखकाने सांगितलेल्या पताका,त्रिपताका,अर्धपताका, मयूर,शिखर,कणित्य,भ्रमर,हंसास्य, कटक,कपोत,स्वस्तिक अशा नृत्यमुद्रा,तसेच इंद्रनृत्य,तांडवनृत्य,लास्यनृत्य हे नृत्याचे विविध प्रकार,कार्यक्रमाचे लेखकाने केलेले विलोभनीय वर्णण या सर्वांशी भान हरपून वाचक तादात्म्य पावतो. डोंगरपायथ्यापासून पाणी आणण्याच्या अटीवर प्रमुख बाईंच्या परवानगीने निकाय नृत्याचे शिक्षण घेतो.त्यामध्ये गती घेतो.एके दिवशी नृत्य शिक्षिका नृत्यमुद्रांची प्रात्यक्षिकांसह माहिती सांगताना वेगवेगळ्या देवता आणि पंचमहाभूतांच्या हस्तमुद्रा,चातुर्वण्य हस्तमुद्रेमध्ये ब्राह्मण हस्तमुद्रा,क्षत्रिय हस्तमुद्रा, वैश्य हस्तमुद्रा,शूद्र हस्तमुद्रा, यांची प्रात्यक्षिके करून घेत होत्या.संगीताहूनही शुद्ध असलेल्या नृत्यकलेतील अशुद्धतता पाहून निकाय धावत सुटतो आणि नृत्यशाळा व नृत्य यांपासून दूर जातो.

ही सर्व चर्चा,याचे संदर्भ पाहिल्यानंतर लेखकाच्या विविध कलांची जाण व त्याने केलेला त्या विषयांचा अभ्यास,त्या अनुषंगाने केलेली मांडणी कथेच्या रूपात ढाळून वाचकांच्या समोर अत्यंत ताकदीने आणण्याचा साहित्य जगतातील हा अपवादात्मक प्रयत्न होय.विविध कलांची अभ्यासपूर्ण माहिती जशी येते तशी कलेच्या मर्यादेबद्द्ल,अपुर्णतेबद्दल चर्चाही येऊन जाते.ती पुढीलप्रमाणे-

**शब्द-चित्र-शिल्प-कलेच्या मर्यादा:**

'कथा'या कथेत चित्रकाराने कथाकाराला ''ही माणसं अजून कोणाच्याही शब्दांवाचून दूरच राहिली असतील तर तूही आजपर्यंत कोणत्याही पात्रांसाठी न वापरलेल्या शब्दांनीच कथारूप तयार कर.''[८] हा दिलेला सल्ला प्रत्यक्षातील वास्तव आणि कलात्मक पातळीवरील सत्य यातील अंतर लक्षात आणून देतो.या कथेत साहित्यनिर्मिती प्रक्रियेलाच अनुभवाच्या केंद्रबिंदूचे स्थान दिले असून माणसांच्या भाव-भावना या शब्दातीत,चित्रातीत, कलातीत असतात याचे पक्के भान ही कथा आणून देते.

साहित्य,चित्रकला, शिल्पकला,संगीत,नृत्यकला, इत्यादी विविध कलांचे अभ्यासपूर्ण विवेचन कथाकार गौतमीपुत्र कांबळे यांनी केलेले आहे.हे चित्रण करताना सुद्धा विविध कलांच्या मर्यादा मांडण्यास ते विसरत नाहीत.विविध कलांना वास्तव प्रश्नांच्या माध्यमातून ते भिडले आहेत.म्हणूनच त्यांनी अशी मांडणी केल्याचे दिसते.साहित्याच्या माध्यमातून विविध कलांचा अंतर्भाव करून कलेकडे पाहण्याचा वास्तववादी दृष्टिकोण चित्रित करून लेखकाने एक वेगळेच परिणाम साधले आहे.

**निष्कर्ष-**

१. गौतमीपुत्र कांबळे यांच्या कथेतील कला प्रतिमा या केवळ कलांचे दर्शन घडविण्यासाठी,त्यांच्या विषयी ज्ञान देण्यासाठी येत नसून बौद्धसंस्कृतीशी कलेचा असणारा संबंध दर्शविण्यासाठी प्रतीके म्हणून येतात.

२. कथानकातील विविध कलांचा अंतर्भाव कथेला एका वेगळ्या उंची पर्यंत घेऊन जातो.

**संदर्भसूची-**

१.रिंढे नितीन: नव्या वाटा धुंडाळणारा लेखक,सकाळ,मुंबई,मेट्रो ४ फेब्रुवारी,२००६,पृ.क्र.१०

२.राजाध्यक्ष विजया (संपा.) मराठी वाड्मयकोश, खंड-४ (समीक्षा संज्ञा), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती-नोव्हेंबर,२००२ पृ.क्र.२२२

३.कांबळे गौतमीपुत्र: परिव्राजक,एक्स्प्रेस पब्लिशिंग हाऊस,कोल्हापूर,प्रथमावृत्ती,सप्टेंबर २००४,पृ.१४१

४.कांबळे गौतमीपुत्र: जयंती,एक्स्प्रेस पब्लिशिंग हाऊस,कोल्हापूर,प्रथमावृत्ती,एप्रिल २०२२,पृ.१६३

५. तैत्रव, पृ.१६४

६. उनि.परिव्राजक पृ.१४६

७. उनि.परिव्राजक,पृ.७६

८. उनि.परिव्राजक, पृ.३६

# कृष्णात खोत यांच्या कादंबरीतील समाजचित्रण

**डॉ.नामदेव कृष्णा मोळे**
विभाग प्रमुख मराठी
म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी
ता. गगनबावडा जि. कोल्हापूर.
ईमेल -namdevmole1967@gmail.com

**प्रस्तावना-**

ग्रामीण साहित्यामध्ये एक वेगळ्या प्रकारचे लेखन करून एक वेगळी दिशा देणारे आणि एकूणच साहित्य विश्वात आपला वेगळा स्वतंत्र ठसा उमटविणारे एक उत्कृष्ट प्रकारचे लेखक म्हणून कृष्णा खोत सरांची ओळख असलेली आपल्याला दिसून येते. कृष्णात खोत सरांचा पन्हाळा तालुक्यामध्ये पन्हाळ्याच्या पायथ्याशी वसलेल्या निकमवाडी या छोट्याशा गावात सरांचा जन्म झालेला आहे. सरांचं बालपण गावातच गेलेले आहे तर त्यांचे माध्यमिक शिक्षण हे पन्हाळ्यावर झालेले आहे. त्यांच्या गावठाण , रौंदाळा, झडझिंबड, धूळमाती आणि रिंगान अशा प्रकारच्या कादंबऱ्या आहेत या प्रत्येक कादंबरीमधून कृष्णात खोत सरांनी वेगळाच विषय मांडलेला आहे. हेच कृष्णात खोत सरांच्या लेखनाचे एक वैशिष्ट्य म्हणता येईल. खोत सरांच्या सर्वच कादंबरी मधून त्या ठिकाणचे सामाज जीवन सांस्कृतिकता दिसून येते. लेखक कृष्णात खोत आपल्या कादंबरीतून आपल्यासमोर एक खेडच उभा करतात.

**गावठाण-**

'गावठाण' ही कृष्णात खोत यांची पहिलीच कादंबरी मौज प्रकाशनाने २००५ प्रकाशित केली. या कादंबरीतून दु:ख आणि दारिद्य हे माणसाच्या वाट्यालाच पुजलेले असते त्याचं एक विदारक चित्र या कादंबरीतून दिसून येते. दारिद्यात जन्मलेल्या आणि संकटांना सतत सामोरे जाणाऱ्या उपजत शहाणपण असलेल्या एका आनंदी नावाच्या मुलीची दु:खद कहानी येथे आहे. उलघाल करणाऱ्या जीवनाअनुभवाची ही कहाणी आहे. आनंदीच कुतुंब गरिब आहे. कष्टकरी आई-वडील लहान भाऊ ,मैत्रिणी सगे सोयरे, त्याचबरोबर दुरावलेले सासर,गावगाडा याचे हृदयस्पर्शी चित्र येते. त्या ठिकाणची पिकं, गुर-ढोर, पशुपक्षी, डोंगरदऱ्या ,झाडझुड, नदी-नाले, नवसाला पावणारी तांजूबाई अशाप्रकारे आदींचे विलक्षण दर्शन या कादंबरीत येते. मानवी नात्यातील भावबंधाचं भीषण आणि कोमल रूपही प्रकट होतं आणि एक संपूर्ण अनोळखी गाव ओळखीचं होऊ लागत.

कादंबरीत कौल देणारे तांजूबाई म्हणजे त्या ठिकाणची देवी आहे. खेड्यातील लोक कोणतीही अडचण आली तर तांजीबाईला श्रद्धेपोटी नारळ देत असतात म्हणजे खेड्यातल्या लोकांची श्रद्धा या ठिकाणी दिसून येते. लेखक कृष्णात खोत यांनी खेड्यातील लोकांच्या जीवनाचा पटच या ठिकाणी त्यांनी उलगडलेला आहे. कष्ट करणाऱ्या शेतकरी लोकांच्या जीवनातील अनेक व्यवहार इथं चित्रित केलेले आहेत ग्रामीण भागातील अनेक शब्द या ठिकाणी आलेले आहेत. अर्धलीची म्हैस, कोंबडीची खुराडी, शिक्काळ, लोढना, डिस्क्याला बांधणारी दत्ताळी रात्रीच्या वेळी अंधारात जाण्यासाठी जो केलेला दिवठा, भाताची मळणी असे शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित असलेले विषय हाताळत असताना त्यांनी या वरील शब्दांचा वापर केलेला दिसतो. त्याचबरोबर खेड्यातील मुलींच्या लग्नाचा प्रश्नही या ठिकाणी आलेला दिसून येतो. कारण जसं जनावराला नाव आणि गाव नसतं तसं बाईच्या जातीलाही नाव आणि गाव नसतं असं लेखकाने त्या ठिकाणी नमूद केलेले आहे.

'अर्धलीन घेतलेली म्हैस' म्हणजे ज्या व्यक्तीला आपल्या परिस्थितीमुळे एखादी म्हैस विकत घेता येत नाही अशी व्यक्ती दुसऱ्या कुणाकडून एखादं लहान रेडकू (रेडी) आणते ते आणतेवेळी एक तोंडी व्यवहार ठरतो तो म्हणजे जी व्यक्ती त्या रेडीला आणते त्याने त्या रेडीला सांभाळायची , मोठी करायची आणि मोठी झाल्यानंतर त्याची दोन येते खायचीत आणि मग ते तिसऱ्या वेळी गाभण गेल्यानंतर त्याला सात आठ महिने पूर्ण झाल्यानंतर मग ते ज्या व्यक्तीकडून आणले जाते त्याला ती परत दिली जाते अशा प्रकारे जी जनावरे अर्धलीने पाळली जातात त्यांचे व्यवहार असे ठरतात.

पश्चिम महाराष्ट्रातील ज्या बोलीभाषा आहेत त्यापैकी कोल्हापुरातील पन्हाळा तालुक्यातील पश्चिम भागातील भाषा या कादंबरीचा एक गाभा असलेली दिसून येते. विशिष्ट हेल काढून बोलण्याची पद्धत, वापरले जाणारे शब्द प्रयोग ही ग्रामीण जीवनातलं वास्तव अचूकपणे मांडतात. कादंबरीत ग्रामीण जीवनशैलीचे अगदी बारीक-सारीक कांगोरे सुंदर पद्धतीने लेखकाने या ठिकाणी टिपलेले आहेत या कादंबरीची नायिका आनंदी स्वतःच निवेदन करते. आपला सारा जीवनपट वाचकांना ती उलगडून सांगत असते,येथील शेती कशी आहे, पिक कशी असतात पाऊस कसा पडतो या ठिकाणी श्रद्धा अंधश्रद्धा कशा आहेत, गावातल्या रूढी परंपरा काय आहेत, या सर्व गावगाड्यातील बारीक-सारीक गोष्टी ती सांगत राहते. खेड्यामध्ये अजूनही माणुसकी कशी जिवंत आहे लोक एकमेकांना कशा पद्धतीने मदत करतात हेही चित्रित केलेले आहे . आनंदीच्या म्हशीला गावातील पाटलाची म्हैस धडक मारते त्यामध्ये आनंदीची महेश मरून जाते म्हैस गेल्यानंतर आनंदीचा जगण्याचा आधारच संपतो कारण तिच्यावरच तिचा संसार चाललेला असतो. आनंदी हतबल होते तिला काही सुचत नाही दु:खाचा डोंगर तिच्यासमोर उभा राहतो, सतत तिला गोठ्यात म्हैस असल्यासारखं वाटतं पण गोठ्यात फक्त रिकामी दावीच असतात. त्यावेळी आनंदीच्या नवऱ्याचा दिगवडे या गावातला एक दोस्त असतो तो आपली शेळी आनंदीला आणून देतो या प्रसंगातून खेड्यातली माणुसकी दिसून येते.जवळच्या लोकांपेक्षा म्हणजेच रक्ताच्या लोकापेक्षा इतर लोक रक्ताचे नसले तरी ती कशा पद्धतीने मदत करतात हे वास्तव दिसते. आनंदी चा नवरा आजारी पडल्यानंतर तिचे दिर आणि जावा तिच्यापासून कशा लांब जातात, तिला कुठल्याही प्रकारचा आधार देत नाहीत हेही या ठिकाणी दिसून येते.

आनंदीचा जन्म हा खेड्यात झालेला . या आनंदीच बालपण ते ती तीन मुलांची आई होईपर्यंतचा प्रवास या प्रवासातलं तिचं भावविश्व तिच्या मनात येणारे विचार दिसून येतात. एका प्रसंगात तिने बाईच्या जन्माला म्हशीच्या गळ्यातील लोढण्याची उपमा दिली आहे. म्हशीला जसं ठरविता येत नाही की आपला मालक कोण आहे तसेच बाईच्या जातीला ठरवता येत नाही की आपला नवरा कोण होणार आहे, आपल्या नशिबी कुठलं गाव पडणार आहे. त्याच पद्धतीने म्हैस उधळू नये, पळू नये म्हणून तिच्या गळ्यात लोडणा बांधला जातो तीच गत बाईची असावी म्हणून बाईच्या गळ्यात मंगळसूत्र असावं असं मत आहे, अशा प्रकारे अशा वेगवेगळ्या उदाहरणांमधून प्रसंगातून ग्रामीण स्त्रीवादाची जाणीव करून दिली जाते अशाप्रकारे स्त्रीच समाजातील स्थान,जीवन आपल्याला दिसून येते.

**रौंदाळा-**

कृष्णात खोत यांचे ही कादंबरी 2008 सली प्रकाशित झालेली आहे. या कादंबरीचा जो मुख्य विषय आहे तो खेड्यातील राजकारण, खेड्यातील राजकारण हे फार एर्षेचे राजकारण असते. प्रत्येक गावामध्ये दोन गट असतात त्यामुळे गावातील माणूस हा कोणत्या ना कोणत्या गटांमध्ये ओढला जातो, त्या व्यक्तीची इच्छा असू दे अगर नसू दे त्याला एका कोणत्यातरी गटांमध्ये कीराहावं लागतं, त्याला गटापासून वेगळं राहताच येत नाही. यातून राजकारणातील सहभाग परिहार्य बनतो तो या गटांमध्ये अधिकाधिक गुंतत जातो आणि या त्याच्या गुंतन्याने भावा-भावामध्ये कसं वैर निर्माण होतं, कशी दरी निर्माण होते, कसे वाद निर्माण होतात आणि त्यातून कसं काहीतरी वाईट निर्माण होतं हे दिसून येतं. अलीकडलं खेड्यातलं राजकारण बघितलं तर एका एका छोट्याशा गावामध्ये चार चार पाच पाच गट तयार झालेले दिसतात सध्याचे राजकारण हे निष्ठेच राजकारण राहिले नाही स्वार्थाचं राजकारण कसं असतं हे लेखकाने याच्यामध्ये चित्रित केलेले आहे. पूर्वी गावामध्ये एखादा ज्येष्ठ माणूस असायचा, अख्ख गाव त्या व्यक्तीचं ऐकायचं पण सध्याची परिस्थिती बघितलं तर घराघरात आता पुढारी निर्माण झालाय,एक भाऊ दुसऱ्या भावाचं ऐकत नाह या राजकारणामुळे माणसं एकमेकापासून कशी मनाने शरीरानं दूर गेलेली आहेत आणि यामुळे माणसांचं जीवन कसं बदलले आहे याचंही चित्र आपल्याला या कादंबरी मधून दिसून येते. गावाचं गाव पण हरवून गेलं आहे, सगळं गाव उध्वस्त झालंय यामुळे गावातील सणवार, उत्सव, लग्न सोहळे साजऱ्या करण्याच्या पद्धतीही आता बदललेल्या आपल्याला दिसून येतात. पूर्वी कुस्तीच्या तालमी जुने खेळ हे सर्व आता बंद झाले आहे. घराघरातील वाद चव्हाट्यावर यायला लागलेले आहेत. पूर्वी घरांमधील वाद घरातच मिटायचेत पण आता हे वाद चव्हाट्यावर येऊ लागलेले आहेत आपल्याच भावाला लोकांचे ऐकून अडचणीत आणण्यासाठी राजकारण होऊ लागले आहे. आणि या सर्व गोष्टीचा वेध रौंदाळा कादंबरी मध्ये आपल्याला घेतलेला दिसून येतो. हे गावच या कादंबरीचा नायक असलेलं दिसून येते.

आपल्याला या ठिकाणी खेड्यातील बदलत्या राजकारणामुळे खेड्यातील माणसांचं जीवनही कसं बदललेलं आहे हे दिसून येते. त्याचबरोबर या राजकारणाचा समाज जीवनावरती कसा परिणाम झालेला आहे हे आपल्याला दिसून येते या ठिकाणचे सणवार, उत्सव ,वेगवेगळे विधी, लग्न सोहळे साजरे करण्याच्या पद्धतीमध्ये किती अमुलाग्र बदल झालेले आहेत, पारंपरिकतेला कशी उतरती कळा आलेली आहे आणि यामुळे एकूणच माणसाच्या जीवनामध्ये, जगण्याच्या पद्धतीमध्ये, वागण्यामध्ये, माणुसकी मध्ये झालेला बदल दिसून येतो.

**झडझिंबड-**

कृष्णात खोत यांच्या सर्वच कादंबरीत त्यांनी कृषी संस्कृती जगणाऱ्या समाजाचे चित्रण केलेले आहे त्यांच्या सर्वच कादंबऱ्या मधील व्यक्तिरेखांची नाव- गाव शेत शिवार आणि एकूणच संस्कृतीला घट्ट जोडलेली आहे या संस्कृतीत जगण्याच्या विशिष्ट धारणा आणि श्रद्धा आहेत. झड झडझिंबड ही 2012 ला प्रकाशित झालेली कादंबरी या कादंबरीचा नायक पाऊसच आहे. पाऊस वेळेत न पडल्याने, कमी पडल्याने आणि कधी कधी अचानक जास्त पडून महापुराचे थैमान या पावसाने घातल्याने शेतकऱ्याची काय परिस्थिती होते, त्याची कशी दयनीय अवस्था होते याचे एक वास्तववादी चित्र या कादंबरीमध्ये पाहायला मिळते. पाण्यासाठी वणवण फिरावं लागत असतानाच एका दिवसात मुसळधार पाऊस होतो आणि नदीला कसा महाभयंकर पूर येतो अशा या अवस्थेचे चित्र या कादंबरीत येते म्हणजेच आपली भारतीय शेती ही पावसावर अवलंबून असते .आपण आता खेड्यातलं चित्र बघितलंतर 1989 ला एक मोठा महापूर आला होता त्या महापुरात खेडीच्या खेडी पुरात वाहून गेली होती, गावच्या गाव जमीनदोस्त झाली आणि अशावेळी त्या माणसांचं तिथलं जीवन किती भयानक असतं याचे चित्र आपल्या डोळ्यासमोर येते. काही काही वेळा पेरण्या होतात आणि पाऊस गायब होतोआणि जमिनीत पेरलेली पिकं वाळून जातात काही काही वेळा भयानक पाऊस पडतो आणि सगळं जमीन दोस्त होतं, काही वेळा ओला दुष्काळ काही वेळा कोरडा दुष्काळ या सर्व परिस्थितीला शेतकऱ्याला सामोर जावं लागतं याचं चित्र या कादंबरीत दिसून येते. त्याचप्रमाणे खेडेगावातील भ्रष्टाचारही आपल्याला या कादंबरी दिसून येतो, की गावामध्ये नदीवर पूल बांधायचा असतो आणि हा पूल बांधत असताना झालेला भ्रष्टाचार त्याचेही चित्र या ठिकाणी येते म्हणजेच या रौंदाळा कादंबरीतून बदलती गाव, बदलती खेडी त्या ठिकाणचे नवे पेच, गावच्या पांडू पाटला सारखी माणसंही या ठिकाणी दिसतात त्याचबरोबर श्रद्धा असलेले मूल्यावर गाढ विश्वास ठेवणारे आबा सारखी माणसे या ठिकाणी चित्रित होतात. आधुनिकीकरणामुळे माणसाच्या जीवनामध्ये झालेले बदल या आधुनिकीकरणाचे फायदे तोटे ही या ठिकाणी आहेत पारंपारिकता लोप पावत चाललेली दिसते या अवस्थेत सर्व उपायही संपत आलेले आहेत त्यामुळे खेडूत माणूस देवाकडे वळलेला दिसतो यातूनच अंधश्रद्धा वाढीस लागलेली दिसते या सर्वाचं चित्र या कादंबरी मध्ये दिसून येते.

**धूळमाती-**

खेड्यातील माणसाचं जीवन कसं असतं त्या ठिकाणचे व्यवहार काय असतात अशाच एका जमिनीच्या व्यवहाराच्या विषयावरती भाष्य करणारी 'धूळमाती' ही कादंबरी 2014 ला प्रकाशित झाली आहे. शेतकरी म्हणजेच खेडूत ज्या खेड्यात,मातीत, काळया आईच्या कुशीत जन्मतो, वाढतो ,खेळतो ,बागडतो ती काळी आई आता उद्योगपती आणि या मोठमोठ्या बिल्डरांच्या घशात कशी चाललेले आहे अशा प्रकारचा विषय लेखकांनी या ठिकाणी चित्रित केलेला आहे. आणि एकूणच या सर्वाचा समाज जीवनावरती जो काय परिणाम होतो तेही या ठिकाणी दिसून येते.

या आधुनिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी गिळंकृत होऊ लागलेल्या आहेत.शहरातील मोठे पैसे वाली माणसं या खेड्यात येतात आणि जमिनी विकत घेतात. या घेतलेल्या जमिनीला कुंपण करून त्याच्यामध्ये छान आलिशान बंगले बांधतात त्याचं फार्म हाऊस केलं जातं आणि या जमिनी मग नापीक होत जातात. ज्या मोकळ्या जमिनीमध्ये शेतकऱ्यांची जनावर चरायची- फिरायची त्या ठिकाणी त्या जमिनी आता बंदिस्त होऊन तेथे फार्म हाऊस उभे राहू लागले त्यामुळे जमिनीचा नापिक पण वाढलेला आहे.आपण या शहराच्या आरशातच खेडी पाहायला लागलेलो आहोत. शहरातील सर्वच पद्धती आता खेड्यात येऊ लागलेल्या आहेत त्यामुळे माणसाचे जगण्याचे संदर्भ आता बदलू लागलेले आहेत, या अशा भौतिक आणि विलासी सुधारणांच्या ,सुखाच्या मागे लागल्याने आमची खेडी आता उध्वस्त व्हायला लागलेली आहेत, ती आता विकेंडची ठिकाणे बनली आहेत, एन्जॉय

करण्याची ठिकाणे बनलेली आहेत. गावाची गावपण कधीच संपलेली आहेत, आता गावातील माणुसकीची जागा व्यवहारणे घेतली आहे याचं एक चांगल्या प्रकारचे चित्र या कादंबरीत येते आणि त्यामुळे इथली सामाजिकता, सांस्कृतिकता कशाप्रकारे बदलत चाललेली आहे याचंही चित्र आपल्याला या धूळमाती कादंबरीमध्ये दिसून येते.

खेडेगावातल्या बदलत चाललेल्या मानवी संबंधाचे खरेखुरे अस्वस्थ करणारे चित्र आपल्याला या ठिकाणी दिसते शेतजमिनी आणि कसणारी माणसं अनेक प्रकारे त्यांच्या नात्यातील परिणाम दाखवणारे ही कादंबरी आहे स्वतःच्या मालकीची शेतजमीन नसणारी लोक दुसऱ्याची जमीन भागीदारांनी करायला घेतात त्याला भागांना शेती कसने म्हटलं जातं. मोठे शेतकरी आणि सावकार श्रीमंत लोक आपल्या जमिनी कुळाकडे करायला देतात आणि पीक निघाल्यानंतर कायद्याप्रमाणे धान्य ताब्यात घेतात हे सर्व व्यवहार विश्वासावर चालत असतात. शेतामध्ये चांगली राबनुक करून पीक काढणारे कुळ असेल तर शेतकरी आपली जमीन त्याच्याच ताब्यात ठेवतो, यामुळे जो कष्टकरी शेतकरी असतो त्याला अहोरात्र त्या जमिनीत राबावं लागतं आणि पीक आल्यानंतर बाकी मोठ्या शेतकऱ्याला किंवा सावकाराला किंवा त्या श्रीमंताला निम्मे द्यावे लागते म्हणजेच या ठिकाणी रात्रंदिवस ऊन, पावसात राबणारा शेतकरी कसं जीवन जगतो हेही दिसून येते.

खेड्यातल्या जमिनी विकत घ्यायच्या हे शहरातील मोठ्या लोकांचे उद्योग सुरूच आहेत त्यामुळे गाव बदलू लागलेली आहेत, जमिनीचे दर गगनाला भिडले आहेत त्यामुळे मोठे लोक जमिनीत पैसा गुंतवत आहे आपल्या पिढीला नाही का आपल्या पुढच्या पिढीला या जमिनी उपयोगी पडतील असा ते विचार करत आहेत. दाजी सारखे लोक आपला माळ विकून त्या येणाऱ्या पैशातून आपल्या पोराला नोकरी लावायची आहे कारण आज काल नोकरी असल्याशिवाय मुलांना मुली कोण देत नाही.त्यामुळे गरजेसाठी दाजी माळ विकायला लागला आहे आणि तो माळ दादाला घ्यायचा आहे खेड्यातून बदलत चाललेली मानसिकता सामाजिक आर्थिक वास्तवाचा हा बदलला चेहरा दाखवून त्यावर लेखकांनी चांगल्या प्रकारे भाष्य केलेले आहे

**निष्कर्ष-**

१) कृष्णात खोत यांनी आपल्या प्रत्येक कादंबरीमध्ये वेगळा विषय मांडलेला आहे.

२) प्रत्येक कादंबरीतील विषय वेगळा असला तरी तो खेड्याशी निगडित आहे.

३) प्रदेश समुहनिष्ठ कादंबरी लेखन आहे.

४) गावगाडा, शेती संस्कृती व तेथील सजीव पशुपक्षी यांचे चित्र आहे.

५) नवीन भूप्रदेश कादंबरीत आलेला आहे.

**समारोप-**

कृष्णा खोत यांच्या कादंबरीतून बाहेरच्या बदलाने खेडी कशी बदलू लागली आहेत. गावगाड्यातील परंपरेतील सुरक्षेची चौकट आधुनिकी करणामुळे कशी विस्कळीत होत चाललेली आहेत याचे चित्रण त्यांच्या कादंबरी येते.' गावठाण' कादंबरीत आनंदी या मुलीची शोकांत कहानी आलेली आहे, असे जरी असले तरी तिच्या या जीवन संघर्षाला आणि पडझडीला अनेक कौटुंबिक आणि सामाजिक पदरही आहेत. 'रौंदाळा' या कादंबरीत समकालीन गावगाड्यातील राजकारणाचं आख्यान रूपकच आहे.'झडझिंबड' या कादंबरीमध्ये पावसाचं अवेळी येणे त्यामुळे होणाऱ्या शेतकऱ्याच्या जीवनाची दशा याचे चित्र या कादंबरीत येते. दिवसागणिक पालटणाऱ्या खलनायक रुपी पावसाची आणि त्याला सामोरे जाणाऱ्या गावांची जीवन कहानी या ठिकाणी येते. 'धूळमाती'मधून खेड्यातील नवीन बदल आणि जमीन विक्री यातल्या संघर्षाचे चित्र आलेले आहे शेतकरी जमिनीवर जीवापाड प्रेम करतो. आपली जमीन विकताना होणाऱ्या कुटुंबाच्या वाताहतीच वास्तव चित्र या ठिकाणी येते.

**संदर्भ-**

1) कृष्णात खोत,'गावठाण,' मौज प्रकाशन, मुंबई,2005

2) कृष्णात खोत,' रौंदाळा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,2008.

3) कृष्णात खोत,' झडझिंबड, पॉप्युलर प्रकाशन मुंबई,2012.

4) कृष्णात खोत,'धूळमाती', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, 2014.

# एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कवितेतील कृषिविषयक जाणीवा

**प्रा. डॉ. नामदेव सोडगीर**
(सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग)
संजीवनी महाविद्यालय, चापोली जि. लातूर
sodgirnamdev555@gmail.com

**प्रास्ताविक:**

मराठी साहित्याच्या प्रांतात इत्तर वाड्मयापेक्षा 'कविता' या वाड्मयप्रकाराला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मराठी कवितेला शेकडो वर्षाची परंपरा लाभली असून ती आपला प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक असा सुखरूप प्रवास करत आली आहे. काळानुरुप मराठी कवितेच्या आशय आणि अभिव्यक्तीमध्ये अनेक स्थित्यांतरे घडत आली आहेत. जसे की, स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मराठी कविता समाजातील सर्वसामान्य माणसाच्या जीवनातील सुखदु:खाच्या जाणीवाचा वेद घेऊन आकाराला आली. स्वातंत्रोतर कालखंडात मराठी कविता ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, मुस्लीम, विज्ञानवादी अशा विविध काव्यप्रकारांनी पारंपरिक चाकोरीबध्द साहित्यातील मरगळ झटकून, पुरोगामी परिवर्तनवादी, माणुसकी व वास्तव मूल्यांची जोपासना करत प्रवाहित झाली. आजच्या सद्यस्थितीत अर्थात एकविसाव्या शतकातील मराठी कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, निबंध अशा विविध वाड्मयप्रकारापैकी 'कविता' हा वाड्मयप्रकार विविध गुणवैशिष्ट्यांनी युक्त आहे. त्यात एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कविता अनेक आव्हाने पेलत बदलत्या सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक जीवनाचे, स्थितिगतीचे वास्तव चित्रण करताना दिसते आहे. एकविसाव्या शतकातील जुन्या-नव्या पीढीतील कवींनी आपली संस्कारक्षम परंपरा, तत्त्वज्ञान आणि आव्हानात्मक भूमिका घेऊन काळ आणि कालातीत विविध समस्यांना वाचा फोडणारी समर्थ कविता लिहिली आहे. एकविसाव्या शतकातील मराठी कवी आणि कविता हा तर वाचकांच्या चिंतनाचा, चर्चेचा आणि चिकित्सेचा विषयच बनला आहे. महाराष्ट्रात तर एकविसाव्या शतकात गावखेड्यांनी आपली कूसच बदलली आहे. शेतीचे आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण झाले आहे. आपल्या कुटुंबाचा डोलारा सावरण्यासाठी जगाचा पोशिंदा आपले श्रम, पैसा आणि वेळ खर्च करीत आहे. वाढत्या महागाईने तर सामान्यमाणूस पुरता सैरभैर झाला आहे. कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या गळ्याला सावकारी पाश लागला आहे. त्यामुळेच जगाचा पोशिंदा निराशेच्या गर्तेत सापडला आहे. ग्रामकृषिजीवनातील अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा, अनाचार, दुराचार, दुष्काळ, नापिकी अशा अनेक सामाजिक समस्यांचा धांडोळा घेणारी अर्थात बदलत्या ग्रामसंस्कृतीचा भीषण चेहरा दाखविणारी मराठी ग्रामीण कविता एकविसाव्या शतकात कवी इंद्रजित भालेराव, नारायण सुमंत, अमृत तेलंग, नारायण सुमंत, विष्णू थोरे, रघुनाथ पाटील, गणेश देवपूरकर यांची कविता तरारून येत आहे. ग्रामीण जीवन, ग्रामसंस्कृती, सण, उत्सव, खेड्यातील शैक्षणिक जाणीव इत्यादी घटक अक्षरबध्द करणारी एकविसाव्या शतकातील कवींची कविता वाचकांना मानवात्मक जाणिवांचा अधिक प्रगल्भ करण्याचा प्रयत्न करते आहे. याच दृष्टीने प्रस्तुत शोधनिबंधात 'एकविसाव्या शतकातील मराठी कवितेतील कृषिविषयक जाणीवा' याचा शोध आणि बोध घेण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे.

**एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कवितेतील कृषिविषयक जाणिवा:**

मराठी साहित्यविश्वात एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कविता ग्रामीण समाजजीवनातील विविध विषयांच्या संदर्भात भाष्य करत असली तरी ग्रामीण भागातील 'शेतकरी आणि त्यांचे कृषिजीवन' हाच ग्रामीण कवितेचा मुख्य विषय राहिलेला दिसून येतो. शेतकऱ्यांचे जीवन हे प्रामुख्याने 'आभाळ आणि माती' यांच्याशी घट्ट जोडलेले आहे. अर्थात आभाळ आणि माती हे दोन घटक शेतकऱ्यांचे जीवनदायी आहेत. आभाळ हे बापासारखे छत्र देणारे तर माती सर्व यातना सहन करणाऱ्या आईसारखी असते. परंतु आभाळाने वेळेवर वर्षाव केला नाही तर मातीही काही देऊ शकत नाही. परिणामी जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या वाट्याला दुष्काळ, नापिकी सारखे संकट येतात. सतत निसर्गाची अवकृपा आणि निर्दयी शासन व्यवस्था यामुळे कृषिजीवनावर विपरीत परिणाम होतो. शेती म्हणजे आतबह्यांचा धंदा. त्यात व्यथा पुष्कळ, पावलोपावली होरपळ आणि त्या होरपळीचे वाटेकरी आणि दुष्काळाचा सामना व शोषणाचे कायम मानकरी शेतकरीच. बदलते ऋतुमान, पिकाचे पडणारे दर, वाढत

जाणारे कर्ज, व्यापाऱ्याकडून होणारी फसवणूक, सरकारचे चुकीचे धोरण, हरवत चाललेली बाजारपेठेतील पत, या मानसिकतेतून होणाऱ्या शेतकऱ्याच्या आत्महत्या. अशी उध्वस्त ग्रामसंस्कृती एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कवितेच्या केंद्रस्थानी आहे. जगाचा पोशिंदा शेतकरीराजाची होणारी परवड, दमछाक, निराशा, व्यथा शेतकऱ्याची मुल आपल्या कवितेतून मांडतांना दिसतात. मराठवाड्याच्या मातीतून उपजलेला कवी इंद्रजित भालेराव म्हणतात,

"भूमिचं काळीज फाटलं
पाण्यानं पाताळ गाठलं
माणूस माणसातून उठलं"[१]

प्रस्तुत काव्यपंक्तीमधून कृषिसंस्कृतीचे भाष्यकार कवी इंद्रजित भालेरावांनी कुणब्याच्या घरातली गरिबी, उपासमारी, आवर्षण आणि शेतीपाणीवर गुदरलेले संकट यावर प्रभावी भाष्य केलेले आहे. कवी इद्रजित भालेराव म्हणतात की, शेतकऱ्याचे जीवन पूर्णत: निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाच्या कृपेने पीकपाणी चांगले झाले आणि उत्पादीत शेतीमालाला योग्य भाव मिळाला तरच जगाचा पोशिंदा स्वाभिमानाने जगेल. शेतकऱ्यांनी कितीही प्रामाणिकपणे काबाडकष्ट करून काळ्या आईची सेवा केली आणि निसर्गाने साथ न दिल्याने, कर्जफेड न झाल्याने, मुलाबाळाचे शिक्षण, लग्न या बाबी वेळेवर पूर्णत्वास गेल्या नाही तर त्याची समाजातील माणूस असलेली इज्जत कमी होते. अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेला जगाचा पोशिंदा तो माणसातून उठल्याने जीवन संपल्यातच जमा होतो. शेतकरी जीवनातील ही शोकांतिका कवी इंद्रजित भालेरावांनी संवेदनशीलतेने आत्मपरतेतून बोलकी केली आहे. केवळ अस्मानी संकटेच शेतकऱ्याला देशोधडीला लावतात असे नाही तर सुलतानीही त्याच्या पाठीशी सदैव लागलेली असतात. आजच्या एकविसाव्या शतकातही शेतकऱ्याचे शोषण करणारी जी अघोरी सुलतानी व्यवस्था आहे त्या व्यवस्थेविरुध्द आवाज उठविताना शेवटी कवी शोषणाच्या केंद्रबिंदूपर्यंत येतो. कवी इंद्रजित भालेराव आपल्या कवितेतून म्हणतात,

"व्यापाऱ्यानं धरला राग
सरकारनी लावली आग
कुणबी झाला जळून खाक
जमून सगळे सावडा राख "[२]

प्रस्तुत कवितेतून नव्या जाणिवांचा संवेदनशील ग्रामीण कवी इंद्रजित भालेरावांनी कुणब्याच्या जगण्याची चित्तरकथाच अधोरेखित केली आहे. पीक चांगले आले तरी दलाल, पुढारी, सरकार हे शेतकऱ्याला लुटत असतात. हा औपरोधिक सूर शेतकऱ्याची शोकात्मक अवस्था अधिक ठाशीव करतो. शेतकऱ्याच्या आयुष्यातील व्यथा, विवंचना आणि कष्ट दाखविणाऱ्या कविता म्हणून इंद्रजित भालेरावांचे काव्यविश्व आशयाने काठोकाठ भरलेले आहे. काळ्या मातीशी इमान सांगणाऱ्या कुणब्याच्या कष्टमयी जीवनाचे असंख्य कंगोरे उलगडून दाखवणाऱ्या इंद्रजित भालेरावांच्या कवितेत मराठवाडी बोलीभाषेची खरी नजाकत दिसून येते. इंद्रजित भलेरावांची शब्दकळा आणि प्रतिमा अर्थपूर्ण असून त्यांच्या लेखनाची आणि संवादाची भाषा जनसामान्यांच्या मुखातली वटली आहे. जागतिकीकरणाच्या ओझ्याखाली मरणारा, सावकारी पाशात आवळला जाणारा आणि भ्रमनिरास होऊन आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनाचे पापुद्रे सोलताना इंद्रजित भलेरावांनी मारठवाडी बोलीचा पुरेपूर वापर केला आहे. त्यामुळे त्यांच्या कवितांचे अभिजात सौंदर्य वाढले आहे. भाषेचे हे अभिजातपण कवीने जागतिकीकरणाच्या रेट्यातही जपले आहे हेच त्यांच्या काव्यनिर्मितीला वेगळेपण आणि कसदारपण देणारे निश्चितच ठरते.

पश्चिम महाराष्ट्राच्या मातीतून उपजलेला आणि नव्या ग्रामकृषिविषयक जाणिवांचा मंचीय कवी नारायण सुमंत हे एकविसाव्या शतकातील ग्रामीण कवितेच्या क्षेत्रात नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारा एक महत्त्वाचा कवी आहे. महाराष्ट्रातील ग्रामजीवनातील काही धुरीण श्रीमंत शेतकरी, राजकारणी ग्रामजीवनापासून लांब गेले आहेत. वास्तविक पाहता ते शासनकर्तेही झाले आहेत. परंतु शेतकऱ्याचे दारिद्र्य, कर्ज आणि पिळवणूक कायमच आहे. शेतकऱ्याचे कष्ट, प्रामाणिकपणा आणि कोणत्याही राजवटीच्या इशाऱ्याप्रमाणे त्याच्या हितासाठी विळा-कोयता हातात घेऊन लढणारा शेतकरी आजही एकविसाव्या शतकात तितकाच प्रामाणिक आहे. त्याचे अज्ञान, त्याच्या बळाचा वापर करून राजवटी विजयी झाल्यात मात्र शेतकऱ्याच्या जीवनातील

दु:ख, कष्ट, यातना कमी होण्याऐवजी वाढतच गेल्याचे दिसून येते. म्हणूनच शेतकऱ्याला आपल्या अज्ञानाच्या कृष्णविवरातून बाहेर पडून बांधावर येण्याचे, मोकळ्या जगात वावरण्याचे आव्हान करताना कवी नारायण सुमंत आपल्या कवितेतून म्हणतात,

"शतकानुशतके येथे सुलतानी लुटमारी
बंधामेराच्या झुडपाला माझे म्हणण्याची चोरी"[३]

प्रस्तुत कवितेतून पश्चिम महाराष्ट्रातील नव्या जाणिवांचा मंचीय कवी नारायण सुमंत म्हणतात की, शासनकर्ते, राजवटी बदलल्या, स्वातंत्र्यानंतर लोकशाही शासन अस्तित्वात आले. एकविसाव्या शतकात संगणकीय युग अवतरले, परंतु शेतकऱ्याची सर्वदृष्टीने होणारी लुबाडणूक आजही सुरूच आहे. व्यापारी व दलाल यांचेमार्फत होणारी लुट, शासनाने ठरवून दिलेले हमीभाव, एका बाजूने सबसिडी द्यायची आणि दुसऱ्या बाजूने कराच्या माध्यमातून ती वसूल करायची यामुळेच आपल्या प्राणप्रिय मुलाबाळांना, काळ्या आईला मागे टाकून स्वत:चा मौलेवान जीव त्यागावा अशी भावना शेतकऱ्याच्या मनात निर्माण होते. ही आजच्या एकविसाव्या शतकातील शेतकऱ्याच्या आयुष्यातील, ग्रामकृषिसंस्कृतीतील वास्तव परिस्थिती जगाच्या दरबारात कवी नारायण सुमंतांनी प्रभावीपणे मांडली आहे. औद्योगिक क्रांती देशात कितीही झाली असली तरी निसर्ग ही गोष्ट शेतीसाठी महत्त्वाची असते. उन्हाळ्याच्या हंगामात पाऊस हजेरी लावतो तर हिवाळ्यात पावसाच्या सारी येतात. या बदललेल्या हवामानामुळे आधुनिक शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा अस्वस्थ झालेल्या शेतकऱ्यांचे चित्रण कवी नारायण सुमंत यांनी 'रानभैरी' या कवितेच्या माध्यमातून नेमकेपणाने केले आहे. आभाळाकडे पाहत, रानात तिफन हाकणाऱ्या शेतकऱ्याच्या मनातील भाव नेमक्या शब्दात टिपताना कवी म्हणतो.

"कुडी जळते उन्हात कुठ पाऊस भेटेना
तू मोप पेरणारा पर हंगाम कळना"[४]

उपरोक्त काव्यपंक्तीच्या माध्यमातून कवी नारायण सुमंतांनी आधुनिक काळातील शेतीचे वास्तव चित्र समर्पकपणे रेखाटले आहे. कवी नारायण सुमंत म्हणतो की, शेतकऱ्यांचे पारंपरिक दु:खणे म्हणजे तो शेतामध्ये अधाशासारखा राबतो. परंतु त्याचे फळ मात्र त्याला अपेक्षेप्रमाणे कधीच मिळत नाही. कारण मोठ्या आशेने तो रानाध्ये धान्य पेरतो परंतु बहुसंख्य शेतकऱ्यांची शेती ही निसर्गाच्या भरोशावर अवलंबून असल्याने पाऊस वेळेवर पडेल याची शाश्वती नाही. शेतकऱ्यांची निसर्गाच्या भरोशावर अवलंबून असणारी शेती त्यामुळे उभे पीक जळून पडताना पाहण्याची वेळ त्या शेतकऱ्यावरच येते. अशावेळी जरी तो शेतकरी भरपूर धान्य पेरत असला तरी पावसाच्या बेभरवशामुळे ते उगवून येईलच याची शाश्वती नसते. म्हणून कवी म्हणतो की, शेतकरी शेतीत भरपूर धान्य पेरतो परंतु त्याला हंगाम न कळाल्याने त्याच्या उभ्या पिकाची वाट लागते. यामधून कवीची शेतकरी जीवनाविषयीची अगतिकता परिणामकारकपणे स्पष्ट होते. दुष्काळ म्हटले की, शेतकऱ्याचे हाल होतात. जगणे कठीण होते. अशावेळी शासन मदत म्हणून काही गोष्टीची सोय करते. परंतु त्याचा काही उपयोग होत नाही असे दिसून येते. दुष्काळात पिके पाण्याअभावी करपून जातात. उदार शासन मदतीचा हात करते त्यावेळी शेतकऱ्यांना आनंद होतो. परंतु हे काही खरे नसते, म्हणून कवी नारायण सुमंत आपल्या कवितेत म्हणतात,

"दुष्काळात होई। उदार शासन
कुणब्याचे मन। गहिवरे
पन्नास टक्के। माफ शेतसारा
लोकल फंड भरा। पूर्ण म्हणे"[५]

प्रस्तुत काव्यपक्तीतून शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन अपयशी कसे ठरते हे प्रभावीपणे सूचित होते. अस्मानी संकटाच्या कचाट्यात सापडलेल्या शेतकऱ्यांना सरकार सहानुभूती म्हणून पन्नास टक्के शेतसारा माफ करतो. त्याचवेळी लोकल फंड पूर्ण भरावा अशी अटही घालते. थोडक्यात 'राजनी मारलं अन पावसानं झोडपलं तर फिर्याद कोणाकडे करायची?' अशी शेतकऱ्यांची अवस्था शासन करून सोडते. या कवितेतून शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन अपयशी कसे ठरते हे सूचित होते. कवी नारायण सुमंत यांच्या 'तू व्हावे पाऊस' या कवितेतून 'दुष्काळाशी सामना' हे शेतकऱ्याच्या जगण्याचे आशयसूत्र सापडते. दुष्काळात पावसाची आतुरतेने वाट पाहणारा शेतकरी नारायण सुमंताच्या या कवितेत दिसतो. पावसाची नक्षत्रे कोरडी गेली तरी अजून पाण्याची धार येत नाही. त्यामुळे वृक्षाची पाने करपून गेली आणि रानमाळ उजाड दिसत आहे. म्हणून कवी म्हणतो,

"उडाली नक्षत्रे अवघी पावसाची ।धार पाणीयाची वर्षवेना
उजाडली राने उदासली मने । करपली पाने देखवेना"[६]

प्रस्तुत काव्यपंक्तीतून कवी नारायण सुमंत यांनी दुष्काळ पडल्यानंतर शेतकरी कसा हवालदिल होतो. चिंताग्रस्त होतो. याचे मार्मिक चित्रण केले आहे. करपलेल्या शिवाराची आणि होरपळलेल्या शेतकऱ्यांची अर्थात आटलेल्या पाण्याची आणि फाटलेल्या शेताची चित्तर कथा म्हणजे कवी नारायण सुमंतांची कविता होय. आपल्या कवितेत कवी नारायण सुमंत म्हणतात की, सर्वच नक्षत्र कोरडी गेलीत, पाण्याचा एक थेंबही पडला नाही. सर्व झाडाची पाने करपून गेली. रानमळ तर उदास झाली आहेत. त्यामुळेजगाचा पोशिंदा शेतकरीराजा आस्मानी संकटात पुरता सापडला आहे. निसर्गावरच त्याचे जीवन अवलंबून असल्यामुळे आणि त्यात पावसानीच दडी मारल्यामुळे त्याला जगणेच असहय झाले आहे. याचे प्रभावी चित्रण कवी नारायण सुमंतांनी आपल्या काव्यातून केले आहे. आज धरण बांधून होत आहेत परंतु वेळेवर पाऊस पडत नाही. पावसाळा सारा कोरडाच जातो. शेतात आडवे बांध घालून तरी काय उपयोग? इथला दुष्काळ अधिक तीव्र असतो. त्यामुळे शेतकऱ्यावर उपासमारीची पाळी येते. त्यामुळे कवी नारायण सुमंत म्हणतात,

"ओस झाल्या कुपनलिका ठिबक सिंचन बंदरे
आसवांनी शिंपितो मी रान माझे बापुडा"[७]

प्रस्तुत 'धरण' नावाच्या या कवितेतून कवी नारायण सुमंत यांनी दुष्काळातील परिस्थिती अचूकपणे टिपली आहे. कवी नारायण सुमंत या कवितेत म्हणतात की, निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकऱ्यांना आसू गाळल्याशिवाय हाती काहीच उरत नाही. इथले विज्ञानज्ञानी ग्रहणातच गुंतून जातात. देशातील नद्याचे पूर समुद्राला जातात. यावरती उपाय म्हणून नद्यांची जोडणी केली तर दुष्काळाची तीव्रता कमी होऊ शकते. असा सल्ला कवी नारायण सुमंत शासनाला देतात. दुष्काळात होणारी शेतकऱ्याची हाल-अपेष्टा, त्यांची दु:खे कवी नारायण सुमंतांनी या काव्यातून समर्थपणे मांडतांना दिसतात. कवी नारायण सुमंत यांची कविता शेतकऱ्यांची वेदना आणि विद्रोह समग्रपणे कवेत घेणारी आहे. आज एकविसाव्या शतकात यांत्रिकीकरणाणे खेड्यांनी आपली कूस बदलली आहे. खेड्यात झालेले परिवर्तन, सलोखा, एकमेकांचा आधार या सर्व बदलणाऱ्या गोष्टींचं चित्रण करतांना कवी कुठेच कमी पडत नाही.

खान्देशच्या मातीतून उपजलेला आणि शेतीची महती व शेतकऱ्याची स्थिती समर्थपणे अभिव्यक्त करणारा विष्णू थोरे हा एकविसाव्या शतकातील एक महत्त्वाचा संवेदनशील ग्रामीण कवी आहे. 'धूळपेरा उसवता' हा त्यांचा पहिला कवितासंग्रह. या काव्यसंग्रहाने त्यांना कवी म्हणून मोठं नाव दिलं. कवी विष्णू थोरे यांची कविता कुणब्याच्या आयुष्यात दाटलेलं मळभ घेऊन तरारून उगवली आहे. एकविसाव्या शतकातील शेतकऱ्यांची जीवनाशा निसर्ग-नशीब यांच्यावर अवलंबून आहे. आपल्याही जीवनात कधीतरी चांगले दिवस येतील असे कुणब्यालाही वाटते. म्हणून कवी विष्णू थोरे आपल्या कवितेतून म्हणतात,

"सोस जगण्याचा सारा ।नशिबाच्या केला नावे
येत्या हर दिवसाचे ।दोहे कुणब्याने गावे
भाळी लावल्या मातीला। कधी फुटेल चांदणं"[८]

प्रस्तुत काव्यपंक्तीतून कवी विष्णू थोरे यांनी कुणब्याच्या दोहयांमध्ये मरणाच्या अभिव्यक्तीबरोबर आशेचे किरणही अभिव्यक्त केले आहेत. कवी विष्णू थोरे म्हणतात की, जगाचा पोशिंदा शेतकरीराजा आपल्या जगण्याचा भार नशिबावर सोपवून टाकतो. मरणाने सुरवात होऊनही अखेरीस पीकपाणीरुपी आशेचे चांदणे कुणब्याला जगायला बळ देत असते. निसर्गाच्या अवकृपेने शेतकऱ्याच्या मनातील सगळी गणिते चुकतात. कर्जाचे आकडे फुगत राहतात. दुष्काळामुळे कधी नुकसान होते तर कधी सुलतानी संकटात सापडून तो पुरता नैराश्यात डूबला जातो. अर्थात गावगाड्याच्या आणि कृषीवलांच्या बकालीचा वेध कवी विष्णू थोरे यांनी आपल्या काव्यातून घेतला आहे. एकविसाव्या शतकातला शेतकरी आस्मानी संकटाच्या तडाख्यात कसा होरपळला जातोय याचे वास्तव चित्र रेखाटतांना कवी विष्णू थोरे म्हणतात,

"कशी करावी पेरणी कशी उगवावी माती
दुष्काळाच्या सोबतीनं येत रितेपण हाती
पिकवून जगण्याचा झाला भरवसा खोटा

इख कर्जचं घेऊन दिला मरणाला रेटा"[९]

प्रस्तुत काव्यपंक्तीतून सामाजिक बांधिलकी जपणारे कवी विष्णू थोरे यांनी आस्मानी आणि सुलतानी संकटाच्या वेटोळ्यात सापडलेल्या शेतकऱ्याची दयनीय अवस्था समर्थपणे मांडली आहे. शेतकऱ्यांच्या आयुष्यात दाटलेलं मळभ अभिव्यक्त करणे हाच कवी विष्णू थोरे यांच्या कवितेचा प्रमुख विषय होय. दिवस-रात्र शेतात काबाडकष्ट करूनही शेतकऱ्यांच्या आयुष्याचं गणित सुटत नाही. त्यांनी शेतीसाठी घेतलेलं कर्ज फिटता फिटतचं नाही. गळ्याला लागलेला कर्जाचा फास आणि निसर्गाची अवकृपा यातून सुटका म्हणून तो जगाचा पोशिंदा शेवटी आत्महत्या करतो. जगाचा पोशिंदा शेतकरीराजाच्या मनात प्रचंड अशा आकांक्षाचे काहूर माजलेले असते. या सर्व आशेचे शेवटी निराशेत रुपांतर होते. असा नैराश्यग्रस्त बनलेला, अगतिक झालेला शेतकरी शेवटी आत्महत्या करावयास प्रवृत्त होतो. ही शेतकऱ्याची करून शोकांतिका कवी विष्णू थोरे यांनी आपल्या कवितेतून वास्तवपणे टिपली आहे. एकूणच कवी विष्णू थोरे यांची कविता ग्रामकृषिसंस्कृतीचा आणि शेतकऱ्यांच्या वेदनामय जीवनाच्या वाताहातीचा पंचनामाच करते.

मराठवाड्याच्या मातीतून उपजलेला कवी अमृत तेलंग हे एकविसाव्या शतकातील कृषिसंस्कृतीचे भाष्यकार आहेत. त्यांचा 'पुन्हा फुटतो भादवा' हा समग्र ग्रामकृषिजीवन कवेत घेणारा व मराठी भाषेला समृध्द करणारा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. त्यांच्या या काव्यसंग्रहातील कविता शेतकऱ्यांचे सत्त्व आणि स्वत्व पुरेपूर जपणारी आहे. अर्थात कवी अमृत तेलंग यांची कविता शेतकऱ्यांच्या अपारकष्टांचा अभ्यासक्रम वाचकापुढे समर्थपणे ठेवते आणि कुणब्याच्या पुढच्या पिढीला मार्गदर्शन करण्याचीही समता बाळगते. पोटाला पाय लावून निजलेली रात शेतकऱ्यांच्या वाट्याला नेहमीच येते. ही शेतकऱ्यांच्या जीवनदु:खांची वस्तुस्थिती मांडतांना कवी अमृत तेलंग म्हणतात,

"कुणबी पेरावा कुणबी उगावा
कुणबी विकावा बाजारात।
कुणबी चोळावा कुणबी पिळावा
कुणबी दळावा पाळूखाली"[१०]

प्रस्तुत काव्यपंक्तीतून कवी अमृत तेलंग यांनी एकविसाव्या शतकातील आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचे केवळ दु:खच न मांडता 'पुन्हा फुटतो भादवा' असा आशावादही व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा-वेदनेची गाथा म्हणजे कवी अमृत तेलंग याची कविता होय. कुणब्याच्या भोगवट्याची चित्तरकथा जगाच्या वेशीवर मांडणारा नव्या पिढीतील दमदार कवी अमृत तेलंग या कवींनी पूर्वसूरीचे अनुकरण न करता स्वत:ची स्वतंत्र पायवाट शोधलेली दिसते आहे. अर्थात एकविसाव्या शतकात बदलत चाललेले ग्रामकृषिवास्तव अचूकपणे टिपण्यात कवी अमृत तेलंग यशस्वी झाला आहे. कवी अमृत तेलंग कृषिव्यवस्थेच्या दुखण्यापाशी पोहोचतो आणि एकविसाव्या शतकातही शेतकऱ्यांना अस्वस्थ करणाऱ्या वर्तमानाची नोंदही घेतो. सुतक आणि मृत्युच्या विषारी वेटोळ्यात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या जीवणाची वेदना कवी अमृत तेलंग यांनी आपल्या काव्यातून प्रभाविपणे मुखर केली आहे. कवी अमृत तेलंग यांची कविता जगण्याच्या जीवन संघर्षातून आणि शेतकऱ्याच्या कोलाहालातून जन्माला आलेली आहे. काळजात थिरकणाऱ्या आणि मातीतल्या कविता कवी अमृत तेलंग यांनी लिहिल्या आहेत. कोरडवाहू क्षेत्रातील नापिकी शेतकऱ्यांच्या जगण्यावर घाला घालणारी ठरली आहे. यावर अचूक बोट ठेवताना कवी अमृत तेलंग म्हणतात,

"पावसाच्या भरोशावर मूठ रिकामी केली
दडी मारल्या पावसानं आम्हा मूठमाती दिली
नाही म्हणणार कधी वांझाट बी अन माती
बुळ्या आभाळासंग कसं जोपासावरं नाती"[११]

प्रस्तुत काव्यपंक्तीतून मातीतल्या माणसांच्या व्यथा आणि वेदनांना कवितेचं अवकाश बहाल करणारा कवी अमृत तेलंग यांनी कोरडवाहू शेतकऱ्यांची मदारच निसर्गावर अवलंबून असल्याने आणि पावसानीच दडी मारल्यामुळे जगाचा पोशिंदा कसा हवालदिल होतो याचे वास्तचित्रण शब्दांकित केले आहे. शेतकऱ्यांचे जगणे आणि भोगणे यांचा वास्तवपट मांडणे हेच कवी अमृत तेलंग यांच्या कवितेचे प्रमुख मैदान आहे. जगाचा पोशिंदा शेतकरीराजा यांच्या मनात प्रचंड अशा आकांक्षाचे काहूर माजलेले असते. या सर्व आशेचे शेवटी निराशेत रुपांतर होते. असा नैराश्यग्रस्त बनलेला, अगतिक झालेला शेतकरी शेवटी आत्महत्या करावयास

प्रवृत्त होतो. अशी एकविसाव्या शतकातील शेतकऱ्यांच्या जीवनाची चित्तरकथा कवीने समर्थपणे चीत्तारली आहे. वाचकांना अंतर्मुख करणारी व विचार करायला लावणारी एकविसाव्या शतकातही नव्या जाणिवेने काव्यलेखन करणाऱ्या अमृत तेलंग कवींची कविता अशीच फुलत राहो. तिने नवनव्या शक्यतांचा मागोवा घेत राहून अधिकाधिक विकसित होवो हीच वाचकांची मनोमन अपेक्षा.

थोडक्यात, एकविसाव्या शतकात मराठी ग्रामीण कवितेच्या क्षेत्रात ग्रामकृषिसंस्कृतीच्या नव्या जाणीवांचे दमदार काव्यलेखन करणारे कवी इंद्रजित भालेराव, नारायण सुमंत, रघुनाथ पाटील, विष्णू थोरे, अमृत तेलंग यांच्या कवितांमध्ये ग्रामीणत्वाचा अस्सल बाज जाणवतो. या कवींच्या कविता साध्या सरळ भाषेत वाचकमनाचा कब्जा घेते व विचार करायला लावते. एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कविता आजच्या वर्तमानातील शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या बदललेल्या रूपातील घटकाचे प्रभावी दर्शन घडवीत आहे. एकविसाव्या शतकातील ग्रामकृषिजीवनाची उलघाल चित्तारणारी, काळीज पिळवटून टाकणारी आणि शेतकरी जीवनावर प्रभावी भाष्य करणारी ग्रामीण कविता वाचकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे. पारंपरिक चौकटीतून बाहेर येत ग्रामीण कृषिजीवनवर्तनात नवनवीन भाषिक रूपे घेऊन वास्तवाकडे झुकणारी एकविसाव्या शतकातील ग्रामीण कविता आणखी तेजाने प्रगट होईल, अशी अशा करायला हरकत नाही.

**समारोप:**

एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कवितेतून आधुनिकीकरणाच्या परिणामातून शेतीची होणारी उपेक्षा, निसर्गाचा अतताईपणा यासारखे विषय कवींच्या कवितामधून प्रभावीपणे प्रकटलेले दिसतात. एकविसाव्या शतकातील कवींनी ग्रामसंस्कृतीचे भान कुठेही ढळू दिलेले दिसत नाही. मराठवाड्यातील इंद्रजित भालेराव, पश्चिम महाराष्ट्रातील नारायण सुमंत, धुळवडचा विष्णू थोरे, खानदेशातील रघुनाथ पाटील या संवेदनशील कवींनी आपल्या कवितेच्या माध्यमातून कृषिसंस्कृतीचे यथासांग दर्शन घडविण्याबरोबरच आधुनिक कालखंडामध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीच्या परिणामातून बदलत्या वास्तव ग्रामीण जीवनाचे प्रतिबिंब कवितेच्या माध्यमातून कसे आविष्कृत होईल, याकडे कटाक्षाने लक्ष दिले आहे. एकविसाव्या शतकातील ग्रामीण कविता ही काहीसी गेय स्वरूपाकडे अधिक प्रमाणात झुकते आहे. हे जरी वास्तव असले तरीही काही ग्रामीण कवींनी मात्र आपल्या कवितेतून ग्रामीण जीवन प्रभावीपणे चित्रित करण्याबरोबरच कृषिसंस्कृतीचे वास्तव दर्शन घडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. "केव्हा तरी ग्रामीण जीवनाच कृत्रिम व वरवरच चित्र रेखाटणारी ग्रामीण कविता आज ग्रामीण जीवनातील सूक्ष्म बदल, ताणताणाव व नवनवीन प्रश्न यांचं वास्तवदर्शी दर्शन घडवीत आहे. आशय विषयाच्या दृष्टीने तर तिच्यात वैविध्ये येतेच आहे, पण शब्द, लय. ताल यांचं भान ठेवून ती अवतरते आहे."[१२] सुरुवातीला लोककथांचा व मौखिख परंपरेचा आधार घेऊन आविष्कृत होणारी व मराठी वाचकासमोर येणारी मराठी ग्रामीण कविता आज एकविसाव्या शतकात सामाजिक भान ठेवून कोणत्याही दबावाला बळी न पडता आधुनिकतेच्या प्रभावातून निर्माण झालेली पहावयास मिळते आहे. शेतकरी हा बळीराजासारखा उदार आहे. परंतु अस्मानी आणि सुलतानी संकटे, दारिद्र्य, दु:ख, वेदना यांच्यामुळे त्याला होणारा आत्मिक क्लेश याचे प्रभावीपणे चित्रण मराठी ग्रामीण कवीने केले आहे. आकाश व पृथ्वी यांचे वरदान शेतकऱ्यांना लाभायला हवे परंतु तेच त्याला लाभत नाही. याचे वास्तव चित्रण एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कवींच्या काव्यातून आलेले वाचकांना ठळकपणे दिसते आहे.

**निष्कर्ष:**

१. एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कवितेच्या आशयसूत्रातून केंद्रस्थानी कृषिजनव्यवस्था आणि बदलते भोवताल आहे.
२. शेतकऱ्यांचे जगणे व भोगणे यांचं वास्तव चित्रण करणे हेच एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कवितेचे प्रमुख मैदान होय.
३. एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कविता अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची शोकात्मिका समर्थपणे चित्रित करते.
४. एकविसाव्या शतकातही दमदार काव्यलेखन करणारे ख्यातनाम कवी इंद्रजित भालेराव, नारायण सुमंत, रघुनाथ पाटील, विष्णू थोरे यांच्या कवितांमध्ये ग्रामीणत्वाचा अस्सल बाज जाणवतो.
५. एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कविता शेतकरी जीवनाचा आशादायी किरण ठरू पाहत आहे.

६. अस्सल ग्रामीणत्वाचा अनुभव, योग्य शब्दकळा, चपखल प्रतिमा, प्रतीके, लोकभाषेचा आविष्कार यातून एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कवितेने वास्तव साकारले आहे.
७. एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कविता शेती आणि खेड्याच्या अवनतीची चौकसपणे वेध घेते.

**संदर्भ सूची :**


१. पवार, पंडितराव, 'मराठी कविता: आकलन आणि आस्वाद' दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती २००५, पृ. २८६.
२. भालेराव इंद्रजित, 'पेरा', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, तृतीयावृत्ती २०१०, पृ. ६०.
३. पवार, पंडितराव, 'मराठी कविता: आकलन आणि आस्वाद' दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती २००५, पृ. ३००.
४. सुमंत, नारायण, 'रानभैरी' अनुराधा प्रकाशन, करमाळा, प्रथमावृत्ती १९८३, पृ.
५. सुमंत,नारायण, 'नारायण पासष्टी' सुविद्या प्रकाशन, सोलापूर, प्रथमावृत्ती २००६, पृ. ५८.
६. तैत्रव, पृ. २२.
७. तैत्रव, पृ. ६१.
८. विष्णू थोरे, 'धूळपेरा उसवता' अक्षरबंध प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती २०१५, पृ. १२.
९. तैत्रव, पृ. २४.
१०. तेलंग अमृत, 'पुन्हा फुटतो भादवा' दर्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१७, पृ. ९९.
११. तैत्रव, पृ.२९
१२. मुलाटे वासुदेव, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप व दिशा' कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९४, पृ.९४.

# २१ व्या शतकातील 'अनवट वाटा' कवितासंग्रहातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**
मराठी विभाग,
शिवजागृती वरिष्ठ महाविद्यालय, नळेगाव ता.चाकूर जि.लातूर
Email -bdigole007@gmail.com

२१ व्या शतकातील एक प्रसिद्ध कवी म्हणून अविनाश पाटील प्रसिद्ध आहेत. 'अन्वयऋतू बहरताना' आणि 'अनवट वाटा' हे त्यांचे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. 'आगरी बोली लोकसंस्कृती व साहित्य परंपरा' हा संशोधन पर ग्रंथ प्रकाशित आहे. त्यांची इतर दहा पेक्षा अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. कोणताही लेखक आपल्या लेखनाची सुरुवात ही कवितेपासून करीत असतो. तशीच त्यांच्या लेखनाची सुरुवातही कविता लेखनापासून झाली आहे. लहान वयापासूनच त्यांना वाचनाची आवड आहे. भरपूर वाचन केल्यामुळेच प्रतिभा शक्ती रुंदवली आहे. वाचनामुळे त्यांच्या अनुभव विश्वाची मूस समृद्ध होऊन ते लिहू लागले. पेनचे डॉ. माधवराव पोद्दार, शंकर देवसर, विलास फडके, कवठेकर सर, वाघमारे सर, गझलकार अंजन काजनी अशा दिग्गज मंडळीचा सहवास लाभल्यामुळे काव्यलेखनाकडे वळले आहेत. जेव्हा त्यांचे मन अस्वस्थ होते तेव्हा त्यांची कविता शब्दरूप धारण करून प्रगट होते. कविता लिहिताना त्यांनी कधीही ठरवून, एकटाकी बसून लिहिलेली नाही. एखाद्या वृक्षाला फांदी फुटून गोड, मोहर येऊन पानाफुलांनी फळांनी बहरते. त्याप्रमाणे मनाच्या सुप्त गाभाऱ्यातून, जाणीवेतून आणि जे वाट्याला आलेले जे जीवन जगले, अनुभवले त्या अनुभूतीतून सर्जनशील निर्मिती केलेली आहे. 'अनवट वाटा' या काव्यसंग्रहातील कविता अंत:करणातील उमाळ्यातून, बेंबीच्या देठापासून बाहेर येऊन शब्दबद्ध झाल्या आहेत. या कवितासंग्रहातील ७२ कविता आजच्या वैश्विकीकरणात, जागतिकीकरणात, वर्तमानकाळासमोर धरलेला लखलखीत आरसा आहेत. कवी अविनाश पाटील यांना राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भाचे भान आहे. यंत्रयुगात, उत्तरआधुनिकतावादात समाजातील अन्यायाची वृत्ती आणि तिचे समर्थन करणारी २१व्या शतकातील संस्कृती यावर त्यांची कविता त्वेषाने प्रहार करते. तसेच माणुसकीचा गहिवर असणारी चिंतनशीलताही त्यांच्या कवितेत आढळते. अनुभवाचे संघटन करणारी अर्थवाही आणि सूचक भाषा हे त्यांच्या कवितेचे ठळक वैशिष्ट्ये आहेत.

समाज ज्या घटकांनी बनवतो त्यापैकी माणूस हा त्यातला एक प्रभावी व संवेदनशील घटक मानला जातो. अशा संवेदनशील माणसाने आपल्या चौफेर होणाऱ्या घटनांचे पडसाद समाजमनाच्या चेहऱ्यावर पाहायचे असतात; पण इथे तर प्रत्येकाचा चेहराच हरवला आहे. मनं कुणीतरी मारून टाकली आहेत .एकूणच हा समाज कर्तबगार वाटत नाही. संवेदनशीलता, कर्तबगारी, स्वत:चे अस्तित्व व त्याची ओळख ही केवळ मानवी मनाच्या व त्याच्या स्वातंत्र्यावर उभी असतात. मात्र पाटील यांच्या कवितेतला समाज साऱ्या परिस्थितीचा गुलाम झाला आहे. ह्या गुलामगिरीतून या समाजाला जर बाहेर काढायचं असेल तर समाजाभोवतालचा परिघ छेदावा लागेल.असा हा परिघ बनला आहे. मानवतेच्या साचलेपणातून, कोणत्याही मनोवृत्तीतून, सर्वांगीण गतिरुद्धतेतून आणि अर्थातच या परिघाचा केंद्रबिंदू आहे. स्वातंत्र्य ! या संपूर्ण समाजमनातील काही माणसं कदाचित स्वातंत्र्याचे चिंतन करतही असतील; परंतु ज्यांना स्वातंत्र्य नको आहे. गुलामगिरी ज्यांना पोषक वाटते. अशी माणसं त्यांना आपल्याकडे ओढून घेतात. असा कोणताच झालेला समाज मग आणखी काय करू शकेल? या साऱ्या माणसांना विचाराचा, मतांचा, स्वातंत्र्याचा सूर्य दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न. मेलेल्या माणसाला जिवंत करण्याएवढा भगीरथ वाटतो आणि तरीही अविनाश पाटील त्यात यशस्वी ठरले आहेत. ही गुलामगिरी परकियांना लाभलेली नाही, तर मानसिक, वैचारिक, आध्यात्मिक, भावनिक, सांस्कृतिक अशा सर्व प्रकारची गुलामगिरी इथल्या समाजात दिसून येत आहे. कवी अविनाश पाटील यांनी विशिष्ट समस्येचे केवळ चित्रण केले नसून त्याच्या तळाशी असलेल्या मानवी भावभावनांचा व जीवन वाट्याचा वेध घेतला आहे. अविनाश पाटील यांच्या कवितेतून सामाजिक असंतोष, विषमता, अन्याय याविषयीचे चित्र जरी आले असले तरी पाटील यांच्या जीवनविषयक दृष्टिकोन नैराश्यवादी नाही. जीवनावर त्यांची निष्ठा आहे ते आशावादी आहेत. आज जरी जीवन निराशमय वाटत असले तरी येणारा भविष्यकाळ हा आशावादी आहे. असा त्यांचा विश्वास आहे "२१ व्या शतकात जो नैतिक वैचारिक वेगळेपणाचा आव आणला जातो तो किती पोकळ भंकस आहे हे समोर आले आहे. विकास, संरक्षण, लोकशाही, प्रशासन या प्रत्येक आघाडीवर आणि देशभरातील शिक्षण

ज्ञान, विज्ञान-तंत्रज्ञान, कला, साहित्य, संस्कृती अशा सर्व क्षेत्रातील अराजक भ्रष्टाचार आणि अध:पतन हे परिसीमा गाठते आहे. राष्ट्रवादाविषयीचा दांभिक चेहरा उघडा पडला आहे यातून देशाच्या वैचारिक सांस्कृतिक नैतिक जीवनात पुन्हा फुसका बार ठरला आहे. आपण सध्या एका सर्वकष संकटाचा सामना करत आहोत. हे अरिष्ट वोढवताना पाहता नवउदारमतवादी म्हणजे बाजारवाद, जागतिकीकरण आणि खासगीकरण करणाऱ्या आर्थिक धोरणांमधून उद्भवलेले आहे. या धोरणामध्ये जुजबी बदल करून त्यांना मानवी चेहरा देण्याचे ढोंग करून फक्त निवडणूक समझोते केले जात आहेत. हे अरिष्ट केवळ व्यापार, वित्त व बाजारपेठ या पुरते मर्यादित नाही, तर यासह या अरिष्टाने आपल्या एकूण सामाजिक, राजकीय, वैचारिक आणि सांस्कृतिक, बौद्धिक, नैतिक, आत्मिक जीवनाला घेरले आहे. आज भांडवलाचे केंद्रीकरण आणि एकत्रिकरण घनीकरण हे कधी नव्हे एवढे वाढते आहे. यातून वाढती विषमता अधिकाधिक होणारे अंतर्विरोध शासनावर आणि एकंदर समाजावर मक्तेदारी भांडवलाची सार्वत्रिक पकड मजबूत झाली आहे. त्यातून सर्व क्षेत्रात मक्तेदार व एकाधिकारशाही बांडगुळासारखी पोसली जात आहे. सट्टेबाज वित्तभांडवलाचे आणि पैशाचे वर्चस्व आज आतोनात वाढले आहे"१(संपा.मा.मा.जाधव,अक्षरधारा,बळीवंश प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती,२०२३, पृष्ठ क्रमांक,१०,११) संस्कृती, परंपरा आणि समाज या तीन घटकांच्या अंगाने कवीचा आत्मा शोधताना आजच्या भौगोलिक वस्तूस्थितीचा आधार घेणे परंपराप्राप्त ठरते. कवीने दु:खाचा शोध घेऊन माणूस शोधण्याचा ध्यास घेतला आहे. समाजजीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन त्यांचा पारदर्शी आहे. त्यामुळे 'अनवट वाटा' मधील कविता वाचताना म्हणत रक्तबंबाळ झाल्याचा अनुभव येतो. मानवी मन, मानवी वर्तन, मनोविकृती, सामाजिक संबंध आदी विषयापासून ते शेतकऱ्यांच्या आत्महत्या, व्यसनाधीनता, कर्जबाजारीपणा, भ्रष्टाचार, जातीयवाद, धर्मांधता, फुटीरतावाद, वाढती महागाई, वाढती लोकसंख्या, कुप्रथा, आर्थिक, सामाजिक विषमता, दुर्बल घटकावर होणारे अन्याय, अत्याचार इत्यादी समस्या कवीने 'अनवट वाटा' कवितासंग्रहातील कवितांमधून रेखाटल्या आहेत. या संदर्भात राग जाधव म्हणतात की, साहित्य हा संस्कृतीचा एक घटक आहे. याचा अर्थ साहित्यातून समाजाचे आणि सांस्कृतिक संदर्भ व्यक्त होते. समाज आणि संस्कृतीचे बाह्य आणि अंतर्यामी बसणाऱ्या समूह माणसातील विविध प्रवृत्ती, प्रेरणा, परंपरा यादेखील साहित्यातून व्यक्त होतात. म्हणून वाड्.मयनिर्मिती ही संस्कृती संपादनाची एक साधना आहे. या त्यांच्या भूमिकेतून साहित्य हे एका अर्थाने जसे समाजजीवनाचा आरसा आहे. तसेच सांस्कृतिक भाष्यही आहे. म्हणून सर्जनशीलतेचा संस्कृतीसापेक्ष विचार करता येणे शक्य आहे. भाषा ही साहित्याचे माध्यम आणि कवी हा समाजाचा घटक यामुळे अगदी संस्कृतीनिरपेक्ष असून साहित्यकृती असणे शक्य नाही. वाड्.मयीन संस्कृती ही ज्याप्रमाणे समाजाच्या उदरात व्यापक संस्कृतीची एक उपसंस्कृती आहे. कवी अविनाश पाटील यांची भूमिकाच मुळात सामाजिक, सांस्कृतिक बदलाची आहे. त्यांची संवेदनशीलता ही आत्मभानातून, अस्मितेतून, आत्मशोधातून आलेली आहे. त्यांना आपल्या कास्तकरी समाजाचा टाकाऊ, निरर्थक जीवनाचा नि जगण्याचा अर्थ समजला. धार्मिक, सांस्कृतिक, जातीयतेवर आधारित गुलामी व लाचारीचे अर्थ कळाले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या शब्दांचा नव्याने अर्थही कळाला. त्यांच्या कवितेला कोणत्याही स्वरूपाचा मानवनिर्मित अन्याय, अत्याचार, अपमान नको आहे. तिला हवीय निकोप मानवी प्रतिष्ठा यास्तव ती अन्यायाविरुद्ध विद्रोह करत सर्व स्तरावरील समतेचा पुरस्कार करते. कष्टकऱ्यांच्या आयुष्याची दीर्घकाळ लूट करणाऱ्या समाजसंस्कृतीवर कायमचा बुलडोझर फिरवावा. असे या कवितेला वाटते. माणूस म्हणून माणुसकीला कलंक फासणारे आहे. त्याला ही कविता सरळ लाथडते. कारण या कवितेला सामाजिक व सांस्कृतिक सजग भान आहे. समाजजीवनात अनेक ज्वलंत विधायक प्रश्न आहेत. अंधश्रद्धा, बुवाबाजी याला धार्मिकतेचा आधार, निरक्षरता, कुपोषण, बालविवाह, दारिद्य, बेकारी, हुंडाबळी, भ्रष्टाचार, अस्पृश्यता, गुलामी, आतंकवाद, बेशरम राजकारण, स्त्रिया, अबलांवर होणारे अन्याय, अत्याचार, धनिकांकडून, शैक्षणिक संस्थाकडून, सर्वसामान्यांचे होणारे शोषण, वाढती कटू धार्मिकता, बुवाबाजी, राजकारण्यांनी वाटून घेतलेले महामानव, भोगवाद, चंगळवाद, व्यसनाधीनता, बधिर संवेदनशीलता, गोठलेली लाचारी ,दुबळी, हातबल मने, चांगुलपणाची चाललेली टिंगल, टवाळी अशा सामाजिक प्रश्नावर त्वेषाने प्रहार करून समाज बदलासाठी आणि स्वाभिमानाच्या पाठराखणीसाठी ती कुठल्याही संघर्षाला सामोरी जाण्यासाठी सज्ज आहे. ही कविता सामाजिक आशयाची, सामाजिक बांधिलकीची आहे. या कवितासंग्रहातील कविता जुन्या, नव्याच्या ताण- तणावातून आकाराला आलेली अस्वस्थ कविता आहे. आधुनिक माणसाचा पेच हाच त्यांच्या कवितेचा गाभा आहे. नवआर्थिकव्यवस्थेचे सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ त्यांच्या कवितांमधून आढळतात. त्यामुळे संपूर्ण जग एक खेडे झाले. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर आपले संस्कृतिक जीवनही ढवळून निघाले. उत्तरआधुनिकता आणि भारतीय संस्कृतिक जीवन जागतिकीकरणातून समाजजीवनाचे स्वरूप

अंतरबाह्य बदलून गेले. यामुळे सामाजिक आणि वाड्.मयीन मूल्यात्मक बदल घडले. नोकरी, धंदा, व्यवसाय, टुरिझम, शिवाय मूल्यांचे, बौद्धिक संकल्पनांचे, प्रतिमांचे, नात्याचेही स्थलांतर झाले. अशा अनेक विषयांना कवी अविनाश पाटील यांनी 'अनवट वाटा' कवितासंग्रहातील रक्त, माणसे, तुमच्या जातीचा सूर्य कुठे गेला सांग, बदल, जगणे, तिकीट, बाबा बापू आणि महाराज वगैरे, देव आणि भक्त, पैलतीर, जीवन, फांस, रानात या, झेंडे, इमान, दुःख, म्हातारा बैल, जीवन, ओळख, अनवट वाटा, तुका म्हणे, अघटीत, नाती, चेहरे, वाट, झाडे, ती जन्माला आली आणि?, भिक आणि भिकारी, कविता, माणसे मरण्यासाठी, स्वातंत्र्यानंतर, ती उभी नाक्यावर, मच्छी पानी, पुतळे, जग, पक्षांतर, ती माणसे इत्यादी कवितांमधून चित्रित केले आहे. शोषित आणि पिडित यांच्या बद्दलची कणव त्यांच्या बहुतांश कवितांमधून स्पष्ट होते. मानवतावादाचा सूर त्यांच्या कवितांमधून घोषित केलेला आढळतो. अविनाश पाटील यांची जीवनविषयक जाणीव सूक्ष्म आहे. आपल्याच रक्तात आपण किड्याप्रमाणे अखंड लोळत, जळत, एकमेकांच्या द्वेष करत जगत असतो. या जगात मानवधर्म हा श्रेष्ठ आहे. वंश, वर्ण, राष्ट्रधर्म यांच्यात कवी भेद मानत नाही. कवीला व्यतीत, पीडित, शोषित यांच्या बद्दल कणव आहे. यामुळेच त्यांना या भेदाच्या चिखलातून बाहेर पडलेला माणूस हवा आहे. कवी अविनाश पाटील 'रक्त' या कवितेत म्हणतात, "रक्त लाल आहे पुकारून टाकू जगाचे नकाशे सुधारून टाकू, जमाती न जाती कशाला निराळ्या, पुन्हा मानवा प्रेम वाटून टाकू, कशा बंदी शाळा जाहल्या घरांच्या, कंपनी तयाची सारी उखडून टाकू, कशाला आता या रोजच्या लढाया अरे राज्य मानवाचे स्थापून टाकू, असूर ते माजले राम भेटेना, कोणी अतो रावणास ही राम बोलून टाकू, (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक,१६) अविनाश पाटील यांची कविता सामाजिक आशयाची आहे. समाजात जे घडते. ते डोळसपणे पाहतात. म्हणूनच हजारो वर्षापासून चालत आलेली जातीय विषमतेवर आधारित असलेली समाजव्यवस्था अस्वस्थ करते. जातीयतेचे रौद्ररूप आजही आहे तसेच आहे. जातीयतेचे नागडे दर्शन पाटील यांची कविता घडवते. वर- वर पुरोगामीत्वाचा देखावा करणाऱ्या प्रवृत्तीचे ते कपडे फाडतात. इथला माणूस सत्यवादी आहे असे त्यांना वाटत नाही. कारण समाजात दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहेत. समाजात विसंगती दिसून येते. कोणी कितीही पुरोगामीत्वाचा देखावा केला तरी जातीची उतरंड बदलायला लोक तयार नाहीत. हे शल्य समाजवास्तवाचे नितळ दर्शनच होईल. आज शिकलेली बहुजनांची पिढी इथल्या भेदभाव करणाऱ्या संस्कृतीला जाब विचारताना दिसते. आज काळ बदलला असून संविधानाची जाणीव आजच्या कास्तकऱ्यांच्या शिकलेल्या पिढीला झाली आहे. कवी पाटील यांची कविता विषमतावादी व्यवस्थेचा नकाशा पुसून टाकून जगात समतेचा नकाशा निर्माण करावे म्हणतात. परंपरा, इतिहास, धर्म, संस्कृती, राष्ट्रवाद यांचा विपर्यास आणि जाती व धर्मावरून सर्व जगात दहशतवाद, युद्धे माजली आहेत. सर्व माणसांची रक्तही हिरवे किंवा भगवे किंवा निळे पांढरे नसून लालच आहे. मग या दंगली, भेदभाव, बंदी शाळा, कंपनी रोजच्या लढाया कशासाठी हे सारे गुंतवून टाकून मानवाचे राज्य निर्माण करून पुन्हा मानवा मानवात बंधू प्रेम वाटून टाकण्याचा संदेश कवी देतात. आजच्या राजकारणाचा गाभा मात्र जात, जमातीय, वर्गीय आणि पुरुषसत्ताक यांची उतरंड व विषमता पोहवचणारा आहे. आजच्या आर्थिक आणि मूकमोर्चच्या आरशातून लोकशाही मूल्य पायदळी तुडवण्याचे संकट येत आहे.

'माणसे' या कवितेतून कवीची जीवनानुभवाशी नाळ बांधलेली आहे. संताप, चिड व्यक्त करतात. माणसा- माणसातील नातं शोधताना ही कविता अर्थ व्याकुळ होते. जीवनाचे विविध संदर्भ शोधू पाहते. एक मी सगळ्या शतकातील माणूस हिंस्त्र श्वापदासारखा वागत आहे. त्यामुळे त्याच्या संस्कृतीच्या, समाजाच्या विचाराच्या कल्पना बदलून गेल्या आहेत. माणुस किती लाचार होऊ शकतो. माणसाला खाली पाहायला लावणारी व आपले षंडत्व उघड करायला लावणारी सामाजिक विषमता प्रांजळपणे व्यक्त करताना म्हणतात, "आता माणसे तरी कुठे आहेत माणसासारखी, जगतात हिंस्र श्रापदासारखी, स्वार्थाच्या दलदलीत गुरफटलेली नातीगोती, माणसांनी विणून ठेवल्या कर्मठ जातीपाती, रोज जातीसाठी माती खात, चाललेला हिंसाचार, गोळीबार, आक्रमणे, हल्ले, माणसे बळी घेत आहेत, मारीत आहेत माणसे, जातीसाठी." (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक,३१) आजचे सामाजिक जीवन दलदलीचे झाले आहे. इथे प्रत्येक क्षेत्रात दलदल निर्माण झाली आहे. जातीपातीची, उच्चनीचतिची, अंधश्रद्धेची, राजकीय, डावपेचांची, भ्रष्टाचाराची, वशिलेबाजीची, देशद्रोही, धर्माचे अनुयायी यांची दलदल वाढल्यामुळे इथल्या शांततामय वातावरणाला दहशतवादी आणि त्यांच्या दहशतीने सुरुंग लागलाय. याला विरोध करणाऱ्या राजकीय प्रवाहांना आणि कष्टकरी सामान्य जनतेला जरब बसवण्यासाठी प्राकृतिक शक्ती व विचारसरणी मुस्लिम, ख्रिश्चन, अल्पसंख्याक काही विशिष्ट जमाती आदींना लक्ष केले जात आहे. अर्बन, नक्षली, देशद्रोही लवजिहाद, व्हॅलेंटाईनडेला विरोध आहार, कपडे, उपासना याबाबतची

दहशत स्त्रियांवरील अत्याचार सारे असे नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी वापरली जात आहे. रोज जात, धर्म, धर्मपंथ यासाठी मातीखात चाललेला हिंसाचार, गोळीबार, आक्रमणे, हल्ले, माणसे बळी घेत आहेत. माणसांनी घराबाहेर कधी पडायचं हे अतिरेकीच ठरवतात. जातीसाठी मारत आहेत माणसे आणि बऱ्याचदा झुंडशाहीचे रूप धारण करत आहेत. या तडाख्यातून कोणीही सुटणार नाही. कवी मनातील वेदना कवितेच्या माध्यमातून मांडली आहे. आजच्या राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक विकृतीचे नग्न चित्र कवी मांडताना दिसतात. कष्ट करून जगणाऱ्या माणसाबद्दल त्यांचा ओढा अधिक जाणवतो. कास्तकरी, सर्वसामान्य गरीब समाजाला अन्याय, अत्याचार निमुटपणे सहन करावा लागतो. कवीच्या सामाजिक जाणीवा संवेदनशील असून येथे प्रत्येक क्षेत्रात दलदल निर्माण झाली आहे. झुंडशाही, दहशतवाद यांच्यामुळे दडपल्या गेलेल्या लाचार माणसाचे हे चित्रण आहे. उदात्त, सुमंगल, परंपरा असलेल्या या स्वतंत्र भारतातल्या लोकशाही देशातील या स्वतंत्र भारतातल्या लोकशाही देशातील नागरिकाला व्यक्ती स्वातंत्र्य नाही; पण तरीही आपण सुखी असल्याचा भास तो निर्माण करत आहे. वेगवेगळ्या दहशतीखाली निर्माण सामान्य माणूस दबला आहे. बेगडी व पोकळ संस्कृतीचे 'डमी' हे प्रतीक आहे. आजच्या संस्कृतीचा उपहास करून झुंडशाही पुढे नमावे लागते. आजची संस्कृती उंची साड्या नेसणाऱ्या तत्त्वहीन डमीसारखी निर्जीव संस्कृती आहे. पंथ, धर्म, देश, प्रांत व जात याप्रमाणे यांचे कळप असतात. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जसे पारंपारिक- सरंजामी धर्मकल्पनेचे यात वर्चस्व होते. आता क्रयवस्तू- व्यापारी स्वरूपाच्या भांडवली धर्मविचाराने घेतले आहे. जुन्या विचाराप्रमाणे धर्मनिरपेक्षता केवळ नाकारण्याची पद्धत न ठेवता हिंदुत्व हीच धर्मनिरपेक्षता असा पवित्रा घेतला गेला आहे. यात आता जो सामाजिक, सांस्कृतिक विचार व संस्कृती आहे. उत्तरआधुनिक संस्कृती व अस्मिता विचारांची व युक्तीवादांची भर पडली आहे. पूर्वीपासूनच नैतिक दुटप्पीपणा, दांभिकपणा होता आणि तो आजही आहे; पण पूर्वी त्यात सनातनी नैतिकता होती. त्याची जागा उपयुक्ततावाद व नैतिकता आणि खरे तर अनैतिकता यांनी घेतली आहे. हे कवी अविनाश पाटील पुढील कवितेतून व्यक्त करतात.

कवी अविनाश पाटील 'तुमच्या जातीचा सूर्य' या कवितेतून वर्तमान प्रश्न मांडतात. जाती-धर्माच्या नावाखाली माणसं माणसांची कशी कत्तल करतात. याचे विदारक चित्रण करतात. "सूर्य नसता तर...! ईश्वर नाही म्हणणाऱ्या नास्तिकांची तोंडे बंद झाली नसती, धर्म आणि जातीचे ढोल वाजून दंगली माजवीनारांनो, तुम्ही तुमच्या प्रत्येक धर्माचे स्वतंत्र सूर्य आणि स्वतंत्र आकाश स्वतंत्र निर्माण करा, स्वतंत्रपणे आपल्याच जातीचे निर्माण करणाऱ्यांनो माणसातल्या सैतानांनो, एकच असती अल्ला, येशू, ईश्वर, बुद्ध सर्वच नद्या सागराला मिळतात, तसे जातात सारेच मार्ग एका मुक्तीकडे, केवळ बंदुकांचा व्यापार न करता माणुसकीही फुलवा जरा, जाताना तुम्हीही जाणार आहात, रित्या हाताने सोबत काहीही न घेता, जगतजेता सिकंदरही अखेर गेला, जगाला हात रिते दाखवीत, मानवता सुळी चढविणाऱ्यांनो तुम्ही सूर्य बनवून दाखवा तुमच्या जातीचा!" (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक,३६) आजच्या वर्तमान वास्तवातील छुप्या दांभिक प्रवृत्तीचे पितळ उघडे पाडले. देश, धर्म, धर्मग्रंथ यावर घणाघाती प्रहार केला आहे. २१ व्या शतकात प्रत्येक क्षेत्रात गदारोळ झालेला असून धर्म आणि जातीचे तुरे मिरविणाऱ्यानो व दंगली माजविनारांनो तुमच्या धर्माचा जातीचा सूर्य स्वतंत्र प्रकाश देणारा निर्माण करा. असा जाब कवी विचारतात. हजारो वर्षापासून दलितांना गावकुसाबाहेर ठेवून बहिष्कृत केले गेले. अज्ञान अंधारात कुजत ठेवले. मानहाणीचे जीवन जगायला भाग पाडले. अशा भीषण अस्वस्थतेतल्या समाजात प्रज्ञासुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर उदयास आले. त्यांनी दलितांना आत्मभान मिळवून दिले. शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा असा मूलमंत्र त्यांनी दिला. असा सूर्य प्रत्येक जातीतील लोकांनी स्वतंत्र निर्माण करा. जातीय दंगली घडविणाऱ्यांना सवाल कवी करतात. संस्कृतीच्या नावाने इतरांचे रक्त चविष्टपणे पिणाऱ्या वारसदारांना जाब विचारतात. संस्कृती, धर्म, जात यांच्या नावाखाली इथल्या सामान्य माणसाला भरडून टाकली गेली. स्वार्थी हेतू साध्य करण्यासाठी संस्कृतीचा सहारा घेतला गेला. म्हणून इतरांचे शोषण करून प्रस्थापितांना सुखा समाधानाने जगता येण्यासाठी निर्माण करण्यात आलेले कोलीत आहे. ही संस्कृती ज्यांना बहाल केल्या त्यांच्यासाठी धर्म, पंथ, वर्ण, गोत्र इत्यादी जातीच्या पाणपोया निर्माण केल्या. सर्वच नद्या सागराला मिळतात. त्याप्रमाणे बौद्ध, हिंदू, शीख, ईसाई, मुस्लिम, ख्रिश्चन सर्वच धर्म एक आहेत. सर्व धर्मांनी मुक्तीचा मार्ग दाखविला आहे. बंदुकीचा व्यापार न करता माणुसकी फुलवा. सगळेच मेल्यानंतर काहीच सोबत घेऊन जाणार नाही. येथेच सोडून जावे लागते. जग जिंकणाऱ्या सिकंदरही रिकाम्या हाताने शेवटी गेला. माणसाने माणसासारखे वागा. धर्म, संस्कृतीचे, ईश्वराचे अर्थ कवी शोधतो आणि माणूसपणाची प्रतिष्ठापना कवीमन करताना दिसते. जागतिकीकरणाने जात संपुष्टात यायला हवी होती; परंतु ती अधिक प्रबळ झाली. आरक्षणाच्या निमित्ताने एक नवे आराजक सध्या देशभर सुरू आहे. माध्यमे आणि समाज माध्यमे यांना संस्कृतिक अधपतनाला

हातभारच लावला आहे. दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेश या समाज धुरीनांच्या हत्या, मणिपूर मधील स्त्रियांवरील हिंसाचार ,अत्याचार या घटना पुरोगामीत्वाची लाज वाटणाऱ्या केळसवान्या घटना आहेत.

सामाजिक आणि व्यक्तिगत पातळीवर सुरू असलेल्या या कोलाहालाचे प्रतिबिंब कवितेत उमटत आहे. मूल्यहिनता, अस्तित्वासाठीचा संघर्ष, भ्रष्टाचार, जगण्याला आलेले बाजारू रूप, जात, धर्म या सगळ्याच घटनांचा प्रभाव 'अनवट वाटा' कवितासंग्रहातील कवितांवर पडलेला आहे. याचा अर्थ असा की, २१व्या शतकाने माणसाच्या जगण्याला जशी नवी जीवनशैली प्रदान केली. तशीच त्यांची संवेदनाशीलता बहिरी करून टाकली. जागतिकीकरणामुळे सर्वसामान्य माणसांच्या आर्थिक संधी वाढल्या; पण सांस्कृतिक कोंडी झाली. मोठ्या प्रमाणावर महागाई, नागरी सुविधांचा अभाव, व्यवसायातील हलाखी, मंदी आणि बेकारी, दैनंदिन भ्रष्टाचार अपघात आणि असुरक्षितता अनेक आर्थिक अडचणींना एकविसाव्या शतकातील समाजाला ग्रासले आहे. सामाजिक विषमता निर्माण होण्यास मुख्य कारण म्हणजे भ्रष्टाचार या भ्रष्टाचाराचा जेव्हा अतिरेक होतो. तेव्हा नीतिमत्ता पूर्णपणे पायी तुडवली जाते. माणूस जेव्हा पशुपेक्षाही भयानक होईल. तेव्हा सगळीकडे हाहाकार माजल तेव्हा अगणित हातात मशाली घेऊन उठतील. भ्रष्टाचार व सुशिक्षित गुंडगिरी हा तर समाजाला लागलेला एक कलंकच आहे. आजच्या घोटाळेबाज संस्कृतीवर कठोरपणे कवी अविनाश पाटील 'कुठे गेला सांगा' या कवितेत हल्ला चढवताना म्हणतात, "अडला का पाण्याचा घोट आमच्या घशातला, कुठे गेला सांगा पैसा आमच्या खिशातला, बुडविल्यात बँका, वाजविलात डंका, फिरतोय मल्ल्या, गल्लोन गल्ल्या, प्रतिष्ठित चोरांनो लुटलात तुम्ही, पैसा आमच्या देशातला कुठे गेला सांगा, हिरवा चारा, उजेड वारा, भूखंड किंवा खिचडी अन्, रस्त्यावरची काळी डांबर, जिथे तिथे तुमचा नंबर, अडला का पाण्याचा घोट आमच्या घशातला कुठे गेला सांगा पैसा आमच्या खिशातला!" (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक,१७) गोरगरिबांना भाकरीची आस लागलेली असते. भारताने कल्याणकारी शासनव्यवस्था स्वीकारण्याने नक्कीच सामान्यांचे कल्याण होईल असे वाटले होते. महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' ची हाक दिली होती. शासनाच्या योजना खेड्यातल्या लोकांच्या अंगणापर्यंत गेल्या खऱ्या, मात्र घरात पोहोचू शकल्या नाहीत. याचे कारण म्हणजे शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचारी मनोवृत्ती. पुढारीही अज्ञानी लोकांचा फायदा घेऊन सामान्यांची फसवणूक करत आहे. अल्पभूधारकांसाठी शासनाने सबसिडीवर कर्ज वाटपाची योजना सुरू केली; परंतु राबविणारा अधिकारीवर्ग भ्रष्ट असल्यामुळे गरजू लोकांना या योजनांचा फायदा मिळाला नाही. भ्रष्टाचार हा आपल्या लोकशाहीला लागलेली कीड आहे. गेल्या ७७ वर्षाच्या कालावधीत तिने सर्वच क्षेत्रांना ग्रासले आहे. भ्रष्टाचाराला आज सार्वत्रिक स्वरूप प्राप्त झाले आहे. त्याला देशव्यापी स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यात भरडला गेला तो कास्तकरी सामान्य माणूस. पाणी आडवा, पाणी जिरवा, मल्ल्या घोटाळा, चारा घोटाळा, भूखंड घोटाळा, खिचडी, चिक्की घोटाळा, रस्त्यावरील डांबरी घोटाळा, अदानीचे कोट्यावधी रुपये माफ, काला धन, भ्रष्टाचारी नेत्यांच्या मागे लागलेली ईडीची चौकशी हे सर्व भ्रष्टाचार ज्यांची सत्ता त्यांचा भत्ता जाग्यावरच जिरला, भ्रष्टाचार या महारोगाच्या विरोधात जे प्रकाश नारायण, बिहारमधील विद्यार्थी, इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी पुकारली, गुजरात मधील नवनिर्माण चळवळ, अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली भ्रष्टाचार मिटविण्यासाठी लोकपालची मागणी मनमोहन सिंग शासनाने मान्य केली. सबका साथ सबका विकास ही भ्रष्टाचार विरोधी आंदोलने फुसकी ठरली. या आंदोलनातील घोषणा मधील अभिप्रेत असलेला असे आणि अर्थ लोकांच्या प्रत्येकाला आला नाही. सत्तेवर येताच देशात ध्रुवीकरणाला जोरात चालला मिळाली. हा सारा पैसा कष्टकऱ्यांच्या घशातला, खिशातला ज्यांनी बँका बुडविल्या त्यांचाच डंका वाजवून सर्वसामान्यांना लुटले. असल्याचे समाजवास्तव कवी मांडतात.

'तिकीट' या कवितेत कवी अविनाश पाटील सांगतात की, तिकीट मिळावे म्हणून पुढारी पक्षश्रेष्ठीची दारे झिजवतात आणि श्रेष्ठींच्या मोठेपणाचे नगारे वाजवितात. एखाद्या पक्षनिष्ठा असणाऱ्या उमेदवाराचे नाव कापून लाखोच्या खोकापेटी घेऊन मांडवलीवर त्याला आमदारकीचे तिकीट दिले जाते. मग काय तो विवेक, निष्ठा मिळवतो आणि खोटी प्रतिष्ठा घेऊन मोठ-मोठे बॅनर रस्त्यावर, नाक्यावर, गल्लीबोळात, गावागावात, मयताच्या, बाळंतपणाच्या, हळदी, लग्नाच्या, वाढदिवसाच्या, गौरी, गणपती, दसरा, दिवाळी, दहीहंडी अशा सर्वच कार्यक्रमात आपले दात दाखवत नोटांचे तुकडे फेकून कार्यकर्ते त्यांच्या कार्यालयात जमवतो. जसे जनावर मेल्यावर कावळे गिरट्या घालतात किंवा जसे गुळाला मुंगळे लागतात त्याप्रमाणे निवडणुकीत दसरा, दिवाळी साजरा करतात. आज निवडणुकांमध्ये संविधानिक नैतिकता पाळली जात नाही. देशात राजकीय पक्षांची संख्या दोन अडीच हजार आहे. लोकशाहीच्या अंगावरची ही सूज आहे. पक्ष, गटबाजीतून सत्ता मिळवण्यासाठी भ्रष्टाचार केला जातो. नेत्यांच्या वैयक्तिक स्वार्थातून

भ्रष्टाचार वाढला आहे. कवी लिहितात, "मतासाठी वाटावे लागतात काळे पैसे, साड्या, धोतरे, दारूच्या बाटल्या, कापाव्यात कोंबड्या, बकऱ्या, त्यासाठी पुन्हा करावी लागते वाट मारी, भ्रष्टाचार, काळाबाजार पैसा पेरावा मग उगवतो पैसा, पैसा आडवा पैसा जिरवा, मग मिळवावा प्रत्येक योजनेतून टक्का. (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक,३९) अशा प्रकारे आजच्या निवडणुकांमध्ये अनेक दोष शिरलेले आहेत. हे निवडून आलेले पुढारी पाच वर्ष अगोदर स्वतःचा विकास करून घेतात. जनतेचा विकास मात्र कागदावरच करून सर्व सरकारी योजना लाटतात. कधीतरी मनात विकास करायचे आले तर वाढीव किमती लावून करतात. सर्वजण देशाला, राज्याला पाच वर्ष तीळ- तीळ सर्व वाटून खातात. फक्त हे हौशी नेते दरवर्षी १५ ऑगस्टला तेवढे उगवतात आणि लोकसेवेचे नाटक मात्र करत राहणार. पुन्हा पाच वर्षानंतर तिकीट मिळावे म्हणून आजचे ज्वलंत प्रश्न या वर्चस्वकारणाला प्रश्नच वाटत नाहीत.

कोट्यावधी तरुण-तरुणींना रोजगार नाही. महागाईच्या ज्वाला गगनाला भिडलेल्या आहेत. गरिबी लोकांच्या जीवावर उठलेली. हजार कोटींचे कर्ज बुडविणारे मल्ल्या, आदानी, शेतकऱ्याचे मृत्यू, शिक्षणाचे खाजगीकरण, नवीन शैक्षणिक धोरण २०२०, स्तरहीन राजकारण, भ्रष्टाचाराचा वणवा, आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री यांच्यावर होणारा हजारो कोटींचा अनावश्यक खर्च, लोक उपाशी आणि लोकप्रतिनिधी चार-पाच वर्षांमध्ये हजारो कोटींचे धनी होतात. हे सगळे जण धनावरचे नागोबा होतात. 'बदल' या कवितेत कवी म्हणतात, गोरे गेले आणि काळे आले; पण कास्तकऱ्यांचे, सर्वसामान्यांचे कुठे भले झाले? आजच्या बाजारवादी आर्थिक आणि राजकीय जीवनामध्ये आधीच्या सामाजिक, उदारमतवादी टप्प्याहून काहीशा वेगळ्या प्रकारच्या विचारप्रणाली आणि घडामोडी बोकाळल्या आहेत. उदाहरणार्थ, अर्थवाद- म्हणजे केवळ आर्थिक मुद्द्यापुरते पाहणे. व्यवस्थापनवाद- म्हणजे राजकारणाचे कार्पोरेट पद्धतीने व्यवस्थापन करणे आणि गोष्टी मॅनेज करणे, सामाजिक अभियांत्रिकी, सोशल इंजीनियरिंग- म्हणजे केवळ जाती जमातींना गटांची गणिते घालणे, तंत्रशाही- म्हणजे तंत्रज्ञान व व्यावसायिक तज्ञ यांना अतिरेकी महत्त्व देणे आणि व्यवहारवाद- म्हणजे तत्वनिष्ठा मूल्ये-विचारसरणी यांना फाटा देऊन व्यवहारात त्याची चलती आहे असे दिसते. त्यांचे व तसे राजकारण करणे असे विचार आज वर्चस्व गाजवत आहेत. यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी नैतिक पैलू हे जणू बिनमहत्वाचे असल्याचे भासवले जात आहे. सत्ताकारण महत्त्वाचे मानायचे. भांडवली पक्षांना व शक्तींना याचा नेहमी फायदा होतो. (अक्षरगाथा, एप्रिल- मे- जून,२०२३, पृष्ठ क्रमांक, १५) कवी अविनाश पाटील राजकारणातील घोटाळ्यांचा पर्दाफाश करताना म्हणतात, "सूर्यही चोरला त्यांनी अन् भुखंडाचेही घोटाळे झाले, साऱ्यांनीच चाखले पाणी, ज्यांनी राखली सत्तेचे तळे, जातीचे भांडवल गुंतवा जरा, हात करून घ्या आपले ओले, नागावले ज्यांनी आम्हाला आम्ही वाहतो त्यांना फुले". (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक,८५) सगळीकडे ढोंग आणि अपप्रवृत्ती, दाभिकता वाढली आहे. गोरे बरे म्हणण्याची पाळी आली आहे. असे विदारक दृश्य सगळीकडे पहावयास मिळते. सर्वत्र भ्रष्टाचार वाढला आहे. कास्तकरी, सर्वसामान्यांची स्वप्नांची रांगोळी झालेली आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रे धनदांडग्यांच्या स्थितीवाद्यांच्या, दांभिकांच्या हाती गेले आहेत. सगळीकडे भ्रमनिरास पसरला आहे. सत्ताधाऱ्यांना जातीचे, धर्माचे भांडवल करून आपले हात ओले करून घेतले. सर्वसामान्य समाजाची दिवसेंदिवस कोंडी होत आहे. सूर्य तर चोरला आणि भूखंडाचीही घोटाळे करून लोकशाही नागडी केली.

'पक्षांतर' या कवितेमध्ये विरोधी पक्ष नको, विरोधी शिक्षण नको, विरोधी इतिहास नको, विरोधी माणूस नको. अशा विरोधाचे कोणत्याही पातळीवरचे अस्तित्वच नष्ट करण्याचा फंडाच सुरू केला आहे. याचे चित्रण केले आहे. कवी अविनाश पाटील आजच्या राजकारणात कालपर्यंत विरोधी बाकावर बसून एकमेकांवर टीका करणारे पक्षांतर करून गळ्यात गळे घालून कसे फिरत आहेत. हे सध्याच्या राजकारणाला तंतोतंत लागू पडते. कवी म्हणतात, "आता त्यांच्या बॅनरवर विरोधकांचे चित्र, कालचे हे शत्रू आजचे नवे मित्र, बाबा, या लोकशाहीची ही तऱ्हा का विचित्र? या झाडावरून त्या झाडावर मारतात माकडा गत उडी, लोकशाही, तुझी काढतात खोडी, कालच्या आणाभाखा, निष्ठा वगैरे सारे काही व्यर्थ, जनसेवेच्या पडद्याआड लपलेला स्वतःचा स्वार्थ, त्यांनी बदलली टोपी, त्यात किती दडलेला अर्थ!" (अनवट वाटा, पृष्ठ क्रमांक,८६) सर्वाधिकारशाही म्हणजे लोकशाही ही एकाधिकारशाही म्हणजे हुकूमशाही होय. ती लोकशाही नसते. जिकडे सत्ता, खुर्ची तिकडे पुढारी पळतात. एका झाडावरून दुसऱ्या झाडावर माकडे उड्या मारतात. त्याप्रमाणे यांचे माकड चाळे चालतात. राजकारणात ना शत्रू, ना मित्र असतो. निष्ठा, अणाभाका हे सर्व त्यांच्यासाठी चिंचुक्याच्या खेळाप्रमाणे असते. लोकसेवेच्या पडद्याआड लपलेला स्वार्थ असतो. कोणत्या एका पक्षावर त्यांची निष्ठा नसते. सारेच विकाऊ असतात. पुढे कवी अविनाश पाटील 'जगण' या कवितेत म्हणतात,असेच नेते उजळमाथ्याने मिरवतात.

लुटून नेतात देशाची तिजोरी. त्यांची मुजोरी वाढते. स्वतःची प्रगती आणि विकास जनतेची मात्र अधोगती होते. असा सगळीकडे अंधार पसरला आहे; पण अंधाराला प्रकाश, चोरांना साव म्हणून दगडाच्याही पाया पडण्याची वेळ गरीब जनतेवर आली आहे .काही विकत घेतलेली माणसे त्यांच्या नावाचा उदो उदो करतात. अशा नेत्यांच्या तालावर भुंकतात. सत्ता त्यांच्याच घरी पाणी भरते. तेव्हा सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. शहाणा, विद्वान असला तरी सत्तेपुढे गाढव बनून वागावे लागते. मात्र कास्तकऱ्यांचे जगणे ठेचा श्वास चालत आहे. अशा अनवट वाटांनी जंगलातून काट्याकुट्यातून भटकत जीवन सर्वसामान्य कष्टकरी माणसाला जगावे लागते आणि जसे जग वागत आहे. त्याच प्रवाहाने वागण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो.

स्वातंत्र्यानंतरचा काळ हा भारावलेला, देश प्रेमाने ओथंबून वाहणारा होता. 'स्वातंत्र्यानंतर' या कवितेत कवी पाटील आपली व्यथा व्यक्त करताना सांगतात की, गावागावात आता खुद्दार यांच्या टोळ्या उदयास आल्या आहेत. यासाठी आम्ही छातीवर गोळ्या झेलल्या होत्या का? असा प्रश्न विचारतात. हळूहळू पुढे स्वातंत्र्य लोकांच्या अंगवळणी पडत गेले. राजकीय विचारधारा बदलत गेल्या. वैचारिक भूमिका बदलत गेल्या. राजकारणातील मूल्यात्मकता, विधायकता संपुष्टात येऊन धर्मांधता हा राजकारणाचा पाया बनला. आज भारतीय राजकारण धर्माच्या पायावर उभे राहिले आहे. आज संविधानाच्या माध्यमातून समता, स्वातंत्र्य, बंधुभाव आणि न्याय या मूलभूत तत्वांशी आपले नैतिक आणि कायदेशीर संबंध असूनही वास्तव मात्र वेगळे आहे. सत्ता परिवर्तनाचे सर्व रस्ते दुर्दैवाने एकाच पुलाखालून पुढे सरकतात. सब घोडे बारा टक्के अशी स्वातंत्र्यानंतरच्या राजकारणाची अवस्था आहे. प्रत्येकाला खुर्ची हवी आहे आणि मग सत्ता व मालमत्ता आपोआप वाढते. आपण जे स्वातंत्र्यासाठी रणांगणात बलिदान दिले ते विसरून गेलो होतो. आज वैचारिक आणि मानसिक संघर्ष मोठ्या प्रमाणात वाढत आहे. महापुरुष किंवा विविध धार्मिक, राजकीय प्रतिकांमुळे दंगली, हिंसा ही महाभयंकर गोष्ट आहे. राम राज्याची पाहिलेली स्वप्नं धुळीला मिळाले आहेत .आता रामातही राम उरला नाही. एवढेच काय आज रावणही उरला नाही. न्याय आता चावडीवरच होतो फिक्स. आता घरात वाजते रिमिक्स पाश्चात्त्याचे अंधानूकरण केले आहे. संस्कृतीच्या डोक्यावरून,खांद्यावरूनही पदर खाली आला. पुन्हा एकदा यउद्धइष्ठर द्युतात हरला आणि द्रौपदी आता पांडवाच्या सभेतील प्रत्येक बारमध्ये दिसत आहे. द्रोपदीचे वस्त्रहरण रोखण्यात श्रीकृष्ण मात्र एकविसाव्या शतकात राहिला नाही. धार्मिक, सामाजिक व राजकीय नेतृत्व हे समाजाच्या अध:पतनाला व समाजोत्कोर्षाला कारणीभूत ठरले आहे .कवी अविनाश पाटील यांची कविता जगण्याचा अर्थ विशद करते. देशाला स्वातंत्र्य मिळाले. स्वकीयांची राजवट सुरू झाली; परंतु सर्व सामान्य समाजाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीत २१ व्या शतकातही काहीच फरक पडला नाही. आज आजादी का अमृत महोत्सव जरी आपण साजरा केला . आपण आपलीच पाठ थोपटून घेत असलो तरी सामान्य शेतकरी, कष्टकरी, मजूर यांच्या अपेक्षा भंग पावल्या आहेत. माणुसकी चिरडली गेली. लोकशाहीचे वस्त्रहरण होताना दिसत आहे. देशाला भ्रष्टाचार व जातीयतेनी पोखरून खिळकीळ केले आहे .आज माणसाचे स्वातंत्र्य गुदमरल्यासारखे वाटते. लोकशाही धनदांडग्याची, राजकारण्यांची बटीक झाली आहे. आजची लोकशाही म्हणजे सत्ताभ्रष्ट गुंडगिरीचे राजकारण होय. खासगीकरण, जागतिकीकरणाने कास्तकऱ्यांच्या भवितव्याचे चित्र अंधुक करण्याची प्रक्रिया होऊ लागली आहे. समाजातील धगधगते वास्तव शोषणाच्या अन्याय व अत्याचाराच्या, गरिबीच्या, ढोंगबाजी, गुंडगिरी, भ्रष्टाचाराच्या ओझ्याखाली दबलेल्या माणसांचे दु:ख कवी अविनाश पाटील कलात्मकपणे मांडतात.

सारांश २१ व्या शतकात आपल्या देशातील सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ वेगाने बदलत आहेत. जागतिकीकरण, चंगळवाद, भोगवाद, माणसांमधील वाढत चाललेली आत्मकेंद्री प्रवृत्ती, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या वरवंट्याखाली सामाजिक वास्तव रक्तबंबाळ होत आहे. संपूर्ण समाज आज भोगवादी संस्कृतीच्या मागे धावू लागला आहे. या साऱ्या गोंधळात माणसातील माणूसपणात रया उरलेली नाही. अशा या समाजजीवनात माणूस माणसांचा वैरी बनत आहे. त्याचा कैवारी कोणी नाही. कवी अविनाश पाटील यांचे काव्यचिंतन वास्तव समाजाचे चित्र रेखाटणारे आहे. कवी अविनाश पाटील ग्रामीण भागातून आलेले असल्यामुळे त्यांची नाळ खेड्यातील कास्तकरी माणसाच्या दु:खाशी जुळलेली दिसते. कवी अविनाश पाटील यांच्या 'अनवट वाटा' या कवितासंग्रहातील कवितांमधून गरिबी, दारिद्र्य, दु:ख, जातीय विषमता, अन्याय, अत्याचार, सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, पातळीवरचे शोषण इत्यादी विषय आले आहेत. कवी पाटील यांच्या कवितेला सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक चळवळीची पार्श्वभूमी लाभली आहे. त्यांना शालेय जीवनापासून ते महाविद्यालयीन जीवनाच्या प्रवासात अनेक प्रकारचे कटू अनुभव आले. काही प्रश्न पडले; परंतु ते प्रश्न अनुत्तरीत राहिले. 'अनवट वाटा' कवितासंग्रहातील कविता ग्रामीण शब्दकळेत

व्यक्त झाल्या आहेत. शेतकऱ्यांची दु:स्थिती मांडणारा, जागतिकीकरण समजून देणारा, कास्तकऱ्याचे जगणे मांडणारा, शोषकांना धडा शिकविण्यासाठी प्रोत्साहित करणारा, ग्रामीण आणि शहरी सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ असलेला हा काव्यसंग्रह आहे. कवी अविनाश पाटील यांना आपल्या पूर्वपरंपरांचा अभिमान आहे. बदलते ग्रामीण जीवन, उद्ध्वस्त होत असलेले गाव, तेथील माणसांची दुष्काळ आणि दारिद्र्याने भंगलेली मने, त्यांच्या अंतःकरणातील दु:ख वेदना या सर्व बाबी कवी अविनाश पाटील यांनी मांडलेल्या आहेत. कास्तकऱ्यांचे प्रश्न त्यांच्या कवितेची ऊर्जा आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न कवीच्या मनाने थिजू दिला नाही. हीच या 'अनवट वाटा' कवितासंग्रहातील कवितांच्या अस्सलतेची आणि जिवंतपणाची नांदी आहे. आजच्या काळातल्या विसंगतीपूर्ण जगण्याला आणि आयुष्यातल्या ताणाला अधोरेखित कवी करत आहे. मानवी व्यवहाराला आणि नात्यागोत्यातल्या यांत्रिकतेलाही या कवीने समोर ठेवले आहे. आंतरिक लय सांभाळून लिहिलेली अत्यंत प्रतिकात्मक स्वरूपातली ही मांडणी कास्तकरी संस्कृतीची दुर्दशा मांडणारी आहे. कृषिसंस्कृतीला जागतिकीकरणाच्या, भांडवलदारांच्या कवेत घेऊ पाहणारी अराजकता आणि संस्कारीत करणारी बाह्यव्यवस्था हा देखील कवितेचा अभ्यासनीय विषय आहे. औद्योगीकरण किंवा शहरीकरण राजकारणातील शासकीय, निमशासकीय संस्था, निवडणुकामधील भ्रष्टाचार, एकूणच ग्रामीण भागातील विकासाच्या भावविश्वाला गिळंकृत करणारा आहे. कवी अविनाश पाटील यांच्या कवितेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या कवितेतून व्यक्त होणारी ग्रामसंवेदना शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या दु:खाचा उच्चार करणारी कविता आहे. सामाजिक संवेनशीलतेवरच प्रश्न निर्माण व्हावेत. अशी एकविसाव्या शतकातील परिस्थिती आहे. कवीकडे जी अनुभवाची शिदोरी आहे. त्या अनुभवातूनच त्यांची कविता साकार होते.

**संदर्भग्रंथ :-**

१) (संपा.) मा.मा. जाधव, 'अक्षरगाथा', बळीवंश प्रकाशन, नांदेड, एप्रिल-मे-जून,२०२३
२) अविनाश पाटील, 'अनवट वाटा', साहित्य अभिरुची प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, २०१६
३) शिवाजी नागरे, 'साहित्य आणि सामाजिक शास्त्रे अंत:संबंध', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१२
४ सुलभा दुसाने, 'मंगेश पाडगावकरांची कविता स्वरूप आणि अभिव्यक्ती', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०००
५) (संपा.) नागनाथ कोत्तापल्ले, 'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य', (प्रा. प्रल्हाद लुलेकर गौरव ग्रंथ), सायन पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २०१७
६) (संपा.), पी. विठ्ठल, 'विशाखा : एक परीशीलन', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००७
७) पी. विठ्ठल, 'मराठी कविता समकालीन परिदृश्य', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१९
८) (संपा.) भगवान काळे, 'इंद्रजीत भालेराव यांची कविता आकलन, आस्वाद आणि आक्षेप', साक्षात प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१३
९) के. जी. सोनकांबळे, 'मराठी दलित कविता आशय आणि अभिव्यक्ती', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००७
१०) (संपा.) नागोराव कुंभार, 'विचारशलाका', एप्रिल २०२२ ते मार्च २०२३

# फासेपारधी समाजाचे दु:ख उजागर करणारे आत्मकथन - "विंचवाचं तेल"

**प्रा. डॉ. राम धारासूरकर**
मराठी विभाग प्रमुख
शाहीर अण्णा भाऊ साठे महाविद्यालय,
मुखेड , जि. नांदेड -४३१ ७१५

फासेपारधी किंवा पारधी ही भटकी व गुन्हेगारी जमात म्हणून भारतात ओळखल्या जाते. महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागात गावकुसाबाहेर पाल ठोकून राहणारी ही जमात. वेद ,पुराण किंवा रामायणात 'विषाद' या नावाने ओळखली जाणारी, भटकी व शिकार करणारी जमात म्हणजे आजचे फासेपारधी. ससे धरणे, शिकार करणे हा मूळ व्यवसाय असलेली ही जमात आहे . या जमातीला वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळी नावे आहेत. मध्यप्रदेशात बहेलिया, धारवाडच्या भागात चितेवाले पारधी, महाराष्ट्रात फासेपारधी, विजापुरात आटवी संचार, वाघारी अशी नावे आहेत. याशिवाय मीर, कोसपर, वाधरी, मेवारी, कोरचर, पाल पारधी, राज पारधी, भिल्ल पारधी, लंगोटी पारधी, गाय पारधी, हरण पारधी अशा त्यांच्या उपजाती मानल्या जातात. पारधी ही भटकी जमात असल्यामुळे या जमातीला स्थिरत्व प्राप्त झालेले नाही. आजही शिकार करणे लुटमार करणे व स्वतःचा उदरनिर्वाह करणे असा शिक्का या जमातीवर बसलेला आहे .त्याचे मुख्य कारण म्हणजे ब्रिटिशांनी १८७३ सारी " रेगुल्लेटिंग ॲक्ट" मध्ये या जमातीला 'गुन्हेगारी' जमात म्हणून उल्लेख करून ठेवला आहे. तेव्हापासून ते आजपर्यंत ही जमात गुन्हेगारच म्हणून ओळखली जाते. भटक्या जमातीतील 198 जाती जमाती ब्रिटिशांच्या दृष्टिकोनातून गुन्हेगार ठरविण्यात आल्या. दुर्दैवाने आजही एकविसाव्या शतकात या सर्व जमातीचा उल्लेख गुन्हेगारी जमाती म्हणूनच केला जातो.

१९११ साली या गुन्हेगारी जमातीची जनगणना करण्यात आली त्यानुसार या गुन्हेगारी जमातीची देशातील संख्या तीन कोटीच्या आसपास होती. आता ही संख्या वाढल्याचे सांगितले जाते. पारधी ही जमात पितृसत्ताक पद्धतीची जमात आहे. दुसऱ्या जातीतील महिलेशी विवाह करणे या जमातीला मान्य नाही. बहुपत्नीत्वाची चाल या जमातीत रुढ आहे. विधवेला पुनर्विवाह करता येतो पण त्याचे नियम ठरलेले आहेत. जात पंचायतीचे प्राबल्य या जमातीत आहे. परपुरुषाने पारधी स्त्रीला स्पर्श केल्यास बाट मानला जातो. हा समाज लंगोटी घालणारा, ओबडधोबड दिसणारा आणि वागणारा समाज म्हणून ओळखला जातो.

**२१ शतक व पारधी समाज :**

ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाने 21व्या शतकात प्रचंड बदल घडवून आणले. अगदी काल-परवापर्यंत भारताचे चंद्रयान चंद्रावर जाऊन अभ्यास करून आले. शिकली सवरलेली माणसं प्रगती करतच राहिली परंतु पिढ्यान पिढ्या ज्यांच्या वाट्याला समाजाकडून लाथाडले केले जाणीवपूर्वक गाव कुसाबाहेर ठेवलं त्यांची सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रगती रोखण्यात आली अशा जमातीपैकी फासेपारधी ही जमात. वर्षानुवर्ष भटकंती करत राहणे पोटापाण्यासाठी लुटमार करणे अशी पारंपारिक वाटणी नशिबाला आलेली ही जात आहे. ब्रिटिशांनी गुन्हेगार म्हणून शिक्का मारल्यामुळे भारतीय समाज आजही या जमातीकडे गुन्हेगार म्हणूनच पाहतो ही वस्तुस्थिती आहे. शिक्षणाचा प्रचंड अभाव असल्यामुळे व बदनाम जमात म्हणून ओळखल्या गेल्यामुळे पिढ्यानपिढ्या या जमातीला कोणत्याच लोकांनी जवळ केले नाही. गावाच्या पोलीस पाटील तीन दिवसापेक्षा जास्त दिवस गावाच्या बाहेर पाल टाकू देत नाहीत. दिवसातून दोन वेळा पोलीस पाटलाच्या घरी हजेरी द्यावी लागे अशा जाचक अटी जुन्या काळात होत्या. आता थोड्या प्रमाणात बदल घडू लागले आहे. या जमातीची मुलं मुले शिक्षण घेत आहे पण हे प्रमाणात अत्यंत अल्प आहे कारण 'आज इथे तर उद्या तिथे' अशी अवस्था असल्यामुळे स्थिरपणा नाही. २१ व्या शतकात ही पोलिसांकडून अन्याय व अत्याचार त्यांच्यावर होत आहेतच ही जमातीची वस्तुस्थिती आहे.

विंचवाचं तेल :

पिढ्यान पिढ्याची गुन्हेगारी जमात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'पारधी' जमातीत जन्मलेल्या एका धडाडीच्या कार्यकर्तीचं हे आत्मकथन. वर्षानुवर्ष मागास, दुर्लक्षित असलेला समाज. पोलिसांच्या अत्याचाराला कायम बळी पडणारा पारधी समाज आणि अन्यायाला वाचा फोडणारी सुनीता भोसले. हे आत्मकथन वाचण्यास घेतले की माणूस सुन्न होऊन जातो. किती अफाट अत्याचार

या समाजावर झाले आहेत हे नव्यानेच कळते. वास्तवाचं झणझणीत अंजन घालणार हे आत्मकथन आहे. हे आत्मकथन जुन्या आठवणी सांगत सांगत सुरू होते. लहानपणी उकिरड्यावर टाकलेल्या उष्ट्या पत्रावळीतून बुंदी गोळा करणारी सात आठ वर्षाची सुनीता भोसले नावाची पोरं सोबत पाच वर्षाचा लहान भाऊ. तिथून हे आत्मकथन सुरू होते. आजही पारध्यांची मुलं भीक मागून खातात. उकिरड्यावर गोळा केलेली बंदी कुत्र्याने पळून गेली आणि चिमुरड्या मुलांच्या वाट्याला पुन्हा भूक सतावत राहिली. सुनीता भोसले यांच्या जिंदगानीचा संघर्ष मुळी त्या सव्वा महिन्याच्या होत्या तेव्हापासून सुरू झाला. वडील वारल्यानंतरही चुलत्या सोबत लग्न केले नाही म्हणून आजोबा खवळले. चार एकर प्रॉपर्टीच्या वादातून छोट्या चुलतीचा खून झाला. पारधी जमातीच्या जातपंचायतने हे प्रकरण फक्त सात हजारात मिटविले. खोट्या प्रतिष्ठेसाठी वाटेल तेवढा पैसा खर्च करायचा पण काम करून जगायचं नाही ही या जमातीची खासियत. नाव्हर्या गावाचा बाजार रविवारी भरायचा. बाजार उठून गेल्यावर पारध्यांची मुलं बाजारात टाकलेल्या भाज्या धान्य गोळा करायचे आणि घरी नेऊन भाजी करून खायचे. अत्यंत वाईट परिस्थितीतून अपार कष्ट करत लहानाची मोठी झालेली सुनीता आपल्या जीवनाचे सगळे श्रेय आपल्या आईला व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला देते. शाळा शिकत असताना रस्त्यात पाच दहा हॉटेल्स होत्या त्या हॉटेलवरचा कचरा स्वच्छ करून द्यायचा त्या बदल्यात हॉटेल मालक शिळी खिचडी, भजे, वडापाव, भाजी द्यायचा इतक्या वाईट परिस्थितीतून सुनीताताई शिकल्या सोबत भावाला पण त्यांनी शिकवले.

फासेपारधी म्हटले की पोलिसांसाठी सावजच असते. या जमातीला सगळ्यात जास्त त्रास पोलीस लोकांचा असतो. मारहाण करणे, पैसे मागणे हे नेहमीचे असते. कोणत्याही गावात चोरी किंवा दरोडा पडला की पहिल्यांदा फाशी पारधी वस्तीवर पोलीस येतात आणि विनाकारण लोकांना धरून नेल्या जाते. 396 कलम लावतात हे 396 कलम म्हणजे जबरी दरोडा व खून असतो. सुनीता ताईने सांगितलेल्या आत्मकथनात वारंवार कलमांची नावे येतात. हे आत्मकथन म्हणजे भोगलेल्या दुःखाचे जसे आठवतील तसे कवडसे आहेत.

स्वतःच्या गणगोत विषयी व पारधी समाजाच्या चालीरीती विषयी हे आत्मकथन प्रांजळपणे व्यक्त होत. पारधी समाजात एकत्र कुटुंब पद्धती नाही. लग्न झालं की वेगळा संसार थाटावा लागतो. स्त्रियांना या जमातीत अत्यंत हीन वागणूक दिली जाते. बाईच्या हाताचे नवरा सोडून इतर कोणीही खात नाही. रानगट अघोरी परंपरा या जमातीत पाळल्या जातात. पारधी समाजात नैसर्गिक मरणाचं प्रमाण फारच कमी आहे. पारधी जमातीतील बहुतेक पुरुषांचा मृत्यू पोलीस कोठडीत, पोलीसांच्या मारहाणीत होतो किंवा चोरीच्या आरोपावरून लोक त्याचा खून करतात. बरेच जण जाचाला कंटाळून विषारी औषध घेऊन मरतात तर काही आपापसातील वादामुळे खून तरी होतो आणि उरलेले व्यसनाधीन होऊन मरतात. पारधी समाजात चार चार लग्न केले जातात. शेळ्या पाळणे, गाई म्हशी पाळणे, मोलमजुरी करणे, शेती करणे अशी कामे आता हा समाज करू लागला आहे पण त्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

शाळेत शिकत असल्यापासूनच्या आठवणी सुनीताबाईंनी या आत्मकथनात सांगितल्या आहेत. सकाळी लवकर उठून घरोघरी जाऊन भीक मागायची नंतर शाळेत जायचे. अभ्यास मन लावून करायचे. एक ड्रेस पुन्हा पुन्हा धुवून घालायचा. कुणी पेन्सिल देत असे तर कोणी वह्या देत असत. बेंद्रे गुरुजींनी आम्हाला सुरुवातीपासून जीव लावला ही गोष्ट सुनीताताई आवर्जून सांगतात. पुढे चालून शाळा सुटली आणि सुनीताताई चळवळीत सामील झाल्या. एकनाथ आव्हाडांमुळे मी आंबेडकर चळवळीत आले आणि माझ्या जिंदगीत खूप परिवर्तन झाल्याचे त्या आठवणीने सांगतात. वयाच्या दहाव्या बाराव्या वर्षात त्यांनी चळवळीत सहभाग सुरू केला. 1995 साली मानवी हक्क अभियानाचे अधिवेशन नगरला होतं. या अधिवेशनात सुनीताताई सहभागी झाल्या आणि त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. राजेंद्र काळे या पारधी जमातीच्या कार्यकर्त्याची त्यांची ओळख झाली. एकनाथ आवाड, मनीषाताई तोकले, राजू काळे, आबा वाघमारे ,बापू जाधव, ॲडव्होकेट दिलीप घारे, नरसिंग भोसले, राजेंद्र जाधव हे कार्यकर्ते मंडळीची ओळख येथे झाली. अनेक गावाच्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्या धडाडीने मोर्चात सहभागी होत होत्या. पूर्वी भिकेसाठी हात पसरवणाऱ्या या मुलीच्या तोंडी आता या चळवळीमुळे 'जय भीम'चा नारा घुमू लागला. स्वतःचे आत्मभान त्यांना येथे मिळाले. घरात बाबासाहेबांचा फोटो लावला म्हणून पारधी समाजाने त्यांना जवळ केले नाही. परंतु आपला समाज आंबेडकर विचारामुळे सुधारू शकतो हे त्यांनी ओळखले आणि कामाचा सपाटा सुरू केला .गायरानावर अतिक्रमण केली. पारधी समाजाला स्वाभिमानाने जगता यावे म्हणून या बाईचा जीव आजही तुटतो. एकनाथ आवाडांच्या मार्गदर्शनाखाली मोर्चे, धरणे, आंदोलने, मेळावे या माध्यमातून काम चालू आहे. हे काम त्या अहोरात्र करत आलेल्या आहेत.

पारधी समाजात आजही अनेक वाईट झाली रिती आहेत. पोलीस केसमधून अनेक तरुण, पुरुष महिला मंडळींना सोडून आणणे ही तारेवरची कसरत असते, असे सुनीताताई म्हणतात. स्वातंत्र्य मिळवून ७५ वर्षे होत आहेत पण पारधी समाजाचा माणूस खुलेआमपणे समाजात फिरू शकत नाही. आजही खून दरोडा पडला की जवळच्या फाशी परद्यांना पोलीस उचलून नेतात. खोटे आरोप लावून लबाडले जाते, त्यांचे दाहक व अंगावर काटे आणणारे अनुभव लेखिकेने या पुस्तकात सांगितले आहेत.'विंचवाचं तेल' हा पोलीसांचा गुन्हा कबूल करून घ्यायचा जालीम उपाय आहे. एखाद्या आरोपीला खोट्या केसमध्ये अडकून त्याला मारून सुद्धा तो गुन्हा कबूल करत नसेल तर त्याच्या उरावर बसून उघड्या पायावर मारले जाते. इतकेच नव्हे तर त्याच्या गुप्तांगावर विंचवाचे तेल (सूर्यनारायण तेल) लावले जाते. त्यामुळे प्रचंड वेदना आणि अंगाची लाहीलाही होते. या वेदनांमुळे धायकुडीला येऊन न केलेला गुन्हा सुद्धा आरोपी कबूल करतो. त्यामुळेच आत्मकथनाला सुनीताताईंनी 'विंचवाचं तेल' हे नाव दिले आहे. पारधी समाजातील ८०% लोक निर्दोष असतात. पण पोलिसांच्या आघोरी अत्याचारामुळे गुन्हे कबूल करतात, हे वास्तव चित्र सुनीता ताईंनी बेडरपणे या आत्मकथनात मांडले आहे.

**पारधी: सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी :**

अत्यंत अशिक्षित समाज म्हणून पारधी समाज ओळखला जातो पालावर जीवन असल्यामुळे या जमातीला स्थिरत्व नाही. वाईट चालेरीतींना या जमातीत प्राधान्य दिलं जातं. विटाळ हा पारधी समाजासाठी शाप मानला आहे. अत्यंत रानटी व माणूसहीन प्रथा या समाजात आजही प्रचलित आहेत . पारधी बाया लुगडं किंवा साडी घरात ठेवत नाहीत तर प्रथेप्रमाणे घराच्या बाहेर त्या ठेवतात. न्हाणी घरात सुद्धा आंघोळ करण्याच्या चालीरीती आजही पाळल्या जातात. बाईच्या लघवीचा या समाजाला खूप बाट मानला जातो. बाईचं लग्न झालं व नवऱ्याबरोबर संबंध आला की तेव्हापासून ती समाजासाठी अस्पृश्य ठरली जाते. बाई बाळंत होताना इतर बायका तिच्या मदतीला धावून जात नाहीत, ही वस्तुस्थिती या पुस्तकात आली आहे. या एका घटनेवरून लक्षात येते की किती चालीरीती, रिवाज या समाजात आजही रुढ व खोलवर रुजले गेलेले आहेत.

या जमातीत जात पंचायतचा प्रभाव मानला जातो. काळानुसार त्यात परिवर्तन होणे गरजेचे आहे. अत्यंत मागास, मध्ययुगीन काळात जगणारा, प्रचंड अज्ञान व अंधश्रद्धा असलेला हा समाज आहे. आणि त्यात गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यामुळे इतर समाजापासूनही तो कोसो दूर राहिलेला आहे. अशा समाजात गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने बदल झाला पाहिजे अशी धडपड करणाऱ्या सुनीताताई भोसले अविरत कष्ट करत आहेत. आता कुठे हा समाज बदल स्वीकारतो आहे. मुलांना शाळेत पाठवत आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक पाठिंबा त्या समाजाला मिळत नसल्याची खंत ही अनेकदा भोसले ताईंनी बोलून दाखवली आहे. या जमातीतील लोकांना रेशन कार्ड, ओळखपत्र, सातबारे मिळत नाहीत. त्यासाठी सुनिता ताई भोसले यांनी "क्रांती" नावाची संस्था उभी केली आहे. या माध्यमातून त्या दीनदुबळ्या समाजाची सेवा करत आहेत. अफाट आणि अचाट कार्य करणाऱ्या या स्त्रीला मानाचा मुजरा.एकविसाव्या शतकातील पारधी समाजाचं दु:ख व्यक्त करणारं हे आत्मकथन सुन्न करणार आहे. आत्मकथनात बऱ्याच ठिकाणी प्रसंगाची पुनरावृत्ती झालेली दिसते. वेळ प्रसंगानुसार सह लेखक प्रशांत रूपवते यांनी पारधी समाज आणि सध्याची वस्तुस्थिती याच्यावरही भाष्य केले आहे. या आत्मकथनाला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भाषा तज्ञ डॉ .गणेश देवी यांनी प्रस्तावना दिली आहे. प्रत्येक वाचकाने पारधी समाजातील दु:ख या आत्मकथनातून जाणून घ्यावे. पारध्यांच्या संघर्षमय जिंदगीचे वेदनामय दु:ख व्यक्त करणारे हे आत्मकथन अचाट आणि अफाटच आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१. विमुक्तायन - लक्ष्मण माने
२. भटक्या विमुक्त जाती - खंड १ ते ४ - रामनाथ चव्हाण
३. गावगाड्याबाहेर - प्रभाकर मांडे
४.उपलानी- भीमराव चव्हाण
५. विश्वकोश,खंड१७ वा - लक्ष्मणशास्त्री जोशी

# २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**प्रा.डॉ. अनिल एस. कांबळे**
(मराठी विभाग प्रमुख)
श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा

**प्रस्तावना:**

कादंबरी हा वाड्मय प्रकार इंग्रजी राजवटीत उदयास आला असला तरी त्यात असलेले कथाबीज मानवी मनास पूर्वीपासूनच ज्ञात होते. हे कथाबीज मौखिक व लिखित स्वरुपात परंपरेने चालत आले आहे. कथात्मक वाड्मय प्रकारची जडण घडण आणि विकास होत असताना काही प्रवृत्ती स्थिरावल्या आणि त्याचा प्रभाव पुढील लेखनावर होत राहिला.

कादंबरी हा शब्द मराठीत कल्पित कथा व कहाणी या अर्थाने १८४१ साली जॉन बनियनच्या 'पिलीग्रीम्स प्रोग्रेस' या रूपक कथेचे हरी केशवजी यांनी केलेले भाषांतर परंतु १८७२ साली मध्ये का.बा. मराठे यांनी 'नावल' शब्द सुचविला. तो 'नॉव्हेल' या इंग्रजी शब्दावरून मराठीत आला आहे. नॉव्हेल म्हणजे चमत्कारिक अद्भुत असे ते 'नवल', नावल अथवा नॉव्हेल शब्दात नाविन्याची प्रमुख छटा आहे. प्रदीर्घ काल्पनिक गद्य राग विकाराची दर्शन असणारी कादंबरी इंग्रजी राजवटीतच सुरु झाली हे इंग्रजी शिक्षणाच्या बरोबर येथे महाराष्ट्रात नवीन प्रकारच्या वाड्मयाची सुरुवात होत गेली.

मराठी भाषेची खरी सुरुवात इंग्रजी, पारसी, अरबी भाषेच्या भाषांतराने झाली असली तरी चटकदार भाषांतराच्या पार्श्वभूमीवर मराठीत प्रथमच श्रृंगार कथा, निर्माण झालेल्या दिसतात. या विषयी प्र.न.जोशी म्हणतात "चिंतामणी दीक्षित जोशी यांची विद्ग्ध स्त्री चरित्र (१८७१) नावाची कादंबरी श्रृंगार कथा-क्रीडाणी भरलेली आहे. याचं काळातील अद्भुत रम्य व कल्पना प्रधान कादंबऱ्यांचे पीक वाढवणारी लक्ष्मण शास्त्री हळवे यांची १८६१ (मुकमाला) आणि रा.भी. गुंजीकर यांची १८७१ ( मोचनगड) ह्या कादंबऱ्या मराठीत आल्याचे दिसून येतात.

अदभूतरम्य श्रृंगारप्रधान कल्पनाप्रचुर वाटचालीतून सामाजिक वास्तवाला स्पर्श करणारी मराठीतील पहिली कादंबरी 'यमुना पर्यटन' (१८५७) बाबा पद्.मजी यांनी लिहून सामाजिक कादंबरीला सुरुवात केली. याचं काळात म.वि. रहाळकर यांनी लिहिलेल्या 'नारायण व गोदावरी'(१८८४) या कादंबऱ्यात सामाजिक आशय आलेला आहे. वास्तावाभिमुख चित्रणाचा जो मार्ग दाखवून दिला याच मार्गाने हरी नारायण आपटे यांनी कादंबरी लेखन केलेले आहे. वा.म. जोशी यांनी तत्वचिंतनात्मक व व्यक्तिप्रधान कादंबऱ्या लिहून मराठी कादंबरीस नवे वळण दिले तर श्री व्यंकटेश केतकर यांनी कौटुंबिक विचार प्रवर्तक कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

कोणत्याही भाषेतील साहित्यातून येणारी कादंबरी हा सामाजिक दस्त ऐवज असतो. परिवर्तनाच्या नोंदी समकालीन कादंबरीतून दृष्टीगोचर होत असते. इतर वाड्मय प्रकारापेक्षा कादंबरीत आलेले समाजवास्तव जास्त प्रतिबिंबित असते. त्यामुळे देशातील सांस्कृतिक, पर्यावरण स्थिती, गती, प्रगती आणि मूल्यऱ्हास यांचे प्रकटन कादंबरी याच वाड्मय प्रकारातून जास्त प्रभावीपणे दाखवू शकतो.

मानवी जीवनाच्या विकसनात आणि त्यांच्या वाटचालीत साहित्याचा वाटा फारच महत्वाचा आहे. मानवी आयुष्यात प्रतिबिंबित होणारी संस्कृती ही अनेक संस्थात्मक उभारणीतून न्याहाळता येते. या संदर्भात केशव मेश्राम म्हणतात, "आपली भारतीय मने विविक्षित तऱ्हेने पिढ्यानपिढ्या शतकापासून आखीव सीमित मुशीतूनच घडवली गेली आहेत. त्यामुळे आपल्या धर्मबद्ध, वर्णबद्ध, जातीबद्ध मनाला परिवर्तन प्रक्रिया जास्त त्रासदायक आणि नकोशी वाटते. साहित्य हे परिवर्तन माध्यम म्हणूनही काम करते"

समाजात सतत काही ना काही घडामोडी घडत असतात. या घडामोडींना गती देणारी अनेक शक्ती केंद्र समजताच कार्यरत असतात. त्यातूनच राजकारण आणि आर्थिक घडामोडींचा लक्षणीय प्रभाव समाजावर पडत असतो. साहित्यिक समाजाचा घटक असल्यामुळे त्यांच्या संवेदना त्या प्रभावानेच कार्यरत होतात. तसेच साहित्याचे माध्यम जी भाषा तिच एक सामाजिक संस्था असल्याने समाज आणि साहित्य यांचा अतूट संबंध अपरीहार्यतेणे प्रस्थापित होतो.

मानवी मनातील अभिव्यक्त होऊ पाहणारी स्पंदने कधी प्रत्यक्ष संवादाच्या तर कधी सांकेतिक चिन्हांचा आधार घेत असतात. या संदर्भात डॉ. सुरेश पैठणकर म्हणतात, " मनुष्य संवेदना भावना विचार किंवा तत्वज्ञान कोणत्याही भाषेच्या आधारे चिंता प्रकटू शकत नाही" तर डॉ. भालचंद्र नेमाडे म्हणतात," खास मानवी अशी संदेशवहनाची व्यवस्था म्हणजे भाषा होय" म्हणून भाषेला अनन्यसाधारण महत्व आहे.

साहित्य समाज आणि सांस्कृतिक पर्यावरण यांचा संबंध स्पष्ट करताना प्रा. कुसुमावती देशपांडे म्हणतात,"कोणतेही कलाकृती आकाशस्थ खपुष्पासारखी नसते. तिच्या निर्मितीत इथल्या भूमीचा स्पर्श झालेला असतो. इथले समाजवास्तव, सामाजिक स्थितीगती, इथल्या परंपरा आणि स्त्री इथले सांस्कृतिक पर्यावरण त्यातून साकार झालेले लेखकाचे व्यक्तिमत्व इथली वाड्मय परंपरा लेखकाची जडणघडण झाली. ते वातावरण त्यातून जन्मास आलेला त्याचा जीवनविषयक दृष्टीकोन इथले सामाजिक संघर्ष, इथल्या सामाजिक आणि वाड्मय चळवळी पूर्व सुरीणी निर्माण केलेले साहित्य इथल्या समाजाची अभिरुची, ग्रंथ प्रकाशन आणि प्रसिद्धीची माध्यमे यावर असलेली हुकुमत आणि इथल्या धर्माने जाती व्यवस्थेने शिक्षण आणि लेखन यावर घातलेली स्वार्थमूलक बंधने या साऱ्यांचा झालेला कलात्मक परिणाम म्हणजे साहित्य निर्मिती होय"

साहित्य हे समाजजीवनाचे अंग मानले जाते. साहित्याला सामाजिक परिस्थितून आशयदृश्य मिळत असते. समाजातील समकालीन समाजवास्तव साहित्यातून अभिव्यक्त होत असते. सामाजिक वास्तव आशय सशक्तपणे अभिव्यक्त करण्यासाठी लेखकाकडे प्रगल्भ सामाजिक दृष्टीकोनाची आवश्यकता असते. या संदर्भात डॉ. मोहिते गणेश म्हणतात, "दृष्टीकोन प्राप्त होण्यासाठी समाजाचे सखोल आकलन, चिंतन, समाजकारण, अर्थकारण, राजकारण यांना समजावून घेण्याची दृष्टी लेखकांकडे असणे महत्वाचे ठरते" या चळवळीचा साहित्यावर परिणाम होत असतो. या चळवळीतून जीवनाचा नवा अन्वयार्थ व्यापणारे साहित्य निर्माण होत असते. शोषणमुक्त समाजव्यवस्थेचा ध्यास घेतलेल्या या चळवळी कलावंतांची दृष्टी व्यापक करतात. धर्म वर्णव्यवस्था, पंथ विषमता आणि शोषण यांच्याकडे पाहण्याची नवी दृष्टी लेखकांना प्राप्त करून देतात. सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक घटकांच्या सरमिसळीतून समाजवास्तव आकारास येते.

व्यक्तींचा समूह म्हणजे समाज या समाजात राहणाऱ्या व्यक्तींना अनेक प्रश्न भेडसावत असतात. समाजाच्या धारणा मूल्य संकल्पना विविध प्रश्न विविध जाती जमाती त्यातून उद्भवणारे ताण—तणाव जगण्याच्या विविधरिती, विविध प्रदेश, विशिष्ट भाषिक समाजाची संस्कृती त्या मानवी समूहांच्या आकांक्षा व्यक्तींची मानसिक आत्मिक स्थिती समूहाचे जगणे त्यातले सदभाव दुख: या सर्व घटकांच्या रसमिसळीतूनच लेखक साहित्य निर्मिती करत असतो. म्हणून साहित्य निर्मितीत सांस्कृतिक घटक महत्वाची भूमिका बजावतो. लेखक हा समाजाचा एक घटक असल्याकारणाने व या सामाजिक पर्यावरणातच त्याचा पिंड तयार होतो. व्यक्तींच्या भोवती असणाऱ्या वास्तवाचा गुंता त्याला अस्वस्थ करतो. आणि हा गुंता जेव्हा भाषिक अभिव्यक्तीतून प्रकट करतो. तेव्हा त्यास कलात्मक मूल्य प्राप्त होते. हा अनुभव व्यक करण्यासाठी लेखकाला विस्तुत भाषिक अवकाश असणारा कादंबरी वाड्मय प्रकार अधिक जवळचा वाटतो.

कादंबरी या वाड्मय प्रकारची संकल्पना विकसित होत जाऊन तिला काही घाट प्राप्त होत गेला. हा घाट सतत बदलत राहिला. प्रारंभीची कादंबरी अदभूत, श्रृंगार अनुवादित होती. तर हरिभाऊ यांची कादंबरी समाजभिमुख राहिली. हरिभाऊच्या नंतर फडके, खांडेकर,साने गुरुजी, माडगुळकर, भाऊ पाध्ये यांच्या लेखानुतून ती बदलत गेल्याची स्पष्ट लक्षात येते. स्वातंत्र्यपूर्व काळातील कादंबरी करमणूक प्रधान होती तर १९४७ ते १९६० हा कालखंड मराठी कादंबरीच्या संदर्भात अत्यंत महत्वाचा होता. १९४७ ला भारत स्वातंत्र्य झाल्यामुळे लोकांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. परंतु समाजाच्या पदरी निराशाच पडली. देशाच्या विकासासाठी सहकाराचे धोरण स्वीकारले गेले परंतु त्यालाही स्वाहाकाराचे ग्रहण लागले. तळागाळापर्यंत शिक्षणाचा प्रसार व्हावा या उद्दात हेतूने स्थापन झालेल्या शिक्षण संस्थांनी शिक्षणाचा बाजार मांडला. जनकल्याणाच्या विकासासाठी सरकारी योजना तयार झाल्या परंतु भ्रष्ट शासन यंत्रणा आणि राज्यकर्त्यांमुळे त्यांचा लाभ समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहचला नाही. भारताने मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारली. १९९२ च्या खुल्या आर्थिक धोरणाने जागतिकीकरणाला प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे खाजगीकरण आले. त्यामुळे समाजात चांगला वाईट परिणाम दिसू लागला. याच काळात इंटरनेट , मोबाईल,डिजिटल प्रसार माध्यमामुळे समाज बदलून गेला. आहार-पोशाख,जीवनशैली यात मोठ्या प्रमाणात बदल झाला. या बदलाचे प्रभाव लेखकावर होऊन तो बदल कादंबरीतून मांडला गेला.

१९६० नंतर सामाजिक,राजकीय,सांस्कृतिक बाबतीत मोठे बदल घडून आले. भारतीय राजकारणात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. धार्मिक शक्तीचा उदय झाला. १९७२ साली महाराष्ट्रात पडलेला दुष्काळ हे मोठे स्थित्यंतर आहे. दुष्काळामुळे कृषी केंद्रित लोकसमूहाला मोठा हादरा बसला. देशात आणीबाणी लागू झाली. त्यामुळे महाराष्ट्रात राजकीय उलथापालथ झाली. मुळच्या पक्षात अनेक गट तट निर्माण झाले आणि नवे प्रादेशिक पक्ष उदयाला आले. सहकारी साखर कारखाने, पंचायती, सोसायट्या, सूतगिरण्या, सहकारी बँका, ग्रामविकासाला पूरक ठरणाऱ्या सहकार संस्थेतून बेरीज—वजाबाकीचे सत्ता संघर्षाचे राजकारण सुरु झाले. त्यातून भ्रष्टाचाराला वाव मिळाला. राजकीय नितीमत्ता संपली आणि सामाजिक परिवर्तनास खीळ बसली. आलुतेदार, बलुतेदार, दलित आणि ग्रामीण समाजच या घटनेचे भक्ष बनले.

१९८०-८२ च्या दरम्यान विनाअनुदान तत्वावर भरमसाठ महाविद्यालयाला मान्यता देण्यात आली. यांत्रिकी,अभियांत्रिकी, वैद्यकीय, कला, वाणिज्य महाविद्यालयातून शिक्षणाच्या सोई सामान्य माणसापर्यंत पोहोचल्या. त्यामुळे सामन्यातील सामान्य मुलं डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्राध्यापक झाली. परंतु दुसरीकडे विनाअनुदान प्रयोगातून शिक्षणाचा व्यापार सुरु झाला. अनेक शिक्षण महर्षी उदयाला आले. त्यामुळे गुणात्मक शिक्षणाला बगल देवून बाजारीकरणाला महत्व आलं. जनकल्याणाच्या विकासासाठी सरकारी योजना तयार झाल्या. परंतु भ्रष्ट शासनयंत्रणा आणि राज्यकर्त्यामुळे त्यांचा लाभ समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत पोहोचला नाही. दलित, गरीब, आदिवासी, निरक्षर, स्त्रिया, प्रकल्पग्रस्त, धरणग्रस्तांचे प्रश्न जशेच्या तसे राहिले त्यामुळे समाजात अस्वस्थता निर्माण झाली. ही अस्वस्थता १९६० नंतरच्या कादंबरीकारांनी आपल्या लेखनातून अभिव्यक्त केलेली आहे.

एकंदरीत महाराष्ट्रीय समाजजीवनातील विविधांगी समाजवास्तवाला मराठी कादंबरीने प्रथगात्मकरित्या अधोरेखित केले आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ:**


१. साहित्य — संकृती मंथन, प्रा.केशव मेश्राम, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद प्र.आ. २००४
२. साहित्य समाज संस्कृती- डॉ.सुरेश पैठणकर,चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.२०१७
३. साहित्याचा अन्वयार्थ, नागनाथ कोतापल्ले,स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९६
४. समकालीन मराठी कादंबरी, डॉ. गणेश मोहिते, जनशक्ती वाचक, चळवळ प्र.आ. २०१३


Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# मराठवाड्यातील नवबौद्धांच्या वेदनांची वास्तव अभिव्यक्ती : बहिष्कार

**डॉ. शिंदे दुष्यंत आनंदराव,**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभागप्रमुख,
आझाद महाविद्यालय, औसा,
ता. औसा, जि. लातूर.

स्वातंत्र्यानंतर कायद्याने दलितांना सर्व अधिकार प्राप्त झाले असले तरी प्रत्यक्ष समाज जीवनात समानतेचे अधिकार मिळाले नव्हते. त्यासाठी सतत संघर्ष करावा लागला आहे. अशा संघर्षातून दलित शिक्षित तरुणांनी लिहिण्यास सुरुवात केली. साठोत्तरी दलित साहित्यातील महत्त्वाचे कथाकार, कादंबरीकार, समीक्षक, नाटककार, बाल कुमार साहित्यिक म्हणून योगीराज वाघमारे सर्व परिचित आहेत. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर शिक्षणाची दारे बहुजनांसाठी खुली झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र प्राणपणाने जपलेल्या पिढीने आपल्या मुलांना शाळेत घालण्यासाठी नेटाने प्रयत्न केले. गावगाड्याशी झुंज दिली. त्यातही काहींनी धर्मांतर करून स्वतःचा वेगळा मार्ग धुंडाळला. मुळातच अस्पृश्य त्यात नव्याने बौध्द झाल्यामुळे समाजातील बहिष्कार अधिकच तीव्र झाला. या अशा वातावरणाचा अनुकूल, प्रतिकूल परिणाम योगीराज वाघमारे यांच्या सर्जनशील मनावर फार खोलवर झाला. शिक्षणाच्या वाटेवर अग्रेसर झालेली दलित पिढी जुन्या नव्या विचारांच्या वावटळीत हेलकावे खात राहिली. काही सुशिक्षित शहरात गेले ते कायमचे. काहींनी आपला समाज, आपले घर सुधारण्याचे कार्य निष्ठेने केले. एकूण योगीराज वाघमारे एका सबंध पिढीचे साक्षीदार आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरत नाही. भालचंद्र फडके यांनी म्हटल्याप्रमाणे, "दलित कथा लेखकांच्या नव्या पिढीत योगीराज वाघमारे एक समर्थ कथालेखक आहेत,"[1] हे मान्य करावे लागते. दलित साहित्याने समकालीन समस्या मांडताना वास्तवाचे भान जपले आहे. विशेषतः मराठवाड्यातील नव बौद्धांच्या वास्तव वेदनांचे वस्तुनिष्ठ चित्रण त्यांनी 'बहिष्कार' या कथासंग्रहात केले आहे. पुढीलप्रमाणे ते समजून घेऊ.

**गृहितके -**

1. योगीराज वाघमारे हे मराठवाड्यातील समकालीन वास्तव सशक्तपणे मांडणारे महत्त्वाचे दलीत कथाकार आहेत.
2. साठोत्तरी मराठवाड्यातील शहरी व ग्रामीण दलीत जीवन त्यांच्या कथेचा केंद्रबिंदू आहे.
3. 'बहिष्कार' कथासंग्रहात त्यांनी नवबौद्धांच्या जगण्यातील वेदना अभिव्यक्त केल्या आहेत.

**उद्दिष्टे -**

1. योगीराज वाघमारे यांच्या कथेतील चित्रित मराठवाड्यातील नवबौद्ध समाजाचे वास्तव जगणे अभ्यासणे.
2. 'बहिष्कार' कथासंग्रहातील आशय आणि अभिव्यक्ती विशेष अभ्यासणे.
3. नवबौद्धांचे प्रत्यक्ष समाज जीवनातील स्थान व स्थिती समजून घेणे.

**अ) परिचय -**

दलित साहित्यातील शिलेदार योगीराज देवराव वाघमारे ज्येष्ठ दलित कथाकार, कादंबरीकार, नाटककार, बालसाहित्यकार म्हणून सर्वपरिचित आहेत. त्यांचा जन्म 1 ऑक्टोबर 1943 रोजी येरमाळा, ता. कळंब, जि. उस्मानाबाद येथे झाला. त्यांचे बालपण अत्यंत हलाखीत गेले. पुढे 1983 मध्ये ते महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाले. 2001 मध्ये जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी या पदावरून ते निवृत्त झाले. अधिकारी पदावर काम करूनही त्यांनी साहित्याच्या क्षेत्रात स्वतःचा स्वतंत्र ठसा उमटविला आहे. त्यांनी कादंबरी, कविता, एकांकिका, बालसाहित्य या प्रकारात विपुल लेखन केले आहे. त्यांच्या एकूण

लेखनातील 'कथा' हा केंद्रवर्ती भाग आहे. विद्यार्थी दशेपासून त्यांनी आपल्या कथा लेखनास सुरुवात केली आहे. दलितांच्या वास्तव वेदना ते आपल्या साहित्यातून मांडतात.

**ब) योगीराज वाघमारे यांचे लेखन :**

मराठवाड्यातील अत्यंत महत्त्वाचे आणि तितकेच वाचनीय लेखक म्हणून योगीराज वाघमारे परिचित आहेत. त्यांनी लेखन केले आहे. मराठवाड्यातील दलित आणि ग्रामीण जीवन त्यांच्या लेखनातून वैशिष्ट्यांसह अनुभवास येतं.

**अ) कथासंग्रह –** उद्रेक (१९७८), बेगड (१९८०), गुडदाणी (१९८३), होरपळ (२००८), बहिष्कार (२००८) नियत (२०१९)

**ब) कादंबरी –** सभापती (१९९०), शिक्षणनामा (२०००), धुराळा (२००५), पडझड (२००५), भीमयुग (२००९), आधार (२०१२), आक्रंदन (२०१२ ), शाळेचे दिवस (२०१३ ), रातआंधळे (२०१३ ), गहिवर (२०१९)

**क) एकांकिका –** मृतात्मे (१९७४),अगा जे घडलेची नाही (१९७४), बारव (२०००), मध्यस्थ (२०१०)

**ख) बालकुमार साहित्य –** आंब्याचे झाड (१९९१), शूरवीरांचे माहेर (१९९८), आभाळमाया (२०००), हमीद आणि इतर कथा (२०००), पिंपळपान (२००३), श्रामणेर (२००९), रमाई (२०१५), तुकाराम आणि त्याचे मित्र (२०१६), घुसमट (२०१६), ज्योतीसावित्री (२०१९)

**ग) संपादित ग्रंथ –** धम्मक्रांती (२००८), बाबासाहेबांचे शिलेदार (२०१३),सोलापुरी कथा (२०१६) याचबरोबर त्यांनी काही कविताही लिहिल्या आहेत.

योगीराज वाघमारे यांच्या साहित्यकृतीची यादी पाहिली तरी त्यांच्या लेखन सामर्थ्याची सहज कल्पना येते. त्यांचे लेखन केवळ संख्यात्मक दृष्ट्याच महत्त्वाचे नाही तर गुणात्मक दृष्ट्याही महत्त्वपूर्ण आहे. विशेषत्वाने मराठवाड्यातील दलितांचे जिणे त्यांनी आपल्या साहित्यातून चित्रित केले आहे. पुढीलप्रमाणे 'बहिष्कार' या कथासंग्रहातून चित्रित झालेल्या नव बौद्धांच्या विविध वेदनांचे अध्ययन करू.

**क) बहिष्कार : नवबौद्धांच्या वेदना चित्रित करणारा कथासंग्रह -**

योगीराज वाघमारे यांनी आपल्या लेखनातून दलित समाजातील विविध जीवनानुभव मांडले आहेत. 'बहिष्कार' हा त्यांचा पाचवा कथासंग्रह ज्यात नवबौद्धांच्या वाट्याला आलेले जिणे त्यांनी वस्तुनिष्ठपणे चित्रित केले आहे. त्यांचे लेखन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या समाजक्रांतीतून उदयास आलेल्या नव्या बंडखोर पिढीचे चित्रण करते. बौध्द तत्वज्ञानाची प्रभावी मांडणी आंबेडकरी चळवळीतील दलित कार्यकर्त्यांच्या शोकात्मक वेदना मांडल्या आहेत. थोडक्यात योगीराज वाघमारे यांच्या लेखनातून अस्मिता, स्वाभिमान, स्वावलंबन आणि स्व-उध्दार, संघर्ष, समता आदी मूलभूत विषय हाताळले आहेत.

हा काळ कायद्याने दलित समाजाला आरक्षणाच्या माध्यमातून राजकीय प्रतिनिधित्व दिलेला कालखंड होता. असे असले तरी प्रस्थापित उच्चवर्गीय राजकारणी दलितांना तो हक्क वापरू देत नसत. त्यांच्यावर हरतऱ्हेने बहिष्कार टाकला जाई. "वडगावच्या बौद्धांवर गावकऱ्यांनी बहिष्कार टाकला. त्यांचं गावात येणं बंद केलं. शेतात फिरणं बंद केलं. रोजी रोजगार तोडला. कामधाम बंद. दुकानाचा मालठाल बंद. गिरणीवर दळण नाही. गुराढोरांना शेतात यायला बंदी. असे एक नाही की दोन नाही दहा दिवस झाले. बौद्ध लोक हवालदिल झाले."[2] 'बहिष्कार' कथेतील वरील चित्रण नवबौद्धांना गावकऱ्यांकडून होणाऱ्या त्रासाचे वास्तव कथन करते. नव्याने राजकीय स्वातंत्र्य मिळालेल्या दलितांना हा अधिकार मिळविण्यासाठी खूप संघर्ष करावा लागला आहे.

शिक्षण हा दलित तसेच बहुजनांच्या उन्नतीचा एकमेव मार्ग आहे. 1960 नंतर शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार खेड्यातही झाला. परिणामी ग्रामीण भागातील सर्व थरातील पहिल्या पिढीतील मुले शिक्षणाच्या प्रवाहात आली. असे असले तरी शैक्षणिक क्षेत्रातील अनिष्ठ वृत्ती लपून राहिली नाही. दलित मुलांना शिक्षण घेताना खूप संकटांना सामोरे जावे लागले. 'मरगळ' कथेतील नायक अशोक बौध्दवाड्यातील अतिशय हुशार मुलगा. औरंगाबाद विद्यापीठाच्या नामांतर लढ्यात तो सहभागी होतो. "औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव द्यावं म्हणून साऱ्या भारतातून लाँग मार्च निघाला

होता."[3] नामांतर हा दलितांच्या अस्मिता आणि जिव्हाळ्याचा विषय होता. नवीन पिढी शिकली आणि त्यांना आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली. अशोक हा अशा असंख्य तरुणांचा प्रतिनिधी आहे.

योगीराज वाघमारे यांनी आपल्या लेखनातून दारिद्य, गरिबीचे चित्रण केले आहे. "गरिबीनं अन लेकरांच्या त्रासानं ती वैतागून गेली होती. नवऱ्याला कुठे काम लागत नव्हतं. आणि लागलंच तर प्रपंचाला पुरत नव्हतं. सदा हाय हाय... नाय नाय व्हायचं. डोक्यात किड पडल्यागत व्हायचं. दुबळकी म्हणतेत ती मालनकडे बघून खरी वाटावी. ज्या घरात खायला तुकडा मिळू नये तिथं लेकरांचा उताडा. वर्ष दीड वर्षाला पाळणा हालायचा."[4] वरील 'दुकान' या कथेत नवबौद्ध स्त्रीच्या असंख्य अडचणींचे प्रातिनिधिक चित्रण योगीराज वाघमारे यांनी केले आहे.

दलित समाजातील शिक्षित मुले आपल्याच जाती बांधवापासून दूर गेले. शिक्षित तरुणांचे तुटलेपण ही नवबौद्धांची मोठीच समस्या होती. कमी अधिक स्वरूपात ती आजही आहे. संविधानाने शिक्षणाचे अधिकार प्राप्त झाले. तरुण पिढी शिकली, सुधारली, शहरात नोकरी व्यवसायासाठी गेली. शहरी वातावरणाला सरावलेल्या तरुणांना गावातील लोक, गावातील राहणीमान आवडेनासे झाले. योगीराज वाघमारे यांनी प्रातिनिधिक रूपात वरील वास्तवाचे चित्र रेखाटले आहे. "काकाचे वय झालेलं बाहेरगावी जायची धकधक सहन होईल गुडघे दुखू लागायचे दम्यान जोर धरला मग एका जागी बसणं व्हायचं पेन्शन वर सगळा खर्च भागविला जायचा थोरल्या मुलाची बदली झाल्याचं नाव झाले पोटापाण्याची आभाळ होते म्हणून बायको पोरांना घेऊन गेला आपल्या पोराबाळात आणि नोकरीत दंग झाला"[5] सुजाता लग्नाला आलेली तरुणी पण मोठ्या भावाचे तिच्याकडे लक्ष नसल्यामुळे तिचे विवाहाचे वय कधीच उलटून गेले आहे. तिचा भाऊ घर दार सोडून आपल्याच संसारात रममाण झाला, परिणामी कुटुंबाची जबाबदारी सुजातावर येऊन पडते. अशा कितीतरी तरुणी आपल्या आसपास आहेत, हे वास्तव योगीराज वाघमारे यांच्या नजरेतून सुटले नाही.

ग्रामीण परिसरातील समाजजीवन, चालीरीती, दलित-दलितेतर माणसांचे विविधांगी चित्रण हे योगीराज वाघमारे यांच्या लेखनाचे वैशिष्ट राहिले आहे. त्यांनी आपल्या साहित्यातील विविध व्यक्तिरेखामधून मराठवाड्यातील ग्रामीण जीवनाचे प्रत्ययकारी चित्र रेखाटले आहे. एकूण शहर आणि ग्रामीण जीवनातील नव बौद्ध तरुणांचे बदलते वर्तन व त्यातील अंतर योगीराज वाघमारे यांनी आपल्या साहित्यातून चित्रित केली आहे.

समकालीन वास्तव जीवन समजून घेण्यासाठी पु. ल. देशपांडे यांचे पुढील विचार समजून घ्यायला हवे. . ल. देशपांडे यांचे मत विचारात घेणे अगत्याचे ठरते. त्यांनी म्हटल्याप्रमाणे, "... चार दोन शहरे आणि शहरांच्या आसपासची काही खेडी वगळली आणि जरा दूर गेले की तोच अंधार, तीच विवंचना आणि तेच हाडेबाहेर आलेल्या गोठ्यातल्या गुरांसारखे जगणे."[6] निदान स्वातंत्र्यानंतरची पहिली काही दशके अशाच प्रकारची होती. कायद्याचे राज्य असले तरी प्रत्यक्ष जीवनात जातीयता मूळ धरून होतीच. शिकलेल्या दलीत मुलांकडे आस्थेने पाहिजे जात नव्हते. कायद्याने दलितांनी बौद्ध धर्म स्वीकारलेला असला तरी ते पूर्वीचेच अस्पृश्य होते. सवर्ण वर्गाच्या मनात ते अजूनही पूर्वीचीच दलित होते. परिणामी याच कारणामुळे नवबौद्धांना विविध समस्यांना सामोरे जावे लागले आहे. प्रस्तुत कथासंग्रह याचेच प्रातिनिधिक चित्र आहे.

## ड) निष्कर्ष -

योगीराज वाघमारे यांच्या लेखन प्रेरणा आंबेडकरी आहेत. त्यांनी मराठवाड्यातील समग्र जीवनाचे चित्रण आपल्या साहित्यातून केले आहे. नव्याने बौद्ध धर्म स्वीकारलेल्या दलितांना समतेचा हक्क मिळालेला असला तरी प्रत्यक्ष समाज जीवनात समानतेचा दर्जा मात्र मिळू शकला नाही. खासकरून ग्रामीण भागातील दलितांच्या जगण्यात सतत अडचणी वाढतच गेल्या, आजही ही स्थिती तशीच आहे. योगीराज वाघमारे यांनी आपल्या 'बहिष्कार' या कथासंग्रहात वरील वास्तवाचे चित्रण केले आहे.

मराठवाड्यातील ग्रामीण आणि दलित जीवनाचे विविधांगी पदर त्यांनी आपल्या साहित्यातून उलगडले आहेत. ग्रामीण भागातील दलितांचे शिक्षण, आरक्षण, दलित स्त्रीची परवड, आत्ममग्न शिक्षित तरुण, शिकलेला पण आपल्या कुटुंबापासून तुटलेला तरुण अशा महत्त्वाच्या विषयावर त्यांनी आस्थेवाईपणे लेखन केले आहे. 'बहिष्कार' या कथासंग्रहात समकालीन समाजवास्तवाचे वस्तुनिष्ठ चित्रण आले असून. कायद्याने दलितांना अधिकार मिळालेले असले तरी प्रत्यक्ष जीवनात त्यांना समानतेचा दर्जा मिळत नव्हता, ही वस्तुस्थिती प्रस्तुत कथा संग्रहाच्या केंद्रस्थानी आहे.

**संदर्भ सूची -**

1. दलित साहित्य उद्गम आणि विकास - भालचंद्र फडके - श्री मंगेश प्रकाशन, नागपूर - प्र. आ. 1998 - पृ. 213.
2. बहिष्कार - योगीराज वाघमारे - संकेत प्रकाशन, नागपूर - प्र. आ. 14 एप्रिल 2008 - पृ. 154.
3. तत्रैव - पृ. 31.
4. तत्रैव - पृ. 89.
5. तत्रैव - पृ. 48.
6. नामस्मरणाचा रोग - लेख - पु. ल. देशपांडे - म. फुले गौरव ग्रंथ भाग 1 - संपा. हरी नरके, य. दि. फडके - महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन, मुंबई - सुधारित द्वितीय आवृत्ती 28 नोव्हेंबर 1991 - 708-709.

# प्रकाश वजरिकार हांच्या 'होमखण' नाटकांतले समाजीक आणी संस्कृतीक संदर्भ

**डॉ. पुर्णानंद च्यारी**
सहयोगी प्राध्यापक
कोंकणी विभाग मुखेली
श्री मल्लिकार्जून आनी श्री. चेतन मंजू देसाय महाविद्यालय, काणकोण - गोंय.
drpurnanandchari603@gmail.com

**सारांश:**

*गोंय, कोंकणी भाशीक समाजाचो प्रदेश. साबार राजवटी आयल्यो आपापले संस्कृतीक अंश सोडून गेले. पूण दीर्घ काळ सत्ता सलोवपी पुर्तुगेज आनी ते उपरांत आयिल्ले परदेशी पाद्री मिशनरी हांणी मेळून मूळ हिंदू कोंकणी भाशिकांक क्रिस्तांव धर्मांत हाडले. कोंकणी भाशीक दोन धर्मांनी वांटलो. संस्कृतीक तरेकवारपणांत येवरोपी शैली भरसली. हें वास्तव, हो इतिहास, हो कोंकणी भाशीक समाजांत भरसून आशिल्लो. हाचें पडबिंब कोंकणी साहित्यांत दिसलां. इतिहासीक घडणुकांचे आघात पचयत कोंकणी समाजान आपली सण्स्कृताय आनी अस्मिताय जिती दवरल्या अशें दाखोवपी जें साहित्य आयलां तातूंत एक प्रकाश वझरीकार हांचें नाटक 'होमखण'*

*गोंय मुक्तीच्या संघर्शाचें चित्रण करपी हें नाटक जाता तितल्या वास्तव इतिहासीक घडणुकांक आनी वास्तव पात्रांक लागीं रावून समाजीक, संस्कृतीक जीण विणटा. त्या वेळा वयलो शोशक आनी शोशीत समाज, क्रिस्तांव जालो तरी देशी संस्कार, परंपरा मानपी समाजाचो घटक, हिंदू-क्रिस्तांव एकवटाचे संस्कृतीक संदर्भ, नाटकांत हाडल्यात. ताचो सोद ह्या प्रपत्रांत घेतला. समाजीक जिणेंत संस्कृताय आनी संस्कृतीक जिणेंत समाज अशी घडी घालून आशिल्लो कोंकणी समाज सुटकेच्या संघर्शाचें 'होमखण' पेटयता. स्वाभिमान ही गजाल मनशा कडल्यान जायत्यो गजाली करून घेता. एका विचारान. एका ध्येयान प्रेरीत जाल्लीं मनां समाजमनाचो हुंकार जाता. बारीक-सारीक भेद आनी भिन्नतेचीं जळमटां कुशीक काडून एकवटीत रितीन कुशीक काडून एकवटीत रितीन समाजीक, संस्कृतीक खाशेलपणांचो पट उकतो करता. ताच्यो देखी ह्या होमखण नाटकांत कशे तरेन आयल्यान ताचो सोद ह्या प्रपत्रांतल्यान घेतला.*

**बीज उतरां: कोंकणी साहित्य, नाटक, होखण, प्रकाश वजरिकार, समाजीक-संस्कृतीक संदर्भ.**

**प्रस्तावना:**

साबार राजवटींचे धक्के पचयत आपली संस्कृताय, समाज, अस्मिताय सांबाळचे खातीर संघर्श करीत उबो आशिल्लो कोंकणी भाशीक समाज गोंय, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र अशा मुखेलपणान चार राज्यांनी शिंपडून गेलो. ताचीं कारणां इतिहासीक, राजकी, धार्मीक, वेवसायीक, म्हामारेन उप्राशिल्लीं संकटां, भास आनी संस्कृतायेची राखण अशीं विवीध तासां घेवन येतात. तांचे उत्फर्के, तांचें बडबिंब कोंकणी साहित्यांत दिसता. मूळ भूंय सोडून कोंकणी भाशीक समाज दुसरे भुंयेर आसरो घेवन रावलो. थंय थंय समाजीक स्थित्यंतरां सांस्कृतीक, परिवर्तनां ताणें पळयलीं. मूळ पीठ गोंयांत साबार राजवटींची सत्ता आयली. चालुक्य, सातवाहन शिलाहार, बाहमनी, कदंब, आदीलशाहा अशा राजवटींचो समाजीक, संस्कृतीक, भुगोलीक परिणाम गोंयचेर जालो. पूण चड काळ म्हणल्यार साडे चारशें वर्सां कोंकणी भुंयेचेर सत्ता स्थापून राविल्ल्या पुर्तुगेजांचे राजवटीचे परिणाम कोंकणी समाज आनी संस्कृतायेंत खोल रोमले. ताचे दीर्घ काळ परिणाम आयज मेरेन दिसतात.

हे सत्तेच्या धर्मकोल्लांत कोंकणी समाज दोन धर्मांनी, दोन संस्कृतायो, दोन लिपयो अशा दोट्टी खाशेलपणांच्यो बाटिल्ल्यो खुणो घेवन वाडलो. अशा भिन्न संस्कृतायांनी भरसून लेगीत कोंकणी भाशीक समाज म्हूण जेन्ना जेन्ना एकवटीतपणान वावुरपाची जबाबदारी आयली तेन्ना तेन्ना ती ताणें निभायली. धर्माचे वांटे पडले तरी कोंकणी अस्मितायेचें, भास संस्कृतायेचें आदलेंपण आपले जिणेचो भाग मानून वावुरपी पिळगी कोंकणी समाजाचें आंग जावन पडलां आनी ताचें पडबिंब दिसपट्टे जिणेंतल्या चाली-रितींनी परंपरेन दिसलां. समाजीक आंदोलनां, चळवळी, उठाव, बंडां ह्या वेळारूय दोनूय धार्मीक कोंकणी समाज खांदाक खांदो दिवन वावुरला आनी ताची गवाय कोंकणी साहित्यांत दिसल्या. चळवळींतल्यान उबी जाल्ले आनी चळवळी खातीर निर्माण जाल्ले कोंकणी कवितेन धर्मीक, संस्कृतीक, समाजीक, भाशीक चळबळ उबी केली. कथा कादंबऱ्यांनी कोंकणी समाजाची एकामेका भितर भरसून गेल्ली संस्कृतीक, समाजीक, वेवसायीक अशे तरेची जीण मुखार आयली. गोंयांत तशेंच गोंया भायरूय शिंपडून

आशिल्ल्या कोंकणी समाजानूय हींच मुळावीं खाशेलपणां केळयलीं. कविता, कथा कादंबरी ह्या साहित्य प्रकारां वांगडाच तियात्र, नाटक ह्याय कला साहित्य प्रकारांनी हिंदू क्रिस्तांव कोंकणी समाज आनी ताचे पुरक संदर्भ आस्पावन घेतल्यात.

कोंकणी नाटक अशा समाजाचो हारसो आसा. राणू नायक हांची दीर्घ एकांकिका *चवथीचो चंद्र*, धरून पुंडलीक नाय हांचे *सुरींग, मुक्तताय,* विष्णू वाघ हांचें *सुंवारी धरणगाज,* दत्ताराम कामत बांबोळकार हांची *मायपास* एकांकिका, श्रीधर कामत बांबोळकार हांचें *सांवारयूग* हें नाटक, प्रकाश वझरीकार हांचें *आवत दे फें* तेच प्रमाण *होमखण* अशीं देखी म्हूण घेतिल्लीं नाटकां आसात. ज्या नाटकांतल्या पात्रांच्या माध्यमांतल्यान भिन्न संस्कृती, भासशैली, भेस आनी हेर सांस्कृतीक संदर्भ दिसतात. प्रसंग, नेपथ्य, संगीत हांच्या माध्यमांतल्यान तांचें देखणें रूप दाखयता. गोंय मुक्तीचो संग्राम, ओपिनियन पोल, राजभास चळवळ, राज्याक धरून हेर भाशीक, समाजीक, पर्यावरणी चळवळी कोंकणी समाज म्हणून एकवटीतपणान जैतिवंत केल्यो. धर्म बदल्ले तरी देशी अस्मितायेचें भान दवरून तडजोड, समजिकाय एकरूप जिवन होच ह्या कोंकणी समाजाचो स्थायीभाव जालो.

**होमखण नाटकांतलो समाजीक संदर्भ:**

प्रकाश वझरिकार हांचे लेखणेंतल्यान साकारिल्लें 'होमखण' नाटक गोंयच्या सुटके झुजाचे फाटभुंयेर आसा. 1946च्या काळांत गोंयची समाजीक स्थिती कोंकणी समाजाची मानसीकताय पुर्तुगेज राजवटी खाला आशिल्लें अस्वस्थ वातावरण, सांस्कृतीक आनी धार्मीक संदर्भ, लोकभावार्थ हांकां धरून सुटकेची चळवळ हांचें चित्र उबें करता. नाटकाचे सुरवातेकूच लेखकान केल्ली वातावरण निर्मिती ह्या विधानाक घटाय दिता. लेखक सांगता, *"हिंदू क्रिस्तांव भाटकारांचीं दोन घरां. दोनूय घरां कांय सांकेतीक कुरवांनी विभागल्यांत. क्रिस्तांवाच्या घरा, दारा सामकार खुरीस तर हिंदूच्या घरा सामकार तुळस. वेळ आमोरेचो. पयसुल्ल्यान इगर्जेच्यो घांटी आयकूंक येतात तशी क्रिस्तांवाच्या घरांत अमोरेची प्रार्थना आयकूंक येता."*(वझरीकार, 21) दोन सामाजीक संस्कृतीक जिणेचें दर्शन घडोवपा खातीर केल्ली वातावरण निर्मिती नाटकाक आदारभूंय मेळोवन दिता. धर्मसंस्कारा प्रमाण साजवेळच्यो प्रार्थना एकेच कोंकणी भुंयेर दोन आंगणां एकामेकाक तेंकल्यांत तरी भावार्थाच्यो प्रार्थना, तांचे सूर एकरूप जाल्ले दिसतात. अशी ही सांस्कृतीक घडी. आमोरी जाली म्हणटकच क्रिस्तांव भाव दार धापता, हिंदू लक्ष्मीच्या पावलांची वाट पळयत दार उकतें दवरता. *"प्रार्थनेचो हो प्रसंग सोंपतना क्रिस्तावाचें घराचें मुखेलदार धांपिल्ल्याचो आवाज, हिंदूचें घर उकतें."* (वझरीकार 22) अशी रंगसुचोवणी कंसांत दिल्ली आसा. नाटकांत पिकावळींतल्यो पिपर्‍यो रुचीन खावप ही कोंकणी जिणेची एक तरा. मीट मिरसांग लावन खावपाचेर संवाद आनी ते तरेचो प्रसंग हें सगळें कोंकणी समाजाचें दिसपट्टें पडबिंब दाखयता.

पुर्तुगेज राजवटींत भाटकार-मुंडकार, शोशक-शोशीत, स्वाभिमानी आनी स्वाभिमानहीण , देशप्रेमी आनी देशद्रोही अश्यो वृती-प्रवृत्ती मुखेलपणान वावुरताल्यो त्यो त्या काळाच्या समाज रचनेची समाजीक मानसीकतेची वळख घडयतात हें सकयल दिल्ल्या संवांदांतल्यान अदीक स्पश्ट जाता.

*"नागा: देशाक मेळटा जाल्यार मेळूं स्वराज आमकां गरज ना. पुर्तुगेज आसा तेच बरे, सवाय खावंक जेवंक मेळटा उतरूय धरता. इंद्रनाथ: आमी स्वराज्य भोगतले.... आमी, तुमी, शेतकार, भाटकार, कुळवाडी, वाणी, मडवळ म्हालो, हीं झाडां-पेडां ही जमीन मुक्त जातली."* (वझरीकार, 25,26)

हांगा स्वातंत्र्याक आशिल्ली आनी स्वार्था खातीत्र लेमडेपणा करपाची एक मानसीकता दिसता. दोन मानसीकतेन दुभंगिल्लो समाज त्या वेळार वावुरतालो हाची एक देख. अशिक्षीत, अंदश्रद्धाळू समाज ह्या नाटकांत जिणेच्या वेगवेगळ्या टप्प्यांचेर दिसता. तांचे विशीं भाश्य करतना स्वातंत्र्याच्या संदर्भांतल्यान रामदास हें पात्र उलयता,

*"हांव तर आरोग्य स्वातंत्र्याचो ध्यास धरतां. वचत थंय गांवांनी कुड्डो भावार्थ, घाडी भगत, दोरे विभुती लावन दुंयेसां पयस जायनात, कितें करतलो? लोक आयकनात."* (वझरीकार, 26)

शोशीत आनी शोशीक समाज त्या काळांत कशे तरेन वावुरतालो. कश्ट करून खंड घालपाची रीत आनी जबरदस्तीन खंड वसूल करून घेवपाची तरा ही श्रम संस्कृताय आनी शोशक वृत्ती हांचे मदलो संघर्श दाखयता. ताची वळख घडोवपी एक शेतकार आनी भाटकार हांचे मदल्या संवादाची देख;

*"शेतकार : हय भाटकारा, तुमचो खंड आमी वगतार पावतो केला भाटकारा!*
*नागा : केलो खरो. आडव्या मापान व्हेल्लो मरे? मागीर उब्या मापान कित्याक फारीक करूंक ना?*
*शेतकार : ना भाटकारा. सगळो उब्या मापानूच फारीक केला."* (वझरीकार, 28)

शेतकार जिवीतभर कश्ट काडटा, पिकयता, शेती संस्कृतायेची पोसवण करता आनी कश्टांचेर फळ म्हण प्रामाणीकपणान खंड दिवपी आनी ताच्या मापाचेर दुबाव घेवपी प्रवृत्ती हांगा दिसता. खंड घालपाचे चाली-रितींत आडवें माप म्हणल्यार मुदल आनी उबें माप म्हणल्यार कळंतरा सकट फारीक केल्लें रीण अशें परिमाण सिद्धं करता. आडव्या आनी उब्या मापाच्या प्रतिकात्मक संदर्भांतल्यान लेखक त्या वेळा वयले हे दोन सामाजीक प्रतिनिधी. दुभंगलेली समाज वेवस्था दाखयता.

शेतकार आपली घरकान्न बरी ना म्हूण आदारा खातीर भाटकाराच्या घरांत कडेन पावता तेन्ना तो दोतोराक व्हरपाक बैलगाडी घेवन आयला म्हूण सांगता. बैल आनी बैलांगाडी हो एक साधनसुविधेंतलो तेन्नाचो वेगळो संस्कृतीक संदर्भ आसा. नाटकांतलो प्रसंग सोंपतना बैलांच्या गळ्यांतल्यो घांटी आयकूंक येतात अशें कंसांत सुचयत प्रसंग सोंपयला. गोरवां राखपाची, शेती संस्कृती, श्रम संस्कृती अदोरेखीत करत बैलाच्या गळ्यांतले घांटीचो आवाज पार्श्वसंगीत वातावरणा खातीर वापरला आनी नाट्यपरिणाम कायम दवरला. खंड घालपाच्या चाली-रितींतली आनीक एक देख-प्रसंग;

*"नागा : बाळा, हो साक कसलो दवरला तो खबर आसा मरे? खंडांचो तो खंडांचो, वर्सान वरस फारीक करपाचो तुमी.*
*बाळाचो बापूय : हय भाटकार, पिड्यान पिड्यो आमी दीत येयल्यात तुमकां."* (वजरीकार, 30)

खंड फारीक करूंक आयिल्ले कडेन भाटकार आपले घरकान्नीक मुदाम बाळाच्या बापायक केळीच्या खोल्यार फोव दी म्हूण फर्मायता. हांगा बाशी आनी केळीचो खोलो हो भेदभाव आसा. तांचे खातीर च्यायेचो ग्लास कुशीक वेगळो दवरिल्लो आसता. तो कडाशेक लायिल्लो आसता. हो भेदभाव, ही विकृती शोशक आपली संस्कृती मानता. ताच्या एका संवादांतल्यान हें स्पश्ट दिसता.

*"आगो हांगा यो. खोलो उखल आनी भायर कुत्र्याक घाल. अशे उपास तपास हे पिरायेर सोबनात तुजे सारक्या कुळवाड्यांक. राया हो तो कडाशेचो ग्लास काड आनी व्या घे तातूंत..."*(वयलोच संदर्भ, 32)

ह्या प्रसंगांत बाळा आनी बाळाचो बापूय खंड दिवंक आयल्यात. पूण बाळाचें लक्ष गोंयांत लोहिया आयला. गोंयच्या सुटके झुजा खातीर तयारी चल्ल्या हाका लागून बाळा अस्वस्थ आसा. भाटकारान दिल्ले फोव, च्या तो घेना तेन्ना अहंकारान भाटकार ते फोव कुत्र्याक घालपाक लायता. भेदाभेद, शोशण, प्रथा-परंपरा अशी समाजीक घडी दिसता. लोहिया गोंयांत आयला अशा वेळार सुटके खातीर लोहियाच्या नेत्रृत्वा खाला वावरांत उडी मारपाक साबारजाण तयार आशिल्ले. तातलोच एक बाळा. संवादांतल्यान दोन धर्मी कोंकणी समाज स्वातंत्र्या खातीर कशे वावुरताले, लागणूक दाखयताले ताच्यो देखी;

*"इंद्रनाथ: तशें जाल्यार म्हाका तेका (लोहियाक) मेळपाची इत्सा आसा. हांव फाल्यांच वतां. म्हजो इश्ट जॉर्ज, तोवूय येत घडये."* (वयलोच संदर्भ, 27) हांगा इंद्रनाथ हो नागा भाटकाराचो भाव. नागा पुर्तुगेजांक फितूर तर इंद्रनाथ सुटके खातीर मुखार सरिल्लो. लोहियाक मेळूंक सोदपी झुजारी. नागा भाटकारागेर पुर्तुगेज सोल्दाद अधिकारी इश्टागतीन येतात वतात तर जुलियावं मिनेझिस क्रिस्तांव भाटकार हांगेर सुटके खातीर चळवळ शिजता आनी एकवटान लोहिया वांगडा बसका घेता. भाटकारशायेच्या काळांत भावां भावां भितर दोन भिन्न मतां, दोन भिन्न धर्मांचे तरी सुटकेच्या विचारान एकमताचे. अशे तरेची समाजीक वेवस्था दिसता. जे पुर्तुगेज येवरोपी संस्कृती, संस्कार पेरीत आयले. परदेशी मिशनरी पाद्रींच्या आदारान थळाव्या हिंदूंक क्रिस्तांव केले. धर्म बदलूनय क्रिस्ती धर्माक पाळो दिनात कळटकच इंक्विजिशनाचे कायदे खर केले. बंदनां, दंड, ख्यास्त अशी परिस्थिती आसतनाय सगळेच क्रिस्तांव भाव पुर्तुगेज धार्जिणें जावंक नाशिल्ले. तांतले बरेचशे सत्ते आड देशी विचारान आनी सुटकेच्या ध्येयान उबे रावले. आनी एक नवो इतिहास तांणी घडयलो.

कोंकणी समाजाची घडी भूंय आनी भौसा खातीर घट उरची हे खातीर धडपडपी पात्रां ह्या नाटकांत दिसतात. टी. बी. कुन्हा, जुलियांव मिनेझीस, जॉर्ज बेर्था ते भायर क्रिस्तांव तरनाटो, जाणटेलो अशीं धेयवादी विचारांचीं प्रातिनिधीक पात्रां नाटकांत उबीं केल्यांत. *"जॉर्ज: आमचे कितलेशेच प्रस्न जानव्यांत घुस्पल्यात. ते तोडून उडोवपाची गरज आसा."* (वयलोच संदर्भ, 42) अशें म्हणटना जॉर्ज हें पात्र जाती वेवस्थेचेर बडी मारता. फकत हिंदूंचेरूच शेरो मारून ओगी रावना. क्रिस्तांवांचेरूय भाश्य करता. *"जॉर्ज: क्रिस्तांव देशभश्ट जाला. ताका देशभक्त करतलो जाल्यार सगळ्यांत पयलीं ताच्या भेसांत बदल घडूंक जाय. ग्रावात फात सोडून सदरे, लेंगे घालूंक जाय. मेंय बुटां बदला सादें जोतें घालपाक जाय. व्हिस्तिदा बदला साडयो न्हेसूंक जाय."* (वयलोच संदर्भ, 43) ह्या संवादांर स्वातंत्र्या वांगडा देशी संस्कृतायेचो पुरस्कार करपी क्रिस्तांव भावा प्रतिनिधित्व करतना दिसता. धर्म बदलले उपरांत तांची पुर्तुगेज सरकाराक विरोध करपाची धार बदलतली असो समज आशिल्लो जावंये. पूण समाजांतलो एक घटक कोंकणी

समाजाचें आंग जावन पुर्तुगेज सत्ते आड उबो राविल्लो. साबारजाणांनी प्राण ओंपले, बंदखणी भोगल्यो. त्रिस्तांव ब्रागांझ कुन्य हे खर राष्ट्रवादी विचारांचे. 'Denationalization of Goans' अशे तरेचें पुस्तक बरयलें. 'गोंयकारांचें देशभश्टेंपण' हो ताचो अणकार. *"टी. बी.: सबंद भारतांत आपलें राश्ट्रीयत्व वगडावन बशिल्ल्या गोंयकारा सारके दुसरे कोणूच आसचे नात. आमच्या राश्ट्रीयत्वाचो र्‍हास करपी परकी सत्ते आड आवाज उठोवप हें म्हजें कर्तव्य मानतां...."* (वयलोच संदर्भ, 55) ह्याच टी. बी.चे आठ वर्सां शिमे भायर आनी पंदरां वर्सां मेरेन नागरी हक्क काडून घेतले.

नाटकांत आयिल्लें 'बेर्था' नांवाचें एक अस्तुरी पात्र लोहिया गोयांतल्यान गेले उपरांत आपूण सत्याग्रह करतली म्हूण मुखार सरपी बयली गोंयकार बायल आसा. *"पुर्तुगेजांक जर किर्ते म्हणलें जाल्यार हांव फारान मारतलों एक एकल्याक."* अशे प्रवृत्तींतले लोक नागा भाटकाराच्या रुपान आशिल्ले. तशेंच त्याच घरांतली बायल तुळशी, *"... आयकतना दिसतालें की पुर्तुगेजांक धरून फारान मारचे."* हाचे वयल्यान अस्वस्थ समाजीक मानसीकता आमकां दिसता.

**नाटकांत आयिल्ले संस्कृतीक संदर्भ:**

हें नाटक जितलें समाजीक घडामोडी आनी संघर्श हाताळपाक यशस्वी थारलां तितलेंच गोंयची संस्कृतीय सांबाळपी आनी तिचे संदर्भीक सुचकतायेंतल्यान मुखार सरपीय आसा. गोंयांत रुजवणा आयिल्ली परदेशी संस्कृताय आनी थळावी, निजाची संस्कृताय हांचो संगम कोंकणी जिणेंतलो संस्कृतीक हुंकार आसा. नवें आपणायतना पोरनें सुटलें ना. आनी नवें आपणावप्या क्रिस्तांव भावांक आपलें म्हणून सोडले ना. अशे तरेन एकामेकाच्या सणा-परबांनी, रिती-परंपरांनी कोंकणी समाज म्हूण एकामेका भितर भरसून रावलो. कलात्मक जिणेंतलीं संस्कृतीक आंगां सुटके चळवळींत माध्यमां म्हूण, साधनां म्हूण वापरलीं. हाचे जायते पुरावे आमकां दिसतात.

नाटकाचे सुरवातेकूच सामुहीक आवाजांत क्रिस्ती धर्माची प्रार्थना आयकूंक येता. *"नोमान मारिये, कुरपेन भोरलेले, सोर्वेस्पोर तुजे थांय आसा.... (घंटा नाद)"* तेच प्रमाण दुसरे वटेन *"सदा सर्वदा योग तुझा घडावा..."* (वयलोच संदर्भ, 22) अशी हिंदू धर्मांतली सांजप्रार्थनाय आयकूंक येता. आमोरी हो प्रार्थनेचो पवित्र वेळ दोनूय धर्मांचे संस्कृतीक परंपरेचो दिश्टावो घडयता. लोकांचो देवाचेर भावार्थ चड. धाडी, भगत, दोरे, विभूत लावन स्वताक देवाच्या आशिर्वादाक सुरक्षीत आशिल्ल्याचे भावनेन जगपी भावार्थी संस्कृताय दिसता. धर्मपरिवर्तनाक लागून दुभंगिल्ली धार्मीक आनी संस्कृतीक वेवस्था दिसता.

लोहियाच्या 18 जुनाच्या उल्या उपरांत सभेक लोक जमल्यात. चळवळ चालू आसा. अशा वेळार वंदे मातरम राम मनोहर लोहिया की जय चे घोशणे भितरूच साजांव परबेचीं पारंपारीक पदां आयकूंक येतात. तांच्या हातांत आशिल्लीं म्हादाळें, कांसाळें, घुमटां अशीं कोंकणी समाजाचीं वाद्यां आनी धवीं बानयनां, तांबडे वाले, मोटवीं कालसांवां असो पारंपारीक भेस तांच्या माथ्यार फुलांचीं कोपेलां असो थाट घेवन हिंदू आनी क्रिस्तांव लोकंचो पंगड नाचता. नाचतना म्हणपी

*"साजांव साजांव धुंवता मरे वाट आमकां दिसोना*
*आयचो दीस उर्बेचो कोण कोणाक मेवोना*
*चोल रे पिये रे, तूं इल्लो घे रे*
*फाल्यां कांय मेवोना*
*ओसलीं फेस्तां वोर्साक कित्याक*
*दोन फावटीं येना?*
*विवा सा जुवांव."* (वयलोच संदर्भ, 47, 48)

सुटके चळवळीच्यो घोशणा, पदां आयकूंक येतात. अशेच फाटभुंयेर त्या लोकसमुहाचो भाग जाल्लेवरी साजांवांतले लोक नाचतात. तांचे फाटल्यान पुर्तुगेज शिपाय खाप्री, सोल्दार तांकां आडावपाक मुखार येतात. पूण साजांवाचें गीत गावपी तांकां आयकनात. दोन धर्म जरी संस्कृतीक परंपरेंतल्यान वेगवेगळे आसले तरी स्वतंत्रतायेचे चळवळींत एकठांय अशें चित्र नाटकांत दिसता. *"हिंदू तरनाटो: साजांव म्हणल्यार आमकां कोंकण्यांकूय उमेद. आमी बी क्रिस्तांवांच्या आमच्या भावांच्या मांडार उमेदीन येतात. मांडावयल्या खुर्साक वाती लायतात. सान्नां-धोशी, पणसा गरे उमेदीन वांट्टात."* *"क्रिस्तांव तरनाटो: पूण साजांव म्हणल्यार आमची व्हड खोस सायबा... साजांवा पयलीं शेत रोवून जालां सायबा... आमी कोंकणे क्रिस्तांव एकूच..."*(वयलोच संदर्भ, 48, 49) हांगा मांड, सान्नां, शेत अशा उतरांनी एकचारा वांगडाच लोकसंस्कृतीचे वेगवेगळे संदर्भ सापडटात. साजांवाचें नाच गीत चालू

आसतना खाप्र्याक घेराव घालून एक गीत गायतात. *"ओ रिंगा रिंगचे कटर, खाप्री मेला भोकान गेला, पाखले बूर पिता सूर, पोणजे व्हरोन पूर."* हांगा खाप्री अफ्रिकेचे शिपाय आनी पाखले वा पुर्तुगाली गोरे तांचे विशीं आशिल्ली तिडक साजांव गिताच्या माध्यमांतल्यान उक्ती करता. अफ्रिकेचे खाप्री गुलाम म्हणून गोंयांत पुर्तुगेजांनी हाडले आनी उपरांत ते सिद्दी कोंकणी लोक म्हणून कोंकणी समाज आनी संस्कृतायेचो भाग जावन पडले. साजांवाचें गीत गायतना घुमटांच्या तालार वंदे मातरम म्हणटात तेन्ना मिरांद द सोल्दाद घुमटाचेर खोंट मारूंक मुखार सरता तेन्ना, घुमटाचेर घालून घेवन *"हें घुमट म्हुणल्यार माती, मातयेंतलो ताल, हे मातयेर आमी जोल्मोल्यात आनी हेच मातयेर पोसल्यात, हे मातयेर आमी उबे रावतात, पूण मातयेर केन्ना खोंट मरिनात. हांव तुका मुजे मातयेर खोंट मारूंक दिवचो ना." "क्रिस्तांव तरनाटो: पूण साजांव म्हणल्यार आमची व्हड खोस सायबा... साजांवा पयलीं शेत रोवून जालां सायबा... आमी कोंकणे क्रिस्तांव एकूच..."* (वयलोच संदर्भ, 52) अशे तरेन घुमट सुरक्षीत दवरताच ते भायर हांगा मांयभूंय ही भावना आनी मातयेचें वाद्य कोंकणी संस्कृतायेचें देणें ही संकल्पना आनी ते विशीं आशिल्लें आपलेंपण दाखयता. ह्या संदर्भांतल्यान नाटकाचो प्रसंग सोंपतना,

*"मिलाग्र सायबिणी*
*आमची काकूत कोर*
*लोयरायी सायबिणी*
*आमची काकूत कोर*
*एकवोटाच्या आर्का*
*आमची काकूत कोर." (वयलोच संदर्भ, 52)*

हांगा मिलाग्र सायबीण आनी लयराय हीं दोन धर्मांचीं दोन दैवतां. कोंकणी संस्कृतीक जिणेंत भावार्थाचें रूप जालां.

त्या वेळार तियात्र, नाटकां करपा वेळार आदमिस्त्रादोर येवन बसतालो. सेन्सोर आनी बंदनां आसतालींच. खंयचेय सांस्कृतीक कार्यावळीचेर पुर्तुगेज राजवटीची वाकडी नदर आसताली. गोंयांत संगित नाटकांचें पिशें ताका लागून मास्तर जावं नाटका खातीर लागपी वाद्यां दोडामार्गा सारकिल्ले शिमे वयल्यान हाडचीं पडटालीं. पासपोर्ट आनी खर तपासणी जाताली. सुटकेचे चळवळीचो हुंकार जावचो तशें 'जळता गोमन्तक' सारकिल्लें नाटक आनी ताच्यो येसायो चालू जातात आनी ताचोच भाग म्हणून गोंयचे शिमे पलतडच्यान एक नाट्य कलाकार नाटकाच्या सामानाची पेटी माथ्यार मारून येता. ताका आडायत आदमिनिस्त्रादोर पेटयेचेर पांय दवरून उबो रावता. गांवठी शिपाय पेटयेचेर खोंट मारपाक वता तेन्ना नाट्य कलाकार रंगदेवतेचो अपमान मानून ते पेटयेचेर घालून घेता. खोंट ताचेर पडटा. ह्या प्रसंगांतल्यान कोंकणी समाजांतलो आनी सांस्कृतीक जिणेंतलो कलाकार आपल्या वाद्यांक आनी कला-संस्कृती संबंदीत वस्तूंक कितले श्रद्धेन सांबाळटा हाची गवाय मेळटा. नाटकांत मांडे, धुलपद, मुसळ अशा लोकनाच गितांचो संदर्भ येता. नाटक, जात्रा, फेस्तां संस्कृतीक जिणेचें आंग आसा. ताचोय संदर्भ आशयाच्या गाभ्यांत भरसला. कांय कडेन सत्ते मुखार शरण येवपाच्यो प्रवृत्ती दाखयतना घालीन लोटांगण वंदीन चरण हे आरतीचोय वापर नाट्यपरिणामाचो भाग म्हूण जाला.

**'होमखण' ह्या नाटकाचें नांव:**

ह्या नाटकाचें नांव संस्कृतीक जिणेचो म्हत्वाचो भाग. साजांव गायतल्यांनी मिलाग्र सायबीण आनी लयराय हांचो उल्लेख केला. दोगीय सात भयणीं मदल्यो दोन भयणी. इतिहासीक कारणा खातीर धार्मीक आनी संस्कृतीक परिवर्तनाच्यो दोन देखी. लयराय देवीचे जात्रे निमतान होमखण पेट्टा. धोंड भक्त भक्तींत लीन जावन भावार्थाच्या भारान एकवत पाळटात. लयरायीचे जात्रेचेर पुराय श्रद्धा दवरून रसरसपी इंगळ्यांचें होमखण उकत्या पांयांनी हुपतात. धार्मीक आनी पारंपारीक रीत संस्कृताय हांगा आसा. पूण बाळा मापारी सारकिल्लो सुटके झुजारी लयरायेचें होमखण आनी सुटके झुजाचें होमखण हाका एकाच भारान पळयता आनी स्वातंत्र्याच्या झुजान स्वातंत्र्याच्या होमखणांत स्वताची बळी दिता हो इतिहास अमर आसा. होमखण हें संस्कृतीक चैतन्य आनी तेच प्रमाण प्रतिकात्मक सुचकताय म्हूण नाटकाक फाव केलां.

**निष्कर्ष :**

मानशान समाज निर्माण केलो. दिसपट्ट्या वेव्हारांतल्यान संस्कृताय घडत गेली. गरजे प्रमाण आनी वांट्याक आयिल्ल्या वायट बऱ्या प्रसंगां प्रमाण तातूंत स्थित्यंतरा आनी नव्यो नवलायो घडत गेल्यो. संवसारांतल्या दर मानव समुहान होच चमत्कार घडयला. तांतल्यान अस्मिताय ही संकल्पना चंवरली. कोंकणी समाज ह्या गजालींक आडवाद ना. ल्हान जमीन ल्हान समूह आसून ह्या समाजाक व्हड आव्हानां पेलचीं पडलीं. कल्पकता, भावना, श्रद्धा, भावार्थ आनी कर्तृत्व ह्या बळार कोंकणी समाजान जी संस्कृताय उबी केली ती साबार राजवटींच्या आवर्शणांतल्यान सावरीत तिगयली, कोंकणी अस्मिताय जगयली. ती कशी? हे खातीर कोंकणी साहित्यांत देखींचें भांडार भरलां. होमखण हें नाटक अशीच एक देख.

साबार राजवटींचो हुलोप सोसून वेगवेगळ्या संस्कृतायांच्या मिश्रणांतक्यान कोंकणी संस्कृतायेचीं मुळां कायम दवरपाचें आव्हान कोंकणी समाजान सदांच पेल्लें. साडे चारशे वर्सांची पुर्तुगेज राजवट कसवटी पळोवपीच आशिल्ली. धर्म बदल्ले, कोंकणी समाज वेगवेगळ्या राज्यांनी शिंपडून पडलो तरी पारंपारीक चाली-रिती, संस्कृताय, भास एके अस्मितायेचो रोस जावन एकजिवी भावनेचो कोंकणी समाज कशे तरेन उबो रावतलो हाची जतनाय सदांच घेतल्या. देखुनूच लोकसंस्कृतायेंतलीं गितां, वाद्यां, भेस, खाण-जेवणां, पारंपारीक वेवसाय, कलाप्रचूर माध्यमां हे सगळे समाजीक संस्कृतीक घटक तितलेच निश्ठेन सांबाळ्ळयात. मानवी प्रवृत्ती भितर सुवार्थ, दुस्वास, भेदाभेद, चलाखी, प्रमाणीकपण, मनीसपण, मांय-भूंय-भास-भौस हे विशीं आशिल्लें आपलेंपण, राग, मोग हें आसताच. पूण जेन्ना समाज, संस्कृताय, अस्मिताय हे विशीं आशिल्लो आत्मसंमान दुखता, समाजीक अस्तित्वाक धोको निर्माण जाता तेन्ना एकवटीतपणान आपलो समाज आनी संस्कृताय सांबाळपा खातीर एकवटाचें होमखण पेटोवपी आत्महुंकार मना मनांनी इंगळ्यांच्या रुपान, ध्येयवादाच्या रुपान ध्यासपर्वाचो नवो इतिहास घडयता. हाचोच उद्गार म्हणल्यार होमखण.

**संदर्भ:**

1. कुन्य, टी. बी, अणकार, आमोणकार, सुरेश, गुंडू, *गोंयकारांचें देशभश्टेपण,* त्रिस्तांव ब्रागांझ कुंज्य चॅरिटी ट्रस्ट, पणजी, 2013.
2. नायक, पुंडलीक. *सुरींग,* जाग प्रकाशन, प्रियोळ, म्हाड्डोळ, गोंय, 1982.
3. बांबोळकार, कामत, श्रीधर, *सांवार युग,* अनंत शाली प्रकाशन,
4. वजरीकार, प्रकाश. *आनीक एक प्रस्न पर्व,* प्राची प्रकाशन, वजरी, सांखळी गोंय; 2017.
5. वजरीकार, प्रकाश. *होमखण,* भूमी प्रकाशन, सत्तरी गोंय; 2022.

# चाळेगत एक सामाजिक सांस्कृतिक व्यूह

**प्रा.डॉ.रमेश पांडुरंग पोळ**
प्रमुख, मराठी विभाग
सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड
polramesh1966@gmail.com

‘ हे विश्वचि माझे घर’, या संत ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणे २१ व्या शतकात संपूर्ण जग हे जागतिकीकरणाने जवळ आले आहे. ‘जागतिकीकरण’,’ ग्लोबलायझेशन’ ही २१ व्या शतकाच्या जगण्याच्या व्यवस्थेचा एक अपरिहार्य भाग आहे. संपूर्ण मानवी जीवनाला व्यापून उरलेल्या या आधुनिकीकरणाचा ‘मार्केट इकॉनॉमी’ हा पाया आहे. आणि याच पायावर आजची जगभरातील मानवी संस्कृती उभी आहे. या नवीन संस्कृतीचा आर्थिकता हा महत्त्वाचा निकष आहे. उत्पादन, ग्राहक, वस्तू, बाजारपेठ, फायदा, तोटा, उत्पादक हे या संस्कृतीचे घटक आहेत. याच भोवती आजचे मानवी जीवन फिरत आहे. यासंदर्भात रंगनाथ पठारे यांचे मत अतिशय महत्त्वपूर्ण आहे, ते लिहितात की “उपयुक्तता हा एकमेव निकष सारीकडं असल्यानं निर्ममपणे अवाढव्य निर्मिती, अतोनात जाहिरातबाजी, अतोनात नासाडी ही आजच्या प्रतिष्ठित मानवी संस्कृतीची वैशिष्ट्ये आहेत.”[१] मानवी संस्कृतीची ही आजची वैशिष्ट्ये मानवी जीवनाला एक असंवेदनशीलता प्राप्त करून देतात.

आजची मराठी कादंबरी ही जागतिकीकरणाच्या संस्कृतीचे ग्लोबल रूप आपल्यात सामावून घेत वाटचाल करत आहे, म्हणूनच ती अधिक व्यापक व गुंतागुंतीची झाली आहे. सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील बदललेले संदर्भ, जगण्याची एक विचित्र जीवनशैली, ती शब्दबद्ध करते. संस्कृती व समाज हा साहित्याचा व मानवी जगण्याचा कणा आहे. कादंबरीतून हे दोन्ही आयाम मांडत, लेखक आजच्या मानवी जीवनाची विविध रूपे उलगडत असतो. यासंदर्भात रंगनाथ पठारे सांगतात की, “ कादंबरीकाराचे लेखनाचे सारे प्रयत्न हे संस्कृतीमध्ये हस्तक्षेपाचे प्रयत्न असतात. किंवा अधिक मर्यादित पद्धतीने म्हणायचे तर लेखकाचे लिहिण्याचे सारे प्रयत्न हे वाङ्.मयीन संस्कृतीतल्या हस्तक्षेपाचे प्रयत्न होत. वाङ्.मयीन संस्कृतीही व्यापक सामाजिक सांस्कृतीचं एक महत्त्वाचं अंग असते हे इथे गृहीत आहे”.[२]

जागतिकीकरणाच्या संस्कृतीची वैशिष्ट्ये आपल्यात सामावून घेत, आपल्या मातीतील संस्कृतीचे, सामाजिकतेचे समग्र दर्शन घडवणारी मराठीतील एक महत्त्वपूर्ण कादंबरी म्हणजेच प्रवीण बांदेकर यांची ‘चाळेगत’ ही कलाकृती होय. एकविसाव्या शतकाच्या संस्कृतीचे एक अस्सल असंवेदनशील रूप ती अतिशय सहजपणे उलगडते. समकालीन विविध जीवन- जाणिवा व्यक्त करत आजची मराठी कादंबरी वाटचाल करत असताना, चाळेगत या कादंबरीने एक स्वतःचा स्वतंत्र ‘स्पेस’ निर्माण केला आहे. ही कादंबरी इ.स.२००९ मध्ये प्रकाशित झाली असून, ती आशय व कादंबरीच्या निर्मिती प्रक्रियेवर एकाच वेळी उलगडत जाते. यासंदर्भात डॉ. हरिश्चंद्र थोरात यांचा अभिप्राय अत्यंत बोलका आहे. ते लिहितात की, “ ‘कादंबरी’ या कन्सेप्टविषयी - म्हणजे कादंबरीचं कथानक सांगणं आणि त्याचवेळी ते कसं निर्माण होतंय याचंही कथानक सांगणं आणि त्याचवेळी ते कसं निर्माण होतंय याचंही कथानक सांगणं, असं काहीतरी या कादंबरीमध्ये प्रवीण इथे करू पाहतोय.”[३] समकालीन जीवनाचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक लागेबंध उलगडत ती लोकसंस्कृतीचे ही प्रभावी दर्शन आपल्या कादंबरीतून उलगडते. कोकणी जीवनातील विविध आशय, तिथली जीवन संस्कृती, परंपरा, जागतिकीकरणाचे समुद्री जीवनावर, मच्छीमारी व्यवसायावर झालेले भयावह परिणाम, ही कादंबरी मांडते. कोकणातील सर्वसामान्य माणसाचे जगणे शब्दांमधून व्यक्त करताना, त्यांच्या वेदना, दुःखे अडाणीपणा याचे अत्यंत प्रभावी चित्रण ती करते.

**चाळेगत कादंबरीतील सांस्कृतिकता:-**

कोकणातील प्रादेशिक जीवनाचे चित्रण करत असताना, जागतिकीकरणाचा इथल्या लोकजीवनवर झालेला परिणाम, ही कादंबरी सांगत असताना, बदलत्या काळातील संस्कृतीचे चित्रण ती करते. आजची संस्कृती ही ‘खाऊजा’या परिघात सामावलेली आहे. नैतिकता,मूल्यव्यवस्था, ही तिची पूर्वीची अधिष्ठाने आता पार मातीमोल झालेली आहेत. राजकारण, अर्थकारण, समाजकारण या प्रत्येक पातळीवर ती उलगडताना जागतिकीकरणाच्या एका गडद सावलीने तिला व्यापून टाकले आहे. कादंबरीचा

स्वतःचा असा एक वेगळा अविष्कार आहे. लोकजीवनातील लोकसंस्कृतीत, लोकसंस्कृतीतील सादरीकरणाची निवेदनाची पारंपारिक पद्धत ही कादंबरी एका बाजूला स्वीकारते, तर दुसऱ्या बाजूला आधुनिक जगतातील टीव्ही मालिकांच्या एपिसोड ची पद्धत ती वापरते. यासंदर्भात डॉ. एकनाथ पगार हे लिहितात की, "सभोवतालच्या समाजजीवनातील व्यक्तिजीवनातील अनुभूती, लेखकाचा संवेदनशील स्वभाव, नैतिक दृष्टिकोन घडवित असतात, आशद्रव्याच्या निवडीचे आणि अविष्काराचे स्वातंत्र्यही येथे गृहीत धरावे लागते."[४]

रूढ अर्थाने 'चाळेगत' या कादंबरीचे कथानक सरळरेषेत नाही. किंवा कथानक सांगत असताना अनेक घटना साखळीच्या माध्यमातून ते उलगडत जाते. त्यामुळे सुरुवातीला कादंबरी वाचताना एक अनाकलनीयता, सतत वाचकाला जाणवत राहते. कोकणातील प्रादेशिक श्रमसंस्कृतीवर जागतिकीकरणाचा फार मोठा परिणाम होऊन, ती यंत्रसंस्कृतीत कशी परावर्तित झाली, त्याचे किती भयावह दुष्परिणाम तिथल्या लोकजीवनावर झाले, आणि त्यातून तिथली संस्कृती कशी बदलत गेली, हे ही कादंबरी नव्याने सांगते. समुद्र हा कोकणी जगण्याचा, व्यवसायाचा एक अविभाज्य घटक आहे. नैसर्गिक पारंपरिक पद्धतीने मासेमारी करून त्यावर उदरनिर्वाह करणारा हा कोकणी समाज,पण या आधुनिकीकरणाने माणसाचे जीवन यंत्राने व्यापले आहेत. भौतिक सुखाच्या हव्यासापायी तो निसर्गाची बेछुट अशी कत्तल करत आहे. समुद्र हा ही निसर्गाचा एक भाग, पण याच समुद्रात माणसाने आपल्या हव्यासासाठी ट्रॉल सारख्या व्यापारी बोटी उतरवल्या.यामुळे समुद्रातील नैसर्गिक साधनसंपत्तीला आणि तिथल्या जीवसृष्टीला प्रचंड मोठा धोका निर्माण झाला. कोकणातील श्रीमंत व्यावसायिकांनी ट्रॉल खरेदी करून या भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उडी घेतली आहे. परंतु त्यामुळे इथल्या छोट्या पारंपरिक पद्धतीने मच्छीमार करणाऱ्या सामान्य लोकांचे जीवन मात्र उध्दवस्त झाले आहे. इथला पारंपरिक मच्छीमार व्यवसाय त्यामुळे संपुष्टात आलेला आहे. गरीब, कष्टकरी समाज त्यामुळे हतबल बेकार झालेला आहे. जागतिकीकरणामुळे आलेली ही यंत्रसंस्कृती मानवी जीवनाला कशी संपुष्टात आणत आहे, मानवी जगण्याला कशी एक भयावहकता प्राप्त होत आहे, हे ही कादंबरी शब्दबद्ध करते.

'दशावतार' हा कोकणच्या लोकसंस्कृतीचा एक अविभाज्य घटक आहे. आजही 'दशावतार' आपले अस्तित्व टिकवून आहे. लोकसंस्कृतीच्या या दशावतार खेळातील एक प्रमुख पात्र म्हणजे संकासुर. हा संकासुर दशावतार खेळातील प्रमुख सूत्रधार असतो. या लोकसंस्कृतीच्या संकासुराचे पात्र कादंबरीकाराने निवेदनासाठी, सामान्यांचा प्रतिनिधी म्हणून वापरलेले आहे. या संकासुराच्या माध्यमातून सामान्य लोकांच्या जीवनाची झालेली ससेहोलपट, कष्टकरी जीवनाचा वेदनादायी प्रवास, समाजजीवनाच्या पारंपरिक चौकटीत मूल्यवस्थेला धरून जगत असताना होणारी ओढातान, लेखकाने शब्दबद्ध केली आहे. संकासुराचा पोशाख, भाषा, तत्कालीन परिस्थितीवर मार्मिकपणे भाष्य करण्याची खुबी, ही सारीच वैशिष्ट्ये कादंबरीकाराने प्रचलित समाजाच्या यंत्रसंस्कृतीवर ओरखडे ओढण्यासाठी समर्पकपणे वापरलेली आहेत. प्रतिकात्मक भाषेची योजना यासाठी केलेली आहे. लोकसंस्कृतीने यंत्रसंस्कृतीचे मानवी जीवनावर झालेले परिणाम यातून सांगितलेले आहेत. यासंदर्भात रंगनाथ पठारे यांचा अभिप्राय अत्यंत बोलका आहे, ते लिहितात की, "कोकणातील सर्वसामान्य कष्टकऱ्यांचं -शेतकरी, मच्छीमार अशांचं जगणं या पद्धतीने केंद्राशी आणून त्याला संकासुराच्या प्रारूपाप्रमाणे उभं करणं, त्याला दशावतारी खेळाच्या लौकिक फॉर्ममध्ये उभा करणं हे मोठं काम प्रवीणने या कादंबरीमध्ये केलेलं आहे. दशावतारी खेळाचा फॉर्म वापरला गेल्यामुळे त्या कथन परंपरेतील लवचीकताही आपोआपच या लेखनाला प्राप्त झालेली दिसते."[५] दशावतारी लोककलेच्या माध्यमातून कोकणी जीवन, तिथली बोलीभाषा, संस्कृती, निसर्गावर अवलंबून असणारी मासेमारी, कोकणी लोकांची प्रवृत्ती, तिथला भौगोलिक प्रदेश, त्या प्रदेशाची असणारी सांस्कृतिक भूवैशिष्ट्ये लेखकाने शब्दबद्ध करताना ही सारीच पारंपरिक संस्कृतीचे रूपे या जागतिकीकरणाच्या परिणांमामुळे कशी बदलत चाललेली आहे, आणि त्यामुळे कोकणाची पारंपरिक संस्कृती कशी लोप पावत चाललेली आहे, याचे अतिशय सूक्ष्मपणे चित्र केले आहे.

**कादंबरीतील सामाजिकता :-**

समकालीन समाजजीवनाचे अत्यंत बोलकी चित्रण करणारी, वास्तववादी कोकणी जीवनदर्शन घडवणारी ही कादंबरी मराठी साहित्यातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण कलाकृती आहे. जागतिकीकरणाच्या अर्थव्यवस्थेने शोषणाची एक व्यवस्था निर्माण केली. समाजकारणी व राजकारणी हातात हात घालून, ही शोषण व्यवस्था अधिकाधिक मजबूत करतात. आर्थिक व भौतिक सुखाच्या हव्यासापायी समाजव्यवस्था खिळखिळी करून सोडतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मानवाला प्राप्त झालेले वस्तूचे

मोल, पारंपरिक उद्योगधंदे बंद पडल्याने, बेकार झालेला तरुण वर्ग, या बेकारीमुळे, भ्रष्टव्यवस्थेच्या व व्यसनाधीनतेच्या आहारी गेलेला समाज, हिंसक गुंड प्रवृत्ती, बुद्धिजीवी लोकांची उदासीनता, एक क्रयवस्तू म्हणून कोकणाकडे पाहणारा राजकारणी वर्ग हे सारेच अत्यंत संवेदनशीलपणाने लेखकाने कादंबरीत मांडले आहे. या संदर्भात स्वतः हा प्रवीण बांदेकर चाळेगत मध्ये व्यक्त होताना लिहितात की, " माझ्या मुलखात घडणाऱ्या या गोष्टी असं जरी मी म्हणत असलो, तरी देशाच्या कुठल्याही भागात हे असंच, यासारखंच घडत होतं, राजकीय हत्या, धार्मिक आणि जातीय संस्थांचं समाजातलं वाढतं प्रस्थ, चिमटीभर विकासाच्या नावाखाली भूमिपुत्रांचं विस्थापित होतं जाणं, खेड्यांचा आणि देशी संस्कृतीचा ऱ्हास, शहरीकरण, चंगळवाद आणि गुन्हेगारी, विचारांची जागा आक्रमकतेनं घेणं, विचार करू शकणाऱ्या संवेदनशी लोकांचं औदास.... हे तर थोड्या फरकानं सगळीकडेच दिसत होतं."[६] बांदेकरांचे हे म्हणणे जागतिकीकरणाची सर्वसामावेशकता तर स्पष्ट करतेच, पण त्याचबरोबर संपूर्ण व्यवस्थेला खिळखिळी करू पाहणारे हे जागतिकीकरण किती भयावह आहे, हे ही स्पष्ट करते. कोकण, तिथला व्यवसाय, लोकसंस्कृती, लोकजीवन, राजकारण, समाजकारण, अर्थकारण ही एक साखळी असून, ती स्वतंत्र नाही. तर ही प्रत्येक व्यवस्था परस्परावलंबी व परस्पर पूरक आहे. कोकणासारख्या साऱ्यात भौगोलिक, प्रादेशिक प्रदेशांची ही स्थिती आहे. आज भांडवलशाही अर्थव्यवस्था जगाच्या बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी एक जीवघेणी भ्रष्ट व्यवस्था निर्माण करत आहे. निसर्गाचा बेछुट वापर करून स्वतःचे भविष्य धोक्यात आणत आहे.

कोकणातील समाजाजीवन आणि समाजजीवनावर जागतिकीकरणाचा झालेला परिणाम स्पष्ट करताना भांडवलशाही यंत्रसंस्कृतीने श्रमसंस्कृतीवर आक्रमण करून समाजाचे गरीब व श्रीमंत या वर्गात विभाजन केले आहे. श्रीमंत वर्ग भांडवलशाही भ्रष्ट समाजव्यवस्थेचे, नव्या छुप्या कारस्थानी व्यवस्थेचे, सत्ताधीश गटाचे प्रतिनिधित्व करतो. तर गरीब वर्ग हा शोषण व्यवस्थेचे, दुर्बल घटकाचे, श्रमसंस्कृतीचे प्रतिनिधित्व करतो. समाजाची ही विषम रचना समाजाला विघातक ठरत आहे. 'खाऊजा' हा जागतिकी संस्कृतीचा, समाजव्यवस्थेचा पाया आहे. जिथे माणसांनाही मूल्य प्राप्त झाले आहे. जी व्यवस्था माणसाने निर्माण केली, तीच व्यवस्था आता अतिहिंसक बनून मानवालाच त्याच व्यवस्थेचा एक भाग बनवत आहे. त्यामुळे माणूस स्वतःची संवेदनशीलता हरवून बसला आहे. चाळेगत मधून येणारी ही जाणीव आपल्याला विचार प्रवृत्त तर करतेच, पण या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत अपरिहार्यपणे वाटचाल करत असताना, आपण आपल्या समाज व संस्कृतीचे संरक्षण केले पाहिजे, तरच माणूस म्हणून असणारी एक स्वतंत्र ओळख आपण हरवून बसणार नाही. आजच्या भौतिक समाजव्यवस्थेचे चित्रण करताना या व्यवस्थेने एका बाजूला समाजाला प्रगतीपथावर नेण्याचा मार्ग पत्करला, तर दुसऱ्या बाजूला मानवी जीवनाला अगतिकतेच्या, असंवेदनशीलतेच्या शोषणाच्या दारासमोर आणून उभे केले. चाळेगत मधून येणाऱ्या या एकाच नाण्याच्या दोन बाजू मराठी साहित्याला पूरक ठरतील असे वाटते.

## संदर्भसूची

१) 'आजची कादंबरी: नोंदी आणि निरीक्षण', रंगनाथ पठारे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथम आवृत्ती २०१४, पृष्ठ क्रमांक १५
२) तत्रैव, पृष्ठ क्र २१
३) तत्रैव, पृष्ठ क्र २२६
४) 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य', संपा. डॉ. शरद गायकवाड, प्रा.सुनील शिंदे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती २००९, पृष्ठ क्रमांक ११०
५) 'आजची कादंबरी: नोंदी आणि निरीक्षण', रंगनाथ पठारे, उणी पृष्ठ क्रमांक २२८
६) 'चाळेगत', प्रवीण बांदेकर, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, दुसरी आवृत्ती २०१४ पृष्ठ क्रमांक ४०-४१

# नव्वदोत्तर मराठी कथेतील वृध्दांच्या समस्यांचे चित्रण

**डॉ. विठ्ठल नामदेव रोटे,**
मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव
ता. वाळवा,जि. सांगली ४१५४१३
मेल – vnrote@gmail.com

**प्रस्तावना -**

कुटूंबातील वृध्द स्त्रीपुरुषांचे चित्रण नव्वदोत्तर मराठी स्त्रिलिखित कथांत येते. कुटूंबातील वयाने प्रौढ असलेल्या स्त्रीपुरुषांना आपल्या मतानुसार राहण्याची सवय असते. पण अलिकडच्या तरुणांना, मुलगा, सूनांना वृध्दांचे विचार, मत पटत नाही किंवा ते त्यांना पटवून घेत नाहीत. काही वेळेला घरात वृध्द स्त्रीपुरुष एकटेच असतात. त्यांचा समस्या तर वेगळ्याच असतात. त्यांची काळजी करणारे कोणीही नसते. वृध्द स्त्रीपुरुष कोणाच्या तरी संगतीची गरज लागते. अशा वृध्द स्त्रीपुरुषांच्या समस्या आपल्या कथांतून१९९० नंतरच्या कथेत लेखिका मांडतात.

**वृध्दांच्या समस्यांचे चित्रण**

आशा बगे सोबती' या कथेतून वृध्द डिसूझा या स्त्रीचे चित्रण करतात. डिसूझा एकट्याच राहतात, त्यांना कॅन्सरसारखा दुर्धर आजार झालेला आहे. पण त्यांच्या आजाराबद्दल, तब्येतीबद्दल विचारले की त्यांना राग येतो. त्यांच्या मुलीही त्यांच्याजवळ राहत नाहीत. मात्र त्या आपले घर व्यवस्थित ठेवतात. आपल्या घरी कुणी आलेले त्यांना आवडत नाही. दिवसेंदिवस त्यांची तब्येत बिघडत जात असताना मात्र त्या आपला स्वभाव बदलत नाहीत. आशा बगे यांच्या 'काही पाने' या कथेतील स्वतः निवेदक व त्याची पत्नी वृध्द आहेत. पण एकमेकांपासून वेगळे राहतात. एकमेकांचे विचार पटत नसल्याने दोघे दोन मुलाकडे राहतात. त्यांचा मुलगा हरीषला मात्र आईवडीलांनी एकत्र रहावे असे वाटते. पण कोणी कोणाकडे जायचे हा दोघांकडे प्रश्न. तरीही निवेदक स्वतःहून आपल्या पत्नीकडे मनोरमाकडे जातो. तरीही मनोरमा अबोला धरते. नंतर मात्र निवेदकाच्या आजारपणात मनोरमा त्याची काळजी घेते, मने जुळत जातात. आपल्याला नातू होणार की नात याविषयावर चर्चा करतात. निवेदक पत्नीला म्हणतो," आपल्या दोघांपैकी कुणीतरी एकजण आधी जाईल. तर कुणी आधी जायचं ? म्हणजे मेलं तर सोईचे होईल? तर मनोरमा म्हणते, "मला तसं मरायला वेळ नाही सध्या आणि मला मरणं सोईचंही नाही. तसं कुणालाही सौभाग्यानंच जाणं आवडेल, पण आजकाल वाटतं तुम्हीच आधी जावं.वाईट काही सोसायची मानसिक ताकद बायकातच जास्त असते. दैनंदिनी स्वरुपात लिहीलेल्या या कथेत वृध्द स्त्रीपुरुषांच्या अहंकार व प्रेमाचे चित्रण येते.

साधना कामत यांच्या 'जोडी' या कथेत प्रविण आपल्या सासऱ्यांना घरी आणतो. सासरे नाना एकटेच आहेत. त्यात वय झाल्याने दृष्टी कमजोर झालेली, ऐकायला कमी पण प्रविणचे वडील तात्या नानांना नाखुशीनेच आपल्या खोलीत ठेऊन घेतात. नाना व तात्याचे विचार वेगळे असल्याने दोघांच्यात नेहमीच वाद होतात. प्रत्येकाच्या आवडी निवडी परस्पर विरोधी असल्याने एकमत होत नाही. नंतर मात्र नाना व तात्या एकमेकांना समजून घेतात. नाना रस्त्यावर पडल्यानंतर त्यांच्या मेंदूला रक्तपुरवठा होत नाही. त्यावेळी तात्याच त्यांची काळजी करतात. वृध्दापकाळात एकमेकांना हवी असणारी साथसोबत तात्या व नाना एकमेकांना देतात. 'सायरनचे गाणे ' या कथेत साधना कामत अण्णा व ताई यांचे चित्रण करतात. अण्णा व ताई यांना तीन मुले, त्यातील दोन मुले परदेशात जातात. पण शेवटचा मुलगा आपल्या जवळ रहावा असे त्यांना वाटते. पण अण्णांचे मित्र केरकरच्या घरची सासू सुनांची भांडणे पहाता केरकर अण्णांना सुखी समजतात. अण्णांना आपल्या शेवटच्या क्षणी कुणीतरी जवळ असावे असे वाटते. आपली मुलं आपल्याजवळच असावी अशी अपेक्षा करणाऱ्या अण्णांचे चित्रण साधना कामत करतात.

"संशय का मनी' या साधना कामतांच्या कथेत नाडकर्णी सर व विजयाबाई यांचे चित्रण येते. नाडकर्णी सर व कल्याणीबाई पतीपत्नी आहेत. दोघांनी अतिशय कष्टाने संसार केला. पण मुले नाहीत. त्यातच कल्याणीबाईंचा मृत्यू होतो. नाडकर्णी सर पुण्यात येतात. तेथे विजयाबाईंबरोबर ओळख होते. नाडकर्णी विजयाबाईशी लग्न करण्याचा विचार करतात.पण नाडकर्णी सरांच्या मनात विजयाबाईबद्दल संशय येतो. आपल्या पैशावर त्यांची नजर असेल म्हणून विजयाबाईंना ते टाळतात. काही दिवसानंतर

विजयाबाईंचा मृत्यू होतो. एकटया असल्याने डिप्रेशनमध्ये जातात व मृत्यू होतो. त्यांची भरपूर संपत्ती असते. नाडकर्णी सरांचे एकटेपण व त्यांचा दुसऱ्यावरील अविश्वास यांचे चित्रण या कथेत येते.

सानियांच्या 'माधवी' कथेतील पत्नी निधनानंतर एकटे पडलेले श्रीनाथ यांचे चित्रण येते. श्रीनाथ आपल्या मुलग्याकडे येऊन राहतात. तिथे त्यांना पूर्वाश्रमीची मैत्रीण माधवी स्वप्नात येते. पण बोलत नाही. आता ती कुठे आहे हे त्यांना माहीत नाही. सकाळी फिरायला गेल्यानंतर माधवीसारखी हुबेहूब दिसणारी मुलगी दिसते. तिचे नाव शशी असते. तिला तीन मुली असतात. शशीमध्ये माधवीला पहात असल्याने शशीच स्वप्नात येते. शशीबरोबर ते शरीरसुखाची कल्पना करतात. पत्नीच्या मृत्यूनंतर त्यांनी शरीर सुख घेतलेले नसते. वृध्दापकाळात कुणाची तरी साथ हवी अशी अपेक्षा करणाऱ्या श्रीनाथचे चित्रण सानिया करतात.

शकुंतला कश्यप यांच्या 'विदीर्ण संध्याकाळ' या कथेत मुलग्याकडून फसवणूक झालेल्या नाना माईचे चित्रण येते. नाना माईंनी किशोरला अत्यंत कष्टाने वाढविलेले असते. किशोर अमेरिकेला जाऊन तिथेच रोझाबरोबर लग्न करतो. भारतात येऊन किशोर माईना खोटे सांगून घर विकायला लावतो. अमेरिकेला दोघांना घेऊन जाण्यासाठी विमानतळावर घेऊन जातो. तेथे दोघांना ठेऊन अमेरिकेला जातो. स्वतःच्या मुलाने फसवील्याने नाना माईना धक्का बसतो. नंतर किशोर भारतात परततो व नाना माईची माफी मागतो. पण दोघेही किशोरला माफ करीत नाहीत.

रेखा राव यांच्या 'गवसलेला सूर' या कथेत शांताबाईचे चित्रण येते. शांताबाईचा मुलगा व सून नोकरी करीत असल्याने नातवंडांना व घराला सांभाळतात. शांताबाईंना वाचनाची आवड आहे. मिळेल ते पुस्तक वाचतात पण मोतिबिंदू झाल्याने व्यवस्थित दिसत नाही. त्यामुळे केलेल्या कामात, जेवणात चुका होतात. मुलग्याचे बोलून घ्यावे लागते. त्यातच शांताबाईंना पेटीची आठवण होते. मुलग्याकडे परवानगी घेऊन पेटीचा तास लावतात. त्यातून शांताबाईंना आनंद मिळतो. रेखा राव यांच्या 'आठवते का?' या कथेत शालिनीचे चित्रण येते. विष्णूशास्त्री पुरानिकाचे व्याख्यान ऐकायला गेलेल्या शालिनीला हेमा भेटते. हेमा ही शालिनीच्या मित्राची दिनकरची मुलगी असते. त्यामुळे शालिनी दिनकरबद्दल भरभरुन बोलते वरून हेमाला शालिनी व आपल्या वडीलांचे प्रेम वगैरे होते का अशी शंका येते.

वृंदा दिवाण यांच्या 'नेणिवेच्या प्रदेशात' या कथेत अस्मिताच्या आईचे चित्रण येते. अजय अस्मिता पती पत्नी असून अस्मिताची आई एकटीच राहते. त्यांना झोपेची आवड आहे. पण पती निधनानंतर व वयोमानानुसार त्यांना झोप लागत नाही. डॉक्टरांनी उपचार करुन झोप येत नसेल तर झोपेची गोळी दिली होती. पण एक दिवस त्या सात/आठ गोळ्या खातात. तीन दिवसांनी त्यांना जाग येते तर त्या मृत्यूतही नव्हत्या ना त्या बेशुध्दावस्थेतही नव्हत्या.

चित्रलेखा पुरंदरे यांच्या 'देणगी' कथेत वसुधा आपटेंचे चित्रण येते. वसुधाला सुरुवातीला नारायण आपटेंचे स्थळ आले होते. पण वसुधाने त्यांना नकार देऊन गंगाधर आपटेंशी लग्न केले होते. गंगाधर आपटेंनी भरपूर संपत्ती गोळा केली होती. पण त्यांना मुले नव्हती. गंगाधरांच्या मृत्यूनंतर वसुधा वृध्दाश्रमाला देणगी देते. तर नारायण आपटेंनी लग्नच केले नव्हते. नारायण आपटेंचा पुतण्या केदारची इच्छा असते की नारायण व वसुधाने पुन्हा लग्न करावे. कारण दोघांनाही कुणाची तरी साथ हवी होती.

नीलिमा भावे यांच्या' वाढदिवस' या कथेत अण्णांचे चित्रण येते. अण्णांच्या मुली लहान असतानाच त्यांच्या पत्नीचे निधन होते. त्यानंतर अण्णांनीच मुलींना वाढवले. त्यांचे चांगल्या घरी लग्न केले. अण्णा मात्र एकटेच रहात. दृष्टी अंधुक, वय झाले तरी एकटेच रहात. अण्णांना डबा घेऊन आलेल्या त्यांच्या मुलीच्या उषाच्या लक्षात अण्णांचा वाढदिवस रहात नाही. वृध्दापकाळात एकटे असणारे अण्णांचे चित्रण या कथेत येते. नीलिमा भावे यांच्या 'वियोग' कथेतील पत्नीच्या मृत्युनंतर व वृध्दावस्थेत शारिरीक वासनेच्या आहारी जाणाऱ्या शामरावांचे चित्रण येते. नाना व माई दोघेही वृध्द आहेत. नानांचे मित्र शामरावांच्या पत्नीचे निधन होते. पत्नीच्या मृत्यूने दुःखी झालेल्या शामरावांचे सांत्वन नाना करतात. त्यानंतर शामराव नेहमीच नानाकडे येतात. माईही शामरावांना खायला वगैरे देतात. शामरावांना त्याच्या घरात व्यवस्थित जेवण मिळत नसल्याने नाना व माई शामरावांना आग्रहाने जेवायला वाढीत असत. पण एके दिवशी माई पाणी देत असताना माईच्या हाताला स्पर्श होतो. माईना तो स्पर्श वासनेचा वाटतो. त्यांनतर माई शामरावांना टाळू लागल्या. तीन महिन्यांनी वयाच्या सत्तरीत शामराव पुन्हा लग्न करतात. याचे आश्चर्य माई व नानांना होते. नीलिमा भावे यांच्या 'दिवस जाय बुडून पार' या कथेत भारतीय संस्कृती मानणारे अमेरिकन कुटूंब व त्यांच्यातील आजोबांचे चित्रण येते. अष्टविनायक दर्शन सहलीसाठी अमेरिकन कुटूंब आलेले असते. भारतीय संस्कृती परंपरेचा आव आणणारे कुटूंब आपल्या आजोबाचे प्रवासात हाल करतात. प्रवासात आजोबांना नेहमी खाली उतरावे लागे. एकदा त्यांचा मुलगा जातो. नंतर मात्र आजीच

आजोबांबरोबर जातात. प्रवासाची दगदग, अवेळी खाणे त्यामुळे आजोबांना अपचनाचा त्रास होतो. जवळजवळ अर्धा तास आजोबा शौचालयात बसतात. आजोबांना यापूर्वी दोन वेळा हृदय विकाराचे झटके आलेले असतात. नंतर आजोबांना उलटया होतात. त्यावेळी आजोबा व आजीची झालेली अवस्था मुलगा, सुन, नातवंडे फक्त पहातच बसतात.

नीलिमा भावेंच्या 'तक्षक' कथेत ८५ वर्षाच्या अण्णांच्यातील वासनेचे चित्रण येते. अण्णांच्या पत्नीचे निधन झाल्यानंतर ते मुलगा विश्वासकडे राहतात. अण्णांची खोली आवरताना मोलकरणीला बेडखाली अश्लील मासिक सापडते. विश्वासची पत्नी जान्हवीला अण्णांच्या विकृतीबद्दल शंका असते. विश्वास जान्हवीचे लग्न झाले तेव्हा ते दोघे एकांतात असताना वस्तू मागण्याच्या निमित्ताने अण्णा दार ठोठावयाचे. जान्हवी अंघोळ करुन येताना ब्लाऊज व परकरवर आपल्या खोलीत जात असे. ते पाहण्यासाठी अण्णा मुद्दाम थांबत. विश्वासने अण्णांना आपल्या बहिणीकडे पाठविले तेथेही कामवाली मुलीबरोबर अण्णा लगट करण्याचा प्रयत्न करतात. वृध्दापकाळातही शारिरीक वासनेच्या आहारी गेलेल्या अण्णांचे चित्रण नीलिमा भावे करतात.

मोहिनी वर्दे यांच्या 'प्रस्ताव' या कथेत पती निधनानंतर एकटया असणाऱ्या श्रीमती शेंडेबाईंना एकटेपणा जाणवतो. मुलगी शितलचे लग्न झाले आहे तर मुलगा जयंत लग्न करणार आहे. श्री ठोसरही विधूर आहेत. शेंडेबाई शाळेत प्रिन्सिपल होत्या. शाळेसाठी भरपूर कष्ट केल्याने संस्थेने त्यांना पेन्शनबरोबर अधिकची रक्कम दिलेली होती. ठोसरही आपल्या कामातून निवृत्त झाले आहेत. त्यांना मुले नाहीत. त्यामुळे ठोसरांना अधिकच एकटेपणा जाणवतो. त्यामुळे ठोसर व शेंडेबाई पुन्हा लग्न करण्याचा विचार करतात. पण ठोसरांच्या व आपल्यातील मतभिन्नता, ठोसरांच्या अतिसावध विचारांमुळे शेंडेबाई लग्नाचा प्रस्ताव नाकारतात. वसुंधरा घाणेकरांच्या 'मी पण माझे' या कथेतील बापूंचा स्वभाव अहंकारी आहे. बापू निवृत्त असून आजपर्यंतचा अहंकारी स्वभाव त्यांना बदलायचा आहे. कारण बापूचा मुलगा सुनंदन लहान असताना बापूंची पत्नी फारच आजारी होत्या. त्यावेळी नोकरी सांभाळत मुलांची शाळा, घरातील काम, पत्नीची सेवा बापू करीत. तरीही अहंकारवृत्ती त्यांच्यात होती. पत्नीच्या निधनानंतर मात्र बापू एकटे पडतात. आपल्यातील अहंकार काढून टाकण्यासाठी अध्यात्म व देवपूजेत गुंतवून ठेवतात. स्वतःतील दुर्गुणाची जाणीव असणाऱ्या बापूंचे चित्रण वसुंधरा घाणेकर करतात.

अनुराधा पावसकर यांच्या 'एक होती आजी' या कथेतील आजी आपल्या लेकीच्या मुलांवर प्रेम करणारी व मुलग्याच्या मुलांचा द्वेष करणारी आहे. आपल्या नातवंडात दुजाभाव करणारी आजी पहायला मिळते. माधवी सामंत यांच्या 'साखरपेंडी' या कथेतील अण्णा नोकरीतून निवृत्त झाले आहेत. पत्नी उमा, प्रशांत व सुशांत या मुलांबरोबर मुंबईत राहतात. मुळचे कोकणातले असणारे अण्णा निवृत्तीनंतर कोकणातल्यासारखे साखरपेंडी घर बांधण्याचे ठरवितात. पण घरच्यांचा विरोध आहे. तरीही अण्णा आपल्या मनासारखेच घर बांधून घेतात. मुंबईत राहूनही कोकणातले संस्कार न विसरणाऱ्या अण्णाचे चित्रण या कथेत येते. स्वाती चांदोरकर यांच्या 'हरवले आहेत' या कथेतील किशाकाका कुणालाही न सांगता घरातून निघून जातात. काकू एकटयाच घरात असतात. त्यांचा मुलगा केदार परदेशात गेला आहे. त्यामुळे किशाकाकांच्या निघून जाण्याने काकू भयभीत होतात.

**समारोप -**

एकूणच आशा बगे (सोबती, काही पाने), साधना कामत (जोडी, सायरनचे गाणे, संशय का मनी ?), सानिया (माधवी), शंकुतला कश्यप (विदीर्ण संध्याकाळ), रेखा राव (गवसलेला सुर, आठवते का?), वृंदा दिवाण (नेणिवेच्या प्रदेशात), चित्रलेखा पुरंदरे (देणगी), नीलिमा भावे (तक्षक), मोहिनी वर्दे (प्रस्ताव), वसुंधरा घाणेकर ( मी पण माझे), अनुराधा पावसकर (एक होती आजी), माधवी सामंत (साखरपेंडी), स्वाती चांदोरकर (हरवले आहेत) इ. लेखिकांनी आपल्या कथेत वृध्दांचे प्रश्न, त्यांच्या समस्या मांडलेल्या आहेत. वृध्दापकाळात येणारे प्रश्न, अडचणी, कुटुंबातील त्यांचे स्थान वृध्दांचा मानसन्मान या सर्वावर लेखिकांनी प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ सूची -**

१.सोमण, अंजली, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९
2. नाईक शोभा, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद- स्त्रीवादी समीक्षा आणि उपयोजन, लोकवाङ्मय गृह, मुंबई, प्रथमावृत्ती, जून २००७
3. राजापुरे तापस, पुष्पलता (संपा.) १९८० नंतरचे स्त्री निर्मित कथनपर साहित्य, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्रथमावृत्ती, डिसेंबर २०१०

# सुभाष भेंडे यांच्या कादंबरीतील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ

**डॉ. पांडुरंग गावडे**
बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय , वेंगुर्ला

**प्रस्तावना**

कथा आणि कादंबरी या साहित्यप्रकारात काही समान गुणधर्म असले तरी कथा व कादंबरी हे दोन्ही स्वतंत्र साहित्यप्रकार आहेत. कादंबरी ही विस्तृत भाषिक अवकाश असलेला साहित्यप्रकार आहे. मानवी जीवन हा कदंबरीचा अनुभव विषय आहे. हा अनुभव जसा वास्तव, लौकीक स्वरूपाचा असतो. दर्शन सखोल घडत असते. मराठी कादंबरी क्षेत्रात विविध विषय आणि आशय असलेल्या दर्जेदार कादंबरी लेखनाची परंपरा आहे. विशेषत: राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्याइतपत त्यांचे लेखन झालेले आहे. समाजातील प्रत्यक्ष जगण्याचे प्रश्न आणि त्यातील गुंतागुंत कादंबरी या साहित्य प्रकारात हाताळलेली आहे. गोव्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचे दर्शन सुभाष भेंडे यांच्या कादंबरीतून घडते.

**गोव्यातील सामाजिक आणि सांस्कृतिकजीवन**

महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोवा या तीन स्वतंत्र राज्यांच्या निर्मितीपूर्वीचा काळ विचारात घेता गोवा आणि कर्नाटक, महाराष्ट्र यांच्या सीमारेषेवर सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन कमालीचे समान आहे. गोव्याला लागूनच असलेल्या आजच्या सिंधुदुर्ग जिल्ह्याचे आणि गोव्याचे जीवन समान आहे. शेती, मच्छिमारी व्यवसाय हा पारंपारिक व्यवसाय आणि आजकाल नव्याने निर्माण झालेला पर्यटन व्यवसाय अशा आर्थिक उत्पन्नाच्या समान संधी या प्रदेशाला लाभल्या आहेत. पारंपारिक कोकणी माणूस आहे त्या परिस्थितीत सुखी आणि समाधानी होता. देव धर्म, कुळाचार यांना प्राधान्य देणाऱ्या या प्रदेशात हजारो वर्ष चाललेल्या रुढी परंपरा आजही काहीशा टिकून आहेत. कोकणी माणसाच्या जगण्याचे संदर्भ लक्षात घेता तो देवभोळा आहे आणि आपले जगणे सागरी किनाऱ्यावरचे हे माणसाचे जगणे अत्यंत साधे तसेच ते निसर्गाच्या कृपेने आहे हीच धारणा आजच्या ह्या माणसांत आढळते. गोव्यात पोर्तुगाल यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत अनेक चर्च बांधले. धर्मपरिवर्तन करुन काहींना ख्रिश्चन केले तरी गोव्यातील धर्मनिष्ठ माणूस आपली संस्कृती, आपले श्रद्धास्थान यापासून वेगळा झाला नाही. परकीय आक्रमणाच्या काळात त्यांनी आपली संस्कृती जपली ती आजच्या जागतिकीकरणाच्या, पर्यटनाच्या आणि भोगवादी, विलासी जीवनमूल्यांच्या भडीमारातही अबाधित ठेवली आहे.

गोव्यातील समुद्रकिनारे, उंच उंच बांधलेले चर्च आणि गावागावात असलेली भव्यदिव्य मंदिरे पाहिली की गोव्यातील लोकांनी आपली सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जोपासली आहे. ही परंपरा गोव्यातील मराठी साहित्यिकांनी आपल्या साहित्यातून भरभरुन मांडली आहे. यामध्ये वि. स. सुखटणकर, जयवंतराव सरदेसाई, बा. द. सातोस्कर, बा. भ. बोरकर आणि सुभाष भेंडे यांनी आपल्या साहित्यातून गोव्यातील समाजजीवनाचे दर्शन घडविले आहे. या सर्व साहित्यिकांनी गोव्याचे वेगळेपण आणि तेथील निसर्ग समाज धार्मिक परिस्थिती श्रद्धा समजूती आपल्या साहित्यातून मांडल्या आहेत. गोव्यातील निसर्गाची भूरळ सर्वांनाच आहे. ती या लेखकांना होती. आंब्या- फणसाच्या , नारळी सुपारीच्या बागा गावागावात आढळणारे विस्तीर्ण तलाव त्या सभोवती भाटांनी व कुळकारांनी वेढलेली लहान लहान घरे प्रचंड खळखळात करणाऱ्या नद्या खाडीच्या किनाऱ्यावर खारट पाण्यावर वाढलेली तिवराची जंगले आणि गोव्यातील प्रत्येक घराच्या आजूबाजूची असलेली फुलांची बाग हे या ग्रामीण जीवनाचे वैशिष्ट्य आहे. इथल्या घरांची रचना मुख्य पाच- सात खोल्यांचे घर त्याला असलेली पडवी घराशेजारी लाकडाचा आणि नारळाच्य सोडणांचा ढीग आजूबाजूला माडाचे वासे, चुडते, अशा जुन्या आणि संपन्न घरांची रचना हे गोव्यातील वैशिष्ट अनेक साहित्यिकारांनी आपल्या साहित्यात मांडले आहे.

**सुभाष भेंडे यांच्या कादंबरीतील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ**

सुभाष वासुदेव भेंडे यांचा जन्म गोव्यातील बोरी या गावी ०४ ऑक्टोबर १९३६ साली झाला. प्राथमिक शिक्षण गोव्यात झाल्यानंतर ते पुढील शिक्षणासाठी सांगली व नंतर पुण्याच्या गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स ॲन्ड इकॉनॉमी मधून त्यांनी पीएच.डी. पदवी प्राप्त केली. प्राध्यापकाची सुरवात त्यांनी मडगाव चौगुले महाविद्यालयातून केली. मराठीतील विनोदी लेखक

म्हणून त्यांची ख्याती असली तरी त्यांनी 'आमचेगोंय' , अदेशी, अंधारवाटा, बॉनसाय , किनारा, दैलतीर, काजळल्या दिशा जोगीण सारखी गंभीर कादंबरीतून गोव्यातील सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रातील वास्तव मांडले आहे. त्यांच्या 'चषक आणि गुलाब' आणि 'गड्या आपुला गाव बरा ' यातून गोव्यातील समाजजीवनाचे दर्शन घडविले आहे. नोकरीच्या काळात त्यांनी बऱ्याचा देशांना भेटी दिल्या. त्यांच्या विश्वव्यापक अनुभवातून त्यांनी आपला गाव आपली माती आणि आपली संस्कृती आणि आपली पाहिलेली माणस वेगळीच आहे. माणूस आपला प्रदेश व गाव सोडून जगाच्या पाठीवर कुठेही गेला तरी त्यांनी आपल्या जन्मापासून अनुभवलेला प्रदेश आपला गाव ,निसर्ग, संस्कृति, आणि जीवाभावाची प्रसंगी मतभेद असलेली माणस जगाच्या पाठीवर कुठेही असलो तरी विसरता येत नाही. आपल्या आपल्या भावभावनांशी आठवणींशी एवढे घट्ट असतो की ते कितीही विसरु पाहिले तरी विसरता येत नाही. मानवी मनाचा हा हळूवारपणा आपलेपणा त्यांच्या ' गड्या आपुला गाव बरा ' यातून व्यक्त झाला आहे.

सुभाष भेंडे यांच्या 'जोगीन' ही कादंबरी त्याच्या इतर कादंबरीपेक्षा वेगळी आहे. बा. भ. बोरकरांनी गोव्यातील समाजजीवनाचे विशेषत: दुर्लक्षित असलेल्या स्त्रीयांच्या जीवनावर भावीण ही कादंबरी लिहिली. या कादंबरीने मराठी साहित्य क्षेत्रात आपले असे स्थान निर्माण केले . गोव्यातील दुर्लक्षित विषयाला समाजासमोर आणण्याचे काम बोरकरांनी केले. नंतरच्या काळात ते आघाडीचे कादंबरीकार राजन गवस यांच्या कादंबरीने केले आहे. 'चौंडक' ही राजन गवस यांची पहिली कादंबरी. या कादंबरीत अनिष्ट रुढी परंपरेने जगण्यात दु:ख आणि हालअपेष्टा सहन कराव्या लागणाऱ्या देवदासीच्या जीवनाची वास्तव कहाणी कादंबरीच्या रुपाने मांडली आहे. देवदासी म्हणून जगताना समाज आणि त्याच्या रुढी परंपरेने माणूसपण नाकारण्याचे दु:ख या जोगतीनी भोगतात. हे हजारो वर्ष रुढी परंपरेच्या नावाखाली चाललेले शोषण आहे. समाजातील कोणत्याच घटकाला या विषयी खंत नाही. उलट समाजच या रुढींना पोसतो. ही समस्या त्या समस्त समाजाची आहे याचे भान समाजाला नाही. समाज देवाधर्माच्या भोंडस नावाखाली कशाप्रकारे शोषण करतो हे या कादंबरीतून व्यक्त झालेले आहे. या त्यांच्या पहिल्याच कादंबरीने सामाजिक भान असलेले संवेदनशील कादंबरीकार म्हणून राजन गवस यांची ओळख निर्माण झाली. राजन गवस यांची 'भंडारभोग' ही दुसरी कादंबरी एका पुरुषाच्या आयुष्याचे दु:ख रुढी परंपरेने किती गहन केले आहे याचे दर्शन घडविले आहे. चौंडक आणि भंडारभोग या कादंबरीतून राजन गवस यांनी या गभींर प्रश्नाकडे वाचकाचे मन वेधले.

सुभाष भेंडे यांच्या ' जोगीण' या कादंबरीने गोव्यातील दुर्लक्षित अशा विषयाला समोर आणले असे म्हटले तरी ती गोव्यातल अनेक वर्षाच्या स्त्रीयांच्या परिस्थितीचे ते एक अंग आहे. इथल्या समाजमनावर जो धर्माचा पगडा आहे त्याचाच एक भाग म्हणून या कादंबरीचा विषय आहे. भावीण आणि जोगीण या दोन्ही कादंबरीचा विषय स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचा आहे. गोव्यातील पोर्तुगाल संस्कृती त्यामध्ये वर्षानुवर्षे चालत असलेल्या रुढी परंपरा अंधश्रद्धा आणि धर्माचे सोंग घेऊन स्त्रीयांना दुय्यम वागणूक देण्याची मनोवृत्ती या कादंबरीतून व्यक्त झाली आहे. गोव्यात ख्रिश्चन धर्मात स्त्रियांना दिलेली वागणूक या निमित्ताने त्यांनी समाजसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. रुढी पंरपरा आणि धर्माचा आसरा घेवून स्त्रीयाचे अन्याय व शोषण कसे होते ते दाखविले आहे.

**निष्कर्ष**

१ सुभाष भेंडे यांची कादंबरी गोव्यातील सामाजिक जीवनाचे दर्शन घडविते.
२ गोव्यातील सांस्कृतिक आणि भाषिक वैशिष्ट्ये त्यांच्या कादंबरीतून व्यक्त झालेली आहेत.
३ गोव्यातील माणसे बहुतांश नोकरी व्यवसायासाठी परदेशात गेली आहेत. तरी त्यांना आपल्या जन्मगावाविषयी असलेली ओढ सुभाष भेंडे नी त्यांच्या कादंबरीतून लेखन आलेले आहे.
४ सुभाष भेंडे यांनी गोव्यातील मध्यमवर्गीय जीवनाचे दर्शन घडविले आहे.
५ त्यांच्या कादंबरीतून गोव्यातील सामाजिक आणि धार्मिक जीवनाचे दर्शन घडते.
६ गोव्यातील हिंदू आणि ख्रिश्चन समाज कसा राहतो यांचेही चित्रण त्यांच्या कादंबरीतून घडले आहे.
७ सुभाष भेंडे यांनी समकालिन समाजव्यवस्थेचे दर्शन घडविले आहे.
८. गोव्यातील महानगराचे दर्शन घडवित असताना बदलत्या गोव्याचे दर्शन घडविले आहे.
९. परिवर्तनाच्या आजच्या काळातही गोव्याने आपली संस्कृती विसरलेली नाही हे त्यांच्या साहित्याने दाखवून दिलेले आहे.

१०. माती, नाती आणि निती यांचा अवलंब गोवेकरांनी पूर्वापार केलेला आहे. सुभाष भेंडे यांनी गोव्यातील समग्र समाज आणि संस्कृती यांचे बारकाईने निरीक्षण नोंदविलेले आहे.

**संदर्भ -**

१. शेळके भास्कर ,मराठी प्रादेशिक कादंबरी ,शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्र. आ. २०१२
२. पठारे रंगनाथ, आजची कादंबरी नोंदी आणि निरीक्षणे,शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्र. आ. २०१४
३. भोसले द.ता. , ग्रामीण साहित्य एक चिंतन , मेहता पब्लिकेशन हाऊस पुणे, प्र. आ. १९८८
४. मुलाटे वासुदेव , ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा ,स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्र. आ. २००५

# २१ व्या शतकातील मराठी कवितेतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

(२०११ ते २०२३ या कालखंडातील युवा साहित्य अकादमी पुरस्कार पाप्त मराठी कवी आणि त्यांच्या साहित्यकृतीच्या अनुषंगाने)

**प्रा. डॉ. मीनाक्षी देव – निमकर**
मराठी विभाग प्रमुख, सहयोगी प्राध्यापक
डॉ.सौ.इं.भा.पा. महिला कला महाविद्यालय,
औरंगाबाद
Email : meenakshideo18@gmail.com

**प्रास्ताविक :**

२१व्या शतकातले युवा मराठी कवी सद्यकालीन वर्तमानाचा वेध घेत कसदार आणि नव जाणिवांचे सशक्त लेखन सामाजिक भान ठेवीत करीत आहेत, आपली संस्कृती, आपली मूल्ये यांचा शोध आपल्या लेखनातून घेत आहे.

जागतिकीकरणाच्या आजच्या युगात आधुनिक तंत्र माध्यमांमुळे ज्ञान प्रक्रियेचे माध्यम बदलले आहे. २१ व्या शतकातील माध्यमक्रांतीतून इंटरनेट, मोबाइल या संपर्क माध्यमांद्वारे अभिव्यक्त होणारा युवा आणि त्याचे साहित्य असा एक नवा साहित्य विचार उद्याला येत आहे. समाज माध्यमावर उत्तम, दर्जेदार, मर्मग्राही लेखन करणारे तरुण आज जगभर विखूरलेले आहेत. सद्यकाळाच्या स्वर त्यांच्या लेखनात उमटत आहे. नवे नवे ताजे, ज्वलंत विषय हाताळत हे युवा लेखक लिहित आहेत.

गेल्या २ हजार वर्षापासून विविध भाषांचे संस्कार आणि आधार घेत मराठी भाषेचा महावृक्ष महाराष्ट्र भूमीत रुजतोय वाढतोय, फोफावतोय या महावृक्षाला सर्जनशीलतेची जिथून नवी पालवी फुटते ती पालवी जोपासली. लक्ष देऊन वाढवली तर हे झाड अधिक बहरेल, डवरेल हिरव्यागार, डेरेदार या वृक्षाखाली बसणाऱ्यांना वास्तवाची जाणिव होऊन सुखद गारव्याची झुळुक अनुभवता येईल.

१९६० पर्यंत मराठी साहित्यात भाषेचे सौष्ठव, शब्द लालित्य, भावसौंदर्य, कल्पनारम्य गोडवा या गोष्टींना महत्त्व होते. १९६० नंतर मात्र सखोल जीवनानुभूतीचं, ज्वलंत सामाजिक समस्या मांडणाऱ्या साहित्याला महत्त्व प्राप्त झालं २००० नंतर स्वान्त सुखाय लिहिण्यापेक्षा परखड ज्वलंत वास्तव मांडणारं समाज हिताचं, सामाजिक सांस्कृतिक मूल्यभान जागृत करणारे साहित्यानुभव मनाचा ठाव घेणारे ठरत आहेत.

समाजातील बदल हे अपरिहार्य असतात. ते स्वीकारावेच लागतात यातून निर्माण झालेल्या सामाजिक प्रेरणाच लेखनासाठी प्रवृत्त करतात, अशा सद्यकालीन वास्तवाचा साहित्यकृतीतून घेतलेला वेध, त्यामधून व्यक्त झालेला आशय, हा महत्त्वाचा असतो. ज्या युवा लेखकांनी आपल्या साहित्यकृतीत समाज जाणिवांचा आणि बदलत्या सांस्कृतिक मूल्यांचा वेध घेतला त्या साहित्यकृतीवर साहित्य अकादमी पुरस्काराची मोहोर उमटली आहे. जे सत्त्व युक्त, कसदार, दर्जेदार, बहूजन हिताय आहे. ज्या युवा कवींनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेने काव्य लेखन केले त्यांच्या काव्यकृतींना, कलाकृतींना शाबासकीची आणि कौतुकाची थाप साहित्य अकादमीने युवा पुरस्काराच्या निमित्ताने मिळाली आहे.

२१ व्या शतकात आपल्या आसपासच्या, परिसरातल्या परिस्थितीतल्या, कुटुंबातल्या माणसांच्या व्यथा वेदना समस्या, जगण्यासाठी त्यांना कराव्या लागणाऱ्या कष्टांचा, संघर्षांचा आलेख आपल्या लेखनातून प्रभावीपणे हे युवा कवी मांडत आहेत. एकविसाव्या शतकात वाटचाल करताना भौतिक सोयी सुविधा अत्याधुनिक तंत्रज्ञान यामध्ये वाढ झाली पण माणूस माणसापासून दूरावला, गोर गरिबांच्या हाल अपेष्टा, सर्वसामान्यांचे दु:ख, त्यांच्या समस्या गंभीर बनल्या आहेत.

पैसा हेच आजच्या काळात एक महत्त्वाचे जीवन मूल्य बनलेले आहे. संवेदनशील असणे, भावनाशील असणे हे बावळटपणाचे लक्षण मानले जात आहे. प्रत्येक घटनेला, व्यवहाराला पैशामध्ये तोलले जात आहे. त्यामुळे भ्रष्टाचार, कामचूकारपणा, अप्रामाणिकपणा गैरव्यवहार सर्वच स्तरांवर पहायला मिळात आहे. परिणामी सर्वसामान्य लोक, शेतकरी, कामगार, भटका - विमुक्त समाज, स्त्रिया आजच्या परिस्थितीपुढे हतबल होत आहेत. साहित्याच्या क्षेत्रात सजग असणारे युवा कवी आजुबाजूच्या परिस्थितीची चिकित्सक पणे अवलोकन करून आत्मभाव आणि समाजभान ठेवून सामाजिक बांधिलकीच्या

भावनेने शेतकऱ्यांचे, कामगारांचे, भटक्या विमुक्त समाजाचे, स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांचे, महानगरीय समाज जीवनाचे प्रश्न, समस्या हिरीरीने आणि प्रामाणिकपणाने आपल्या लेखनातून मांडत आहेत, अशा सर्जनशील व सामाजिकभान असणाऱ्या नवलेखकांची दखल राष्ट्रीय स्तरावर साहित्य अकादमी युवा पुरस्काराच्या रूपाने घेतला जात आहे ही अभिनंदनाची व समाधानाची बाब आहे.

**सद्यकालीन युवा कवी आणि त्याच्या कवितेतील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ :**

२१व्या शतकाच्या पहिल्या दोन दशकात देशातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील, माहिती तंत्रज्ञानातील प्रगती, अस्थिरता, असूर क्षितता या समाज वास्तवाचे चित्रण या काळातील तरुण कवींनी केले आहे. प्रत्येक जगण्यातून आलेल्या अनुभवाचे संदर्भ त्यांच्या कवितेतून आले आहे. २०११ ते २०२३ या कालखंडातील साहित्य अकादमी युवा पुरस्कार प्राप्त कवी आणि त्यांच्या कवितेतील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ समकालीन समाजवास्तव अधिक सक्षमपणे व्यक्त करतात.

उदाहरणार्थ : २०११ सालचा पहिला साहित्य अकादमी युवा पुरस्कार प्राप्त करणारे नाशिक जिल्ह्यातील चांदवड तालूक्यातील `पाटे' या खेड्यातील रहिवासी कवी ऐश्वर्य नामदेव पाटेकर आपल्या `भूईशास्त्र' कविते संग्रहातून सद्यकालीन शेतीची झालेली दूरावस्था, शेतकरी आणि कष्टकरी वर्गाच्या व्यथा - वेदना मांडतात.

ग्रामीण कृषी संस्कृतीतून आपल्या कवितेची जोपासना करीत मातीशी, शेतीशी, ग्रामीण संस्कृतीशी निगडीत प्रतिमा - प्रतिकांमुळे पाटेकरांची कविता अधिक खुलली आहे. कवी स्वत: शेतकरी असल्यामुळे शेतकऱ्यांचे दैनंदिन आयुष्य, काबाड कष्ट, दुष्काळाचे भयाणवास्तव कवीने नेमके पणाने टिपले आहे.

कवी म्हणतात, ``**जीव घेऊन पळणाऱ्या उंदरामागे माजरांनं लागावं, तसाच दुष्काळाचा बैल पाठीमागं लागल्या सारखा मी नुसता पळतो आहे.**'' किंवा

``**बियाणं मातीच्या पोटात टाकून निसूर होण्याचे दिवस कधीचेच संपून गेलेत, मातीची भूक बदललीय आणि चवीच्या गोष्टीही.**'' कवी रंजलेल्या - गांजलेल्या शेतकऱ्याचे दु:ख संत तुकारामांच्या कानावर घालतात कारण त्यांना सभोवताली कुठेही संवेदनशील माणूस दिसत नाही.

``**थांब तुकारामा, ऐक माझे पाठे, वैकुंठाशी घोडे दाटू नको माती ढेकळात जरी गुंते प्राण, साचलिती घाण तिचे काय? एकट्या टापूत नाहीच माणूस सारेच खवीस जित्राब गा।**''

शेतकऱ्याची शेतीची एकूणच ग्रामीण संस्कृतीची कुंचबणा गळचेपी होत आहे. यातून सुटकेचा कोणताच मार्ग कवीला दिसत नाही, तेव्हा कवी म्हणतात,

``**मुक्ते, ज्ञानाला ताटीचे अभंग सांगून तू वैफल्यातून बाहेर काढलेस, इथे ढेकळा धस्कटाच्या गुंतवळ्यातून मला कोणीच का सोडवन नाही.**''

अशी त्यांची कविता संवादी वाचकांशी थेट बोलणारी आहे, समग्र गावगाड्याचे व त्यातील भावभावनांचे चित्रिकरण कवी आपल्या कवितेतून उभे करतात.

२०१३ सालचा साहित्य अकादमी युवा पुरस्कार प्राप्त औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री तालुक्यातील जळगाव मेटे या गावचे रहिवासी कवी रवी कोरडे यांच्या `धुसर झालं नसतं गाव' या काव्य संग्रहातून आजच्या काळातले ज्वलंत प्रश्न आपल्या कवितून संदर्भासह व्यक्त करतात. पावसाची विविध रूपे चित्रित करतांनला कवी म्हणतात,

``**आम्ही चिंब भिजायचो वावर भिजल्यागत, धारांची दोरी धरून, जाऊन बसायचो, आभाळाच्या देशात, तू बरसायचास छप्पर फाटेस्तोर, तरी अंगणात नागव्याने विस्तव टाकला नाही कधीच**'' असे ग्राम समजूतीचे सांस्कृतिक संदर्भ ही त्यांच्या कवितेतून येतात.

पाऊस व्यवस्थित आणि चांगला झाला की बळीराजा सुखावतो त्याचे सणवार, लग्नकार्य ही दणक्यात साजरे होतात,

`` **तो जेव्हा येतो त्याला बोलवल्या दिवशी, कुणब्याचे सण ओघळू लागतात, जमिनीवर शिवार भर, पसरू लागतात. अक्षता लेकीच्या मांडवदारी, बैल पोळा सजवले जाई तोरणदारी**''

जागतिकीकरणामुळे पूर्वीचे शांतता प्रिय, स्वायत्त, भक्तीप्रिय गाव उजाड, उध्वस्त झाले आहे. गावातील राजकारण गाव पुढार्‍यांची चलती या तसेच कर्जमाफी, लोड शेडिंग, शेतमालास हमीभाव, पाण्याचा प्रश्न आणि स्वार्थी राजकारणी शासकीय घोषणा या बद्दल ही कवी वर्तमांनातील भिषण वास्तव कवितेतून नेमक्या शब्दातून मांडताना ``**सणांना यावेत शुष्क शुभेच्छांचे एस. एस. एस. तसे नुसता अक्षरांचा सांगाडा म्हणजे कशी होऊ शकेल कविता**'' असे आजच्या काळाचे संदर्भ नेमकेपणाने आणि अचूकपणाने देऊन वर्तमानाचे भीषण वास्तव कवी मांडतात.

२०१५ सालचा साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार वीरा राठोड यांच्या `सेनं सायी वेस' या मराठी कविता संग्रहाला प्राप्त झाला या कविता संग्रहात लमाण बंजारा समाजाचे जीवन, त्यांच्या चालीरिती, संस्कृती समस्या शब्दबद्ध केल्या आहेत.

तांड्यावरच्या बाया - बापड्या, माता भगिनी त्यांचे जीवन गरिबी, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, हाल अपेष्टा, अवहेलना, कुचंबणा सहन करीत करारी, कणखर बनतात. २१ व्या शतकातही या समाजातील उपेक्षित वंचित घटकातील स्त्रियांचा जगण्याच्या कक्षा रुंदावलेल्या नाहीत.

``**किती हौसेने तिने गोंदवून घेतला होता मोर तिला माहित नव्हते, भाबडी होती अजाणती अंगभर चरन जाईल हाच मोर म्हणून**'' किंवा

``**किती भयंकर लागलीय हपापी, बकासूरी, पोट काढून हे वर्तमान माणसंच गिळत सुटलंय, मारून टाकते, भावना बिवना, इच्छा - बिच्छा, बरंच काही शिल्लक ठेवते सापळा आडवा उभा अस्थिपंजर भणभणता.**``

या सारख्या कवितेतून कवीने वर्तमान परिस्थितीत माणसाचे वागणे किती बदलत चालले आहे ते व्यक्त करतात.

कवी आपल्या दु:खाला वेदनेला व्यक्त करताना संत तुकारामांकडे दान मागतात,

``**तुकारामा, तुझी शिवी माझ्या रक्तात भिनू दे, मला कबीराची पेरणी करायचीय शेतात, शेता शेतातून अभंगातील शब्दा शब्दातून, या हवेत तरंगत रहावंस युगानुयुगे, कारण ही हवा खूप दुषित झालीय. भळभळणारं दु:ख, उसळणारी उर्मी सळसळती वेदना काव्य रूपाने बाहेर पडू दे**'' या साठी तुकाराम जन्मभर पुरेल ऐवढा या कवितेतून वेदनेला व्यक्त करण्यासाठी काव्याचे दान मागतात''

२०१९ सालचा साहित्य अकादमी युवा पुरस्कार महानगरीय संवेदना हे मुख्यसूत्र असलेला सुशीलकुमार शिंदे यांचा ``शहर आत्महत्या करायचं म्हणतोय'' या कविता संग्रहाला प्राप्त झाला. मुंबई या महानगरातलं जीवन, ग्रामीण भागातून आलेल्या लोकांच्या वाट्याला तिथं येणारं उपेक्षित, नाकारलेपण, जातीय, धार्मिक तेढ, गिरणी कामगार, झोपडपट्टीत राहणार्‍या लोकांचे प्रश्न, महिलांवर होणारे अत्याचार - शोषण जगण्यात आलेलं भयात वास्तव कवी या कवितांसंग्रहात व्यक्त करतात.

``**या गचाळ शहराच्या कठड्यावर मी सोलून ठेवलाय माझा आत्मा, जसा सलीम अडकून ठेवतो कापलेला बोकड कत्तल खान्याच्या खुंटीवर.**''

खेड्यातून शहरात आल्यावर शहरात जे अनुभवलं ते संवेदनशील मनाने टिपून मोजक्या शब्दात कवी कवितेत मांडतात.

``**कचर्‍याच्या ढिगार्‍याखाली या शहराने भाड्याने ठेवलीत स्वप्ने, आशा आणि आकांक्षा तीव्र इच्छेला ही असतो, उग्र वास, घाणी सारखाच सहन न होणारा आणि दडपता ही न येणारा.**'' शहरामध्ये माणसांची गर्दी, प्रत्येक जण आपल्यातच मग्न, आजूबाजूला काय घडतंय याकडे लक्ष द्यायलाही कोणाला वेळ नाही अशा वेळी कवी मनाची होणारी घुसमट कवी आपल्या कवितेतून व्यक्त करतात.

२०२२ चा अमरावती येथील पवन नालट यांच्या `मी संदर्भ पोखरतेय' या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार प्राप्त झाला आहे. आजूबाजूला घडणार्‍या घटना मोजक्या शब्दात पण प्रभावी पणे त्यांनी आपल्या कवितेतून मांडल्या आहेत.

``**मला माहित होतं थडग्यांवर जीव लावणारी माणसं सर्वच धर्मात असतात, माणसांवर जीव लावणारी माणसं सापडत नाहीत कुठेही।**''

धर्माच्या बुरख्यात शतकानुशकते राहत कवी विश्वनिर्मात्याचा शोध घेतो मराठी माती, हिंन्दु संस्कृती आणि सामाजिक संदर्भ ही त्यांच्या कवितेची ताकद आहे, धर्म भाषा संस्कृती विषयक संदर्भ पोखरून काढताना कवी सांस्कृततिक समन्वयाचे नवे आयाम देत जातो.

देशातील राजकीय परिस्थितीवर प्रखर आसूड ओढताना कवी म्हणतात,

``**जातीय सलोख्याच्या नावाखाली सामाजिक जीवनात धर्मांधता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पुन्हा लोकशाही नावाच्या करवतीवर आमची मान कापली जाणार आहे।**''

``**विद्यार्थी निवडत असतात खिचडीतल्या आळ्या, मेळ घाटात पोरं होतात भाकरी सारखेच सपाट**'' या ओळीतून शाळा, शाळेतील पोषण आहार योजना, मेळघाटातील कुपोषण अशा अनेक बाबींवर कवी प्रकाश टाकतात.

स्वत:च्या भूमिकेशी प्रामाणिक राहत कवी आपल्या कवितेतून आजच्या परिस्थितीवर निर्भीडपणे भाष्य करतात.

``**जगण्याचे पापुद्रे निघतील इतकं कोरडं होऊ नये माणसानं, मनाची ओल आणि हिरवेपण ताजे सतेज ठेवावे श्वास जिवंत ठेवण्यापेक्षा देवपूजेतील पाना फुलांप्रमाणे जीवन कारणी लावावे आणि थांबावे**'', असा सल्लाही कवी आपल्या कवितेतून देतात.

तरुण कवियत्री विशाखा विश्वनाथ यांच्या स्वत:ला स्वत: विरुद्ध उभं करताना या कविता संग्रहाला २०२३ सालच्या साहित्य अकादमी युवा पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

``**प्रतारणांना उत्तर म्हणून वेदनांवर मलम म्हणून नसते प्रार्थना, स्वत:ला स्वत: विरुद्ध उभं करताना पाठीशी असावं कुणी म्हणून म्हणायची असते प्रार्थना,**'' असा अश्वासक काव्य सूर व्यक्त करतात.

त्यांच्या कवितेत सामाजिक जाणिवा आहेत, ॲसिड हल्ला, एक तर्फी प्रेमातून हल्ले यावर भाष्य करताना, ``**असूया, मत्सर द्वेष वाटणाऱ्याला जात, पात धर्म यातील काहीही लागत नसते.** '' असे ठामपणे व्यक्त करते. सद्यकालीन तरुण सुशिक्षित बेरोजगारांची कुतरओढ अस्थिरता व्यक्त करणारी त्यांची कविता ``**रोज ठरल्या वेळी नोकरी डॉट.कॉम पाठवते माझ्या प्रोफाइल ला साजेसा जॉब पॅटर्न्स ई मेल, आधी नोकऱ्या आहेत असा विचार करून मग मी नोकरी धरून पाहिली, इमानेइतबारे करून पाहिली.**''

असा स्वत:चं अस्तित्व सिद्ध करण्याचा संघर्ष उभा करते.

मला वामांगी व्हायचं नाहीये

मला विठ्ठलाच्या पाया खालची वीट हलवायची आहे. या कवितेतून सध्याच्या काळात मुलांच्या मनावरील दडपण, ओझे प्रत्येक घरातला मुलगा विठ्ठल आहे, अशी कल्पना करून

``**मला विठूला हसवायचे आहे विठूला रडवायचे आहे मोकळा करायचाय त्याचा गदगदलेला जीव**'' या शब्दात व्यक्त करते.

अशा प्रकारे २१ व्या शतकातील मराठी कविते मधून शेतकरी, कष्टकरी, स्त्रिया, आदिवासी, भटके विमुक्त तसेच महानगरीय जीवनातील समस्या समकालीन वास्तवाचे संदर्भ युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी आणि त्यांच्या कवितेतून आलेले दिसून येतात.

कोणत्याही भाषेच्या साहित्यात कवी हा महत्त्वाचा घटक असतो, आजूबाजूला घडणाऱ्या घटनां तो मोजक्या शब्दात प्रभावीपणे मांडत असतो. मराठी साहित्यात सकस आणि ताज्या दमाने, उमीदीने लिहिणाऱ्या तरूण कवींच्या काव्यतून सभोवतालच्या वास्तव जीवनाच्या संदर्भाचे प्रतिबिंब दिसून येते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हे युवा कवी समकालीन प्रश्न, समस्या अभिव्यक्त करीत आहेत.

सद्यकाळात भारतीय संस्कृती आणि पाश्चात्य संस्कृती यांची सरमिसळ होत आहे. तरुण पिढीच्या राहणीमानातून जीवनमानातून त्यांच्या भाषा, विचार, सवयी, आवडी-निवडी, कुटुंब, पालक व समाज यांच्याकडून त्यांना मिळणारी वागणूक, बदललेले वातावरण, बदललेला काळ आणि संपर्कमाध्यमांचा प्रभाव, गतिमान परिस्थितीचा रेटा या सगळ्यांशी जुळवून घेत नवी पिढी त्याच्या पद्धतीने अभिव्यक्त होत आहे. हे एक आशादायी चित्र आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) भूईशास्त्र - ऐश्वर्य पाटेकर

२) धुसर झालं नसतं गाव - रवी कोरडे

३) सेनंसाई वेस - वीरा राठोड
४) शहर आत्महत्या करायचं म्हणतंय - सुशीलकुमार शिंदे
५) मी संदर्भ पोखरतोय - पवन नालट
६) स्वत:ला स्वत: विरुद्ध उभं करताना - विशाखा विश्वनाथ
७) युवा साहित्य सन्मान्ा - डॉ. मीनाक्षी देव - निमकर

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# एकविसाव्या शतकातील मराठी गझलेतील सामाजिक संदर्भ

**डॉ. विनायक शरदचंद्र राऊत**
बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण
तालुका - पाटण, जिल्हा - सातारा
vinayakrautpatan@gmail.com

मराठी साहित्यामध्ये उर्दू-फारसी भाषेच्या प्रभावातून 'गझल' हा काव्यप्रकार समाविष्ट झाला आणि आज तो पूर्णपणे रुजलेला दिसतो. गझल हा मूळ फारसी भाषेतही अत्यंत लोकप्रिय असणारा काव्यप्रकार आहे.

उर्दू-हिंदी शब्दकोशामध्ये 'प्रेमिका से वार्तालाप उर्दू-फारसी कविता का एक प्रकार विशेष जिसमें प्राय: ५ से ११ शेर होते है । सारे शेर एक ही रदीफ और काफिए में होते है और शेर का मज्यून अलग होता है। पहला शेर मात्ला कहलता है जिसके दोनों मिस्त्रे सानुप्राप्त होते है और अंतिम शेर 'मक्ता' होता है जिसमें शायर अपना उपमाना लाता है।' अशी व्याख्या येते.

उर्दू-मराठी शब्दकोश 'प्रियतमेशी प्रीतीच्या व जीवनाच्या गोष्टी बोलणे, प्रेमपात्राशी गुजागोष्टी करणे व खेळणे, उर्दू-फारसी कवितेचा एक प्रकार अशी व्याख्या करतो.

सुरेश भट यांच्या मते 'एकाच वृत्तातील एकच यमक (काफिया) व अन्त्ययमक (रदीफ) असलेल्या प्रत्येक २-२ ओळींच्या किमान पाच किंवा त्याहून अधिक कवितांची बांधणी म्हणजे गझल, गझलेच्या फॉर्ममध्ये उलगडत जाणारी सलग कविता लिहिली जाऊ शकते; पण कविताच गझल नव्हे!'१

गझले संबंधी प्रा. ख्वाजा अहमद फारूकी म्हणतात 'गझल के माने उस कराह के भी है जो गिजाल (हिरन ) तीर चुभने के बाद बेकसी के आलम में निकलता है। इसलिए गजल में दुनिया की नापायदारी और दर्दमंदी का अक्सर जिक्र किया गया है ।'२

वास्तविक पाहाता उपरोक्त व्याख्यांतील शेवटच्या व्याख्येतून व्यक्त होणारी गझलेची वैशिष्टे वेगवेगळ्या प्रकारची आहेत. गझल म्हणजे प्रेम व्यक्त करणारी कविता किंवा ज्या कवितेतून फक्त प्रेमाची भावना अभिव्यक्त होत होती ती कविता. परंतु ही चौकट गझलेने मोडून काढली. प्रेमभावने सोबत जगातील वास्तवसत्य, विफलता, कारुण्य, अगतिकता, आध्यात्मिकता, भाषाभिमान इ. अनेक विषय गझलेमध्ये रूढ झाले. अशाप्रकारच्या तात्त्विक गझला प्रचंड लोकप्रिय झाल्या.

'कविता आणि गझल ह्यात-

१ अनेक कवितांची एकाच फॉर्ममध्ये किंवा आकृतिबंधात बांधणी व मांडणी.

२ प्रत्येक शेराचे कविता म्हणून स्वतःचे सार्वभौमत्व हे दोन महत्त्वाचे व मूलभूत फरक असतात.'३

" गझलेतील प्रत्येक शेर किंवा द्विपदी म्हणजे स्वतंत्र कविता ठरू शकते त्यामुळे एकाच गझलेत अनेक विषयांवरील शेर येऊ शकतात या शेराच्या शेवटच्या ओळीत यमक (काफिया) आणि अंत्ययमक (रदिफ ) असते. शेरात जे सांगायचे असते त्याची प्रस्तावना म्हणजे पहिली ओळ (ऊला मिसरा) तर दुसरी ओळ (सानी मिसरा) म्हणजे पहिल्या ओळीचा (प्रस्तावनेचा) समावेश असतो म्हणून शेराची दुसरी ओळ लिहिणे अवघड काम असते. कारण वाचकाच्या मनावर परिणाम करण्याचे सामर्थ्य या दुसऱ्या ओळीत असते.

"या गज्जलात दोन दोन ओळीच्या कविता पाच हून जास्त असू नयेत' असे माधव त्रिंबक पटवर्धनांनी सांगितले आहे.

१३ व्या शतकात मोगली साम्राज्यासोबत भारतात आलेल्या या काव्यप्रकाराचा माधव त्रिंबक पटवर्धन यांनी मराठी भाषेला अधिकृत परिचय करून दिला त्यांनी उर्दू गझल काव्यातील सौंदर्यविशेष मराठी काव्यात उतरविण्याचा आटोकार प्रयत्न केला त्यांनी 'छंदोरचना' या ग्रंथात 'गझल' हा शब्द वापरला आहे. तसे पाहाता मध्ययुगीन पंडित कवीमध्ये 'मोरोपंत' आणि 'अमृतराय' या पंडित कविच्या काही रचना गझल सदृश्य असल्याचे आढळते.'४ परंतु माधव त्र्यंबक पटवर्धन यांनी मराठीत प्रथमच गझल या काव्यप्रकाराचे जाणिवपूर्वक लेखन केले. त्यांच्या 'गज्जलांजली' या काव्यसंग्रहात काही गझल आहेत. परंतु त्यांच्या गझलांना म्हणावी तितकी लोकप्रियता प्राप्त झाली नाही.

माधव ज्युलियनांनंतर कविवर्य वासुदेव वामन उर्फ भाऊसाहेब पाटणकर यांनी दिल्लीपासून हैदराबादपर्यंत मैफिली गाजावून मराठी भाषेचा जोम, रम्यप्रतिभा आणि मराठी श्रोत्यांची सौंदर्यासक्ती दाखवून दिली. आपल्या मराठी शायरी, मराठी मुशायरा आणि जिन्दादिल या गझलसंग्रहांद्वारे मराठी गझलेला लोकप्रियता प्राप्त करून दिली.

मराठी गझलेला लोकप्रियतेच्या शिखरावर नेऊन ठेवण्याचे महत्वाचे कार्य सुरेश भट यांनी केले. त्यांनी 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'झंझावात', 'सप्तरंग' हे कवितासंग्रह प्रकाशित केले. त्यांचा मृत्यू १४ मार्च २००३ साली झाला. त्यानंतर चार वर्षांनी त्यांच्या अप्रकाशित कविता संकलीत करून 'रसवंतीचा मुजरा' हा कवितासंग्रह प्रकाशित केला. यापैकी 'सप्तरंग' हा गझलसंग्रह २००२ साली प्रकाशित झालेला होता २१ व्या शतकात हा गझलसंग्रह प्रकाशित झालेला असल्याने त्याचा विचार या ठिकाणी करणे गरजेचे आहे. समाजामध्ये पाठीत खंजीर खूपसणाऱ्या आणि दगा देणाऱ्या माणसांची कमी नाही. अशा लोकांना गजलेच्या माध्यमातून एक संदेश देताना सुरेश भट म्हणतात,

कोणाला कोणाची कसलीही माया नाही!
सारीच बोडके झाडे कुठेही छाया नाही !
आताही उरली आहे मज केवळ सोबत माझी !
कोणीच हसाया नाही ! कोणीच रडाया नाही!

आज दिलेल्या शब्दाला किंमत राहिलेली नाही त्यामुळे शब्दांच्या अर्थांना पाय फुटू लागलेले आहेत. बोलणारा बोलून जातो आणि पुन्हा म्हणतो की माझ्या बोलण्याचा विपर्यास केला गेला. यावर भाष्य करणारी अतिशय सुंदर गझल सुरेश भटांनी लिहिली ते म्हणतात,

उरले तरी बिचाऱ्या शब्दात काय आता ?
अर्थास ऐनवेळी फुटतात पाय आता.....
ऐकून घ्यावयाला दुनिया तयार नाही,
देईल कोण माझ्या ओठास न्याय आता.

एकविसाव्या शतकातील मराठी गजलेतील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ या अनुषंगाने विचार करत असताना २१ व्या शतकातील काही ठळक गझलकार आपल्या नजरेसमोर येतात त्यामध्ये इलाही जमादार, अनिल कांबळे संगीता जोशी, प्रदीप निफाडकर, शिवाजी जवरे, ए. के. शेख, महमूद सारंग, भागवत बनसोडे, सिद्धार्थ भगत, दीपक करंदीकर, हेमंत डांगे, अनिल पाटील, दिलीप पांढरपट्टे, जहीर शेख, गौतमकुमार आठवले, गंगाधर महाम्बरे यांसारख्या गझलकारांनी मराठी गझल समृद्ध करण्यासाठी प्रयत्न केलेले दिसतात.

मराठी गझल, मराठी कविता जनमानसापर्यंत पोहोचावी, त्यांनी त्या कवितांचा आस्वाद घ्यावा, कविता वाचल्या जाव्या आणि सादरही केल्या जाव्या या ध्येयाने प्रेरित होऊन 'क्षण मोहरत नंतर', 'त्या कोवळ्या फुलांचा' हे कवितेवर आधारित कार्यक्रम करणारे आणि सुरेश भटांचीच वाट चोखळणारे अलीकडच्या कालखंडातील गझलकार म्हणजे अनिल कांबळे. चंद्रपूर येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये...

त्या कोवळ्या फुलांचा बाजार पाहिला मी
पैशात भावनेचा व्यापार पाहिला मी
अंधार वेदनांनी अक्रंदतो तरीही
नजरेत वासनेचा श्रृंगार पाहिला मी
बाहेर सभ्यतेचे गातात गोडवे जे
वेश्यागृहात त्यांचा दरबार पाहिला मी
रस्ते उन्हात न्हाले सगळीकडे परंतु
वस्तीतुनी दिव्यांच्या अंधार पाहिला मी
थोडा उजेड ज्याला मागावयास गेलो
तो सूर्य ही जरासा लाचार पाहिला मी

ही गझल सादर केली तेव्हा उपस्थित सर्वच मान्यवर कवींनी मुक्तकंठाने त्यांची स्तुती केली. कारण या कवितेतून भेदक वास्तव जे वर्णन करण्यात आलेले आहे. वेश्या वस्तीचे चित्रण करणारी त्यांची ही कविता मराठी कवितेतील विषयाची आणि आशयाची कक्षा रुंदावण्यास मोलाचा वाटा उचलणारी ठरली.

समाजात जगत असताना आलेले बरे वाईट अनुभव साहित्यातून व्यक्त होत असतात. साहित्य म्हणजे समाजाचे प्रतिबिंबच असते. गझलेमध्ये दोन ओळीच्या साह्याने ते सहज प्रतिबिंबित करता येते. म्हणून कवी म्हणतो..

जीवनापासून जे जे मिळत राहिले
ओठ माझे तेच गाणे म्हणत राहिले
शोधताना मी सुखाचे उन्ह कोवळे
शब्द माझ्या सोबतीने फिरत राहिले

त्यांच्या गझलांमध्ये विषयाची आणि आशयाची विविधता आढळते. अनेक गझलांमधून विफल प्रीती दिसून येते. तर अनेक ठिकाणी सफल प्रीती! त्यांच्या तात्विक गझला तर वारांगणेपासून दिवाळीपर्यंतचे अनेक विषय व्यापणारी आहे. त्यांच्या विविध गझला या आशय आणि विषयाच्या बाबतीत, कालात्मक मांडणी आणि शब्दसामर्थ्याच्या बाबतीत, अत्यंत उत्कटतेची साक्ष देणाऱ्या आहेत. प्रत्येक वाचकाला त्या स्वतःच्याच जीवनाचे चित्रण आहे असे वाटायला लावतात.

'संगीता जोशी' यांचे 'म्युझिका' (२००३) आणि 'चांदणं उन्हातलं' (२००४) हे दोन गझलसंग्रह प्रकाशित आहेत. यातील म्युझिका या गजल संग्रहात स्त्री जीवनाच्या व्यथा वेदना व्यक्त करताना त्या म्हणतात

निर्मिले ज्यांनी स्वतः हे कैदखाने,
तेच ढोंगी मागती आता खुशाली.
न्यायदेवी आंधळी राहू नको तू
गे तुझ्या डोळसपणाची वेळ आली. (आकाश जरा सांभाळ)

भारतीय समाजातील स्त्रीचे स्थान, समाजाने स्त्रीवर लादलेली आणि स्त्रीनेही स्वीकारलेली पूर्वपर बंधने आणि स्त्री पुरुष समानतेचे बेगडी वास्तव याला छेद देऊ पाहणारी ही गझल आजच्या आंधळ्या न्यायव्यवस्थेला आता पुरे हे सांगण्याची धमक ठेवते. समाजामध्ये स्त्रियांवर होणारे अत्याचाराला वाचा फोडून न्याय मिळाला पाहिजे याची जाणीव करून देण्याचे काम या गजलेच्या माध्यमातून त्या करताना दिसतात.

'शिवाजी जवरे' आपल्या 'आवेग' (२००४) या गझल संग्रहामध्ये समकालीन धार्मिकतेचा राजकारणात होणारा गैरवापर आणि धर्माच्या वापर करून सत्ता काबीज करणारे, तरुणांची डोकी भडकवणारे अनेक पक्ष सध्या समाजामध्ये अस्तित्वात असल्याने त्यावर भाष्य करणारी कविता जवरे लिहितात

देश, भाषा, धर्म, जाती ह्या सीमा तोडून टाकू,
विश्वनाशाची कारणे आम्हास ठाऊक झाली. (अंधुक झाली)

जागतिक पातळीवरील होत असणाऱ्या दहशतवाद, वंशवाद, सीमावाद यांसारख्या अनेक प्रश्नांवर भाष्य करून समाजाला विश्वचि माझे घर हा संदेश देण्याचा प्रयत्न आवेग गजल संग्रहातील गजलेमध्ये करतात.

धर्म हृदयात असे तोवर अमृत वाटे
धर्म डोक्यात चढे रक्त विषारी होते.

धर्माचे स्थान समाज जीवनामध्ये बदलत चाललेले दिसते. धर्माला अफुची गोळी म्हणतात वास्तविक धर्म ही एक आचरणाची पद्धती आहे याची जाणीव होणे सुद्धा तितकेच गरजेचे असल्याचे दिसते, ही जाणीव या गजलेच्या माध्यमातून ते करून देताना दिसतात.

धर्म या ज्वलंत प्रश्नावर 'ए. के. शेख' आपल्या २००२ साली प्रकाशित झालेल्या 'मोरपीस' या गझल संग्रहातील 'आम्हा जरा जगू द्या' या गजले मध्ये म्हणतात

आम्हा जरा जगू द्या आम्हा जरा हसू द्या.
वाळीत टाकलेल्या या जीवना फुलू द्या.

निष्पाप लेकरांचा आक्रोश पाहवेना.
धर्मांध अन विखारी हा जोश पाहवेना.
दहशत बसेल अशा, नारे नि घोषणा या.
हिंस्रतेला तयांच्या संतोष पाहवेना.
मन-मंदिरे जळाली, घर-मस्जिदी जळाल्या.
आपल्या पराजयाचा जयघोष पाहवेना.

वास्तविक पाहता कोणत्याही दंगलीमध्ये कोणत्याही धर्मातील लोकांची घरे किंवा मंदिरे किंवा प्रार्थना स्थळे उध्वस्त झाली तरीही तो एक प्रकारे मानवधर्माचा पराभव असतो 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' हे साने गुरुजींनी सांगितलेले तत्व या ठिकाणी पराजित होताना दिसते. कोणत्याही दोन धर्मातील वादांमध्ये मानवता या मूलभूत धर्माचा मात्र पराभ होतो याची जाणीव त्यांनी या गझलेतून येते.

'महमूद सारंग' यांच्या 'शहरात आज माझ्या' (२००५) गझल संग्रहामध्ये 'घाम गाळूनी मिळेना' ही गझल लिहितात

घाम गाळून मिळेना पामरा भाकरी इथे
ऐतखाऊ रोज देई सोवळी ढेकर येथे.
कष्ट करणारा उपाशी रोज येथे झोपतो
अन लयाची तोकडी वाटे सदाचार इथे.

या गजलेमध्ये सध्य कालीन समाजातील गरिबीचे चित्रण आल्याचे दिसते. कितीही कष्ट केले तरी आपल्या कष्टाचा योग्य मोबदला अनेक भारतीयांना मिळत नाही. भूक, उपासमार व दारिद्य त्यांच्या पाचवीला पुजल्याचे दिसते. समाजातील श्रीमंत आणि गरिबीतील दरी वाढत असताना दिसते माहागाइमुळे दारिद्र्यरेषेची उंची वाढवण्याच्या दृष्टीने सुद्धा या ठिकाणी विचार व्हावा हेही या गजलेच्या माध्यमातून व्यक्त केले जात आहे.

महानगरीय जीवनात अचानक उसळणाऱ्या दंगलींचे चित्र महमूद सारंग आपल्या शहरात आज माझ्या आणि शहरात या अचानक या दोन गझल गजलांच्या माध्यमातून करताना दिसतात

शहरात आज माझ्या रस्ते विराण का
अन या अराजकाचे उघडे दुकान का ?

त्याचबरोबर

रस्ते विराण झाले शहरात या अचानक.
रक्तात लोक न्हाले शहरात या अचानक.
आनंद आजवर हो जो होता बहाल होता.
त्रिशूल फार झाले शहरात या अचानक.
दुःखासहित आम्ही होतो सुखात पण हे,
झालेत हात भाले शहरात या अचानक.
देवा तुझ्याप्रमाणे मानव भला तरीही,
पडतात रोज घाले शहरात या अचानक.

आजचे शहरातील बिघडलेले वातावरण समाज समाजामधील दोन वेगळ्या धर्मीयांमधील असणारी तेढ त्यानिमित्ताने निघणारे मोर्चे, उपोषणे त्यांना मिळणारे हिंसक वळण, त्यातून होणाऱ्या दंगली, माणसांच्या स्वधर्माबद्दलच्या, महापुरुषांबद्दलच्या, देवतांबद्दलच्या टोकदार झालेल्या भावना, टोकाचा अभिमान आणि यातून निर्माण होणारी धार्मिक तेढ त्यामुळे होणारी दंगल आणि दंगली नंतर होणारे शहराचे हाल याचे चित्रण प्रस्तुत गझलेच्या माध्यमातून येताना दिसते.

'सिद्धार्थ भगत' आपल्या 'यापुढे माझी लढाई'(२००९) आणि 'युद्धयात्रा'(२००६) या गझल संग्रहांमधून समाजातील भेदक वास्तव मांडण्याचा प्रयत्न करतात आपल्या युद्धयात्रा या गजलेमध्ये ते म्हणतात

मंचावरी करावी जातीविहीन चर्चा

मंचातळी जपावी आपापली घराणी
किती पिढ्या अजून जातील वाया
उभ्याच जातवार जाती नव्याने किंवा
कुठलाच गाव आता असणार शांत नाही
निवडून काल आले चिवडून जात वैरी

आज राजकारणामध्ये जातीचा शिरकाव झाला आहे. आपल्या जातीचा वृथा आणि टोकाचा अभिमान त्या निमित्ताने दिसून येत आहे आणि त्यासाठी भारतीय समाज व्यवस्थेतील विविधतेतील एकता ही कुठेतरी पणाला लावली जात असल्याची चर्चा प्रस्तुत गजलेच्या माध्यमातून होताना दिसते.

'दीपक करंदीकर' आपल्या 'धुनी गझलांची' (२००१) गझलसंग्रहातून आजच्या समाजवास्तवाचे चित्र मांडताना दिसतात. आपल्या 'चाप' या गझलेत ते म्हणतात,

माझ्या जगावयाचे मजलाच व्याप झाले,
जिजी सुखे मिळाली त्यांचेच ताप झाले.
विश्वास का धरावा या संत सज्जनांचा,
का पाप पुण्य झाले ? का पुण्य पाप झाले ?

या गजलेच्या माध्यमातून आजच्या समाजातील बदललेली नीतिमूल्य व्यवस्था अधोरेखित करण्याचे काम ते करताना दिसतात. त्याचबरोबर आपल्या 'कविकुल' (2009) गझलसंग्रहातील 'पानझड' या गजलेमध्ये आज राजकीय व्यवस्थेतील प्रत्येक पक्ष आणि प्रत्येक घटक हा देशापेक्षा स्वतःचीच तुंबडी भरून घेण्यासाठी किती आणि कसा प्रयत्नशील आहे त्यातून हा अखंड भारत देश पोखरला जात आहे याची जाणीवही ते करून देतात ते लिहितात,

कृष्ण-कृष्ण ना राहिला राम-राम राहिला
आता जिकडे तिकडे कौरवांचा बोलबाला ....
आता घ्यावी कशी नावे सत्ताधीश या संतांची
देश पोखरण्यासाठी जो तो हाती घेई भाला

'अनिल पाटील' आपल्या 'गाफील' (२००५) या गझल संग्रहातील 'दंगा' या कवितेच्या माध्यमातून समाजाला सांगतात,

आम्ही समानतेच्या का वल्गना कराव्या
अजूनही परंपरांचा दंगा सुरूच आहे
संबंध ना मुळीही ज्यांचा सुधारणेशी
दांभिक शोषणाचा दंगा सुरुच आहे
मी सूर कोकिळेचा आणू कुठून आता
देशात कावळ्यांचा दंगा सुरुच आहे

वास्तविक पाहता आजच्या समाज वास्तवाला सामोरासमोर भिडणारी, दांभिक राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारी आणि आपल्या काल्पनिक समानतेवर बोट ठेवणारी अनिल पाटील यांची ही गझल आजच्या समाज समाजाला अंतर्मुख करताना दिसते कारण आज समानता ही फक्त कागदावरतीच असलेली दिसते, वास्तवात मात्र प्रत्येकाने स्वतंत्र प्रत्येकाचे स्वतंत्र सुभे आणि स्वतंत्र व्यवस्था असल्याचे निदर्शनास येते

आपल्या 'गाफील' या गझलसंग्रहातील 'उलंगवाडी' या गझलेत ते म्हणतात

अद्याप ऐक माझ्या गावात एक चर्चा
तो कालचा भिकारी दिल्लीत मस्त आहे
धुळखात फायलींनी खचली इथे कपाटे
मैत्री बघा विदेशी दौऱ्यात व्यस्त आहे.

असे मानले जाते की 'जे न देखे रवी ते देखे कवी' २००५ साली अनिल पाटील यांनी लिहिलेली ही गझल आजच्या वास्तव परिस्थितीची जाणीव करून देताना दिसते. आपल्या देशाची परिस्थिती काय आहे आणि आपण किती परदेश दौरे करावे याचेही काही राजकारण्यांना भान नसल्याचे चित्र आहे. ते पुढे 'बेबंद' नावाच्या आपल्या एका गझलेमध्ये वर्तमान लोकशाहीवर भाष्य करताना म्हणतात

काय बोलावे कुणाला भान नाही
थोर लोकांना जराही मान नाही
ही कशी बेबंध झाली लोकशाही
लोकशाहीला कुठेही स्थान नाही

आज अनेक मान्यवर राजकारण्यांकडून समाजातील युगपुरुषांना महापुरुषांना जाहीरपणे अपमानित केले जाताना पहावयास मिळते भूतपूर्व राज्यपाल यांनीही अनेक महापुरुषांचे त्याबद्दल विवादास्पद वेळाने करून आपली कारकीर्द गाजवलेली संपूर्ण महाराष्ट्राने पाहिलेली आहे हीच वस्तुस्थिती या गजलेतून ते मांडताना दिसतात.

'दिलीप पांढरपट्टे' 'शब्द झाले सप्तरंगी'(२००१) गझलसंग्रहातील 'प्रत्येक माणसाच्या' या गजलेमध्ये म्हणतात

रस्त्यामधून साऱ्या सैतान माजलेली
का देव गुंतलेला त्या देवळात आहे
दाही दिशा हरामी अन बेईमान आहे
माझी पहाट आता कोण्या नभात आहे

आज सामान्य माणसांचे, स्त्रियांचे जीवन पूर्णपणे असुरक्षित बनल्याचे चित्र समाजामध्ये आहे. एक प्रकारे समाजाचे स्वास्थ्य बिघडलेले आपणास पहावयास मिळते. कारण या समाजामध्ये धनदांडक्यांना आणि राजकीय वरदहस्त असणाऱ्यांना पूर्णपणे अभय मिळत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे आता खरी पहाट ही कोणत्या नभात आहे ही हे शोधणेही गरजेचे आहे.

'गौरवकुमार आठवले' आपल्या 'सवाल' (२००२) गझलसंग्रहातील 'स्वतंत्र देश माझा' या गझलेमध्ये लिहितात

मी सांगतो गड्यांनो हा इतिहास ताजा...
वाटे कधी कधी हा स्वतंत्र देश माझा आहे
अजून बाकी देशात या गुलामी
मी ओरडू कशाला ? स्वतंत्र देश माझा
चौकात खून, दंगे, मी रोज पाहताना
वाटे खरेच आहे, स्वतंत्र देश माझा

आजची देशाची झालेली अवस्था वेगवेगळ्या ठिकाणी होत असणारे अन्याय, अत्याचार पाहून खरंच आपण देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांमध्ये वावरत आहोत का ? असे वाटते कारण अशा प्रकारच्या घटना आजही घडताना दिसतात आजही मणिपूर सारखी घटना स्वतंत्र भारताच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये भारतवासीयांना पहावयास मिळते याचा विचार करायला लावणारी ही गझल आहे. समाजाला अंतर्मुख करणारी ही कविता आहे.

**निष्कर्ष :-**

१ मराठी गझलकारांनी २१ व्या शतकातील संवेदनशीलता हरवलेल्या समाजाचे भेदक वास्तव शब्दबद्ध केल्याचे दिसते.
२ मराठी गझललेत २१ व्या शतकातील नितीमत्ता हरवलेले राजकीय, धार्मिक वातावरण शब्दबद्ध केल्याचे दिसते.
३ २१ व्या शतकात मराठी गझल काव्याला अमाप लोकप्रियता प्राप्त होताना दिसते.
४ मराठी भाषेमध्ये हा काव्यप्रकार रूढ आणि लोकप्रिय करण्यासाठी उपरोक्त सर्व गझलकरांनी मोलाचे योगदान दिले आहे.

**संदर्भ :-**


१. एल्गार सुरेश भट, प्रका. साहित्य प्रसार केंद्र नागपूर आवृत्ती ६ वी २००५ पृष्ठ क्रमांक ६

२. साप्ताहिक हिन्दुस्तान संपा-मनोहर श्याम जोशी, २९ जाने १९७८ पृष्ठ क्रमांक ९

३. उ. नि. पृष्ठ क्रमांक ६

४ संक्षिप्त मराठी वाङमय कोश आरंभ पासून १९२० पर्यंतचा कालखंड संपा. प्रभा गणोरकर, जया दडकर, वसंत आबाजी डहाके, सदानंद भटकळ पृष्ठ क्रमांक १४६

# साहित्य, समाज आणि संस्कृती आणि नव्वोदत्तरी मराठी कविता

**डॉ. बाळासो आण्णा सुतार**
प्रा.डॉ.एन.डी. पाटील महाविद्यालय, मलकापूर .

जीवन हा साहित्याचा विषय आणि भाषा हे साहित्याचे माध्यम आहे. जीवन व भाषा या दोन्ही गोष्टी समाजधिष्ठित आहेत, तर प्रत्येक समाजाजवळ एक संस्कृतीचा ठेवा असतो. शिवाय 'साहित्य' हे वाचक, श्रोते वा प्रेक्षक यांच्याकरीता निर्माण होते आणि 'साहित्यिक' हा समाजाचा एक घटक असून साहित्यनिमितीने त्याला समाधान, संपत्ती व किती प्राप्त होते, या सर्वच गोष्टीत साहित्याचा समाजाशी असलेला संबंधच दिसून येतो. साहित्याचे समाजावर व समाजाचे साहित्यावर बरे-वाईट परिणाम होत असतात. लेखक, वाचक, आणि भाषा हे साहित्यकृतीच्या संदर्भात लक्षात घ्यायला हवेत. हे तिन्ही घटक 'सामाजिक' म्हणून एकच कारण असे देता येते की, लेखक, वाचक, आणि भाषा हे साहित्यकृतीच्या संदर्भात लक्षात घ्यायला हवेत असे तिन्ही घटक 'सामाजिक' म्हणून अशा एक वस्तुचेच भाग असतात. त्यामुळेच साहित्याला एक सामाजिक परिणाम प्राप्त होत असते. त्यामुळेच तेथे कलात्मकतेबरोबरच सामाजिकतेचा विचारही महत्त्वाचा ठरतो. "लेखक ही निर्मितीक्षम कलावंत असला तरी, तो नेहमीच एका विशिष्ट समाजाचा घटक असतो.

व्यक्ती आणि समाज यांच्या संबंधाबाबतचे सर्व प्रश्न त्याच्याही बाबतीत उपस्थित होत असतात. त्याच्या । कृती उक्तीला नेहमीच एक सामाजिक परिणाम असते. व्यक्तीचे एकलेपण आणि सामाजिकता यातही एक गुढ संबंध असतो. त्यातील प्रश्नांची सोडवणूक साध्या, सरळ नियमांनी करता येत नाही हे खरे असले तरी त्या दोहोंत असलेला संबंध अमान्य करता येत नाही". 'साहित्य' आणि 'संस्कृती' यांचा निकटचा संबंध आहे. साहित्य हा संस्कृतीचाच एक भाग आहे. संस्कृती म्हणजे विशिष्ट काळातील समाजातील जगण्याची विशिष्ट रोतो, पध्दती, धाटणी होय. संस्कृतीत सामावलेल्या कोणत्याही गोष्टीचे ज्ञान उपजत नसते. संस्कृतीचा वारसा पूर्वजांकडून मिळतो. परंतु प्रत्येक पिढी तेवढयावरच समाधान मानीत नाही. परिस्थितीशी समायोजन करताना व चिकित्सक बुध्दीने निर्माण केलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधताना प्रत्येक पिढीला नवीन अनुभव येतो. नवनवीन संस्कृतीची निर्मिती होते. मूळ संस्कृतीत भर पडते. या प्रक्रियेमुळेच मानवी संस्कृतीचा सतत विस्तार होत आला आहे. समाज विकसनशील आणि विस्तारशील आहे.

संस्कृती हे या समाजाचे एक वैशिष्टय आहे. संस्कृतीसुध्दा विकसनशील आणि विस्तारशील असते. मानवी समाजाच्या सांस्कृतीक जीवनातील स्थिती गतीचा आलेख, निर्देश साहित्य कलांमधून प्रत्ययाला येऊ शकतो. मानवी समाजात संस्कृतीचे महत्त्व आहे. संस्कृती जोपासावी लागते. जोपासतानाच तिचे संवर्धन होते. साहित्य हे संस्कृतीची जोपासना करण्यांच, संस्कृतीचं रक्षण करण्याचं आणि संवर्धन करण्याचं कार्य करीत असते. समाज वास्तवाला साहित्यात अनन्यसाधारण महत्त्व असते. लेखक त्याने अनुभवलेले सामाजिक वास्तव आपल्या साहित्यकृतीतून मांडतो. त्यातून त्याच्या साहित्याला संदर्भ प्राप्त होत असतात. या संदर्भाच्या अभ्यासात साहित्य मार्गदर्शक ठरते. वरील संदर्भ लक्षात घेता लेखकाच्या सामाजिक जाणिवेचा, सामाजिक वास्तवाचा, समाज जीवनाचा, समाज परिवर्तनाचा, सामाजिक मूल्यांचा, समाजातील वृत्ती-प्रवृत्तांचा, समाज आणि साहित्य यांच्या नात्यांचा आणि त्यातून समाज मूल्यांचा आविष्कार करावा अशी अपेक्षा लेखकाकडून केली जाते. सामाजिक बांधिलकीत लेखक हा व्यक्ती म्हणून समाजाचा घटक असतो. हा विचार लक्षात घेतलेला आहे.

लेखकाच्या साहित्य निर्मितीत त्याचे सारे व्यक्तीमत्व सामावलेले असल्याने साहित्याचा विचार करताना. त्याच्या व्यक्तीमत्वाचा विचार तितकाच महत्वाचा असतो. "सामाजिक आणि सांस्कृतीक पर्यावरण" हा सामाजिक घटक, वाङ्मयनिर्माती आणि अभिरूची, सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणातच घडत लेखक वाचक हे समाजाचेच घटक असतात. ते ज्या समाजाच्या पर्यावरणात वावरतात त्या पर्यावरणाचा त्यांच्यावर चांगला वाईट परिणाम होणे स्वाभाविक असते. शिवाय प्रत्येक समाजाची आपली म्हणून एक संस्कृती असते. या संस्कृतीची जडण घडण परंपरेने झालेली असते. समाजाच्या आचार-विचार, रूढी प्रथा यातून संस्कृतीला पैलू प्राप्त होत असतात. लेखक आणि वाचक याच सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात वाढलेला असतो. त्यामुळे या समाजाच्या जीवनपध्दतीचे चित्रण त्याच्या साहित्यकृतीतून येणे जसे स्वाभाविक असते, तसेच ते वाचकालाही आपले वाटणे स्वाभाविक ठरते. काळ बदलला की सामाजिक आणि संस्कृतीत स्थिती बदलते. आणि बदलत्या स्थितीचा परीणाम साहित्यावरही झालेला दिसून येतो.

स्वातंत्र्योत्तर काळानंतर दलित साहित्य, स्त्री साहित्य, इत्यादी साहित्य प्रकारात झालेला बदल हे काळाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाचे उदाहरण आहे. मराठी साहित्य बाराव्या शतकापासून निर्माण झालेले असले आणि आपल्या साहित्याच्या या परंपरेचा आजच्या साहित्याशी व साहित्यविषयक वातावरणाशी संबंध असला तरी मराठी साहित्याच्या मराठी

साहित्य बाराव्या शतकापासून निर्माण झालेले असले आणि आपल्या साहित्याच्या या परंपरेचा आजच्या साहित्याशी व साहित्यविषयक वातावरणाशी संबंध असला तरी मराठी साहित्याच्या संदर्भात प्राचीन, अर्वाचीन हा भेद फार महत्वाचा आहे. या अर्वाचीन कालखंडात मराठी समाजाचा पाश्चात्य संस्कृतीशी जो संबंध आला त्या संबंधाचेच आपल्या आजच्या साहित्य संस्कृतीशी अधिक प्रभावी नाते असलेले आढळते.

१९६० नंतर मराठी कवितेत नव्या जाणिवा निर्माण झाला. पारंपारिक मार्ग धुडकावून नवे मार्ग चोखाळले गेले. संतप्त रितीने प्रयोगशीलता काव्यात आणून दृढ संकेतांना आकारले. उध्द्ट प्रयोग,टवाळखोरपणा,अहंभाव्यता, संभोगवर्णने आणि तरेवाईकपणा या सर्वांमुळे ही कविता पराभूत पिढीची कविता असे म्हंटले जावू लागले. वेदना,विद्रोह, नकार, निषेध, स्वागत, आशा-निराशावाद अशा उलट सुलट वृत्तीप्रवृत्तीचे दर्शन साठोत्तरी कवितेने घडविले. या परंपरा मांडणाऱ्या कवितेच्या आशावादी वृत्तचित्र, किरणांच्या प्रकाशातच नवोदत्तरी कवितेची वाटचाल सुरू झाली. या पिढीतीलच पण आपले काव्यलेखन नव्वद नंतरही सुरू असणारे कवी अरुण कोल्हटकर दि. पू. चित्रे, वसंत गुर्जर, सतीश काळसेकर, डहाके, तुलसी परब यांनी आपले काव्यलेखन केलेले दिसते.

नव्वोदत्तरी मराठी कवितेतचा विचार करताना 'खाऊजा' ही संकल्पना पाहणे महत्वाचे ठरते. खाजगीकरण, उदारीकरण, जगतिकीकरण यांचा तत्कालीन परिणाम दिसतो. याचा परिपाक नव्वदाव्या दशकातील मूल्यसंवेदना या कवितेने टिपली. खाऊजाचे परिणाम तिच्यावर झाले आहेत. जागतिकीकरणाचे हे परिणाम जागतिक स्तरावर पडले आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय संस्कृती, व्यापार, अर्थकारण, या घटकांशी येणारा समाजातील प्रत्येक व्यक्तीचा संबध, या संबंधातून ढवळून निघणारा माणूस, त्याची झालेली वाताहात, या कवितेने संवेदनशीलतेने टिपले आहे. ग्लोबल विलेजचे राहवाशी असणाऱ्या समाजाची वाताहात या बदलत्या कालावकाशाने व तंत्रज्ञानाने प्रभावित झालेल्या भांडवली रचनेची समाजव्यवस्था आकारात आलेली दिसते. या सर्वातून नवीन वास्तव व तत्कालीन पिढीची व जुन्या पिढीची मनोवस्था म्हणजेच या दोन्ही पिढीतील अंतर नव्वोदत्तरी कवितेने अचूक टिपला आहे. ग्राहक झालेला माणूस जागतिकीकरणात वस्तूसारखा विकला जात आहे, लुबाडला जात आहे. 'यूज अँड थ्रो'चे स्वरूप त्याला आलेले दिसते. अरुण काळे ही वेदना मांडताना म्हणतात,

म्हणे स्पर्धेचे युग आहे
याला म्हणतात का रे खुली स्पर्धा ?
काय असतं रे तुझे ते जागतिकीकरण, खाजगीकरण?
मेंदी लावून केलेत केस काळे
पण जुना थोबडा लपला नाही.
असं कुणालाही होता येते का तरुण भारत ![१]

या जागतिकीकरणाच्या रेट्यात भाषा , बोली, संस्कृती , जीवनव्यवहार,विचारप्रक्रिया, मूल्ये , परंपरा, या सोबतच लेखन, वाचन, यावर फेसबूक, ट्विटर, व्हाट्सअ‍ॅप, या सारख्या सोशल मीडियाचा परिणाम झालेला दिसतो. या माध्यमांच्या विस्फोटामुळे मोबाइल मधील कॉनटॅक्ट लिस्ट वाढली पण संवाद तुटत गेले आपले खाजगीपण जावून, कळसूत्री बाहुल्यात रूपांतर झाले आहे. नव्वोदत्तर काळातील माध्यम क्रांतीने झालेला परिणाम कवींनी आपल्या शब्दात मांडला. हेमंत दिवटे म्हणतात,

*'तू मला हसण्याचा, रडण्याचा, जगण्याचा*
*मरण्याचा वापरण्याचा व वापरला जाण्याचा*
*पासवर्ड दिलास*
*आणि मी माणूस झालो तू माझी इ- भाषा*
*तू माझी इ –आई*
*तू आहेस म्हणून मी आहे तू नसताना तर नसतो मी'*[२]

माध्यमांचा झालेला शिरकाव व त्यातून बदलत जाणारी मूल्ये सलिल वाघ सदयाच्या कविता या कवितेत म्हणतात.

*'चल देवा कर तुझ्या कृपेचे एमओयू साईन*
*माझ्या श्रध्देची मी देतोय वॉरंटी लाइफटाइम '*[३]

या कवितेत नव्वद नंतर स्त्री कवितेने या दशकातील आव्हाने सशक्त रूपाने कवेत घेतली आहेत. अनुराधा पाटील , प्रज्ञा लोखंडे, ज्ञानदा, या कवींनी आपला अंतस्तर जपला आहे. अनुराधा पाटील यांनी आपल्या संयत शैलीत पोस्टमॉर्डनायझेशन चिंतनशीलपणे व्यक्त केले आहे. 'पोरी' या कवितेत त्यांनी स्त्रीची दोलायमान स्थिति व जगण्याचा अपरिहार्य पीळ सामाजिक जाणिवांसोबत व्यक्त केला आहे.

*'पुलाच्या कटड्यावर पाय झुलवत बसलेय मुलगी*

*मी विचार करते*
*ती मोठी झाल्यावर*
*इकडे उडी घेईन की तिकडे? ती देईल फुलांना जन्म!*
*की नुकत्याच मुली जन्माला घालून! गोवली जाईल !*
*अक्षम्य अपराधाच्या साखळीत.'*[४]

या सोबतच ही कविता महानगरीय व्यक्तिमत्वेचे, जटीलतेचे आव्हानही आपल्या कवितेत व्यक्त करताना दिसते. प्रज्ञा लोखंडे म्हणतात.

*'गच्च ओसंडून वाहतोय शॉपिंग मॉल,*
*गच्च रिकामेच रिकामे आहेत भुकेले हात,*
*जो वाढतोय नावननाव, जगतोय ग्लोबल पसाऱ्यात.'*[५]

नव्वद नंतरच्या कवितेत माणसाचं कृत्रिम जगणं, संवेदनाहीन आत्मरत वृत्ती,स्वार्थीपणा,भोवताली पाहण्याची निकृष्टता,कवींनी अचूकपणे टिपली आहे. कवि लहू कानडे हे आपल्या 'नामी यंत्र' या कवितेत अत्यंत मार्मिकपणे सूचित करतो.

*'आता राहिले नाही लोकल, ग्लोबल झालोय*
*नाही लिहीत पत्र-बित्र , ई-मेल वालोय*
*डिश टीवीचे मासिक भाडे नियमित भरतोय*
*नी रंगीत अभासाच्या भरमार दंगलीत रोजचं मारतोय.'*[६]

रंगीत अभासात जगणाऱ्या या माणसाच्या संस्कृतीचे, आणि विकृतीचे दर्शन कवि उत्तम कांबळे यांनी माऊस आणि उंदीर या कवितेत घडविले आहे.

*'का रे माणसा*
*या दोघांनाही*
*माऊस बनवून*
*संगणकाच्या पडद्यावर आणले तर'* ७

दुबळ्या माणसाचं जगणं भांडवलशाहित या आधुनिक काळात कसं आवघड झाले आहे. याचे चित्रण नव्वोदत्तरी कवींनी केले आहे. माणूस नैसर्गिक जगणेच हरवून बसलाय. अशा संवेदना बधीर माणसाला सावधगिरीचा इशारा करताना लेखक म्हणतो ,

*'लेकरांना*
*नेट, इंटरनेटच्या मुखातील विश्व दर्शन मायावी*
*नेमके निवडून घ्या ज्ञान.'*

या कवींनी जगतिकीकरणाचे धोके संगत माणसाचे हरवलेले मानुसपण हरवू न देता चांगले तेच स्वीकारण्याचा सल्लाही दिला आहे.

**निष्कर्ष:**

वरील सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की, 'साहित्य' हे समाज आणि संस्कृतीच्या प्रभावातून निर्माण होणारी एक कला आहे. साहित्याचा अनुबंध राष्ट्र, जात, धर्म, वंश, प्रदेश इत्यादी दृष्टीने तपासला असता त्यातून समाजाचे व संस्कृतीचे प्रतिबिंब अनुभवता येते. साहित्याची भाषा ही दलित, ग्रामीण, अभिजात, आदिवासी इ. दृष्टीने आधुनिक काळात बोलीरूप झालेली दिसते. त्यामुळे या सर्व साहित्यातून त्या-त्या बोलीच्या परंपरा, लोकतत्त्व आणि त्या-त्या समाज संस्कृतीचा आलेखच स्पष्ट होतो. १९९० नंतरच्या कवितेने सामाजिक, राजकीय, धार्मिक चित्रणासोबत क्षणिक सुखासाठी धावणाऱ्या भरकटणाऱ्या पिढीची सुन्न अवस्था चित्रित केली आहे. जागतिकीकरणाचा शिरकाव त्याचा झालेला मानवी जीवनावर परिणाम व त्यातून बदलत जाणारी मूल्ये या मूल्यांचा संवेदनशील मनाने समाजदर्शन घडविले आहे. या काळात जगताना ग्लोबल विलेजचे गावकरी झाल्याने सामाजिक सांस्कृतिक मूल्यांची झालेली पडझड जगण्यातील विसंगती आपल्या समर्थ लेखणीने विणलेली आहे.

**संदर्भग्रंथ :**

१) कन्हाडे सदा सहित्य आणि समाज'
२) कुळकर्णी अरविंद वामन - साहित्य विचार
३) जोशी माधवशास्त्री भारतीय संस्कृती कोष खंड-

४) ९ कर्वे इरावती - मराठी लोकाची संस्कृती
५)राजाध्यक्ष विजया मराठी वाड्मय कोष खंड- ४ सहस्त्रबुध्दे अविनाश साहित्य आणि समाज
६) अरुण काळे 'नंतर आलेले' लोकवाड्मयग्रह प्रकाशन, २००८, पृ. ४८
७) हेमंत दिवटे 'चौतीशी पर्यंतची कविता' पृ. १८/१९
८) सलिल वाघ 'प्रार्थनेची कविता' सध्याची कविता पृ. ३९
९) अनुराधा पाटील 'पोरी'
१०) प्रज्ञा लोखंडे 'मी भिडवू पाहतोय समग्राशी डोळा' पृ . ५८
११) लहू कानडे 'तळ ढवळताना' २०१२
१२) कांबळे उत्तम 'जागतिकीकरणात माझी कविता ' सुगावा प्रकाशन, २००६
१३) किसन पाटील 'नव्वोदत्तरी कविता नवी रुपे' प्रथमावृत्ती २०१२
१४) प्रभाकर बागले 'साहित्य आणि सांस्कृतिक संवेदन' २०१४

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# एकविसावे शतक आणि मराठी ग्रामीण कवितेतील जाणीवा

**प्रा. डॉ. शहाजी ज.पाटील**
प्रमुख मराठी विभाग.
पद्मभूषण डॉ वसंतराव दादा पाटील महाविद्यालय तासगाव. जिल्हा - सांगली .

**प्रस्तावना:**

एकविसाव्या शतकातील मराठी कविता विविध स्तरांतून अनेक संदर्भ घेऊन वाटचाल करत आहे एक या कवितेने समाज जीवन, मानवी मन ,गावगाडा आणि गाव शिवार यातील अनेक स्थित्यंतरे व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण शेती आणि शेतीत राबणारा माणूस त्या माणसाचे प्रश्न दिवसेंदिवस कसे बिकट होत आहे याचे प्रसाद या कवितेत म्हटले गेले आहे ग्रामीण जीवनाचे अनेक प्रश्न घेऊ मराठी कविता पुष्ट होत आहे 1990 नंतर एकूण सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक आर्थिक आणि राजकीय अशा सर्व स्तरावर परिवर्तनाने गती घेतल्याने माणूस त्या माणसाची मूल्य व्यवस्था ज्यामधील ताणतणाव हर्ष शोकासह अनेक विषय या कवितेने नोंदवलेले आहे आजच्या सामाजिक अभिसरणाची प्रक्रियेत समकाली व्यवस्थेतील अनेक उपरे जीवन कवीने आपल्या कवितेचा विषय म्हणून आहे जागतिकीकरण भांडवलीकरण उदारीकरण यात माणूस मिथ्य आणि सोने सत्य ही प्रवृत्ती सर्वत्र सारखीच दिसतें हो संवेदनशीलता झपाट्याने बदलत असून मानवतेचे मूल्य दडपले जात आहे एका बाजूला शेतीसाठी पाऊस पाणी नाही शेतकरी जीवन प्रश्नांच्या विळख्यात अडकलेले आहे ग्रामीण खेडूत माणसाला अनेक संकटांनी निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित याने घेतल्याचे मराठी कवितेत स्पष्ट होत आहे त्याचे प्रतिनिधी रूप कवी हबीब भंडारे यांच्या कवितेतून प्रकर्षाने व्यक्त झाल्या मराठी ग्रामीण मुस्लिम समाजाच्या व्यथावेतनेचा आलेख त्याचा सामग्री आणि विचार स्पष्टपणे मांडला आहे त्याचा अभ्यास व्हावा हा येतो या लेखनाच्या मागे आहे.

**उद्दिष्टे:**

१ एकविसाव्या शतकातील कवितेचा परिचय स्पष्ट करणे.
२ कवी हबीब भंडारे यांची कवितेचे वेगळेपण अधोरेखित करणे.
३ ग्रामीण भागातील समाज संस्कृतीचे मुल्य स्पष्ट करणे.
४ मुस्लिम समाजातील जगण्यावर निष्ठा व्यथा वेदनेसह व्यक्त करणे.
५ भंडारे यांच्या कवितेचे वाड् मय विशेष स्पष्ट करणे

**संशोधन पद्धती**

वरील विषयाच्या अभ्यासाकरता वर्णनात्मक अभ्यास पद्धती,ऐतिहासिक तौलणिक यांचा आधार घेतला जाणार आहे.

**विषय विवेचन:**

समकालीन मराठी ग्रामीण कवितेत आपले स्वतःचे वेगळेपण अधोरेखित करणारा आघाडीचा कवी हबीब भंडारे यांची कविता मुस्लिम समाजाचे प्रश्न मांडते आहे कवी भंडारे हे मूळचे सिरसगाव जिल्हा जालना येथील असून ते एका खेड्यातून नोकरीच्या निमित्ताने शहराकडे आलेल्या तरुणाच्या मनात गाव खेड्यातील बदलत्या मूल्य व्यवस्थित आपल्या चिंतनात्मक काही प्रश्न कवितेच्या रूपाने शब्दबद्ध केले आहेत.

आजच्या वर्तमान जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांची व्यथा व्यथा कवी नेमकेपणाने आपल्या कवितेतून व्यक्त करतो आहे त्यांच्या कवितेला ग्रामसंस्कृतीचे अनेक संदर्भ चिकटलेले आहे खेड्यातील माणसाला जगण्यासाठी पावलोपावली संघर्ष करावा लागतो आहे सामान्य माणसाच्या आयुष्यात थोडासा ही नित्याचीच आहे त्याचे वेदनादायी उपेक्षित एकाकी पण या माणसाच्या वाट्याला आल्याचे कवी आपल्या कवितेतून स्पष्ट करतो आहे ते लिहितात.

*"माय म्हणाली*
*आज सकाळपासूनच*
*भाकर गोड लागत नाही*
*सगळं उदास उदास वाटतं*
*असं म्हणतात सैरभर मन*
*मौतीचा सांगावा घेऊन*
*उभा एकजण "*

कवी येथे जगण्यातील आंतरिक मळक येथे व्यक्त होताना दिसते आह आहे जगण्यातील उदासीनता कवी मनाला सतत बोचत राहते जगण्यासाठी झटणाऱ्या हातांना साधे कामही मिळू नये अशी येतील व्यवस्था या विरोधात कवी विद्रोह न करता जशी आहे तसे स्वीकारून आपल्याच मनाला मुरड घालण्याचा प्रयत्न करतो आहे ते लिहितात

*"माणूस करून घेतो*
*दोन हात संकटाशी*
*जिथं रसद असते जगण्याची भक्कम*
*पण करणार काय इथं?*
*अनिश्चिततेच्या सर्कशीत...."*

प्रस्थापित व्यवस्थेला शरण जावे लागत आहे त्या शिवाय गत्यंतर नाही.कवी स्पष्ट करतो की हा सर्व अनिश्चिततेचा खेळ असून हा खेळ सर्कशी सारखा आहे तोच तोपणा त्यात ठासून भरलेला आहे ग्राम संस्कृतीचं म्हणून असणार मूल्य म्हणजे जगणं महत्त्वाचं परिस्थिती वरती मात करून पुढे जाणं एवढेच खेड्यातील माणसाला माहीत असतं याचे अनेक भावबंद कवी भंडारे यांनी आपल्या लेखणीतून शब्दबद्ध केले आहेत

*"दु:खाचा एक एक भोग भोगताना*
*वेदनेचा खोल खड्डा*
*बाप कौतुकाने बजुवायाचा "*
*खेड्यातील माणसाची सल कवी आपल्या बापाची होणारी ओढाताण संसाराचे टाके घालताना कशी दमछाक होते ते लिहितात*
*"वर्षानुवर्षे गणती नुसार*
*जत्रेतील सॉंग*
*नव्या नव्याने सजत होते*
*विस्कटून नये अस्तित्व म्हणून"*

या काव्य पंक्तीतून कवीने जगणं विकणाऱ्या माणसांच्या रंगरेषा स्पष्ट केल्या आहेत.हबीब भंडारे यांनी संवेदनशीलतेने माणसाचं जगणं समजून घेतले आहे त्यांच्या बकाल निराधार आणि संघर्षमय यातनाचा आलेख मांडला आहे.गरीब मुस्लिम समाजाच्या व्यथा वेदनेवर दीर्घ भाष्य आहे आजच्या खा उ जा संस्कृतीच्या काळात सामान्य माणसाच्या कडे लक्ष द्यायला वेळच नाही शेतकरी हातावर पोट असणाऱ्या गरीब मुस्लिम समाजाचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत आहेत. जगण्याच्या लढाईत गरीबांची होणारी होरपळ कवी आपल्या कवितेचा विषय बनतो आहे येथे जगणं विकणाऱ्या माणसांची तगमग, अस्वस्थता आणि घालमेल विचार करायला लावते. कवी लिहितो

*"चालणं....पळणं होत*
*दम घुटवून धुळीतून*
*जगण्याचा अर्थ शोधत होती पाखरं*
*लांब लांब ओळीतून"*

कवी भंडारे यांनी प्रभावीपणे माणसाची सल नोंदवली आहे शिवाय मानवी नातेसंबंधातील फोलपणा दाखवून देताना कवी म्हणतो

की....

*"झाली वो एकदाची वाटणी*
*शेताची..... घराची*
*म्हातारा न म्हातारीची*
*एक जण चार चौघात कुजबूजत होता*
*घराची शेतीची ठीक आहे*
*पण मायबापाची*
*म्हातारा माझ्याकडं आणि म्हातारी लहानग्या कडे"*

आज भौतिक तांत्रिक विकास होत आहे बदलाचे वारे गतीने वाहत आहे तथापि नैतिक जीवनाचे अधं पतनही झपाट्याने होत आहे मानवी नाती ही समाज व्यवहारात फोल ठरताना कवी येथे सुचित करतो आहे.

कवी हबीब भंडारे हे ज्या कुटुंबात, समाजातून पुढे आले आहेत त्या कुटुंबाचे समाजाचे ते आपल्या शब्दशैली तून नेमके प्रश्न उपस्थित करत आहेत या समाज व्यवस्थेत विशेषता ग्रामीण मुस्लिम समाजाचे होणारे शोषण ते अचूक शब्दात टिपतात . या समाज व्यवस्थेत मुस्लिम समाज अत्यंत समरसतेने आपले जीवन कष्टाने जगतो आहे तो कधी ही हार मानत नाही परिस्थितीशी जुळवून घेत तर कधी दोन हात करत जिद्दीने उभा राहतो. या माणसांच्याकडे तुम्ही सहानुभूतीने पाहयला हवं ते येथील समाज व्यवस्थेतील घटक आहेत त्यांनीही आपल्या परीने समाज संस्कृतीला चालना देण्यासाठी हातभार लावला आहे आहे तथापि त्यांच्या अंतर्मनातील भाव व्यक्त करताना ते लिहितात.

*"पानांनी आता ठरवलंय*
*वारा आला तर हालायचं*
*बोललं कुणी तरच बोलायचं"*

या काव्य पंक्तीतून कवीने सहजपणे सूचित केले आहे की जसा समाज व्यवहार तसेच आपण आपल्या आपण व्यवहार केला पाहिजे त्यासाठी स्वत:ची म्हणून काही मूल्य निष्ठा अंगीकारल्या पाहिजेत सामाजिक ऐक्य व सलोखा समाज व्यवस्थेला व कुटुंब व्यवस्थेला अधिष्ठान देतात माणसाचा मूल्य प्रमाण मानून या गोष्टी सिद्ध व्हायला हव्यात अशी काहीशी अपेक्षा कवी आपल्या कवितेत व्यक्त करतो आहे ते लिहितात-

*"झाडांनी आता स्वत:ला सावरलच पाहिजे*
*आपलं दु:ख निमुटपणे आवरलच पाहिजे*
*वर्तमान माणसाला पुढे जायचं असेल तर वेदनेची कळ लागलीच पाहिजे असेही त्यांना वाटते"*

कवी भंडारे यांची कविता अत्यंत तरल भावस्पर्शी समाज मनाला भिडणारी कविता आहे मुस्लिम समाजाच्या जगण्याचे प्रश्न माडते आहे कवीचा जीवन अनुभव विशिष्ट चाकरीबद्ध असून तो अस्वस्थ करणारा आहे स्वत:च्या जगण्याचा शोध घेत आहेत ती समाज जाणिवेचा पट उलगडते आहे.

**निष्कर्ष :**

१ 21 व्या शतकातील मराठी ग्रामीण कवितेच्या जाणिवा प्रगल्भ असून त्या मूल्याधिष्ठित आहेत.

२ कवी भंडारे यांनी संवेदनशीलतेने समाज व्यवस्थेत असलेली अभावग्रस्तता सूचित केली आहे ती वाचकांना अंतर्मुख करते.

३ कवी आपल्या कवितेत माणसाचं जगणं महत्त्वाचं मानतो आहे. त्या करिता किती ही कष्ट,यातना अपमान सहन करावा लागला तरी ते हार मानत नाहीत.

४.हातांवर पोट असलेल्या गरीब मुसलमान हा त्यांचा कवितेचा मुख्य केंद्रबिंदू आहे.

५ कवी भंडारे आपल्या कवितेतून समाज व्यवस्थेवर आरोप न करता किंवा कुठलीही आदळ आपट न करता केवळ आपले जगणे जगावे असाच भाव ते व्यक्त करतात जे वाट्याला आलेले आहे ते निमुटपणे झोकून देऊ सहन करावे जिवाची तगमग , अगतिकता ,अस्वस्थता घालमेल एवढेच ते नोंदवत राहतात

६ कवी भंडारे यांची कविता मुस्लिम गरीब निष्पाप माणसाच्या जगणयाविषयी करुणा व्यक्त करते.

७ सामाजिक ऐक्य भाव स्पष्ट करते, सलोख्याचे संबंध दृढ करण्यासाठीचे सूचन करते

८ मानवतेचे मूल्य प्रमाण मानण्याचा संदेश देत रहाते.

९ कवी हबीब भंडारे यांची कवितेतील जग नैतिकतेच्या पायावर उभे आहे. श्रद्धा निष्ठा प्रामाणिकपणा यांचा भक्कम आधार त्यांची कवितेला आहे.

१० या कवितेतील माणसं मरणाच्या दारात जगण्याचा अर्थ शोधत आहेत.

**समारोप:**

मराठी ग्रामीण कविता 21 व्या शतकातील एक प्रतिनिधी स्वरूपाची कविता म्हणून कवी हबीब भंडारे यांच्या कवितेचा धांडोळा घेतला आहे ही कविता मुस्लिम समाजाचे प्राथमिक प्रश्न जगण्याचे चेच प्रश्न अधोरेखित करते आहे सामाजिक सलोखा त्याचबरोबर मानवतेचे मूल्य याचा आग्रह कवीने आपल्या कवितेत शब्दबद्ध केला आहे ही कविता मुक्त छंदात्मक असून ती विचाराला प्राधान्य देते काही वेळेला भावनांना मुरड घालते माणसाच्या जगण्यातील भाव अधोरेखित करते या कवितेचे सामर्थ्य मुळातून अभ्यासण्यासारखे आहे मरणाच्या दारात जगण्याचा अर्थ शोधणारी माणसंआणि जगणं विकणाऱ्या माणसांच्या कविता हे दोन कविता संग्रह महत्वपूर्ण आहेत.

**साधन ग्रंथ**

१. जगणे विकणाऱ्या माणसांच्या कविता, हबीब भंडारे,गोदा प्रकाशन औरंगाबाद २०२१
२. मरणाच्या दारात जगण्याचा अर्थ शोधणारी माणसं,गोदा प्रकाशन औरंगाबाद,२०२०
३. मराठी काव्याचे मानदंड,खंड पहिला, डॉ स.रा.गाडगीळ , पद्मगंधा प्रकाशन, पुणे.,२००५
४. कवितेतील आधुनिकवाद , डॉ प्रा केशव सद्रे, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर,२०१३.

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# एकविसाव्या शतकातील स्त्रीमनाचे पदर उलघडणारे 'देवबाभळी' संगीत नाटक : एक चिकित्सा

**प्रा. प्रदिप प्रकाश कदम**
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
लांजा
ई-मेल: pradip0325kadam1996@gmail.com

**प्रस्तावना :**

संगीत नाटकाच्या माध्यमातून गेली अनेक वर्ष समाजातील समस्यांचे चित्रण केले गेले. तसेच सांस्कृतिक जीवनात महत्वाचे बदल घडवून आणण्यास संगीत नाटकांचा वाटा महत्वपूर्ण असा आहे. दक्षिणेकडून आलेले नाटक आणि उत्तरेकडून आणलेले संगीत यांचा मराठी रंगभूमीवरील 'संगीत' नाटकात मिलाफ झाला. विष्णुदास भावेंच्या 'सीतास्वयंवर' या नाटकापासून मराठी रंगभूमीला सुरुवात झाली. मराठी संगीत नाटकांनी गेली वीस वर्ष एक वेगळ स्थान निर्माण केल आहे. संगीत हे माणसाच्या आयुष्यातील अविभाज्य भाग आहे. कारण जन्मापासून ते मृत्यूपर्यंत प्रत्येक टप्प्यावर संगीत महत्वाची भूमिका बजावते. २१ शतकात संगीत नाटकांना सुवर्णकाळ दाखवण्यासाठी मराठी रंगभूमीवर अनेक पुरस्कार मिळवत साकार झाले ते नाटक म्हणजे 'संगीत देवबाभळी'! प्राजक्त देशमुख लिखित 'संगीत देवबाभळी' या नाटकाला 'साहित्य अकादमी पुरस्काराने' गौरविण्यात आले. या नाटकाने मराठी रंगभूमीवर नवे विक्रम रचले आहेत. प्राजक्त देशमुख यांनी 'देवबाभळी' या नाटकातून संत तुकाराम पत्नी आवली (आवलाई जिजा ) आणि विठ्ठलाची पत्नी लखुबाई (रखुमाई) यांच्या अंतरीच्या वेदना उलघडवून दाखवल्या आहेत. या दोघींच्या संवादातून, प्रश्नातून स्त्री मनाचे दु:ख, एकांकीपनाची भावना, देव आणि संत पत्नी म्हणून झालेलं दुर्लक्ष, स्त्री म्हणून नशिबी आलेली उपेक्षा मांडलेली आहे.

प्रस्तुत नाटकात नाटककार प्राजक्त देशमुख संत श्रेष्टत्व प्राप्त झालेले संत तुकाराम आणि देवत्व असलेले विठ्ठल यांची भक्ती केंद्रस्थानी ठेवून तुकाराम पत्नी आवली आणि विठ्ठल पत्नी लखुबाई यांची दु:खे समजून न घेण्याची खंत आणि देव असो कि मानव दोघांनी ही स्त्रीला दुय्यमत्व देण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे नाटकाच्या माध्यमातून जाणीव करून देतात. देवरुपी स्त्री आणि सामान्य स्त्री यांच्यातील समान स्त्री-जीवन दु:खाला अधोरेखित करतात. पुर्वरंभ प्रसंगात भंडार्याच्या डोंगरावर पोटुशी असलेली तुकाराम पत्नी भाकरी घेऊन जाताना आवलीच्या पायात बाभळीचा काटा रुततो. आणि तो काटा स्वत: विठ्ठल काढतो. अशी पौराणिक कथा सुरुवातीला सांगितलेली आहे. साधीसुधी आशा-अपेक्षा बाळगत जगणार्या या दोघींच्या वाट्याला येणारी वंचना म्हणजे खोलवर दुखणारा बाभळीचा काटा आहे. तसेच बाभळीचा काटा हा पुरुषसत्ताक व्यवस्थेचे प्रतिक म्हणून वापरला आहे. जो अनेक वर्ष स्त्रियांच्या पायामध्ये रुतून बसलेला आहे. नाटककार दोन स्त्रियांच्या संवादातून स्त्रीची व्यथाकथा मांडतो.

'देवबाभळी' या नाटकात लखुबाई विठ्ठलावर रागावून दिंडीरवनात रागाने जाते. मात्र आवलीच्या पायात काटा रुतल्याने विठ्ठल लखुबाईला न विचारता आवलीची सेवा करण्यासाठी पाठवतो. म्हणजेच विठ्ठल लखुबाईला समजून घेत नाही, तिच म्हणणं विचारात घेत नाही, तीच रुसन दूर करत नाही. ही चीड व्यक्त करताना लखुबाई म्हणते की, 'कुजू दे देवा कुजू दे रे, पायाखाली वीट कुजू दे रे' असा विठ्ठलावरचा राग व्यक्त करते. जस सर्वसामान्य माणूस स्वताच्या पत्नीला दुय्यमस्थान देतो. तीच देवाची वृत्ती नाटकातून स्पष्ट होते. नाटकातील देवपात्राने (विठ्ठल) आणि एका संत पात्राने (तुकाराम) स्वत:चे श्रेष्टत्व सिद्ध करण्यासाठी आपापल्या पत्नीकडे जे दुर्लक्ष केले. त्याविषयी ही पुरुषसत्ताक व्यवस्था काहीच बोलणार नाही का? हा प्रश्न नाटककार समाजासमोर ठेवतो.

१७ व्या शतकातील आवलीच्या वाट्याला येणार दु:ख वैश्विक आहे. परंपरेने बनवलेली आवलीची प्रतिमा भांडकुदळ, कजाग, रागीट अशी तयार केली आहे. आपला पती विठठल भक्तीत एवढा रममाण झाला आहे कि त्याला आपल्या संसाराची, माझी काळजी नाही, म्हणून विठ्ठलाने त्याला समजावून सांगाव. ही भावना आवलीची आहे. आणि याच रागातून ती विठ्ठलाला शिव्याशाप देते. रागावते. पण आवली विठ्ठलाच्या रखुमाईप्रमाणे रुसून बसत नाही.तर ती आपल्या क्रोधातून तुकोबांच्या विठ्ठल भक्तीला आव्हान करते. तसेच बाईपणाचा परंपरेने तयार केलेला साचा ही नाकारते. आवलीचा क्रोध हाच आवलीचा विद्रोह आहे.

बाईने घरासाठी राबाव. नवर्यासाठी झिजाव, पण तोंड बंद करून ही गृहिणी असलेल्या बाईकडून पुरुषप्रधान समाजाची परंपरागत अपेक्षा असते. स्त्रीने प्रश्न न विचारता पुरुषांच्या आदेशाप्रमाणे वागले पाहिजे. ही पुरुषसत्ताक व्यवस्थेची भावना आवली नाकारते. मराठी साहित्य विश्वात संत तुकारामांचे श्रेष्टत्व अधोरेखित झाले आहे. पण आवलाईचे दु:ख मात्र फारसे मनावर घेतलेले दिसत नाही. हे निर्विवाद सत्य आहे. हे नाटककार आत्मियतेने मांडतो.

'देवबाभळी' या नाटकात दोन टोकांवर उभी असलेल्या स्त्रिया एकत्र येतात आणि देवबाभळीच्या काट्यापेक्षाही खोलवर सलणारी आपली भळाळती दु:ख चुलीपाशी, तर कधी इंद्रायणी काठी, तर कधी धुणे धुवताना, तर कधी भांडी घासताना एकमेकींना सांगतात. दोघींचही दु:ख सारखच आहे. "संसार सुखाचं पीक येवो न येवो, आपल्या वाट्याची जमीन स्वतः नांगरली पाहिजे" हे वाक्य समाजातील प्रत्येक स्त्रीला नवी उभारी देणारं आहे. प्रत्येक स्त्री ही संसाराचा गाडा पुढे घेऊन जाण्यासाठी पुरुषाची वाट न पाहता संसाराची जमीन नांगरत असते. स्व- कष्टाचं बी पेरते. स्व-बळावर आपला संसार रेटणाऱ्या, कष्टकरी स्त्रियांची आवली हि प्रतिनिधीत्व करते. पुढे लखूबाई आवलीला सांगते की, "तुझ्या नांगरणीला पावसाची बांधिलकी नाही , आणि माझा पाऊस कुठं तरी दुसऱ्या रानात कोसळतोय. हे तुला कधी कळायचं नाही. आपलं आभाळ आपण बांधून, हक्काचा पाऊस होता आलं पाहिजे." हे स्त्री आत्मभान जसं अनुभवातून आवली आणि लखुबाई यांच्यात आलं. तसच समाजातील प्रत्येक स्त्रीमध्ये यावं. ही भूमिका नाटककाराची नाटकातून स्पष्ट होते.

नाटककार आवली आणि लखुबाई यांच्या संवादातून स्त्री प्रश्नांची उकल करतो. हे प्रश्न जगण्याविषयीचे समाजव्यवस्थेविषयी, पुरुषवृत्तीविषयी आणि धर्मविषयक आहेत. पती जेवणा आधी मी कशी जेवू ?, तू कोणाच्या कोणाच्या जखमा भरायची वाट पाहशील? इस्कटलेला संसार म्हणजे खरी भक्ती असते व्हय? कडेलोटच्या क्षत्रापर्यंत पोहचून परत माघारी का फिरायचं ग सारख आपणच ? असे एक नव्हे तर अनेक प्रश्न नाटकातून उपस्थित करून स्त्री मनाची अवस्था आणि स्त्रीच भूत-वर्तमानकालीन जगण अधोरेखित करतात.

'देवबाभळी' या नाटकात प्राजक्त देशमुख यांनी स्त्री- जाणीवेबरोबरच संत तुकारामांची जी समाजाकडून झालेली अवहेलना नाटकातून मांडली आहे. तसेच लखुबाई म्हणते की, राधेच किसनासोबत लग्न झालं नाही तरी 'राधेकिसना' मंत्र झाला. आता 'ईठूरुक्माय' मंत्र झाला. पण पंढरीतली मंदिरं वेगळीच राहणार म्हणजेच देवतांच्या कथेत आणि प्रत्यक्ष मानवी जीवनात स्त्री ही उपेक्षितच राहिली. ही खंत नाटकातून व्यक्त होते.

**समारोप:-**

२१ व्या शतकातील नाटक साहित्य परंपरेतील स्त्री- दु:ख मांडणारे महत्वाचे नाटक म्हणून प्राजक्त देशमुख यांच्या "देवबाभळी' या नाटकाकडे पाहता येईल. या नाटकातून प्राजक्त देशमुख आवली आणि लखुबाई यांच्या संवादातून स्त्री मनाचे पदर उलघडवून दाखवतात. तसेच दोघीजणी आपल्या नवर्यावर रुसलेल्या आहेत. त्यांचे रुसणे, राग व्यक्त करणे ही खरतर त्यांच्या अस्तित्वाची त्यांनीच घेतलेली दखल आहे. म्हणून हे नाटक आजच्या काळातील स्त्री जीवनाशी निगडीत आहे. पुरुषसत्ताक परंपरागत व्यवस्थेत स्त्रीला किती गोष्टी संसारात सोसाव्या लागतात. किती प्रकारच्या दु:खाला सामोरे जावे लागते याचे दर्शन नाटकातून घडते.

स्त्रीची नेहमी समर्पण करण्याची वृत्ती पाहायला मिळेत. ती देव पत्नी असो वा सामान्य स्त्री असो तिला समर्पणाच्या भूमिकेतूनच समाज पाहतो. तिला व्यक्त होण्याचे, प्रश्न विचारण्याचे, बोलण्याचे स्वातंत्र्य नसल्यामुळे तिच्या मनाची ही घालमेल, मनाची अवस्था 'मुक्यामारा' सारखीच 'न' दिसणारी आहे. समाजातील स्त्रीविषयीचे वास्तव या नाटकातून मांडले आहे. 'देवबाभळी' या प्राजक्त देशमुख यांच्या नाटकातील आवलाई ही 'काल' च्या अवकाशातील तर लखुबाई 'आज' च्या अवकाशातील स्त्री म्हणून समोर येते. यातून काल आणि आज या अवकाशातील स्त्रीच्या मनाचा ठाव या नाटकातून नाटककाराने घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'देवबाभळी' हे नाटक आवली आणि लखुबाई एवढच मर्यादित न राहता समाजाने उपेक्षिलेल्या समस्त स्त्री जीवनाचे झालेले आहे. 'देवबाभळी' हे नाटक स्त्री संघर्षाचे आत्मभान जागवणारी महत्वाची कलाकृती आहे. असे म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ :-**


१ देवबाभळी – प्राजक्त देशमुख

२ मराठी साहित्य रूप आणि रंग – डॉ.सतीश कामत

३ देवबाभळी नाटकाचा परिचय - https://maharashtratimes.com

४ मराठी वाड्मय प्रकार : स्वरूप , संकल्पना व वाटचाल – डॉ. द. के. गंधारे

५ नाट्यावलोकन – प्रा. डॉ. आरती कुलकर्णी

६ स्त्री - लिखित साहित्य संदर्भ आणि चिकिसा - आशुतोष पाटील

# ‘ एकटी ’ काव्यसंग्रहातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**प्रा.डॉ.पांडुरंग जगन्नाथ ऐवळे**
मराठी विभाग प्रमुख,
बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण
ता. पाटण , जि. सातारा
drpjaivale@gmail.com

---

१९७५ हे आंतरराष्ट्रीय स्त्रीमुक्ती वर्ष म्हणून युनोने घोषित केले. परिणामी स्त्रियांच्या विविध प्रश्नाकडे पाहण्याची नव्याने दृष्टी आली. विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, प्रसारमाध्यमे यांच्या माध्यमातून स्त्री प्रश्नावर मंथन झाले. स्त्री संघटनांनी स्त्रियांच्या विविध प्रश्नासाठी, हक्कासाठी संघर्ष केला. समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान, लैंगिक विषमता, पुरुषसत्ताक व्यवस्था त्यात तिची होणारी घालमेल अशा विविध अंगांनी वाड्मयीन पातळीवरही शोध घेतला गेला. मुली महाविद्यालयीन शिक्षण घेऊ लागल्या. शिक्षणातून आत्मभान प्राप्त झालेली ही पिढी भोवतालच्या दु:ख, दैन्याकडे नव्याने पाहू लागली. यासंदर्भात अश्विनी धोंगडे म्हणतात, “ स्वत:चे अस्तित्व विसरून गेलेल्या स्त्रीने डोळे उघडून जगाकडे पाहायला सुरुवात केल्यावर ज्यावेळी तिला मुख्य प्रवाहातून आपण फेकलो गेल्याची जाणीव झाली त्यावेळी आपल्या अस्तित्वासाठी पाय रोवायला स्त्रीने आपल्या सामर्थ्यानिशी सुरुवात केली व स्त्रीच्या अध:पतनामागचे पुरुषी राजकारण तिला समजू लागले ”[१].

मराठी वाड्मय क्षेत्रावरही स्त्रीवादी विचारांचा प्रभाव पडत गेला.आपली होणारी घुसमट, शोषण, आपले जगणे साहित्यातून जगासमोर ठेवण्याच्या भूमिकेतून स्त्रियांनी लेखणी हातात घेतली. आणि विविध वाड्मय प्रकारांच्या माध्यमातून आपल्या जाणिवा, आपले हुंकार व्यक्त करू लागल्या. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला अजूनही दुय्यम स्थान आहे. मग ती स्त्री कोणत्याही काळातील असो अथवा कोणत्याही वर्णातील. ही विषमता आजही दिसते. पुरुषप्रधान संस्कृतीने तिला नेहमीच उपेक्षित ठेवलेले असले तरीही विविध जबाबदाऱ्या,विविध सामाजिक व कौटुंबिक बंधने खांद्यावर घेऊन त्या आपल्या भावना कधी निर्भिडपणे तर कधी संयमाने मांडू लागल्या. अशीच एक कवयित्री म्हणजे प्रा.सौ.कांचन थोरात. सप्टेंबर २०१९ मध्ये प्रकाशित झालेल्या त्यांच्या ‘एकटी’ या काव्यसंग्रहातून त्यांनी आपल्या भावनांना व अनुभवांना मोकळी वाट करून दिलेली आहे.

आपल्या मनोगताच्या सुरुवातीला त्या म्हणतात, “ स्त्री एकाक्षरी अन जोडाक्षरी शब्द तशीच तीसुद्धा आहे. एकटी पण सर्वांना जोडलेली. संपूर्ण विश्वात पुरुषांच्या बरोबरीने जिचे अस्तित्व निर्मिकाने निर्माण केलंय ती स्त्री. पण याच स्त्रीला येथील पुरुषप्रधान संस्कृतीने कायम उपेक्षित ठेवलय.”[२] ही उपेक्षीतता, पुरुषप्रधान संस्कृती आणि सामाजिक विषमता मांडण्याचा प्रयत्न कवयित्री ने केलेला आहे.

स्त्रीचं विश्व म्हणजे तिचं कुटुंब पती , मुलं, घरदार यांच्या भोवती फिरत राहतं . आपल्या आयुष्यातील सुखाच्या क्षणांना तेल, मीठ लावून पाकात घालून किवा लोणचं बनवून ठेवावेसे वाटतात. कारण परत ते क्षण आयुष्यात कधी येतील असे नाही पण स्वत:च्या आयुष्यात तरी इतके सुखाचे क्षण आहेत का ? एखाद्या जीनप्रमाणे ती मोठमोठी दिव्ये करती. किमयागार म्हणून आयुष्यात मिरवत असते. पण संसाराच्या बाटलीतून मात्र ती कधीच मोकळी होत नाही. ती आपल्या पतीकडे प्रेमाची फक्त दोन मिनिटे मागते पण ती तिच्या इच्छेप्रमाणे तिला हवी असतात ती ही तिला मिळत नाहीत .कामानिमित्त पती बाहेर जातो पण जाताना घराचं घरपणही घेऊन जातो. दिवसभर ती त्याला ‘मिस’ करते . दुसरं करणार तरी काय ? ती म्हणते,

*“ माझी सुरुवात तुझ्यापासून*
*आणि शेवट ही तुझ्यापाशी*
*मग तो दिवसाचा असो किंवा जीवनाचा ”*

त्याची ती वाट बघत राहते. आल्यानंतरच्या कटकटीची आणि वटारलेल्या डोळ्यांची तिला आता सवय झालेली आहे. नदीसारखी संथ वाहणारी आणि स्वत:चं अस्तित्व विसरून त्याच्यात सामवणारी. त्याला हेही माहित आहे की काहीही झालं तरी ती आपल्याकडे येणार. नदी आणि समुद्र यांच्या प्रतीकातून कवयित्री अपला भाव व्यक्त करते. ती माती सारखी आहे त्याच्या

ओलाव्यावर मुठीत हवी तशी राहणारी जानकीच्या वंशातली. आपला पती, कुटुंब, घरदार याच्यातच ती आपलं समर्पण करीत असते. जन्मापासून मरेपर्यंत तिला दुसऱ्याच्या आधाराची सवय झालेली असते. या सर्वात स्वतंत्र व्यक्तीमत्व म्हणून ती उरतच नाही. घरातल्या इतर वस्तू प्रमाणे तिचं अस्तित्व असलेलं जाणवतं. म्हणून सूर्याचा आणि आपला काहीतरी ऋणानुबंध आहे असं तिला वाटतं. तो जसा जळतो आकाशात तशी ती संसारात.

इथं प्रत्येक पुरुषाच्या आत एक मनू दडून बसलेला आहे. कोणाला दिसू नये असा काहींनी लपवून ठेवलेला आहे. जेव्हा तो उफाळून येतो तेव्हा तो आपला स्टेटस विसरून तोंडानी, डोळ्यांनी तर कधीकधी लाथाबुक्क्यांनी ही तो बोलू लागतो. स्वत:चं कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी तिनं बाहेर पडायचे ठरवले तरी अनेक अटींनी तिचे हात पाय बांधून ठेवले जातात. एवढेच नव्हे तर घायाळ करणारे बाण वेळोवेळी मारले जातात. ती म्हणते ,

*"मला करायचं असेल काही*
*ते मी नक्की करेन*
*तोपर्यंत तुझे बाण*
*तुझ्या भात्यामध्ये ठेव.*
*उगाच नको सोडूस असे*
*वर्मी लागतात आणि करतात खूप घायाळ."*

बऱ्याचदा समुद्राला सर्वात अथांग आहे असे म्हटले जाते पण बाईच्या हृदया एवढा तो नक्कीच अथांग नसेल. करोडो समुद्र पोटात घालू शकत नाही इतक्या चुका ती पोटात घालते. ती आता स्वत:लाच समजावते उन्मळून पडलेली झाडेही पुन्हा रुजतात मग स्त्री तर हाडामासाची आहे. . तिला आता कोणाची संगत नकोशी वाटते. आणि एकटीच नीट पुढचा मार्ग चलण्याचा विचार करते. ही वाटचाल करण्यास ती सिद्ध झाली आहे. समोर स्वच्छ व निरभ्र आकाश आहे. जगण्याची आस आहे. कोटी कोटी किरणे उधळणारा सूर्य आहे. आता तिला कशाची भीती नाही आणि खंतही नाही. आजवर तिच्या कर्तृत्वावर, क्षमतेवर नेहमी प्रश्नचिन्हं उभी केली. वेळोवेळी तिचे खच्चीकरण केले. पण आज या सर्व रूढी-परंपरांना झुगारून, उंबरठा ओलांडून या विषमतेच्या गर्तेतून बाहेर पडून मोकळा श्वास घेऊ इच्छिते.

नवऱ्याने टाकलेली स्त्री तेवढीच परित्यक्ता असते असे नाही तर जिचा विचार, शब्द, भावना, निर्णय हे सर्व गृहीत धरून चाललं जातं ती सुद्धा एक परित्यक्ता असते. म्हणून कवयित्री म्हणते की,

*"परित्यक्ता नसतीस तर*
*विचारलं असतं झोपण्यापूर्वी तुला*
*कदर केली असती तुझ्या*
*होकाराची किंवा नकाराची.*
*तू सुद्धा परित्यक्ताच आहेस*
*परित्याग केलाय तुझ्या विचारांचा,*
*भावनांचा, इच्छांचा, निर्णयांचा,*
*आवडीनिवडीचा, शिक्षणाचा,*
*वाढत्या वयाच्या सुरकुत्याचा*
*आणि पिकलेल्या केसांचा "*

आज ती केवळ एकाच ठिकाणी पेटणारा 'निष्क्रिय आगडोंब' आहे तिच्यातल्या दाहाची झळ इतर कोणालाही दिसत नाही. तिचा हा आगडोंब प्रेमाच्या साध्या फुंकरीनेही शांत होतो.

तिला कधीही वाकडे तिकडे चालायला जमलं नाही. पण त्याचं वागणं नेहमी वाकड्यातलं. त्याच्याबरोबर फरफटताना ते सवयीचं होऊन जातं. बकुळीच्या फुलासारखी ती अन तिनं पाहिलेली सुंदर स्वप्नं राकट हातांनी ओरबाडून नेलेली आहेत. त्यामुळे तिला आता पुरुष जातीचीच भीती वाटू लागली आहे.

*"आरपार भेदणाऱ्या नजरेच्या गुप्तीची*

*शब्दांचे मधाळ बाण*
*अन नपुसक प्रेमाची*
*भीती वाटते आता पुरुष जातीची*
*या जातीमध्ये लपलेल्या लांडग्याची."*

तिच्या आत्मविश्वासाची मुळं छाटून तिचं बोन्साय केलेलं आहे. कुंडीतल्या मातीसारखं तिचं विश्व मर्यादित आणि अधिकच छोटं बनवलं जातं. मग ती आई, बहीण, बायको किंवा मुलगी असो. एकजरी संधी दिली असतीस तर तिनंही दाखवलं असतं आपल्यात ठासून भरलेलं प्रेम. पण त्याचं ते तकलादू प्रेम तिला आवडत नाही. ती म्हणते,

*" तुझं ते तकलादू प्रेम ठेव तुझ्याकडेच*
*भावनाशून्य, स्पर्शशून्य, प्रेमाशून्य*
*ऊरक म्हणणार."*

स्त्री ही नियतीच्या हातातली 'बाहूली' आहे सजवलेली, त्याच्या इच्छेनुसार झोपणारी, उठणारी, जपलेली, खुपलेली हळूहळू भेसूर दिसत जाणारी, हात, पाय, डोळे तुटलेली. कपड्यांची लक्तरे झालेली आणि शेवटी अडगळीच्या खोलीत टाकलेली. आपल्यावर झालेल्या पिढ्यान्-पिढ्याच्या अन्याय , अत्याचाराबद्दल समाजातील या विषमतेबद्दल ती सर्वांचे आभार मानते. डोळ्यातल्या आसवाबद्दल, बेचिराख स्वप्नाबद्दल, स्वार्थी प्रेमाबद्दल, खोट्या शब्दाबद्दल आणि आयुष्यभर जखमा दिल्याबद्दल, त्या जखमांवर मीठ चोळल्याबद्दल, परमेश्वराला विसरु न दिल्याबद्दल,

*"आभारी आहे तू दिलेल्या*
*सर्वात मौल्यवान गळफासाबद्दल,*
*सोन्याच्या कोंदणात जडवल्याबद्दल*
*आणि तारुण्यातच फुलपाखराला*
*चिमटीत पकडून मारल्याबद्दल."*

आपला झालेला अपेक्षाभंग अतिशय उपरोधिक व मार्मिक पद्धतीने कवयित्रीने मांडलेला आहे.

तिच्यातील सामर्थ्य जागे होऊन ती आता पुरुषप्रधान संस्कृतीला प्रतिप्रश्न करू पाहते. याद्दष्टीने 'आणि म्हणून', 'फैलावर', 'रुतलेलं', 'विषबाधा', 'कोंडमारा', 'भुलणार नाही' इत्यादी कवितांमधून पुरुषप्रधान संस्कृतीला तिने इशाराच दिलेला आहे. तिच्यातील हे आत्मभान पाहण्यासारखे आहे. आपल्या पतीनं प्रेमानं बोलावं,खांद्यावर हात ठेऊन बिलगून घ्यावं, एखाद गिफ्ट किवा गजरा आणावा, कधी बाहेर फिरायला न्यावं, तिने बनविलेल्या स्वयंपाकाच कौतुक करावं. एवढं जरी केलं तरी त्या सुखी होतात कारण

*"अजून त्या जाग्या नाहीत.*
*झोपल्यात, ग्लान आहेत*
*आणि म्हणून त्या थोडक्यात खुश आहेत."*

पुरुषाच्या अस्तित्वानं स्त्रीला पूर्णत्व यावं. ज्याच्या इच्छेसाठी काहीही करावं. ज्याच्या आज्ञेपुढे नतमस्तक व्हावं. "असा कोण आहेस तू ? असा प्रतिप्रश्न करून "तू जर स्वत:ला देव समजत असशील तर अशा देवाला मी मानत नाही. अशी स्पष्टोक्ती आता करू लागलेली आहे. पुरुषाच्या गोड गोड बोलण्याला ती भूलणारी नाही. आता माझे मलाच 'पुनरुत्थान' करायचे आहे. लाखो पिढ्यांचे, संस्कारांचे, ग्रंथांचे, परंपरांचे, चालीरीतींचे, सण-समारंभांचे, थरावर थर साचलेले आहेत. त्यातून बाहेर पडायचं आहे आणि इतर भगिनींनाही बाहेर काढायचं आहे . कोषात गुरफटून थकवा आला आहे. आता सुंदर फुलपाखरू होऊन बाहेर पडायचं आहे. स्त्रीचं आयुष्य खोल खोल विहिरी सारखं आहे. संस्कृतीच्या कठड्यानी बंदिस्त केलेलं. संसाराचे रहाटगाडगे सतत सुरू आहे. सहनशीलतेचे जल सततच्या उपस्यान आटू लागले आहे. तळ उघडा पडू लागला आहे.

*"हा उपसा बंद झाला पाहिजे अन्यथा*
*जगाला दिसेल भेसूर रूप आणि*
*खूप खोल खोल 'रुतलेलं' सारं काही."*

आत्मसन्मानाची 'ठिणगी' तिच्यात पडल्याने ती पुरुषाला जाब विचारते, " बघ एकदा घरदार सोडून, दुसऱ्याच्या घरी राहणं. तुझ्यासारखीच ती सुद्धा लाडाकोडात, ऐश्वर्यात वाढलेली. पण स्वतःची बहीण आहे असं समजून तिची काळजी का घेत नाहीस ? पण आजही असं घडताना दिसत नाही. उलट पुरुषांनी दिलेला बुरखा तिने सर्वांगावर ओढून घेतला आहे. पण त्यात तिची आता घुसमट होत आहे. म्हणून ती इशारा देते की,

*"हा लाव्हा बाहेर येण्याअगोदर*
*काळजी घेऊयात सगळेजण*
*कारण बुरख्यातून तिची ती येईल बाहेर*
*एक ना एक दिवस*
*आणि घेईल एकेकाला 'फैलावर.'*

खरच आज तिला समानतेची वागणूक दिली जाते का ? समाजातील असणारी ही विषमता पिढ्यानपिढ्या तिचा पाठलाग करत आलेली आहे. सामाजिक विषमतेची ही वेदना,आणि पुरुषप्रधान संस्कृतीतील वास्तव साध्या, सोप्या, आणि प्रवाही भाषेत मांडलेले आहे. संवेदनशील आणि संयमी असणारी ही भाषा कधी कधी स्पष्ट व परखड होताना दिसते. तरीही तिने दिलेला इशारा हा संयमाने दिलेला आहे त्यात कुठेही आगपाखड दिसत नाही. यातील कविता विचार करायला लावणाऱ्या व मनाला थेट भिडणाऱ्या आहेत. कवयित्री सासर-माहेर यामध्ये गुंतून पडलेले नाही.

*"स्त्रियांचा हा जन्म नको घालू सख्या हरी।*
*रात्र ना दिवस परक्याची ताबेदारी"*

स्त्रियांच्या अशा मौखिक वाङ्मयातही एकूण स्त्रीच्या मानसाचेच दर्शन घडत असते. समाजातील एकूण सर्व स्त्री वर्गाच्या दु:खाचे हे शब्दरूप आहे."[३] याचाच प्रत्यय या काव्यसंग्रहातून येतो.

या संग्रहातील स्त्री एकटी किंवा एकाकी नाही तर ती समष्टीचा विचार करणारी आहे. प्रत्येक स्त्रीच्या मनातली ही खदखद अतिशय तळमळीने या काव्यसंग्रहातून मांडलेली आहे. डॉ. द. ता. भोसले म्हणतात , "नात्याचे ऋजू भावबंध माणसाला पुष्ट करीत असतात. ही माझी आई, ही माझी आजी, हा माझा भाऊ, ही माझी मुले, ही माझी बहीण असे संबोधन्यातून आपली जी मानसिक जडणघडण होते, जे निरामय भावबंध निर्माण होतात, त्याच्यासाठी जो आपण जीव टाकतो आणि त्यांच्या सहवासात आपणाला जो अपूर्व आनंद मिळतो त्यालाच एकविसाव्या शतकातील व्यक्ती पारखी होऊन जाईल " [४]

**शीर्षक**

'एकटी' असले तरी तमाम स्त्री जातीच्या या भावना आहेत. भयाण सामाजिक वास्तव तर आहेच पण आपल्या संस्कृतीचा बुरखा देखील फाडलेला आहे. यातच या काव्यसंग्रहाचे यश आहे. 'स्व' पासून सुरू झालेली ही कविता स्त्री जीवनाचे विविध आयाम दाखवते. सर्वसमावेशक स्त्री जाणिवेचे स्वप्न कवयित्रीने पाहिलेले आहे.

**संदर्भ :-**

१. धोंगडे अश्विनी : 'स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन' पृ. २३
२. थोरात कांचन : 'एकटी', ग्राममित्र पब्लिकेशन , नांदलापूर, कराड , पहिली आवृत्ती-२०१९ . पृ. १२
३. डॉ. मांडे प्रभाकर : 'लोकपरंपरेतील स्त्री प्रतिमा', 'गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद. दुसरी आवृत्ती २०१४. पृ.१९१
४. डॉ. भोसले द. ता.:'लोकसंस्कृती:स्वरूप आणि विशेष',पद्मगंधा प्रकाशन, पुणे. पहिली आवृत्ती २००४. पृ.१५९

# राव कादंबरीतील सामाजिक संदर्भ

**डॉ संभाजी धोंडीराम कदम**
बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी
ता.पलूस जि.सांगली

"राव " कादंबरीमध्ये गाव आणि गावातील बदलती चिरंतन मूल्ये पदोपदी कादंबरीतून दिसून येतात . गावामध्ये जगण्याच्या पद्धती , रीतीरिवाज , सण , उत्सव , परंपरा , राजकारण या गोष्टींना अनन्य साधारण महत्व आहे . " राव " या कादंबरीमध्ये धनदांडग्यांचे गावावर वर्चस्व दिसून येते . त्यांच्या आर्थिक बळाच्या सामर्थ्यावर ते इतरांना लुटण्याचा ' धमकावण्याचा . छळण्याचा त्यांच्यावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात . "राव " कादंबरीमध्ये जागतिकीकरणामुळे बदलत्या गावाचे चित्र प्रतिबिंबीत होताना दिसून येते . खेड्यामध्ये विविध योजना आल्या व खेड्याचे ग्लोबल गाव होत असताना गावात सरकारी योजनेतून विकासाच्या योजना मोठ्या प्रमाणात येत आहेत. गावामध्ये सर्व सोई सुविधा उपलब्ध होत आहेत. जागतिकीकरणामुळे गावातील जूने व्यवसाय मोडून पडले . त्याजागी नवनवे तंत्रज्ञान विकसित होत आहे. त्यामुळे गावातील बारा बलुतेदारी बंद पडून या कारागिरांवर उपासमारीची वेळ आली आहे . ग्लोबल गावामध्ये शाळा , महाविद्यालये , वैद्यकीय रुग्णालये , बार , हॉटेल , धाबे , देशी - विदेशी दारूची दुकाने मोठ्या प्रमाणामध्ये उपलब्ध झाल्यामुळे संपूर्ण गावाचे चित्रच बदलले आहे.

" राव " कादंबरीमध्ये जातीय राजकारण दिसून येते . दलित - सवर्ण संघर्ष , त्यांच्या झोपडपट्टयाना आगी लावणे , त्यातून ताण तणाव निर्माण होवून गावामध्ये तणावाचे वातावरण निर्माण होणे , गावातील विकास कामावरून वादंग निर्माण होणे . गावातील तक्रार पोलीस स्टेशनमध्ये गेल्यामुळे तिथेही धन दांडग्यांचा वचक असणे . या सर्वांततून असे दिसून येते की , आजही ग्रामीण भागातील जातीय राजकारण त्यातून होणारी कष्टकरी , दीन, गरीबांची उपासमार दिसून येते. गावात सरपंचाची निवड असो सोसायटीची निवड असो किंवा लोकसभा ,विधानसभा निवडणूक असो यावेळी गावातील वातावरण तणावग्रस्त व गढूळ बनलेले दिसून येते .या कादंबरीतील सरपंचाबदल सोमनाथ साळवे सुशिक्षित बेकार तरुण सांगतो की, "वर्षा दोनवर्षात झालेला गावचा सरपंच ऐटित गाडीत बसून गावात फिरतो ,बऱ्याच उचापती करतो . गाव त्याच अन् धाबाही त्याचा . लोकांच्या विकासासाठी आलेला पैसा घाब्यात गुंतवलाय " गावात सरपंचान टोलेजंग बंगला बांधलाय. त्यांने स्वतःचा विकास केला पण झोपडपटटीचा विकास केला नाही यावरून आजच्या सामाजिकतेचे दर्शन यातून होते . सरपंचांने स्वतःचा विकास केला; पण झोपडपट्टीचा विकास केला नाही . गरीबांच्या मतदानावर निवडून पुन्हा गरीबाला दुःख देणारे आहेत. . त्यांना गरीबांचा विसर पडतो .

खेडेगावामध्ये हॉटेल , पानपट्टी चे दुकान हे गावाच्या कुचाळक्या , टवाळक्या करण्यासा साठीचा अड्डा असतो . असेच या गावामध्ये जाधवाचे हॉटेल एक प्रकरणच होते . हे हॉटेल व्यवस्थित चालत नव्हते म्हणून तो जाधव गाव सोडून जातो . गावात वेगवेगळ्या प्रकारचे तर्कवितर्क केले जातात. कोण म्हणत जाधवावर बँकेचे कर्ज झाले . म्हणून त्याने गाव सोडल , कोण म्हणत तो पळून गेला , कोण म्हणत तो जागा विकून गेला ; पण जाधव गावात येतो ते नवीन सुंदर बायको घेवून . ती हॉटेलच्या गल्ल्यावर बसताच हॉटेल आता जोमात सुरु झाले . दिवसेंदिवस पैसा मिळत होता . म्हणून त्याने तालुक्याच्या ठिकाणी हॉटेल टाकले . आजही समाजामध्ये हीच गोष्ट घडताना दिसून येते अनेक किराणा दुकानदार दुकान सुरळित चालावे म्हणून सुंदर बायका दुकानामधे , पेट्रोल पंपावर तेल सोडण्यासाठी स्त्रियांची नेमणूक करताना दिसून येत आहेत . इथे लेखक गावातील सामाजिक बारकावे टपल्याचे दिसून येते .

" राव " कादंबरीतील संपूर्ण समाज वेगवेगळ्या पातळ्यांवर जगताना दिसून येतो . या कादंबरीमध्ये सोममाथ साळगे , विलास आणि कॉन्ट्रक्टर रणपिसे या प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. सोमनाथ कोंडीबा साळगे हा विद्यापीठाचे शिक्षण घेता घरची परिस्थिती अत्यंत बेतची असून त्याली मदत करणारे धनदांडगे कॉन्ट्रक्टर रणपिसे , धनूशेठ , आमदार यांच्या अधिकाराच्या ओझ्याखाली गाव दबलेला असतो . गावच्या पाटलाची नजर साळगेच्या आईवर असते . साळगेच्या आईच्या चारित्र्याबद्दल गाव वेगवेगळ्या पध्दतीने बोलत असतो . साळगे पाटलाच्या घरी गेल्यानंतर पाटील साळगेच्या आईविषयी म्हणतो " तुझी आय नागीन व्हती . नुसती सळसळायची , तू जलमाला यायच्या अगूदर " (पृष्ठ क्र. ९३ ) या गोष्टीचा सोमनाथला खूप राग येतो . पण परिस्थितीमुळे लाचारीचे जीणं जगावे लागते . पाटलाचे शब्द जिव्हारी लागूनही काही उपयोग होत नाही गावगाड्याचा प्रमुख पाटील

होता .तो परंपरेने त्याचाच गावावर वचक होता . पाटलाच्या वाड्यावरून जाताना स्त्रीया पुरुष पायातील चपला हातात घेवून जायच्या हा प्रत्येक खेड्यातील दंडक होता . गावातील अनेक धनदांडगे गोरगरीबांच्या बायका मुलींवर वक्र दृष्टी ठेवून असतात ह्याचे दर्शन त्या कादंबरीतून होते . वयाने वृद्ध असणारा कॉन्ट्रक्टर रणपिसे पैशाच्या जोरावर स्त्रियांना आपल्या सोबत घेवून ऐषारामाचे जीवन जगत असतो . इथे समाजामध्ये पैसा, सत्ता ' संपत्तीच्या बळीवर जगण्याचे संदर्भच बदलवून टाकणाऱ्या रणपिसेचे चित्रण अत्यंत उठावदारपणे लेखक चित्रित करत आहे . धनदांडग्यांची नोकरी कितीही प्रामाणिकपणे करा. ते कधीही नोकरांवर विश्वास ठेवत नाहीत . कामावरून काही सिमेंटची पोती चोरीला जातात त्यावेळी रणपिसे टाकून बोलतो ." तुला कळत नाही काय? शेण खातोस का? शिकला म्हणून बरा " ( पृष्ठ क्र. ५२ ) गरीबाला बिकट परिस्थितीमुळे करावे लागणारे कष्ट व सहन करावा लागणारा अपमान याचे चित्रण होते .

समाजामध्ये शिक्षण सम्राटांनी शिक्षणाचा बाजार मांडल्याचे चित्रही इथे दिसून येते . चेअरमनच्या शाळेतील क्लार्कच्या जागेची जाहिरात प्रकाशित होते . म्हणून साळगे त्या शाळेत नोकरीस असणाऱ्या केंगार सरांकडे जातो . तेंव्हा केंगार सर त्याला म्हणतात ." उगाच वीस रुपये घालवू नकोस " हे समाजवास्तवाचे दर्शन इथे होते . महाराष्ट्रामध्ये ज्या शिक्षण सम्राटांनी बहुजनांच्या मुलांच्या शिक्षणासाठी संस्था स्थापन केल्या . त्यांनी प्रसंगी मुलांच्या अन्नासाठी समाजासमोर झोळी पसरली त्याच संस्थामध्ये आज त्या थोर शिक्षण सम्राटांच्या विचारांचा व कार्याचा विसर आताच्या संस्था चालकांना पडतो . याच नावाजलेल्या शिक्षण संस्थामध्ये पगारातून टक्केवारी , बदलीसाठी पैसा , नोकरीसाठी पैसा जाहिरात देण्याअगोदर जागा भरलेल्या जाहिरातबाजीचा दिखाऊपणा दिसून येतो. ही शिक्षण क्षेत्राला लागलेली कीड या कादंबरीमध्ये पहावयास मिळते . आज शिक्षण व्यवस्थेचे विदारक चित्र आहे . शाळांमध्ये शिक्षकांच्या जागा भरावयाच्या आहेत ; पण त्या भरल्या जात नाहीत . केंगार सरांसारखे तासीका तत्वावरचे शिक्षक भरून शिक्षण व्यवस्थेचे वाटोळे या भांडवलदार , धनदांडग्यांनी केल्याचे दिसून येते . सेवानिवृत्त शिक्षकाला त्याच्या हक्काची पेन्शनसुद्धा सहज मिळत नाही . आयुष्यभर प्रामाणिकपणे नोकरी केलेल्या खोत सरांना
साळगेसारख्या विद्यार्थ्याने पेन्शनसाठी आमदारापुढे गुडघे टेकावे , आर्जव व विनवणी करावी याचे आश्चर्य वाटते . इतकेच नाही तर प्राथमिक केंद्राचे प्रमुख जोशी सरांनी गावातील धनदांडगे , प्रतिष्ठित , भांडवलदारांच्या मनाप्रमाणे रिपोर्ट दिले नाहीत म्हणून त्यांची बदली नक्षलवादी भागात केली जाते . साळगे गुरुजींना घेऊन आमदारांपुढे जातात . तेंव्हा आमदार म्हणतात "रणपिसे बघा , साळगे पुढारी होताहेत , चांगले आहे . ( पृष्ठ क्र. ८१ ) यावेळी साळगेला अत्यंत वाईट वाटते की, जो आमदार आणि रणपिसे वाटचाल करतात ती अनेक साळगेसारख्या तरुणांच्या कर्तृत्वावरच होय . पण एवढे सोसून साळगे म्हणतो " आपल्यासारखे हजारो या देशात आहेत . गुलामी अन् लाचारीजन्माला घेऊन येणारे ( पृ. क्र. ८१ ) गरीबांनी फक्त काबाड कष्ट करायचे , लाचारीचे जीवन जगायचे , त्यांनी कोणतेही महत्वाचे निर्णय घ्यायचे नाहीत अशीच आजही या समाजातील स्वत:ला उच्चभ्रू समजणाऱ्या समाजाची आहे .

समाजामध्ये एकीकडे प्रचंड संपत्ती आहे तर दुसरीकडे प्रचंड उपासमार आहे . याचे चित्रण कादंबरीमध्ये आले आहे . धनू शेठ हा सावकार , आमदार , खासदार , सरपंच व गावातील धनिकांच्या आशीर्वादामुळे गावात , तालुक्यात सावकारी करत असतो . या मोठ्या माणसांशी मैत्री वाढावी आपला व्यवसाय वाढावा म्हणून खाणे , पिणे ,नाचणे अशा प्रकारच्या पार्टीचे आयोजन करतो ; तर दुसरीकडे अन्नासाठी चाललेली फरफट दिसते . तेव्हा सोमनाथ म्हणतो की, " एका बाजूला कुत्री अन् दुसऱ्या बाजूला माणसं दोघांचही एकाच कारणासाठी भांडण , पोट भरण्यासाठी " ( पृ क्र . ८० ) हे समाजवास्तव लेखक अत्यंत तन्मयतेने मांडताना दिसतात .

" राव " या कादंबरीतील आणखी एक समाजवास्तव समोर येते ते असे की , तानूआजी तारुण्यात असताना फार सुंदर दिसायची म्हणून तिच्याकडे लोकांची ये-जा असायची पण तिच्या वृद्धपणी तिला भीक मागयची व भंगार गोळा करायची वेळ आली . तिच्या मृत्यूनंतर तिच्याजवळ कुणीच नव्हत " झोपडीत फक्त शिळ्या भाकरी अन त्या भाकरीसाठी भांडणारी कुत्री " ( पृ. क्र ६ ८ ) माणसाच मन हेलावून टाकणारी ही घटना म्हणजे आजही खेड्यापाड्यात आणि शहरातही दारिद्र्याने गांजलेली , पिचलेली माणसं जगण्याच्या विवंचनेत मरणप्राय यातना सोसताना दिसून येतात. अनेकांना दोनवेळच्या रोजीरोटीचा प्रश्न भेडसावत आहे. इथल्या माणसाना केवळ भाकरीचाच प्रश्न नाही तर रोजगाराचा सुद्धा शोध घ्यावा लागतो. तो नाही मिळाला तर " फाटलेल्या

वाकळेचा संसार, अंधारात मातीला पाठ ठेकवायची आणि दिवस उजाडला की, पुन्हा पाणी पिऊन रोजगाराच्या शोधात " ( पृ क्र. ६१ ) गावभर , शहरभर भटकायच हा गरीबाचा दैनंदिन व्यवहार झाला होता.

या कादंबरील " सका " अत्यंत गरीब . त्याच्या पाठी जन्माला आलेल्या बहिणीचा विवाह होतो पण सासरच्या लोकांनी तिला जावून मारलं होत. हुंड्यासाठी आजही स्त्रियांना हुंड्यासाठी बळी जावे लागत आहे . याचे दर्शन या कादंबरीतून पहावयास मिळते. हुंड्यासाठी पत्नीला जीवे मारणाऱ्या नवऱ्याला " पोलीसांनी त्याला धरायचे नाटक केले . दुसऱ्या दिवसापासून तो बोकडासारखा मोकळेपणाने गावात छाताड काढून फिरु लागला . गरिबाला न्याय न्हाय मुकादम , न्याय न्हाय " ( पृ.क्र. ६३) हे समाज वास्तव मनाला चटका लावून जाणारे आहे गावा - घरात माणूसकी जीवंत राहिली नाही . माणसाची मनं बधीर झाली आहेत. जनावारांपेक्षा वाईट वागणूक पहावयास मिळत आहे. शहरातील , गावगाड्यातील एकोपा , जिव्हाळा , सहकार्याची भावना नष्ट होत चालली आहे. एकमेकांच्या मनात वरील भावना नष्ट होत चालल्या असून त्याठिकाणी सूड , तिरस्कार अन्याय , अत्याचार , सत्तास्पर्धा , अंतर्गत वाद - विवादाचा शिरकाव झाल्याचे दिसून येते .

प्रस्तूत " राव " कादंबरीमध्ये समाजातील लोकांची होणारी उपासमार ' अन्नाची टंचाई , बेरोजगारी , धनदांडग्यांचा समाजावर असणारा वचक ' गरीबाच्या मोक्याच्या जागेसाठी वाट्टेल ते करण्यासाठी तयार असणारा भांडवलदार वर्ग . गावाचे भ्रष्ट राजकारण ' समाजात शिक्षणाची झालेली हेळसांड , सावकारी , धनदांडगेशाही " दिसून येते . परिस्थितीने गांजलेल्या मालन, रंगी या स्त्रियांनी पैशासाठी शेठ, सावकाराची शेज सजवायला ह्या स्त्रिया तयार असतात तर सावकाराच देण देण्यासाठी रात्रीचा दिवस काम करणारा महादेव इथे दिसून येतो समाजातील दैनंदिन व्यवहार त्यातून समाजाची होणारी ससे होलपट व धनीक श्रीमंताचा गावावर असणारा वचक या कादंबरीमध्ये दिसून येतो .

"राव " या कादंबरीमध्ये लेखकाने विकासाच्या नावाखाली गावात होणारी लूट अनेक तर्हेची माणस गावातील सामाजिक मूल्यव्यवस्था , गढूळ राजकारण ' अंतर्गत गटातटाचे राजकारण , त्यातून होणाऱ्या मारामाऱ्या , खून ' गरीब , दलितांचे शोषण , धनिकांचा धिंगाणा , उच्च शिक्षणानंतर तरुणांच्या मनात येणारे नैराश्य ' गावातील सुंदर स्त्रियांवर धनिकांचे लक्ष ' समाजविघातक गोष्टी ' शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार , फसवणूक ' त्यातून होणारे समाजाचे अध:पतन दिसून येते . तर गावातील जातीय तंटे यामुळे समाजात माजलेली अराजकता , कामगारांचे शोषण ' पोलीस स्टेशनमध्ये असणारा धनिकांचा वरदहस्त . त्यातून सामान्य जनतेची होणारी पिळवणूक अशा अनेक सामाजिक प्रश्नावर प्रकाश टाकण्याचे काम लेखक युवराज खरात यांनी केल्याचे दिसून येते .

**संदर्भ :**

१) प्रा. डॉ. हंडीबाग भारत - मराठी कादंबरी आकलन आणि विश्लेलेषण
२ ) प्रा. खरात युवराज - राव कादंबरी - शाहू प्रकाशन , भोसरी पुणे - ३९ प्रथम आवृत्ती जून २००९ .

www.aiirjournal.com

# २१ व्या शतकातील दलित मराठी कादंबरीतील सामाजिकता व सांस्कृतिक संदर्भ

**प्रा. निलेश नामदेव कांबळे**
श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी
nileshkamble0202@gmail.com

**प्रस्तावना :**

मराठी साहित्यामध्ये कथा, कविता, नाटक या वाङ्मयप्रकाराप्रमाणे कादंबरी का वाङ्मय प्रकार देखील लक्षवेधी ठरला आहे. म्हणूनच कादंबरी व त्या त्या कादंबरीतून प्रकट झालेली सामाजिकता या विषयावर लक्ष वेधण्यासाठीच हा लेखनप्रपंच करीत आहे. तसे पाहता मराठी वाङ्मयातिल कादंबरीचा आढावा घेताना अभ्यासकांच्या लक्षत येते की १८५६ साली गोमंतकिय संस्कार झालेला एक माणूस म्हणजे बाबा पद्मनजी या ग्राहस्थाने 'यमुनापर्यटन' ही कादंबरी लिहिली. अभिमानाची गोष्ट अशी की, याचा कादंबरीला संपूर्ण मराठी वाङ्मयामध्ये पहिल्या कादंबरीचा दर्जा प्राप्त झाला. ही कादंबरी वाचल्यानंतर बाबापद्मनजी यांनी ख्रिचन धर्माचा थोडासा का होईना प्रसार व्हावा या हेतूने ही कादंबरी लिहिली गेली. आणि संपूर्ण महाराष्ट्रातून , घराघरात लोकप्रिय झाली. या कादंबरीतील 'यमुना' आणि तिची मानसिकता याचे प्रखरपणे जीवन वाचकांच्या मनाला भिडते. याचे कारण असे की लेखकाने यमुनाच्या मानसिकतेबरोबरच सामाजिक जाणिवेच चित्रण केले आहे.

**दलित कादंबरीतून दिसून येणारी सामाजिकता :**

याची प्रेरणा घेऊन नंतरच्या काळामध्ये १९६० नंतर मराठी कादंबरीमध्ये ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, महानगरीय, ऐतिहासिक व चरित्रात्मक प्रवाह उदयाला आलेले दिसतात. या प्रवाहातून समाजमध्ये असलेली सामाजिकता त्याचे होणारे मूलगामी परिणाम, वास्तव समजाभिमुख यांचे आणि त्याच्या अनुषंगाने त्या लेखकाने कादंबरीतून अभिव्यक्त केलेली सामाजिकता याचे चित्रण वाचकाला अंतर्मुख करून टाकते.

दरम्यानच्या काळात दलित कादंबरीच्या प्रवाहामध्ये वावरताना वि. रा. चौगुले कादंबरीच्या बाबतीत म्हणतात " मराठी साहित्याचा मुख्यप्रवाहात जातीय श्रेष्ठ –कनिष्ठतेचे चित्रण आले होते. पण दलित कादंबरी पाहता समाजाचे चित्रण सूक्ष्म पातळीवरून केलेले दिसते. उदा. अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' कादंबरी लक्षात घेण्यासारखी आहे. मराठी साहित्यातील सामाजिकतेला या सादर हू लेखकांनी दिलेले वरदान म्हणावे लागेल. कारण या लेखनांतून नवनवे विषय परिमाण मराठी वाङ्मयाची ऊंची वाढवतात. प्रामुख्याने वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, विषमता, उच्च- निच भावामुळे होणारा संघर्ष आणि मानसिक ओढाताण व तेढ या परिघातच फिरणारी आहे. या समजुतीला छेद देणारे लेखन म्हणून सिद्धार्थ रामटेके यांच्या 'भारत सैल' होताना या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल.

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. तो समाजाशिवाय जिवंण जगू शकत नाही. ज्या समाजात राहत असताना एका विशिष्ट समजा घटकाला मृत्यूसमान अनुभव येतं असतात. तेव्हा त्याचेही प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. दलित साहित्यातील मूल्यांचा विचार करताना प्रमुख मूल्य सामाजिक समस्या मांडणे हे आहे, असे म्हणावे लागेते. दलित समाज आणि साहित्या यांचा विचार करताना नामदेव ढसाळांची भाषा विद्रोहाचे बोल बोलते. आपल्या प्रस्थापित मराठी साहित्याची गत असेल तर साहित्यानेच अमरतत्वाचा, पट्याचा कशा करता ध्यास धरावा. दलित साहित्याने मराठी साहित्याला नवे शब्द दिले. समाजाला माहीत नसलेले जीवन दाखवून दिले.

**निष्कर्ष :**

१. या काळातील दलित कादंबरी पारंपारिक दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या लेखकांना एक पावुल पुढे ताकत बदलणे दलित जीवन प्रश्न, जागतिकीकरण, राजकारण, ग्रामीण भागातील बदलते संदर्भ यांचा वेध घेणे.

ISSN 2349-638x www.aiirjournal.com Aayushi International Interdisciplinary Research Journal

२. दलित साहित्य आणि चळवळ जागतिकीकरणात नामशेष झाली आहे. परंतु आपला विचार पुढे लिहिणारे, मांडणारे लेखक या काळात आहेत. हे विधान अधिक संयुक्तिक वाटते.

३. एकूणच २१व्या शतकात दलित कादंबरी विविध प्रवाहातून समृद्ध होताना दिसते. १९६० नंतरच्या प्रवाहापेक्षा हा प्रवाह निश्चितच मराठी कादंबरीत भरीव योगदान देत आहे.

**संदर्भ :**

१. नोंद : विलास खोले, आधुनिक महाराष्ट्रची जडणघडण साप्ताहिक विवेक, मुंबई, २००९.
२. समीक्षामीमांसा : गंगाधर पाटील, मौज प्रकाशन, मुंबई.
३. साहित्याचे निकष बदलावे लागतील : शरणकुमार लिंबाळे, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
४. टीकास्वयंवर : भालचंद्र नेमाडे

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतून येणारे धनगर समाजतील स्त्री चित्रण

**प्रा. उदय बाळासो शिंदे**
श्री संत गाडगेबाबा महाविद्यालय, कापशी.
shindeuday799@gmail.com

**प्रास्ताविक :**

आज २१ व्या शतकातील मेंढपाळांची भटकंती ती अविरत चालू असल्याची दिसते. ऊन, वारा, पाऊस, दुष्काळ, रोगराई, या अशा नैसर्गिक संकटांशी दोन हात करून तो आपले जीवन जगत असतो. ते जगत असताना मेंढका मेंढराप्रमाणेच रांनोमाळ भटकतो. या मेंढरापाई स्वाभिमानीशून्य जीवन तो जगत असतो. अशा या मेंढराबरोबर त्याच्या पाठीमागे बिऱ्हाड सांभाळणारी त्याची जीवनसाथीही काबाड कष्ट करताना दिसत असते. त्याचा निम्मा भार उचलताना दिसत आहे. नुसतेच चूल आणि मूल ऐवढेसे आपले स्वत:चे कार्यक्षेत्र मर्यादेत न ठेवता ती त्याच्या बरोबर मेंढरामागे भटकत आहे. हवे नको ते पाहत ती त्याच्या बरोबर कष्ट करीत आहे.

म्हणूनच भटकंती मागच्या जीवनामध्ये धनगर समाजातील स्त्रीचे चित्रण साहित्यातून कशा प्रकारे चित्रित झालेले आहे. हे पाहण्यासाठी १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतून येणारे धनगर समाजातील स्त्री चित्रण लेखामध्ये या समाजातील स्त्रीयांचे प्रश्न कोणते आहेत, त्या प्रश्नांना ती कशा प्रकारे हाताळताना दिसते ते हालत असताना तिच्या अंगी असणारी सोषिकता, समंजसपणा, निर्भयता, जिद्द, चिकाटी, सहनशीलता अशा विविध स्वभाव वैशिष्ठ्यांचा शोध प्रस्तुत लेखामधून घेतलेला आहे.

**'मेंढका' कादंबरीतून व्यक्त होणारे स्त्री चित्रण :**

मेंढपाळीचा व्यवसाय करत असताना त्या मेंढरांच्या पाठीमागे भटकंतीवर असणाऱ्या मेंढराबरोबर त्याची पत्नी असते. अशा या भटकंती मागे सर्व परिस्थितीशी मिळते जुळते घेऊन विनातक्रार दिवस ढकलणारी स्त्री पाहून तिच्यातील सोषिकपणा आपल्याला दिसतो. सुरेश शिंदे यांच्या 'मेंढका' या कादंबरीतून आलेली 'जनाबाई' ही व्यक्तिरेखा आपली भटकंती दरम्यांनची परवड सांगताना म्हणते की 'सगळा ऊगा-निगा एकटीला करावा लागतो.' रोज एका तळावर मेंढर बसायला असतात. त्यांच्या बरोबर सारखाच बिऱ्हाड हलवाव लागते. करून खाण्यापुरत बिऱ्हाड असलतरी रोज उचलायच म्हणजे थोडा उपध्याप आहे. यातून आपल्याला तिची होणारी हेळसांड, कसरत, तिला होणाऱ्या वेदना, तिच्या मनाची अवस्था समजते. असे कितीतरी प्रश्न या स्त्रियांना भटकंतीवर असताना पडलेले असतात.

**'डोंगरापल्याड' कादंबरीतून स्त्रीचित्रण :**

भटकंतीवर असताना मेंढपाळांचा जिथे तळ पडलेला असतो. तिथे बिऱ्हाड उतरली जातात तिथे ऊन, वारा, पाऊस,या सर्वांशी त्यांना सामना करताना किती तरी संघर्ष करावा लागतो. सकाळी उठल्यापासून ते दिवसभर राबराब राबूनही त्या स्त्रीला जेव्हा संध्याकाळचे दोन घास ही नीट खाता येत नाहीत. या विषयी 'डोंगरापल्याड'मधुन पावसामुळे झालेली धनगरी बिऱ्हाड्यांच्या दुरावस्थेचा चित्रित झालेला प्रसंग वाचकांना बरेच काही सांगून जातो.

स्त्रीला पावलोपावली लागणाऱ्या ठेचा नजरेस पडतात. त्याप्रमाने 'डोंगरापल्याड' ची सुरवातीला बोलक्या स्वभावाची व नंतर वाचा गेलेली नायिका, नायक हे स्त्री चित्रण ही बरेच काही सांगून जाते.

अशा प्रकारे 'डोंगरापल्याड' मधील नायिका 'जायरू' या प्रमुख स्त्री चित्रणा शिवाय इतरही अनेक गौण स्त्री चित्रणेही नजरेस पडतात.

**'माझा धनगरवाडा' मधील होणारे स्त्री चित्रण :**

माझा धनगरवाडा या साहित्यकृतीतून अशाच एका प्रसंगी झालेल्या गारांच्या पावसामुळे, काळजीने अस्वस्थ झालेली नायकाची आई कपाळाला हात लावून म्हणते की, अरे देवा कस व्हणार ? पोराबाळांच्या, मेंढक्यांच्या पोटाला काय घालायचं ?

कशानं चूल पेटवायची असे प्रश्न तिच्यापुढे निर्माण होतात. माझा धनगरवाडा साहित्यकृतीतून व्यक्त होणारे चित्रण, आई-वडील, शेळ्या मेंढ्यांची चारणी करायला आपल्या धनगरवाड्या बरोबर दऱ्याखोऱ्यांची शिवारात कोठेतरी भटकत होते त्यांचं भटकण त्यांना जीवन जगत असताना करावा लागणारा संघर्ष आणि आपली मूल शेळ्या, मेंढया राखायच सोडून शाळा शिकतील या साठी करत असलेले कष्ट हे आमच्यासाठी सर्व काही होत. त्यांच्या संघर्षमय जीवनातून आमच्या अंगी शाळा शिकण्याची निर्माण झालेली जिद्द हेच आमच खर बळ होत.

प्रत्येक स्त्रीला आपण सुंदर दिसावे, दागदागिने घालावेत असे वाटत असावे. या समाजातील स्त्रीला ही अगदी असेच वाटते. पण मेंढरामागच्या भटकंतीमय जीवनात असले नटणेमुरडणे कुटले आले आहे. या स्त्रीला मग या स्त्रिया आपली हाऊस मौज करतात त्या मुळं गावी असताना चार पाच महीने वर्षातील हा मेंढपाळ आपआपल्या गावी असल्यामुळेत्यो स्थिर पद्धतीचे जीवन अल्पकाळ का होईना जगतो.

**निष्कर्ष :**

१. मेंढरामागच्या भटकंतीमुळे जीवन संघर्षाचा 'मेंढका, डोंगरापल्याड व माझा धनगरवाडा या मराठी साहित्यकृती मधून धनगर समाजातील स्त्रियामध्ये असणारी सहनशीलता, समंजसपणा, जिद्द, चिकाटी हे गुण दिसून येतात.
२. 'माझा धनगरवाडा' या साहित्यकृतीतून स्त्रीजीवनातील समस्ये बरोबरच शिक्षणाचे महत्व अधोरेखित होताना दिसते.
३. 'डोंगरपल्याड' या साहित्यकृतीतून धनगर समाजातील स्त्रीजीवनाची भटकंती दरम्यांनची होणारी परवड चित्रित होताना दिसते.

**संदर्भ :**

१. सर्ज्या आणि मेंढकाग्रामीण साहित्य समीक्षा, सुरेश शिंदे, सुरेखा प्रकाशन, सर्ज्यालय,फलटण.
२. डोंगरपल्याड, शिवाजी ठोंबरे, अनूबंध प्रकाशन, पुणे.
३. माझा धनगरवाडा, धनंजय धुरुंगडे. रोहन प्रकाश, पुणे.

# दलित कवितेतील सामाजिकता

**डॉ.तुळशीराम उकिरडे**
सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग,
तेरणा महाविद्यालय (कला,विज्ञान व वाणिज्य),
उस्मानाबाद

1990 नंतर जागतिकीकरणाचा वेग वाढला. सर्व जगाच्या सीमारेषा अस्पष्ट झाल्या. जागतिककरण, उदारीकरण, खाजगीकरणाचा वेग वाढत गेला. याचे चित्रण कथा,कविता,कादंबरी, आत्मचरित्र,ललित साहित्यात अधोरेखित केलेले पहावयास मिळते. जागतिकीकरणात सर्वसामान्य माणूस अंधाराच्या खाईत ढकलला जाऊ लागला. 'आहे रे नाही रे' हा वर्ग तयार झाला. श्रीमंत - श्रीमंत होत गेला गरीब- गरीब होत गेला. माणसा - माणसातील गरिबी- श्रीमंतीची दरी वाढत गेली. सर्वसामान्य माणूस आजही अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजा भागविण्यासाठी जीवाचे रान करतो आहे .

ही विषमता मोठ्या प्रमाणामध्ये सर्वदूर पसरत गेली. त्यामध्ये वंचित , शोषित , दलित कष्टकरी, अल्पभूधारक पुरते पिळले गेले. प्राथमिक गरजा भागविण्यासाठी संघर्ष करणारा माणूस या युगामध्ये दिसू लागला. ताण, तणाव, नैराश्य, आत्महत्या ,बेरोजगारी, कर्जबाजारीपणा, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या घटनेमध्ये वाढ झालेली आपणास पहावयास मिळते. याचे चित्रण कवितेत दिसून येते. या देशातील सर्वसामान्य जनता सुखी आहे का? हाही विचार करणे या ठिकाणी क्रमप्राप्त ठरते. समाजातील अनिष्ट- रूढी , परंपरा, दलितावर होणारे अन्याय- अत्याचार, कष्टकऱ्यांचे होणारे शोषण, मजूरांचे होणारे हाल, समाजातील घडणाऱ्या बऱ्या वाईट घटना मानवी मनाला पिळवटून टाकणाऱ्या आहेत. दलितावर होणारे अन्याय- अत्याचार मानवी संवेदना गारठून टाकणाऱ्या आहेत.

कवी लेखणीच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची हाक देतात .डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने त्यांची लेखणी धार धरू लागते आणि समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करू लागते. त्यामध्येच जयराज खुणे ,भरतकुमार गायकवाड आणि पंडित कांबळे यांच्या कवितेचा प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून परामर्श घेतलेला आहे.

कवी जयराज खुणे "मी माझ्या भूमीच्या शोधात", कवी भरतकुमार गायकवाड "दावणीला बांधलेले लोक" आणि कवी पंडित कांबळे "पेटलेल्या शहरांच्या कल्लोळात " यांच्या कवितांच्या संदर्भाने प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे. प्रस्तुत कवींच्या कवितेतून परिवर्तनवादी विचार आविष्कृत झालेले दिसून येतात. कवी जयराज खुणे यांच्या "मी माझ्या भूमीच्या शोधात" या कवितासंग्रहात एकूण 50 कविता आहेत . कवी भरत गायकवाड यांच्या "दावणीला बांधलेले लोक" हा कविता संग्रह ग्रंथाली प्रकाशनने प्रकाशित केला आहे. या काव्यसंग्रहात ६२ कविता आहेत, तर पंडित कांबळे यांच्या "पेटलेल्या शहराच्या कल्लोळात" या कवितासंग्रहात ७३ कविता आहेत. या तिन्ही कवींच्या कवितांच्या जन्म 2000 नंतरच्या कालखंडातील आहे.

कवी जयराज खुणे 'बाबासाहेब 'या कवितेत म्हणतात,

*"बाबासाहेब !*
*ज्ञानामृत पाजून*
*तुम्हीच फुलविला वृक्ष*
*आम्हा सर्वांसाठी*
*त्यांचीच फळे खातोय*
*आज चवीने*
*पवित्र प्रसाद म्हणून*
*वाटतोय दुसऱ्यांनाही*
*कुणी रुसू नये म्हणून"(पृ.क्र.४२)*

या समाज व्यवस्थेने बहिष्कृत केलेल्या दलित समाजाला समाजप्रवाहात आणण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले.माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त करून दिला. कवी जयराज खुणे कवितेत म्हणतात, बाबासाहेब तुमच्यामुळेच आम्ही माणसात आलो. तुम्हीच चांगल्या विचारांचे बीजारोपण करून वटवृक्ष वाढविला आहे. त्याची गोड फळे आम्ही चाखत आहोत. त्याचबरोबर चांगले विचार दुसऱ्यांनाही वाटत आहोत ,असे कवी नमूद करायला विसरत नाही.तर भरतकुमार गायकवाड 'माफ करा बाबासाहेब 'या कवितेत म्हणतात .

*"शिक्षण सोडून दिलंय*
*संघर्षाचा तर पत्ताच नाही*
*जिथे तिथे पत्करली लाचारी*
*कुठे अभिमानाने जगलोच नाही" (पृ.क्र.१९)*

"शिका संघटित व्हा संघर्ष करा" हा मूलमंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समग्र समाजाला दिला . भारतीय व्यवस्थेमध्ये चातुर्वर्ण व्यवस्था होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा पद्धतीने जातीव्यवस्थेची उतरंड समाजामध्ये पसरलेली होती. शूद्र घटकातील व्यक्तींच्या जीवनामध्ये प्रकाश पेरण्याचे काम केले.उपेक्षित घटकांना समाजप्रवाहात आणण्याचे काम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले पाहावयास मिळते.

जातीय व्यवस्था माणसाच्या मनामनामध्ये, नसानसामध्ये भिनलेली होती. आजही जातीयतेची पाळेमुळे मानवी मनातून सर्वदूर नष्ट झाली आहेत, असे म्हणणे अनाठायी ठरेल. प्रत्येक व्यक्ती माणसाकडे माणूस म्हणून पाहील, त्याच वेळेस कुठेतरी यथोचित न्याय मिळाला असे म्हणता येईल. आजही गाव पातळीवर मोठ्या प्रमाणामध्ये जातीयता ,जाती-जातीमध्ये होणारे संघर्ष पाहायला मिळतात. हे परिवर्तन केव्हा होणार? आम्ही जातीपातीत किती वर्ष अडकून पडणार? महामानवांच्या विचारांना असेच मूठ माती देणार का? या गोष्टीचा विचार करणे गरजेचे आहे, असे कवीला वाटते.

शिक्षणाने मानवी मन समृद्ध होते, आम्ही शिक्षण घेतले. कवी म्हणतो, त्या शिक्षणाचा उपयोग काय ? आम्ही मोठमोठ्या पदव्या घेतल्या. उच्चशिक्षित झालो, शिक्षणाने सुसंस्कार केले .तरीही लाचारीचे जगणे संपता संपत नाही . स्वाभिमानाचे जगणे वाट्याला येत नाही, अशी खंत कवी कवितेत व्यक्त करताना दिसून येतो. कवी पंडित कांबळे 'नवा मार्ग' या कवितेत म्हणतात,

*"ही तर आदिम लढाई*
*कपिल चार्वाकापासून ते*
*डॉ.बाबासाहेब आंबेडकरा पर्यंत*
*व्यवस्थे व्यवस्थेत सत्ता बदलली*
*विकासाचा भूल भूलैया झाला*
*पण सामान्य जनासाठी ठोस असे काहीच नाही का ?"(पृ.क्र.५८)*

कवी खंत व्यक्त करतो. अनादी काळापासून पिढ्यानपिढ्या सर्वसामान्य माणसांचे शोषण सुरूच आहे. आजही वर्तमान परिप्रेक्षात सूक्ष्म पद्धतीने पाहिले तर त्याची प्रचिती आल्याशिवाय राहणार नाही. एकूणच हा सामाजिक स्तर विघातक असलेला पहावयास मिळतो. एक वर्ग अत्यंत बिकट परिस्थितीत जगतो आहे, याची कवीला खंत वाटते. तो या कवितेच्या माध्यमातून समाज व्यवस्थेवर असणारा रोष प्रकट करतो आणि सर्वसामान्य माणसासाठी न्यायाची याचना करतो. सर्वसामान्य माणसाला न्याय मिळाला पाहिजे .त्याच्या जीवनामध्ये परिवर्तन झालं पाहिजे. तो समाजामध्ये आनंदाने जगायला हवा. सामाजिक प्रवाहामध्ये प्रत्येक पातळीवर त्याच्या जीवनात बदल व्हायला हवा, अशी अपेक्षा कवी व्यक्त करत असताना दिसून येतो. वरील तिन्ही कवींचा विचार हा सामाजिक परिवर्तनासाठीचा आहे. भरतकुमार गायकवाड म्हणतात,

*"बांडगुळासारखे नकोच जगणे*
*आयुष्याशी झुंजता झुंजतोय मी*
*नाचणे कधीच जमलेच नाही*
*स्वाभिमान माणसात पेरतोय मी" (पृ.क्र.१०)*

स्वाभिमानी जगण्याची भाषा कवी भरतकुमार गायकवाड कवितेच्या माध्यमातून करताना दिसतात. समाजामध्ये खोटे मुखवटे घालून जीवन जगणारे अनेक लोक आहेत. अशा पद्धतीचे जीवन मला जगता आले नाही .सत्याच्या वाटेने चालण्याचा मी प्रयत्न करतोय. बाबासाहेबांच्या विचारांची कास मी पकडतोय. त्यांच्या विचाराने मी चालण्याचा प्रयत्न करतोय, अशा पद्धतीचा आशावाद भरतकुमार गायकवाड कवितेच्या माध्यमातून व्यक्त करत असताना दिसून येतात.

तर पंडित कांबळे हा कवी बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित होऊन क्रांतीची भाषा करताना दिसतो.कवी म्हणतो," *जातीच्या*

*झाडांच्या फांद्यांनो*
*दिशाहीन वाढताना भान ठेवा*
*निळ्या वाऱ्याची चेतना घेऊन*
*क्रांतीची बीजे पेरण्याशिवाय*
*आता तुम्हाला पर्याय नाही"(पृ.क्र.५०)*

कवी पंडित कांबळे बाबासाहेबांच्या विचाराने चालण्याची भाषा बोलतात. समाजाने दिशाहीन चालण्यापेक्षा योग्य दिशेने चालण्याचा प्रयत्न करावा. योग्य मार्गाने चालण्याचा प्रयत्न करावा. समाजामध्ये परिवर्तन घडवून आणायचे असेल तर क्रांती केल्याशिवाय पर्याय नाही, असे मत कवितेच्या माध्यमातून पंडित कांबळे मांडताना दिसून येतात.

खरे तर हे तीनही कवी बाबासाहेबांच्या विचाराने प्रेरित झालेले आहेत. त्यांच्या कवितेतून समाजातील विषमता, वर्णभेद, गरिबी, श्रीमंतीचे दोन ध्रुव, गढूळ झालेले सांस्कृतिक पर्यावरण दिसून येते . कवी त्यांचा पुन्हा - पुन्हा निषेध करतात आणि स्वातंत्र्य, समता ,बंधुता ,मानव मुक्ती यांना आपलेसे करतात. मानवतावादी विचार पेरतात. जीवनात ध्येयवाद, आशावाद व्यक्त करताना दिसतात.

कवी परखड भावना व्यक्त करतात. दुःखमुक्तीचा विचार करताना दुःखाचे मूळ जातीव्यवस्थेत असल्याचे ठामपणे सांगतात. आजही संविधानाला धुडकावून जाती व्यवस्था पेरण्याचा प्रयत्न होतानाची भावना व्यक्त करतात. या सर्व बाबी प्रस्तुत तीनही कवींच्या कवितेत दिसून येते.

शोषण मुक्त समाज व्यवस्था निर्माण करण्याचं काम त्यांची कविता नक्कीच करते . हे प्रश्न सोडवण्यासाठी नवतरुणांनी बाबासाहेबांचा विचार हृदयात तेवत ठेवून जागृत रहायला पाहिजे. बाबासाहेबांच्या विचाराला मूठ माती देणाऱ्यालाच मातीत गाडलं पाहिजे ,ही प्रखर भावना कवी जयराज खुणे ,भरत गायकवाड आणि पंडित कांबळे यांची कविता व्यक्त करताना दिसते.

**निष्कर्ष:-**

1) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित होऊन लिहिते झालेले कवी आणि त्यामध्ये परिवर्तनवादी विचारांची पेरणी झालेली आपल्याला दिसून येते.
2) दलित कवितेची मुख्य प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार हेच आहेत.
3) माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार प्राप्त व्हायला हवा. मानवी मूल्यांची होत असलेली गळचेपी कवी कवितेच्या माध्यमातून अधोरेखित करत असताना समाज परिवर्तनाची भाषा बोलू लागतो.
4) समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षण हे महत्त्वाचे माध्यम आहे. शिक्षण घेतले पाहिजे, हा आशावाद कवितेतत अधोरेखित झालेला पहावयास मिळतो.
5) राजकारण आणि राजकारणातील गलिच्छपणा त्यामध्ये सर्वसामान्यांचे होत असलेले हाल, सर्वसामान्य माणसाला अन्न, वस्त्र , निवारा या प्राथमिक गरजांसाठी करावी लागणारी ससेहोलपट कवी कवितेच्या माध्यमातून अविष्करत करताना दिसून येतात.
6) स्वातंत्र्य, समता, बंधुता, समानता या मूल्यांचा स्वीकार कवी कवितेत करताना दिसतो.
7) दलित कवितेची प्रेरणा एका विशिष्ट वर्गावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची भयावह चित्र रेखाटणारी आहे, माणसाला माणूस पण प्राप्त करून देणे हा मुख्य उद्देश दलित कवितेत दिसून येतो.

**समारोप :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे उच्च विद्याविभूषित होते. त्यांच्या वाट्याला हाल अपेष्टा आल्या. त्यांनाही जातीयतेचे चटके सहन करावे लागले. निसर्गाने मोफत दिलेले पाणी सुद्धा संघर्ष करूनच मिळवावे लागले. वर्गामध्ये बसण्याचा अधिकार नाही. शिक्षण घेत असतानाही त्यांना अनेक समस्येला तोंड द्यावे लागले. समाजाने जो एका घटकावर अन्याय अत्याचार केला आहे, त्याला न्याय देण्याचे, वाचा फोडण्याचे , अन्याय- अत्याचारा विरोधात लढण्याचे बळ त्यांनी समग्र समाजाला दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने पेटून उठलेला तरुण साहित्याच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची भाषा बोलू लागतो व होत असलेला अन्याय लेखणीच्या माध्यमातून उजाघर करण्याचा प्रयत्न करू लागतो. कवी जयराज खुणे, कांबळे व भरतकुमार गायकवाड यांच्या कवितेत बाबासाहेबांच्या विचारधारा दिसून येते.

**संदर्भ सूची :-**

1) पंडित कांबळे,पेटलेल्या शहराच्या कल्लोळात,समीक्षा पब्लिकेशन पंढरपूर,26 जून 2022
2) भरत गायकवाड,दावणीला बांधलेले लोक,ग्रंथाली प्रकाशन,मुंबई,प्र.आ.2022
3) जयराज खुने,मी माझ्या भूमीच्या शोधात,मी माझ्या भूमीच्या शोधात, निर्मल प्रकाशन, नांदेड १४ एप्रिल २०१७
4) फडके भालचंद्र-दलित साहित्य वेदना आणि विद्रोह श्री विद्या प्रकाशन पुणे 30 प्र.आ.1978
5) खंडेराव हरीश- आंबेडकरी कवितेचे अंतरंग जागर प्रकाशन मुंबई प्र.आ.1981

# समकालीन कवितेतील बदलते सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**डॉ. मांतेश हिरेमठ ,**
देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्ट्स अँड सायन्स कॉलेज ,
चिखली , ता शिराळा , जि . सांगली

**प्रस्तावना** :

कविता हा वांङ्मय प्रकार सभोवतालच्या परिस्थितीचा प्रभाव चटकन पकडतो . परिस्थितीचे निरीक्षण अनुभव आणि आकलनासह त्यावर भाष्य करण्याचे प्रभावी साधन म्हणजे कविता असे म्हणता येईल . समकालीन कवींपैकी काहींना वास्तव हे अखंड एकसंघ तसेच वस्तुनिष्ठ वास्तव म्हणून प्रतीत झाले . तर काहींना हे वास्तव विघटीत म्हणजे तुकड्या तुकड्यांमध्ये प्रतीत झाले. वास्तवाची दोन्ही आकलने मराठी काव्य परंपरेला परिचित आहेत . अखंड वास्तवाच्या आकलनातून मानवतावादी , वास्तववादी विश्वभन असते . तर खंडित वास्तवातून आधुनिक विश्वभान प्रकट होते . वास्तव असे काही नसतेच . जे असते ते चिन्हांकित , रचलेले वास्तव असते . त्यामागे उत्तराधुनिकतावादी विश्वभान असते . वास्तव अखंड आहे अशा आकलनाचा परिणाम महानगरातल्या आणि ग्रामीण भागातल्या अनेक कवींनी केलेल्या कवितेत दिसून येतो . श्रीकांत देशमुख , प्रवीण बांदेकर , वीरधवल परब, अजय कांडर , संतोष पवार इत्यादी कवींच्या काव्यातून त्या बदललेल्या संदर्भांचा शोध घेता येतो. अरुण काळे , महेंद्र भवरे हे कवीदेखील बदललेले संदर्भ अधोरेखित करतात .

साहित्य हा समाज मनाचा आरसा असतो किंबहुना समाजाचेच प्रतिबिंब साहित्यामध्ये उमटत असते . सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवरती समाजामध्ये काळाबरोबर बऱ्याच उलथापालथी होत असतात . त्या त्या काळाच्या पार्श्वभूमीवरती लेखक , कवी , नाटककार , विचारवंत हे बदललेले वास्तव मांडण्याचा प्रयत्न करत असतात . कविता हा वांङ्मयप्रकारसुद्धा याला अपवाद नाही . आधुनिक मराठी कवितेचे जनक म्हणून केशवसुतांना ओळखले जाते . 'नव्या युगाचा शिल्पकार हा मानवच आहे ' , ही संकल्पना केशवसुतांनी अग्रक्रमाने मांडली . 'माणसाला ' केंद्रबिंदू मानून नव्या विचारांची पहिली तुतारी त्यांनी फुंकली . अनेक कवितांच्या माध्यमातून सामाजिक व राष्ट्रीय ऐक्यभाव जोपासला आणि त्यांनी आपला जात ,पंथ पुसून टाकला .

'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न ' किंवा 'मजुरावर उपासमारीची पाळी ' यासारख्या कवितेतून गरिबांचे प्रश्न समाजासमोर मांडले . प्रत्येक वाचकाला विचार करण्यास भाग पाडले . आपल्या स्वार्थापायी मुठभर मानवांनी दलितांना दीन बनवले . अशांचा ते धिक्कार करतात . आपल्या काव्यातून नव्या युगाचा विद्रोही हुंकार साकारतात . जुन्या परंपरा सोडून देऊन , नवीन युगाची हाक ऐका असे म्हणतात . यातून जुन्या मूल्यांना कवटाळून बसलेल्या समाजाला सुधारणेकडे नेण्याचा त्यांचा प्रयत्न महत्त्वाचा वाटतो . केशवसुतांनी मराठी कवितेला नवा विचार , नवा आचार व नवा उच्चारही प्राप्त करून दिला . म्हणूनच त्यांना आधुनिक मराठी कवितेचे जनक असे म्हटले जाते . इंग्रजी काव्याच्या अभ्यासाने मराठीत जे परिवर्तन घडून आले ते केशवसुतांमुळेच होय . मराठी कवितेला सामाजिक , सांस्कृतिक पातळीवर प्रेम , निसर्ग , सामाजिकता हे विषय निषिध्द नाहीत , हे मराठी कवींना दाखवून दिले . केशवसुतांनी आखून दिलेली ही वाट पुढे मराठी साहित्यातल्या अनेक कवींनी चोखाळली . एकविसाव्या शतकात आणि जागतिकीकरणाच्या काळात बदललेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भांचा वेध अनेक कवींनी घेतला आहे .

याच सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर बदललेल्या वास्तवाचा वेध घेणारी कविता तिबेटी धर्मगुरू दलाई लामा यांनी लिहिली . तिचा मराठी अनुवाद शोभा भागवत यांनी केला आहे .

*आपल्या काळात इमारतींची उंची वाढली*
*पण माणुसकी कमी झाली .*
*रस्ते रुंद झाले , पण दृष्टी अरुंद झाली खर्च वाढला आणि शिल्लक कमी झाली घरं मोठी पण कुटुंब छोटी ....*
*सुख सोयी पुष्कळ पण वेळ दुर्मिळ झाला*
*पदव्या स्वस्त झाल्या आणि शहाणपण महाग*
*माहितीचे डोंगर जमले पण नेमकेपणाचे झरे आटले*
*तज्ज्ञ वाढले आणि समस्याही वाढल्या औषध भरपूर पण आरोग्य कमी झाले मालकीची भाषा वाढली , मूल्यांची कमी आपण*
*बोलतो फार .... प्रेम क्वचित करतो . . . . आणि तिरस्कार सहज करतो*
*राहणीमान उंचावलं पण जगणं दळभद्री झालं*
*आपल्या जगण्यात वर्षांची भर पडली , पण आपल्या वर्षांमध्ये जगण्याची नाही आपण भले चंद्रावर गेलो -आलो*
*पण शेजारच्या नव्या माणसाला भेटणं काही होत नाही*
*बाहेरचा परिसर आपण जिंकत चाललो , पण आतल्या हरण्याचं काय ?*

*हवा शुद्ध करण्यासाठी आटापिटा, पण आत्म्याच्या गुदमरण्याचं काय ?*
*आपली आवक वाढली , पण नियत कमी झाली .*
*संख्या वाढली , गुणवत्ता घसरली*
*हा काळ उंच माणसांचा पण खुज्या व्यक्तिमत्त्वांचा*
*उदंड फायद्याचा पण उथळ नात्यांचा जागतिक शांतीच्या गप्पांचा पण घरातल्या युद्धांचा*
*मोकळा वेळ हाताशी पण त्यातली गंमत गेलेली*
*विविध खाद्यपदार्थ पण त्यात सत्व काही नाही*
*दोन मिळवती माणसं , पण त्यांचे घटस्फोट वाढलेले*
*घर नटली पण घरकुल दुभंगली दिखाव्याचा खिडकीत खूप काही मांडलेले*
*पण कोठीची खोली रिकामीच*
*हे पत्र पोचवणारं तंत्रज्ञान आहे*
*आणि आज आहे तुमचं स्वातंत्र्य ही*
*या पत्राकडे लक्ष देण्याचं किंवा न देण्याचं*
*यातलं काही वाटलं तर बदला .... किंवा .... विसरून जा .*

( दलाई लामा )

२१ व्या शतकातल्या बदललेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भांचा वेध घेणारी दलाई लामा यांची ही अतिशय महत्त्वपूर्ण कविता आहे . समाजामध्ये निर्माण झालेला प्रचंड विरोधाभास या कवितेतून व्यक्त होतो . वास्तवाचे यथार्थ दर्शन घडते . मानवता आणि नैतिकता तसेच बदलणाऱ्या मूल्यांबाबत परखड भाष्य पाहायला मिळते .

आज मोठमोठ्या महानगरांमधून गगनचुंबी आणि टोलेजंग इमारती पाहायला मिळतात . इमारतींची उंची इतकी की , या इमारती आकाशाशी स्पर्धा करत आहेत की काय असे भासावे . हजारोंनी माणसे या इमारतींमध्ये वास्तव्य करतात परंतु कुणाचा कुणाला पायपोस नसतो . माणूस मेला किंवा त्याने आत्महत्या केली तर चार -आठ दिवसांनी आपल्याला दुर्गंधीवरून कळते . मग पोलिसांना बोलावून पुढचे सोपस्कार पार पडले जातात . कोणी कोणाच्या दरवाजात नाही . आपणहून कोण बोलत नाही . स्वतःहून बोलले की कमीपणा येतो की काय ? अशी भीती वाटते . दुःखं - आनंद या गोष्टी एकमेकांमध्ये विभागल्या जात नाहीत .यामुळे ताण वाढत जातो व नको त्या गोष्टी आपल्या हातून घडतात . याच्यातून एक विचित्र अशा प्रकारची खुजी पिढी वाढते आहे . हे सर्व जर थांबायचे असेल तर इमारतींची उंची कमी झाली तरी चालेल पण माणसांच्या मनाची उंची आणि माणुसकीची उंची वाढली पाहिजे .

आधुनिक काळात बंगले आणि फ्लॅट संस्कृती मोठ्या प्रमाणात वाढली . विविध प्रकारच्या सुख - सोयींनी माणसांचे जीवनमान उंचावले . बंगले - फ्लॅट आकाराने मोठे झाले परंतु कुटुंब छोटी झाली . मुलांना आजी - आजोबा , काका -काकी , इतर नातेसंबंध याविषयी काही देणे घेणे राहिले नाही . यामुळे नातेसंबंधातील ताण वाढत आहेत . यामुळे सामाजिक सलोखा व एकसंघपणाला घराघरातूनच तडा जात आहे . आधुनिक काळात कुटुंबाचे सगळे संदर्भ बदलत चालले आहेत . आपलं आपलं राहणीमान उंचावलं पण जगणं मात्र दळभद्री झालं आहे . आपल्या जगण्यात वर्षांची भर पडत चालली . पण या वर्षांमध्ये समृद्ध जगण्याची मात्र भर कुठेच दिसत नाही . पाश्चात्यांची हॅपी बर्थडे संस्कृती आपण स्वीकारली . यामुळे आपण वर्षे मोजत जातो पण त्या वर्षांमध्ये आपण काय मिळवलं हे मात्र सोयीस्करपणे दुर्लक्षित करतो . सरलेल्या आयुष्यावरती सिंहावलोकन न करता आनंद , डामडौल , जाहीर प्रदर्शन करण्यामध्ये माणसं मश्गुल होताना दिसतात . आपण भले चंद्रावर पोहोचलो असलो तरी शेजारच्या माणसाला महिनोनमहिने काय वर्ष - वर्ष सुद्धा भेटत नाही . हे आपले दुर्दैव म्हणावे की आणखी काय . बाहेरचे जग आपण पदाक्रांत करत चाललो पण आतल्या गुदमरण्याचं काय करावं हा प्रश्न सुटत नाही . ही घुसमट आणि व्यथा मोकळे करण्यासाठी आपल्या आजूबाजूला जिवाभावाची माणसंच राहिली नाहीत . माणुसकी आटत चालली की काय ? असा प्रश्न पडतो . फास्टफूड खाऊन माणसं उंच झाली . शरीरानं मोठी दिसू लागली . ( केवळ फुगली , सुजली ) पण आतून पोकळ बनली . उंचीप्रमाणे माणसांची व्यक्तिमत्वं उंच झाली नाहीत तर ती खुजी बनत आहेत . फायद्यासाठी नाती एकत्र येतात एरवी त्यांच्यात उथळपणाच जास्त .

जी गोष्ट नात्यांची तीच अवस्था शिक्षणाची झाली आहे . पदव्या स्वस्त होत आहेत आणि शहाणपण महाग बनत चालले आहे . पदव्यांमुळे शहाणपण येईल याची सुतराम शक्यता नाही . तंत्रज्ञानाच्या युगामध्ये माहितीचे डोंगर मोठ्या प्रमाणामध्ये जमा केले जात आहेत पण नेमके ज्ञान कशाला म्हणायचे हे कळेनासे झाले आहे . खऱ्या गुरुंऐवजी गुगल गुरुवर अवलंबित्व वाढत चालले आहे . त्यामुळे खऱ्या ज्ञानापासून आपण वंचित होत चाललो आहोत .

हा काळ स्पेशलायझेशनचा आहे . स्पेशलायझेशनच्या युगात तज्ञांची रेलचेल मोठ्या प्रमाणावर दिसून येते . समस्या सुद्धा तितक्याच प्रमाणात वाढल्या आहेत . वैद्यकीय क्षेत्राचा विचार केला तर पूर्वी जनरल प्रॅक्टिशियन सर्व रोगांचे निदान करीत असे पण आत्ता निदान करणे खूपच अवघड झाले आहे . नको त्या महागड्या टेस्ट रुग्णांच्या कपाळी मारल्या जातात . त्याच्यातून हाती काहीच लागत नाही . मात्र रुग्णांचे आर्थिक , मानसिक व शारीरिक शोषण मोठ्या प्रमाणात होत आहे . औषधांचा मोठ्या प्रमाणात मारा करूनही रुग्ण खात्रीशीर बरा होईल याची खात्री डॉक्टरांना सुद्धा देता येत नाही , अशी परिस्थिती निर्माण झाली आहे . औषध मोठ्या प्रमाणात वाढली पण त्या प्रमाणात आरोग्य वाढले नाही . रुग्णसेवा ही सेवा न राहता व्यवसाय बनला आहे . (काही अपवाद वगळता)

आपला देश जागतिक शांतीच्या गप्पा मारताना दिसतो पण अंतर्गत भांडणं मात्र दिवसेंदिवस वाढत आहेत . जात ,पंथ , धर्म ,भाषा अशा विविध कारणांवरून समाजाचे स्वास्थ बिघडताना दिसते . राजकारणी माणसं राजकारणासाठी कोणतीच संधी सोडत नाहीत . मात्र याच्यात सामान्यांचे मुडदे पडतात . त्याचे कुणाला काहीही देणे घेणे नाही . अशा अनेक बदललेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक घटनांचा आढावा या कवितेत दलाई लामा यांनी घेतला आहे .

जागतिकीकरणामुळे पर्यावरणाचा विनाश होतो आहे . ग्लोबल वार्मिंग , सतत पडणारे दुष्काळ , ऋतूमधील अनाकलनीय बदल , पाणीटंचाई , प्रत्येक क्षेत्रातील जीवघेणी स्पर्धा , असुरक्षितता , तंत्रज्ञानामुळे वाढलेले बेकार कारागीर , विषमता, हेवेदावे , दहशतवाद , जातीय दंगली , व्यवसायातील लुटमार , पेशंटला लुबाडणारी वैद्यकीय व्यवस्था , आत्महत्यांचे वाढलेले प्रमाण , बदलत्या व्यक्तीवादी दृष्टिकोन , माणसामाणसातला तुटणारा संवाद , रुजत असलेली नवी संस्कृती , जीन्सच्या पॅन्ट , मेड इन चायनाच्या वस्तूंची बाजारपेठ , मॉल संस्कृती , चंगळवाद असे बदललेल्या महानगराचे चित्रण कवी सुहास जेवळीकर यांच्या ' दहशतीची दैनंदिनी ' या संग्रहात वाचायला मिळते . या काव्यसंग्रहातील रूपरंगांतर , होड्या , झाडांची गोष्ट , डॉक्टर मित्रांशी एक संवाद , टाकेटा , पन्नाशीतल्या स्वातंत्र्यातील एक गोष्ट , भिंत आणि पूल , शाळा , आणीबाणीतला पोपट , घराघरातील प्रश्न , महानगर अशा अनेक कवितातून बदलत्या जीवनाचे , स्थिती गतीचे आणि निसर्ग पर्यावरणासह बदलत्या जीवनमुल्यांचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेत उमटते . आजूबाजूला विकास , परिवर्तन आणि सुधारणांचा बोलबाला दिसतो परंतु वास्तव मात्र भयावह आहे.

*या गावच्या तुटल्यात भिंती , खचलेल्या वेशीचे बुरुज*
*उंबरठ्यावर सांडली राख , हल्ली पायी चढतेय सूज*
*( या गावच्या तुटल्यात भिंती )*

१९९० नंतरच्या जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर बदललेल्या सामाजिक , सांस्कृतिक घटनांचा कवितेच्या माध्यमातून धांडोळा घेणारे अरुण काळे हे एक महत्त्वाचे कवी . ग्लोबलचे गावकूस , रॉकगार्डन , सायरनचे शहर , नंतर आलेले लोक असे चार कवितासंग्रह प्रकाशित आहेत . ' ग्लोबलचे गावकूस ' मधील कविता ही जागतिकीकरण , बाजारु संस्कृती , माहितीच्या स्फोटाचे परिणाम , आगतिकता आणि विदारक वास्तवाचे संवेदनशील भाष्य त्यांची कविता करते . जागतिकीकरणामुळे मुठभर श्रीमंतांचा विकास झाला . अप्रत्यक्षपणे मूलतत्त्ववादाला खतपाणी घातले गेले . संवेदनशून्यता , स्वार्थीपणा आणि बेजबाबदार बुद्धिवंत , पोटार्थीपणाचे प्रश्न , आत्मकेंद्रीवृत्ती या प्रवृत्तींवर त्यांची कविता उपहास आणि उपरोधात्मक भाष्य करते .

*आज मुंबईभर फटाके , उडवले बदमाशानी*
*घरी टीव्ही समोर , तुटलेली माणसं बघितली*
*मुलगी म्हणाली पप्पा !*
*बॉम्बेत बॉम्बस्फोट होतात*
*म्हणून तिला बॉम्बे म्हणतात का ?*

दहशतवाद , बॉम्बस्फोटाच्या बाबतीत निरागस मुलीने विचारलेल्या प्रश्नांवर कुठला बाप उत्तर देऊ शकेल ?

कवी वीरधवल परब यांच्या 'दरसाल दरशेकडा ' या कवीतासंग्रहातील कविता नवोदत्तरी समाजाच्या स्थितीगतीचा वेध घेते . जागतिकीकरणामुळे सामान्य माणसाच्या जीवनातील सुसंगतता जाऊन विसंगत वास्तवाला तोंड द्यावे लागत आहे . सभोवताली होणारी मूल्यांची पडझड , स्वतःची घालमेल , निष्क्रियतेच्या गर्तेत ढकलले जाणे , व्यक्तिवादी होण्याची जाणीव , गुलामीच्या नव्या जाणीवा , कॉम्प्युटरायझेशनचा रेटा, श्रीमंतांचे भांडवली प्रदर्शन , एन्जॉय करीत जगणारा चंगळवाद अशा अनेक प्रश्नांवर त्यांची कविता भाष्य करते .

*आउटडेटेड होत जाते आपली संवेदनशीलता*
*कॉम्प्युटरायझेशनच्या रेख्यात .. ?*
*हे तकलादू हात दरिद्री*

*तेजस्वी भारताचा इतिहास घडवू पाहणारे ....*
*गॅटची सचित्र रंगीत बाराखडी महासत्तांची तुघलकी राजनीती*

संगणक क्रांतीमुळे , सोशलमीडियाच्या वाढत्या वापरामुळे आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या प्रभावामुळे आपली संवेदना अधिक बोथट होत चालली आहे . एकीकडे अविकसित भारतात भांडवलदारांचा वाढता प्रभाव आणि गरिबांची होत असलेली पडझड हा प्रचंड विरोधाभास कवीने मांडला आहे .

कवी महेंद्र भवरे यांच्या ' महासत्तेचे पीडादान ' या कवितासंग्रहातून अनेक बदललले नवे सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ शोधता येतात .जातीय सत्ता नव्या रूपात प्रबळ होत आहेत नजीकचा वर्तमान सामाजिक सांस्कृतिक प्रदूषणाने भरला आहे आर्थिक दुर्बलता प्रसारमाध्यमांचे अतिक्रमण वाकडे जाणारा समाज शेतकऱ्यांच्या आत्महत्या दलितांचे हत्याकांड युद्धांचे वातावरण जात धर्माधिकारी सांस्कृतिक वातावरणातील प्रदूषण आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरणामुळे दलित बहुजनांच्या अस्तित्वाला लागलेले ग्रहण मुक्त अर्थव्यवस्थेमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढणारे मूलतत्त्ववाद आणि दहशतवाद यांचा प्रभाव आणि सध्याचा काळाची गरज व्यक्त करतात .

*संस्कृती नावाची लावण्यवती जोपासत आलीय*
*सहस्त्रकाची मायावी अजागळ*
*ती चालत आलीच भ्रुणहत्येच अवजार घेऊन*
*गर्भातच मारले सहस्त्रावधी आकांत ....*

**समारोप** :

१. समकालीन कवितेवर आधुनिकतावादी प्रभाव असला तरी त्यातून मानवतावाद , नैतिक मूल्ये , यांच्यावर एक प्रकारे विपरीत प्रभाव पडलेला दिसून येतो .

2.जागतिकीकरणाचा प्रभाव असल्यामुळे मुक्त अर्थव्यवस्थेची भांडवलदारी समर्थक , भौगोलिक कक्षा पुसून टाकणारी , कला संस्कृतीवर प्रभाव टाकणारी , अस्तित्वालाच सुरुंग लावणारी आणि नवी मूल्यव्यवस्था निर्माण करणारी , प्रसारमाध्यमांच्या अंकित ठेवणारी एक नवी व्यवस्था विकसित होताना दिसते .

3. आधुनिकता आणि परंपरावादाच्या संभ्रमातील जनजीवन , अस्तित्वाचे प्रश्न , बाजारूप्रवृत्ती , व्यक्तीनिष्ठता , ग्राहककेंद्री चंगळवाद , अर्थव्यवस्था , प्रसारमाध्यमांचा धुडगूस , धार्मिक , सांस्कृतिक , सामाजिक प्रश्नांची मांडणी , नव्या धोरणांबाबतची विपरीत अवस्था , मॉलसंस्कृती , कॉम्प्युटरयुग , अणुयुगआणि पर्यावरणाचा ऱ्हास इत्यादी प्रश्नांबाबत ही कविता सजग करते .

# 21 वे शतकातील स्त्रियांच्या समस्या (रोहिणी कुलकर्णी यांच्या कादंबऱ्यांच्या आधारे)

**प्रा.डॉ.बाबासाहेब नाईक**
मराठी विभाग
सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

## प्रस्तावना

समाज जीवनात घडणाऱ्या घटनांचे पडसाद साहित्यात उमटणे स्वाभाविक आहे. खरे पाहता मराठी साहित्याला नवतेचे भांन देण्याचे काम कविवर्य बा.सी.मर्ढेकरापासून सुरू झालेले आहे. त्यामधून साहित्याची रूप पालटून गेले.आपल्याकडे नवसाहित्य हेच आधुनिक साहित्य ठरले. अनेक मराठी लेखकांनी या आधुनिकतेचा स्वीकार केलेला आहे. आपल्या देशात १९६० नंतर खऱ्या अर्थाने आधुनिक तिचे वारे जोमाने वाहू लागले. परिणामतः स्त्रियांच्यामध्येही,नवचैतन्य,आत्मविश्वास आणि आत्मभान निर्माण झाले. याचे पडसाद समाजात उमटू लागले.१९६० नंतरच्या काळात स्त्रिया संबंधीची काही कायदे शासनाला करावे लागले. कारण स्त्रियांवरील अन्याय आणि अत्याचार यांच्या विरोधात लढण्यासाठी स्त्रिया सिद्ध झाल्या, स्त्रीमुक्ती चळवळ निर्माण झाली. या चळवळीमधून स्त्रियांची स्त्रिया संघर्ष करू लागल्या व आपल्या समस्या मांडू लागल्या.

## भारतीय स्त्री जीवनाचा प्रवास-

भारतीय स्त्री,आई,पत्नी,गृहिणी या भूमिकेत पूर्णपणे अडकलेली होती. कुटुंब हेच तिचे सर्वस्व कार्यक्षेत्र होते. सामाजिक प्रवाहापासून पुरुषप्रधान संस्कृतीने तिला जाणीवपूर्वक दूर ठेवले,परंतु शिक्षणामुळे तिला स्वतःच्या सत्वाची जाणीव झाली होती. आपले हक्क मिळवण्यासाठी धडपडू लागली १८४८ साली महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रियांसाठी पुण्यात पहिली शाळा काढली. त्या शाळेला सावित्रीबाईंनी खूप मदत केली.म्हणून सावित्रीबाईना स्त्री शिक्षणाची पहिली शिक्षिका म्हणतात. महात्मा फुलें यांनी विद्येचें महत्त्व सांगताना म्हणाले, की

"विद्यमिना मती गेली
मतीविना नीती गेली
नितीविना गती गेली
गती विना वित्तगेले.
वित्तविना शूद्र खचले,
इतके अनर्थ एका अविद्याने केले"

यामुळे स्त्री विचार करू लागली तिला तिच्या अस्तित्वाची जाणीव निर्माण झाली.१९२४ झाली महात्मा गांधींच्या योगदानाने स्त्रिया मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या. यामुळे अखिल भारतीय महिला परिषदेची स्थापना झाली भारतामध्ये भगवान बुद्ध,महानुभाव संप्रदाय,वारकरी संप्रदाय यांच्या काळापासून स्त्रिया आधुनिकतिची बीजे रोवली गेली. इ.स.१८२९ मध्ये राजा राम मोहन राय यांच्या प्रयत्नाने सतीबंदीचा कायदा झाला. खऱ्या अर्थाने भारतामध्ये १९७५ नंतर आधुनिकतेची सुरुवात झाली १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. इंग्रजांचे भारतात आगमन,मुद्रण कलेचा झालेला जन्म, यामुळे अनेक जण लेखन करू लागले. यामध्ये स्त्रीजीवनाचे अनेक पदर उलघडण्याचे काम सुरू झाले. मराठीतील पहिली कादंबरी बाबा पदमजी यांची 'यमुना पर्यटन' या मध्ये स्त्रीच्या वास्तवाचे दर्शन घडवणारी कादंबरी ठरली.

भारतामध्ये आधुनिकता खऱ्या अर्थाने १९६० नंतर अवतरली वैचारिक पातळीवर छाया दातार ,विद्या बाळ, शांता किर्लोस्कर, यांनी स्त्रियांच्या गुलामगिरी चा शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये नीलम गोरे, शारदा साठे ,माया वानखेडे, शैला लोहिया, चंद्रकला भार्गव, मंगला खिवसारा, शीला शिपुरकर, रजिया पाटील, मंगला गोडबोले, अंबिका सरकार, विजया राजाध्यक्ष, कमल देसाई ,रोहिणी कुलकर्णी, अशा बगे, सानिया गौरी देशपांडे तारा भवाळकर प्रभा गनोकर, यासारख्या अनेक स्त्रियांनी स्त्रियांची दु:ख व समस्या मांडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला.

प्रबंध लेखनाचा हेतू

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये रोहिणी कुलकर्णी यांच्या कादंबऱ्यांच्या आधारे स्त्रियांच्या समस्या मांडणे हा उद्देश आहे. रोहिणी कुलकर्णी यांच्या नावावर एकूण भेट,फलश्रुती, स्वातीचा उ;षाप, आणि तिन्हीसांज ,या लघु कादंबऱ्या त्यांच्या नावावर आहेत. यामधील रचना आणि भाषा यामुळे त्यांच्या कादंबऱ्या जगापेक्षा वेगळ्या ठरलेल्या आहेत.

रोहिणी कुलकर्णी

१९६० नंतर स्त्रियांची दु:खे वास्तव रूपाने मांडणाऱ्यामध्ये रोहिणी कुलकर्णी यांचे नाव खूप अग्रक्रमाने घेतली जाते .त्यांनी आपल्या साहित्यामधून कथा कादंबरी आधुनिक स्त्रीचे समस्यांचा परामर्श घेतलेला आहे. कुटुंब पद्धती ,स्त्री जीवन यामधून निर्माण होणाऱ्या समस्या त्यांनी मांडलेले आहेत. एक वेगळा विचार मांडणाऱ्यासमस्या मांडलेल्या आहेत. एक वेगळा विचार घेऊन ही लेखिका आपल्यासमोर येताना दिसते. त्यांच्या एकूण साहित्याचा विचार करता कादंबरी मधील स्त्रियांच्या समस्यांचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात अभिप्रेत आहे. त्यांच्या नावावर भेट १९८८फलश्रुती१९८८ स्वातीचा उ;षाप२००२ तिन्हीसांज२००२ या कादंबरीतील स्त्रीच्या समस्यांचा विचार येथे करावयाचा आहे.

**भेट मधील स्त्री समस्या**

आईचे मुलाशी असलेले नाते. ही या कादंबरीमधून येते. सुधाही या कादंबरीची नायिका असून तिला आनंद नावाचा मुलगा आहे आपला पती भाऊसाहेब यांच्याशी पटत नसल्यामुळे त्यांनी दुसरा संसार थाटलेला आहे. आनंदा जेव्हा कर्णिकांच्या लग्नात भेटला ,तेव्हा मात्र सुद्धा अस्वस्थ होते .तिचे मातृत्व तिला स्वस्थ बसू देत नाही. दिरांकर आनंदाला भेटतेवी. व तिचे आई पण तिला स्वस्त बसू देत नाही. आपल्या पोटाच्या गोळ्याला गोळ्याशी जुळलेली नाळ तुटणी शक्यच नाही. भाऊसाहेब आपल्या विचार स्वातंत्र्यावर गदा आणतात. ही स्त्री बंडखोर आहे सुद्धा व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला न घालता स्त्री-पुरुष समानता मानणारी स्त्री आहे.

**फलश्रुती मधील स्त्रीची समस्या**

१९८८'अमन्ना' ही या कादंबरीची नायिका आहे. आपल्या कुटुंब व्यवस्तीत चालावे म्हणून ती धडपडते. आपल्या कुटुंबाची जबाबदारी व्यवस्थित पार पाडते .परंपरा आणि नवता यांचा सुंदर मिलाप या त्यांच्या संसारात आहे. कुटुंब हे सुशिक्षित व सुसंस्कारित आहे. आपल्या मुलांनी काहीतरी काम धंदा करावा म्हणून त्या दोघांची धडपड असते. कुटुंब व्यवस्थित चालावे यासाठी ती ज्योतिषाकडे पत्रिका दाखवते. आपल्या मुलांनी मुलांच्यासाठी व्रतवैकल्ये, उपास -तपास करते. पण बापाला हे मान्य नाही स्वतःच्या मनाची फसवणूक वाटते. वडील म्हणतात,'माणसाचा स्वभाव हेच त्याचे नशीब ' असते. माणसाचे कर्तव्य हे देवधर्मापेक्षा श्रेष्ठ आहे. जीवन समृद्ध करायचे असेल, तर भौतिक जीवन समृद्ध असणे गरजेचे आहे. ते पुरुषाला कर्तुत्व महत्त्वाचे वाटते, तर स्त्रीला कर्तुत्वाबरोबरबरोबर परमेश्वराचे अधिष्ठान महत्त्वाचे वाटते. पुरुष झटपट परिवर्तन स्वीकारतो, स्त्री जुन्या नव्याचा मेळ साधून जगण्याचा प्रयत्न करते.

**स्वातीचा उश्याप मधील समस्या**

२००२ यदुनाथ हा या कादंबरीचा नायक आहे त्यांच्या जीवनातील चढ उतार हा कादंबरीचा महत्त्वाचा भाग आहे यदुनाथ हा कॉलेजमध्ये व्याख्याता आहे. तो उच्चशिक्षित व सुसंस्कारित आहे. त्याचे मन्ना नावाच्या श्रीमंत मुलीवर प्रेम आहे. परंतु यदुनाथ ची सांपत्तीस्थिती चांगली नाही .शिवाय दोघांच्या प्रेमात जात आडवी येते. त्यावेळी मन्ना म्हणते माझे डॅडी साध्या घरात राहिलेले पण माझी मम्मी श्रीमंतांच्या घरात वाढलेली.सांपत्तीस्थिती विषमता जात या दोघांच्या मध्ये कधीही आड आलेली नाही. त्या दिवसांमध्येही तर ती तुझ्या माझ्या मध्ये का आडवी यावी. माझ्या मम्मी डॅडीचा प्रेमविवाह आहे. हे मी तुला यापूर्वीही सांगितलेले आहे. जात आणि आर्थिक विषमता न मांडणारे आधुनिक विचार या कादंबरी मधून येतात.

**तिन्ही सांज मधील स्त्री समस्या**

२००२ पूर्वीच्या स्त्रीचे क्षेत्र हे केवळ चूल आणि मूळ इतकेच होते तिच्यावर समाजाचे अनेक बंधने होती. त्या काळातही माँ मॅट्रिक होतात शिक्षण खात्यात शिक्षिकेची नोकरी करतात परंतु अचानक त्यांची पतीचे निधन होते. सासू-सासरे आधाराला नसतात मुलांना अशा परिस्थितीतही ती लहानाचे मोठे करते. त्यांच्यावर योग्य संस्कार करते. अशा परिस्थितीत ते कोणाकडे कोणाचाही आधार मागत नाही. आगतिकता दाखवत नाही. एक कर्तवनिष्ठ जिद्दी आई समाजाच्या अनेक प्रश्नांना समस्यांना धीराणे तोंड देते. लढते, झुंजते तिच्या जगण्यासाठी चाललेली धडपड या समस्या या कादंबरीत दाखवतात.

**शोधनिबंधाचा निष्कर्ष**

स्त्री हा कुटुंबाचा आधार आहे. ती कितीही शिकली तरी मातृत्व हा तिचा स्थायीभाव आहे समाजात होणारे बदल लेखिका टिपते. जे प्रश्न बुद्धीने सुटत नाही तेच प्रश्न भावनेने सोडवण्याचा प्रयत्न करते. अर्थाजनाला पर्याय नाही, अर्थाजन केल्याशिवाय स्त्री स्वावलंबी होणार नाही. तिला प्रतिष्ठा प्राप्त होणार नाही. म्हणून चूल आणि मुलाबरोबरतिला बाहेरच्या जगाचे

ज्ञान प्राप्त होणे महत्त्वाचे आहे. दोन पिढीतील अंतर्गत संघर्ष चित्रित करते. उतारा वयात माणसाला होणारी हेळसांड आणि त्यातून आलेली एकाकी पण सुद्धा महत्त्वाचे समस्या मांडते.

**समारोप**

अशा प्रकारे रोहिणी कुलकर्णी यांच्या कादंबरीवरून स्त्री समस्येचा वेध घेताना आई,या कादंबरीमधून आई आणि आपत्य यांचे नातेसंबंध समस्या व्यक्त करते. तर फलस्वती मधून परंपरा व नव्हता यांचा सुंदर निराभ शब्दबद्ध करतात. स्वातीचा उ:शाप मधून गरीब आणि श्रीमंत यांच्यातील विषमतेची दरी दाखवतात. तर तिन्ही सांजा या कादंबरी मधून पुरुषाची समानतेची पीजे पेटवतात.

थोडक्यात आधुनिकतेच्या अंगानं स्त्री समस्या कुटुंबाच्या वेद घेताना लेखिका आपल्या साहित्यामधून दिसतात.

**संदर्भ**

१ आधुनिक कादंबरी आणि मराठी लेखिका –डॉ.शशिकांत साळवे,स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद
२. गुलामगिरी – महात्मा ज्योतीराव फुले
३. भेट - डॉ.रोहिणी कुलकर्णी
४. फलश्रुती - डॉ.रोहिणी कुलकर्णी
५. स्वातीचा उ:शाप - डॉ.रोहिणी कुलकर्णी
६. तिन्हीसांज - डॉ.रोहिणी कुलकर्णी

# २१ व्या शतकातील स्त्रीलिखित मराठी कथेतील काही सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**डॉ. कु. कोकिळा हनुमंत चांगण**
शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद,
ता. खंडाळा, जि. सातारा.

भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान असून स्त्रीला आजपर्यंत दुय्यम स्थान दिले गेले आहे हे सर्वज्ञात आहे. देवीपूजा करणारा हा समाज रूढी परंपरांच्या नावाखाली स्त्रीवर अनेक बंधने लादत आला आहे. संस्कार आणि संस्कृती म्हणून स्त्रीला मुक्तपणे विकसित होऊ दिले गेले नाही हे आतापर्यंतच्या इतिहासातून समजते. १९ व्या शतकापर्यंत स्त्रीलाही ही बंधने योग्यच वाटत होती ; कधी संस्कृती म्हणून तर कधी स्वतःची सुरक्षितता म्हणून. ब्रिटीश काळात इंग्रजांनी 'सर्व घटकांना समान शिक्षणाचा' जो निर्णय घेतला त्यामुळे व भारतीय समाजसुधारकांनी समाजसुधारणेचे जे काम केले त्यातून सर्वच स्तरांमध्ये खूप मोठे परिवर्तन घडून आले. म. ज्योतिबा फुले , सावित्रीबाई फुले , महर्षी कर्वे यांनी स्त्रीशिक्षण व स्त्रीच्या प्रगतीसाठी खूप मोठे कार्य केले. पाश्चात्य संस्कृतीतील व्यक्तीस्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व या तत्वत्रयींनी प्रभावित होऊन अनेक समाजसुधारकानी स्त्रीकडे बघण्याचा समाजाचा आजपर्यंतचा संकुचित दृष्टीकोन बदलून तो उदार व व्यापक करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष बालविवाह, विधवाविवाह, जरठकुमारी विवाह, पुनर्विवाह या गोष्टींवर रूढी परंपरांच्या विरुद्ध जाऊन काम केले. ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' सारखा ग्रंथ अत्यंत स्पष्ट व परखड भाषाशैलीत लिहण्याचे धाडस केले. आतापर्यंत माजघराच्या उंबरठ्यात असणारी स्त्री २०व्या शतकात पतीच्या नोकरीच्या निमित्ताने का होईना देशात व परदेशातही प्रवास करू लागली. तिला बाहेरचे जग कळू लागले. ती प्रवासवर्णने , आत्मचरित्रे लिहून व्यक्त होऊ लागली.

पाश्च्यात्य साहित्यातील कथा, कादंबरी, कविता, नाटक या प्रकारात आपल्याकडील पुरुषमंडळी लिखाण करत होती. 'शांतबाई' या नावाने मराठीतील पहिली स्त्री लिखित कथा १८९६ला लिहिली गेली, ती मासिक मनोरंजन मधून प्रसिद्ध झाली. १९१५ मध्ये लक्ष्मीबाई अभ्यंकर यांचा 'सद्यस्थिती' हा मराठीतील पहिला स्त्री लिखित कथासंग्रह प्रसिद्ध झाला. १९१० ते १९२६ या मनोरंजन कालखंडात काशीबाई कानिटकर, गिरीजाबाई केळकर, आनंदीबाई शिर्के, वामनसुता, सुवासिनी, ताराबाई तर्खड, हिराबाई पेडणेकर, कमलाबाई किबे या लेखिका कथा लिहित होत्या. खरंतर हा कालखंड स्त्रीजातीसाठी परीक्षेचा कालखंड होता. कारण आत्तापर्यंतचे धर्म संस्कृतीचे संस्कार तिच्या मनावर सखोल रुजलेले होते. पहिला संघर्ष हा तिचा तिच्या मनाबरोबर होता आणि दुसरा पुरुषसत्ताक समाजाबरोबर. त्यामुळे या कालखंडातील लेखिकांनी स्त्रीशिक्षण, विधवाविवाह, जरठकुमारीविवाह, बालविवाह, स्त्रीस्वातंत्र्य याविषयीचे लेखन आपल्या कथांतून केले असले तरीही ते वस्तुनिष्ठ व बोधवादी झाले आहे. या कथालेखिकांनी स्त्री जीवनातील समस्यांवर, सुधारणेवर कथालेखन करून पुढील पिढीतील कथा लेखिकांसाठी एक वाट करून दिली असे वाटते. १९३०-४० च्या दशकामध्ये कमलाबाई टिळक, विभावरी शिरूरकर, कुसुमावती देशपांडे यांच्या कथांतून नव्या जाणिवा प्रकट होताना दिसतात. मुक्त होऊ पाहणाऱ्या स्त्री जीवनाला रुढीपरंपरामुळे अनेक सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते हे या लेखिकांच्या कथांतून लक्षात येते. प्रौढकुमारी, कमावत्या मुलीच्या पैशांवर कुटुंब चालत असल्याने तिच्या विवाह आड येणारा बाप व त्यामुळे तिच्या मनाची होणारी कुचंबना, शिकलेल्या नव्या जाणीवांनी जागृत झालेल्या स्त्री मनाची वेदना, तसेच तिच्या सुप्त इच्छा आकांक्षा या कथांतून लक्ष वेधून घेतात. कुसुमावती देशपांडे, विभावरी शिरूरकर यांच्या कथांतून उपेक्षित स्त्रीजीवनाचे चित्रण आले आहे, जे यापूर्वी आले नव्हते. 'कुसुमावतीबाईनी आपल्या लेखनातून समाजातील विषमता, स्वार्थीपणा, क्रियाशून्यता यांकडे वाचकांचे लक्ष्य वेधले. समाजाच्या वेगवेगळ्या स्तरांतील उपेक्षित स्त्रियांचे अनुभव मांडून त्यांनी मध्यमवर्गीय मराठी कथेचे विषयक्षेत्र थोडे व्यापक केले.'१ विभावरी शिरूरकर यांची 'बाबांचा संसार माझा कसा होईल', कमलाबाई टिळक यांची 'प्रेमाचा वाटा', कुसुमावती देशपांडे यांची 'कलाधोबिन' अशा कथांतून स्त्रीचा याबाबत विचार व कणखरता लक्षात येते. या कथानायिका त्यांची स्त्री वेदना सांगतात, परंतु त्या वेदनेच्या पाठीमागे ज्या सामाजिक रूढी परंपरा आहेत, संस्कार संस्कृतीच्या नावाखाली ती दडपली जात आहे याची जाणीव होऊनही ती याबद्दल त्यांच्याविरुद्ध तिचा आवाज उठवत नाही. या नायिका या सामाजिक रूढी परंपरा विरुद्ध बंड करत नाहीत. १९४० नंतर वसुंधरा पटवर्धन, इंदिरा संत, स्नेहलता दसनूरकर, सरोजिनी बाबर, सुमती क्षेत्रमाडे, योगिनी जोगळेकर, कमला फडके, सरिता पत्की, वसुधा पाटील, शकुंतला गोगटे, शिरीष पै, विजया राजाध्यक्ष यांनी स्त्री जीवनातील विविध अनुभव, विविध समस्या, व्यथा वेदना मांडण्याचा प्रयत्न केला परंतु त्यामध्ये फारसे नाविन्य आढळत नाही. १९६० नंतर साहित्याच्या क्षेत्रात काही चळवळी उभा राहिल्या. या कालखंडात राजकीय सामाजिक क्षेत्रातही खूप बदल झाले. पुरुष लिखित स्त्रीविषयक जे साहित्य आहे त्यामध्ये १९६०च्या अगोदर पासूनच बंडखोर नायिका आल्या होत्या. परंतु स्त्रियांनी मात्र आपल्या साहित्यातून आक्रमक बंडखोर नायिका किंवा तसे विचारही व्यक्त केले

नाहीत असे दिसते. १९६० नंतर स्त्रिया शिक्षणाने जागृत झाल्या त्या स्वतंत्र विचार करू लागल्या आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बोलू लागल्या. 'स्त्रीचा जीवनाकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन, स्त्री-पुरुष संबंधाचे धिटाईने वर्णन, स्त्रीवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध प्रतिकार करणे, परंपरेने लादलेली मूल्य नाकारणे हे सगळं कथेतून धीटपणे मांडले जाऊ लागलं.'२ ज्योत्स्ना देवधर, कमल देसाई, गौरी देशपांडे, आशा बगे, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, सानिया, प्रतिमा इंगोले, शैलजा काळे, विजया राज्याध्यक्ष या लेखिकांनी जे कथालेखन केले ते वैविध्यपूर्ण आहे. ज्योत्स्ना देवधर, आशा बगे, विजया राज्याध्यक्ष यांच्या कथानायिका संयमी, आशावादी, सकारात्मक आहेत. तर कमल देसाई, मेघना पेठे, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर यांच्या कथानायिका स्वतंत्र विचाराच्या बंडखोर बंधने झुगारून देणाऱ्या आहेत. गौरी देशपांडे यांच्या 'आमंत्रण' कथेतील सरिता, प्रिया तेंडुलकर यांच्या 'भाजीपाला' कथेतील राधा तसेच विजया वाड यांच्या 'अवेळ' कथेतील दुर्गाताई या नायिका लक्षात येतात.

१९६०च्या आसपास सानिया, अंबिका सरकार, उर्मिला शिरूर, वसुधा माने, मंदाकिनी गोगटे, पद्मजा फाटक या लेखिका प्रामुख्याने कथालेखन करताना दिसतात. या लेखिकांनी आपल्या कथातून मध्यमवर्गीय सुशिक्षित स्त्रियांच्या दुःखाचे सूक्ष्म पदर उलगडलेले आहेत. १९७५ नंतर पाश्चात्त्य स्त्रीवादाचे वारे वाहू लागले. इनो ने १९७५ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून जाहीर केले. १९७५ नंतरच्या कालखंडातील स्त्री लेखिकांनी जे कथालेखन केले आहे ते कोणतेही दडपण न घेता अगदी मुक्तपणे केले आहे. स्त्री शिकली कमवू लागली त्यामुळे धिटपणे ती आपले विचार मांडू लागली व निर्णयही घेऊ लागली. समाजातले हेच चित्र या लेखिकांनी आपल्या कथांमधून मांडले. आपल्या इच्छेनुसार जगणारी, स्वतःला सिद्ध करू पाहणारी, आत्मनिर्भर, कणखर तसेच स्वच्छंदी, नीती मूल्यांनाही झुगारणारी अशी स्त्रीची विविध रूपे १९७५ नंतरच्या कथेतील नायिकांमधून दिसतात. 'परंपरा नाकारणे, सामाजिक रुढींना विरोध करणे, लग्न संस्थेला पर्याय शोधणे, कुटुंब संस्थेतील नातेसंबंधातील पोकळपणा उघड करणे, स्त्रीवर लादलेल्या पारंपारिक भूमिकांना नकार देणे, पती-पत्नी किंवा प्रियकर प्रेयसी या नात्यांमध्ये स्त्रीकडून अपेक्षित असलेल्या दुय्यम भूमिकेचा विरोध करणे, त्याविषयीची खंत व्यक्त करणे अशी या संघर्षाची वेगवेगळी रूपे १९७५ नंतरच्या स्त्री साहित्यात दिसतात.'३ असे अरुणा दुभाषी म्हणतात.

डॉ. सुमती क्षेत्रमाडे यांच्या 'आषाढ मेघ' या कथेतील मृणालचे आई-वडील बालपणीच गेले असताना भावासह शाळा घर सांभाळत ती वाढते. भावजयीशी पटेना म्हणून दुःख न करता शिक्षिकेची नोकरी करत स्वतंत्र जगते. स्नेहलता दसनूरकरांच्या 'बंदिनी' कथेतील ललिता ही शंतनू जवळ विवाहाशिवाय 'लिविंग रिलेशनशिप' मध्ये राहते. शंतनुने दुसऱ्या मुलीशी विवाह करून त्यांना झालेल्या अमोलचा सांभाळ शंतनूच्या निधनानंतर ललिता करते. मृणाल आणि ललिता व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या आहेत, पण त्या संस्कारही जपताना दिसतात. शिकून सक्षम झालेली आत्मभान आलेली स्त्री ही सुधारलेल्या समाज जीवनाची प्रतीक आहे. परंतु ही स्त्री शिकली धिट झाली आणि फक्त स्वतःच्याच सुखाचा विचार करू लागली तर त्याचा विपरीत परिणाम त्या कुटुंबावर कसा होतो याचा प्रत्यय स्नेहलता दसनूरकर यांच्या 'हिमनग' या कथेवरून येतो. यातील नंदिनी आईला म्हणते, 'नवऱ्या मुलाचे गाव घर कस आहे हे केवळ मध्यस्थ्यांच्या सांगण्यावरून खरं मानायचं का आपण प्रत्यक्ष पाहून येऊ'. नंदिनी अनेक स्थळांना नकार देत शेवटी देवेंद्र शी लग्न करून शहरात राहते. मात्र लग्नानंतर सासू-सासऱ्यांचा अपमान करते, घरकाम टाळते, पतीकडे दुर्लक्ष करून किटी पार्टीला जाते. शिक्षणाने स्त्रीची विचारशक्ती वाढते त्यातून होणारा सकारात्मक बदल अपेक्षित आहे परंतु तो नकारात्मक झालेला ही येथे दिसतो.

प्रिया तेंडुलकर यांच्या 'वारे' या कथेतील रेणुका ही महत्त्वाकांक्षी आहे. स्वतःचे कर्तुत्व सिद्ध करण्यासाठी खेडे सोडून प्रभाकर च्या मदतीने ती शहरात जाते. परंतु हाच प्रभाकर तिचा गैरफायदा घेतो. स्नेहलता दसनूरकर यांच्या 'कुंपण' कथेतील शहरातील शालिनी खेड्यातील अंगणवाडीत जाऊन तेथील एका आमदाराची बळी कशी जाते ते सांगितले आहे. सामाजिक सुधारणा झाल्या तरी स्त्री समस्या संपल्या नाहीत हे या कथेतून लक्षात येते. मनमारत अन्याय सहन करत जगणारी स्त्री बदलली हे शैला राजे यांच्या 'रूढी' या कथेतील अनुवरून लक्षात येते. तर सुधा नरवने यांच्या 'बेस्ट ऑफ लक' या कथेतील प्रज्ञा करिअरसाठी ठरलेलं लग्न मोडून अमेरिकेत राहते.

आजपर्यंतच्या स्त्रीलिखित कथेतून स्त्रीजीवनाचे विविध पैलू बघायला मिळाले. मर्यादा सांभाळत हळूवारपणे आपले अनुभव, भावना व नंतर व्यथावेदना मांडणारी कथा लेखिकांनी लिहिली. स्त्रीच्या या संयमित मनाची घडण ही याच समाजजीवनात झालेली आहे. १९६० पर्यंतची कथा हि संस्कार सांभाळून स्त्रीला व्यक्त करताना दिसते. नंतर मात्र ती सर्व बंधने झुगारून व्यक्त होते. यानंतर जाणवते कि स्त्री मुक्तपने जगतानाही पुरुषसत्ताक समाजात ती निर्भयपणे जगू शकत नाही. स्त्री पुरुष यामधील हे द्वन्द्व या कथांतून या लेखिकांनी निर्भीडपणे व्यक्त केले आहे. वेगेवेगळे आशय व विषय घेऊन या लेखिकांनी कथा लिहिल्या आहेत. तरीही स्त्रीचे शोषण करणाऱ्या तिच्या प्रगतीआड येणाऱ्या सर्व सामाजिक घटकांकडे या कथालेखीकांचे लक्ष गेले आहे का? जीवनाची सर्वांगीण रूपे त्यातील अनेक विषय, त्यातील अंतर संबंध सर्व परीमानातून जाणून घेऊन ते व्यक्त करण्याची प्रतिभाशक्ती स्त्री कथाकार सीमित करून टाकतील अशी भीती अंजली सोमण यांनी व्यक्त केली आहे. ४

**संदर्भ :**

१. सोमण अंजली, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, आ.२., २००५,प्रतिमा प्रकाशन , पुणे, पान. नं. ६२
२. पवार राजेश्री, साहित्यपरीघ, आ. १, २०१०, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद. पान. नं. ६१
३. दुभाषी अरुणा, आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिकता, आ. १, २००७, पद्यगंधा प्रकाशन, पुणे पान नं.१३२
४. सोमण अंजली, मराठी कथेची स्थितीगती, आ.१., १९९५,प्रतिमा प्रकाशन , पुणे, पान. नं. १३९

# २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील सामाजिक - सांस्कृतिक संदर्भ

**डॉ.लक्ष्मण शिंदे**
मराठी विभाग, मिरज महाविद्यालय , मिरज

सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ आणि साहित्याचा खूप जवळचा संबंध असतो.कादंबरी हा वाङ्मयप्रकार तर समाजजीवनाचा विस्तृत पट मांडणारा असतो. अर्थात कादंबरी आणि सामाजिक-सांस्कृतिक संदर्भयांच्यात केवळ बिंब–प्रतिबिंबवादी संबंध शोधायचा आहे, असे नाही.परंतु कादंबरीचा सामाजिक-सांस्कृतिक संदर्भाशी असलेला अनेक पातळ्यावरील आंतरिक संबंध दाखवून देता येईल.

हाटप्पा २१ व्या शतकाच्या आगमणाच्या पार्श्वभूमीवर मानला आहे. सांस्कृतिक पर्यावरण एखाद्या क्षणी अचानक बदलते असे येथे म्हणावयाचे नाही. २१ व्या शतकातील सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ काही निवडकमराठी कादंबऱ्यांच्या आधारे दाखवता येतो.

**१.गरीब, बेकार तरुणाचे जीवन दर्शवणारी‘अडगळ’-संभाजी भगत**

प्रस्तुत काळातील शहरी जीवनाचे चित्र आपण स्पष्ट केले आहे. शहरात विषमता पराकोटीला पोहोचली आहे. शहरांचे अस्ताव्यस्त वाढणे, बकालीकरण हे सांस्कृतिक वास्तव बनले आहे. त्याचप्रमाणे आपण सद्य स्थितीतील बेरोजगारीची स्थितीही पहिली आहे. त्यातून येणारी मानसिक निराशा भयावह असते. प्रस्तुत काळात सर्वसामान्य कुटुंबात वाढणाऱ्या तरुणांची होणारी धूसमटही स्पष्ट केली आहे. या सांस्कृतिक पर्यावरणाचे प्रतिबिंब संभाजी भगत यांच्या ‘अडगळ’मध्ये अत्यंत स्पष्टपणे डोकावताना दिसते. त्यांनी ‘अडगळ’ मधून अत्यंत अल्प शब्दात प्रस्तुत काळातील सामान्य तरुणाची मानसिकता प्रभावीपणे मांडली आहे. ‘अडगळ’ २००८ च्या ‘सृजन’ दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली आहे.[1]‘अडगळ’मध्ये बी.ए. होऊन बेरोजगार असलेल्या एका परिस्थितीशरण तरुणाचे आत्मवृत्त आले आहे.त्यातूनच आपल्यापुढे २१ व्या शतकातील झोपडपट्टीतील जीवनाचे सामाजिक सांस्कृतिक पर्यावरण उभे राहते. सारे निवेदन स्वगताच्या पद्धतीचे आहे. काठांनाकाला आवश्यक असाच तो प्रकार वाटतो. बागडेबुवा त्याच बाप हरहुन्नरी माणूस होता. तो पूर्वी गुंड होता. रेल्वेच्या बगण लुटायचा. मग रेल्वेत मजूर म्हणून नोकरीला लागला. पण दारू पिऊन त्याने साहेबाला मारले तेव्हा तेव्हा नोकरी गेली. मग मुंबईत आला परेरा वादी या बग्त धाडस करून अतिक्रमण करून झोपडी बांधली.

जिथे पूर्वी शेती होती. गर्द झाडी होती. शंकराचं मंदिर होतं. विहीर होती. निळसर पाण्याचं तळं होतं हळूहळू प्रदूषण वाढून साऱ्या बाबी संपल्यातिथे चाळीस वर्षात परेरा बाग नावाची ३०० झोपड्यांची झोपडपट्टी झाली आहे. बापानं एवढी मोठी जागा घेतली होती. त्या जागेवर अनेक गरीब, अडचणीत असणाऱ्यांना बापानं झोपडीसाठी जागा दिली. त्यामुळे नायकाला किंमत आहे. बापानं दिलेल्या जागेत अनेकांनी पक्की घरे बांधली आहेत. ही संपूर्ण झोपडपट्टी बापानं कायदेशीर केली. रात्रभर कंपनीत फितर म्हणून काम करायचं. दिवसभर बी.एम.सी.त खेटे मारून सरकारी नळ वस्तीत आणला. लाइटची सोय झाली.

अशा बापाला तंबाखूमुळे कॅन्सर झाला. शेवटची दोन वर्षे अंथरुणाला खिळून होता. आईने त्याची खूप सेवा केली. त्याची आई हिंदू सांस्कृतीच्या प्रभावाखालची आहे. तिला वाटते ‘मागच्या जन्मात काही तरी पाप घडलं असंल तिच्या नवऱ्याच्या हातून.....’[2]तिने तिच्या पारंपरिक संस्कारानुसार मृत्यनंतरही सारे विधी व्यवस्थित पूर्ण केले. पांढऱ्या कपाळानं जगणं तिला नकोसं वाटतं.

नायकाला एकूण तीन बहिणी तिघीही त्याच्यापेक्षा मोठ्या. त्यातील दोघीची लग्ने झाली नाहीत. या कादंबरीच्या कथानकामध्येच प्रस्तुत काळातील सांस्कृतिक पर्यावरण दिसते. वरवर पाहता दिसले नाही तरी झोपडपट्टीचे सर्व संदर्भ कथानकात आहेत.

लग्न होऊन गेलेल्या थोरच्या बहिणीचे नावही नायक घेत नाही. आपले मन हलके करण्यासाठी सारे सांगण्यासारखी ती होती. असे तो म्हणतो. परंतु तिच्यापुढे वडील लवकर वारले. अशी आईची समजूत असते. एका समंजस सोशिक ‘स्त्रीला’ परिस्थिति शरण कसे यावे लागते? हे त्याच्या या बहिणीच्या कथानकातून कळते. पाठच्या बहिणींना सांभाळण्यासाठी तिची सातवीतून शाळा सोडली. ‘ एक चांगली गृहिणी म्हणून जगायचे सगळे गुण तिच्यात होते.’[3] तिचे लग्न झाले. नवऱ्याला दारूचे व्यसन होते. त्याच्या चुलत्याने त्याला गावाकडची जमीन, मुंबईतली जागा काही दिले नाही. लग्नानंतर त्याच्याकडे टॅक्सी होती. टॅक्सी विकली. हळूहळू बिल्डिंगितली खोली विकली. झोपडपट्टीत राहायला गेले. एक मुलगी दोन मुले झाली. बहिणी भांड्यांचे कामे करायची. तिने कधीही माहेरी तक्रार केली नाही . तो मटका खेळू लागला. घरीच बसून दारू पिऊ लागला. ती सकाळ

संध्याकाळी भांडी घासायची. घरात दोन चार खानवळी घालू लागली. संसाराचा गाडा ओढणं तिला अशक्य होऊ लागलं. एकदा मुलं घेऊन माहेरी आली तर तिला आधार न देता माघारी पाठवले. तिने नवऱ्याची दारू सुटावी म्हणून सारे प्रयत्न केले. एकदिवस वैतागून ती खानवळीतील एका तरुणाबरोबर पळून गेली. तिच्या लहान मुलांना पोरं आमची आहेत म्हणून नाकाच्या आईकडून भावोजीचे चुलते घेऊन गेले.

नायक सरळमार्गी आहे. त्याने मराठी विषयात पदवी मिळवली होती. पण आता त्याला मराठीचा अभ्यासक्रमच फालतू होता. असे जाणवू लागले आहे. बी.ए.ची डिग्री, पदवीदान समारंभातील फोटो त्याला जास्तच दु:ख होतात. आपण बहीणींच्या जिवावर बसून खातो याचा बोचणी लागलेली आहे. तो सारी सर्टिफिकेट काढणे, एम्प्लॉयमेंटला नाव नोंद करणे, साऱ्या सरकारी नोकरीच्या परीक्षा देणे, अभ्यास करणे हे प्रामाणिकपणे करताना दिसतो. शेवटपर्यंत पोहोचला तरी मुलाखतीला नापास हतो. त्यामुळे त्याला आता साऱ्या ठिकाणी असणारे दर पाठ झालेत. त्याला एक सिनेमावाला वापरुन घेतो. आई त्याचाशी पूर्वीसारखी बोलणारी होती. पुन्हा त्या सिनेमावाल्याकडे जातो. तर तेथे पन्नास रुपयात दिवसभर सुताराचे काम करावे लागेल असे सांगीतले जाते.

त्याला निद्रानाशाच्या त्रास सुरू झालाय. माळ्यावरून त्याला पाणी प्यायला किंवा लघवीला खाली जाणेही खूप अवघड असते. एकतारीवाले रतभर सकाळपर्यंत भजन म्हणत असतात. माळा साफ करावा असे त्याला फक्त वाटते पण 'महिनोंमहिने आपण अंगाखालचं अंथरूण उचलत नाही'[4] हे वास्तवही आले आहे. बापाने स्व:ताचे घर मोठे का बांधले नाही ? असे त्याला कधीकधी वाटते.

चित्रकलेत तो हुशार होता. परंतु आज त्याला संडासावर चित्र काढून ती इच्छा पूर्ण करावी लागते आहे. मधली पत्र्याची भिंत सोडली तर एक तरुण जोडपं बाजूला दोन फुटाच्या अंतरावर पलीकडच्या खोलीत झोपते. त्यांच्या प्रणयक्रिडांच्या आवाजानी त्याला स्वत:हाची कामवासना आवरणे कठीण होते. त्याचा मुठ्या मारण्याचा कार्यक्रम रोजचाच असायचा. अलीकडे त्याची ती इच्छाही होत नाही. नकाशे काढलेला बिछाना त्याला धुवायला देताही येत नाही आणि धुताही येत येत नाही. आदिवासीयांमध्ये नोकरी नंतर छोकरीचं घाणेरड समीकरण नाही. त्याबद्दल त्यांना तो सुधारलेला समाजगट म्हणतो तो विचार करतो, "नियमाहून अधिक तरुणाई ज्या देशा मुठ्या मारत जगते त्या देशाचा काय झंटाचा विकास होणार आहे ? तसेच त्याला शेजारच्या जोडप्याचा छोट्याशा जागेतील अंधारातील प्रणय किडया – मुंग्यासारख्या वाटतो. येथे२१ व्या शतकातीलसामाजिक सांस्कृतिक संदर्भ दिसून येतो.

त्याच्या मनात कधीतरी त्याच्या राहुल बनसोडे या मित्राचे विचार येतात. तो जयभीमवाला. आत्मविश्वासू , बोलका , उत्साही आणि धडपडणारा होता. त्याचे वाचन चांगले होते. तो गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या जगातल्या राजकारणावर चर्चा करायचा. कॉलेजच्या निवडणुकीत तो एकवरशी हारतो. पण दुसऱ्या वर्षी जिंकतो. पुढे तो मोर्चे काढू लागला. संघटनेत तो खूप बुडून गेला . पोलिसांना सापडू नये म्हणून तो दोन तीन दिवस याच माळ्यावर झोपला होता. शेतकरी-महिला-दलित-आदिवासी यांच्या लढ्यांची माहिती सांगायचा. मार्क्स,लेनिन,चेगोवेरा वगैरे सांगायचा पुढे तो एका मोठ्या गुंडावर त्याच्या संघटनेन हल्ला केला. म्हणून वॉटेड झाला. एस.वाय.नंतर तो कॉलेजला आला नाही. एकदा अचानक नायकाच्या घरी आला. संघटनेत भरती व्हावे असे सांगू लागला. परंतु नायक नेहमीच्या लपत-छपत जगण्याच्या स्वभावामुळे फक्त ऐकूण घेतो. नायकान टी.वाय.केले. काही दिवसापूर्वी गडचिरोलीच्या जंगलात आदिवासींसाठी लढताना पोलिसांनी त्याचा तो आदर्श एन्कॉन्टर केल्याची बातमी वाचली. 'माणसानं कसं जगावं याचा तो आदर्श' असे नाकाला वाटते. निदान गांडू सारखी झोपेची वाट बघत बसावं तरी लागलं नसतं आर या पार झालं असतं एकदाची. असे त्याला वाटते.

**आदिवासी स्त्रियांना आरक्षणामुळे येत असलेला आत्मसन्मान,त्यांचा संघर्ष व स्वयंसेवी संस्थांचा कारभार ब्र -कविता महाजन**

कविता महाजन या मराठीतून एम.ए. नेट झालेल्या आहेत. नांदेड, मुंबई येथे प्राध्यापक म्हणून काम केले आहेत. तसेच त्यानी राज्य विकास संस्था, टाटा सामाजिक विज्ञान संस्था या सारख्या संस्थामध्ये संशोधनाचे काम केले आहे. विविध प्रकाशन संस्थासाठी त्यांनी कामे केली आहेत. त्यांचा डी.टी.पी. च व्यवसाय आहे. `तत्पुरुष` हा त्यांचा काव्यसंग्रह तर 'भिन्न' हे त्यांनी `ब्र` नंतर लिहिलेली कादंबरी होय. दोन्ही कादंबऱ्यात स्त्रिया केंद्र आहेत. 'ग्राफिटी वॉल' हे त्यांचे आणखी एक पुस्तक आहे.

'ब्र' ही कविता महाजन यांची २००५ साली प्रकाशित झालेली कादंबरी आहे. कविता महाजन स्वत: 'ब्र' बद्दल म्हणतात, " 'ब्र' मध्ये काहीही काल्पनिक नाही. त्यात वास्तवाची आणि वास्तवाचीच सरमिसळ आहे."[5]त्या पुढे म्हणतात, थोडक्यात सांगायचं, तर हे वास्तव माझं एकटीचं नाही, अनेकांचं(स्त्रियांचं आणि पुरुषांचंही ) आहे. स्नेहा अवसरीकर यांना दिलेल्या मुलाखतीत 'ब्र' बद्दल लेखिकेने सविस्तर मत मांडले आहे.[6] Field workच्या Energy बद्दल त्या म्हणतात, शोधण्याची तीव्र

इच्छेमुळे ते शक्य होते. आदिवासी कार्यकर्त्याच्या दृष्टीकोणातून आदिवासी स्त्रीजीवन समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. या विषयावरील टाटा इन्स्टिटयूटच्या प्रोजेक्ट वर त्यांनी चार वर्षे काम केले. ९ जिल्ह्यात हे काम झाले.फॉरेन फंडिंग साठी होणारे राजकारण त्यांनी पाहिले. ही कादंबरी लिहिताना सगळ्या क्षेत्रातले आदर्श ढासळल्याने अनेक नैतिक प्रश्न पडल्याचे त्या सांगतात. लिहून झाल्यावर तीन वर्षांनी कादंबरी प्रकाशित झाली. दृष्टांत पाठातील दृष्टांत 'सार' म्हणून घेतलेले दिसतात. आपले कामच (छंद, व्यवसाय) आपल्याला शेवटपर्यंत सोबत देतात. हा त्यांना `ब्र`चा निष्कर्ष वाटतो.

या कादंबरीत स्वयंसेवी संस्था व आदिवासी समाजजीवन याबद्दल मुख्य आशय आला आहे.येथे नवे सांस्कृतिक राजकारण दिसते. स्त्री-पुरुष संबंधाबद्दलही कादंबरी बोलते. 'ब्र' कादंबरीची नायिका प्रफुल्ल सुरूवातीला साधी गृहिणी आहे. विसाव्यावर्षी लग्न होऊन २१ व्या वर्षी एक मूल झाल्यानंतर नवऱ्याने तिला घटस्फोट दिलेला आहे. ती मूल व नवऱ्याला सोडून सुमेधसोबत काम करू लागते. त्यानंतर ती आदिवासी प्रकल्पात काम करण्यास सुरुवात होते. म्हणजेच ती एक घटस्फोटीत आहे. त्यातून ती उभी राहते. असे दाखवले आहे. तिला आपल्या नवऱ्याची,मुलाची मधून मधून आठवण येते. त्या आठवणी गुलाम मानसिकतेतील आहेत.तिचा प्रकल्प आदिवासी स्त्रियांसंदर्भात आहे.या स्त्रियांना आरक्षणामुळे सरपंचपासून सभापतीपर्यंत अनेक पदे मिळाली. पण त्यांच्यावर घरापासून दारापर्यंत सतत तिच्यावर अन्याय होतो. तरी ती लढत राहते. हक्कांसाठी संघर्ष करावा लागतो. पुरुषसत्तेला आव्हान देणाऱ्या, त्यात पराभूत झाल्या तरी पुन्हा उभ्या राहणाऱ्या स्त्रियांची ओळख लेखिका करून देतात. कादंबरीत या स्त्रियांबद्दलचा अहवाल म्हणता येईल असा मोठा मजकूर आहे.

प्रकल्पाच्या कामानिमित्त तीचा पहिला प्रवास वडगाव या गावी होतो.तिच्या प्रकल्पाचा विषय ग्रामपंचायतीवर निवडून आलेल्या स्त्रियांच्या संदर्भात असणारा होता. महिला सरपंचावर येणारे मोठ्या प्रमाणावरील अविश्वासाचे ठराव, त्यांच्यावरील अन्याय, संघर्ष, वेदना, स्त्रियांच्या विषयी असणारा पुरुषी दृष्टिकोन या सगळ्या गोष्टी दिसून येतात. २१ व्या शतकातील आदिवासी स्त्रीयांचे प्रश्न दिसून येतात. पुरुषसत्ता दिसून येते. आदिवासी स्त्रियांना महिला आरक्षण मिळून सुद्धा आपला अधिकार हक्क मिळत नाही. पुरुषप्रधान समाज त्यान स्त्रियांना योग्य पदापर्यंत पोचू देत नाहीत असे दिसते. उदा. कडुबाई ही उपसरपंचाच्या घरी वाढली म्हणून तिला सरपंच केले. शिकलेल्या चान्नीमध्ये स्वतंत्र विचार करण्याची धमक आहे.ती हुशार आहे. पण तिला सरपंच होता आलेले नाही.

२१ व्या शतकातही एखाद्या जातीच्या व्यवसाय परंपरेने ठरलेले असतो. असा समज शिल्लक असलेला दिसतो. उदा. कातकरी समाज चोरी करणारा समाज म्हणून ओळखला जातो म्हणूनच कालिबाईच्या मुलावर चोरीचा आळ आणून कालिबाईवर अविश्वासाचा ठराव आणला जातो.

भारतीय स्त्रियामधील सद्यस्थितीतील निरक्षरतेचे प्रमाण हे ६०.६% आहे. हे कडू वस्तवही कादंबरीतून पुढे आलेले आहे. "इथं वीज नाही. पाण्याची सोय नाही साधा रस्ता सुधा नाही. पिठाची गिरणी नाही".[7]गरिबीमुळे होणारी उपासमार, कुपोषण, संडास, आरोग्य, पाणीप्रश्न, रोजगार हे सर्व २१ व्या शतकातील आदिवासी जीवनातील प्रश्न कादंबरीत आलेले दिसतात. वाडीवरील जीवनसंघर्ष, त्यांची सध्यस्थिती,राहणीमन,अडचणी, विचारपद्धती या सगळ्यातून लेखिका त्यांच्या राजकीय जाणिवा नेतृत्त्व क्षमता शोधताना दिसते.

NGO सारख्या संस्था आदिवासीच्या प्रश्नासाठी पुढे सरसावलेल्या दिसतात. NGO बद्दलचे संदर्भ पहिल्यांदाच 'ब्र' च्या रूपाने मराठी कादंबरीत आलेले दिसून येतात. २१ व्या शतकात NGO चे प्रमाण वाढले. प्रश्नाकडे बहाण्याची दृष्टी त्यांनी बदलून टाकला याचे प्रत्यंतर 'ब्र' मधून येतो. प्रश्नांच्या प्रश्नांच्या जाऊन व्यवस्था परिवर्तनाचा विचार २१ व्या शतकात मागे पडलेला दिसतो. प्रश्नांची दाहकता कमी व्हावी म्हणूनच की काय NGO च्या रूपाने तात्पुरत्या मलमपट्ट्या केल्या जाताना दिसतात याचे प्रत्यंतर 'ब्र' मधून ओळखता येते. प्रशिक्षणाच्या माध्यमातून सत्तास्थानांचा उपयोग कसा करून घ्यायचा याची चर्चा दिसते. विविध मते आलेले दिसतात. पण या संस्था या काळातील आदिवासीच्या जीवनातील जाणीवपर्यंत पोहोचतात का? हा प्रश्न प्रामुख्याने उद्भवतो. या संस्थामध्ये अंतर्गत संघर्ष चालू आहेत हे स्पष्टपाने दिसून येते.

'ब्र' मध्ये एके ठिकाणी निवेदिका म्हणते, "म्हणजे काम काय करायची, कुठ करायची, किती प्रमाणात करायची, खर्च किती करायचं असे सगळे निर्णय ट्रस्टी घेतात. आम्ही केवळ अंमलबजावणी करतो या वाक्यातून हा संघर्ष दाखविता येतो.[8]NGO सारख्या संस्थांना भांडवली स्वरूप प्राप्त झाले. खऱ्या परिवर्तनाची चळवळींना मर्यादा पडताना दिसतात. २१ व्या शतकात आदिवासींना अनेक प्रश्नांनी ग्रासलेले दिसते परंतु त्यावरील उपाय मात्र अपुरे राहिलेले दिसतात. प्रचंड मोठ्या कामाची गरज आज आदिवासी क्षेत्रामद्धे निर्माण झालेली आहे.

१९८० च्या दशकापासून परदेशी पैसा खूप वाढला. त्यामुळे NGO सारख्या स्वयंसेवी संस्था सगळीकडे दिसू लागल्या. 'ब्र' कादंबरीतून या घटनेबद्दल उपरोधिक असे एक वाक्य आलेले दिसते. "पावसाळ्यात कुत्र्याच्या छत्र्या उगपाळयात तशा स्वयंसेवी संस्था सगळीकडे दिसू लागल्या."[9]

स्थानिक आदिवासी बायकांच्या समस्या, गैरसमज, अंधश्रद्धा, गरीबी, व्यसने शासकीय निष्क्रियता, प्राथमिकता सुविधाचा अभाव हे २१ व्या शतकातील प्रश्न NGO मार्फत तडीस जाऊ शकत नाही असे दिसते. संस्थेचा Project पूर्ण झाला की, ते निघून जातात. बायकांचे प्रश्न तसेच राहून जातात. स्वयंसेवी संस्थाकडे महाराष्ट्रात सध्या दरवर्षी किमान ३५० कोटी रु. येतात असा एक उल्लेख झाला आहे .[10]यात पैशाचा योग्य वापर होतो का? या कटू प्रश्नाचे उत्तर चिंतनातून नाही असे मिळते. कादंबरीत याचाही उल्लेख सापडतो. “काम परिणामकारक होत आहे की, नाही यापेक्षा कागदावरच्या नोंदी नेमकेपणाने आहे की नाही, या वरच त्यांचा अधिक भर असतो”.[11] कार्यकर्त्यांना सर्वेक्षणासाठी महाराष्ट्रातील आदिवासी जिल्ह्यातून प्रवास करायचचा होता. परंतु काही ठिकाणी प्रत्यक्ष न जाता माहिती भरून पाठविण्याचा प्रकट दिसून येतो . जी स्त्रियांची माहिती भरून घेतली आहे ती अचूक आहे असे मनता येत नाही. ‘ब्र’ कादंबरीत या बाबीचाही उल्लेख मिळतो. “त्या संस्थकडून नुसती यादी मिळवून घे बायकांच्या नावागावांची आणि इथे ‘प्रगतमध्येच बसून भरून टीके फॉर्म स्वतःच’[12]यावरून आपणास NGO च्या कार्याचे स्वरूप कळते. माहिती काही वेळा भोगस भरल्याचे दिसून येते. प्रत्येक वेळेला सामाजिक कार्यकर्त्याला त्या ठिकाणी पोहोचता येते का? योग्य वेळी मदतकार्य पोहोचते का? प्रफुल्लाला पडलेले प्रश्न याबाबतीत पाहण्यासारखा आहे. “मला अजूनही वाटत होतं की, समाजातल्या विविध पातळ्यांचे ‘सूक्ष्म’ बदल असे निव्वळ फिरून अनुभवता येतात का?”[13] या ठिकाणी प्रामाणिक सामान्य कार्यकर्त्यांनी घुसमट दिसून आली आहे. एक प्रकारे NGO च्या कार्याचे वरवरचे स्वरूप या चिंतनातून स्पष्ट होते. आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रत्यक्षात अनेक मर्यादा व अडचणी आहेत. हे स्पष्ट होते.

२१ व्या शतकात प्रचंड विषमता वाढत गेल्याचे दिसते. जागतिकीकरणाच्या काळात सर्व काही असणारे लोक एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला काहीच नसणारे लोक आहेत. हे सांस्कृतिक पर्यावरण कादंबरीत थोड्या फार प्रमाणात प्रतिबिंबीत झालेले दिसते.पराकोटीच्या विषमतेचे सांस्कृतिक पर्यावरण एका संवादात अगदी अचूकपणे आलेले दिसते.एके ठिकाणचे मत पाहू. “आपल्याकडच्या बहुतेक समस्यांचं मूळ गरिबीत आहे;आजच्या संपत्ती व सत्तेच्या अतीव केंद्रीकरणात, विषम समाजअर्थव्यवस्थेतआहे.पण याचा विचार किती स्वयंसेवी संस्था करतात?”[14]यावरून ते स्पष्ट होते.

**३.औद्योगिक जगतातील वास्तव ‘नरिमन पॉइंटचा समुद्र’ -ह.मो.मराठे**

ह.मो.मराठे हे या काळातील एक प्रमुख कादंबरीकार आहेत. त्यांच्या काळेशार पाणी, निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी,नो सेंटिमेंट्स प्लीज,सॉफ्टवेअर,मार्केट,कलियुग व नरिमन पॉइंटचा समुद्र या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांनी स्फूट,आत्मचरित्रपर व कथालेखन ही केलेले आहे. त्यांच्या कादंबऱ्यांवर सांस्कृतिक पर्यावरणाचा प्रभाव दिसतो. अविनाश व केतकी हे नवरा-बायको एकाच प्रकारचा माल बनवणाऱ्या वेगवेगळ्या कंपण्यात काम करत असतात.त्यातून दोघामध्ये संघर्ष होत जातो. हाच संघर्ष त्यांचे कौटुंबिक जीवन उध्वस्त कसे करतो, याचे चित्रण `नरिमन पॉइंटच्या समुद्र’ या लघुकादंबरीत चित्रित केला आहे.

अविनाश व केतकी हे जोडपे वेगवेगळ्या कंपनीत चांगल्या पगारावर कार्यरत असतात. अविनाश साने `सन शाईन क्लिनिंग सोप` चे मार्केटिंग करत असतो. अविनाशच्या कंपनीच्या मालाला बाजारात चांगली मागणी असते. त्यामुळे कंपनीही त्याच्यावर खुश असते. त्याचवेळी केतकी साने त्या कंपनीत काम करत असते. ती कंपनी `एव्हरफ्रेश क्लिनिंग सोप` चे उत्पादन बाजारात आणण्याचा प्रयत्नात असते. योगायोगाने केतकीच्या कंपनीच्या मार्केटिंग मॅनेजर राजीनामा देऊन निघून जातो. त्यामुळे केतकीला प्रमोशन देऊन ‘मार्केटिंग मॅनेजर’ चे पद देण्यात येते. त्यामुळे साने कुटुंबाला खूपच आनंद होतो परस्परांचे स्पर्धक म्हणून घराच्या बाहेरच राहण्याचा निर्णय दोघेही होतात. केतकीच्या प्रमोशनामुळे अविनाशला खरोखरच आनंद झालेल असल्याने केतकीला ‘मार्केटिंग मॅनेजर’ला येणाऱ्या अडचणीबाबत मदत करण्याचे आश्वासन तो देतो.

कथानक केतकीच्या मार्केटिंग मॅनेजर या पदावर बढती झाल्यापासून सुरू होते. केतकीचे ऑफिस नरिमन पॉइंटला एका उंच इमारतीत असते. दररोजच्या धावपळीच्या जीवनात या उंच इमारतीच्या अठराव्या मजल्यावरून समुद्राकडे बघण्यास तिला वेळच मिळत नव्हता. पण तिला आज `मार्केटिंग मॅनेजर`च्या केबिनमधून दिसणाऱ्या समुद्राकडे बघण्यामुळे वेगळाच आनंद झालेला होता. कारण तिला आज समुद्राचे भीषण रूप दिसत नव्हते. तिला फक्त समुद्राची खोली आणि दूरत्त्व जाणवत होते.

‘मार्केटिंग मॅनेजर’च्या पदाची सूत्रे हातात घेतल्यावर सर्वप्रथम तिला `एव्हरफ्रेश क्लिनिंग सोप` बाजारात आणून चांगले गि-हाईक मिळविण्याची जबाबदारी घ्यावी लागते. तिला कंपनीने हे पद दिल्याने माल खपविण्याचे आव्हानच वाटत असते. पण ती मोठ्या धाडसाने आव्हान स्वीकारते. त्यामुळे रात्रंदिवस त्याच्याच विचारात राहते. अविनाशकडून काही कल्पना घेऊन सर्वप्रथम जाहिरात मोठ्या प्रमाणात करते. जाहिरात एजंटचे नाव अविनाशनेच सुचविलेले असते. त्या दोघांनी एकमेकांना मदत करण्याचे जरी ठरवले असले तरी ते एकमेकांचे गळेकापू स्पर्धक होतातच.ती विविध योजना वापरुन वर्तमान, दूरदर्शन इ. प्रसारमाध्यमासाठी मोठ्या प्रमाणात जाहिरात करते. त्यामुळे कंपनीचे नाव व मालाची वैशिष्ठ्ये जनमानसात बिंबविण्याचा प्रयत्न करते. दरम्यानच्या काळात अविनाशच्या कंपनीच्या मालाला चांगली मागणी असली तरी दुकानामध्ये माल शिल्लक नसल्याचे

केतकीला कळते. ती त्याचा फायदा घेऊन आपला माल जाहिरात करून बाजारात आणते. त्यामुळे लवकरच मालाला खप वाढत जातो. त्यामध्ये दुकानदार विक्रेत्यांना विविध सवलती जाहीर केल्याने तेही गि-हाईकांना केतकीच्या कंपनीचाच माल देत असतात.

`सनशाईन` कंपनीच्या मालाची प्रसिद्धी खूपच असते. परंतु मालाला मागणी असली तरी कंपनीच्या चुकीच्या धोरणामुळे `सनशाईन` चे उत्पादन थांबलेले असते. त्यामुळे मागणी असूनही पुरवठा नसल्यामुळे अविनाश हतबल होतो. तो वरिष्ठांना वेळोवेळी कल्पना देतो. पण उत्पादनात काहीच फरक पडत नाही. तर पत्नीच्या कंपनीचा माल बाजारात दिसायला लागलेला असतो. त्यामुळे अविनाशच्या नोकरीवर गदा येण्याची शक्यता असते. शेवटी केतकीच्या `एव्हर फ्रेश` ने मार्केट काबीज केल्याची बातमी अविनाशच्या मालकाला कळते. त्यामुळे साहजिकच त्याचे वरिष्ठ अविनाशला जबाबदार धरतात. अविनाशने पूर्वी `सनशाईन` च्या उत्पादनबद्दल लेखी सूचना दिलेल्या नसल्याने अविनाश कोंडीत सापडतो. त्यामुळे सर्व जबाबदारी अविनाशवर ढकलण्यात येते. कंपनीचे अधिकारी पुन्हा उत्पन्न वाढवतात पण केतकीच्या `एव्हरफ्रेश`ने मार्केट काबिज केल्यामुळे `सनशाईन'चा खप कमी होत जातो.

तिने मोठ्या कौशल्याने विविध योजना वापरुन `एव्हरफ्रेश` चा खप वाढवलेला असतो. अविनाशच्या `सनशाईन` ला मागणी नसल्याने तो हतबल होतो. दोघांचे कौटुंबिक नातेही कलुषीत होत जाते. दोघामधला बाहेरचा संघर्ष घरात पोहचतो. स्पर्धेच्या युगात दोघांनाही कौटुंबिक नात्याचा विसर पडतो. त्यामुळे एके दिवशी अविनाश केतकीने जाहिरातीसंबंधी केलेल्या योजना चोरतो. त्याच योजना अमलात आणतो. त्यामुळे स्पर्धक कंपनीने जशाच्या ताशा योजना राबविल्याचे पाहून केतकीला कंपनीचे वरिष्ठ जाब विचारतात. त्यामुळे केतकी चिडते. पुन्हा मार्केटिंगचे कौशल्य वापरुन `एव्हरफ्रेश` ला पुन्हा मार्केट मिळवून देण्यात यशस्वी होते.

पतीने पत्नीच्या योजना वापरल्या असल्या तरी त्याच्या `सनशाईन`कंपनीचा खप वाढत नाही. त्यामुळे अविनाशवर त्याचा ठपका ठेवण्यात येतो. मार्केटिंग मॅनेजर म्हणून अपयशी ठरल्याचे कारण सांगून त्याची बदली स्टोअर डिपार्टमेंट मध्ये करण्यात येते. कंपनीच्या वरिष्ठांच्या ध्येयधोरणामुळे त्याचा हा अपमान झालेला असतो. अविनाश अपयशी ठरतो तर केतकी प्रमोशन पात्र ठरते. घरी अविनाश पुरुषी वर्चस्व दाखवून केतकीला राजीनामा देण्यास सांगतो. उलट केतकी त्यालाच राजीनामा देण्यास सांगते.एखाद्या पदावरून बदली होते किंवा पोष्ट काढून घेतली जाते ही राजीनामा मागण्याची पूर्व सूचना असते. असे ती व्यवहारिकपणे अविनाशला सांगते.

**संदर्भ:-**


1. भगत संभाजी, अडगळ, सृजन दिवाळी २००८ संपा. वी.ना. जाधव
2. तत्रैव,पृक्रं९६-९७.
3. तत्रैव,पृक्रं.१०३.
4. तत्रैव,पृ९१.
5. ग्राफिटी वॉल, कविता महाजन राजहंस प्रकापुणे ., प्र .आ.२००९ पृ.१९
6. मुलाखतकार स्नेहा अवसरीकर, अंतर्नाद, जुलै, २००७ संपा. भानू काळे.
7. महाजन कविता,ब्र,राजहंस प्रकापुणे.२००५.,पृ क्र४९.
8. तत्रैव,उनिपृ क्र.१०६.
9. तत्रैव,उनिपृ.क्र. १५० .
10. तत्रैव,उनिपृ.क्र.२००.
11. तत्रैव,उनि.पृ.क्र.२०१
12. तत्रैव,उनि.पृ.क्र .२५१
13. तत्रैव,उनिपृ.क्र.३२८ .
14. तत्रैव,उनिपृ.३९३.

# २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील शेतकऱ्यांच्या जीवनातील सामाजिक संदर्भ (बारोमासच्या अनुषंगाने)

**प्रा. डॉ. सविता अशोक व्हटकर,**
भोगावती महाविद्यालय, कुरुकली
ता. करवीर, जि. कोल्हापूर

**प्रस्तावना**

२१ वे शतक हे मानवी समाजासाठी किंवा एकूणच पृथ्वीवरील सर्वच जीवसृष्टीसाठी खूप वेगळे ठरलेले आहे. एकतरी आपण सार्वजण या शतकाला विज्ञानयुगाचे अवडंबर माजवणारे आहे असे बऱ्यापैकी समजले याचे कारण या शतकातील बदलाचा वेग हा लक्षात न येण्यासारखाच आहे. दररोज एक वेगळे काही मानवनिर्मित विज्ञानात बदल होताना दिसतात. काळानुसार बदल हे होतच राहणार, जुन्या-नव्याचा संगम हे सूत्र ही आता खूपच मागे पडलेले आहे. आजच्या या २१ व्या शतकात मला जसे पाहिजे तसे मला इतरत्र कोणत्याही प्रकारचे देणे-घेणे नाही अशी काहीशी भूमिका समाजात पहायला मिळते आहे. कारण समाजात ज्या गोष्टी घडत असतात किंवा जे काही प्रश्न निर्माण होत असतात. त्याचेच प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. मग तो साहित्याचा कोणताही प्रकार असो प्रत्येक साहित्य प्रकारात यांना त्या प्रकारे समाजचित्रण येतच असते. प्रस्तुत निबंधात २१ व्या शतकातील कादंबरी या सामाजिक संदर्भ कसे आहेत, काय आहेत, त्याचे स्वरूप कसे आहे. आणि त्याचा मानवी स्वभावावर कोणत्या प्रकारचा प्रभाव असतो हे शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कादंबरी हा वाङ्मय प्रकार 'कथात्म' वाङ्मयामध्ये मोडणारा आहे. त्यामुळे कादंबरीचे कथात्म वाङ्मयाचा परंपरेबरोबर नाते अजूनही जोडलेले आहे. कादंबरीने कथात्म वाङ्मयाकडून जे स्वीकारले ते नव्या जाणीवेपोटी नव्याने निर्माण केलेले आहे. व त्यातून तिचे रूप घडत गेलेले आहे. कादंबरी हा मूळचा इंग्रजी वाङ्मय प्रकार १८५७ साली प्रसिद्ध झालेली 'यमुना पर्यटन' ही पहिली कादंबरी सामाजिक प्रश्नांचे जणू ओझेच वाहत वाचकांसमोर आली आणि या पहिल्याच कादंबरीचे वास्तववादाची जाणीव सर्वांना करून दिली. जिथपासूनच 'कथात्म' साहित्यापेक्षा कादंबरीला सर्व मान्यता मिळू लागली. बदलत्या काळाची पावले ओळखत कादंबरीही आपले रूप व स्वरूप बदलू लागली. निसर्गनिर्मित, मानवनिर्मित अनेक प्रश्न कादंबरीतून मांडले जाऊ लागले. विज्ञानातील कादंबरी निसर्गातील अनेक रहस्ये शोधण्यासाठी तत्पर झाली. व या कादंबरीचे अनेक प्रकार निर्माण झाले ती प्रवाहातून वहात भूतकाळातील अनेक घटना-प्रसंग स्वत:मध्ये समजून घेत नव्या वळवाची वाट शोधताना समाजाचा प्रत्येक प्रश्न आपल्या कथेत घेण्याचा वसा या कादंबरीने म्हणजेच कादंबरीकारांनी घेतला आणि काळाच्या ओघात कादंबरी वाङ्मयाचे संपर्कही बदलू लागले हे संदर्भ का बदलू लागले त्याची कारणे काय आहेत? या विषयीची मांडणी मी प्रस्तुत निबंधात करणार आहे.

२१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील सामाजिक संदर्भ विचारात घेताना कादंबरी वाङ्मयाचे बदलते स्वरूप, वस्तुस्थिती, समाजात घडत असणाऱ्या वास्तव घटना, एका विस्तृत पटात मांडणे, त्याचा उहापोह करणे अशी मी सामाजिक संदर्भाविषयी माझे मत मांडते. आता वरील सर्व घटक कादंबरीतील सामाजिक संदर्भाबरोबर अनेक प्रश्नांची विचार करायला लावणारे आहेत. २१ व्या शतकातील कादंबरी ही जागतिकीकरणाच्या केंद्रस्थानी राहिलेली आहे. या जागतिकीकरणाने एकूणच प्रत्येक साहित्य प्रकारला अनेक घटना, प्रसंग, प्रश्न यांची ओळख करून दिलेली आहे. याचा परिणाम समाजातील प्रत्येक घटकावर प्रत्येक क्षेत्रावर झालेला आहे. त्याला कारण आहे खुले आर्थिक धोरण, या धोरणाने प्रत्येक छोटी गोष्ट गिळंकृत करायला सुरुवात केली आणि माणसाचे जगणेच कोलमडू लागले. जी कामे माणूस स्वत: तयार केलेल्या साधनाच्या सहाय्याने अनेक गोष्टी करत होता ती जागा यंत्राने घेतली आणि मानवी हातांनी तयार केलेली साधन सामग्री कालबाह्य ठरू लागली. बेकारीची कारणे या यंत्रात असल्याचे दिसते. हळूहळू माणुसकीही कमी होऊ लागते. यंत्रवत जगणे माणसाच्या वाट्याला आले आणि सगळ्याच गोष्टी तत्पर व्हाव्यात असे जणू नियमच प्रत्येकाने स्वत:ला लावून घेऊन नकळत स्वत:चे स्वास्थ्यही कमी करून घेणे सुरु झालेले आहे. अशा प्रकारचे सामाजिक संदर्भ २१ व्या शतकातील कादंबरीतून आलेले आहेत.

सामाजिक बदलाची सुरुवात ही यंत्राबरोबरच, प्रसार माध्यमांसारख्या बऱ्याच गोष्टींनी केलेली आहे. आंतरजाल, दूरदर्शन, युट्युब, फेसबुक, ट्विटर यासारखी प्रसारमाध्यमे माणसाच्या हातात आली. आणि कोणत्याही क्षणी चंगळवाद दिसू लागला. साहजिकच आपल्याही वाट्याला असेच आभासी जग असावे अशी धारणा घेऊन 'हातचे सोडून पळत्याच्या पाटी' किंवा 'मृगजळाचा भास' समाजात पसरू लागला याचे कारण कोणत्याही प्रकारच्या 'सेन्सॉर' नसलेल्या मालिका व चित्रपटांचे विषय यामुळे मानवी मनावर 'संयम' नावाचा जो संस्कार होता तोच आता बऱ्यापैकी नाहीसा झालेला आहे. काय स्वीकारावे

आणि काय नाकारावे याचे तारतम्य नष्ट होत चाललेले आहे असेही काही २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील बदलाने संदर्भ येतात.

२१ व्या शतकातील कादंबरीचे प्रकारातून जे बदलते संदर्भ येतात. त्यामध्ये दलित, ग्रामीण, सामाजिक, वास्तववादी, राजकीय, समस्याप्रधान, बालकादंबरी, वैज्ञानिक, आत्मकथनात्मक, काल्पनीक, प्रसंगचित्रण असे साधारणपणे कादंबरी या प्रकाराचा समावेश होतो. मराठी साहित्यात मात्र जास्त करून दलित, ग्रामीण,सामाजिक, बालकादंबरी, वैज्ञानिक या प्रकारच्या कादंबऱ्यांचा प्रभाव लक्षात घेण्यासारखा आहे. त्यातील जास्त लोकप्रिय कादंबरीप्रकार म्हणजे ग्रामीण कादंबरी होय. याचे कारण ग्रामीण कादंबरीच्या घटकांचे नाते समाजातील प्रत्येक प्रश्नांबरोबर सांधलेले असते म्हणूनच ग्रामीण कादंबरीतून नेहमीच शहरी भागातील राहणाऱ्या अनेक प्रश्नांची दखल घेतलेली आहे. तिथे यांना त्या प्रकारे शहरी भागातील संदर्भ हे येतच राहतात. मग ते वैचारिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक असे घटक सांगता येतात. असे असले तरी याचे परिणाम मात्र समाजातील सामान्य व्यक्तीच्याच वाट्याला आलेले आहेत. त्यांच्यासाठी जागतिकीकरणाचा बदल व त्यांचे जगणेच उपरे करणारे तर कधी उद्ध्वस करणारे आहे. दलित कादंबरीतून येणारे सामाजिक संदर्भ हे उपेक्षेचे बदलाच्या स्वरूपाचे आहे. त्यांच्या वाट्याला अजूनही बऱ्याच ठिकाणी घुसमट वाट्याला आलेली आहे. या दोन प्रकारच्या कादंबऱ्यातून येणारे सामाजिक संदर्भ हे वरील प्रमाणे नमूद केलेल्या घटकांशी निगडीत आहेत.

२१ व्या शतकातील कादंबरी या वाङ्मय प्रकारातून जो संदर्भ येतो तो अर्थकारणाचा ग्रामीण भागातील अर्थकारणाचा जास्त संबंध येतो तो सहकाराबरोबर, राजकारण या घटकाला नको तितके आलेले महत्त्व मग यातूनच बेकारीचे प्रश्न निर्माण झाले. असतानाही संकट तर ग्रामीण भागातील लोकांच्या पाचवीलात असते. यातून शेती व शेतकरी यांचे प्रश्न. एक प्रश्न सोडवत असताना पुन्हा दहा प्रश्न निर्माण होतात. कोणत्या प्रकारापासून सुरुवात करावी याचा गुंता सुटणारा नाही. या अनुषंगाने सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' ही कादंबरी मी विचारात घेतलेली आहे.

सदानंद देशमुखांच्या बारोमासया कादंबरीतून आलेले शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न मांडलेले आहेत. या कादंबरीचे कथानक एकूणच एका वर्षामध्ये घडलेले आहे. या वर्षात शेतकऱ्यांच्या जीवनात जे काही घटना, प्रसंग, प्रश्न येतात. त्याचे चित्रण या कादंबरीत येते. शेतकऱ्यांच्या जीवनात संकटे येत नाहीत तर ती कोसळत असतात. यावर मात करत. त्यांच्या कुटुंबातील मुले शिक्षण घेतात. तरीही त्यांच्या आयुष्यातील प्रश्न अत्यंत वेदनादायी असतात. या कादंबरीचा नायक एकनाथ याच्या आयुष्यात एकाकीपण आलेले आहे. त्यातून तो बाहेर पडण्याचा कष्टाचा आणि प्रामाणिकपणाचा पर्याय शोधत असतो. दिनकर दाभाडे व मधु हे उच्चशिक्षित असूनही अंधश्रद्धेच्या आहारी गेलेले आहेत. तर एकनाथ मनात विचार करतो, 'आपण आहोत मोडक्या तलवारीसारखे, ही तलवार जशी लढाईला प्रवृत्त करत नाही, फक्त इतिहासातील पराभवाची कथा सांगते. तसे आपणही पराभूत जीवनाचा इतिहास चेहऱ्यावर घेऊन फिरणारे आणि जास्त जपणार हे की आपण मोडलेले, शेती असून शेतकरी नाही, शिक्षण असून कर्मचारी नाही, घर असून बेघर झालेले, भाऊ असून नसल्यासारखे, बायको असून नसल्यासारखे, गाव असून नसल्यासारखे एकाकी (बारोमास पृ.क्र. १३६, उद्धृत) हे वर्णन वाचल्यावर एकनाथाचे अंतर्बाह्य व्यक्तिमत्व कसे कोलमडून पडलेले आहे. याची जाणीव होते. या कादंबरीतील सामाजिक प्रश्नांचे दिनकर दाभाडे, मधू व एकनाथ हे प्रतिनिधी आहेत. 'आधुनिक युगात नवेच जीवन वाट्याला आले. शहरी जाणिवांतून आलेले शिक्षण ग्रामीण जाणिवांशी विसंवादी आहे'.[१] अनेक तरुणांची ही व्यथा वैयक्तिक नसून सामाजिक आहे. आता जेव्हा असे प्रश्न वारंवार कादंबरीतून नाही तर प्रत्यक्षातही या ना त्या प्रकारे आजच्या किंवा कोणाच्या ना कोणाच्या तरी वाट्याला आलेले असतातच. हे प्रश्न सोडविण्याचाही काही गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. जसे की 'खेडेगावातील लोक इतर रितीने कितीही अडाणी असोत त्यांच्यामध्ये सूक्ष्म निरीक्षण शक्ती असते हे खास'[२]जसे की एकनाथाचा प्रश्न हा आधीच्या दोन पिढ्यांपासून आहे. आधी भानू आजा व सुभानराव वडील, नातू आता पूर्ण सेंद्रीय पद्धतीने शेती करणारे सकस धान्यांचे उत्पन्न घेणारे, त्यातून जेमतेमच म्हणजे गरजेपुरतेही उत्पन्न नाही. आपल्या कष्टाचे चीज व्हावे म्हणजे ज्यादा उत्पन्न मिळावे म्हणून सुभानराव संकरित बि-बियानांचीपेरणी करतात. जुन्याचा बिमोड करून नविन बियाणे विकत घेतल्यापासून सुरुवात सुभानरावांना करावी लागते. संकरित बियाणांपासून कमी वेळेत उत्पन्न मिळणे पण कष्ट आणि पैसा याचा ताळमेळ लागत नाही. खर्च वाढतच जातो. पण जसे पाहिजे तसे उत्पन्न मिळतच नाही. आजोबा आणि वडील यांच्याकडून शिक्षणासाठी पैसा मिळणार नाही. हे लक्षात घेणारा एकनाथ शेती विकून शिक्षण घ्यावे असा विचार करतो. एम.ए.बी.एड. चे शिक्षण घेऊन त्याला संस्थाचालकांना नोकरीसाठी चार लाख रुपये द्यायला नाहीत. म्हणून तो परत शेती करतो. शिकलेल्या एकनाथाचा विवाह होतो. त्याची पत्नी अलकाला पण नवऱ्याच्या नोकरीची शाश्वती लागत नाही. तेव्हा ती एकनाथला पानटपरी चालवून दोन पैसे मिळवायला सांगते. 'समाजाने व्यक्तिची पूर्णपणे स्वायत्तता नष्ट करून कोणत्याही प्रकारचा विरोध शक्य नसणाऱ्या सामाजिक अणू म्हणून वापरणाऱ्या, समाज प्रस्तापित व्यवस्थेमुळे पूर्ण शरणागत असणाऱ्या व्यक्तिची निर्मिती करणे हे प्रस्थापितांचे वैशिष्ट्य असते.'[३]या सर्व परिस्थितीमुळे सुभानराव याच्या एकत्र कुटुंबात

अनेक समस्या निर्माण होतात. अशी ही बारोमास कादंबरी बारा महिने शेतकऱ्यांना विविध प्रश्नांना कसे जीवघेण्या प्रसंगातून सामोरे जावे लागते याचे चित्रण करणारी आहे.

या कादंबरीतील तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारा एकनाथ याचे प्रश्न या समकाळाला भेडसावणारेच आहेत. एकनाथाचे शिक्षण, त्याला नोकरी लागेल अशी अपेक्षा ठेवणारी त्याची पत्नी अलका हिला शहरी जीवनाची सवय आहे. शहरी जीवन हे पैशाच्या सवयीचे असते. तोच एकनाथजवळ नाही म्हणून ती त्याच्याजवळ राहत नाही.'मुळात शहर आणि ग्रामीण या दोहोंमध्ये सांस्कृतिक व्दैत आहे आणि ते प्रकृती भिन्नत्वामुळेच आलेले आहे'.[४] खेडेगाव व तेथील वातावरण तिला नकोसे वाटते. या सगळ्या वाट्याला आलेल्या परवडीमुळे एकनाथाची जगण्याचीच वाताहत झालेली आहे. या सगळ्या आपल्या कुटुंबात घडणाऱ्या गोष्टीपासून एक्नाथाचा भाऊ मधू सोनेरी टोळीत सामील होतो व धनाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. त्यांचे वडील सोपनराव जगण्याची होलपट सहन न होऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न करतात. पुन्हा त्यांना वाचविण्यासाठी त्याच्या साऱ्या कुटुंबाला जीवघेणी धडपड करावी लागते.

बारोमास या कादंबरीचा नायक एकनाथ तनपुरे हा एम.ए.बी.एड. उच्च शिक्षित तरुण .वयाची एकतीस वर्षे झाली तरी नोकरी मिळत नाही म्हणून नैराश्याने घेरलेला कारण डोनेशन देता येत नाही. शेती हे परंपरेच भांडवल, त्याचे स्वप्न प्राध्यापक व्हावे असे असते. पण ते त्याला शक्य होत नाही. त्याचे आजोबा भानूआजा शेतीची परंपरा जपण्याचा प्रयत्न करतात. तर जास्त उत्पन्न मिळावे मनून सुभानराव ती मोडीत काढतात. एकनाथाला तर शेतीऐवजी नोकरीच महत्वाची वाटते. या तीन पिढ्यांभोवती बारेमास फिरताना दिसते. विदर्भातील ओल्यासुका परिसर हे या कादंबरी लेखनाची प्रेरणा आहे. तसेच येथील शेती व शेतकरी यांचे जगणे मांडणे हे प्रयोजन आहे. कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यालाही समाजव्यवस्था आत्महत्या करायला भाग पाडते. आधुनिक शेती पद्धतीचे ज्ञान नसणारा कोरडवाहू जमीन असणारा, अल्पभूधारक शेतकरी अत्यंत हालाखीचे जीवन जगत असतात. याला कारण सरकारी धोरणे, रोजगारांची मजूरी, नापीक जमीनी व्यवस्थेकडून होणारे शोषण यामुळे त्यांच्या वाट्याला नेहमी निराशाच येते. सरकारी कार्यालयतील उदाहरण या कादंबरीत येते. एकनाथ तलाठ्याच्या कार्यालयात शेतीच्या व बँकेच्या कर्जासाठी सातबारा मिळवण्यासाठी अनेक चकरा मारतो. तलाठ्याला थोडेफार पैसे दिल्याशिवाय सातबारा मिळणार नाही हे त्याला माहिती असते शेतकऱ्यांसाठी, ग्रामीण भागात असणारी सरकारी कार्यालये ही शेतकऱ्यांचे शोषण करण्यासाठी हक्काची ठिकाणे आहेत. या सगळ्या दिखाऊ गोष्टी समूळ नष्ट व्हाव्यात. त्याशिवाय शेतकऱ्यांच्या आयुष्यातील दैन्य व दारिद्र्य संपणार नाही. अशी अपेक्षाही व्यक्त करतो. 'पूर्वापार परंपरेपासून आर्थिक स्थिती घडविण्याचे व बिघडविण्याचे काम सुरु आहे त्यात कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नाही.'[५] या कादंबरीला अशा अनेक सामाजिक प्रश्नांची दखल लेखक सदानंद देखमुख यांनी घेऊन कृषी संस्कृतीची घुसमट स्पष्ट केलेली आहे.

शेती बरोबरच शेतकऱ्यांचे कृषी संस्कृतीबरोबरही नाते असते. याचे विस्तृत चित्रण आनंद यादव यांच्या 'गोतावळा' या कादंबरीतून आपणास वाचायला मिळते. 'निसर्गाच्या आधाराने निसर्गाचा घटक म्हणून राहणारा माणूस आपल्या सभ्यतेच्या आणि भौतिकतेच्या विकासाबरोबरच निसर्गाच्या विरोधी भूमिका घेऊ लागला.'[६] बारोमास या कादंबरीतूनही पशुपक्षी विविध प्रकारची झाडेझुडपे, वेगवेगळ्या वनस्पती, पिकांच्या नवनविन जाती, जास्तीत जास्त उत्पन्न देणाऱ्या संकरित जाती, सेंद्रीय खताऐवजी रासायनिक खतांचा वापरामुळे तर जमिनीचे आरोग्यच धोक्यात आले आहे. याची चिंता व्यक्त करताना लेखकाने यावर पर्याय ही सुचविला आहे आणि तो म्हणजे वनशेती, सेंद्रीयशेती, निसर्गशेती यामुळे काही वेळाने का होईना पण निसर्गाचा समतोल राखण्यास मदत होईल असाही आशावाद व्यक्त होताना दिसतो. या कादंबरीतील श्यामभाऊ गहाणे याविषयी आपले मत मांडतात. 'निसर्ग सर्वसमावेशक आहे. त्यातील वनस्पती, प्राणीमात्रांचे अस्तित्व, सूक्ष्मातील सूक्ष्म जिवाणूंची विविधता, त्यांचे परस्परावलंबी जीवन हे जमिनीशी निगडीत आहे. त्यांचे नैसर्गिक संतुलन हा निसर्गशेतीचा आधार आहे.'(उदधृत बारोमास पान. ६४) यावरूनच शेती आणि शेतकरी हाच खरा ग्रामीण संस्कृतीचा कणा आहे. पण तोच कणा आजमितीला जीर्ण होताना दिसतो आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे शेतकऱ्यांसाठी सरकारने दिलेली खोटी आश्वासने दिल्या-दिल्या लगेचच संपून जातात. वर्षानुवर्षे आपल्या जगण्यातील कष्ट कधीतरी थोडेफार कमी होईल या अपेक्षेवर जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या हाती मात्र काहीच लागत नाही, तर दिवसेंदिवस त्याचे जगणेच दुष्ट चक्रात अडकून पडते. एकतर पुन्हा पारंपारिक शेती पद्धतीकडे वळता येत नाही आणि आधुनिक शेतीसाठीचा खर्च परवडत नाही. आज तर आपण पाहतोच आहोत की विकासासाठी शेतकऱ्यांच्या पिकाऊ जमीनीची वाताहत होताना दिसते. म्हणजे श्यामभाऊ गव्हाणे यांनी चिंता व्यक्त केलेली आहे. या कादंबरीत निसर्ग हा सर्वसमावेशक आहे तो तसा किती काळासाठी असणार? असाही पुन्हा नव्याने प्रश्न त्यांनी समस्त मानवी समाजासमोर उभा केलेला आहे.

**सारांश**

'बारोमास' या कादंबरीत शेती व्यवसायाचाच प्रश्न नाही. तर खेड्यातील शेतकरी, त्यांच्या आत्महत्या, तरुण पिढीची ससेहोलापट, शहराचे ग्रामीण भागावर होत असलेले अतिक्रमण यातूनच समाजात अनेक प्रश्न निर्माण होत असतात. शेती व्यवसायातून वेळ, कष्ट व पैसा याचा योग्य मोबदला मिळत नाही. शहरी जीवन पद्धती ग्रामीण भागात जशीच्या तशी तग धरू शकत नाही. त्यातूनच मग ग्रामीण कुटुंबांमध्ये मोठ्या प्रमाणात मतभेद होताना दिसतात. या कादंबरीतील तिसऱ्या पिढीची वाताहत ही सदगुणांमुळे तर काही अवगुणांमुळे झालेली आहे. एकनाथाला त्याच्या चांगुलपणाची किमंत मोजावी लागते तर मधुला कुटुंबातील वास्तव परिस्थितीवर मात करण्यासाठी अंधश्रध्देसारखा मार्ग स्वीकारावा लागतो. मधूचा आडमुठेपणा, पत्नीचा रागीट स्वभाव, वडिलांचे दुर्लक्षित स्वभाव, शिक्षणाची झालेली हेळसांड या सगळ्या नकारात्मक गोष्टींनी एकनाथची मानसिक कोंडी केलेली आहे. एकूणच या कादंबरीतून शेतकऱ्यांच्या दु:ख,व्यथा, वेदना या कधीही न संपणाऱ्या आहेत हे स्पष्ट होते.

**संदर्भ टिपा**

१) लिंबाळे शरणकुमार (संपा), - 'साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००७, पृ.क्र. ८५.
२) देवघर ग.ल., - 'उद्याचे खेडे', प्रकाशन ग.ल. देवघर, द्वितीयावृत्ती, १९५२, पृ.क्र.३४.
3) थोरात हरिचंद्र, - 'कादंबरी एक साहित्य प्रकार', शब्द पब्लिकेशन, प्रथमावृत्ती, २०१०, पृ.क्र. १३०.
४) पाटील मोहन, 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती' स्वरूप प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००२, पृ. २१.
५) लिंबाळे शरणकुमार (संपा), - 'साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह', दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००७, पृ.क्र. ८५.
६) गायकवाड विनोद,-'पर्यावरणीय साहित्य स्वरूप आणि समीक्षा' अक्षरदीप प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, २०१९, पृ.क्र. १७.

# व्यक्तिचित्रणात्मक ललितगद्य: 'लोकपरंपरचे शिल्पकार'

**डॉ प्रियांका कुंभार**
अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी

मराठी साहित्यात कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, चरित्र या वाङ्मयप्रकारासारखच ललितगद्य हा एक व्यापक आणि संमिश्र वाङ्मयप्रकार आहे. इतर वाङ्मयप्रकारांच्या प्रमाणेच ललितगद्य हा प्रकार देखील इंग्रजी साहित्याच्या प्रभावातून निर्माण होत असताना ललित निबंध म्हणून उदयाला आला. त्याच्या स्वरूप बदलत लघुनिबंधाचे रूप आकाराला आले त्यानंतर त्यामध्ये अमुलाग्र बदल होऊन ललितगद्य आकारास आले. मराठी साहित्यामध्ये ललितगद्यालाच 'ललित निबंध' अशी संज्ञा वापरली जाते. 'ललितगद्य' हा शब्द 'ललित' व 'गद्य' अशा दोन भिन्न शब्दांच सहोगातून निर्माण झालेला आहे. ललित म्हणजे 'सौंदर्यशील' आणि गद्य साठी 'बंदिश' असेही अर्थ वापरले जातात. म्हणूनच ललितगद्य या शब्दसाठी 'सौंदर्यपूर्ण गद्यात्मक लेखन' असा तचा शब्दशः अर्थ अभिप्रेत असून त्याची व्यापकता व मर्यादा याच संज्ञेमध्ये स्पष्ट होते आहे. या शब्दप्रयोगात आठवणी-अनुभव, लघुनिबंध, प्रवासलेख, व्यक्तिचित्रे ललितलेख या सर्वच उपप्रकारांचा समावेश केला गेला आहे. ललितगद्य ही संज्ञा अधिक लवचिक आणि सर्वसमावेशक बनली आहे. मानवी जीवनाचा अर्थ समजून घेता यावा म्हणूनच आयुष्यातील काही निवडक प्रसंग, घटनाक्रम काढून त्याचा अन्वयार्थ लावणे हेच ललित साहित्याचे काम आहे असे म्हणता येते. प्रसंग, घटनाक्रम प्रत्यक्ष घडलेले असोत किंवा मानवी जीवनात निदान तसे घडने शक्य असते त्याचेच प्रतिबिंब साहित्यात उमटत असते. ललितगद्य लेखनाचा आरंभ हा सरळसरळ विषयाला धरून मानवी जीवनात आलेल्या अनुभवांना धरून कथनाने येत असतो. हे अनुभव आपल्या मूळ स्वरूपाला धक्का न लावता अंतर्मुख वृत्तीने अवतरत असतात. ललित लेखनात येणारे संवाद, विनोद, घटना, गोष्टी, अनुभवांचा भाग म्हणून येत असतात.

व्यक्तिचित्रणात्मक ललितगद्यामध्ये लेखक आपलला भेटलेल व्यक्तींच्याअंर्तबाह्य रूपाचा वेध घेतो आणि आपल इच्छेनुरूप व्यक्तींची वर्णने साकारतो. मनातील अस्वस्थता, मानसिक प्रतिक्रिया, मानसिक आंदोलने, एकाकीपण, परात्मका मनात टिपून आंतरिक व्यक्तिचित्र साकारतो. एकप्रकारे व्यक्तीचे मनोविश्व रेखाटून मनोविश्लेषणात्मक पातळीवर व्यक्तीचे दर्शन व्यक्तिचित्रणात्मक ललितगद्यातून लेखक घडवतो. अशाप्रकारच्या लेखनाला गुढतेचा स्पर्श झालेला असतो. भूतकाळात अधिक रमल्याने अनेकदा वास्तव चित्रणाचा अभाव जाणवतो. अनुभवांची व्यामिश्रता हे महत्त्वाचे वैशिष्ट्ये ठरते. वि.द. घाटे, पु.ल.देशपांडे, इरावती कर्वे, रवींद्र पिंगे यांनी व्यक्तिचित्रणात्मक लेखनतंत्राचा वापर केलेला दिसतो. अलिकडच्या कालखंडामध्ये गणेश चंदनशिवे यांनी असा प्रयत्न केल्याचे दिसते. आठवणींमध्ये ललितगद्याची प्रतिमा मुक्तपणे प्रकट झालेले दिसते. लेखक आपल जीवनातील सुख-दुःखाच्या क्षणांना तसेच संस्मरणीय आठवणींना ललितगद्यातून मांडतो. विशिष्ट निवडक प्रसंगाला केंद्रवर्ती ठेऊन तने केलेले हे लेखन 'मी' च्या भोवती फिरणारे लेखन असते. भूतकाळातील प्रसंगांना रेखाटताना त्यात्या प्रसंगातील मानसिकता, भोवताल, विचारप्रक्रिया, भेटलेली माणसे, माणसांचे नमुने, वर्तनव्यवहार इत्यादी असंख्यबाबींना लेखक अशा लेखनातून स्थान देतो.व्यक्तिचित्रणात्मक किंवा अठवणींना ललितगद्यामध्ये मांडणी असलेलागणेश चंदनशिवे लिखित'लोकपरंपरचे शिल्पकार' एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. या ग्रंथाचे सामाजिक आणि संस्कृतिक अंगाने आलेले विवेचन हे काळानुरूप महत्त्वपूर्ण ठरते आहे.

जगातील कोणतेही साहित्य जन्माला येताना ते आपले सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ अधोरेखित करत जन्माला येतअसते. मराठी साहित्य विषयी हा विचार केला तर आपल्याला त्याचा प्रत्येय येतो. मौखिक साहित्य परंपरेपासूनमराठी भाषेतील म्हाइंभटांचा पहिला गद्यग्रंथ लीळाचरित्र, वारकरी संत साहित्य परंपरेतील ओव्या, अभंग, कीर्तन, गौवळण, भारुड ते पुढे शाहिरी परंपरेतील गण, भेदिक, पोवाडे, लावण्या आणि आधुनिक साहित्यातील लघुकथा, कादंबरी, कविता महाकाव्य, खंडकाव्य, नाटक, एकांकिका, दीर्घांक. शोकात्मिका, सुखात्मिका, प्रहसन पर्यंत आपणास ते दिसून येते. बाराव्या शतकापासून एकविसाव्या शतकापर्यंत ही परंपरा तशीच अखंडपणे अविरत चालत आलेली आहे. या सर्व काळामध्ये साहित्य निर्मितीत मोलाचे योगदान देणारा एक घटक म्हणजे 'शाहिर'.या शाहिरांच्या निर्मिती बद्दल रा. श्री. जोग म्हणतात,''यादव कालाच्या पूर्वीपासून राज्यस्थान सारख्या उत्तर भारतीय परदेशात हिशोबान अथवा बिरूद्गगाण गाणाऱ्या भाटांची परंपरा होती. हा एक प्रकारे कीर्तीकाव्याचा नमूना होता. राजस्थानातून राजपूत कुलांबरोबर अनेक भाट महाराष्ट्रात यादवपूर्वी आलेले होते. त्याचाच उत्तरकालीन आविष्कार म्हणजे शाहीर होय''(जोग,रा. श्री.:१९७३:पृ. ४०६) म्हणजे हे भाटजे किर्तीकाव्य रचत होते ते त्या राजाच्या कार्य कर्तृत्वाची समाजिक स्तुतीच होते. मराठीतीलआद्य 'पोवाडा' शाहिर आगिनदासाने लिहिलेला आहे हा पोवाडा'अफजलखानाचावध' या ऐतिहासिक घटनेची साक्ष देणारा आहे.

शिवकालीन शाहिरी आणि पेशवेकालीन शाहिरी ते तमाशा असे बदलत गेलेले स्वरूप आपणास पहावयास मिळते. शौर्याचे पोवाडे लिहिणारा आणि गाणारा शाहिर पुढे पेशवेकाळात तमाशा करु लागला. श्रृंगारिक लावण्याचे फड रंगवू लागला. हा अपवाद वगळता याच काळातील उमा बाबू सावळजकर (१८१८ ते १८९०) याचे आद्य वग - नाट्य 'मोहनाबटाव' हे पौराणिक कथेत मोडत असले तरी त्यातील समाजिक आशय आणि सांस्कृतिक संदर्भ महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात. या दोन्हीकाळातील शाहिरांचा विचार करता ही परंपरा पुढे आधुनिक काळातही तशीच्या तशी चालत आलेली दिसते. याचाएकविसाव्या शतकातील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भाचा नवाकोरा ऐतिहासिक दस्ताऐवज म्हणजे डॉ. गणेश चंदनशिवे यांचे 'लोकपरंपरचे शिल्पकार' हा ग्रंथ.

डॉ. गणेश चंदनशिवे हे नाव महाराष्ट्राला आता नवं राहिलेले नाही. त्यांची तमाशा परंपरेतून झालेली सुरवात आज लोकप्रबोधना पासून आंबेडकरी विचारधारे पर्यंत जी सामाजिक आणि सांस्कृतिक भूमिका बजावते आहे. त्यांनी जोपासलेली ही एकविसाव्या शतकातील समाजिक शाहिरीच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट मानावी लागेल. मुंबई विद्यापीठात लोककला विभागाचे प्रमुख म्हणून काम करत असताना. समाज आणि साहित्याप्रती आपली असलेली सामाजिक - सांस्कृतिक बांधिलकी ते आपल्या कृतीतून आणि शाहिरी सेवेतून सिद्ध करत असल्याचा प्रत्यय येतो. या बद्दल लिहिताना कबिर दास म्हणतात, “डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक वारसा आणि अण्णाभाऊंच्या प्रबोधनकारी लोककलेचा वारसा नीती-निष्टा-कष्टाने चालवणाऱ्या घराण्यातील तशीच वडिलोपार्जित परंपरा असणारे करकरीत व्यक्तिमत्त्व डॉ. गणेश संपतराव चंदनशिवे. (चंदनशिवे, गणेश:: पृ. ७) चंदनशिवे यांनी 'हे भिमराया, नमितो पाया, द्यावी मती आम्हा तव गुण गाया ' या भिमराव कर्डकाच्या गणा पासून ते अमेरिकेतील ऑक्सफर्ड विद्यापीठात मांडलेल्या भारतीय लोकसाहित्याच्या भूमिकेपर्यंत सामाज प्रबोधनाच्या बांधिलकीची भूमिका बजावताना दिसतात.

'लोकपरंपरचे शिल्पकार' हा ग्रंथ ही सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरांची नोंद घेत इतिहास साक्ष होणारा ग्रंथ आहे. “महाराष्ट्राच्या मराठी मुलखात अनेक स्थित्यंतर आली आणि गेली. अनेकांनी मराठी भूमीवर आणि मराठी मुलखावर आक्रमण केली. त्यांनी आपले बरे वाईट संस्कार या भूमीवर उमटवले. तरी पण मराठी भाषा आणि मराठी माणूस यांनी आपल्या मातीचा संस्कार मात्र ढळू दिला नाही. संत पंत आणि लोककलावंत यांनी इथल्या परंपरागत चालत आलेल्या लोककला आणि मराठी भाषेचे संवर्धन करण्याचं काम प्रामुख्याने केलं.”(चंदनशिवे, गणेश:२०२३:पृ. १७ ) याच कमाला न्याय देण्यासाठी या ग्रंथाची निर्मिती झाली असावी.

या ग्रंथाचे वैचारिक आणि कालनिहाय असे दोन भाग करुन त्याची मांडणी केली आहे. तसे पाहता ही शाहिरांचे स्फुट लघुचरित्र निबंध आहेत. त्या त्या काळात त्यांनी केलेल्या कार्याची नोंद घेतलेली आहे. भाग - एकमध्ये तमासगीर शाहिर आहेत. शाहीर आनंद फंदी, शाहीर परशुराम, शाहीर प्रभाकर, शाहीर राम जोशी, शाहीर होनाजी बाळा, शाहीर सगनभाऊ, शाहीर उमा बापू सावळजकर, शाहीर शिवा संभा कवलापूरकर, शाहीर पट्टे बापूराव, शाहीर भाऊ पक्कड, पद्मश्री यमुनाबाई वाईकर, शाहीर दत्तोबा तांबे, शाहीर हरिभाऊ अन्वीकर, शाहीर काळू बाळू, तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर आणि शाहीर दत्ता महाडिक. यांनी आपल्या शाहिरीमधून दिलेला व्यवहारिक उपदेश हा समाजप्रबोधन करणारा होता.

अनंत फंदी यांनी 'बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्ग सोडू नको संसारामध्ये ऐसा आपला उगाच भटकत फिरू नको' असे समाज प्रबोधनाचे फटके लिहिले आहेत. 'लंडे, गुंडे, हिरसे, तट्टू यांची संगत धरू नको, नरदेहाची येऊन प्राण्या दुष्टवासना करू नको, चंगी भंगी भटकी सटकी यांच्या मेळ्यात बसू नको, बिकट वाट वही वाट नसावी, धोपट मार्गा सोडू नको' वरील रचनेच्या ओळीत आपल्याला कानांवर पडल्या की, फंदीच्या फटक्यांची आठवण होते. निर्भीड आणि कठोर शब्दांच्या ओळी म्हणजेच फटका होय. सत्य आणि कठोर शब्दांचा फटकारा करणे हे समाजहिताच्या अनुषंगाने किती फायद्याचे आहे, हे शाहीर अनंतपदींना चांगलेच माहीत होते.परशुराम यांनीमानवी स्वभावातील वर्मावर नेमके बोट ठेवून उपरोधिक विनोद करत तत्कालीन समाजातील पुरुष कर्तुत्वाला विसरतो तेव्हा त्यांच्या स्त्रीया कष्टाचे जीवन व्यतीत करतात, यावरती मार्मिक भाष्य करणारा आणि सामाजिक भान असणारा शाहीर म्हणजे शाहीर परशुराम होय.प्रभाकर यांनी'१८१८ मध्ये पेशव्यांचा असतो झाला त्यानंतर राजाश्री कलावंतांची अत्यंत वाईट स्थिती झाली त्यांचा परिणाम प्रभाकर च्या आयुष्यावर अधिक पडला कारण त्याच्या तमाशाला स्वतःचा फोड नव्हता त्यामुळे रोजी रोटीलाही महाग होण्याची वेळ आली अशा परिस्थितीत बडोद्याच्या गायकवाड घराण्याने त्यांना आश्रय दिला विश्व कुटुंबाच विश्व कुटुंबी श्रीमंत ते तर तुर्त प्रजेला अंतरले गायकवाड आहेत म्हणून हे ब्राह्मण तरले अशी समस्त ब्राह्मणांच्या वतीने उपकाराची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.'राम जोशी यांनी' पेशवाईतील ब्राह्मणी राज्य कसे कमकुवत होत चालले आहे याचे कथन करून तसा इशाराही त्यांनी आपल्या कवणाच्या माध्यमातून दिला होता. पेशवाईतील अधर्माने कशी अराजकता माजविली आहे.

वास्तविक पाहता पेशवेकालीन 'शाहिरी' ही श्रृंगारिक आणि भाटगिरी करणारी 'शाहिरी' होती.अशी बहुतेक अभ्यासकांनी मांडणी केली आहे. पण यावर य. न. केळकर यांनी भाष्य केले आहे. त्याचे विवेचन रास्त ठरते. ''इतिहास संशोधकांना या कवींच्या काव्यांतून तत्कालीन समाजस्थितीची काही तुरळक माहिती मिळू शकते, हे खरें असलें तरी तेवढ्यावरून त्या समाजाचे विश्वसनीय व सम्यक् दर्शन काधीच होऊ शकत नाही. म्हणून या पूर्वोक्त संत, विद्वान किंवा धार्मिक कवींची काव्यगंगा ही 'उलटी गंगा' म्हणजे आकाशगंगाच म्हणावी लागेल; कारण ती ज्या काळातील ज्या समाजांतून वाहत गेली त्या काळाचे किंवा त्या समाजाचे प्रतिबिंब तिच्या पात्रांत कोठेच पडलेले नाही. उलटपक्षी'लोककवी' असलेल्या शाहिरांच्या कवितेच्या पात्रांत मात्र त्यांच्या समकालिन समाजाची प्रतिबिंबे दोन्ही तटाकी अगदी सजीव असल्यासारखी स्वच्छ उमटलेली आहेत.'' (केळकर,य. न.:१९५२:पृ.३) हे विधान संशोधनाच्या पातळीवर डॉ. गणेश चंदनशिवे यांनी मांडले असल्याचे लक्षात येते.

या ग्रंथाचा दुसरा भाग हा प्रबोधन पर्वातील शाहिरांचा आहे. यामध्ये येणारे शाहीर अमर शेख, शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर दत्ता गव्हाणकर, शाहीर आत्माराम पाटील, शाहीर विठ्ठल उमप, शाहीर वामनदादा कर्डक, शाहीर बाबासाहेब देशमुख, शाहीर छगन चौगुले, शाहीरा मीराबाई उमप ही आधुनिक साहित्यातील प्रसिद्ध आणि सुपरिचित नावे आहेत.

अमर शेख अण्णा भाऊ साठे, दता गव्हाणकर कर हे तीन शाहिर ज्यांची उभी जिंदगी समाजप्रबोधन आणि सामान्यच्या लढ्यासाठी रस्त्यावर प्रबोधन करण्यात गेली. त्यांचं संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान म्हणजे समाजिक लढ्याच्या इतिहासाती सुवर्ण पान म्हणावे लागेल. त्यांनी डाव्या कम्युनिस्ट चळवळीतूनचे 'लाल बावटा कला पथक' यांच्या माध्यमातून १९४२ ला टिटवाळा या ठिकाणी सुरवात केली. पुढे देश स्वतंत्र्याच्या लढ्यापासुन ते संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि गोवा मुक्ती संग्राम अशा महत्त्वाच्या लढ्यात आपली महत्त्वाची भूमिका बजावताली ह्या प्रबोधन पर्वातील शाहिरांच्या भागात शाहिर अमर शेख यांच्या काव्यातीलकष्टकरी ,कामगार ,शेतकरी, यांची व्यथा लोकपरंपरेच्या कलापथकात सादर करून बळी राजाच्या व्यथेला त्यांच्या न्याय हक्केला लोकमान्यता मिळून देण्यासाठी सतत आपल्या लेखणीला धार लावून व्यवस्थेवर हल्ला करणारा एक लढवय्या शाहीर म्हणून लोकशाहीर अमरशेख यांच्या कार्य कर्तृत्त्वाचा लेखा जोखा आपण करून घेऊयात. अशी सुरवात करून पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदानाची नोंद घेतली आहे.

अण्णा भाऊ साठे यांनी मुंबईनगरीतील कामगार जीवनातील विषमता अण्णाभाऊंनी दर्शवली असून गोरगरीबांनी हे दुबळे जिणे बदलण्यासाठी झुंज द्यावी असा संदेशही दिल्याचा आढळतो दुसरे असे कि, 'जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव' हे अजरामर गीत समग्र दलित चळवळीमध्ये आलेली मरगळ झटकून टाकून नवचैतन्य निर्माण करण्याचे कार्य केले. अण्णाभाऊंची शाहिरी ही अखिल मानव जातीच्या उद्धाराचा झेंडा घेऊन लढणारी होती. त्यावरती डॉ. गणेश चंदनशिवे यांनी अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला आहे. 'शौर्याची तवा परंपरा शिवबाच्या महाराष्ट्राकळून बघ जरा' शिवबाच्या महाराष्ट्राला साद घालणारी शाहिरी लिहिणारे दत्ता गव्हाणकर हेही महत्त्वाचे शाहीर म्हणून या पुस्तकात त्यांची नोंद घेतली गेली आहे. शाहिर वामनदादा कर्डक हे सुद्धा महत्त्वाचे शाहीर या पुस्तकातून अधोरेखित केले गेले आहेत.

मानवाचा सर्वांगीण विकास हाच संत सुधारकांचा सांगावा आहे,हाच सांगावा महाकवी वामनदादा कर्डक यांच्या शाहिरीचा मुख्य श्रोत आहे. बुद्ध,कबीर,तुकोबा,छत्रपती शिवाजी महाराज,फुले,शाहू-आंबेडकरांचा विचार कार्य-कर्तृत्वाचे सामाजिक भान, लोक प्रबोधन व मानव मुक्तीचे तत्वविचार वामनदादाच्या कवनातून दिसतो .आंबेडकरी शाहिरीचा उगमही म.फुलेंच्या सत्यशोधकी शाहिरी जलशातून प्रेरणा घेऊनच उदयाला आला. जिचा मूळ उद्देश जिथे जिथे शोषण,विषमता,अन्याय,अत्याचार,अनीती,असत्य आहे तेथे तेथे भारतीय संविधानिक तत्व विचाराच् पायावर लोकशाही,समता,स्वातंत्र्य न्याय,बंधुता,राष्ट्रीय एकता-एकात्मता,राष्ट्रवाद,विज्ञानभिमुखता ह्या मानवी मूल्यांची रुजवणूक आणि त्याचा प्रचार-प्रसार करणे हाच राहिला.

लोकपरंपरा आणि उस्फुर्त लोकगायिकीत आपला हातखंडा असणारे लोकशाहीर विठ्ठल उमप यांचं सामाजिक भान सर्वाना सर्वश्रुत आहे . त्यांनी जांभूळ आख्यानाच्या माध्यमातून आख्यान गोंधळाचा प्रकार अमेरिकेपर्यंत नेऊन पोचवला हे सांस्कृतिक कार्य खूपच मोलाचे आहे. जसे ते आंबेडकरी साहित्य आणि सांस्कृतिक चळवळीचे खांदे कार्यकर्ते होते तसेच ते सामाजिक बांधिलकी मानणारे शाहीर देखील होते. अशाप्रकारे या ग्रंथा मधून डॉ. गणेश चंदनशिवे यांनी सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेचा वेध घेतला आहे.

एकूणच गावगाड्यातील खेड्यापाड्यातील प्रतिभावंत शहिरांनी आपल्या रचना आणि कवनांच्या माध्यमातून मराठी संस्कृती आणि लोकपरंपरा जीवापाड जपली. जेव्हा जेव्हा मराठी भूमीवर स्थित्यंतरे निर्माण झाली तेव्हा तेव्हा कलावंतर आणि शहिर मंडळींनी हातामध्ये डफ, तुणतुने घेऊन लोकांच्या मनोरंजनाबरोबरच लोकांचे प्रबोधनही केले त्यातून संस्कृतीही जोपासली.

**संदर्भः**

1. रा. श्री. जोगःमराठी वाङ्मयाचा इतिहास : खंड तिसरा, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे १९७३
2. गणेश चंदनशिवेःलोकपरंपरचे शिल्पकार, डिंपल पब्लिकेशनवसई २०२३
3. तंतकवि तथा शाहीर , य. न. केळकर, रिसर्च आयडियल पब्लिशिंग हाऊस पुणे. १९५२

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# २१ व्या शतकातील ग्रामीण कादंबरी

**डॉ.वैशाली श्रीकांत गुंजेकर**
मराठी विभाग,
भोगावती महाविद्यालय,करुकली

**प्रास्ताविक**

१९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्राची स्थापना झाली आणि समाजपरिवर्तनाला गतिमानता येऊ लागली. शिक्षणाचा प्रचार व प्रसार वेगाने सुरू झाला. विज्ञान-तंत्रज्ञानाचे लोणही खेड्यापाड्यापर्यंत पोहचले. याचा परिणाम ग्रामीण जीवनशैलीवरही झाला. शिक्षित व्यक्ती आपल्या जीवनातील व्यथा-वेदना साहित्यातून मांडू लागले. त्यातूनच ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, भटके-विमुक्त असे विविध प्रवाह अस्तित्वात आले. या प्रवाहातून सर्वसामान्य माणसांच्या भावविश्वाचा वेध घेऊन बदलत्या मानवी जीवनाचा परामर्श या कालखंडातील साहित्यिकांनी घेतलेला आहे.

२१ वे शतक हे माहिती तंत्रज्ञानाचेआणि प्रचंड स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगातील ग्रामीण समाजजीवनातील नवे आशय आणिजाणिवा संबंधिचे नवे आत्मभान साहित्यातून अधोरेखित होऊ लागले. ग्रामीण साहित्य हे मूलता व्यक्ती केंद्रीत आणि कृषीकेंद्रीत आहे. गावगाडा तेथीलकृषी समाजरचना व संस्कृती यांच्या वास्तवाचे विचार मंथन २१ व्या शतकातील ग्रामीण साहित्याने केलेले आहे. साहित्यिक आपल्या लेखणीतून ग्रामीणसंघर्षमय जीवनआणिपरिवर्तन वैविध्यपूर्णरितीने मांडताना दिसतात. जीवघेण्या स्पर्धेतील मानवी मूल्यांचा ऱ्हास, विस्थापन, संघर्षमय जीवनाने व्यापलेला शेतकरी यांच्या मनोव्यवस्थेचे प्रतिबिंब ग्रामीण साहित्यात उमटलेले आहे. २१ व्या शतकातील साहित्यिकांनी ग्राम जीवनातल्या व्यथेच्या मुळाशी असणाऱ्या प्रश्नांना वाचा फोडलेली आहे. त्याचा थोडक्यात सामाजिकतेच्या आणि सांस्कृतिकतेच्या अंगाने आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेणार आहोत.

**शोधनिबंधाची उदिष्टये -**

१) २१ व्या शतकातील ग्रामीण कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक जीवन जाणिवांचेचित्रण शोधणे.
२) २१ व्या शतकातील ग्रामीण कांदबरीतून संघर्षमय स्थितीचा आढावा घेणे.
3) २१ व्या शतकातील कृषीजन संस्कृतीचे वास्तव रूप जाणून घेणे.
४) २१ व्या शतकातील ग्रामीण जीवनातील स्थित्यंतरे अभ्यासणे.

**अभ्यासपद्धती**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी समाजशास्त्रीय अभ्यासपध्दतीचा आधार घेण्याचे निश्चित केलेले आहे. २१ व्या शतकातील ग्रामीण कादंबऱ्यांचा अभ्यास सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून केला जाईल.

**ग्रामीण साहित्य**

ग्रामीण साहित्यातून ग्रामीण विभागाशी संबंधित असलेले जीवनानुभव व्यक्त होतात. ग्रामीण जीवनपद्धती तेथील समाज, कृषीप्रधान संस्कृती, निसर्गाशी आणि मातीशी असलेला वैशिष्टयपूर्ण संबंधग्रामीण साहित्यातून अधोरेखित केला जातो. प्रदेशानुसार मानवी जीवनाला लाभलेली सामाजिक, राजकीय, आर्थिक,भौगोलिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक वैशिष्ट्ये आणि त्यासंबंधिचे प्रश्न व समस्या प्रामुख्याने मांडून त्यांचा कालौघात जीवनशैलीवर होणारा संस्कार ग्रामीण साहित्यातून प्रतिबिंबित झाला आहे. ग्रामीण मनाचा, समाजाचा अनेक ताणतणावासह शब्दबद्ध करून ठेवलेला सांस्कृतिक ठेवा ग्रामीण साहित्यातून उलगडला जातो. या संदर्भात ग्रामीण साहित्याचे अभ्यासक आनंद यादव म्हणतात,*बदलत्या खेड्याचे वास्तव दर्शन घडविण्यात ग्रामीण साहित्य हे अनुषंगाने समाजकारणही साधत असते. मराठी खेड्याच्या दृष्टीने सध्याचा काळ हा संक्रमणाचा एक काळ आहे. हजारो वर्षे चालत आलेली जुन्या खेड्याची सर्वांगीण संरचना बदलत आहे. त्याचे विघटन होऊन नवे खेडे अंग धरत आहे. या संक्रमणात ग्रामीण जुन्या समाजाच्या अनेक अंगोपांगांची वाताहत होऊन ती अनेक निरुपद्रवी व्यक्तिसमूहाना उद्ध्वस्त करून टाकत आहे. अनेक समाजस्तरांची कधी नव्हे अशी जागृती होऊन नव्या समाज-व्यवस्थेत स्वत:ला जमवून घेऊन स्थिर होण्याच्या प्रयत्नात ओढाताण सुरु आहे. ग्रामीण समाजाच्या संक्रमणाचे हे जिवंत नाट्य व अपूर्व इतिहास साहित्या-सारख्या सरळ सरळ जीवनप्रत्यय देणाऱ्या कलाप्रकाराच्या द्वारा पकडून ठेवणे हे पुढच्या पिढ्यांना मार्गदर्शक आणि उपकारक ठरणार आहे. तो एक* ( सांस्कृतिक संचित म्हणून ) *मोलाचा ठेवा ठरणार आहे.* [ ग्रामीणता : साहित्य आणि

वास्तवपृ ५८ ]ग्रामीण साहित्य बदलत्या समाजव्यवस्थेच्या संक्रमणाचे प्रतिनिधित्व करत आहे याची जाणीव आनंद यादव करुन देतात.२१ व्या शतकातील ग्रामीण कादंबरीकारबदलत्या खेड्याचे वास्तव दर्शन घडवितात. तसेचकृषी क्षेत्रातील आणि ग्राम जीवनातील प्रश्नांना वसमस्यांना वाचा फोडण्याचे काम उत्तम पद्धतीने करतआहे.

**२१ व्या शतकातील ग्रामीण कादंबरी**

१९९० नंतर आणि २१व्या शतकाच्या सुरुवातीला सामाजिक स्थित्यंतराचे वास्तव चित्र दृष्टीस पडू लागले. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या प्रभावाचे प्रतिबिंब संपूर्ण समाजजीवनावर उमटले. मानवी जीवनाला व्यापून टाकणाऱ्या सर्वच क्षेत्रामध्येआमुलाग्र परिवर्तन झाले. या परिवर्तनाचे, स्थित्यंतराचे वास्तव चित्र२१ व्या शतकातील ग्रामीण कादंबरीच्या माध्यमातून लेखकांनी अधोरेखित केले आहे.

आपल्या सभोवतालच्या समाजजीवनातील काही घटक वेचून कादंबरी आकार घेत असते. कादंबरीचा उद्देश केवळ जीवनानुभवाच्या चित्रणापुरता मर्यादित नसतो, तर आत्मशोधाच्या आणि जीवनशोधाच्या प्रेरणेची स्थलकालातील गुंफन असते. ग्रामीण कादंबरी संदर्भात रवींद्र ठाकूर म्हणतात,*साहित्य ही एक सामाजिक घटना आहे.कादंबरीहा समकालीन समाजवास्तव चित्रित करणारा एक वाङ्मयीन दस्तऐवज आहे. याचे भान ग्रामीण कादंबरीने दाखवले आहे.*[ मराठी ग्रामीण कादंबरी, पृ८] यावरुनच ग्रामीण कादंबरी भोवतालच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे अधोरेखित करते.२१ व्या शतकातील कादंबऱ्या ग्राम जीवनातील बदल, ग्रामसंस्कृतीतील नष्ट होऊ पाहणारी आदर्श मूल्यावस्था मांडताना दिसतात. यामध्ये बाबाराव मुसळे'वारूळ'(२००४) प्रतिमा इंगोले 'पार्ट टाईम' (२००४) आशा बगे 'भूमी'(२००८) अशोक पवार 'तसव्या' (२०१३) 'दर कोस दर मुक्काम' (२०१६) रमेश इंगळे'निशाणी डावा अंगठा' (२००५) 'सर्व प्रश्न अनिवार्य' (२०११)कैलास दौंड 'कापूस काळ' (२००९) महेंद्र कदम 'धूळपावलं' (२००९)सीताराम सावंत 'देशोधडी' (२०१०) नवनाथ गोरे'फेसाटी' (२०११) आनंद विंगकर 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट' (२०११)अविनाश कोल्हे 'पंगतीतलं पान' (२०२०) यासारख्या अनेक कादंबऱ्यानी २१ व्या शतकातील बदलत चाललेल्या ग्रामीण वास्तवाची व्यामिश्रता टिपण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे.या कालखंडातील काही कादंबऱ्यांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे.

**सदानंद देशमुख- बारोमास(२००२)**

भारतीय खेड्यातीलवर्षाच्या बाराही महिने कृषीजीवनात घडणाऱ्या घटनांचा प्रातिनिधिक धांडोळा सदानंद देशमुख 'बारोमास' कादंबरीतून घेतात. शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे, त्यांच्या समाजजीवनाचे, पर्यावरणाचे, मानवी नातेसंबंधाच्या समस्याचे चित्रण या कादंबरीत पहावयास मिळते.'सुभानराव' या शेतकऱ्याच्या कुटुंबाची दुर्दशा ही भारतीय शेतकऱ्याच्या दुःखाचे प्रतिनिधित्व करते. निसर्ग, दुष्काळ, शेतीची नापिकता, कर्जबाजारीपणा, महागाई, विजेचा प्रश्न, भ्रष्ट राज्यकारभार, सावकारी पाश अशा अनेक समस्येने ग्रासलेला शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्वीकारताना दिसतो. तीन पिढ्यांचा संघर्ष तसेच सुशिक्षित बेरोजगारांच्या प्रश्नावर कादंबरी गंभीर रूप धारण करते.एकनाथ, मधु पवार,दिनकर दाभाडे इत्यादी तरुणांनी शिक्षण घेऊन सुद्धा नोकरी न मिळाल्यामुळे पदरी निराशा येते. नैराश्यग्रस्त तरुणांच्या मनाची व्यथा सदानंद देशमुख कोवळीकतेने मांडतात.

**शंकर सखाराम- 'एसईझेड' (२००९)**

समकालीन वातावरणाचा वेध 'एसईझेड' ही कादंबरी घेते. सेझ म्हणजे (special Economic zone) विशेष आर्थिक क्षेत्र ही योजना भारताच्या व्यवसाय विकासासाठी राबविली जात आहे.२००६ साली रायगड जिल्ह्यातील 'सेझ'च्या विकासासाठीशेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेऊन उद्योगसमुहाच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या दुरावस्थेचे दर्शन शंकरसखाराम 'एसईझेड' कादंबरीतून घडवितात.आर्थिक उदारीकरणाच्या नावाखाली शेतकऱ्याचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन उद्ध्वस्त करून भांडवलदारी संस्कृती रुजविण्याचे काम 'सेझ' करीत आहे.यासेझला शंकर सखाराम विरोध करण्यासाठी शेतकऱ्यांच्या चळवळीत सामील होतात. या चळवळीत आलेले अनुभव आणि पाहिलेले समाजजीवन कांदबरी अधोरेखित करतात.२१ व्या शतकातील आधुनिकीकरणाच्या नावाखाली नामशेष होणाऱ्या सामजवास्तवाचे विविध पैलू कादंबरीच्या दोन भागातून उलगडून दाखविलेलेआहेत. पहिल्या भागात रायगड जिल्हयातील अलिबाग, पोयगाड, उरण, पेण परिसरातील वैभवशाली समाजजीवन, त्यांचे व्यवसाय, सण-उत्सव, मानवी स्वभाव, त्यांची भाषा कौशल्यपूर्ण रीतीने मांडलेली आहे. दुसऱ्या भागात 'सेझ' कायद्याच्या विरोधात लढणाऱ्या ग्रामीण चळवळी पहावयास मिळतात.बलाढ्य भांडवलदार शासनाशी हातमिळवणी करून शेतकऱ्यांना देशोधडीला लावून त्यांचे जीवन उद्ध्वस्त करीत आहे. शेतीवरील अतिक्रमणामुळे उध्वस्त झालेला गावगाडा, दरिद्री व अज्ञानी भूमिपुत्र, बलुतेदार, मजूर, कामगार यांच्यापुढे अनेक प्रश्न उभे राहतात.शंकर सखाराम नष्ट होत चाललेल्या ग्रामीण समाजजीवनाचा वेध या कादंबरीत घेतात.

**प्रविण बांदेकर – चाळेगत (२००९)**

'चाळेगत'कादंबरीतून २१ व्या शतकातील सर्व बदलांचे संदर्भ पहावयास मिळतात. तळकोकणातील समकालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वास्तवाचे भयवाह चित्र प्रविण बांदेकर रेखाटतात. विकासाच्या नावाखाली मानवी संस्कृतीने निसर्गावर केलेले अतिक्रमण आणि त्यातून निर्माण झालेल्या समस्या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहेत. एका गोष्टीतून दुसरी गोष्ट, दुसरीतूनू तिसरी असा कादंबरीचा रचनाबंध गुंतागुंतीचा आहे. चाळेगत मधील मिथके पुराणकाळातील दशावतारीखेळ,लोकगीत, लोककथा, लोककला यांच्या वर्णनातून कोकणाच्या पारंपरिक संस्कृतीचेदर्शन घडवितात. दशावतारी नाटकातील संकासुर ही व्यक्तीरेखा बहुजन वर्गाच्या समस्येचे प्रतिनिधित्व करत बदलत्या सामाजिक वास्तवतेत जगण्याची केविलवाणी धडपड खेळातून मांडते. गोवा, केरळ या परप्रांतातत्या ट्रॉलर्सवाल्यानी कोकणात केलेल्या घुसखोरीतून मच्छीमारांचे, शेतकऱ्यांचे पारंपरिक व्यवसाय नष्ट होऊ लागले. ग्राम समाजातील पिढीजात उदरनिर्वाहाच्या समस्या, निराशावादी सुशिक्षित तरुण वर्गांचे प्रश्न चाळेगतमध्ये उठावदारपणे मांडलेले आहे. कोकणातील सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा सर्व स्तरातून होत असलेल्या ऱ्हासाचे वास्तववादी चित्रण प्रवीण बांदेकर मांडतात.

**राजन गवस - ब-बळीचा (२०११)**

२१ व्या शतकाच्या कचाट्यात सापडलेला गावगाडा आपली पारंपरिक, नैसर्गिक मूल्ये हरवत चाललेला आहे. भूमीशी नाते तोडणारी माणसे 'ब-बळीचा' या कादंबरीत राजन गवस उभी करतात.आधुनिकतेच्या आणि सुधारणांच्या नावाखाली खेड्याला आलेले विद्रुप रूप प्रस्तुतकादंबरीतूनअनुभवता येते.कादंबरीतला नायक सिनेमातील पटकथाकार 'कल्लाप्पा कोनेकरी''उफराळ' या पटकथेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे भावविश्व,बदलती कुटुंबव्यवस्था, सण-उत्सव, समारंभ यांना आलेले विकृतीकरण अत्यंत वास्तवदर्शीपणे मांडतो. ग्रामीण समाजजीवनातील संवेदनशीलता परिणामकारकपणे कादंबरीतव्यक्त केलेली आहे

**कृष्णात खोत – गावठाण (२००९),झड:झिंबड (२०१२)**

कृष्णात खोत हे २१ व्या शतकातील मराठी साहित्यातील एक सुपरिचित लेखक आहेत. त्यांच्या 'गावठाण','रौंदाळ','झड-झिंबड','धुळमाती', 'रिगांण', या कादंबऱ्यातून कृषीसंस्कृतीलसमाजजीवनाचे विदारक वास्तवदर्शी रूप रेखाटलेले आहे.'गावठाण' मध्ये शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या'आनंदी' यास्त्री पात्राचा खडतर जीवन प्रवास विषद केलेला आहे.आनंदी समवेततिचे आई वडील,लहान भाऊ, मैत्रिणी,सासरची मंडळी यांचे हृदयस्पर्शी चित्रण केवळ१०६ पृष्टातून मांडलेले आहे.मानवी नात्यातील भावबंधाचे आणि स्त्री जन्माच्या दु:खत कहाणीचे प्रभावी चित्रण कादंबरीत आलेले आहे.तसेच'झड-झिंबड' या कादंबरीत पाऊस हाच नायकाच्या भूमिकेत आहे. शेतकऱ्याचा आधार असणारा पाऊस कधी जीवनदान देतो, तर कधी त्यांच्या जीवावर उठतो. पाऊस नपडल्यामुळे किंवा आतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या हाल अपेष्टांचे चित्रण कादंबरीत मांडलेले आहे. मातीच्या, पाण्याच्या प्रश्नाबरोबर गावगाड्याचा लेखाजोखा कादंबरीत रेखाटलेला आहे. रिंगाण, धूळमाती याही कादंबऱ्यातून शेती आणि शेतकरी समाजजीवनासंबंधित येणाऱ्या अनेक प्रश्नांचे सखोल चिंतन कृष्णात खोत यांनी प्रकर्षाने चितारलेले आहे.

**समारोप**

एकूणच २१ व्या शतकातील ग्रामीण कादंबरीतून कृषीसंस्कृती, शेतकरी, त्यांचे समाजजीवन, सांस्कृतिक जीवन यांच्या परिवर्तनाचे अनेक कंगोरे अत्यंत सूक्ष्म निरीक्षण दृष्टीने आणि संवेदनशीलतेने मांडलेले आहेत. बदलत्या कृषीसंस्कृतीतील शेतकऱ्यांच्या जीवनातील समस्यांचा वेध घेतलेला आहे. आधुनिक काळातील ग्रामीण समाजजीवनाचे नेमके भयवाह वास्तव चित्र जागृकपणे कादंबरीकारांनी टिपलेले आहे.प्रस्तुत शोधनिबंधातून हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

**निष्कर्ष**

१) २१ व्या शतकातील ग्रामीण कादंबरीतून सामाजिक व सांस्कृतिक स्थित्यंतराचा परिणाम प्रभावीपणे व्यक्त झालेला आहे.
2) ग्रामीण जीवनानुभवातून कृषीसंस्कृतीतील बदलत्या वास्तवाचेप्रत्ययकारी चित्रण अनुभवता येते.
3) आधुनिक विकासाच्या नावाखाली मानवी जीवनमूल्यांचा ऱ्हास होत चाललेला आहे. तसेच माणूस संवेदनाहीन बनत चाललेला आहे.याची जाणीव ग्रामीण कादंबरी करुन देते.
४) ग्रामीण कादंबरी शेतकऱ्यांच्या बदलत्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील वास्तवता रेखाटते.
५) वैफल्यग्रस्त शेतकऱ्यांच्याशोषणव्यवस्थेचा वबेरोजगारी तरुणांच्या उद्वस्थतेचामागोवा स्पष्टपणे मांडण्याचे काम २१ व्या शतकातील ग्रामीण कादंबरी करीत आहे.

**संदर्भ**

१) आनंद यादव - ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८१.
२) डॉ. रविंद्र ठाकूर - मराठी ग्रामीण कांदबरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००१.
३) सदानंद देशमुख- बारोमास कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे, २००२
४) शंकर सखाराम- 'एसईझेड', सामंतपब्लिकेशन्स, मुंबई, २००९
५) प्रविण बांदेकर - चाळेगत, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपुर, २००९
६) राजन गवस - ब-बळीचा, पॉप्युलर प्रकाशन,मुंबई, २०१२,
७) कृष्णात खोत - गावठाण, मौज प्रकाशन गृह, मुंबई२००९
८) कृष्णात खोत -झड: झिंबड' पॉप्युलर प्रकाशन,मुंबई, २०१२

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com

# ‘सीतायन’ या ललित संग्रहातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**श्रीमती प्रतिभा भारत पैलवान**
श्रीमती आ.रा.पाटील कन्या महाविद्यालय,
इचलकरंजी,कोल्हापूर.

**प्रस्तावना :**

मराठी साहित्याला शेकडो वर्षाची परंपरा आहे. या कालखंडात साहित्याच्या आशय आणि अभिव्यक्तीमध्ये कालानुरूप अनेक स्थित्यंतरे घडत आली आहेत. सध्या मराठी साहित्य हे समाजातील सर्वसामान्य मानसाच्या जीवनातील सुखदुःखाच्या जाणिवा घेवून आकाराला येवू लागले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी अशा विविध घटकांच्या भावभावना साहित्यामधून प्रभाविपणे अविष्कृत होत गेल्या. अनेकांनी आपला परिसर, आपले सांस्कृतिक जीवन, त्यातील प्रतिमा साहित्यातून अभिव्यक्त केल्या. खरे तर मराठी भाषा आणि मराठी साहित्याचा विचार करता मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. मराठी ही भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. मराठी महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे ९ कोटी आहे. मराठी मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा आहे. मराठी भाषा भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे आधुनिक रूप आहे. गाथा सप्तशती हा मराठीतील २२२० वर्ष जुना पहिला ग्रंथ. मराठीच वय किमान २५०० वर्ष आहे. मराठी भाषेचा गौरव ज्ञानेश्वरांनी त्यांच्या साहित्यातून ही केलेला दिसून येतो. महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून मराठी भाषेला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. आजतागायत मराठी भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत आणि त्यात सातत्यपूर्ण रीतीने भर पडत आहे.

**‘सीतायन’ च्या अनुषंगाने :**

लोकसाहित्याच्या गाढ्या अभ्यासक डॉ. तारा भवाळकर यांची ‘सीतायन’ ही अशीच एक विलक्षण साहित्यकृती आहे. एकविसाव्या शतकाची स्वतःची अशी वैशिष्ट्ये आहेत. माहिती व तंत्रज्ञान युगाने संगणक, इंटरनेट, उपग्रह, मोबाईलसारख्या साधनांनी स्थल व कालाच्या सीमारेषा पुसल्याने राष्ट्र, चलन, भाषा, दळणवळण, संस्कृती या गोष्टी जवळजवळ संपुष्टात आणल्या. स्त्रीकडे सत्ता, संपत्ती व निर्णय अशा तिन्ही गोष्टी गतीने आल्याने समाजरचनेत तिची भूमिका निर्णायक बनली. मूल्यांपेक्षा किंमत, भावनेपेक्षा भौतिक,नात्यापेक्षा व्यवहार,शिक्षणापेक्षा शहाणपण, समूहापेक्षा व्यक्ती आणि विचारापेक्षा कृती महत्त्वाची ठरल्याने घर, समाज, व्यक्ती धारणेत आमूलाग्र बदल झाले. मनुष्य टोकाचा आत्मरत व आत्मकेंद्री झाला. समाजकारणाची जागा राजकारणाने घेतली. सेलिब्रेटी व सत्तधीश समाजाचे ‘आयडॉल' बनले.जग एक होत असताना जात, धर्म, राष्ट्र, नागरिकत्व, संस्कृती, भाषा गौण ठरून मानव अधिकार, जात-धर्मनिरपेक्षता, वंचित विकास या गोष्टींना आपसूक महत्त्व येते. टाळकुट्या पद्धतीने विचार बंदिस्त करणे म्हणजे आपला विकास अवरुद्ध करणे असते, हे तरुणाईला जितके उमगले आहे तितके ते समाज नेतृत्वास नाही; हे वास्तव नाकारता येणार नाही. डॉ तारा भवाळकर या लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकपरंपरा आणि लोककला या विषयांशी संबंधित असून या विषयांच्या त्या गाढ्या अभ्यासक आहेत. त्यांनी लोकसंस्कृती, नाट्यसंशोधन, संतसाहित्य, एकांकिका, ललित लेखन, लोककला यांविषयी तसेच स्त्री जाणिवांवर लक्ष केंद्रित करणारे विपुल लेखन केले आहे आणि लोककला आणि लोकसाहित्य या विषयांशी संबंधित अनेक चर्चा, परिसंवाद, संमेलने यांत भाग घेतला आहे.

डॉ.तारा भवाळकरांनी पौराणिक नाटक, लोकनाट्य, दशावतार, तंजावरची नाटके, यक्षगान, कथकली अशा नाट्य प्रकारांची जडणघडण शोधली. त्यांचे समग्र लेखन वस्तुनिष्ठ, यथार्थ व चिकित्सक दृष्टी आणि सैद्धांतिक अभ्यासाचा वस्तुपाठच आहे. मराठी विश्वकोश, मराठी वाड्मयकोश आणि मराठी ग्रंथकोश या महत्त्वाच्या कार्यातही त्यांनी बहुमोल योगदान दिले आहे.अभ्यासक स्त्रिया (ज्येष्ठ लेखिका मालती दांडेकर, विदुषी दुर्गा भागवत यांच्यापासून ते प्रसिद्ध कवयित्री डॉ. अरुणा ढेरे यांच्यापर्यंत ज्ञात-अज्ञात अशा २५ अभ्यासक स्त्रियांच्या संशोधन कार्याचा परिचय करून देणारे पुस्तक),आकलन आणि आस्वाद (साहित्यिक),तिसऱ्या बिंदूच्या शोधात (वैचारिक),निरगाठ सुरगाठ (लेखसंग्रह),प्रियतमा ( गडकरी साहित्यातील स्त्री प्रतिमा), बोरीबाभळी (रा.रं. बोराडे यांच्या ग्रामीण स्त्रीविषयक कथांचे संपादन आणि प्रस्तावना), मधुशाळा (हरिवंशराय बच्चन यांच्या ‘मधुशाला’चे मराठीतले पहिले मराठी भाषांतर), मरणात खरोखर जग जगते (कथासंग्रह), मराठी नाटक : नव्या दिशा, नवी वळणे,मराठी नाट्यपरंपरा : शोध आणि आस्वाद, महामाया,माझिये जातीच्या (सामाजिक),मातीची रूपे(ललित),मायवाटेचा मागोवा,मिथकआणि नाटक,यक्षगान आणि मराठी नाट्य परंपरा, लोकनागर रंगभूमी (माहितीपर),लोकपरंपरा आणि स्त्रीप्रतिभा (माहितीपर), लोकपरंपरेतील सीता,लोकसंचित (वैचारिक)लोकसाहित्य: वाड्मयप्रवाह, लोकसाहित्याच्या अभ्यासदिशा

(माहितीपर)लोकांगण (कथासंग्रह), संस्कृतीची शोधयात्रा (माहितीपर), स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर (वैचारिक), स्नेहरंग (वैचारिक)एवढे विपुल लेखन करणाऱ्या लोकसाहित्याच्या जेष्ठ अभ्यासक डॉ. तारा भवाळकर या नेहमीच लोकसंस्कृतीचा अभ्यास मातृसंस्कृती म्हणून करत आल्या आहेत . एकूणच लोकसाहित्याची स्त्रीवादी अंगाने त्यांनी केलेली मांडणी लक्षणीय आहे. त्याच अनुषंगाने सीतेच्या वेदनेचा विद्रोहाचा जो सूर त्यांना वेगवेगळ्या लोकरामायणांत सापडला,त्याचा मागोवा म्हणजे हे सीतायन होय. रामपत्नी म्हणून सीतेची प्रतिमा आजवर 'सोशिकतेचं मूर्तिमंत प्रतीकअशीच रंगवली गेली आहे. सीता सोशिक होती खरीच,पण संधी मिळाली तेव्हा तिनेही रामाविरुद्ध विद्रोह केला.भूमिकन्या असलेल्या सीतेने पुन्हा भूमीचा आश्रय घेणं,हा लोकपरंपरेनं तिचा विद्रोहच मानला आहे.अभिजन परंपरा आणि लोकपरंपरांचं नातं कायमच कधी संवादी,तर कधी विसंवादी असं राहिलेलं आहे.सीतेच्या संदर्भात तर भारतीय लोकमनाने कायमचसीतेला झुकतं माप दिलं आहे. मराठी, हिंदी, कन्नड, बंगाली, बौद्ध जातककथा ते अगदी आदिवासी कथांमध्येही रामापेक्षासीतेचंच गुणगान गायलेलं दिसतं. एके ठिकाणी त्या म्हणतात,

"राम म्हणू राम नाही सीतेच्या तोलाचा,
सीतामाई हिरकणी राम हलक्या दिलाचा"

ही ओवी, रामाने सीतेचा त्याग केल्यावर लक्ष्मण आपण तुझ्या माहेरी जातोय असं सांगून वनात निघालेला असताना, "माझ्या माहेरच्या वाटेवर बोरीबाभळीची झाडं नाहीत, केळीची झाडं आहेत" असं लक्ष्मणाला सांगणारी सीता, सासूने रावणाचं चित्र काढून दाखव असं सांगितल्यावर 'डाव्या अंगुष्ठावाचून नाही देखिला रावण' असं म्हणणारी सीता या गोष्टी लक्षात राहिल्या. नेहमी ऐकलेल्या रामायणापेक्षा हे सारं काहीतरी वेगळं, नवीन होतं त्यातूनच मग लोकरामायणातील सीतेबद्दलचं कुतूहल वाढत गेलं. पण हे कुतूहल शमवायचं तर मग देगलूरकर वगैरे भारदस्त आडनाव असलेल्या, ठोकळेवजा ग्रंथ लिहिणाऱ्या अभ्यासकांपासून वाचनाची सुरुवात करायची हिंमत मात्र होत नव्हती आणि अशातच 'सीतायन' हे डॉ. तारा भवाळकरांचं साधं सोपं, सुटसुटीत पुस्तक हाती आलं. लोकरामायणातल्या सीतेबद्दल वाटणारं कुतूहल या पुस्तकाच्या निमित्ताने बरंचसं शमलं.रामायण माहीत नाही असा माणूस भारतात शोधूनदेखील सापडणार नाही. रामाची गोष्ट आपण सगळेच ऐकत असतो, वाचत असतो. रामायणातले वेगवेगळे प्रसंग, निरनिराळ्या घटना आपल्या समोर आलेल्या असतात पण त्या बऱ्याचशा अभिजात परंपरेतल्या. सोबतच कोणतं रामायण प्रमाण मानावं किंवा सीतात्याग, शंबुकवधासारख्या घटनांवरचे वादही असतातच. पण सीतेची गोष्ट आपण अभिजात रामायणाच्या चष्म्यातून पाहत असतो. संपूर्ण गोष्ट रामाभोवती केंद्रित झालेली असते. काळाबरोबर, प्रदेशाबरोबर या रामायणात छोटेमोठे बदल घडत असतात. रामकथेची वेगवेगळी रूपं आपल्यासमोर येत राहतात. यातीलच काही रूपं आहेत लोकपरंपरेतील. लोकमानसाने, लोकप्रतिभेने घडवलेलं रामायण. या रामायणात सामान्य लोकजीवन प्रतिबिंबित होत राहतं, लोकमानस समजून घेता येतं आणि म्हणूनच अभिजात परंपरेतील रामायणासोबतच लोकपरंपरेतील रामही जाणून घेणं महत्त्वाचं ठरतं. 'सीतायन' हे पुस्तक म्हणजे या लोकपरंपरेतील सीतेचा वेध घेण्याचा प्रयत्न आहे...सीता रामाची, अयोध्येची राणी. पण लोकपरंपरेतील गोष्टींमध्ये मात्र सीता सामान्य, निरक्षर कष्टकरी स्त्रियांच्यासुखदु:खांशी सहज जोडली जाते. या स्त्रिया आपल्या आयुष्याचा आधार घेत सीतेच्या आयुष्याकडे पाहूलागतात. आपल्या जीवनाशी ताडून पाहत या रामकथेचं मूल्यमापन करतात. अशावेळी मग त्यांच्यासाठी राम टिपिकल भारतीय नवरा होतो. कैकयी खाष्ट सासू होते. सासुरवास, सासू आणि नणंदांनी नवऱ्याचं कान भरणं, नवऱ्याने त्यावर विश्वास ठेवून बायकोला सोडून देणं किंवा पुढे मुलांनी आपल्या बापाच्या या वागण्याचा राग म्हणून त्याची ओळख नाकारणं, नवऱ्याने सोडून दिल्यावर आपल्या मुलांसाठी जगणं अशा ज्या गोष्टी सर्वसामान्य स्त्रीच्या आयुष्यात घडाव्यात तशाच या लोकपरंपरेतील सीतेच्या आयुष्यात घडताना दिसतात.या सगळ्याची वर्णनं ओव्या, गीतं, कथांच्या माध्यमातून लोकपरंपरेत येत राहतात. या स्त्रिया सीतेच्या आयुष्याशी स्वतःचं आयुष्य ताडून पाहतात, सीतेची दुःखं त्या स्वतःही सोसत असतात. या स्त्रिया रामाचं मोठेपण सांगतातच पण सीतेशी त्यांची विशेष जवळीक जाणवते.जणू सीतेची सुखदु:खं त्यांचीच असतात.सीतेवर समाजव्यवस्थेत झालेला अन्याय त्यांना अस्वस्थ करतो. या लोकपरंपरेतील रामकथांचीही कितीतरी निरनिराळी रूपं... प्रदेश आणि काळानुसार बदलणारी. 'सीतायन' मध्ये या वेगवेगळ्या रामकथांचा आणि त्यातील साम्य, फरक, वैशिष्ट्यं यांचा आढावा घेतला आहे. रामाविषयी लोकमानसात आदर असला तरी आपल्या पतिव्रता पत्नीचा त्याग करणाऱ्या रामाबद्दल लोकमानस निषेधही व्यक्त करतं. स्त्रीरचित ओव्या, कथांमधून सीतेविषयीचा कळवळा व्यक्त होतो. समाज आणि कुटुंबातही अन्याय सहन करणारी, दुःख सोसणारी सीता या सीतायनात सामान्य कष्टकरी भारतीय स्त्रियांचं प्रतिनिधित्व करते. स्त्रीमनाचा विद्रोह आणि वेदना या लोकसाहित्यात व्यक्त होत राहतं. सीतेच्या जागी मग आपल्यालाही एखादी कष्टकरी भारतीय स्त्री दिसू लागते. 'सीतायन'मध्ये अंकुश पुराण, चंद्रावती रामायण, चित्रपट रामायण, दशरथ जातक, आदिवासींचे सीतायन अशी लोकरामायणाची निरनिराळी रूपं लेखिकेने मांडली आहेत. त्यातील साम्यं, फरक सांगत असताना सीतेच्या अंगाने, स्त्रीवादी अंगाने केलेली ही मांडणी आहे.

इथे कोणतं रामायण प्रमाण वगैरेसारख्या वादात न पडता लोकसाहित्यातील सीतेचा शोध घेणं हा उद्देश आहे. सोप्या आणि ओघवत्या भाषेमुळे पुस्तकातला मजकूर आपल्यापर्यंत सहज पोहोचतो हेही लेखिकेच्या लेखनशैलीचं यशच.

**सारांश**

एकंदरीत, हे पुस्तक आपल्याला अपरिचित राहिलेलं रामकथांचं जग आपल्यासमोर मांडत जातं. अनेक सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ यामध्ये सापडतात. आपल्याला रामायण माहीत असतं पण ते एखाद्या अभिजात रूपातच. लोकपरंपरेतील रामाची, सीतेची रूपं बऱ्याचदा आपल्यासाठी नवीन असतात. 'सीतायन'च्या माध्यमातून आपल्याला रामकथेकडे पाहण्याचा नवा, वेगळा दृष्टिकोन सापडतो. लोकपरंपरेतील सीता आपल्याला हळूहळू सापडतेच पण त्याचसोबत रामायणही आपल्या मुळांशी किती रुजून राहिलंय याची जाणीव होते. लोकप्रतिभेची विलक्षण ताकद लक्षात येऊ लागते. लोकजीवन व्यक्त होईल असं काहीतरी ही लोकप्रतिभा निर्माण करते आणि आपसूकच मग रामायण, राम, सीता लोकमानसाशी, समाजाशी इथल्या सामाजिक सांस्कृतिक परंपराशी आणखी घट्ट जोडले जातात. रामायण ही केवळ श्रीरामाची आदर्श गोष्ट उरत नाही तर ती लोकांची, समाजाची त्यांच्या जीवनाशी जोडलेली गोष्ट होत जाते. रामकथेची लोकपरंपरेतील रूपं समजून घेण्यासाठी आणि रामायणाची लोकसाहित्यातील अंगं जाणून घेण्यासाठी हे पुस्तक महत्वाची भूमिका पार पाडते, हे नक्की !

**संदर्भ :**

१. सीतायन, डॉ तारा भवाळकर, मनोविकास प्रकाशन (ऑगस्ट २०२३).
२. माझिये जातीच्या (सामाजिक), डॉ तारा भवाळकर , मनोविकास प्रकाशन.
३. आकलन आणि आस्वाद (साहित्यिक), डॉ तारा भवाळकर, पद्मगंधा प्रकाशन
४. संस्कृतीची शोधयात्रा, डॉ तारा भवाळकर, पद्मगंधा प्रकाशन.
५. प्रतिभासंवाद, डॉ रा.ची. ढेरे, डॉ तारा भवाळकर आणि अधिक....,मनोविकास प्रकाशन.
६. पी.सावंत संदर्भ ग्रंथ, शब्दशिवार प्रकाशन.

# आदिवासी कवितांमधील सामाजिक समस्यांचे चित्रण

**श्री.रघुनाथ चंदर गवळी**
सहा.प्राध्यापक मराठी आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
नागठाणे ता. जि. सातारा

**प्रस्तावना –**

आदिवासी जमातींचे वास्तव्य हे प्राचीन काळापासून जंगल, डोंगर, दऱ्या-खोऱ्यात असलेले दिसून येते. त्यांना त्यांच्या जीवन जाणिवांचे आकलन व्हायला बराचसा कालखंड लोटला गेला. त्यांच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता २१ व्या शतकातही पूर्ण होताना दिसत नाही. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आरोग्य आणि आर्थिक अशा अनेक समस्यांनी हा समाज अजूनही ग्रासलेला आहे. आदिवासी जमाती या पिढ्यानपिढ्या मुख्य प्रवाहापासून वंचित असून स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी शिक्षणाची पुसटशी वाट गवसली आहे. या वाटेवरून मार्गाक्रमण व जगण्याचा संघर्ष करत असताना अनेक प्रकारच्या समस्यांची जाणीव झाली. यामधून बोध घेऊन अनेक साहित्यिकांनी लेखणीच्या सहायाने या समस्यांना आदिवासी कथा, कविता, कादंबरी, नाटक आणि आत्मचरित्र इत्यादी साहित्य प्रकाराच्या माध्यमातून वाचा फोडण्याचे काम केले. या साहित्यातील आदिवासी कविता ही या साहित्याचा आरंभ आहे. आदिवासींचा पहिला कवितासंग्रह १९८२ साली जरी प्रकाश झाला असला तरी खऱ्या अर्थाने १९९० ते २०२० पर्यंतच्या दशकामध्ये आदिवासी कवितेने विविध विषय घेऊन जोमाने वाटचाल केलेली आहे. यामधूनच अनेक आदिवासी काव्यसंग्रहांची निर्मिती झाली असून ती अतिशय सकस आणि कसदार अशी आहे. आदिवासी कविता लेखनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे वास्तवस्पर्शी लेखन हे असून या लेखनामध्ये कल्पकता आणि मनोरंजनाला फारसे स्थान असलेले दिसत नाही.

महाराष्ट्रातील आदिवासींचा पहिला कवितासंग्रह भुजंग मेश्राम आणि प्रभू राजा गडकर यांचा 'मोहोळ' (१९८२), भुजंग मेश्राम यांचा उलगुलान (१९९५), वाहरु सोनवणे 'गोधड' (१९८७), डॉ. विनायक तुमराम 'गोंडवन पेटले आहे' (१९८७), माधव सरकुंडे 'मनोगत' (१९९७), पुरुषोत्तम शेळमाके 'वणसुर्य' (१९९१), चामुलाल राठवा 'माझी सनद कुठे आहे?' (२००४), उषाकिरण आत्राम 'म्होरकी' (१९९७), कुसुम आलाम 'रानआसवांचे तळे' (१९९७), सुनिल कुमरे 'तिरकमठा' (१९९९), रा.चि.जंगले 'पाऊसपाणी' (२०१०), तुकाराम धांडे 'वळीव' (२०१०), संजय लोहकरे 'आदिवासींच्या लिलावाचा प्रजासत्ताक देश' (२०१५ ), देवदत्त चौधरी 'झडप' (२०१६), मधुचंद्र भुसारे 'आदोर' (२०१५), आणि 'तांडा' (२०१६) आशा अनेक काव्यसंग्रहाच्या माध्यमातून आदिवासी कवींनी सांस्कृतिक, ऐतिहासिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक समस्यांबरोबरच ज्या काही सामाजिक समस्या त्यांनी पाहिल्या, अनुभवल्या आणि सोसल्या त्या सामाजिक समस्यांचा आदिवासी कवितेमधून सहजपणे उलगडा झालेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे-**

१.आदिवासी कवितांमधून आदिवासी समाजाच्या समस्यांचा शोध घेऊन त्यांचा अभ्यास करणे.
२.आदिवासी समाज आणि इतर समाजामधील समस्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
३.२१ व्या शतकातील आदिवासी समाजाच्या सद्यःस्थितीवर प्रकाश टाकणे.
४. मराठी कवितेच्या तुलनेत आदिवासी कवितेचे वेगळेपण स्पष्ट करणे.
५.जागतिकीकरणांमध्ये आदिवासी कवितेचे स्थान शोधून तिला महत्त्व प्राप्त करून देणे.

**अभ्यास विषय निवड-**

आदिवासी साहित्यामधील कविता या साहित्य प्रकाराचा ८०-९० च्या दशकामध्ये उदय झालेला असून आदिवासी कवितेचा सामाजिक दृष्टीकोनातून फारसा संशोधन अभ्यास झालेला नाही. त्यामुळे आदिवासी कवितांमधील सामाजिक समस्यांचा शोध घेऊन संशोधन अभ्यास करणे गरजेचे वाटते. २१ व्या शतकातही आदिवासी समाजाला अनेक समस्यांनी ग्रासले असून त्या समस्यांचे निराकरण झाल्याशिवाय आदिवासी समाज विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये येणे शक्य नाही. त्यामुळे आदिवासी कवींनी आपल्या कवितांच्या माध्यमातून ज्या काही वास्तवस्पर्शी समस्यांचे चित्रण केलेले आहे. त्या समस्यांचा शोध घेऊन आदिवासी समाजाला त्या समस्यांची जाणीव करून देणे गरजेचे वाटते म्हणूनच 'आदिवासी कवितांमधील सामाजिक समस्यांचे चित्रण' हा अभ्यास विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधन पद्धती –**

'आदिवासी कवितांमधील सामाजिक समस्यांचे चित्रण' शोधनिबंध लेखनासाठी सामाजिक, अशयनिष्ठ व वर्णनपर संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात आलेला आहे.

कवी डॉ.गोविंद गारे आपल्या कवितेमध्ये 'ती माणसंच होती' या कवितेतून समाजाला माणूसपणाची ओळख करून देताना म्हणतात...

"कळपाकळपाणे चाललेली
काड्या - कुड्या शरीराची, तेलकट काळ्या रंगाची
नागडी, उघडी, बोडकी,
करपलेल्या मुक्या चेहऱ्याची,
पोट खपाटीला गेलेली,
कवटीत डोकं अडकलेली,
डोक्यावर मडकी-गाडगी,
अंगा खांद्यावर चिल्ली, पिल्ली
धडपडत जगायला निघालेली
ती माणस होती..." पृ.क्र.१९

स्वातंत्र्योत्तर काळातही आदिवासींच्या अन्न, वस्त्र आणि निवारा गरजा पूर्ण होतांना दिसत नाही. प्राचीन काळापासून जंगल, डोंगर, दऱ्या-खोऱ्यात राहणारा हा समाज जीवनाविषयी व जगण्याविषयी कुठल्याही प्रकारे तक्रार न करता आहे परिस्थिती मध्ये समाधान मानून जीवनाची वाटचाल करत आहे. मात्र २१ व्या शतकातही पोटाची खळगी भरण्यासाठी जगण्याचा संघर्ष करणाऱ्या या माणसांना 'ही पण माणसंच आहेत'. अशी कवी जगाला ओळख करून देतो ही खूप मोठी शोकांतिका आहे.

कवी वाहरू सोनवणे जगण्याचे द्वंद्व 'गोधड' या काव्यसंग्रहातील 'गोधड' कवितेमध्ये सहजपणे चित्रित करतात.

"माझी फाटकी गोधडी मळलेली,
गोधडीतल्या गोधडीत गुदमरत राहिलो,
खालीवर करून कुशी बदलत राहिलो,
गोदडीत नाक खूपसून आंबट वास सोसत राहिलो,
याच गोधडीत पूर्वज विझत गेले..." पृ.क्र.७

कवीच्या वाटेला आलेले जगणं आणि त्या जगण्याचा उद्रेक पूर्ण ताकदीनिशी होतांना दिसतो. पिढ्यानपिढ्या गरिबी, दु:ख, दैन्य आणि दारिद्य या समस्यांचे संचित कवीच्या व वारसदारांच्याही वाट्याला येते. 'गोधड' या कवितेतील दु:ख हे फक्त कवी पुरते मर्यादित नाही तर ते समग्र आदिवासी समाजाचे दु:ख आहे. म्हणूनच ही कविता समग्र आदिवासी समाजाची व त्यांच्या समस्यांचे प्रतिनिधित्व करणारी कविता आहे.

२१ व्या शतकातही आदिवासींना त्यांचे न्याय व हक्क मिळत नाही. कवी हिरामण पाडवी आपल्या 'आदीम' काव्यसंग्रहातील वास्तव कवितेमध्ये शोषित सत्ताधाऱ्यांना व समाजव्यवस्थेला प्रश्न विचारतात.

"शोषक सत्ताधाऱ्यांनी,
कागदावरच तिजोरी लुटावी,
गरिबांची पोर उघडी-नागडी झोपावी,
तर मग या लोकशाहीत,
असल्या जीवांचे हक्क,
स्वातंत्र्य, समता, बंधुता,
कागदावरच जळून
खाक होत नसतील का?" पृ.क्र.९

कवी हिरामण पाडवी यांची कविता समाज व्यवस्थेमधील विषमतेविरुद्ध लढताना दिसते. लोकशाही ही फक्त कागदावरच असून शोषण करणारी व्यवस्था आदिवासींचे न्याय, हक्क व स्वातंत्र्य हिरावून घेते. आजही हा समाज अनेक सोयी-सुविधांपासून वंचित आहे. ज्या काही आदिवासींच्या नावे असलेल्या विविध प्रकारच्या योजना व सोयी सुविधा सत्ताधारी व शोषणकर्ते कागदावरूनच गायब करतात. तसेच सांविधानिक अधिकारही कागदावरच राहतात. या समस्येचे उत्तर व मार्ग म्हणून कवी आपल्या लेखणीच्या माध्यमातून व्यक्त होतात.

आदिवासी साहित्याचे गाढे अभ्यासक कवी संजय लोहकरे यांनी 'आदिवासींच्या लिलावाचा प्रजासत्ताक देश' या काव्य संग्रहातील कवितेमध्ये आदिवासींच्या जगण्याचा संघर्ष चित्रित केलेला आहे. ते आपल्या कवितेमध्ये म्हणतात....

"मी म्हणलं अरे बा, आज प्रजासत्ताक दिन,
बेल्ह्याचा बाजार सुदीक बंद आसन,
तेव्हा बानं गावदेवाला हात जोडलं,
अन तोंडातल्या तोंडात पुटपुटला,
बेल्हयाचा बाजार बंद असलत असू दे...
पण नाराणगावचा माणसांचा बाजार मातर तेजीत चालू दे...
मी म्हणलं, अरं बा झेंडावंदन झाल्यावं जाऊ...
पण बा नं आम्हाली पहाटीच तंगाडला..." पृ.क्र.६३

स्वातंत्र्याच्या साठ-सत्तर वर्षानंतरही प्रजासत्ताक दिनी आदिवासी मजुरांचा अनेक ठिकाणी लिलाव होतांना दिसतो. लोकशाहीच्या प्रजासत्ताक देशामध्ये या देशांमधील लोकप्रतिनिधीची हुकूमशाही व मुर्दाडपणा आदिवासी समाजाच्या विकासामधील खूप मोठी समस्या आहे. आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्या ऐवजी त्यांचे हक्क आणि अधिकार हिरावून घेतलेले आहेत. त्यांच्या जगण्याच्या हक्कावरतीच गदा आणलेली आहे. परिणामी उदरनिर्वाहासाठी आदिवासींना शहरांकडे स्थलांतर करावे लागते. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीच आदिवासी मजुरांचा लिलाव करून शोषण केले जाते ही समस्या कवीला प्रखरपणे भेडसावते. आदिवासींची संस्कृती ही जगाच्या पाठीवर आगळी-वेगळी संस्कृती आहे. परंतु जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये बाह्य संस्कृतीच्या अक्रमणामुळे आदिवासी संस्कृतीचे विकृतीकरण केले जात आहे.

कवी संजय लोहकरे आदिवासी 'स्वातंत्र्याचा जाहीरनामा' या कवितासंग्रहातील प्रदीर्घ कवितेमध्ये देशाच्या व्यवस्थेबद्दल म्हणतात...

"तुमच्या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर
नष्ट केल्या आमच्या बोली पहिल्यांदा
हळूहळू संस्कृती समाजजीवन
आणि आम्हालाही..." पृ.क्र-६०

स्वातंत्र्योत्तर कालखंडातही विकासाच्या नावाखाली जी काही सामाजिक आणि सांस्कृतिक आक्रमणे झाली. आदिवासींच्या बोली-भाषा रुढी, प्रथा आणि परंपरा जगाच्या पाठीवरून नष्ट होत चाललेल्या दिसून येतात. त्यामुळे आदिवासींची दैदिप्यमान अशी संस्कृती लोप पावत आहे. भाषा आणि संस्कृतीचा ऱ्हास ही खूप मोठी समस्या आदिवासी समाजापुढे आ वासून उभी आहे. कारण जेव्हा भाषा लोप पावते तेव्हा त्या भाषेबरोबर संस्कृतीचाही ऱ्हास होत असतो.

आदिवासी हा या देशाचा मूळ मालक असून त्यांनाच या देशामध्ये उपरेपणाची वागणूक दिली जाते आणि त्यांनाच त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवले जाते. कवी हिरामण पाडवी 'आदिम विद्रोह' काव्यसंग्रहातील 'फक्त फसवणूक' या कवितेमध्ये विद्रोहाची भाषा करतात.

"घुसखोरी फसवेगिरीने,
जल, जंगल, जमीन आमुची बळकावली
अन जंगली वनवासी संबोधून,
बदनामी आमचीच केली..." पृ.क्र.२९

आदिवासींच्या जगण्याचे साधन म्हणजे जल, जंगल आणि जमीन ही साधने प्रस्थापित व्यवस्था बळकावते. त्यामुळे मूळ रहिवासी असूनही आदिवासींचे वनवासीकरण करून विटंबना किंवा बदनामी केली जाते. आदिवासींना उध्वस्त करण्यासाठी अनेक प्रकारची षडयंत्र रचली जातात. आदिवासींच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन अनेकांनी त्यांच्या साधनसंपत्तीवर कब्जा मिळवलेला आहे व त्यांची बदनामी करून देशोधडीला लावले आहे.

आदिवासींचे जीवन हे व्यथा आणि वेदनांनी ओथंबून वाहत आहे. खऱ्या अर्थाने 'जावे त्यांच्या वंशा तेव्हा कळे' या तुकारामांच्या उक्तीचा बोध कवी मधुचंद्र भुसारे यांच्या 'तांडा' काव्यसंग्रहातील 'आदिवासी बनवून बघ' या कवितेमध्ये दिसून येतो ते म्हणतात.

"कविता कथा कादंबऱ्या शोधनिबंध
लिहायचे असतील आमच्यावर

तर...तर आमच्या अंतरातील कळ अनुभवण्यासाठी...
एक तरी दिवस
फाटक्या झोपडीत येऊन
आमची जात उसनी घेऊन बघा
अन एक दिवस आदिवासी बनुन बघा..." पृ.क्र.५५

कवीने आपल्या कवितेच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या व्यथा, वेदना आणि समस्या जाणून घ्यायच्या असतील तर त्यांच्यावर लिहून किंवा संशोधन करून काही उपयोग नाही त्यांचे हे दु:ख, व्यथा, वेदना आणि समस्या समजण्यासाठी कवी प्रस्थापितांना आदिवासी बनून आदिवासींचे जीवन जगण्याचे आव्हान करतो...

आदिवासी साहित्यामध्ये कविता या प्रकाराची आरंभीची निर्मिती असून आदिवासी कवितासंग्रहांचा अभ्यास करताना कवीने आपल्या कवितेच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या अनेक समस्या उलगडल्या आहेत. मराठी साहित्यातील कवी प्रमाणे आदिवासी कवीनेही जे काही पाहिलं, अनुभवलं आणि सोसलं ते सुख-दु:ख व्यथा,वेदना, समस्या व गौरवशाली संस्कृतीचा ऱ्हास आपल्या कवितेतून मांडलेला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळूनही आदिवासींना स्वातंत्र्य भोगण्याची स्वातंत्र्य मिळाले नाही. त्यांच्या अन्न, वस्त्र आणि निवारा त्यांच्या मूलभूत गरजा या जल, जंगल आणि जमिनीवरच अवलंबून असून ही जगण्याची साधनेच प्रस्थापित व्यवस्थेने बळकावली आहेत. ही खूप मोठी समस्या बनली आहे. आदिवासींना दारिद्य, उपासमार, अन्याय, अत्याचार, शोषण, भ्रष्टाचार, घुसखोरी, वनवासीकरण, संस्कृतीचे विकृतीकरण तसेच आदिवासींना घटनेने दिलेली अधिकार व लोकशाहीतील मुल्यांची पायमल्ली अशा अनेक प्रकारच्या सामाजिक समस्यांच्या चक्रानी आदिवासींच्या दैनंदिन जगण्याला वेढलेले आहे. समस्यांचे हे चक्र भेदण्यासाठी व वाचा फोडण्यासाठी अनेक आदिवासी कवींनी लेखणी हे शस्त्र हातात घेऊन प्रस्थापितांवर प्रहार केलेला आहे. जागतिकीकरणाच्या नावाखाली आदिवासींचे सामाजिक आणि सांस्कृतिक शोषण ही आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासामध्ये सर्वात मोठी समस्या आहे. या सर्व समस्या एकट्या कवीच्या नसून समग्र अदिवासी समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. या समग्र आदिवासी साहित्य चळवळीचा निश्चितच सकारात्मक परिणाम होऊन आदिवासी समाज विकासाच्या प्रवाहामध्ये येईल हा आशावाद आदिवासी कवींना वाटतो.

**निष्कर्ष -**

१.आदिवासी साहित्यामधील कविता हा साहित्य प्रकार व साहित्यिकांची ओळख होण्यास मदत होते.
२.आदिवासी कविता आणि मराठी कविता मधील वेगळेपण जाणवते.
३.आदिवासी समाज जीवनाची व सामाजिक समस्यांची ओळख होते.
४.आदिवासी कवितांमधून आदिवासींच्या विविध समस्यांचा उलगडा होतो.
५.२१ व्या शतकातील आदिवासी समाजाची सद्यस्थिती लक्षात येते.
६.आदिवासी कवितांमधून आदिवासी समाजाच्या रिती-रिवाज, प्रथा-परंपरा व संस्कृतीचा अभ्यास करता येतो.
७.आदिवासी समाजाचे जगाच्या पाठीवरील सामाजिक दृष्ट्या असलेले स्थान लक्षात येते.

**संदर्भ ग्रंथ -**

१.डॉ. रोंगटे तुकाराम बी.-उष:काल आणि सद्यस्थिती, संस्कृती प्रकाशन, पुणे-३०. पृ.क्र.१९
२.सोनवणे वाहरू - गोधड, सुगाव प्रकाशन, पुणे. पृ.क्र.७
३.डॉ.लोहकरे संजय- कवी आणि कविता, मेधा पब्लिशिंग हाऊस,अमरावती, २०१४. पृ.क्र.९
४.डॉ.लोहकरे संजय- आदिवासींच्या लिलावाचा प्रजासत्ताक देश, दिलीप राज प्रकाशन, पुणे. पृ.क्र.६३
५.डॉ.लोहकरे- संजय- आदिवासी स्वातंत्र्याचा जाहीरनामा, मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती. पृ.क्र-६०
६.पाडवी हिरामण - आदीम विद्रोह अक्षता प्रकाशन, पुणे. पृ.क्र.२९
७.भुसारे मधुचंद्र- तांडा, मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती. पृ.क्र.५५

# एकविसाव्या शतकातील शिक्षणव्यवस्थेचे वेगळे रूप दाखीवणारी कादंबरी म्हणजे निशाणी डावा अंगठा

**प्रा.डॉ.देसाई अजित यल्लाप्पा**
राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध
ता. खटाव जि. सातारा

कांदबरी हा साहित्यप्रकार दिर्घ कथनपर गदय अशा स्वरूपाचा असून तो जीवन समांतरता अपेक्षितो. कादबरी म्हणजे माणसाची गोष्ट ठरविल्याने गोष्टीतील माणसे व त्याच्या उक्ती कृती यांचा आषयात्मक वेध घेण्याकडे आपला कल असतो. निशाणी डावा अंगठा हि कादंबरी याला अपवाद नाही. लेखकाने आपल्या अवतीभोवती घडणाऱ्या घटनेची याठिकाणी मांडणी केली असली तरी ही काल्पनीक वाटत नाही. ही कादंबरी फेब्रुवारी 2005 रोजी प्रकाशित झाली असली तरी यातील विषय हा युगानुयुगे चालत आसल्यासारखा वाटतो. या कादंबरीने लोकप्रियतेबरोबरच अनेक पुरस्कारसुध्दा मिळविले. प्रसिध्द मराठी चित्रपट निर्माते दिग्दर्शक पुरूषोत्तम बेर्डे यांनी या कादंबरीवर मराठी चित्रपटाची निर्मिती केली आहे. या कादंबरीचे लेखक रमेश इंगळे उत्रादकर हे गेली वीस वर्षे जिल्हा परीषदेच्या शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करीत आहेत. आपल्या अनुभवातून त्यांनी लेखनासाठी बरीच सामग्री जमवली आहे. वस्तुत: लेखकाचे कौटुबीक जीवन आणि त्याची साहित्यकृती श्याच्या नात्याचा काटेकोरपणे शोध घेवू नये असे म्हणतात. तरीसुध्दा लेखकाच्या लौकीक जीवनाचा साहित्यकृ◌ृतीशी असलेला संबध याचा शोध घेण्याचा प्रयत्न कारावा लागतो. या कादंबरीच्या विषयाशी साधर्म्य आसणारे प्रसंग लेखकाच्या जीवनात आलेले दिसतात त्यामुळे ही कादंबरी जरी काल्पनिक असली तरी फारशी काल्पनिक वाटत नाही. आपल्याना आलेल्या अनुभवाकडे लेखक तटस्थपणे व मिस्किल स्वरूपाने पाहतो. यामुळे ही कादंबरी विनोदी स्वरूपाची झाली आहे. जिवनातील बऱ्याच क्षेत्रात भ्रष्टाचार, दांभिकता, फसवणूक याचे प्रमाण वाढले आहे आता याला शिक्षणक्षेत्रही अपवाद राहीले नाही. आजवरच्या मराठीतील काही कादं◌ंबरीत विभीन्न क्षेत्रातील विदारक आणि कारूण्यपूर्ण जीवनाचा प्रत्यय ये◌ेतो. लेखकांनी या कादंबरीत शिक्षणक्षेत्रातील बेडगीपणा आणि अनिष्ठ प्रवृत्तीवर भाष्य न करता विनोद उपहासाच्या आधारे कादंबरीचा आषय अर्थपूर्ण केला आहे.

निशाणी डावा अंगठा ही रमेश इंगळे उत्रादकर यांची कांदबरी म्हणजे स्वातंत्र्यांची पंच्याहत्तर वर्षे उलटून गेल्यावरही जगातील सर्वात मोठा निरक्षर देश म्हणून विख्यात असलेल्या आपल्या भारत देशातील प्रौढसाक्षरता अभियानाचा जिल्हास्तरीय शोकांतीकेचा फार्स आहे. विशेषत: प्राथमिक शिक्षणाची आपण अक्षम्य जी हेळसांड केलेली आहे तिचे अत्यंत विदारक वास्तव या कांदबरीने आपल्यासमोर मांडले आहे. ज्या प्रौढ निरक्षरांना साक्षर करण्यासाठी अभियानाचा जो घाट घतला जातो ते अगणित भारतीय नागरीक स्वातंष्योत्तर काळात जन्माला आले असले तरी आपल्या सदोश शिक्षणप्रणालीमुंळे वयाची पन्नाशी ओलांडतानाही डाव्या हाताच्या अंगठयाचा उपयोग स्वाक्षरीला पर्याय म्हणून करताना दिसतात. वरवर पाहता ही कादंबरी सामान्य पे्रक्षकांना विनोदी स्वरूपाची वाटू शकेल पण दोन घटका मनोरंजन करावे व विसरून जावे एवढी सामान्य आषायाची ही कथावस्तू वा हा अनुभव निश्चित नाही. ग्रामपातळीवरील जिल्हापरिषदेसारख्या शैक्षणिक व्यवस्थेत नोकरी करीत असल्यामुळे या क्षेत्रातील अनुभव घेत तो पचवित लेखकाने आपल्या ढंगात मांडलेला आहे. यातील भाषा, शिव्या, ग्रामीण रीतीभाती, माणसांचे वर्तन, त्यांच्या वर्तनातील विसंगती, इरसालपणा, बेरकीपणा, उडाणटप्पूपणा या सगळयाबरोबरच जो अस्सलपणा जाणवतो तो निश्चितच मानावा असा आहे.

## कादंबरीचे कथानक

भिलढाणा जिल्हयातील मुंगळा गावची ही गोष्ट आहे. मुंगळा, भिलढाणा, भेंडवळ या परिसरातील सामान्य माणसे, शिक्षक, शिक्षण खात्यातील कारकून, अधिकारी, सी ई ओ, सी ओ बीडीओ, तहसीलदार डेप्यटी कलेक्टर, कलेक्टर, ग्रामव्यवस्थेतील ग्रामपंचायतीचा सदस्य, सरपंच ग्रामसेवक, पंचायतसमीतीचा सभापती ही सगळीच माणसं या साक्षरता अभियानाशी प्रत्यक्षपणे बांधली गेल्याली. या साक्षरता अभियानाकडे गावकऱ्यांचा व प्रौढ शिक्षणअधिकाऱ्याचा, कार्यकत्यार्ंचा पाहण्याचा दृष्टीकोण वेगवेगळा आहे. अधिकाऱ्यांना व कार्यकर्त्याना हे अभियान शंभर टक्के यशस्वी करून दाखवायचं आहे. तर या अभियानाशी गावकऱ्यांचा कुठलाही संबघ नाही. हे अभियान राबवलं गेल काय किंवा नाही राबवलं गे◌ेलं तर काही फरक पडणार नाही. त्यांच्या दैनंदिन जीवनावर याचा काही परीणाम होणार नसतो. पण मधल्यामधे जिल्हा परीषदेमध्ये राबणारा शिक्षक अडकित्यातल्या सुपारीसारखा अडकला जातो. गावकऱ्यांना सांभाळणं व आपल्या वरीष्ठांना सांभाळणं या आशा दुविधेत तो हेलपाटे खात राहतो. परिणामी हे साक्षरता अभियान यशस्वी होण्यासाठी शक्कल, युक्त्या शोधून काढतात. आणि

साक्षरता अभियान कसं अलबेल आहे, विनासंकट विनासायास सुरू आहे ते मोठया हिकमतीने दाखवून देतात. हे दाखविताना शिक्षक ज्या करामती, हिकमती करतात त्यातून ही कादंबरी उभी राहते. या कादंबरीमध्ये साक्षरता अभियान हा विषय आहे. अभियानाच्या पूर्वतयारीपासून ते त्याच्या बाहय आणि अंतर्गत मूल्यमापणापर्यंतच्या तयारीचा कालावधी यात आहे. तसे पाहील तर हा कालावधी लहाण आहे ज्या अवकाशात तो वाहत राहतो तो अवकाशही लहाण आहे. जिल्यात साक्षरता अभियान सुरू करण्यासाठी प्रत्येक केंद्रातून पूर्णवेळ कार्य करणाऱ्या शिक्षकांची गरज असते रंगनाथ भास्कर डुकरे या शिक्षकाची त्यासाठी निवड होते खरं म्हणजे त्यांना शाळेच्या ईमारतीचा आणि घडयाळाशी नैतिक संबध ठेवणाऱ्या त्या घंटीचा वैताग आला आहे.त्यातून त्याना मुक्त व्हायचं आहे हे म्हणजे निष्ठा नसताना निष्ठा असल्यासारखं दाखवणं. पण याचा अर्थ डुकरे हा या कादंबरीचा नायक नाही. कोणत्याही एका पात्राभोवती ही कादंबरी फिरत नाही. तर सबंध अभियानाभोवती आहे. शासनाचा उदात्त हेतू आणि त्या अभियानाकडे पाहण्याचा, त्या अभियानाला प्रतिसाद देण्याची सर्वसामान्य नागरीकांची, अशिक्षितांची प्रवृत्ती यात फार गमतीने पहावयास मिळते. कादबरीची खरी ताकद व्यक्त होत ते त्याच्या निवेदनाच्या माध्यमातून. लेखकाने या कादंबरीत वापरलेली भाषाशैली रूढ कादंबरीतील भाषाशैलीपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. या भाषेत जसे अनुभवाला भिडण्याचे सामर्थ्य आहे तसेच त्यातील अनुभवाचा प्रत्येक पदर सुटा करून त्या अनुभवाकडे मिश्कीलपणे, छदमीपणे, तिरकसपणे, खेळकरपणे, अल्लडपणे बेरकीपणे पाहण्याची ताकद या भाषेत आहे. या साक्षरता अभियानामध्ये ज्यांनी खारीचा वाटा उचलला त्यांची ही कादंबरी आहे.

या कादंबरीत कुणाही एका व्याक्तिच्या परीपोषाला वाव नाही. अधिक भर समूहचित्रणावर आहे. पण बद्रुदिन काझाी, भाऊ राठोड, सुरेश भगवान म्हणजे जावई, प्रतापराव जुबड, रंगनाथ डुकरे यांच्या स्वभावातील बारकावे दिर्घकाळ लक्षात रहातील असे लेखकांने त्यांचे व्यातीचित्र रेखाटले आहे. बद्रुदिन काझींना पाच मुले व पाच मुली असा त्यांचा परीवार आहे तरीही ते फॅमीली प्लॅनिंगच्या मिटीगमध्ये ऑपरेशन करून घेण्यासाठी दुसऱ्यावर दडपण आणतात. भाऊ राठोड हे शासकीय यंत्रणेत तयार झालेले कष्टाळू, काहीसे चतूर, हिकमती, गोष्टीवेल्हाळ व अश्लिल बोलण्याची चटक लागलेले अनुभवी शिक्षक आहेत अशा अनेक अनुभवी पात्राामधून ही कथा आकारास येते.

प्रौढ साक्षरता अभियान ग्रामीन पातळीवर राबविणे ते राबविताना येणाऱ्या अडचणींना तोड देत पुढे जाणे, त्या योजनेचा फज्जा उडणे आणि अंतिमत: निरक्षर आपल्याच ठिकाणी राहणे त्यांच्यात तसूभरही फरक न पडणे हे चित्रच मुळात एखादया कल्पक कलावंतास आव्हानात्मक असं आहे या किंवा अशा विषयावर एखादा कादंबरीकार गंभीर प्रवृत्तीची कादंबरी लिहण्याचा विचार कधी करू शकनार नाही, विसंगती, उपहास, अतिशोक्ती अन्योक्ती इ. घटकांच्या माध्यमातून कथाविषय हाताळत शेवटी कारुण्यालाही हास्यकारक रंग फासण्याचे कसब ज्या कलावंतामध्ये असेल तोच कलावंत या कथाविषयाला हात घालू शकतो.

या कादंबरीमध्ये विशेषत्वाने जाणवणारी गोष्ट म्हणजे या शिक्षकांच्या गप्पाकेद्राभोवती सतत आसणाऱ्या स्त्रियांच्या गोष्टी, विषयाचा वावर. पुरूषांच्या अध्यात्मिक बोलण्यातून त्यांच्या एकंदर जगण्याविषयाी, धारणासंबधी, असणाऱ्या अनाकलनीय विश्वाचं सुप्त चिंतन यांचचं सतत हया सहकार्यामध्ये चर्वण होत आसतं. या कादंबरीतील स्त्रियांचं जगणं अनेक भूमिकांना ओलांडून सरकताना दिसतं. घर, मूल, नवरा, लोकांच्या नजरा, शाळा, गाव ही सर्कस सांभाळताना जीवनामध्ये अग्रक्रम कोणत्या गोष्टींना दयायचा ही कोडी त्यांना आयुष्यभर सुटत नाही. प्राथमिक शिक्षकांना सरकारी योजना उदा. जणगणना, कुटुंब नियोजन, मतदार नोंदणी, साक्षरता अभियान, अशा अनेक कामांना जुपले जाते. हया सरकारी कामात कसूर केल्यास कारवाईचा बडगा तयार आसतो. म्हणून शिक्षक ही जमात शिकविण्याचे काम करण्यापेक्षा हयाच दुय्यम कामाच्या ओझ्याखाली दबलेली असते. एकून मनाविरूध्द कराव्या लागणाऱ्या कामामुळे शिक्षकांची सामाजिक, आर्थीक, शैक्षिणीक, कौटुंबीक अशा सर्वच पातळयावर ओढाताण होते. प्राथमिक शिक्षकांच्या वाटयाला आलेले हे जीवघेणे अनुभव त्यांचे आयुष्य कुरतुडून टाकतात. अनुभवाचे हे केंद्रच या कादंबरीचे आशयसूत्र आहे.

लेखकावर कोसलाकार नेमाडे आणि श्याम मनोहर यांच्या भाषिक वापराच्या शैलीचा गडद प्रभाव जाणवत असला तरी या लेखकाने अनुकरणात्मक शैलीपेक्षा प्रभाव आतल्या आत जिरवून आपली स्वत:ची स्वतंत्र आसलेली खास शैली या कादबरीतून निर्माण केली आहे. अनेकदा लेखक स्वत:च्याच शैलीत अडकून पडल्याचे जाणवते. तरीपण एखादया व्यक्तिचे, घटनेचे, मूल्यांचे स्थूलतिसूक्ष्म वर्णन करताना लेखक जेव्हा त्याला सार्वत्रीक रूप देतो तेव्हा कादंबरीच्या रूपबंधाचे हे खास असे वैशिष्ट्य तो निर्माण करीत असतो. केवळ प्रतिभावान लेखकालाच असे सार्वत्रीकरण प्रभावीपणे मांडणे शक्य होते. या कादंबरीच्या रूपबंधाचे खास वैशिष्टय असे की लेखक एकूनच कथाभागाला, व्यक्तिदर्शनाला, घटनाप्रसंगाला आणि ईतरही सर्व रूपबंधाच्या अवकाशांना , जागांना कमालीच्या नाटयमयतेने एका विशाल नाटकाच्या, तमाशाच्या रूपात सादर करतो.

या कादंबरीचा झालेला गौरवसुध्दा पाहण्यासारखा आहे. महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्:मय निर्मितीचा कादंबरीसाठीचा वि. स. खांडेकर राज्य पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशन साहित्य पुरस्कार, सहकारमहर्षी शंकरराव मोहीते पाटील

साहित्य पुरस्कार, असे पुरस्कार मिळालेच त्याशिवाय मुंबई विद्यापीठाच्या बी. ए. भाग दोन त्या वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी या कादंबरीचा समावेश करण्यात आला आहे. अशा प्रकारचे अनेक गौरव या साहित्यकृतीस प्राप्त झाले आहेत.

**निष्कर्ष**

एकूणच शिक्षणक्षेत्राशी निगडीत आसलेल्या सर्वच घटकामध्ये अप्रामाणीकपणाचा संचार झाल्याचे आणि त्याला जबाबादार आसलेल्या विविध घटकांंचे वास्तव लेखकांने प्रत्यंयकारी शैलीने मांडलेले आहे. आजच्या शिक्षणव्यवस्थेवर क्ष किरणे टाकून लेखकांचे जी शल्यचिकित्सा केली आहे. ती समाजाच्या दूर्धर अशा रोगावर उपचार ठरली आहे. अशा साहित्यकृतीकडे केवळ वाचन रंजन म्हणून न पाहता समाजाच्या शरीराला उपचार म्हणून पाहता आले पाहीजे. साहित्यातून सामाजिक क्रांती होत असते. आणि क्रांती करण्याची क्षमातही साहित्यात आसते. हे तत्व जर मान्य केले तर या साहित्यकृृतीकडे सर्वांनी सकारात्मकदृष्टीने पाहीले पाहीजे.

**संदर्भ -**

1. उत्रादकर रमेश इंगळे, (2009) निशाणी डावा अंगठा, ग्रंथाली प्रकाशन.
2. पगार एकनाथ, (2008) निशाणी डावा अंगठा, आकलन आणि समिक्षा, निरीक्षराचंअक्षरलेणे, रविंद्र इंगळे, चावरेकर शब्दालय प्रकाशन, प्रथमावृत्ती,
3. कोठारे आदित्य, (ऑगष्ट 2013) ‘‘चहूबाजूने बदल होत आहे,’’ साप्ताहिक प्रिमीयर, संपाश्रीराम जयसिंगराव पवार .,, सकाळ पेपर प्रालिमिटेड .,

# २१ व्या शतकातील मराठी ख्रिस्ती कथेतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**प्रा. अविनाश भोरे,**
प्रमुख, मराठी विभाग,
मिरज महाविद्यालय, मिरज

**प्रस्तावना:-**

स्वातंत्र्यपूर्व ते स्वातंत्र्योत्तर काळामध्ये अनेक ख्रिस्ती लेखकांनी कथा, कादंबरी, कविता, चरित्रे, आत्मचरित्रे, ललितलेखन, संशोधन, व्याकरण, कोशनिमित्ती असे वैविध्यपूर्ण लेखन केले. मराठी ख्रिस्ती साहित्य आणि मराठी भाषा यांचा भावबंध अतूट आहे. या अतूट भावबंधातून ख्रिस्ती कथाकारांनी मराठी कथा वाड्.मय समृद्ध केले आहे. कथेच्या माध्यमातून अनेक ख्रिस्ती कथालेखकांनी जीवनातील अनेक स्थित्यंतरे आपल्या कथांमधून चित्रित केलेली आहेत. २००० नंतरच्या कालखंडापासून मराठी ख्रिस्ती कथेने नव्या जाणिवा, नवे संघर्ष प्रकर्षाने दाखविले त्यातून समाजमनात नवी जागृती निर्माण होवू लागली. मानवी जीवनाचे सखोल व्यापक दर्शन ख्रिस्ती कथा लेखकांनी आपल्या कथांमधून दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. ही कथा २१ व्या शतकाच्या दृष्टीने सामाजिक व सांस्कृतिक संदर्भात कशी वैशिष्ट्यपूर्ण आहे. याचा ऊहापोह येथे करावयाचा आहे. त्यासाठी काही उद्दिष्टे समोर ठेऊन प्रस्तुत विषयविवेचन करणे अपेक्षित आहे.

**उद्दिष्टे:-** प्रस्तुत शोधनिबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) २१व्या शतकातील ख्रिस्ती समाज जीवनाचे बदलते संदर्भ पाहाणे.
२) ख्रिस्ती समाज जीवनाचे धार्मिक चित्रण पाहाणे.
३) ख्रिस्ती व्यक्ती आणि समाज यांच्या संघर्षाचे चित्रण पाहाणे.
४) ख्रिस्ती व्यक्ती आणि समाज यांच्यातील सांस्कृतिक संबंध तपासणे.
५) ख्रिस्ती व्यक्ती आणि समाज यांची विचारधारा लक्षात घेणे.

मराठी ख्रिस्ती कथेतील सामाजिक व सांस्कृतिकसंदर्भ ख्रिस्ती कथेमध्ये कशी आलेली आहेत. हे तपासण्यासाठी दिलेल्या उद्दिष्टांचा विचार होणे क्रमप्राप्त आहे. यासाठी प्रस्तुत शोधनिबंधासाठी वापरलेली संशोधन पद्धती खालील प्रमाणे आहे.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत अभ्यास विषयासाठी माहितीचे संकलन, नमुना निवड आणि चिकित्सक परीक्षण ही अभ्यासपद्धती वापरलेली आहे. या पद्धतीचा अवलंब करून अचूक तथ्य आणि निरीक्षणापर्यंत पोहचण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केलेला आहे.

**मराठी ख्रिस्ती कथेतील समाज जीवनाचे बदलते संदर्भ:-**

साहित्य आणि समाज यांचा परस्परसंबंध असतो. कोणत्याही कलाकृतीवर तत्कालीन काळातील समाज आणि संस्कृती यांचा ठसा उमटत असतो. २१व्या शतकामध्ये जागतिकरणामुळे सर्व मानवी जीवन बदलून जात आहे. नव्या पिढीला नव्या जाणिवा नवी जीवनदृष्टी प्राप्त होत आहे. कथा वाड्.मयात नव्या वाटा कथा लेखकास मिळाल्या. समस्या नवे संघर्ष प्रकर्षाने साकारले गेले. त्यातूनच समाज मनात नवी जागृती निर्माण होऊ लागली. मानवी जीवनाचे व्यापक व सखोल दर्शन ख्रिस्ती मराठी कथांमधून झालेले दिसून येते. अनेक ख्रिस्ती लेखकांनी मराठी कथेचे दालन समृद्ध केले आहे. त्या लेखकांमध्ये चारूदत्त रुकडीकरांचे नाव अगत्याने घ्यावे लागेल. रुकडीकरांनी आपली कथा बीज **'बायबल'** मधून वेचली, तशी ती सभोवताली वावरणाऱ्या व्यक्तीतून आणि सामाजिक परिस्थितीतूनही घेतली. **'प्रेरणा'** नावाचा त्यांचा कथासंग्रह 2000 मध्ये प्रकाशित झाला. त्यांच्या कथांमध्ये माणसातील चांगुलपणावर प्रकाश टाकला आहे. वरकरणी वाईट वागणारा माणूसही त्याच्यातील चांगुलपणाला स्पर्श केला तर पश्चाताप करून सरळमार्गी होतो. अशी बायबलच्या विचाराची धारणा रुकडीकरांच्या कथेमध्ये प्रतिबिंबित होते, **'विस्कटलेला संसार'**, **'बरब्बा'**, **'परिवर्तन'**या कथांमध्ये ख्रिस्ती विचारधारेतील पश्चात्तापाचे परिणाम चित्रित झालेले पाहावयास मिळतात. थोडक्यात, रुकडीकरांच्या कथा व्यापक धार्मिक आणि सामाजिक आशयाच्या झालेल्या आहेत. अनुभवाची व्यापकता हे त्यांच्या कथेचे बलस्थान आहे. येशू ख्रिस्तावरील अढळ श्रद्धा ही त्यांच्या लेखनामागील प्रमुख प्रेरणा आहे.

डॉ. उषादेवी कोल्हटकर यांच्या **'फुलांना घर नसतं'** (२००१) या कथासंग्रहामधून आधुनिकीकरणाच्या आणि जागतिकीकरणाच्या विळख्यात अडकलेला समाज आणि त्याचे भावविश्व प्रकट झाले आहे. स्वातंत्र्य आणि अमर्याद स्वातंत्र्य यांमध्ये एक सीमा नसेल तर त्याचे परिणाम काय होतात हे **'श्वास'**या कथेत निवेदकाने दाखवून दिले आहे. तसेच घटस्फोटीत

स्त्रीचे भावविश्व, बलात्कारित अल्पवयीन मुलीची मानसिकता, चंगळवादी संस्कृतीकडे झुकलेल्या स्त्रीव्यक्तिरेखा यांसारख्या अनेक व्यक्तिरेखा डॉ. उषादेवी कोल्हटकर यांनी साकारल्या आहेत. त्यांच्या कथांमधून हिंदूधर्म संस्कृती आणि ख्रिस्ताचे तत्वज्ञान यांचे एकत्रीकरण दिसते.

**ख्रिस्ती समाजजीवन आणि ख्रिस्ती संस्कारांचे दर्शन घडविणाऱ्याकथां:-**

खिस्ती समाजाची आरोग्य सेवा ही या समाजाचीमानवता दर्शविणारी कृती आहे. हा समाज सेवाभावी वृत्तीने वागणारा आहे. त्यातल्या त्यांत या समाजाच्या स्त्रियांमध्ये परिचारिका होण्याचे मोठे स्वप्न असते. यासंदर्भात मोनिका कुंवर यांचा **'कोसू'** (२००१) हा कथासंग्रह महत्वाचा आहे. परिचारिकेचे अनुभवविश्व प्रस्तुत कथासंग्रहाच्या केंद्रस्थानी आहे. स्त्रीचे अंतर्विश्व आणि बहिर्विश्व याचे सखोल चिंतन कथांमध्ये आलेले आहे. ख्रिस्ती समाज जीवन आणिख्रिस्तीसंस्काराचे दर्शन प्रथम व तृतीयपुरुषी निवेदनातून निवेदकाने घडविले आहे. या कथासंग्रहातील **'अतृप्त मातृत्व'** ही कथा मालक व कामगार संघर्षात छेद देणारी कथा आहे. प्रस्तुत कथेत मालक आणि कामगार यांच्यातील अतूट नाते संबंध प्रतीत होतात. स्त्री-पुरुष या नात्याच्या पालिकडील नाते **'अदृश्य-नाते'** या कथेत साकारले आहे. कॅन्सर, एड्स यांसारख्या रोगांवर निवेदकाने भाष्य केले आहे. वेचक व वेधक प्रसंग चित्रण आणि चिवटपणे झुंजणाऱ्या नायिका हे विशेष त्यांच्या कथेतून दिसून येतात.

अशोक आंग्रे यांचा **'शरण तुला प्रभूराया'** (२०१०) या कथासंग्रहामध्ये येशू ख्रिस्ताच्या शिकवणीला केंद्रस्थानीठेवून ख्रिस्ती धार्मिक विचार मांडणाऱ्या कथा लिहिल्या आहेत. त्यांच्या कथेतील पात्रे पार्थना, चर्च, चर्चमधील उपदेश, उपवास व बायबलमधील वचने यांचा अंगीकार करणारी आहेत. **'शरण तुला प्रभुराया'** कथेतील संजय, **'निश्चय'** मधील जोसेफ आणि **'साक्षात्कार'** मधील दिनू ही पात्रे प्रभू येशूची प्रार्थना करणारी असून ते धार्मिक आहेत. आपल्या जीवनाविषयी प्रभूयेशूवर अवलंबून राहतात. **'वधस्तंभ'** मध्ये येशूच्या त्यागाचे मूल्य सांगितले आहे. **'देव हरवला आहे'** या कथेमध्ये देवाच्या आस्तित्वाचे महत्व सांगितलेले आहे. अशाप्रकारे ख्रिस्ती जीवनमूल्ये कथांमध्ये येतात. **'असाही एक ख्रिस्त'** या कथेत नाताळ सणाचा उद्देश स्पष्ट झालेला आहे. अशोक आंग्रे यांच्या कथां आदर्श ख्रिस्तीमुल्ये जोपासणाऱ्या आहेत. ख्रिस्ती संस्काराचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या कथां आहेत.

**बदलत्या ख्रिस्ती समाजव्यवस्थेचे चित्रण करणाऱ्या कथां:-**

वसई परिसरातील मराठमोळ्या ख्रिस्तीजीवनाचे चित्रण करणाऱ्या कथालेखकांतील महत्त्वाचे कथालेखक म्हणून स्टॅन्ली गोन्सालविस हे एक कथालेखक आहे. **'मोझेसची काठी'** (२०१५) या त्यांच्या कथासंग्रहातील कथांमध्ये ख्रिस्ती जीवनाचे प्रतिबिंब पडलेले आहे. त्यांच्या कथा वास्तव आहेत. सूक्ष्मभावभावनांचे दर्शन त्या घडवितात. बदलत्या समाजव्यवस्थेचे चित्रण करणारी कथा ते लिहितात, ख्रिस्ती शिकवणुकीतील प्रेम, दया, माया, परोपकार, सहनशीलता, करुणा, शेजारधर्म पालन या गुणांचा प्रभाव ख्रिस्तीलोकांवर आहे. म्हणूनच तीव्र पराकोटीचा सामाजिक संघर्ष वा व्यक्ती कलह स्टॅन्ली यांच्या कथांमध्ये फारसे दिसून येत नाही. **'मोझेसची काठी'** संग्रहातील कथा म्हणजे माणसांच्या नातेसंबंधीच्या प्रत्ययकारी कहाण्या आहेत. **'पदर तिचा प्रेमाचा'**एक ख्रिस्तीकुटुंबकथा आहे. म्हाताऱ्या आजीच्या विवेकशीलतेमुळे व समजुतदारपणामुळे कथा परिणामकार झाली आहे. ही विवेकशीलता ख्रिस्तीतत्वज्ञानातून, व्यवहारज्ञानातून, अनुभवातून व मनन-चिंतनातून आलेली आहे. या घरट्यात माझ्या, सती, एकटा या कथांमध्ये पात्रांच्या मनाचे सूक्ष्म पदर उलगडून दाखवले आहेत. **'मोझेसची काठी'**ही उत्तम प्रतिकात्मक कथा आहे. **'मेंढरं'** कथेत क्रेडिट सोसायटीतील गलिच्छ राजकारणाचे चित्रण आहे. **'नातं मातीचं'** या कथेमध्ये रिकी परेरा हा श्रीमंत तरुण स्वार्थीपणाने जीवन जगत असतो. आपल्या प्रिय माणसांशीतो तुटकपणे वागतो. त्याचे हे वागणे कथेमध्ये आले आहे. वसई परिसरातील मराठमोळ्या ख्रिस्तीसमाजजीवनाचे चित्रण स्टॅन्लीगोन्सालविस यांनी केली आहे. त्यातून मराठी ख्रिस्ती समाजाची संस्कृतीची पार्श्वभूमी दाखवून दिली आहे.

**'दान कृपेचे'** (२०१५) मध्ये हेमंतहजारे यांच्या कथासंग्रहांमध्ये पुस्तकामध्ये आठ कथां समाविष्ठ आहेत. या कथां मराठी ख्रिस्ती कौटुंबिक पार्श्वभूमी, ख्रिस्ती संस्कार अशा अध्यात्माच्या पायावर आधारलेल्या आहेत. ख्रिस्ती धर्मातील प्रार्थनेचे स्थान, त्यातून मिळणारे मानसिक आणि प्रार्थनेचे मिळणारे फळ ह्याचा अनुभव ते कथेतून मांडतात. **'तुझिया वात्सल्यतेला'** व **'आकाश'** या कथा या संदर्भात महत्त्वाच्या ठरतात. सेवा भावाचा आदर्श समोर ठेवून ज्या मिशनने आपल्यावर संस्कार केले त्याविषयीची कृतज्ञता म्हणून आजीवन अविवाहित राहून सेवेचे व्रत घेणाऱ्या स्त्रियांचे चित्रण **'लग्न का केले नाहीत?'** या कथेमध्ये आले आहे. स्त्रीभ्रूणहत्या सारख्या २१ व्या शतकातील ज्वलंत प्रश्नावर आधारीत **'काय मी गुन्हा केला?'** था कथेमध्ये ख्रिस्ती कुटुंबातील एक अनुभव मांडलेला आहे. अशाप्रकारे हेमंत हजारे यांची कथा ख्रिस्ती कुंटुंबव समाज यांच्यातील बदलत जात असलेल्या स्थितीचे चित्रण करतात.

सरोजिनी साळवी यांचा **'बायबल मधील स्त्रियांच्या कथा'** (2020) हा कथासंग्रह ख्रिस्ती विचारधारा प्रकट करणारा आहे. काही व्यक्तिरेखा कधीही कालबाह्य होत नाही उलट नव्या काळात त्यांचे नवे संदर्भ लागतात. एकूण अठरा स्त्रियांच्या

जीवनावर आधारित असणाऱ्या या कथा त्यांची व्यथा-वेदना व्यक्त करतात. त्यांच्या जीवनातील संघर्ष दाखवताना त्यांना कथात्मक स्वरुप देऊन त्या वाचनीय व मनोरंजक झाल्या आहेत. तसेच त्यातील संदेश वाचकांपर्यंत पोहोचविण्यात लेखिका पूर्णपणे यशस्वी झाल्या आहेत. या कथांमध्ये भेटणारी प्रत्येक व्यक्तीची जीवनाकडे पाहाण्याची स्वतंत्र्य दृष्टी आहे.

सारा, तामार, मरीया, इत्यादी स्त्रियांच्यासत्यकथांतून त्या काळाची संस्कृती, स्त्रीचे स्वातंत्र्य, व्यक्तिमत्त्व यांची माहिती मिळते. देवाविषयीचे कुतूहल, देवाची ओढ, त्याची प्रिती, विश्वास यांना स्त्रियांनी दिलेला प्रतिसाद यांचे वर्णन म्हणजे त्यांचा आत्मविश्वास या अठरा कथांमधून दाखविला आहे. स्त्रियांच्या जिव्हाळ्याचे विषय, समस्या, भावना, या सारख्याच असतात. मानासिक, सामाजिक अवहेलनेमुळे तीव्र वेदना होतात. बायबलमधील या कथांतून वेगवेगळ्या स्त्रिया, वेगळ्या परिस्थितीत व स्वरुपात वाचकांना भेटतात, त्यांची व्यक्तिमत्त्वे जाणून घेण्याच्या दृष्टीने बायबलचा अभ्यास करणाऱ्या वाचकांना उपयुक्त ठरतील. धार्मिक व सामाजिक उपयुक्तता यासाठी लेखकेचा हा कथासंग्रह, महत्त्वाचा आहे. २१व्या शतकातील मराठी ख्रिस्ती कथा संग्रहातील एक महत्त्वाचा कथासंगृह ठरतो.

प्रा. डॉ. सुभाष पाटील यांचा **'चर्च भोवतालच्या कथा'** (२०२१) मराठी ख्रिस्ती कथा साहित्यातील महत्वाचा कथा संग्रह आहे, ख्रिस्ती समाजजीवन व संस्कृतीचे विविधांगी चित्रण त्यांनी केले आहे. ख्रिस्ती जीवनात नाताळ ताऱ्याचे महत्त्व विशद करणारी कल्पना वेगळीच आहे. तर **'एकच व्यथा'** ही कथा नाताळाचा सण संपल्यानंतर लेखकाच्या मनातील निराशा प्रकट करते. ख्रिस्ती लोकात नाताळ हा तसा एकमेव उत्सव. तो जवळ येऊ लागला की, मनाची घालमेल सुरू होते, सणाची सजावट करणे सुरू होते. कॅरोल पार्ट्या, नाटकांच्या तालमी, खाद्यपदार्थ अशा कितीतरी अंगाने ख्रिस्ती समाज ढवळून निघतो, नाताळानिमित्त मंदिरात आणलेल्या सजावट वस्तूंच्यामार्फत लेखकाने स्वतःच्या मनातील व्यथा कथन केली आहे. **'कोनशिलेचा धोंडा'** या रूपक कथेमध्ये अनेक ख्रिस्ती धार्मिक मनाची स्थित्यंतरे दाखविणारी आहे. चर्चमध्ये धार्मिक निष्ठेने जाणारे लोक कोणत्याही अडचणींना बळी पडत नाहीत. ते सहनशील, संयमी असतात. ईश्वराच्या भक्तीमध्ये स्वतःला धन्य मानतात. असे लोक धर्माचे खरे आधार असतात. हे लेखकाला कथेद्वारे सुचवायचे आहे. **'देवळातले पशूपक्षी'** ही कंपाऊंडमधील ख्रिस्ती रहिवाशांचे मनोवेधक दर्शन घडविणारी कथा आहे. **'निर्माल्य स्वीकार'** नावाच्या कथेतील मायकल येशूच्या शिकवणुकीतून स्वत:मधील गुन्हेगारीवृत्तीमधून बाहेर पडतो. व स्वतःचे परिवर्तन घडवून आणतो आणि नव्या उमेदीने जीवन जगतो. ख्रिस्ती विचाराचा प्रभाव व्यक्त करणारी अशी कथा ख्रिस्ती समाजाची जीवनपद्धती स्पष्ट करते.

**निष्कर्ष** :- २१ व्या शतकातील मराठी ख्रिस्ती कथाकारांनी समाजातील परिवर्तनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. याचा अभ्यास करताना काही निष्कर्ष समोर येतात ते खालीलप्रमाणे.

१) २१ व्या शतकातील मराठी ख्रिस्तीकथालेखकांनी आपल्या कथांचा आशय सभोवती घडणाऱ्या सामाजिक परिस्थिती वव्यक्तींमधून घेतलेला आहे.
२) २००० नंतर जीवनव्यवहार, विचारप्रणाली यांमध्ये जे बदल झाले ते ख्रिस्तीकथाकारांच्या कथेत आलेले आहेत.परिवर्तनाच्या बदलाचा वेध घेत ख्रिस्तीसमाजाचे जीवनवास्तव मांडण्याचा प्रयत्न कथालेखकांनी केलेला आहे.
३) समाज सुधारणे बरोबर मानवी प्रतिष्ठा हे ख्रिस्ती धर्माचे मूल्य कथाकारांनी कथांमधून जोपासले आहे.
४) ख्रिस्तीकथालेखकांचे अनुभवविश्व, निष्ठा ही मराठी भाषेच्या मूळ प्रवाहांशी जोडणारी आहे. त्यांच्या कथांचा विषयख्रिस्ती समाज, धर्म यांच्या निगडीत असला तरी अभिव्यक्ती मराठी आहे. ख्रिस्तीधर्माचे संस्कार आणि मराठी संस्कृती यातून संस्कारीत झालेली भाषाशैली कथांमधून दिसून येते.
५) ख्रिस्तीकथाकार आपल्या कथांमधून आधुनिक समाजातील जीवनाचे विविध पैलू उलगडण्याच प्रयत्न करतात.
६) वास्तवदर्शी जीवन दर्शन, प्रबोधनाची प्रेरणा, संवेदनशीलता ख्रिस्तीजीवनसंस्कृतीचे मर्मउलगडण्याचा प्रयत्न कथाकार करतात.
७) हिंदू आणि ख्रिस्तीसंस्कृतीचे एकत्रीकरणही ख्रिस्तीकथाकारांची बलस्थाने आहेत हे त्यांच्या कथा लेखनातून दिसून येते.

**संदर्भ:-**

१) सुनील आढाव, धर्म ख्रिस्ताचा, विचार साहित्याचा!', दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००३
२) 'ललित'कथा विशेषांक, ऑगस्ट २०१३
३) डॉ. सुभाष पाटील, 'मराठी ख्रिस्ती साहित्य : उगम आणि विकास', चेतक बुक्स, पुणे, आवृत्ती पहिली, २०१६
४)संपादक,डॉ. गजानन हेरोळे, नवदोत्तर मराठी कथा: रंग आणि अंतरंग, गोवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती,२०१८
५) कामिल पारखे, 'क्रुसाभोवतालचा मराठी समाज', चेतक बुक्स प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०२१

# २१ व्या शतकातील स्त्रीवादी कादंबरीतील सामाजिक संदर्भ

**प्रा.डॉ. जयकुमार चंदनशिवे**
कन्या महाविद्यालय, मिरज.

**प्रस्तावना -**

एकविसाव्या शतकामध्ये सर्वक्षेत्रात झपाट्याने बदल होत आहे.स्त्री शिक्षणांमुळे स्त्रियांच्या जीवनात आमुलाग्र बदल होताना दिसत आहे.ती विविध क्षेत्रात मन लावून मेहनत करताना दिसते.त्यामुळे विविध क्षेत्रात प्रावीण्य मिळवत आहे.तिने आपल्या कर्तृत्वाने हे यश मिळविले आहे.स्त्रियांच्या हिताचे अनेक नवनवीन कायदे केले गेले आहेत. संस्कृती, रूढी, परंपरेत काम करणाऱ्या स्त्रीला आत्मभान झाल्याने ती संपूर्ण जीवनाचा डोळसपणे शोध घेत आहे. समाजाच्या जडणघडणीत, विकासाच्या प्रक्रियेत आपला महत्वाचा वाटा आहे, याची जाणीव तिला झाली आहे.आपले स्वतःचे जीवन जगताना तिला अनुभवांची प्रचीती आली आहे.पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये आपले स्थान कायम असायला हवे असे तिला वाटते.आपल्या हक्कासाठी तिने लढा उभा केला आहे.जात, धर्म, वर्णभेद यांच्या पलिकडे जाऊन न्याय हक्कासाठी आत्मभानाने बंड केले.हे बंड म्हणजे स्त्रीवाद होय.

प्रस्तुत निबंध लेखनात स्त्रीवादी कादंबरीतील सामाजिकता, आत्मभान, जाणीवा अंगाने शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

साहित्य हा समजाचा आरसा असतो.समाजजीवनाचे, समाजमनाचे प्रतिबिंब त्यात उमटलेले दिसते.अर्थात त्यातून समाजाचा चेहरा दिसणे स्वाभाविक आहे.त्या त्या समाजाची म्हणून एक संस्कृती असते.त्यामुळे त्यांच्या संस्कृतीचे दर्शन साहित्यातूनउमटते.समाजात अनेक व्यक्ती असतात. वृत्ती-प्रवृत्ती असते.त्यानुसार तो समाजात वावरत असते, बोलत असते. त्याच्या स्वत:च्या म्हणून काही आवडी-निवडी, राग-लोभ, भाव-भावना असतात. त्याचा एकूणच परिणाम जगण्याच्या पध्दतीवर होताना दिसतो. समजाच्या काही रूढी-परंपरा, अलिखित संकेत असतात. काही नियम, विधी, आचार-विचार जपावे लागतात. त्यामुळे स्वातंत्र्यावर काही मर्यादा येतात आणि एक व्यक्ती म्हणून त्याची ओळख सांगता येईल असे ही स्वत:चे अस्तित्व असते. एक विशिष्ट परिसरात प्रदेशात, समाज गटात राहणाऱ्या माणसाला त्या काळातील परिस्थितीचे भान ठेवावे लागते.त्या काळातील चालीरिती, प्रश्न आवासून उभे असतात. या सगळ्यांचे ओझे घेऊन जगणे होत असते हे काळाचे, परिस्थितीचे पर्यावरण सतत बदलत असते आणि ही क्रिया अखंडपणेसुरु असते.या बदलाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम समाजावर समाजमनावर, व्यक्तीच्या जीवनावर होत असतो.हे परिवर्तन आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वरुपाचे तसेच मानसिक स्वरुपाचेही असते. यातून व्यक्तीमनावर परिणाम होतो. कारण चळवळी या आंदोलने, प्रश्न घेऊनच निर्माण होतात.

१९७५ या आंतरराष्ट्रीय महिला वर्षापासून स्त्री विकासाच्या अभ्यासाला वेग लागल्याचे दिसून येते.त्यामुळे सामाजिक प्रश्न, कौटुंबिक प्रश्न, धार्मिक अशा विविध प्रश्नांवर स्त्रियांनी सडेतोड लेखन कादंबरीतून केलेले आहे. साठोत्तरी कालखंडात वेगळ्या साहित्य चळवळीतून आलेला आशय त्यातून मांडलेले सामाजिक प्रश्न, उलगडलेले भावविश्व सहजतेने केलेले विचार मंथन यामधून त्या त्या समाज घटकांचे प्रश्न सुटताना दिसून येतात. काहीसा देशी आणि मोठ्या प्रमाणात पाश्चात्य प्रभावातून आपल्याकडे स्त्रीवाद ही संकल्पना उदयास आली. जगात ज्याप्रमाणे अन्यायाच्या जाणीवेतून साहित्य निर्माण होऊ लागले त्याप्रमाणेच स्त्रियांचे 'स्त्रीवादी साहित्य' निर्माण होऊ लागले. हे साहित्य निर्माण होण्यासाठी मुख्य प्रेरणा होती ती 'स्व' जाणीवेची समाजव्यवस्थेकडून होणारा अन्याय हा केवळ स्त्री म्हणून होत आहे याची जाणीव तिला होऊ लागली. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध पातळ्यांवर तिची घुसमट होताना दिसू लागली, याची जाणीव प्रकर्षाने होऊ लागली.अशा अनेक समस्या कादंबरीमधून चित्रीत होऊ लागल्या. याच विचाराचा धागा पकडून आणि काळाची गरज म्हणून गौरी देशपांडे, ज्योत्सना देवधर, आशा बगे, मेघना पेठे, कमल देसाई, सानिया, कविता महाजन, शांता गोखले यांनीही समस्या मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१९७५ नंतरच्या अनेक लेख्किांच्या कादंबऱ्यातून स्त्रीवादाला अभिप्रेत असणारा भगिनीभाव 'स्थलांतर' या कादंबरीतून दिसून येतो.रिना व नंदू यांचे स्वभाव भिन्न असले तरी रिना नंदूला आत्मीयतेने घरात ठेवून घेते. तर शांता गोखले यांच्या 'रिटा वेलिणकर' या कादंबरीत सरस्वती रिटाचे दु:ख जाणून घेते. गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यातून मित्र-मैत्रीण या नात्याची कितत‍रीपरिपक्व रूपे दिसतात. रक्ताची नाती असतात. स्त्रिया विवाहित असल्याने सासरची सर्व नाती ती समजून घेते. तिला ती सांभाळावी लागतातच.पण लग्न होवो अथवा न होवो स्त्रियांना स्वाभाविकपणे मित्र असल्याचे दिसते.कधीतरी मित्राशी संवाद होतो, कधी प्रेम जुळते. मग 'प्रेम' या शब्दाचा स्त्री म्हणून उच्चार करता येत नाही, स्त्रियांनी नकळतपणे प्रेम केलेतर स्त्रियांना

समाज स्वीकारत नाही, पण गौरी देशपांडे यांच्या 'चंद्रिके गं' या कादंबरीतील सुहाल-पॉल नात्यातही शरीर संबंधाचा स्वीकार केलेला दिसून येतो.

बऱ्याचदा स्त्रियांना तारुण्याच्या उंबरठयावर असताना बुजऱ्या-अजाण वयात झालेल्या विवाहामुळे त्यांना आपल्या आवडी-निवडीचींही पुरेशी जाण नसते. स्वत:च्या मनाचा थांग लागलेला नसतो.

'भूमी' मधल्या शंतनू-मैथिलीचे लग्नानंतरचे दोघांमधील पडत जाणारे अंतर जाणवू लागते.समकालीन स्त्रीवादी जीवनाचं आणि स्त्रीवादी विचाराचे प्रतिनिधीत्वकरणारी मेघनापेठेची 'नातिचरामि' ही कादंबरी महानगरीय सुशिक्षित आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या स्त्रियांच्या जीवनात पुरुषप्रधान संस्कृतीचा दुराग्रही भूमिकेतून आलेल्या समस्या आणि जगण्याचे पर्याय शोधण्यासाठी मीराच्या रुपाने मांडणी केल्याचे दिसून येते. यातून मीराच्या जीवनाची एक बाजू मेघनानं निर्भयपणे मांडली आहे.यातून मध्यमवर्गीय स्त्रीवर होणारा अन्याय स्त्री जीवनाचं वास्तव अधोरेखित करते.

'ब्र' या कविता महाजन यांच्या कादंबरीतील प्रफुल्लाही नायिका आहे.तिने डिव्होर्स घेतला आहे.पण तिचा पती तिच्यावर कायम नजर ठेवून आहे.प्रफुल्ल आदिवासी भागात एका स्वयंसेवी संस्थेत काम करते.आदिवासी स्त्रियांना त्यांचा न्याय हक्काबद्दल जागृत करते व त्यांना अन्यायाची जाणीव करुन देते.आदिवासी स्त्रियांवर कौटुंबिक, सामाजिक, राजकीय आणि गावगुंड पुढारी कशा पध्दतीने अत्याचार करतात याचे वास्तव चित्रण 'ब्र' या कादंबरीतून केलेले आहे.

स्त्री पात्रांच्या बंडखोरीच्या स्वरुपाबद्दल गौरी देशपांडे यांनी आपल्या सर्जनशीलतेच्या आधारे मानवी समाजाचं दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्त्री आणि पुरुष हे मानवी समाजाचे मुख्य घटक आहेत. समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या या घटकांकडे बघण्याचा दृष्टिकोन कसा आहे या विषयीचे भान त्या आणून देतात. 'एकेक पान गळावया' या कादंबरीत जुन्या नितिमूल्यांचे संकेत, कुटुंब व्यवस्थेने लादलेले संकेत आणि पुनर्विवाहाची वाट ती नाकारते. 'काही दूरपर्यंत' या कादंबरीत नायिका जसोदा स्वत:चे मनस्वातंत्र्य, व्यक्तीस्वातंत्र्य, हक्क जपण्यासाठी बंडखोरी करते. परपुरुषाबरोबरच्या प्रणयात स्वत:च्या देहमनाच्या संवेदना फुलून आल्याची कबुली ती कोणत्याही दडपणाशिवाय देते. 'तेरुओ' या कथेत जपानी पात्रे आहेत, जपानी संस्कृतीचे दर्शन घडते.'तेरुओ' ही नायिका कादंबरीच्या प्रारंभापासून स्त्रीवरील अन्याय, अत्याचार परिस्थितीने तिची केलेली कोंडी या विरुध्द ती बंड करुन उभी राहते.एकूणच गौरी देशपांडे यांच्या कादंबरीतील अनेक नायिका आपल्या आयुष्याचे निर्णय आपणच घेतले पाहिजेत या विचारांच्या आहेत.

रीटा वेलिणकर ही एका अविवाहित स्त्रीच्या जण्याची कहाणी आहे.या प्रौढ कुमारिकेच्या वाट्याला आलेली घुसमट एका वेगळ्यातऱ्हेने चित्रीत केलेली आहे.कादंबरीतील रीटा या स्त्रीची घुसमट फक्त रीटाची नाही तर भारतीय समाज समस्येच्या पातळीवरुन पाहिल्यास तिला जो सन्मान पाहिजे असतो तो पुरुष देत नाही तेव्हा तिला आपल्यावरील अन्यायाची शोषणाची जाणीव होताना दिसते.

एकूणच साहित्यातील परिवर्तनाचा व समाजाचा विचार करताना आपल्या लक्षात येते की, भारतीय स्वातंत्र्य लढ्यामधून उदयाला आलेल्या सर्वच मानवतावादी मूल्यांचा स्वीकार केला आणि या मूल्यांना अनुसरुनच प्रजासत्ताक भारताची वाटचाल सुरु झाली. जुनी विषमतावादी भारतीय समाज व्यवस्था मोडीत निघाली. त्यातून उपेक्षित वर्ग, स्त्रिया शिकल्या, ज्यांना आत्मभान आले हेच लोक साहित्यातून आपले विचार, रुढी-परंपरा, हक्क, अधिकार, अन्याय, अत्याचार, समाजव्यवस्था यावर परखडपणे लिहू लागली. साहित्याच्या माध्यमातून त्यांचे नाते समाज जीवनाशी समाज परिवर्तनाशी होऊ लागले.

**संदर्भ-**

१) लांडे, सुमती :स्त्रीवाद, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर प्र.आ.२००४
२) महाजन, वंदना : सांस्कृतिक प्रवाहांची स्त्रीवादी समीक्षा स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे प्र.आ.२०११
३) देशपांडे, गौरी :'काही दूरपर्यंत', मौज प्रकाशन, मुंबई.
४) महाजन कविता : 'ब्र', राजहंस प्रकाशन, पुणे.
५) को आशा : भूमी, मौज प्रकाशन, मुंबई
६) पेठे, मेघना : नातिचरामि, राजहंस प्रकाशन. पुणे.
७) पाटील, भारती :स्त्रिया: समाज आणि राजकारण, हर्मिस प्रकाशन, पुणे.
८) सानिया, स्थलांतर : राजहंस प्रकाशन, पुणे.

# दलित आत्मकथनांमधील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ आत्मकथनांच्या परिप्रेक्ष्यातून

**प्रा. डॉ. शैलजा श्रीधर शिंदे**
सहायक प्राध्यापक ,मराठी विभाग
सहकारभूषण एस.के.पाटील महाविद्यालय,कुरुंदवाड

**प्रस्तावना**

दलित साहित्य ही गेल्या काही वर्षातील एक नवीन वाङ:मयीन चळवळ आहे ही चळवळ केवळ वाङ:मय चळवळ नसून सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाने दलित अनुभवाला जाग आली आणि शतकानू शतकांच्या मौनावस्थेला वाचा फुटली. मनुष्यत्व नाकारलेल्या पीडेला एक अर्थ प्राप्त झाला. अज्ञान, अंधश्रद्धा, अत्याचार, भूक, उपासमार, देव व देवता यांनी मांडलेल्या मानवी मनाला नव्या विज्ञाननिष्ट हुंकारानी समज आली. नव्या जाणिवा कोंडीमुक्त होऊन नवा आशय अविष्कृत करू लागल्या. हा नवा आत्मशोध नकार होता, ही नवी सांस्कृतिकता होती, अस्मितेचा नवा उद्गार होता. असे दलितांचे साहित्य होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा त्यांचे कर्तुत्व व व्यक्तिमत्व हे या साहित्याचे केंद्रस्थान होते त्यामुळेच वेगवेगळ्या वाङ:मय प्रकाराने दलित साहित्य बहरलेले पहावयास मिळते.

**शोधनिबंध लेखनामागील हेतू:**

डॉशिक्षित व .बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीमुळे दलित समाजात सामाजिक परिवर्तन आले.र्ग लेखणीला प्रवृत्त होऊ लागला आपल्यावरील अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी अनेक साहित्य प्रकार हाताळू लागलात्यातीलच . एक प्रकार म्हणजे'आत्मकथन' या साहित्य प्रकाराला जवळ करून दलितांनी आत्मकथने लिहिलीया आत्मकथनामधून . व्यक्त झालेले सामाजिक व सांस्कृतिकसंदर्भ हे दलितांच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहेत तेच घटक शोधण्याचा हेतू या शोधनिबंधा मागे आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करताना मूलभूत साधनांचा वापर वस्तुनिष्ठ पद्धतीने केला आहे तसेच इतर आधारभूत ग्रंथांचा आधार घेतला आहे.

**'दलित' व्याख्या :**

दलित साहित्यातील दलित हा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असा अर्थ सामान्यतः उभा राहतो यासंदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, "दलित हा मानवी प्रगतीत सर्वात मागे पडलेला आणि मागे भेटलेला सामाजिक वर्ग आहे"[१] तर दलित शब्दाची व्याख्या करताना बाबुराव बागुल लिहितात, "दलित हा आजच्या युगाचा नायक आहे.दलित हा आजच्या सबंध क्रांतिकारक उलथापालथीचे केंद्र आहे... दलित म्हणजेच क्रांतिकारक, दलित म्हणजेच सम्यक परिवर्तन"[२] खरे तर 'दलित 'आणि 'दलित साहित्य' या संकल्पनांच्या व्याख्या करताना जातीवाचकते पासून गुणवाचकतेपर्यंत या संज्ञा मांडल्याचे दिसते.

**दलित आत्मकथन स्वरूप :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून जागा झालेला समाज आत्मभान आलेला समाज जे जगतो आहे बघतो आहे स्वतःचे सुख यातना मन मारून गिळत होता तो समाज लिखित झाला व आपल्या व्यथा वेदनांना वाट मोकळी करून देण्यासाठी त्याला जवळचा वाटणारा वाङ :मय प्रकार म्हणजे 'आत्मकथन' किंवा 'स्वकथन' यातून तो व्यक्त होऊ लागला. आज पर्यंत शेकड्याने आत्मकथने लिहिली गेली आहेत त्यामध्ये त्या त्या समाजाचे दु:ख, दैन्य, दारिद्य,सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अवस्थांचे, वेदनामय दर्शन घडविले आहे. दलित आत्मकथन या पुस्तकाच्या प्रस्तावनेत डॉ. गंगाधर पानतावणे व चंद्रकुमार नलगे लिहितात,"कथन हे सातत्याचे प्रतीक आहे तर कथेला शेवट असतो.ती पूर्णत्वाचा प्रत्यय देते, ती कुठेतरी थांबते,आत्मकथनाचा प्रवास मात्र सुरूच असतो. या दृष्टीने 'दलित आत्मकथन' ही संज्ञा अधिक अर्थपूर्ण व अन्वर्थक आहे."[३] असे मत मांडले आहे.

**दलित आत्मकथनांमधील सामाजिक संदर्भ :**

लेखक व्यक्तिगत जीवनानुभव घेत असतो तेव्हा या अनुभवात सामाजिक जाणिवेची पार्श्वभूमी असते लेखक भावानुभवाचा शोध हा सामाजिक पातळीवर व सामाजिक संदर्भात घेतो आणि त्याची साहित्यातून अभिव्यक्ती करतो. यासंबंधी डॉ.यशवंत मनोहर लिहितात, " वाङ:मयीन कलाकृती भोवतीच्या सांस्कृतिक, आर्थिक, वाङ:मयीन,नैतिक आणि सामाजिक

संदर्भातूनच साकार होत असते. या सर्वच प्रत्यक्षाप्रत्यक्ष परिणाम वाङ:मय कृतीत मुखरित होत असतो.साहित्य हे समाज जीवनाचे महत्त्वाचे अंग असून इतर अंगांशी त्याचे अंगभूत नाते असतेच. साहित्याचे विश्व हे त्यामुळेच सांस्कृतिक विश्व ठरते.. काहीही केले तरी साहित्यकृतीला जीवनापासून तोडता येत नाही. "[४] हीच जीवनानुभूती आठवणींचे पक्षी मध्ये प्र. ई. सोनकांबळे मांडतात,"उंटाचा आणि माझा इतका जवळचा संबंध आला, परंतु जनावरासारखे आम्ही जवळ कधीच आलो नाही."[५] कारण प्र. ई. च्या वाट्याला आलेले जीवन आणि उंटाचे जीवन यात साधर्म्य आहे. उंटाचे राबणे, काटेरी पाला खाणे,पाण्याने पोट भरणे इत्यादी सवयी व त्याचे रोग हे लेखकासारखेच आहेत. तर 'मुक्काम पोस्ट: देवाचे गोठणे 'मधून अस्पृश्यतेची प्रखरता मांडली आहे. सोगमवाडी गावच्या शाळेत मास्तर झाल्यावर जेव्हा त्यांना शाळा सुटल्यावर मुले आंघोळ करायला गेली हे कळते तेव्हा ते लिहितात, "म्हंजे माझा विटाळ झाला म्हणून ही पोरं अंघोळीला गेली?एका शिक्षकाचा विटाळ!... मी सारखा विचार करतोय माणसाचा माणसाला विटाळ होतोय?.. अंगाला घाण लागली, गू,मूत लागलं तर ते स्वच्छ करायचं असतं हे मी समजू शकतो पण माणसासारख्या माणसाचा स्पर्श होताच माणसाला तो घाण वाटावा हे मी समजू शकत नाही."[६] त्यावेळी त्यांची आई म्हणते, "त्यांच्या जीवावर आपली जिनगानी,उद्या त्येसनी आपली मत्नीमूट बंद केलानी तर आपुन खावाच काय?"[७] या आणि अशा संदर्भातून दलितांच्या जीवनाचे बंद लक्षात येतात.

'अंत :स्फ़ोट' या आत्मकथनामध्ये कुमुद पावडे अस्पृश्यतेच्या संदर्भात व्यक्ती व समाजमन यांचे चित्रण करताना लिहितात," आजही बौद्ध धर्मात देखील हिंदू प्रमाणे कटाक्षाने पोट जाती पाळण्याचे खूळ अव्याहत चालू आहे..या देशात कोणत्याही धर्माचा माणूस जातीच्या भावनेने झपाटलेला आहे, ही जाणीवच नष्ट व्हायला हवी. माणूस, माणूस म्हणून जन्मला,जात म्हणून नाही की धर्म म्हणूनही नाही."[८]

' काट्यावरची पोटं ' या उत्तम बंडू तुपे यांच्या आत्मकथनात त्यांची आई मानवी वृत्तीवर बोलते की, "उत्तम रग नि वग कवाबी कामाला येती.माणसानं मनात येईल ते खावं,शिकून घ्यावं,माणूसच व्हवं कुठलाबी प्राणी जन्माला आलाय त्येला भोग घ्यावाच लागणार हाय. या परान्यात माणूस जितका चांगला तितका वाईट,इतका की जनावरा परास वाईट.माणसानं माणसासारखं वागावं म्हंजी डोळ्यात पानी धरावं आई भणीची वळख धरावी..."[९] माणसाला माणूस न मानणारी व्यवस्था किती भयंकर होती हे सांगताना 'गबाळ 'या आत्मकथनातून मल्हारी महादेव मोरे लिहितात,"आमची जात सुधारणार नव्हती, गावोगाव भटकतच राहणार होती, परमेश्वरानेच आपल्याला हीन जातीत जन्माला घातले आहे मग माणसाने नफरत केली तर बिघडले कुठे?"[१०] या विचारात लेखकाच्या मनात लाचार जीवनाच्या संदर्भात तिरस्कार वाटत असला तरी तो सौम्य रूपात प्रकट होताना दिसतो आहे.

याशिवाय फांजर, मिटलेली कवाडे,गावकी, आभरान,बलुतं,अक्करमाशी,जिनं आमुचं,म्हारुडा या आणि अशा कितीतरी आत्मकथनांमधून प्रसंगानुरूप व आशयानुरूप सामाजिक संदर्भ अनुभवाला येतात कारण त्यांचे जीवन हे सामाजिकशी जोडलेले आहे. त्यामुळे व्यथा, वेदना, प्रथांचे, चालीरीतींचे दर्शन सामाजिक संदर्भातून व्यक्त झालेले पहावयास मिळते.

**दलित आत्मकथनांमधील सांस्कृतिक संदर्भ:**

दलित आत्मकथनातील समाज हा विविध सांस्कृतिकतेने नटलेला आहे.या समाजाचा व्यवहार हा त्यांच्या बोलीवर चालतो. प्रत्येक समाजाची बोली ही विविधतेने आली आहे.'दलित' या संकल्पनेत येणारा समाज हा गुप्तबोली, व्यवसाय बोली, जात बोली, व्यक्ती बोली बोलतो. त्यातून व्यक्त होणारे सांस्कृतिक संदर्भ हे तपासण्यासारखे आहेत.कोकण परिसरातून आलेल्या 'ढगा आडचा चंद्र 'या आत्मकथनातील कोकणी महारी व्यक्तीबोली पाहता, " हय रे म्हाज्या झिला म्हाका म्हायत आसा ता जिणा, तू बस्टो झगडा नको, तुका दिसता मां भावाक शिकवचो? शिकय व्हयो तितको. "[११] या व्यक्ती बोलींचे दर्शन होते. तर जात बोलीचा दाखला देताना लक्ष्मण गायकवाड 'उचल्या 'मध्ये सांगतात,"आम्हाला बिना दाखल्याचं कुठं बी फिरता येत नाही,आमच्या उचल्याच्या घरात देवापरीस मोठा आम्हाला आमचा दाखला वाटायचा अन खिसे कापायची भारतपत्ती घरातली लक्ष्मी वाटायची"[१२]

गुन्हेगारीचा शिक्का मारलेली जात म्हणून चोरी पकडली जाऊ नये यासाठी खिसे कापताना पोलिसांना सापडले जाऊ नये यासाठी गुप्त बोली व सांकेतिक बोली बोलत असतं. सांकेतिक बोलीचा एक नमुना म्हणजे मातंग समाजातील लोक जनावरांची खरेदी विक्री करताना सांकेतिक बोली वापरतात याशिवाय कुलदैवते,सणवार, पेहराव, श्रद्धा - अंधश्रद्धा,चालीरीती,परंपरा,श्रद्धास्थाने, शिवी हा सर्व सांस्कृतिक ठेवा जपत चरितार्थ चालवताना दिसतात.

व्यवसाय बोलीची उदाहरणे पाहता 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे 'मध्ये "कच्ची रापवणी झालेल्या चामड्यागत"[१३] तर 'हातोडा 'मध्ये पुंडलिक गवंडी म्हणतात, "दगडफोडीत जगलेला जीव या दुखण्यानं मात्र खचत खचत संपला होता"[१४] अनेक दलिता आत्मकथनकारांनी जगण्यातील सांस्कृतिकता वेगवेगळ्या घटकातून मांडली आहे. यामध्ये जत्रा, यात्रा,बकरा किंवा कोंबडं कापून देवाला नवस करणे, आजारपणाला दूर करण्यासाठी भक्ताच्या आशीर्वादाला किंवा अंगाऱ्याला जवळ करणे,

पेहरावासाठी मागून आणलेल्या वस्त्रांचा वापर करणे तर भविष्यासाठी गाडगी मडक्यातून वाळलेले तुकडे जमा करून त्यावर पावसाळ्यात गुजरात करणे सण समारंभ म्हणून भटकंती करणारा समाज गावावर येऊन सण साजरे करतो, नातलगांना भेटून रिती -रिवाज पाळतो व रोटी बेटी व्यवहार करतो.याशिवाय जातीनुसार, व्यवसायानुसार,शिव्यांची लाखोळी वाहतो. 'शिवी' हा जगण्यातला व जीवनातला मोठा सांस्कृतिक ठेवा म्हणूनच जणू त्याकडे पाहतो. 'आभरान 'गुंडाळून, अंगावर आसूड ओढणारा पोतराज, स्वतःच्या भविष्याचा ठावठिकाणा नसताना इतरांचे भविष्य सांगणारा कुडमुडे जोशी, पिंगळा या रूपातून व्यक्त झालेले आत्मकथनकार जगण्यातले संदर्भ शोधताना आत्मकथनांमधून सापडतात हे सर्व आत्मकथनकारांनी अनुभवले असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मुळे सजग झालेला आत्मकथनकार येणाऱ्या नव्या पिढीला प्रेरणा देणारा आहे. पूर्वजन्मीचे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ फेकून देऊन विज्ञाननिष्ठेने,मानवतावादी सम्यक विचार नव्या पिढीसमोर उभे करतो आहे.शिक्षणाशिवाय तरुणोपाय नाही, हा विचार पुढे आणल्यानेच अनेक दलित अभ्यासक, विचारवंत, साहित्यिक,लेखक,क्रांतिकारक घडले व त्यांनी नकार, विद्रोह,मानवता व विज्ञाननिष्ठा जोपासून हजारो वर्षाच्या परंपरेत अडकलेल्या आपल्या समाजाला नव्या विचारधारेत आणले आहे.

**निष्कर्ष:**

१. प्रस्तुत आत्मकथने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार प्रणालीतून जाणीव जागृत झालेल्या दलित आत्मकारांची आत्मकथने आहेत.
२. आज पर्यंतच्या सर्वच आत्मकथनांमधून सामाजिक जाणीव व सांस्कृतिक संदर्भाशिवाय जगणं अशक्य असल्याचे व्यक्त झाले आहे.
३. दलित आत्मकथनांमधून त्यांच्या जगण्याचे वास्तव किती विदारक आहे हे कोणताही विद्रोह न करता सौम्य भाषेत सांगितले आहे.
४. दलित आत्मकथने ही त्या त्या समाजाची आपापल्या बोलीभाषेतून व्यक्त केली आहेत.
५. मानवी जगणं हे समाजाशिवाय शक्यच नाही त्यामुळे समूहाने राहणारा हा दलित, सामाजिक बांधिलकी घेऊनच जगतो आहे हे आत्मकथनांमधून व्यक्त केले आहे.
६. सामाजिक जीवनासोबत प्रत्येक समाजाच्या चालीरीती,परंपरा, व्यवसाय,जात बोली, सांकेतिक, गुप्त बोली, दैनंदिन जीवनाशी जोडलेला एक दुवा म्हणजे 'शिवी' हा एक सांस्कृतिक दस्तऐवज असल्याचे स्पष्ट होते.
७. सामाजिक व सांस्कृतिक संदर्भातून मराठी साहित्यात मोलाची भर पडलेली दिसते.
८. वर्षानुवर्षे बंदिस्त जीवनाला झुगारून देऊन वेदना, विद्रोह, नकार, मानवता व विज्ञाननिष्ठा स्वीकारणाऱ्या आत्मकथनांचा उदय झाला आणि मराठी साहित्याच्या वैभवात मोलाची भर पडली आहे.
९. दलित आत्मकथनांमधून लेखकांच्या वाट्याला आलेली जात व्यवस्था व तिचे प्राबल्य किती बळकट आहे त्याचे प्रत्यंतर येते.
१०. जातव्यवस्था,धर्मव्यवस्था, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता यामध्ये गुरफटलेला दलित समाज डॉ.बाबासाहेबांच्या योगदानामुळे हे सर्व झुगारून देऊन नव्या समतावादी विचाराने पुढे गेलेला दिसतो.

**संदर्भ सूची:**

१.जोशी लक्ष्मणशास्त्री :'निकाय 'नागपूर, ऑगस्ट -सप्टेंबर १९७६, पृष्ठ.५
२.बागुल बाबुराव : 'स्मरणिका 'दलित साहित्य संमेलन, नागपूर १९७६, पृष्ठ. २८०-२८१
३.नलगे चंद्रकुमार व पानतावणे गंगाधर: 'निमित्त' 'दलित 'आत्मकथन -दलित आत्मकथन, सुरेश एजन्सीज पुणे १९८६
४. मनोहर यशवंत :'बांधिलकी आणि साहित्य',सिलिव्हया प्रकाशन,नागपूर १९८३पृष्ठ.१७
५. सोनकांबळे प्र. ई.: 'मनोगत,'आठवणींचे पक्षी,चेतना प्रकाशन, औरंगाबाद १९७९,पृष्ठ.४८
६. कोंडविलकर माधव:' मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे', मॅजेस्टिक प्रकाशन, गिरगाव मुंबई,१९७९पृष्ठ.८
७. कोंडविलकर माधव: मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, पृष्ठ.१५
८. पावडे कुमुद :'अंत:स्फोट 'आनंद प्रकाशन,औरंगाबाद, १९८१ पृष्ठ.५४
९. तुपे उत्तम बंडू : 'काट्यावरची पोटं,मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे १९८१ पृष्ठ.५१
१०. मोरे दादासाहेब : 'गबाळ' ग्रंथाली प्रकाशन, पुणे, १९८३,पृष्ठ.१६३
११. जाधव चंद्रकांत :' ढगा आडचा चंद्र', प्रचार प्रकाशन, कोल्हापूर,प्रथम आवृत्ती,ऑक्टोबर १९९६पृष्ठ.३
१२. गायकवाड लक्ष्मण : 'उचल्या 'श्रीविद्या प्रकाशन, चौथी आवृत्ती,१९९६ पृष्ठ.३
१३. कोंडविलकर माधव: मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे, पृष्ठ.२७

# फिंद्री या कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**प्रा. अमर विलास डोणे**
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महा. मिरज

## प्रस्तावना

21 वे शतक हे अनेक आव्हानांनी युक्त असे मानव जाती पुढे उभे ठाकलेले आहे. खाजगीकरण उदारीकरण व जागतिकीकरण ( खाउजा) धोरणामुळे भारतासारख्या विकसनशील देशापुढे आपल्या अस्तित्वाचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या सर्व प्रश्नांचा उहापोह 21 व्या शतकाच्या सुरुवातीच्या दोन अडीच दशकातील मराठी साहित्यामध्ये केला असल्याचे आपणास दिसून येते. मराठी वाङमयातील ग्रामीण व दलित साहित्य प्रवाहामध्ये खाऊजा धोरणाची कारणे व त्याचे परिणाम आपल्याला वाचावयास अनुभवायास मिळाले आहेत. दुभंगलेली कुटुंब व्यवस्था, त्रिकोणी किंवा चौकोनी कुटुंब रचना, बदलते कृषी जीवन, सहकारातील फोफावत चाललेला भ्रष्टाचार आणि याला जोड म्हणून पावसाने फिरवलेली पाठ तसेच यातून करावा लागणारा दुष्काळाचा सामना अशा अनेक गोष्टींचे ग्रामीण व दलित साहित्यातून प्रतिबिंब पडल्याचे दिसून येते.

ग्रामीण दलित वाङमय प्रवाहातील सुनीता बोर्डे लिखित 'फिंद्री' ही कादंबरी समकालीन कादंबरीहून वेगळी आहे. भारतीय समाज व्यवस्थेतील तमाम स्त्रियांची कैफियत या कादंबरीतून व्यक्त झाली आहे. समाजातील अनिष्ट प्रथांबरोबरच संस्कृतीची खोटी जोड असलेल्या अनेक गोष्टींची चिकित्सा लेखिका सुनीता बोर्डे यांनी या कादंबरीत केलेली आहे. त्यामुळे या कादंबरीचे महत्त्व अनन्य साधारण आहे. हे वाचकांच्या समोर स्पष्ट झाले आहे.

## विषयाची उद्दिष्टे

१) फिंद्री या कादंबरीच्या अनुषंगाने विशिष्ट भूप्रदेशातील स्त्रियांचे स्थान अधोरेखित करणे.
२) प्रस्तुत कादंबरीच्या अनुषंगाने स्त्रियांच्या समस्यांचा वैश्विक पातळीवर उहापोह करणे.
३) प्रस्तुत कादंबरीच्या अनुषंगाने स्त्रियांच्या समस्यावर उपायात्मक विचार मांडणे.
४) समकालीन कादंबरी मध्ये फिंद्री या कादंबरीचे वेगळेपण अधोरेखित करणे.
५) लेखिका सुनीता बोर्डे यांचे स्त्री लिखित साहित्यातील वेगळेपण स्पष्ट करणे.

## विषयाची व्याप्ती

भारतातील बहुतांश भागात आणि महाराष्ट्र राज्यात ही आर्थिक,सामाजिक व धार्मिक कारणांमुळे मुलींपेक्षा मुलग्याला प्राधान्य दिले जाते. आपल्या समाजात विशेषतः हुंडा संस्कृती प्रचलित असलेल्या ठिकाणी मुलींकडे आर्थिक ओझे म्हणून पाहिले जाते. मुली बद्दलचा अनादर एवढ्या टोकाला पोहोचला आहे की, एक अन्यायकारक प्रथा आपल्या समाजात दिसून येते ती म्हणजे काही ठिकाणी घरी जन्मलेल्या मुलीचे नाव नकुसा/नकुशी असे ठेवले जाते. नकुसा म्हणजे 'नको असलेली'. अत्यंत गरीब आणि सामाजिक दृष्ट्या उपेक्षित कुटुंबामध्ये मुलग्याची वाट बघताना मुलीच जन्माला आल्या असतील तर तिथे शेवटच्या मुलीचे नाव नकोशी असे ठेवण्यात येते. निराशा, पूर्वग्रह आणि अज्ञानाबरोबरच ही अनिष्ट प्रथा हिंदू धर्मात जवळजवळ सर्वच जाती आणि वर्गामध्ये वाढली असल्याचे दिसून येते. शेवटच्या मुलीचे नाव नकोशी ठेवले तर पुढील बाळ मुलगा होईल अशी अंधश्रद्धा या वर्गामध्ये दिसून येते. नकुशी मुलीची ही व्यथा घर, समाज, गाव, देशपातळीपासून ते जगाच्या विस्तृत परिघापर्यंत या विषयाची व्याप्ती आपल्याला जाणवते. कुटुंबामध्ये आजही थोड्याफार फरकाने का होईना मुलींना डावले जाते. मुलींचे बोलणे,चालणे, हसणे, वागणे इत्यादी बाबत अगदी कटाक्षाने सगळ्यांची दृष्टी मुलींकडे असते. याबाबतच्या बंधनांना पुन्हा सांस्कृतिक व सामाजिक पार्श्वभूमी सांगितली जाते ती वेगळीच. त्यामुळे आपल्यावर लादलेली बंधने ही बंधने आहेत असे महिला मुलींना कधी वाटतच नाही, उलट याबाबत संस्कृती जपली गेल्याचा खोटा बडेजाव पणा बाळगला जातो. जागतिक स्तरावर मोठा प्रश्न बनून राहिलेली ही सामाजिक समस्या महाराष्ट्रातील मराठवाड्यासारख्या सर्वच बाजूनी उपेक्षित असलेल्या प्रदेशात देखील खूपच गंभीर बनलेली आहे याचा आढावा या विषयातून घेतला आहे.

## फिंद्री कादंबरीतील सामाजिक संदर्भ

सुनिता बोर्डे यांची फिंद्री ही मनोविकास प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेली कादंबरी आहे. भारतीय समाज व्यवस्थेतील दलित समाजातील एका मुलीची व तिच्या आईची शिक्षणासाठी चाललेली धडपड या कादंबरीतून व्यक्त होते. स्त्रीच्या संघर्षाची ही कहाणी आहे त्याचबरोबर समाजव्यवस्था आज ही स्त्रीला 'माणूस'समजत नाही. मराठवाड्यासारख्या काहीशा दुर्गम व दुष्काळी परिस्थितीचा सामना करणारी ही कुटुंबं तिथल्या बोली,शब्द आणि त्यातून

आपली वेदना स्पष्ट करणारी स्त्रीगीत यामुळे फिंद्री कादंबरी वाचकांच्या मनावर गारुड घालते.

फिंद्री नको असलेल्या मुलीची (संगीता) ची आई (मिरु आई) ही खऱ्या अर्थाने या कादंबरीची नायिका आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी' या उक्तीप्रमाणे महिला मुली शिकल्या पाहिजेत यासाठी महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा आपल्या देशात सुरू करून स्त्री शिक्षणाचा पाया घातला. त्याची गोड फळे आज सर्वच समाजातील मुली महिलांना चाखायला मिळत आहेत. मात्र आजही शिक्षणाच्या बाबतीत दलित समजला जाणारा समाज हा शेकडो अंतरावर यापासून वंचित राहिला आहे. त्यातच दलित मुलींसाठीचे शिक्षण म्हणजे दिव्यस्वप्नच म्हणावे लागेल. फिंद्री कादंबरीतील आई आपल्या मुलींने शिक्षण घेतले पाहिजे यासाठी टोकाचा संघर्ष करते. या संघर्षासाठी लागणारे सगळे बळ तिला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून मिळाले आहे. असे म्हणतात की, प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एका स्त्रीचा हात असतो परंतु स्वतंत्र भारताच्या संपूर्ण स्त्रियांच्या प्रगतीत फक्त एकाच महापुरुषाचा हात आहे आणि ते म्हणजे बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर. हिंदू धर्म परंपरेने स्त्री शूद्रच होती.मुळातच ही विषमता हा अन्याय दूर केला तो डॉ. आंबेडकरांनी. महाड येथे झालेल्या परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना उद्देशून भाषण केले. स्त्रियांनी आपले राहणीमान कसे सुधारावे, दारू पिऊन येणारा नवरा, भाऊ, बाप इत्यादी पुरुषांसाठी दार उघडू नका असे त्यांनी सांगितले. केवढा मोठा हा सल्ला! दारुने संसाराची कशी राख रांगोळी होते हे त्यांनी जाणले होते. त्यांना पुरुषांप्रमाणेच अधिकार मिळावेत यासाठी कठोर मेहनत घेऊन, भविष्याचा वेध घेऊन डॉ. आंबेडकरांनी 'हिंदू कोड बिल' चा मसुदा लिहून त्याचा कायदा केला. या कायद्याचे कवच भारत देशातील सर्वच महिलांना प्राप्त झाले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे महिलांसाठीचे कार्य कदाचित या निरक्षर आईला समजले असावे. किंवा त्याचबरोबर डॉ. बाबासाहेबांनी स्थापन केलेल्या औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयाच्या माध्यमातून गोरगरीब दलित पण स्वाभिमानी अशा समाजाला जे शिक्षणाचे महाद्वार खुले केले त्याचीही या आईला जाणीव असावी. यामुळेच की काय ही आई आपल्या मुलीच्या शिक्षणाचा आग्रह धरते.अनेक कठीण प्रसंगाला सामोरे जाऊन कष्ट उपसते. आपल्या दारुड्या नवऱ्याचा प्रचंड मार खाते. पुरुषसत्ताक कुटुंबातील आईची झालेली होरपळ वाचून मनाला खूपच यातना होतात. अस्पृश्यता, स्त्रीभ्रूणहत्या या समाजाला कलंक असलेल्या प्रथा समाजात कोणी सुरू केल्या? या प्रथांना हे पुरुष का बळी पडतात? या मागचे अज्ञान केव्हा संपणार? यासारखे प्रश्न वाचकांच्या मनात निर्माण होऊन या सर्व अनिष्ट प्रथांमागे खोटा अहंभाव मिरवणारे धर्मग्रंथ आहेत. त्या धर्मग्रंथांची व धर्मशास्त्राची आपण चिकित्सा केली पाहिजे अशा निर्णायक मताला आपण येतो. मराठवाड्यातील एका दलित कुटुंबातील मुलीची फिंद्री ही कथा म्हणजे स्वतःच्या अस्तित्वासाठी करावी लागणारी जीवघेण्या संघर्षाची कहाणी आहे. स्त्रीचे जगणं,तिच्या चिंता,तिची कधीही न संपणारी काटेरी वाट या सगळ्या प्रसंग चित्राबरोबरच यातलं मिनिमिनत्या दिव्याच्या उजेडात अभ्यास करणारी संगी बघून मनातला हुंदका दाटून येतो. दारिद्र्य,गरिबी,अज्ञान याबरोबरच दारुडा नवरा हा दलित स्त्रियांच्या पाचवीला पुजलेला एक शापच आहे. कुटुंबाच्या,आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी धडपडणारी आई कोणत्याही संघर्षाला एका पायावर तयार असणारी आई या कादंबरीतून आपल्याला भेटते. नवऱ्याकडून तिला होणारी प्रचंड मारहाण त्यातून होणारा मनस्ताप वाचून;खूप झाले आता मरण आले तर बरे होईल.;असा विचार आपल्या मनात डोकावून जातो. स्त्रीच्या वाट्याला आलेली ही होरपळ मनाला सुन्न करून जाते.

**फिंद्री कादंबरीतील सांस्कृतिक संदर्भ**

हिंदू धर्म संस्कृतीमध्ये मुलगा म्हणजे;वंशाचा दिवा; अशी अंधश्रद्धा आहे. त्या अंधश्रद्धेची बैठक फिंद्री म्हणजे या कादंबरीतील मुलीच्या बापावर बसली आहे. आपल्याला मुलगा हवा होता पण मुलगी झाली याचा प्रचंड संताप राग या बापाला आहे. या रागातून तो आपल्याला नको असलेल्या या मुलीला फेकून देतो. त्या बाळाचे काही बरंवाईट होईल ते बाळ मरून जाईल असा विचार सुद्धा त्याच्या मनाला शिवत नाही. पदोपदी छळणारा हा बाप म्हणजे या मुलीचा जीवनदाता शिक्षण घेत असलेल्या आपल्या मुलीची पुस्तकं दप्तर विहिरीत फेकून देतो हा अनुभव वाचून 'पिता ना तू वैरी'असा विचार मनात निर्माण होतो. नकोशी ठरलेल्या एका मुलीने आपल्या कष्टकरी आईची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी असंख्य संकटाच्या काट्याकुट्यातून व खाचखळग्यातून वाट काढत जिद्दीने आपल्या शिक्षणाचा प्रवास सुरू ठेवला. या शिक्षणामुळे तिला आत्मभान आले आहे. शिक्षणाच्या या प्रवासात तिला महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ताराबाई शिंदे, हेगेल,फुको व कार्ल मार्क्स इत्यादी विचारवंत भेटतात. त्यांचा संघर्ष तिला ध्येयापर्यंत जाण्यासाठी प्रेरित करतो. स्त्रियांना फिंद्रीपण देणाऱ्या व्यवस्थेला बदलण्याचं काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांचे हिरावून घेतलेलं माणूसपणं त्यांना दिले बाबासाहेबांचे हे ऋण कसे फेडावे?असा विचार करून लेखिका सुनीता बोर्डे यांनी हा विषय फिंद्री या पुस्तकातून आपल्यापुढे मांडला आहे. फिंद्री कादंबरीतून बुद्धांचा अनित्यवाद आपल्याला दिसून येतो. कोणतीही परिस्थिती कायमस्वरूपी शाश्वत राहत नाही. त्यामुळे आज आपल्यावर ओढवलेली प्रतिकूल परिस्थिती आपल्या कष्टाने आपण बदलू शकतो व उद्याच्या आव्हानांना भेदू शकतो एवढी

जाणीव कादंबरीची नायिका, तिची आई व तिच्या आजीलाही आहे. म्हणूनच की काय ही पात्रे देवाला दोष देण्यापेक्षा स्वतःच्या कर्तुत्वाला सिद्ध करतात.

मराठवाड्यातील वैजापूर जवळच्या एका खेडेगावातील मुलीच्या संघर्षाचा हा प्रवास औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयात पोहोचतो. बापाने विहिरीत पुस्तके टाकून दिलेली असताना देखील फिंद्री अभ्यास करून पास होते. नुसती पासच होत नाही तर मुलींमध्ये पहिला क्रमांक मिळवते. पुढे महाविद्यालयात प्राध्यापिका होते फिंद्री( संगीता) व तिच्या आईच्या कष्टाचे खऱ्या अर्थाने सार्थक होते.

## सारांश

स्त्री शिक्षणासाठी अग्रेसर असणाऱ्या आपल्या महाराष्ट्रात शिक्षण घेण्यासाठी नायिकेला किती संघर्ष करावा लागतो? फुले शाहू आंबेडकरांच्या वैचारिक परंपरेचा वारसा आपल्याला लाभला असतानाही केवळ खोट्या संस्कृतीच्या गप्पा मारणाऱ्या आपल्या कुटुंबव्यवस्थेतून हा कौटुंबिक हिंसाचार आजही पूर्णतः कमी झाला आहे असे आपल्याला म्हणता येत नाही.फिंद्री या कादंबरीतील मुलीचा बाप हाच खरा या कादंबरीचा खलनायक आहे. राजाने दंड दिला, नवऱ्याने मारले आणि पावसाने झोडपले तर दाद कोणाकडे मागायची? अगदी अशीच अवस्था या कादंबरीतील मुलगी व तिच्या आईची झालेली आहे. मुलांची प्रगती व त्यांचे यश यामध्येच आई-वडील आपले सुख मानतात. मात्र या कादंबरीतील बाप आपल्या मुलीचा दुस्वास करतो. हर एक प्रयत्नाने तिने शिकू नये असा अटकाव करतो. या सर्व प्रसंगावरून असे वाटते की किती ही भयानकता आहे? शरीराची प्रतिकारशक्ती वाढवणाऱ्या पेशी काही कारणाने शरीराच्या विरुद्ध काम करू लागल्या तर काय करावे? फिंद्री या कादंबरीचा शेवट मात्र गोड झालेला आहे. आपण घेतलेल्या कष्टाचे चीज होते.

एवढा मार खाऊन अपमान सहन करून देखील ही नायिका उच्च पदास पोहोचते आणि तिचे कर्तृत्व बघून आईलाही आपण खाल्लेल्या खस्ता विसरून जाण्यास लावते. मायलेकींचा हा संघर्ष वाचकांनाही एक नवी दृष्टी देऊन जातो. प्रतिकूल परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी मार्ग शोधणाऱ्या प्रत्येक व्यक्तिमत्त्वाला या कादंबरीतून जगण्याचे बळ मिळते. उंच झेप घेण्याची उभारी प्राप्त होते हे निश्चित.

## संदर्भसूची

१) सुनिता बोर्डे- फिंद्री मुलीच्या नकोशीपणाची गोष्ट. मनोविकास प्रकाशन पुणे मार्च २०२१.
२) दै. लोकसत्ता फिंद्री समीक्षण ७ मार्च २०२१.
३) अक्षरनामा मराठी ऑनलाईन फीचर्स -सतीश कुलकर्णी २५/०७/२०२१.

# "माझी मुंबई अर्थात् मुंबई कोणाची" रूप आणि आविष्कार

**प्रा.डॉ.शिवाजी सटवाजी वाघमारे**
लोककला अकादमी .मुंबई विद्यापीठ.मुंबई.

## प्रस्तावना

महाराष्ट्राच्या नाहीतर भारताच्या इतिहासात संयुक्त महाराष्ट्राची चळवळीस अनन्यसाधारण अशा प्रकारचे महत्वाचे स्थान आहे. कारण मुंबईसह मराठी भाषिकांचा संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे या मागणीसाठी संपूर्ण महाराष्ट्रभर सरकारच्या विरोधात मोठ्या धैर्याने हा लढा जनतेने दिला."माझी मुंबई" हे वगनाट्य भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर,संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या धामधुमीच्या काळात म्हणजे १९४८ साली लिहिले गेले आणि प्रत्यक्ष रंगमंचावर सादर केले. या वगनाटयामुळे चळवळ अधिक तीव्र झाली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात या वगनाट्यची चर्चाच चर्चा झाली.हे वगनाट्य पाहण्यासाठी हजारोंचा जनसमुदाय जमत असे. मराठी अस्मितेसाठी या आंदोलनात गोरगरिबांन पासून ते श्रीमंतांन पर्यंत सर्वच घटक सहभागी झाले होते,त्यात शेतकरी,कष्टकरी, कामगार, आदिवासी ,हमाल , रिक्षावाले ,पक्ष संघटना इत्यादींचा समावेश होता.माझी मुंबई,हे वगनाट्य "लाल बावटा"कला पथकाच्या माध्यमातून,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, शाहीर अमरशेख, शाहीर द. ना. गवाणकर या प्रतिभावंत कलावंतांनी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी हजारो लोकांच्या समोर सादर करत असत.या वगनाटयामुळे मराठी जनता एकजूट होऊ लागली. ही चळवळ अधिक जोर धरू लागली या संयुक्त महाराष्ट्र चळवळचे स्वरूप अधिक व्यापक झाले. "माझी मैना गावाकडे राहिली" ही मुंबई ची लावणी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर आधारित अण्णाभाऊंनी लिहिली. आणि ही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात गाजली

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी जी एकूण लोकनाट्य लिहिली.त्या सर्व वगनाटयामध्ये " माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची" हे वगनाट्य खूपच गाजले. ऐक इतिहासच रचला. अण्णाभाऊंच्या वगनाट्याचा मुख्य हेतू हा प्रबोधनाचा होता.तो काल्पनिक नसून तो वास्तविक होता. प्रबोधनाचाच भाग म्हणून त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पार्श्वभूमीवर आधारित "मुंबई कुणाची अर्थात मुंबई कोणाची "वगनाट्य लिहिले.

## कथानक.

"माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची "वगनाट्यचे थोडक्यात कथानक असे की, विष्णू नावाचा मुंबईतला कामगार आणि मुनिमची हा गुजराती माणूस, या दोघांच्या मध्ये 'मुंबई कुणाची' या विषयावर, सवाल, जबाबाच्या,माध्यमातून झालेला संवाद आहे. भाषावार प्रांतरचनेच्या प्रक्रियेत मुंबई महाराष्ट्राला द्यावी का, गुजरातला द्यावी,का स्वतंत्र असावी. या विषयावर चर्चा सुरू झाली. शेवटी मुंबई, बेळगाव, कारवार ,निपाणी डांग, उंबरगावसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे,अशी घोषणा देऊन मराठी माणूस मैदानात उतरला, मुनीमजी आणि विष्णू या दोघांच्या संवादातून अण्णाभाऊ मुंबई महाराष्ट्राचेच कशी आहे हे पटवून देतात.

**मुनिमजी** - नाना भाषेची अनंत जातीची तूच मागशी कशी हिला?
**विष्णू** -जशी गरुडाला पंख आणि वाघाला नखं तशी ही मराठी मुलखाला.
**मुनिमजी** - आम्ही येऊनी मुंबईला व्यापार वाढविला, पैसा पेरीला का बोला?
**विष्णू** -नदीला बगळा जमून सगळा टपून बसतोय कश्याला "

अश्या सवाल-जबाब मध्ये विष्णू हा मराठी माणूस जिंकतो अन् मूनिमजी हरतो.शेवटी लाडोबा व मूनीमजी कटकारस्थान रचून विष्णुवर चोरीचा आळ घालतात.अन त्याला पोलिसात देतात.पण त्याचा ही काही उपयोग होत नाही.विष्णू ठणकावून सांगतो."मुंबई माझीच!पहिली व्हती;आता हाय,पुढं असणार." शेवटी विष्णूला सर्व कामगार साथ देतात.वगनाटयाचा शेवट विष्णू जिंकतो असे दाखवले जाते.विष्णु जिंकला म्हणजे मराठी माणूस जिंकतो ,महाराष्ट्र जिंकतो.असे सूचित होते.

## पात्र परिचय व दृश्य विश्लेषण

माजी मुंबई,अर्थात मुंबई कुणाची ' या वगनाटया मध्ये बाळकु, गणू , विष्णू , दामले,मुनीमजी , लाडोबा मिसाळ, पोलीस अधिकारी , परप्रांतीय भैय्या अशी एकूण आठ दहा पात्र आहेत. मुख्य पात्र विष्णू आणि मिनीमजी आहेत. या वगनाटयात एकूण चार दृश आहेत. प्रत्येक दृश्यांमध्ये अण्णाभाऊनीं मार्मिक भाष्य केले आहे .मानवी प्रवृत्तींचं दर्शन दाखवलेल् आहे.

"पहिल्या दृश्यांमध्ये बाळकु, गणू, विष्णु, या कामगारांचा संवाद आहे. हाताला काम नाही ते कामाच्या शोधात असतात. या दृश्यांमध्ये "काळ्या बाजाराचा पोवाडा" खूप महत्वाचा आहे. . पोवाड्यातून काळाबाजार कोण कसा किती करतो हे सांगितले आहे. माणूस हा माणसाचा वैरी झाला असून,माणसाच्या जीविताला कसल्याही प्रकारची किंमत नसल्याचे अण्णाभाऊ सांगतात.भ्रष्टाचारी काळाबाजार करणारे, सामान्य जनतेच्या जिवाशी कसे खेळतात. हे मार्मिक भाष्य या दृश्या मध्ये केले आहे.

**पोवाडा**

काळ्या बाजाराचा रोग आला / मागं लागला / गोरगरिबाला/
सुखाचा घास मिळना झाला/ काळ हा अति बिकट आला/
कराव काय आता बोला //
सार्‍याच वस्तू महागल्या/भुयारात गेल्या/ मिळेनाशा झाल्या /
वरती बैसले चोर kनफेबाज /करिती ते आज आपुले काज /
म्हणती देशात आपली राज//
या उंदरांना खेचून / काढू या बिळातून/ आम्ही महाराष्ट्राचे धनी नाव मराटा/
आम्ही दरी कपारीत चालविलाया पट्टा/ हातवरला अजून नाही जिरला घट्टा //
प्याला दूध जित्या आईचं/काळ्या खडकाचं/पाणी हाय तुमचं/
नफेबाजांना दावा समयास /काळाबाजार न्यावा विलयास/
वाटेगावकर विनवी सकलास//

अशा प्रकारे अण्णाभाऊ पोवाड्यातून, भ्रष्टाचार करणाऱ्या माणसावर आसूड ओढले आहेत त्यांच्या विरोधात लढा दिला पाहिजे ही प्रेरित करतात.

दृश्य दुसऱ्या मध्ये मुनीमजी लाडोबा आणि विष्णू यांचा संवाद आहे. मुनीमजी आणि लाडोबा हे आपला व्यवसाय चालवण्यासाठी नफा मिळवण्यासाठी कसे कटकारस्थान करतात. याचे विश्लेषण केलेले आहे.विष्णू कामाचा शोध घेत असताना त्याचा मित्रच मुनिमजीच्या कंपनीमध्ये कामगार म्हणून कामाला लावतो.मग विष्णू आणि मुनीमजि यांच्यातील संवाद होतो.

दृश्य तिसऱ्या मध्ये वगनाट्यचा उत्कर्षबिंदू दाखवला आहे.या दृश्यांत मुंबई कुणाची या विषयावर विवेचन आहे. सवाल जबाबाच्या माध्यमातून विष्णू पात्र, मुंबई महाराष्ट्राची कशी आहे हे ठामपणे पटवून देतो आणि मुनीमजी या मुंबईला आम्ही कशी घडवली असे पटवून देतो. या दोघांची जुगलबंदी दाखवली आहे यात विष्णूचा विजय होतो. आणि मुनीमजी चा पराभव होतो. असे या दृश्यात मांडणी आहे

दृश्य चौथ्या मध्ये विष्णू ला पोलिसांनी हातकड्या घातलेले आहेत. कारण मुनीम, लाडोबा कटकारस्थान करून त्यांना पोलिसात देतात. विष्णू आपल्या मराठी अस्मितेसाठी जेलमध्ये जातो त्यांच्या या धाडसाला पाहून सर्व कामगार त्यांच्या पाठीशी असतात .अखेर विष्णूचा विजय होतो, विष्णूचा विजय म्हणजे महाराष्ट्राचा विजय होतो असे दाखवले जाते.

' माझी मुंबई ' या वगाचे कथानक जेव्हढे,दमदार आहे.तेव्हढेच त्यांचे रंगमंचीय आविष्कार खूपच दर्जेदार आहे. आपल्या महाराष्ट्रातील निखळ मनोरंजनाचा प्रसिद्ध कला प्रकार तमाशा.याचा तमाशातील काही मुख्य बलस्थाने,घटक घेतले.त्यात.गण, शिलकार ,कटाव,सवाल जवाब, टाकनी ,पोवाडा ,हलगी ,ढोलकी,तुणतुणं,अश्या पद्धतीने तमशाचा बाज घेतला.पारंपरिक गणपतीच्या गणा ऐवजी त्यांनी ,धरतीमातेला,,महापुरुषांना शुर वीरांना,विश्वातील सर्व जनगणाला वंदन करणारे गण लिहिले."प्रथम माय भूच्या चरणा,किंवा ' विश्व व्यापी जनगण,विश्वव्यापी जनगना" अश्या पद्धतीचे गण अण्णाभाऊंनी लिहिले.पारंपरिक तमाशातील ,मनोरंजक ,काल्पनिक,धार्मिक, ,वगनाट्यचे आशय, विषयाला बगल देऊन.त्यांनी त्याठिकाणी ,प्रबोधन हाच ,आशय ,विषय टाकला.पुढे 'नवे तमाशे' या नावाने ते सादर होऊ लागले.

"माझी मुंबई "या वगनाट्य मुळे संयुक्त महाराष्ट्राची चळवळ अधिकच जोर धरू लागली.या त्यांच्या वगनाटयाची चर्चा ,मोरारजीभाई देसाई पर्यंत पोहोचली. याच वगनाट्याचा प्रयोग मुंबईमध्ये ठेवण्यात आला होता.मुंबई येथे काळाचौकी पोलीस चौकी येथे जाऊन रीतसर परवानगी घेतली. "१५ जानेवारी १९४९ रोजी मुंबईचे पोलीस कमिशनर यांनी या तमाशाला रीतसर परवानगी दिली.तरीही मोरारजी भाई देसाईंनी या तमाशावर बंदी आणली. परंतु साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी मोठ्या चातुर्याने तमाशाचे नामकरण करून "लोकनाट्य" असे नाव दिले व तो प्रयोग लाखोंच्या जण समूहा समोर कामगार मैदानावर सादर झाला.

**सारांश**

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा उज्वल इतिहास लिहिताना. "माझी मुंबई अर्थात् मुंबई कोणाची "यावगनाटयाचा जनमानसावरील प्रभावाचा उल्लेख केल्या शिवाय पुढे जाताच येणार नाही. मराठी माणसाची प्रादेशिक अस्मिता जागवणारे म्हणून दीर्घकाळ लक्षात राहिल असे हे वगनाट्य आहे. अर्थात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा काळ असल्याने काळाची गरज म्हणून जरी लिहिली गेली असली तरी अण्णा भाऊंचा व्यासंग, तळमळ युक्तिवाद व शाहिरी यांचा सुंदर मनोमिलाफ वगनाटयातून दिसून येतो.यावगनाटयातून अण्णाभाऊंनी भ्रष्टाचारी काळाबाजार करणारी लोक सर्वसामान्य जनतेला कसे छळतात.हे पोवाड्याच्या माध्यमातून सांगतीले, आपलाच माणूस आपला कसा वैरी आहे. मानव प्रवृत्तीचे दर्शन वगनाटयातून पहावयास मिळते.आपल्या मातीची विमान कसे राखलं पाहिजे हे यातून अण्णाभाऊंनी सांगितले आहे.या वगनाटयातून एकजुटीची भाषा करताना सांगितले आहे. प्रेरणा,ऊर्जा ,स्वाभिमान अभिमान, या वगनाटयातून आपणास पहावयास मिळतो.अन्यायाविरुद्ध लढण्याचे बळ या वगनाटयातून मिळते. कितीतरी लोकांना प्रोत्साहित केले.किती तरी पेटविले त्यांची गणती नाही .जिवाची पर्वा न करता मराठी जनतेने शेवटपर्यंत लढा दिला.त्यात १०६ शुर कामगारांनी मायभूमी साठी बलिदान दिले. अखेर १ मे १९६०रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

**आशय** :

" माझी मुंबई अर्थात् मुंबई कोणाची "या वगनाटयाचा थोडक्यात आशय असा की, "सर्वसामान्य कामगारांनी,मराठी अस्मितेसाठी केलेला संघर्ष आणि त्या संघर्षातून मिळवलेला विजय." "मबई शिवाय महाराष्ट्राची कल्पनाच होऊ शकत नाही.हा आत्मविश्वास अण्णाभाऊंनी सध्या सरळ युक्तिवादा तून मांडून,मुंबई हीच महाराष्ट्राची कशी आहे.हे मराठी माणसांच्या मनामनात रुजविण्याचे कार्य केले.

**संदर्भ ग्रंथ**

१. शाहीर चंदू भरडकर, शाहीर कृष्णकांत जाधव,केशरबाई शेख यांची प्रत्यक्ष मुलाखत .२००८,२०१० ,२०१४
२. प्रा.डॉ. सुरेश चौथाईवाले,विद्रोही अण्णाभाऊ साठे ,लहुजी प्रकाशन. औ बाद.१०१५
३.बाबुराव गुरव : अण्णाभाऊ साठे,समजविचार ,साहित्य विचार, लोकवाड;मय गृह .मुंबई.२०१०.
४. डॉ. राजेश्वर दुडुकनाळे : विद्रोही कलावंत अण्णाभाऊ साठे, लोकायत प्रकाशन, सातारा.२०१५
५. अण्णाभाऊ साठे: माझी मुंबई अर्थात मुंबई कोणाची वगनाट्य.

# ब, बळीचा व बारोमास या कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**डॉ. लक्ष्मण भानुदास साठे**

प्रस्तुत निबंधाची मांडणी करताना आरंभी एकविसाव्या शतकाची वैशिष्ट्ये समजून घ्यावी लागतील कारण एकविसावे शतक हे माहिती तंत्रज्ञान, संगणकाचे युग आहे. इंटरनेट, उपग्रह तसेच मोबाईल सारख्या साधनांनी स्थळ व कालाच्या सीमारेषा पुसल्याने राष्ट्र, चलन, भाषा, दळणवळण, संस्कृती या गोष्टी मधील अंतर जवळपास संपुष्टात आलेले आहे. या काळात जागतिक व्यापार वाढला. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे नागरीकरण वेगाने घडू लागले. ज्ञानाचे महत्त्व समाजातील सर्वच वर्गाला पटल्याने इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणास महत्त्व आले. स्त्रीची समाज रचनेतील भूमिका बदलली. मूल्यांपेक्षा किंमत, भावनेपेक्षा, भौतिक नात्यापेक्षा व्यवहार, समूहापेक्षा व्यक्ती आणि विचारांपेक्षा कृती महत्त्वाची ठरल्याने घर, समाज, व्यक्ती धारणेत आमुलाग्र बदल झाला. मनुष्य टोकाचा आत्मवृत व आत्मकेंद्री झाला. समाजकारणाची जागा राजकारणाने घेतली. हे सर्व बदल मराठी साहित्याने टिपलेले आहेत.

साहित्य हा सामाजिक दस्तऐवज आहे. विशिष्ट सामाजिक परिस्थितीला साहित्यिकाने दिलेल्या प्रतिसाद म्हणजे साहित्य होय. साहित्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनाशयाचा सामाजिकतेशी अपरिहार्य संबंध असतो. प्रदेश, भाषा, संस्कृती यानुसार त्या त्या साहित्यात काही वैशिष्ट्ये येत असतात. मराठी कादंबरीचा अवकाश व्यापक असल्याने कादंबरी या वाङ्मय प्रकाराने सामाजिक सांस्कृतिक संदर्भ यांना चित्रित केलेले दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधात ब-बळीचा व बारोमास या कादंबऱ्यातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ तपासले जाणार आहेत.

**उद्देश**

१) ब- बळीचा कादंबरीचा समकालीन सामाजिकता आणि सांस्कृतिकता या संदर्भात अभ्यास करणे.
२) ब- बळीचा कादंबरीचा आशय आणि एकविसाव्या शतकाचे स्वरूप यामधील अनुबंध तपासणे.
३) बारोमास कादंबरीतील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ यांचा शोध घेणे.

**ब- बळीचा कादंबरीचा आशय**

राजन गवस लिखित व 'ब-बळीचा' ही समकालीन जीवनावर भाष्य करणारी प्रयोगशील कादंबरी आहे. ग्रामीण भागातील स्थित्यंतर, सामाजिक- आर्थिक- राजकीय वास्तव, इतिहास आणि संस्कृती याचा शोध कादंबरीच्या केंद्रस्थानी राहिलेला आहे. कादंबरीतील आशयाची व्याप्ती समग्र ग्रामीण जीवनाला व्यापणारी आहे. कादंबरीतील लेखक कल्लाप्पा कोणकेरी, भांड्याचा व्यापारी दिपू शेठ आणि आडव्याप्पा अशा या कादंबरीतील मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहेत.

कादंबरीचे मध्यवर्ती सूत्र पाहिल्यास कोणकेरी आणि त्याने लिहिलेल्या चित्रपट कथेचा नायक हे दोघेही कृषी संस्कृतीचे प्रतिनिधी आहेत. एकाची वाटचाल शेतीतून बाहेर पडून पांढरपेशी होण्याकडे चाललेली आहे तर एक कोरडवाहू शेती करणारा अल्पभूधारक शेतकरी आहे. या दोघांच्या जीवनदर्शनाने त्या संदर्भात निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या निमित्ताने आणि ज्योतिराव फुले, कांतारामजी यांना लिहिलेल्या पत्रांमुळे या कादंबरीचे कथानक आशय सूत्राच्या एका मध्यवर्ती केंद्राकडे सरकत राहते. शेती, शेतकऱ्यांचे शोषण आणि कृषी संस्कृतीचे दर्शन असे बहुमुखीय कथन या कादंबरीचे मध्यवर्ती सूत्र आहे.

**कादंबरीतील सामाजिक सांस्कृतिक संदर्भ**

कृषी संस्कृती, विभक्त कुटुंब पद्धती, नातेसंबंध, भ्रष्टाचार, पर्यावरणाचा ऱ्हास, शेतकरी स्त्रियांची सोशिकता, धर्मसंस्था, शिक्षणसंस्था, राजकारण असे अनेक सामाजिक- सांस्कृतिक संदर्भ कादंबरीत येतात. 'ब-बळीचा' कादंबरीचा सांस्कृतिक भूगोल हा महात्मा फुलेंना अभिप्रेत असलेल्या प्रदेशाशी निगडित आहे. हिंदुस्थान हा बळीचा देश ही केवळ भौगोलिक संज्ञा नसून ती सांस्कृतिक ओळख देणारी आहे. या संज्ञेमागे एक स्वतंत्र इतिहास दडलेला आहे. ती एक संस्कृतीच्या अस्मितेची ओळख असलेली खूण आहे. महाराष्ट्रात शेतकऱ्यांचा राजा म्हणून बळीराजास मानले जाते. हा बळीराजा नाहीसा कसा झाला ?, स्त्रिया आजही बळीच्या राज्याची प्रतीक्षा का करतात ? अशा अनेक प्रश्नांकडे लेखक लक्ष वेधतो.

" झाडाची मुळे जशी जमिनीत खोल गेलेली असतात तशीच साहित्याची मुळे देखील जीवनात रुजलेली असली पाहिजेत. शेतकरी, मजूर, भूमिहीन मनुष्य यांचे जीवन आणि संघर्ष हा साहित्याचा विषय असण्याची गरज याच काळात प्रबळ झाली पाहिजे" (गणोरकर, २००४: १४६) या महाश्वेता देवी यांच्या विचाराचा आशय 'ब-बळीचा' कादंबरीतून अविष्कृत होताना दिसतो लेखक भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळाचा शोध घेत वास्तवाचे दर्शन घडवितात. कादंबरीच्या आशयातील

काही प्रश्न विमर्शक आहेत. "संस्कृतीच्या प्रारंभी काही माणूस शेती करू लागला. त्यातून श्रम परंपरा तयार झाली काही लोकांना श्रम न करता सगळ्यांचे जीवन समृद्ध करण्यासाठी फक्त विचार करावा. त्यांच्या पोटापाण्याचं श्रमिक बघतील या कल्पनेतून पंडित वर्ग निर्माण झाला. हे पंडित जप, तप, मौन, संन्यास, तपश्चर्या, साधना, समाधी, मोक्ष असे भलतेच काय काय करत बसले. ते फक्त स्वतःचेच बघत गेले"( पृ.३०६ ) आणि त्यामुळे ज्ञानी आणि अज्ञानी अशी दरी रुंदावत गेली. किंबहुना या द्विपदीत ज्ञान परंपरेच्या तुलनेत श्रमपरंपरेला खालचे स्थान प्राप्त झाले.

कादंबरीकार या अनुषंगाने काही प्रश्न उपस्थित करतो तो लिहितो, " ज्ञान म्हणजे काय? ज्ञानाची कसोटी काय? शेतकरी ज्ञानी का नाही? ज्यांना ज्ञानप्राप्ती झाली ते शेतकऱ्यांच्या मुक्तीसाठी का नाही बोलले ? गौतम बुद्ध, शंकराचार्य, महावीर, येशू, पैगंबर तू शेतकऱ्या विषयी काय म्हणालास, शेतकऱ्यांना काय सांगितलं, कोणताच धर्म शेतकऱ्यांना काहीच का सांगत नाही?, कष्टकऱ्यांचा श्रम हाच धर्म असेल तर पुस्तकी धर्माची मांडणी का? मग धर्म कोणाची खाज"( पृष्ठ:३०७) स्वातंत्र्य म्हणजे काय ? १५ ऑगस्ट १९४७ कोणाला मिळाले स्वातंत्र्य?, भारतातल्या शेतकऱ्याला की शेतकऱ्यावर सत्ता गाजवायची इच्छा असणाऱ्यांना? आत्महत्या करण्याचं स्वातंत्र्य हे सोडून कशाचेच स्वातंत्र्य नसणारे आपण लोक फक्त आत्महत्येचे स्वातंत्र्य( पृष्ठ:२९९), व्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ कसा लावायचा ज्याच्या त्याच्या आकलनानुसार (पृष्ठ:१९२) असे अनेक प्रश्न कादंबरीत येतात. ते एकविसाव्या शतकाच्या बदलत्या सांस्कृतिक परिप्रेक्ष्यामुळे.

ज्ञान, स्वातंत्र्य, धर्म या सामाजिक घटकांवर कादंबरीत येणारे भाष्य आणि त्याचे ऐतिहासिक संदर्भ वाचकांना नवी दृष्टी प्रदान करतात. " खरं तर सत्यशोधक विमर्शक दृष्टिकोनातून या कादंबरीला अनुभवाचा तळ शोधायचा आहे. किंबहुना हा दर्शनबिंदूच (standpoint view) या कादंबरीचे एक मुख्य संघटनतत्व आहे" (असोलकर (संपा.) २०१५:१६) हे रमेश वरखडे यांचे निरीक्षण सदर ठिकाणी अचूक वाटते.

भ्रष्टाचार, चंगळवाद, अंधश्रद्धेचे वाढते स्तोम, मूल्यहीन संस्कृती, आधुनिकीकरणाच्या नावाखाली उध्वस्त होत चाललेले ग्रामीण जीवन ही एकविसाव्या शतकात उभी राहिलेली नवसंस्कृती. याचा विविध घटना प्रसंगाच्या माध्यमातून लेखाजोखा कादंबरीकार मांडतो. आधुनिक जीवनसरणीच्या प्रतिमा रेखाटतात. दारिद्य रेषेखालील रेशन कार्ड काढून देण्यासाठी नायब तहसीलदार पन्नास रुपयाची लाच घेतो. कल्लाप्पा कोणकेरी 'कोडब्याड' या नावाची कादंबरी लिहायची आहे. कादंबरीच्या प्रारंभी तो आपल्या मित्राला गोष्ट ऐकवतो, एका राजाला बाई समजून घ्यायची होती ऋषीने त्याला सांगितलं पहिली मेंदूतली वासना काढ तुला बाई समजेल, राजा म्हणाला वासना बाजूला काढली की बाईत काय राहिलं ऋषी म्हणाला माणूस. याचा अर्थ राजा हा एकविसाव्या शतकाने निर्माण केलेल्या ग्राहकवादी, चंगळवादी संस्कृतीचा प्रतिनिधी आहे.

एकविसाव्या शतकात अनेक प्रश्न निर्माण झाले. नव्या व्यवस्था उदयास आल्या. नक्षलाईट संस्कृतीकडे माध्यमांनी अधिक लक्ष दिल्याने त्याच्या पार्श्वभूमीचा विचार सुरू झाला. कादंबरीत या अनुषंगाने चिंतन प्रकट झालेले आहे. कल्लाप्पा हा शेतकऱ्याची बाजू घेणारा, मूलनिवासी असणाऱ्या धनगराची बाजू घेणारा या व्यवस्थेला सुरुंग लावू पाहणारा म्हणून तो नक्षलाईट. तसे प्रतिज्ञापत्र देणारे दारूवाला सारखे प्रतिष्ठितही येथे उदंड असल्याचे लेखक नोंदवितो. वास्तवात कल्लाप्पा नक्षलाईट असणे अशक्य असल्याचे भिंगारकर म्हणतो कारण कोणकेरी नक्षलाईट होणे शक्य नाही. त्याला त्या चळवळीचे स्वरूप मान्य नाही. तो कशाला त्यांच्यात जाईल तो असला पाहिजे एक तर बेडीवच्या म्हातार बाबाकडे किंवा ज्ञानी महाराजांकडे. त्याला दोनच मार्ग मान्य होते( पृष्ठ:२६८) कादंबरीत येणारा म्हातारबा जंगलातील कंदमुळयाचे औषधी गुण जाणणारा तर ज्ञानी महाराज जात-पात न मानणारे. सेंद्रिय शेती करत ग्रीन मुव्हमेंटच्या पर्यावरणीय तत्वज्ञानाला जवळ जाणारे विचार करणारे आहेत. याचा अर्थ नक्षलाईट ही शोषणाच्या स्वरूपातून उभा राहिलेली पर्यायी व्यवस्था असली तरी सामान्य माणूस त्या संस्कृतीत जात नाही हेच लेखकाने या ठिकाणी सिद्ध केलेले आहे.

सारांश, 'ब,बळीचा' कादंबरीतील सामाजिक सांस्कृतिक संदर्भांना भारताच्या विचारप्रणालीची पार्श्वभूमी आहे. सांस्कृतिक वर्चस्वातून निर्माण झालेल्या इतिहासाचा संदर्भ आहे बदलत्या मूल्यऱ्हासाची, उद्धवस्तीकरणाची कथा आहे.

**बारोमास कादंबरीचे आशयसूत्र**

शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेकारी, भ्रष्टाचार, तरुणांची हतबलता या आशयसूत्रांना केंद्रस्थानी ठेवून वर्तमान सामाजिक- राजकीय- आर्थिक परिस्थितीच्या वास्तवावर प्रकाश टाकणारी बारोमास ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. एकविसाव्या शतकाच्या आरंभी निर्माण झालेल्या भयानक आणि विदारक स्थितीवर बारोमास भाष्य करते. लेखक सदानंद देशमुख यांची ही कादंबरी समग्र ग्रामीण जीवनाचा पट उभा करते. एकनाथ हा या कादंबरीचा नायक आहे. सुशिक्षित पण बेरोजगार. तो पारंपारिक शेती करण्यापेक्षा आधुनिक दृष्टीने शेती करू लागतो. नोकरीसाठी प्रयत्न करतो पण डोनेशन भरण्याची ताकद नसल्याने त्याला नोकरी मिळत नाही. एकनाथचे लग्न अलका या पदवीधर मुलीशी होते. शहरात वाढलेल्या अलकाला

ग्रामीण संस्कृतीशी जुळवून घेता येत नाही. सावकाराच्या कर्जात शेती गेल्याने एकनाथचे वडील आत्महत्या करतात आणि कादंबरीचा शेवट होतो. दु:ख, कष्ट, दारिद्र्य, वेदना याचे भीषण चित्रण करणारी 'बारोमास' ही कादंबरी आहे.

**बारोमास कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ**

खाजगीकरण, यांत्रिकीकरणाने निर्माण झालेल्या सामाजिक समस्यांकडे ही कादंबरी लक्ष वेधते. कुटुंबव्यवस्थेचे विघटन, कर्जबाजारीपणा, सावकारशाही, शेतकरी आत्महत्या, राजकारण, सुशिक्षित बेकारांची मनोवस्था, माणसातील वाढता हिंस्रपणा, पाण्याचा प्रश्न, फसवणूक अशा अनेक सामाजिक संदर्भांना कादंबरी अभिव्यक्त करते." भारतीय कृषी समाज, भारतीय कुटुंब व्यवस्था, स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय मूल्यहीन राजकीय व्यवस्था, भारतीय शासन तंत्र भारतीय सांस्कृतिक मूल्य व्यवस्था, न्यायव्यवस्था या सर्वांच्या पडझडीची दारुण शोकात्मक अनुभव देणारी ही महाकाव्यीय अभिव्यक्ती असल्याचे निरीक्षण डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर नोंदवितात".(देशमुख ;२००७:३५२) यावरून हे लक्षात येते की 'बारोमास' ही ग्रामीण जीवन व संस्कृती बरोबरच बदलत्या काळाचे संदर्भ टिपणारी महत्त्वाची कलाकृती आहे. कशाची नोकरी आणि कशाचं काय पैशाशिवाय जमते का नोकरीच. पन्नास हजार दिले नाही म्हणून गेली संधी (पृष्ठ ४५) आज महत्त्वाचा आहे पैसा डोनेशनच्या नावाखाली होणारा काळाबाजार आणि पैसा नाही तर मग अभावग्रस्तांच्या पोरांनी शिकायचं का (पृष्ठ ५७) या काही विधानातून भ्रष्टाचाराचे भयानक दर्शन वाचकांना घडते.

खताच्या वापरासंबंधी आपला शेतकरी शास्त्रशुद्ध माहितीचा अवलंब करीत नाही. खताचा अजिबात वापर न करणारे शेतकरी आता सापडतच नाहीत कारण आजच्या शेतीला रासायनिक खत आवश्यक झाले आहे. रासायनिक खताचा जोर जास्त आणि सेंद्रिय खताचा जोर कमी झाला तर त्याचा विपरीत परिणाम जमिनीवर होणार (पृष्ठ ६१) या भानुदास पाटील यांच्या विचारातून बदलत्या शेतीची स्थिती समजते. निसर्ग शेती काळाची गरज असल्याचे तो स्पष्ट करतो.

आपल्या देशातील ५०% लोकांना राष्ट्रवादी या शब्दाचा अर्थच कळत नसावा. जातीच्या देशात असंच होणार ज्याला त्याला वाटते आपण श्रेष्ठ.. आपली जात श्रेष्ठ पृष्ठ ;१२२) जाती व्यवस्था आता खूपच टोकदार होताना दिसत आहे. गेला जमाना गांधी- आंबेडकरांचा आता कुठे जास्त आंतरजातीय विवाह होताना दिसतात. आता आमच्यात काय आणि तुमच्यात काय जाती-जातीत पुन्हा उपजाती तयार होत आहेत( पृष्ठ; २०४) ज्या महापुरुषांनी जन्मभर आयुष्याचा पाठ दिला त्याच महापुरुषांच्या मूर्तीभंजकांनी तोडून टाकल्या शांतीचा संदेश गेला कुठं साली ही मूर्ती तोडणारी माणसं होती की हैवान. नका मानू जात- धर्म पण शिल्प डोळ्यांनी तरी पहा (पृष्ठ :१७५) या काही विचारातून सामाजिकतेचे स्वरूप समजते. समाजातील लोकांच्या भावभावना, विचारव्यूहाचे दर्शन घडते. नव्या समाजरचनेत कोण कोणत्या प्रकारचा वर्ग उदयास आलेला आहे त्याच्या सामाजिक जाणीव, मानसिकता याचे संदर्भात विचार प्रकट झालेले आहेत.

वेरूळ अजिंठा येथे ज्या काळात शिल्प कोरले गेले त्या काळातील प्रतिभावंतांनी कोरलेले एका स्त्रीचे शिल्प पाहून नायकाला प्रश्न पडतो , आक्रमणाच्या काळात शिल्प जमिनीत गाडले आणि मग तो आक्रमकाच्या तलवारी खाली बळी गेला असावा. मात्र कलावंताच्या सृजनाचं कौतुक न होता ते असं माती खाली दडवून ठेवावे लागणं यासारखा कलेचा अपमान दुसरा नाही. रामायण महाभारताचा पौराणिक कालखंड मारझोडीचाच; पण या दोन्ही काळापेक्षा मधल्या काळातला आपल्या संपन्न देशाचा सांस्कृतिक कलाकुसरीचा इतिहास खूप वैभवसंपन्न व लालित्यपूर्ण आहे (पृष्ठ १७८) अशा काही सांस्कृतिक संदर्भांनी कादंबरीचा आशय उठावदार केला आहे. खरंतर साहित्य आणि संस्कृती याचे नाते दुहेरी असते." एका बाजूने संस्कृती साहित्याच्या निर्मितीचे कारण ठरत असते तर दुसऱ्या बाजूने साहित्य ही एक सांस्कृतिक शक्ती ठरवून संस्कृतीच्या जडणघडणीत सहभागी होत असते"( पाध्ये; १९९८: २९ ) हा विचार सुसंगत वाटतो.

सारांश, बारोमास कादंबरीने आधुनिक जीवनातील बदलत्या सामाजिक जाणीव मनोव्यवस्था याचा वेध घेतलेला आहे. एकविसाव्या शतकातील काळ आणि त्या काळाने निर्माण केलेले प्रश्न या विषयाचा शोध घेत त्यावर भाष्य केलेले आहे.

**समारोप**

'ब, बळीचा' ही कादंबरी कृषी संस्कृतीची मूल्य परंपरा व आधुनिक व्यवस्था यांच्यातील संघर्ष चित्रित करीत वर्तमान वास्तवातील प्रश्नांचा शोध घेते. कादंबरीत येणारे सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ गंभीर वैचारिक चिंतन प्रकट करणारे आहेत. आधुनिकीकरणाने सामाजिक अंतरंगामध्ये घडून आलेल्या विविधांगी बदल याकडे कादंबरी लक्ष वेधते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचे पुनरुज्जीवन करत त्या अनुषंगाने विमर्शक विचार करायला लावणारा आशय कादंबरीची मौलिकता आहे.

'बारोमास' कादंबरी कृषी संस्कृतीची होत असलेली पडझड, मूल्य व्यवस्थेचा होत असलेला सर्वांकष ह्रास, शेती-शेतकरी, वर्ण- वर्ग संघर्ष, वेगाने बदललेला सामाजिक आणि सांस्कृतिक अवकाश याचे भेदक दर्शन घडविते. ग्रामीण जीवन संस्कृतीचा अनेकांगी विमर्श करणारी बारोमास ही एक विचार प्रवृत्त कादंबरी आहे.

**निष्कर्ष**

१) एकविसाव्या शतकातील कादंबरीकारांना काळाचे भान आहे. बदलत्या समाज जीवनाचा वेध त्यांनी घेतलेला आहे.
२) 'ब-बळीचा' कादंबरी एकविसाव्या शतकातील परिणामांचे चित्रण करते.
३) सांस्कृतिक वारसा, परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील वैचारिक ताणतणावांचे कादंबरीतून दर्शन घडते.
४) 'बारोमास' कादंबरीत लेखक शेती, भ्रष्टाचार, खाजगीकरणाचा प्रभाव व बदलत्या मानसिकतेवर प्रकाश टाकतात.
५) 'बारोमास 'कादंबरीत भारतीय सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांच्या पडझडीवर भाष्य येते.

**संदर्भ**

१) गवस राजन, 'ब , बळीचा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती २०१२
२) संक्षिप्त मराठी वाङ्मय कोश, खंड तिसरा संपादक प्रभा गणोरकर व इतर, जी. आर. भटकळ फाउंडेशन, मुंबई. प्रथम आवृत्ती फेब्रुवारी २००४
३) वरखडे रमेश, बळी विषयी संपा. शरयू असोलकर दर्या प्रकाशन पुणे २०१५
४) देशमुख सदानंद, 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. तृतीय आवृत्ती २००७
५) पाध्ये दिगंबर, साहित्य समाज आणि संस्कृती, लोक वाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई १९९८.

# " पेटलेल्या शहराच्या कल्लोळात "- अस्वस्थ वर्तमानाला शब्दबद्ध करणारी कविता

**प्रा. संदीप परदेशी**
सहाय्यक प्राध्यापक,
पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,
बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बीड

**प्रास्तविक-**

पंडित कांबळे हे एक मानवतावादी साहित्यिक म्हणून परिचित आहेत. प्रस्तुतच्या कवितासंग्रहापुर्वी त्यांचे'संदर्भ' आणि 'चरथ भिक्खवे' हे दोन कविता संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. 'नाचा रे नाचा', 'गाणी माझ्या गावची', 'विहार गाणी', हे बालकवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. तसेच त्यांनी योगीराज वाघमारे यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेचे 'साहित्यिक प्रवृत्ती: मूल्ये आणि जाणिवा' हे पुस्तकही संपादित केले आहे. 'उजेडाचा वारस' यु.डी. गायकवाड' या गौरव ग्रंथाचेही संपादन त्यांनी केले आहे तसेच अनेक वर्तमानपत्रातून लेख, समीक्षा वककविता लिहिलेल्या आहेत.

पंडित कांबळे यांचा 'संदर्भ' (२००९) हा पहिला कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. 'संदर्भ' या संग्रहातून त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक विषयांवर कवितेतून मागोवा घेतला आहे. जगण्यातील संदर्भ, दु:ख, दैन्य, दास्य, उपेक्षा आणि कविमनात ठसणारी वेदना हाच 'संदर्भ' चा गाभा होता.

पंडित कांबळे यांचा दुसरा कवितासंग्रह 'चरथ भिक्खवे' (२०१७) प्रसिद्ध आहे. यात त्यांनी तथागत गौतम बुद्धांच्या जीवनातील प्रसंग कौशल्याने मांडले आहेत. बुद्ध, धम्म, संघ तसेच धम्मप्रसार, विहारे, धम्मजागृती, बुद्धांचे अनेक शिष्य, अनुयायी यावर या कविता आधारीत आहेत.

**'पेटलेल्या शहराच्या कल्लोळात'(२०२२)**या त्यांच्या तिसऱ्या नवीन कवितासंग्रहात विषयांचे वैविध्य दिसते. माणूस, माणुसकी, नीतिभ्रष्टता, तंत्रज्ञानाचे युग, राजकीय नाकर्तेपणा, मानवीमूल्ये, संघर्ष, वेदना आणि विद्रोह असे अनेक विषय आपल्या कवितेच्या केंद्रस्थानी आणण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत शोधनिबंधातून या कवितासंग्रहातून आलेले सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ थोडक्यात मांडले आहेत.

**'पेटलेल्या शहराच्या कल्लोळात': सामाजिक संदर्भ -**

प्रस्तुत कवितेतून कवीने दुटप्पीपणे जगणाऱ्या माणसाच्या प्रवृत्तीवर भाष्य केले आहे. जातियता, मनुवादी प्रवृत्ती, सर्वांच्याच मनात घर करून बसली आहे. सामाजिक सौहार्दाच्या बाबतीत हाच मोठा अडसर ठरला आहे. म्हणून मैलाचा दगड ठरलेल्या संस्कृती विनाशकांना उखडून फेकण्यासाठीचा संकल्प या कवितेने केला आहे. ते म्हणतात,

"जरा थांबा दोस्तांनो
या थांब्यावरच्या अस्सल दगडानं मला उखडून फेकायचे आहे
प्रत्येक पिढीच्या स्थलांतराचा
रस्ता मला साफ करायचा आहे"१

प्रत्येक पिढ्यागणिक हे संस्कृतीचे दगड रोवले गेले आहेत. म्हणून हे प्रत्येक थांब्यावरचे दगड उखडून फेकू पाहणाराविद्रोह येथे व्यक्त होताना दिसतो. खून, मारामाऱ्या, हत्याकांड हा आतादैनंदिन कार्यक्रम झाला आहे. सामान्य माणूस हतबल होऊन या वास्तवाकडे पाहात राहण्याशिवाय काहीच करू शकत नाही. त्यांच्या कृतीने उद्ध्वस्त झालेल्या घरांचा, घरातील लोकांचा आक्रोश कोणालाही ऐकायला जात नाही. या क्रुरतेने मारली जातात ती गरीब, निरपराध माणसे असतात. मात्र हे का घडते...? कशामुळे क्रौर्याची सीमा गाठली जाते? हे का घडवून आणले जाते या मागचा कार्यकारणभाव शोधण्याचा कोणी प्रयत्न करत नाही. अशावेळी 'पेटलेल्या शहराच्या कल्लोळात' कवीमन संतापाने अंतर्बाह्य पेटून उठताना दिसते.

भ्रष्टाचार, मध्यमवर्गीय आत्मकेंद्री प्रवृत्ती कशी बेदरकारपणे वाटचाल करताना दिसते. याविषयीचे वास्तव अधोरेखित करून उपरोधिक अंगाने वर्तमानावर भाष्य ही कविता करते.

विषारी आणि रक्तबंबाळ करणाऱ्या प्रवृत्ती वाढत गेल्या. त्यांनी माणसाचे जगणे कठीण करून टाकले आहे. त्यामुळे सामाजिक पर्यावरण पुन्हा फुलवायचे असेल तर या जहरी प्रवृत्तीचा समूळ नायनाट केला पाहिजे, अशा कृतिशील विद्रोहाची जाणीव ही कविता करून देते. याविषयी कवी म्हणतो,

"या जंगलाचं जंगलपण राखायचे असेल तर

काटेरी झुडपांचा नायनाट करून
आकाशाला गवसणी घालणारी झाडं
इथं वाढवावी लागतील
तरच या माणसांच्या जंगलाचे अस्तित्व
अबाधित राहील"२

अशा प्रकारे प्रतिकात्मतेने ही अभिव्यक्ती झालेली दिसून येते.

जागतिकीकरणानंतरच्या काळात बाजार संस्कृती प्रचंड वाढत गेली.स्व-कष्टातून निर्माण केलेल्या उत्पादनाची किंमत शून्य झाली आणि दलाली प्रवृत्तीने कळस गाठला आहे. स्पर्धेच्या जगात सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे. एकीकडे वंचितांची पराभूत दुनिया आणि दुसरीकडे अर्थनिती ठरवणारांची, गडगंज संपत्तीवाल्यांची दुनिया, असे हे विषम, विरोधाभासी जगाचे भीषणत्व या कवितेने वाचकांसमोर ठेवले आहे.

"खरेदी विक्रीत दिसते जात
कोणी आधार देईल असे वाटत नाही
शेवटच्या माणसांनी व्यापार उद्यमात
ठामपणे उभारावे त्याला मदत होईल
असे वाटत नाही"३

या वास्तवासह कवी आपल्या समाजातील अस्वथता विविध कवितांतून विद्रोहीपणे मांडतो. तसेच कवितांतून सांस्कृतिक संदर्भही आले आहेत.

**'पेटलेल्या शहराच्या कल्लोळात':सांस्कृतिक संदर्भ –**

नीतिभ्रष्टता, धर्मांधता वाढत असूनव्यवस्था मुजोर झाली. अशा व्यवस्थेला शह देण्यासाठी संघटितपणे वैचारिक लढा देण्याची गरज निर्माण झाली आहे. बेताल कावकाव आणि सनातन वांझोटा आक्रोश या गोष्टी सांस्कृतिक जगताला दुषित करणाऱ्या आहेत. त्यांनी समष्टीला वेठीस धरले आहे. शांततेच्या प्रदेशावर विरजण घालणाऱ्या या प्रवृत्तीला वेळीच पायबंद घातला नाही तर सांस्कृतिक विश्व रसातळाला गेल्याशिवाय राहणार नाही. विषमता, अंधश्रद्धा या बाबी तंत्रज्ञानाच्या युगातही प्रबळ ठरल्या आहेत. एकीकडे सनातन अंधश्रद्धा माणसाचा जीव घेत आहे तर दुसरीकडे जन्मदात्रीच जन्माला आलेल्या अर्भकास मारून टाकत असेल तर मग मायेची ममता ही शाश्वत गोष्ट निरर्थक ठरते. त्यामुळे 'संस्काराच्या भात्यात' परत हवा भरण्याची गरज निर्माण झाली आहे.

तंत्रज्ञानाच्या झालेल्या अफाट वाढीमुळेएक नवी संस्कृती जन्मास आली आहे. तिच्याशी जुळवून घेणे ही अनिवार्यताच ठरली आहे. तरी आपण परंपरेतच गुरफटून राहणार असू तर ते करंटेपणाचे ठरणार आहे. म्हणून कवीने म्हटले आहे -

"क्षणाक्षणाने बदलणारे तंत्रज्ञान
फार पुढे जातेय
धरती अंबराशी संवाद साधतेय
वर्ल्ड वाईड वेबच्या अंतराळात शिरून
अद्भूत जगाशी केव्हा
संवाद साधणार आहोत आपण ?"४

यंत्र, तंत्रज्ञानाने प्रगती केली, संशोधनात भर घातली त्यामुळे संवाद साधणे सोपे झाले आणि अभासी जगाचे अमर्याद असे एक नवे विश्व उभे झाले. माणसाचा माणसाशी केवळ संवाद वाढला पण माणसे माणसांपर्यंत पोहचली नाहीत. त्यांचे भावबंध आणि परस्परसंबंध, नीतिमूल्ये या गोष्टी माणसाच्या वर्तनाच्या केंद्रस्थानी आल्या नाहीत. माणसे हरवत गेली आणि माणुसकीही हरवत गेलीहे फार अस्वस्थ करणारे वर्तमान आहे. संवाद साधला तरी माणसे जवळ येतीलच याची शास्वती नाही. असे का घडले असावे ? याविषयी संशोधन झाले पाहिजे. तरच भविष्याची दिशा ठरविता येईल असा विचार या कवितेने मांडला आहे.

**समारोप-**

साहित्यिक भोवताली घडलेल्या सुष्ट-दुष्ट प्रवृत्ती पाहूनअस्वस्थ होतो. त्या अस्वस्थेतून तो लिहायला लागतो. मग तो साहित्याचा कोणताही प्रकार असो. ही अस्वस्थता त्याच्या लेखनातून प्रतिबिंबीत होते. समाज, राजकारण, माणसातील मतभेद,

मनभेद, माणसाचे माणूसपण नाकारणारी ही व्यवस्था, प्रतिष्ठीतांची हुजरेगिरी, गरिबांवर अन्याय या साऱ्या समाजघटकातील गोष्टी सामाजिक जाणीव असणाऱ्या जिवंत माणसाला अस्वस्थ करतात. तो या व्यवस्थेविरुद्ध बंड करून उठतो. अशीच ही अस्वस्थता पंडित कांबळे कवितेत मांडतात. या कवितांमधून व्यक्ती, प्रवृत्ती, समाजकारण, राजकारण, जातीभेद, भ्रष्टाचार, पारंपरिक रुढी, परंपरा यातील विसंगतीवर नेमकेपणाने बोट ठेवलेले आहे.

**निष्कर्ष-**

१. कमीत कमी शब्दात आशयपूर्ण विषयाची मांडणी ही पंडित कांबळे यांच्या कवितेचे वैशिष्ट्ये आहे.
२. माणसाचा, माणुसकीचा शोध घेणारी जाणीव या कवितेतून प्रकट झाली आहे.
३. सामाजिक व सांस्कृतिक मुल्यांचा वेध ही कविता घेते.
४. ही कविता समतावादी समाजाची अपेक्षा व्यक्त करते.
५. जातीभेद, विषमता, भ्रष्टाचार, अमानवीयता, नीतिभ्रष्टता, निष्क्रियता यावर प्रहार करून उद्याचे भविष्य प्रकाशमय असावे असा आशावाद व्यक्त करते.

**संदर्भग्रंथ-**

१. पंडित कांबळे, पेटलेल्या शहराच्या कल्लोळात, समीक्षा पब्लिकेशन, पंढरपूर, प्रथमावृत्ती, २०२२, पृ. क्र.२४
२. तत्रैव पृ. क्र.२७
३. तत्रैव पृ. क्र.२९
४. तत्रैव पृ. क्र.३१

# २१ व्या शतकातील मोहन पाटील यांच्या कादंबरीतील बदलते सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**श्रीमती व्हसमने सुरेखा बसाप्पा**
शि. डॉ. बापूजी सांळुखे महाविद्यालय, मिरज
संशोधक विद्यार्थिनी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**गोषवारा :-**

साहित्य हे सांस्कृतिक व सामाजिक संचित आहे. समाजातील, मानवी जीवनातील संवेदना आणि जाणिवा यात साहित्यनिर्मितीचा स्त्रोत आहे. साहित्य म्हणजे सामाजिक आणि पर्यावरणाच्या संदर्भात मनुष्यमात्रांचा अभ्यास होय. कादंबरीतून अभिव्यक्त होणारे आशयद्रव्य विशिष्ट समाजातून, संस्कृतीतून येत असते. ते आशयद्रव्यज्या समाजजीवनातून घेतले जाते, त्या समाजाची भाषाही आशयद्रव्याबरोबरच कादंबरीत येते असते. २१ व्या शतकाची स्वत:ची अशी काही वैशिष्ट्ये आहेत. माहिती व तंत्रज्ञान युगाने संगणक, आंतरजाल, उपग्रह, मोबाईल सारख्या साधनांनी स्थलकालाच्या सीमारेषा पुसल्याने राष्ट्र, चलन, भाषा, दळणवळण, संस्कृती या गोष्टी जवळजवळ संपुष्टात आल्या आहेत. ग्रामीण जीवनातील आव्हाने बदलेली आहेत. नवनव्या भीषण समस्यांना सामोरे जाण्याच्या नवनव्या पध्दतींना ग्रामीण कादंबरीने काळजाला भिडेल असे सामाजिक आणि सांस्कृतिक बदल रेखाटले आहेत. २१ व्या शतकातील ग्रामीण कादंबरीचा अभ्यास करताना जाणवते की, नवनवीन विषय, आशय हाताळले आहेत.पारंपरिक चौकटीतून बाहेर येत ग्रामीण जीवनवर्णनात नवनवीन भाषिक रूपे, सामाजिक व सांस्कृतिक बदल पुढे आणलेले आहेत.

**प्रस्तावना :-**

२१ व्या शतकाच्या सुरवातीलाच एकूणच मानवी जीवनात, पर्यायाने ग्रामीण जीवनात प्रंचड उलथापालथ झाली. माहिती तंत्रज्ञान व आधुनिकीकरण म्हणजेच जागतिकीकरणाचा परिणाम सर्वच क्षेत्रावर झाला.त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रावरसुध्दा परिणाम झाला. त्यामुळे एकूणच ग्रामीण जीवनाच्या जाणीवाच बदलून गेल्या. २१ व्या शतकातील ग्रामीण जीवन अत्यंत गुंतागुतीचे व दृष्टचक्रात भरडले जाणारे आहे. ग्रामीण जीवन म्हणजे एकीकडे अश्वासनांची खैरात असून स्वर्गसुख वाटणारी आहे. पण प्रत्यक्षात अतिशय दाहक होरपळ आहे. २१ व्या शतकातील ग्रामजीवनाच्या ग्रामसंवेदना अधिकच भेसूर आहेत. शेतकऱ्यांसमोर अनेक समस्या उभ्या आहेत. अस्मानी-सुलतानी संकट, अल्पभूधारक शेतकरी, शेतीचे तुकडे पडणे, दुष्काळ, सावकारी कर्ज, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न, शेतीमालाचे भाव, महागाई, बेकारी, वाढता भ्रष्टाचार, सहकार क्षेत्रात बोकाळलेला भ्रष्टाचार, यातून निर्माण होणारी आंदोलने, संप, मोर्चे अशा अनेक समस्या २१ व्या शतकाच्या सुरवातीलाच ग्रामीण कादंबरीतून मांडण्याचा प्रयत्न झाला आहे.

**मोहन पाटील यांच्या कादंबरीची वैशिष्ट्ये:-**

मोहन पाटील हे १९८० नंतरचे महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांनी आपल्या कादबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचे लेखन ग्रामीण जीवनाचे वेध घेणारे आहे. पारंपारिक, रूढ, ग्रामीण जीवनाकडे न पाहता बदलत्या ग्रामीण जीवनाचे बदलते वास्तव चित्रित करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. बदलत्या ग्रामीण जीवनातून निर्माण होणाऱ्या समस्या, नातेसंबधातील ताण-तणाव, राजकारण, अर्थकारण, आगतिकता, निसर्गाचा कोप, ग्रामीण परिसरात रोजगार उपलब्ध नसणे, यासारखी विविध आशयसूत्रे मोहन पाटील आपल्या कादंबऱ्यातून मांडताना दिसतात.

मोहन पाटील आपल्या कादंबऱ्यातून सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्याच्या परिसरातील ग्रामीण माणसाच्या व्यथा, वेदना, शब्दबध्द केल्या आहेत. त्याचबरोबर राजकारणामुळे झालेला बदल, औद्योगिकीकरणाचा, जागतिकीकरणाचा ग्रामीण समाज जीवनावर झालेला परिणाम ते आपल्या कादंबऱ्यातून व्यक्त करतात. शिवाय परिवर्तनाची जाणीव मनात बाळगून मोठ्या जिद्दिने धडपडणारा नायक मोहन पाटील यांनी आपल्या कादंबऱ्यातून उभा केला आहे. गावगाड्यातील बदलत्या विचारात मानवी मूल्यांचा, जीवनमूल्यांचा ऱ्हास होत आहे याची जाणीव मोहन पाटील यांच्या कादंबऱ्यातून होते. मोहन पाटील यांचा ग्रामीण जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा आहे. त्यांच्या कादंबरीत केवळ ग्रामीण परिसराचे वर्णन आलेले नाही, तर ग्रामीण मनाला स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कादबऱ्यांतून जाणवते. त्यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा वाचकासमोर साक्षात उभ्या राहतात. मोहन पाटील यांच्या लेखनात संवेदनशिलता जाणवते. पाटील यांच्या कादंबऱ्यातील संवेदनशिलतेविषयी आपले मत व्यक्त करताना म. द. हातकणंगलेकर म्हणतात की, "मोहन पाटील यांच्या कादंबऱ्यातून समाज जीवनाचे भेदक चित्रण केले

आहे. ग्रामीण समाजजीवनातील मानवी रूपे, तिची जाणीव लेखकाला आहे. लेखकाचे अस्सल अनुभव आणि शोधक दृष्टी यामुळे हे अनुभव आणि चित्रण वास्तव ठरलेले आहे. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यातून ग्रामीण संवेदनशीलता जाणवते."[१]

**मोहन पाटील यांच्या कादंब-यातून दिसून येणारे बदलते सामाजिक व संस्कृतिक संदर्भ पाचुंदा**-सन २००२सालीपाचलघुकादंबऱ्याचासंग्रहएकत्रित 'पाचुंदा' यानावानेप्रकाशितझालाआहे. गावगाडा मोडून झालेली पंचायत, त्यातून निर्माण होणारी संमातर सत्तास्थानं, सहकारी संस्था, पाणी सोसायट्या अशा विकासाभिमुख सहकार संस्थातले भ्रष्ट राजकारण, अर्थकारण यामुळे गावकीत निर्माण झालेले ताण या सर्वांसह आलेले बदलत्या खेड्याचे वास्तवचित्रण मोहन पाटील यांच्या 'पांचुदा' लघुकादंबरीसंग्रहातून दिसून येते. ग्रामीण जीवनाचे सजग वास्तवभान आणि जिंवत व्यक्तिरेखाटन यामुळे या लघुकादंबरीसंग्रहाची उंची वाढली आहे.

**'कोंडमारा'**-या कादंबरीत खेड्यातील 'जानू' नावाच्या तरूण शेतकऱ्याची व्यथामांडली आहे. जानूपाटीलहा सामान्यशेतकरी कुटुंबातील आहे. शेतात वर्षभरराबून काबाडकष्ट करून पिकतील तेवढ्याच धान्यावर उपजिविका करणारा, नवे काहीतरी करावे म्हणून हातपायपसरणारा, कर्जाच्या कुबड्याचा आधार घेणारा, जानू नियतीपुढे, वखवखलेल्या ग्रामीण व्यवस्थेपुढे हतबल आहे. या कादंबरीत सहकारी साखरकारखान्यामुळे सामान्य जिराईत शेतकऱ्यांचा झालेला कोंडमारा किंवा शेतकऱ्यापुढे वाढून ठेवलेलं स्वप्नांच भविष्य, शेतकरी जानू पाटीलयाची व्यथा, वेदना मोहन पाटील यांनी या लघुकादंबरीत मांडली आहे.

**लिगाड** – या कादंबरीत शिकलेला, शहर गावाला नोकरीसाठी जाऊन परतगावी आलेला आणि शेती करू लागलेल्या रघूच्या नजरेतून या कादंबरीकडे पाहिले जाते. रघु शिवाच्या साथीन दाजीतात्याशी झुंज देणे म्हणजेच भिंतीवर डोके आपाटून घेण्यासारखे आहे. रघु, शिवा सारखी एकटी-दुकटी माणसे काहीच करू शकत नाहीत. कारण राजकारणाने ग्रामीण जीवनाचा श्वासनश्वास कोंडला आहे.

**खांदेपालट** –'खांदेपालट' मधील राजीचा मृत्यू ग्रामपंचायतीतील पांठिब्यासाठी झालेला दिसतो. विधवा, परित्यक्ता, दलित, शेतमजूरी करणाऱ्या स्त्रियांचे जीवन शोचनीय असल्याचे जाणवते. ग्रामीण जीवनाची बदलती चित्रे या कादंबरीत दिसते. सत्ताप्रमुख असणारा धोंडीनाना सरपंचपद आपल्याकडे राहावे म्हणून वेगळी राजकीय खेळी खेळतात. गावात दुफळी निर्माण करतात. महार, चांभार जातीत संघर्ष निर्माण करतात. मराठा – जैन यांच्यात भांडण निर्माण करतात. नानाकडे धूर्तपणा आहे. त्यांच्यातील धूर्तपणा त्यांच्या मुलांमध्ये नसतो. त्यामुळे त्यांना खऱ्या अर्थाने सत्तेची खांदेपालट करता येत नाही. त्यांचे जीवन अस्थिर होते. आपल्या जगण्यातला खोटेपणा लपविण्याचा प्रयत्न ते करतात. त्यांना खरेपणाने जगता येत नाही. या कादंबरीत धोंडीनांनाच्या व्यक्तिमत्त्वाचे दुभंगलेपणा जाणवते.

**बस्तान** –या कादंबरीत अक्कातंगीचा माळ व माळावरील दगड त्यातून तयार झालेली दंतकथा, त्याचबरोबर बदलत्या ग्रामीण जीवनातील संघर्ष किती पिळवटून टाकणारे असतात याचा प्रत्यय 'बस्तान' ही कादंबरी आणून देते. शंकरमामासांरख्या परगावातून आलेल्या लोंकानी जनतेची, समाजाची लुबाडणूक करून आपले बस्तान कसे बसवितात? आपल्या व्यवसायाचा विस्तार कसा करतात? याला स्थानिक लोक कसे बळी पडतात? आणि याला प्रतिकार करणारा बापू शंकरमामाचा डाव मोडून कसा काढतो? याचे चित्रण कादंबरीत मोहन पाटील यांनी केलेला आहे.

**साखरफेरा** - (२००६) साली प्रकाशित झालेल्या याकादंबरीत एकखेडे, खेड्यातील शेतकरी कुंटुब, निसर्गाची अवकृपा, 'बोरीगाव' या खेड्याच्या रूपातून संपूर्णखेड्यातील वास्तवाचे चित्रण अत्यंत यथार्थपणे लेखकाने साकारले आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या ऊसाला कारखान्या मध्ये दरदिला जातनाही. रस्त्यावर उतरल्या शिवाय ऊसाचा प्रश्नसुटणार नाही. यासाठी शेतकरी 'चक्काजाम' आंदोलन करतात. हंगामापूर्वी कारखान्याकडून ऊसाच्या दराची लेखीहमी घेऊन देशातील शेतकऱ्याची ताकद किती मोठी आहे हे जगाला दाखवून द्यायचे आहे. ऊस-उत्पादक शेतकऱ्याच्या वेदना लेखकाने अत्यंत मनोज्ञतेने मांडल्या आहेत. शेतकऱ्यांचा मनोव्यापार, त्यांची होणारी पिळवणूक, त्यांचे होणारे शोषण, त्यामुळे तडफडणारे मन आणि त्यांच्या निरनिराळ्या स्तरावरच्या कुंचबना, ग्रामीण विश्वाचे मनाला भावलेले, मनात रूतलेले वास्तव दर्शन जसेच्या तसे मोहन पाटील यांनी' साखर फेरा'कादंबरीत रेखाटलेआहे.

शेतकरी प्रश्नातून संघटना उदयासआली. या संघटनेने कष्टकरी शेतकऱ्याची स्थिती आक्रमक पवित्रा घेऊन समाजापुढे ठेवली. ग्रामीण महाराष्ट्रावर त्याचा प्रभाव पडला. प्रभावित प्रश्नांचे मग राजकारण सुरू झाले. याचा परिणाम ग्रामीण समाजावर ऊस उत्पादक शेतकऱ्यावर झाला. त्यातून सामाजिक जीवनात त्यांचे परिणाम जाणवू लागले, म्हणून मोहन पाटील यांनी 'साखरफेरा' कादंबरीत हा प्रश्न व्यापकतेने मांडलेलाआहे.

**बांडगुळअख्यान(२०१५)**- याकादंबरीत मोहनपाटील यांनी जवळपास शंभरवर्षाचा काळपट घेतला आहे. छ. शाहूमहारांजाच्या काळात असणाऱ्या वेशीचा गाव, ती वेसपाडून गावात घुसूदेणारे वर्तमान गाव असा विस्तृतपट कादंबरीत येतो.

या कादंबरीने समकालीन वास्तवाचे चित्रणकरीत असताना अनेक प्रश्न उभेकेले आहेत. दृष्टप्रवृत्ती, भ्रष्ट मूल्यहिन राजकारण, समाजकारण, जीवघेणी आर्थिक स्पर्धा या सर्व गोष्टी काळाच्या एक अपरिहार्य भाग म्हणून समोर येत असतानाच आपली सांस्कृतिक मूल्ये, सामाजिक, राजकीय, मूल्याधिष्ठीतभान, कौटुंबिक स्तरावरील आणि सामुहिकस्तरावरील नातेसबंधासाठी , मानवी विकासासाठी, त्यांच्या उन्नत्तीसाठी काय योग्य-अयोग्यआहे याचाविचारही कादंबरीकरायला लावते.

तीन पिढ्यांच्या संघर्षातून वाटचाल करणारा गाव आणि जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावर उभा असणारा गाव संपुर्णपणे शहरात विसर्जित होतो की, आपले स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व या जागतिकीकरणाच्या रेट्यात कसा टिकवतो? कादंबरी हा प्रश्न वाचकांसमोर उभी करते. समाजातील राजकारण, समाजकारण, शिक्षण व्यवस्था यासर्व सामाजिक संस्थाचे बांडगुळी करणहोत आहे. मुळवृक्षतोच आहे पण बांडगुळाची होणारी वाढ भयचकीत करणारी आहे. आजच्या बदलेल्या खेड्याचे, त्या खेड्यामध्ये उगवलेल्या बांडगुळी राजकारणाचे आणि संस्कृतीचे, बागायती पट्ट्यातले खेडे, शहराच्या जवळ असणाऱ्या खेड्याचे संबध आणि खेड्याचे होणारे शोषण हे सर्व याआख्यानाचे एकपरिणाम आहे. या सगळ्या विपरित वास्तवाचे चित्रण ग्रामपंचायतीला केंद्रस्थानी ठेऊन मोहन पाटील यांनी अतिशय प्रभावीपणे केले आहे.

**निष्कर्ष :-**

- मोहन पाटील यांनी आपल्या कादंबऱ्यातून ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रित केले आहे. १०९० नंतर जागतिकीकरण, खासगीकरण, उदारीकरण, भांडवलशाही, आधुनिकीकरण, शासनाच्या विविध योजना, भ्रष्टाचार, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, राजकारण हे सर्व खेड्यांमध्ये शिरल्यामुळे ज्या विविध समस्या निर्माण झालेल्या आहेत, त्याची दखल मोहन पाटील यांच्या कादबऱ्यांनी घेतली आहे.
- शहरातील भडक संस्कृतिचे आकर्षण, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, शिक्षण, उद्योग व्यवसाय यामुळे गावाकडून शहराकडे होणारे विस्थापित आणि त्यामुळे भकास, ओसाड होत जाणारे खेडे दिसून येते.
- प्लॉटीकरणामुळे पडीत जमीनीमध्ये होणारी वाढ त्यामुळे उत्पन्नात होणारी घट, नोकऱ्यांमधील गैरप्रकारांमुळे बेकारांच्या संख्येत होणारी वाढ, गावातील राजकारण, त्यातून निर्माण होणारी गुंडगिरी, व्यसनाधिनता, गटबाजी या सर्वांचा बळी ठरणारा ग्रामीण माणूस, समाज मोहन पाटील यांच्या कादंबऱ्यातून दिसत आहे.
- मोहन पाटील यांनी २१ व्या शतकातील आजच्या खेड्याशी नाते जोडून तिथल्या कृषीव्यवस्थेला, ग्रामीण जीवनाला, समाजाला, संस्कृतीला त्यांच्या पडझडीला समजून घेण्याचा नेहमीच प्रयत्न केला आहे.

अशाप्रकारे मोहन पाटील यांनी आपल्या कादंबऱ्यातून सातत्याने बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेतला आहे. या सर्वच कादंबऱ्यात २१व्या शतकातील ग्रामीण राजकारण, अर्थकारण यामुळे सामाजिक व सांस्कृतिक झालेले बदल अत्यंत सांक्षेपी दृष्टीने टिपलेले दिसून येतात

**संदर्भ सूची :-**

१. हातकणंगलेकर, म. द. – दै. पुढारी, कोल्हापूर दिंनाक १७ ऑगस्ट १९९१
२. पाटील, मोहन - 'पांचुदा' कादंबरी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००२
३. पाटील, मोहन - 'साखरफेरा' कादंबरी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे २००६
४. पाटील, मोहन - 'बांडगुळ आख्यान' कादंबरी, सायन प्रकाशन पुणे, २०१५
५. पाटील, मोहन - 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती', स्वरूप प्रकाशन,२००८

# " परोपकारी श्याम " या बालकादंबरीतील स्त्रीव्यक्तिरेखांच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास

**प्रा.पुरुषोत्तम प्र.सूर्य**
( संशोधक विद्यार्थी)
मु.पो.काटा ता.जि.वाशीम.
पिनकोड क्र.444505

**गोषवारा :-**

मराठी साहित्यात विविध साहित्य प्रकारांत विपुलतेने लेखन झाले आहे. मराठीत आशयसमृद्ध अशा बहुविध साहित्यकृती साहित्याच्या विविध प्रकारांमध्ये आढळतात. खरे तर" साहित्य हा समाजाचा आरसा" असतो. त्यामुळे समाजाचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले दिसून येते. साहित्यिक आपल्या अवतीभवतीच्या जीवनामध्ये घडणाऱ्या विविध घटनांचे अचूकतेने वेध घेऊन आकलन करतो. सर्जनशील साहित्यिक आपल्या लेखणीतून अनुभवांच्या आधारे त्याचे चित्रण साहित्यातून व्यक्त करतो. आपल्या कल्पनेच्या आणि प्रतिभेच्या बळावर साहित्यकृतीतून वास्तवचित्र उभे करण्याचा प्रयत्न करतो. प्रा. देवबा पाटील हे मराठी साहित्यातील एकबहूआयामी आणि व्यासंगी असे व्यक्तिमत्व आहे. आपल्या साहित्यातून त्यांनी समाजातील विविध प्रश्न, समस्या, घटना, प्रसंग, घडामोडी, घटनांचे परिणाम इत्यादी गोष्टींचा वस्तुनिष्ठपणे वेध घेतला आहे. समाजातील विविध व्यक्तिरेखांच्या माध्यमातून आपल्या अनुभवाच्या आधारे त्यांना समाजमनावर बिंबवण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्यिक प्रा. देवबा पाटील यांचे साहित्य रंजकतेला सोबत घेऊन सामाजिक- सांस्कृतिक प्रबोधनाचा उद्देश अभिव्यक्त करणारे आहे. साहित्यिक प्रा. देवबा पाटील यांची "परोपकारी श्याम" ही बालकादंबरी अलीकडच्या काळात प्रकाशित झालेली आहे. कादंबरीकार प्रा. देवबा पाटील यांनी या बालकादंबरीतून" श्याम "या मुख्य व्यक्तिरेखेच्या अनुषंगाने समाजातील विविध व्यक्तिरेखांच्या जीवनशैलीचे दर्शन घडविले आहे. समाजातील अनेक ज्वलंत समस्या आणि लोकजीवन विविध व्यक्तिरेखांच्या माध्यमातून या बालकादंबरीतून प्रतित झाल्याचे दिसून येते. कादंबरीकराने विविध व्यक्तिरेखांच्या माध्यमातून त्यांचे समाज जीवन अधोरेखित करतांना स्त्री जीवनाचाही सूक्ष्मपणे अभ्यास केला आहे. विविध स्त्रीव्यक्तिरेखातून स्त्री जीवनाचा पट उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. समाजातील वेगवेगळ्या स्त्रीव्यक्तिरेखांतून विविध स्तरातील स्त्री जीवनाचे पदर उलगडून वास्तवचित्र समोर आणण्याचा प्रयत्न या बालकादंबरीतून झाला आहे. आजही समाजातील स्त्रियांचे प्रश्न पूर्णपणे सुटलेले नाहीत, अशी वस्तुस्थिती असूनही आपली संस्कृती आणि मूल्य परंपरांची जोपासणा करणारी स्त्री सामाजिक जीवन जगतांना कादंबरीमधून चित्रित झालेली दिसून येते.सामाजिक अपप्रवृत्ती आणि अनुचित घटनांविषयी सजग भान असलेली स्त्री आईच्या व्यक्तिरेखेतून प्रतित झाली आहे. समाजात निराधार आणि वंचित स्त्रिया अभावग्रस्त जीवन जगत असतांना दिसतात. त्यांचा आर्थिक विवंचनेचा मुख्य प्रश्न आहे. अशा निराश्रित स्त्रीच्या जगण्याचा संघर्ष वृद्ध स्त्रिच्या व्यक्तिरेखेतून प्रकर्षाने दिसून येतो. समाजामध्ये अल्पवयीन मुलांकडे आई-वडिलांचे होणारे दुर्लक्ष आणि त्यामुळे उद्भवणारे गंभीर परिणाम हा चिंतेचा विषय आहे. असा हा चिंतनशील आणि ज्वलंत विषय कादंबरीकारानेसामाजिक बांधिलकी आणि सेवा कर्तव्यपूर्तीची जबाबदारी प्रामाणिकपणे निभवणा-या स्त्री डॉक्टरच्या व्यक्तिरेखेतून अधोरेखित केली आहे. एकूणच या कादंबरीतून समाजातील विविध स्त्रीव्यक्तिरेखांतून स्त्रियांचे जीवनातील विविध प्रश्न आणि स्थान व भूमिका विशद झाली आहे.

**आशय सूचक शब्द :-** मानवतावाद , सेवाभाव, चौकसबुद्धी , अचूकनिर्णयक्षमता, सामाजिक बांधिलकी,सेवाकर्तव्यपूर्ती, अभावग्रस्त जीवन

**प्रस्तावना :-**

साहित्यिक प्रा. देवबा पाटील हे मराठी साहित्यातील एक उत्तुंग म व सर्जनशील लेखन करणारे व्यक्तिमत्व आहे. त्यांच्या लेखन साहित्याचा विशेष भर हा बालकेंद्रित आहे , असे दिसून येते .बालसाहित्यामध्ये त्यांनी विविध साहित्यप्रकारांमध्ये भरपूर लेखन केले आहे. साहित्यिक प्रा. देवबा पाटील यांची" परोपकारी शाम" ही बालकादंबरी उल्लेखनीय आणि आशय समृद्धपूर्ण आहे. कादंबरीतील घटना, प्रसंग, परिसर, निसर्ग, शेती, पशुपक्षी, माणसे, बोली इत्यादी अनेक बाबींवरून कादंबरीचे भौगोलिक क्षेत्र ग्रामीण भागातील आहे हे अधोरेखितहोते . कादंबरीकार प्रा. देवबा पाटील यांनी या बालकादंबरीतून ग्रामीण लोकजीवनाचा अतिशय व्यापकपणे वेध घेतला आहे."परोपकारी श्याम" बालकादंबरीतून ग्रामीण व शहरी समाजजीवन आणि त्या संबंधित प्रश्न विविध व्यक्तिरेखांमधून प्रतित झाले आहेत. समाज जीवनातील विविध घटकांप्रमाणेच स्त्री जीवन आणि त्यांचे

समाजातील स्थान विविध स्तरातील स्त्री व्यक्तिरेखांच्या रूपातून कादंबरीकारांनीआविष्कृत केले आहेत.या बालकादंबरीतून तरुण मुलगी, वृद्ध स्त्री, आई, डॉक्टर स्त्री, समाजातील कष्टकरी स्त्री, स्वाभिमानी ,चाणक्य, सामंजस्य व संवेदनशील स्त्री, निसर्गाविषयी प्रेम व ओढ,आस्तिकता जोपासणारी स्त्री, शहरी स्त्री अशा स्त्रीव्यक्तिरेखांचे जीवनदर्शन घडते. कादंबरीकारांनी या स्त्रीव्यक्तिरेखांतून समाज जीवनातील विविध आशयाच्याअंगाने स्त्री जीवन रेखाटलेले आहे. स्त्री जीवनाच्या विविध आशयाच्या अंगांपैकी या स्त्रीव्यक्तिरेखांतून स्त्रियांच्या सामाजिक जीवनाचा सर्वांगिण अभ्यास करण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून केला आहे.

**" परोपकारीश्याम " याबालकादंबरीतील सामाजिक स्त्रीव्यक्तिरेखांचाअभ्यास :-**

आजही ग्रामीण समाजातील लोक जीवनात परस्पर सहकार्याची भावना जोपासली जातेअसे,दिसून येते. ग्रामीण समाज जीवनात स्त्रीपुरुष आणि तसेच समाजातील तरुण मुलेमुली यांच्या ठिकाणी असलेली सामाजिक बांधिलकीची भावना अनेक घटना प्रसंगांमध्ये प्रत्ययाला येते. समाजातील निराधार वृद्ध मंडळींना मानवतेच्या दृष्टिकोनातून स्त्री-पुरुषांबरोबरच त्यांची मुलेही सामाजिक बांधिलकी जोपासतांना दिसून येतात. समाजातील निराधार वृद्ध मंडळींना गरजेच्या प्रसंगी ते क्षमतेनुरूप सहकार्य करण्याचा प्रयत्न करतांना दिसून येतात. मुलांच्या या सामाजिक बांधिलकीच्या भावनेला प्रोत्साहन देणाऱ्या आणि कौतुक करणाऱ्या अनेक स्त्रिया ग्रामीण समाज जीवनात दिसून येतात. आपल्या मुलांमध्ये माणुसकीचे मूल्य संस्कार रुजावेत अशा अपेक्षापूर्तीसाठी स्त्रिया मुलांना त्यांच्या चांगल्या कार्याला नेहमीच प्रोत्साहन देतांना आढळून येतात." परोपकारी श्याम" या बालकादंबरीतील प्रा. देवबा पाटील यांनी "आजारी आजीच औषध" या कथेतून मानवता व सेवाभावी प्रवृत्ती जोपासणाऱ्या आईचे चित्रण सीताबाई या स्त्रिव्यक्तिरेखेतून प्रतित केले आहे. सीताबाईचा मुलगा व या कादंबरीचा नायक "श्याम "हा गावातील एका आजारी वृद्ध स्त्रिला ताप आल्यामुळे तिची संपूर्ण देखभाल करतो. म्हाताऱ्या स्त्रिला आजारपणातून लवकर बरे व्हावे, म्हणून स्वतः काळजी घेतो. श्याम आपल्या कष्टाच्या जमवलेल्या पैशातून आजारी म्हाताऱ्या स्त्रिला डॉक्टरकडून औषधी आणून देतो. संध्याकाळी श्याम आई सीताबाईला वृद्ध स्त्रिच्या आजारपणाविषयी संपूर्ण परिस्थितीची जाणीव करून देतो. वृद्ध निराधार आजारी स्त्रिला जेवणासाठी आई सीताबाईलाआपल्या घरची भाकरी देण्याचा मानस व्यक्त करतो. त्यामुळे आई सीताबाई आनंदाने एक भाकरी बनवून जेवणासाठी आजारी म्हातारी स्त्रिला देण्यास शामला सांगते. यातून आईसीताबाईच्या "परोपकारी व सेवाभावी" वृत्तीच्यापरिचयाचे दर्शन घडते. श्यामने फुले विकून जमवलेल्या बचतीच्या पैशातून शाळेचा गणवेश खरेदी करण्याचा बेत केलेला होता.वृद्ध आजारी स्त्रिला कोणाचाही आधार नसल्यामुळे व तिची गरीब परिस्थितीश्यामच्या लक्षात आल्याने तो जमवलेले बचतीचे सर्व पैसेवृद्ध स्त्रिच्या औषधपाण्यासाठी खर्च करतो. त्यामुळे शाळेत गणवेश नसल्यामुळे श्यामला शिक्षकांकडून शिक्षा केली जाते.शाळेचा गणवेष खरेदी करता आले आला नाही, याविषयीची खंत तो आई सीताबाईजवळ व्यक्त करतो. त्यावेळी सीताबाईतील आईच्या मनाच्या मोठेपणाचे दर्शन घडते. मुलाच्या चांगल्या कामाविषयी सीताबाईला अभिमान वाटतो. आई सीताबाई श्याममधील सत्कार्य प्रवृत्तीला प्रोत्साहन देते आणि कृतज्ञता भाव प्रकट करते. ती श्यामला म्हणते, " जातीनं बाळा हेही दिवस निघून. पनं तुनं एक फार चांगलं काम केलं. याचा आमाले लय आनंद झाला. "१( पृष्ठ क्रमांक 15) आई सीताबाई श्यामला समजावून सांगून त्याच्यातील संस्कारमूल्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करतांना दिसून येते.

आपल्या समाजात स्त्री कुटुंब व्यवस्थितरीत्या सांभाळण्याचे कर्तव्य करतांना दिसून येते. ग्रामीण समाज जीवन असो अथवा शहरी समाज जीवन असो, समाजातील कित्येक स्त्रिया स्वतःच्या कष्टावर कुटुंबाला हातभार लावतांना दिसतात. ग्रामीण समाज जीवनात अनेक स्त्रियांना कोणाचाही आधार नसतांना त्या आपले जीवन अनेक अडचणींवर मात करून जगतआहेत, असे दिसून येते. समाजामध्ये बऱ्याचशा कुटुंबात स्त्रियांच्या वाट्याला निराधार व अभावतेचे जीवन आल्याचे दिसून येते . अशा निराधार स्त्रिया बिकट परिस्थितीत आपला जीवनचरितार्थ चालवतांना दिसतात. शरीर प्रकृतीची चांगली साथ मिळते तोपर्यंत त्यांना इतरांच्या आधाराची गरज वाटत नाही.स्त्रियांना जसा वृद्धापकाळवाट्याला येतो तसे त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याचे प्रमाण समाजामध्ये वाढलेले दिसून येते.वृध्दाकाळात अशा स्त्रियांना अनेक संकटांचा सामना करावा लागतो. आर्थिक समस्या, कठीण प्रसंगी देखभाल करणे आणि आरोग्याची काळजी घेणे तसेच दैनंदिन उपजीविकेचा प्रश्न अशा कितीतरी समस्या निराधार स्त्रियांसमोर वृध्दापकाळी आवासून उभ्या ठाकतांना दिसून येतात.वृध्दापकाळी अनेक स्त्रियांच्या नशिबी काठीचा आधार नसल्याने हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याचे चित्र समाजामध्ये पाहावयास मिळते. गरीब परिस्थितीमुळे कोणीही त्यांची देखभाल करत नाही. वृद्ध निराधार स्त्रियांची काळजी घेण्यास समाजामध्ये कानडोळा केला जातो. वृद्धापकाळी स्त्रियांकडे लक्ष दिले जात नाही असे दिसून येते. म्हातारपणात आर्थिक आधार नसल्यामुळे वृद्ध स्त्रियांना आरोग्याची व्यवस्थित काळजी घेता

येत नाही. त्यांच्या प्रकृती स्वास्थ्याची हेळसांड होताना दिसते. त्यामुळे“ स्त्रिया जशा वृद्ध होत जातात तसे त्यांच्याकडे समाजाचे दुर्लक्ष करण्याचे प्रमाण वाढत जाते, असे निरीक्षण“ हेल्पेज इंडियाच्या“ (Helpes India ) अहवालात जागतिक श्रेष्ठ नागरिकछळप्रतिबंधक दिनाच्या निमित्ताने आढळून आलेले आहे. हेल्पेज इंडियाने (Helpes India is an Indian Organization where jibby and the government are focused on the concern of Elders and support geriatricintiative established in 1978 )वृद्ध स्त्रिया आणि त्यांच्या कुटुंबांमध्ये शारीरिक व मानसिक आरोग्य जपण्याविषयी जागरूकता करणे गरजेचे असल्याचे मत नोंदविलेले आहे“२. कादंबरीकार प्रा. देवबा पाटील यांनी या बालकादंबरीतील“आजारी आजी औषध“ या कथेतून एका निराधार व अभावग्रस्त वृद्ध स्त्रीचे जीवन अधोरेखित केले आहे या कादंबरीचा नायक“ श्याम“ हा शहरांमध्ये फुले विकण्याचे काम दैनंदिनपणे करत असतो. त्याकरिता तो गावातील तळ्याच्या ठिकाणी असलेल्या फुलझाडांची फुले दररोज तोडून आणत असतो. एक दिवस श्याम फुले तोडून रस्त्याने घराकडे परत येत असतांना त्याला एका झोपडीतून म्हाताऱ्या स्त्री विव्हळत असल्याचा आवाज ऐकू येतो. श्याम झोपडी मध्ये जाऊन पाहतो.झोपडीत म्हातारी स्त्री फाटक्या गोधडीवर तापामुळे त्रस्त पडून असलेली दिसून येते. त्या म्हाताऱ्या स्त्रिला कोणाचाही आधार नसल्यामुळे तीनिराधार व निराश्रित असल्याचे श्यामच्या लक्षात येते. म्हातारी स्त्री ताप आल्यामुळे त्रस्त झालेली होती. श्यामच्या अंगी मानवता आणि भूतदयेची वृत्ती असल्यामुळे म्हातारीची आपुलकीच्या भावनेने विचारपूस करतो. त्यावेळी कादंबरीचा नायक “श्याम“ या बालकाजवळ म्हातारी स्त्री आपल्या अंतर्मनातील दुःखद भावना व्यक्त करते. कादंबरीकार प्रा. देवबा पाटील त्या संवादप्रसंगाचे वर्णन“कोण हाय बाबा तू, आमा गरीबाले ईचारणारा ? म्हता-याईलेपुसणारा? “३ (पृष्ठ क्र.13 ,14)आजारी वृद्ध आजीबाईला दवाखान्यात न जाण्याचे कारण विचारल्यावर ती वृद्ध आजारी स्त्री श्यामला“रामाचा पोरं हाय तू? बईस अठीखाली. कशी जाऊ म्या दवाखान्यात ? कोण नेयीनंमले ? तू सांग माहयाजोय काय पयसे हाय ? त्या डाकतरलेदेयाले ? अन् अवषिध्याघेयाले. माह्यासारख्या बिनकाम्या बुढीले कोण देईनरं पयसे. बरी हुईनतसीचं आपुआप.” ४(पृष्ठ क्रमांक. 14 ) अशा प्रकारे आजारी म्हातारी स्त्री श्यामजवळ आपल्या वृद्धावस्थेमुळे आलेल्या हतबलतेची आणि आर्थिक विवंचनेची समस्या व्यक्त करते.वृद्धापकाळी निराश्रित असल्याचे दुःख म्हाताऱ्या स्त्रीच्या बोलण्यामधून श्यामला जाणवले होते.त्यामुळे श्याम फुले विकून जमवलेल्या बचतीच्या पैशातून डॉक्टरकडून औषधी म्हाताऱ्या स्त्रिला आणून देतो.

ग्रामीण भागातील समाजातील जीवनामध्ये श्रमजीवी वर्ग हा मोठ्या प्रमाणावर आहे.ग्रामीण भागात शेती हाच मुख्य व्यवसाय असतो. शेती व्यवसायातील संबंधित कामे अतिशय काबाडकष्टाची आणि स्वतः अंग मेहनतीने करावी लागतात. त्यामुळे ग्रामीण भागातील स्त्रीपुरुष आणि तरुणवर्ग शेतामध्ये कष्ट आणि मोलमजुरीचे काम करतांना दिसतात. दररोजच्या कष्टाच्या कामावरच त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून असतो. कष्ट केले तरच कुटुंबाची उपजीविका होते.त्यामुळे सर्व कष्टकरी वर्ग सुखा समाधानाने नांदताना ग्रामीण समाज जीवनामध्ये आढळून येतो. ग्रामीण भागात अचानकपणे बाहेरगावाहून एखाद्या व्यक्तीचे आगमन झाले तर त्या व्यक्तीची आपुलकीने शहानिशा केली जाते.मात्र अपरिचित व्यक्ती गावामध्ये आली असेल तर तिच्याबद्दल कसोशीने जाणून घेवून आश्रय देता वेळेस खूप विचार केला जातो. त्या व्यक्तीचा पूर्वजीवन इतिहासाविषयी कोणालाच कल्पना नसते.अशा अपरिचित व्यक्तीच्या जीवनाविषयी संपूर्ण माहिती जाणून घेण्याच्या अगोदरत्याच्याकडे संशयाच्या नजरेने बघितले जाते. त्याच्या वर्तनव्यवहाराविषयी समाजातील सर्वांमध्येच अनभिज्ञता असते. अशा अपरिचित व्यक्तीला गावात आश्रय देतांना ग्रामीण भागातील पुरुषांबरोबरच स्त्रियांसुद्धा अतिशय गांभीर्यपणे या गोष्टींकडे लक्ष देतांना दिसतात. अपरिचित व्यक्तींविषयी त्यांच्याही मनात उत्पन्न झालेलीसाशंकता एखाद्यावेळी अचूक असूशकते. प्रा. देवबा पाटील यांनी या बालकादंबरीतील“भिकाऱ्याला काम“ या कथेतून चौकसबुद्धी, अचूक निर्णयभान आणि चाणाक्षवृत्तीही गुणवैशिष्ट्ये असलेल्या आईचे चित्रण “सीताबाई” च्या स्त्रिव्यक्तिरेखेतून चित्रित केले आहे.

या बाल कादंबरीचा नायक “श्याम “हाफुलेविकून शहरातून गावाकडे परत येत असतो. रस्त्याच्याकडेला त्याला एक बेहोशहोवून पडलेली व्यक्ती दिसते. श्याम त्या व्यक्तीच्या जवळ जावून पूर्ण विचारपूस करतो. भीक मिळाली नसल्यामुळे तोव्यक्ती उपाशीपोट होता. त्यामुळे उपाशीपोटी असल्यामुळे तो व्यक्ती चक्कर येवून पडलेला होता. दररोज भीक मागून तो आपली उपजीविका करत असल्याचे त्याने श्यामला सांगितले. माणुसकीच्या भावनेने श्याम त्या शरीरप्रकृतीने धष्टपुष्ट दिसणाऱ्या व्यक्तीला आपल्या पैशातून नाश्ता-चहापाणी यांची व्यवस्था करतो. पुढे श्याम त्या व्यक्तीला भीक मागण्यापेक्षा आपल्या गावातील बाभूळबनात बाभळीचा डिंक काढून विकण्याचा व्यवसाय करण्याचा सल्ला देतो. शामच्या या युक्तीमुळे त्या व्यक्तीचे भीक मागणे आणि पोट भरण्यासाठी मजुरीचा प्रश्न सुटतो. श्याम त्या अपरिचित भिकाऱ्या व्यक्तीला आपल्या गावामध्ये घेवून येतो. गावातील मंदिरामध्ये त्या व्यक्तीच्या राहण्याची व्यवस्था करतो. शाम संध्याकाळी आई“ सीताबाईला“ भीक

मागणाऱ्या व्यक्तीची संपूर्ण हकीकत सांगतो. श्यामने "भिकारी" हा शब्द उच्चारताच आई सीताबाईला एकदमछातीमध्ये धडकाभरतो.अपरिचित अशा भिकारी व्यक्तीविषयी आई सीताबाई श्यामला बऱ्याच गोष्टी समजावून सांगते कारण अनेकदा अशा व्यक्तींच्या वागण्यातून समाजात अनुचित घटना प्रकार झाल्याची अनेक उदाहरणेघडून गेलेली असतात .अशा काही व्यक्ती केवळ आळशीपणामुळे विलासीवृत्तीच्या बनलेल्या असतात. त्यांना कष्टाची कामे न करता जीवन उपभोगण्याची सवय जडलेली असते. त्यामुळे श्रम न करता पर्यायी स्वरूपाच्या अनुचित कामाची निवड करून आपली उपजीविका करणे ही त्यांची दिनचर्या ठरलेली असते. एखाद्यावेळी काही साध्य झाले नाही तर उपाशीपोटी राहण्याची वेळ येते तेव्हा त्यांच्याकडून बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करून पोट भरण्याचा मार्ग निवडला जातो. उदाहरणार्थ चोरी करणे,लुटमार करणे, दरोडा टाकणे, अशा घटना ह्या शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही घडलेल्या आहेत. त्यामुळे श्यामने भिकारी व्यक्तीविषयीची आई सीताबाईला सांगताच तिच्या चौकसबुद्धी आणि चाणाक्षवृत्तीचाप्रत्यय येतो. शामला व्यवस्थितपणे परिस्थितीची जाणीव करून देतांना सीताबाई म्हणते, " श्याम बाळा, आज काल कुनाची काहीच खात्री देता येत नाही. तो कुणी चोरभामटा निघालाअन् त्यानं गावात कुठी कधी चोरीबिरी केली तर लोक आपल्या नावाने कांदे फोळतीनं."५ ( पुष्ट क्रमांक. 27)आईने जाणकरून दिल्यानंतर त्या व्यक्तीविषयीची पूर्ण खात्री करून देतो..सीताबाईच्या शंकांचे निरसन झाल्यानंतर त्या भिकारी व्यक्तीसाठी तीआपल्याच घरी जेवण तयार करते. मुलगा" श्याम"वर पूर्ण विश्वास दाखवून सीताबाई त्याला शक्य तेवढी मदत करण्यास तयार होते.

आज जागतिकीकरण आणि यांत्रिकीकरण फार मोठ्या प्रमाणावर झाले आहे. या आधुनिकीकरणाचा समाजावर फार मोठा परिणाम झाला आहे. समाज जीवनावर या भौतिकवादाचा परिणाम झाल्यामुळे लोकजीवनात फार मोठा बदल झालेला दिसून येतो. आज समाज जीवन पूर्णपणे चंगळवादाच्या आहारी गेलेले आहे, असे दिसून येते. त्यामुळे भौतिकसोयीसुविधांचा आणि साधनांचा वापर फार मोठ्या प्रमाणावर समाजात होतांना दिसतो. समाजातील सर्व स्तरातील वयोगटांमध्ये तसेच अल्पवयीन वर्गामध्येही या भौतिकसाधनांचा वापर करण्याचे प्रमाण वाढलेले आहे. समाजातील स्त्री- पुरुष , अल्पवयीन तरुण मुलेमुली यांत्रिक आणि भौतिक साधनसुविधांच्या मोहजाळात गुंतून गेलेले दिसून येतात. आपल्या सभोवती घडणाऱ्या सामाजिक घटनांविषयी कोणालाही फारसे लक्ष द्यायला वेळ नाही, असे वास्तव समाजचित्र अनुभवास येत आहे. कुटुंबामध्येही आई-वडिलांना आपल्या अल्पवयीन पाल्यांच्या वर्तनव्यवहाराकडे लक्ष द्यायला वेळ नाही. आई-वडिलांचे अल्पवयीन पाल्यांच्या वर्तनाकडे दुर्लक्ष होणे आणि त्यांच्या वर्तनाला सहजतेने घेण्याच्या निष्काळजीप्रवृत्तीमुळे समाजात अनेक गंभीर घटना घडतांना दिसतात. अशा गंभीर घटनांच्या वाईट परिणामांना सामोरे जावे लागण्याचे कित्येक प्रसंग आज समाजातप्रत्ययाला येतात.समाजामध्ये कित्येक कुटुंबातील आई-वडील आपल्या अल्पवयीन पाल्यांच्या अनेक कृतींचे प्रेमाने कौतुक करतांनादिसतात. त्याचप्रमाणे परिणामांचीही जाणीव वेळोवेळी आपल्या पाल्यांना करून द्यायला पाहिजे. आपल्या अल्पवयीन पाल्याला अयोग्य आणि बेकायदेशीर कृतींपासून परावृत करणे हे पालनकर्ता म्हणून आई-वडिलांचे कर्तव्य असते.पाल्यांवरील होणारे दुर्लक्ष आणि निष्काळजीपणामुळे घडणाऱ्या घटनांच्या गंभीर परिणामांना आई-वडील सर्वस्वी कारणीभूत असतात. कादंबरीकार प्रा. देवबा पाटील यांनी या बालकादंबरीतील "अपघाती सहकार्य " या कथेतून सामाजिकदायित्व आणि सेवाकर्तव्यपूर्तीभाव जोपासणाऱ्या समाजातील एका स्त्री डॉक्टरच्या व्यक्तिरेखेचे चित्रण केले आहे. कादंबरीचा नायक "श्याम " हा शहरात आपली दररोजची फुले विकून गावाकडे परत येत असतो. त्यावेळी त्याला एक पंधरा- सोळा वर्षाचा अल्पवयीन मुलगा वेगाने मोटरसायकल रस्त्याने चालवितांना दिसतो. तोमुलगा रस्त्यामधील इतर वाहनांना मागे टाकून पुढे जाण्याच्या प्रयत्नांमध्ये असतोतेव्हा समोरून विरुद्ध दिशेने येणाऱ्या एका जड वाहनामुळे त्या अल्पवयीन मुलाचा अपघात होतो. त्याच्या आई-वडिलांचे आपल्या मुलाकडे लक्ष नसावे. मुलांवरील दुर्लक्षामुळेच या गंभीर घटनेच्या परिणामाला आई-वडीलच कारणीभूत आहेत,असा विचारश्यामच्या मनामध्ये येतो. प्रसंगावधान राखून श्याम त्या लहान मुलाची मदत करतो. त्या लहान मुलाला तो रस्त्याच्या बाजूला उचलून घेतो. अल्पवयीन मुलाच्या डोक्याला गंभीर मार बसलेला असतो .श्याम त्या अल्पवयीन जखमी मुलाला खाजगी वाहनातून शहरातील एका खाजगी दवाखान्यात घेऊन जातो. दवाखान्यातील डॉक्टरांना श्याम जखमी मुलावर ताबडतोब उपचार करण्याची विनंती करतो. दवाखान्यातील डॉक्टर व डॉक्टरीणबाई त्या जखमी लहान मुलावर औषधोपचार करतात. अपघाताचे गांभीर्य लक्षातयेताच श्यामला डॉक्टरीणबाई म्हणाल्या, " या अपघाताला कारणीभूत तुझे वडील आहेत. एवढ्या लहान वयात तुमच्या वडिलांनी मोटरसायकल कशी काय दिली तुमच्या हातात ? त्यांचा फोन नंबर सांग. मी ताबडतोब फोन करते." ६ ( पृष्ठ क्रमांक 41,42 ) श्याम डॉक्टरीणबाईंना सर्व घडलेली खरी परिस्थिती समजावून सांगतो. अपघातातील तो जखमी मुलगा आपला भाऊ नसल्याचे सांगून रस्त्यात घडलेला प्रसंग सविस्तरपणे कथन करतो. डॉक्टरीणबाई श्यामने दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे कौतुक करतात व पोलिसांना फोन करून घडलेल्या घटनेची माहिती देतात. डॉक्टरीणबाई त्या जखमी मुलाच्या घरी फोन करून त्याच्या आई-वडिलांना दवाखान्यात बोलावून घेतात. अपघातामुळे घडलेल्या गंभीर घटनेबद्दल

खडे बोल सुनावून कानउघडणी करतात. पोलिस श्याम आणि त्या जखमी मुलाचे बयान नोंद करून घेवून अल्पवयीन मुलाच्या हातात मोटरसायकल दिल्याच्या गुन्ह्याबद्दल त्याच्या आईवडिलांना पोलीस कार्यालयात हजेरी लावण्यास सांगतात. आपल्या मुलाची अपघातामुळे झालेली अवस्था बघून लहान वयात त्याची मोटरसायकल चालविण्याची कौतुक करण्याची उर्मी खूप महाग पडल्याचे आई-वडिलांना जाणवते. जखमी मुलाचे आईवडील श्यामचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त करतात. श्याम डॉक्टरीणबाईंची परवानगी घेवून न आपल्या गावाकडे परत जातो त्या गावी परत जातो.

**समारोप :-**

कादंबरीकार प्रा. देवबा पाटील यांनी "परोपकारी श्याम" या बालकादंबरीतून समाजातील विविध स्तरातील स्त्रीव्यक्तिरेखांतून स्त्री जीवनाचे सूक्ष्मपणे निरीक्षण व अभ्यास केला आहे. समाजातील स्त्री जीवनाचे सर्वांगपूर्ण चित्रण स्त्रीव्यक्तिरेखांमधून अधोरेखित केले आहे. स्त्री जीवनविषयक प्रश्न आणि समाजातील स्त्रियांचे स्थान व भूमिका अधोरेखित करून तसेच त्यांवर प्रभावी उपाययोजना करून त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी.त्यामुळे समाजातील स्त्रियांचे जीवनमान उंचावण्यास निश्चितच मदत होवू शकेल. स्त्री व्यक्तिरेखांच्या जीवनाचा अभ्यास करून स्त्री जीवनविषयक सामाजिक जागृती करण्याचा कादंबरीकाराचा प्रामाणिक हेतू दिसून येतो." या बालकादंबरीमधून प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत त्यातून हिंमतीने मार्ग काढीत युक्तीने संकटातून कसे बाहेर पडावे आणि आपल्या जीवनाचे मार्गक्रमण करीत रहावे याचे उत्तम शिक्षण मिळते. " ७ पृष्ठ क्रमांक 323 )

**संदर्भग्रंथसूची:-**

1 )" परोपकारी श्याम "—बालकादंबरी,प्रा.देवबा शिवाजी पाटील ( पृष्ठ क्रमांक -13,14,15,27,41,42,) प्रथमावृत्ती,सुगम प्रकाशन अमरावती, 9 सप्टेंबर 2013 )
2) प्रा.देवबा शिवाजी पाटील -बालसाहित्य समीक्षा, संपादक — डॉ . किसन पाटील,साईजीवन प्रकाशन नागपूर, प्रकाशन वर्ष- डिसेंबर 2020 , प्रथमावृत्ती,( पृष्ठ क्रमांक-323, 196,197)
3) Helpes India organization report published in daily News paper Deshonnati on 15th June.2023
4) स्त्री प्रश्नांची चर्चा — एकोणिसावेशतक, लेखिका — प्रतिभा रानडे पद्मगंधा प्रकाशन पुणे -जानेवारी 2015

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# तृतीयपंथीयांच्या कवितेतील विद्रोही भूमिका
## ( विशेष संदर्भ : दिशा पिंकी शेख यांचा कुरूप कविता संग्रह )

**भरत शिवाजीराव गायकवाड**
संशोधक विद्यार्थी,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

मराठी साहित्यातील विविध वाङ्मय प्रवाहावर मोठ्या प्रमाणात चर्चा व संशोधन झालेले आहे. पण ज्यांची आजही समाजाने ' माणूस' म्हणून ओळख करून घेतली नाही अशा तृतीयपंथीयांनी लिहिलेल्या वाङ्मय प्रकारावर चर्चा झालेली दिसत नाही. जेथे तृतीयपंथीयांना समाज माणूस म्हणून मान्यता देत नाही तेथे त्यांच्या साहित्यावर विचारमंथन होणे तर दूरच...! आपल्यापेक्षा इतरांना तुच्छ लेखणे ही मानवाची सहज प्रवृत्ती. खरे तर कोणत्या जातीत, कोणत्या धर्मात किंवा कोणत्या लिंगात जन्म घ्यावा हे माणसाच्या हातात नसतेच.

मानवी समुदाय प्राचीन काळापासून स्त्री आणि पुरुष अशा दोन वर्गात विभागला गेला आहे. यापेक्षा तिसऱ्या वर्गाचा म्हणजे तृतीयपंथीयांचा समाजाला विसरच पडलेला आहे. तृतीयपंथीयांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाने विविध योजना निर्माण केल्या पण त्या कागदावरच आहेत. प्रत्यक्ष तृतीयपंथीयांपर्यंत त्या योजना पोहोचताना दिसत नाहीत. शिक्षण, नोकरी, व्यवसाय यापासून ते आजही दूर आहेत. बाजारात, रस्त्यावर, बसस्थानकात, रेल्वे स्थानकात, रेल्वेत डोक्यावर मायेचा हात फिरवत चार-दोन पैसे मागणारा हा समुदाय. टाळी नाही तर थाळी नाही अशी त्यांची अवस्था. असंख्य प्रश्नांना तोंड देत त्यांना जगण्याच्या वाटा शोधाव्या लागतात. त्यांना सतत अपमानास्पद वागणूक दिली जाते. माणूस म्हणून जगण्यासाठी ते धडपडत आहेत पण इथल्या व्यवस्थेकडून त्यांची सतत हेटाळणी केली जाते.

खरे तर बहुसंख्य तृतीयपंथी हे अशिक्षित आहेत. समाजाच्या त्रासापोटी, भीतीपोटी शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत ते पोहोचतच नाहीत. अनेक तृतीयपंथीयांच्या वेदना, दुःख हे शब्दात न मांडण्यासारखेच आहे. अशा परिस्थितीतही अलीकडे काही तृतीयपंथी कार्यकर्ते जुन्या वाटेने जगण्यापेक्षा जगण्याच्या नव्या वाटा शोधत आहेत. आपल्या साहित्याद्वारे तृतीयपंथी समुदायाला नवी दिशा दाखवत आहेत. तृतीयपंथीयांना सन्मानाने जगता यावे, त्यांनाही सर्वसामान्य माणसांसारखाच न्याय मिळावा या हेतूने काही तृतीयपंथी कार्यकर्ते समाजाशी, शासनाशी संघर्ष करीत आहेत. यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील पहिल्या तृतीयपंथी कवयित्री दिशा पिंकी शेख, गौरी सावंत, शमिभा पाटील, सारंग पुणेकर, लक्ष्मी त्रिपाठी यांचा उल्लेख करावा लागेल. प्रस्तुत शोधनिबंधातून दिशा पिंकी शेख यांच्या कुरुप या बहुचर्चित कवितासंग्रहातील विद्रोही भूमिकेवर चर्चा करण्यात आली आहे.

### तृतीयपंथी म्हणजे काय ?

तृतीयपंथी समुदायाबद्दल समाजात बरेच गैरसमज पसरले आहेत. तृतीयपंथीयांना समजून घेण्यापेक्षा त्यांचा तिरस्कार करणारे लोक समाजात जास्त आहेत. म्हणून तृतीयपंथी म्हणजे काय हे समजून घेणे गरजेचे आहे. "प्रत्यक्षात ज्या व्यक्तीचे शरीर पुरुषाचे, मात्र मानसिकता, हावभाव, वर्तणूक, बोलणे-चालणे पूर्णपणे स्त्रीचे आहे, अशा व्यक्तीला तृतीयपंथी म्हणतात. सर्वसाधारणपणे जन्मतःच ज्यांच्या लिंगात विकृती निर्माण झालेली असते किंवा ज्यांच्या शरीरात संप्रेरकाचे (हार्मोन्स) असंतुलन निर्माण झालेले असते किंवा ज्याची वाढच पूर्णपणे मुली व स्त्रियांच्या प्रभावाखाली आल्याने वर्तणूक स्त्रियांसाठी होते किंवा जे विविध कारणांसाठी लिंग विच्छेदनाचा मार्ग स्वीकारतात. अशा सर्व व्यक्तींचा तृतीयपंथीयांमध्ये समावेश होतो. तृतीयपंथीयांना हिजडा, पवय्ये, खोजे, बंदे, देवडा, फालक्या, फातडा, मंगलमुखी आदी संबोधनांनी ओळखले जाते."१

तृतीयपंथी समुदायाचे अभ्यासक डॉ. मारोती कसाब तृतीयपंथीयांची ओळख करून देताना लिहितात, "लिंगाधारित भेदभावाचा बळी ठरलेल्या एल.जी.बी.टी.क्यू. ( लेस्बिअन,गे, बाय सेक्सुअल, ट्रान्स जेंडर आदी ) व्यक्ती समूहातील पारलिंगी स्त्रियांचा एक मोठा वर्ग आपल्या देशामध्ये आहे. ' तृतीयपंथी ' , ' हिजडा ' , ' मिठ्ठा' , ' छक्का ' आणि ' किन्नर ' आदी नावांनी तो ओळखला जातो आणि याच नावांनी हिणवलाही जातो. ह्या वर्गातील स्त्रिया वयाच्या १० व्या, १२ व्या वर्षापर्यंत पुरुष म्हणूनच आपल्या घरात आणि समाजात वावरतात. नैसर्गिक लिंग वाढीच्या काळात त्यांच्यामध्ये हा बदल जाणवतो आणि पुरुषाची स्त्री झाल्याचा वरकरणी भास होतो. यालाच इंग्रजीत 'ट्रान्स जेंडर ' आणि मराठीत पार लिंगी असा शब्द वापरला जातो.

गर्भात राहिलेल्या बाळाला स्त्री, पुरुष किंवा पार लिंगी अशा स्वरूपाची ओळख ही निसर्गतःच लाभलेली असते. यातील काही बाळं पूर्णपणे पुरुष असतात, काही पूर्ण स्त्रिया असतात तर काही दोन्ही असतात म्हणजेच उभयलिंगी असतात.

म्हणजेच बाह्य रूपावरून जरी एखादे मूल पुरुषासारखे दिसत,बोलत असले तरी त्याची अंतर्गत जाणीव ही स्त्रीत्वाची असू शकते. पुरुष असूनही ज्याला आपण स्त्री आहोत असे वाटते किंवा आपल्या भावना या स्त्रियांसारख्या आहेत अशी जाणीव होते, अशा स्त्रियांना पार लिंगी स्त्रिया असे म्हणता येईल."२

**दिशा पिंकी शेख यांचा परिचय :**

दिशा पिंकी शेख या तृतीयपंथी सामाजिक कार्यकर्त्या आहेत. नाशिक जवळ येवले हे त्यांचे गाव. विषमतावादी व्यवस्था नाकारत तृतीयपंथीयांना सन्मानाने जगता यावे यासाठी त्या सतत प्रयत्नशील असतात. 'शब्दवेडी दिशा' या नावाने फेसबुकवर त्या सामाजिक विषयावर लेखन करीत असतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने त्यांची 'तृतीयपंथी विकास महामंडळाच्या' सदस्यपदी निवड केली आहे. 'वंचित बहुजन आघाडी'च्या त्या प्रवक्त्या आहेत. राजकीय पक्षाच्या प्रवक्तेपदी निवड होणाऱ्या त्या पहिल्याच तृतीयपंथी आहेत. आंबेडकरी चळवळ गतिमान करण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे.

तृतीयपंथीयांच्या दुःखाला, वेदनेला शब्दात मांडत त्यांनी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. साहित्य अकादमीच्या मंचावरून मराठी कविता सादर करणाऱ्या त्या पहिल्या तृतीयपंथी आहेत. मुंबईच्या 'शब्द पब्लिकेशन'या नामांकित प्रकाशन संस्थेतर्फे त्यांचा 'कुरूप ' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला आहे. या कवितासंग्रहातून त्यांनी इथल्या विषमतावादी व्यवस्थेविरुद्ध चीड व्यक्त केली आहे. 'कुरूप ' या शीर्षकाविषयी शर्मिष्ठा भोसले लिहितात, "पायात रुतलेले काटे तिथेच राहिल्याने ठसठसणारं जे काही उमटतं, ते असतं कुरूप. हा शब्द आजही ग्रामजीवनात वापरतात. स्वतःच्या कवितेला दिशा 'कुरूप ' म्हणते. ते अनेकार्थाने खरं असल्याचं संग्रहभर जाणवतं." ३ तृतीयपंथीयांच्या व्यथा, वेदनेचा जाहीरनामा मांडणारा मराठी भाषेतील हा पहिलाच कवितासंग्रह असून या कवितासंग्रहातील निवडक कवितेवर जमीर कांबळे यांच्या पुढाकारातून महाराष्ट्रभर नाट्यप्रयोग होत असतात.

**कुरूप कवितासंग्रहातील विद्रोही भूमिका :**

विद्रोह ही संकल्पना प्राचीन आहे. जेव्हा जेव्हा अन्याय, जुलूम, छळ यांचा अतिरेक होतो तेव्हाच विद्रोहाचा जन्म होतो. आपल्यावर होत असलेली गुलामगिरी झुगारून देणे म्हणजेच विद्रोह. फ्रेंच तत्त्वज्ञ अल्बेर काम्पू म्हणतात, 'आज विद्रोहाची संकल्पना खूपच व्यापक बनली आहे. तो केवळ गुलामाचा मालकाविरुद्ध, गरीबाचा श्रीमंताविरुद्ध, व्यक्तीचा समाजाविरुद्ध असा विद्रोह नसून व्यक्तीचा विश्वाविरुद्ध विद्रोह असे व्यापक स्वरूप त्याला प्राप्त झाले आहे.'४ असा विद्रोह तृतीयपंथीयांच्या पाचवीलाच पुजलेला आहे. तृतीयपंथी हा शब्द उच्चारला की अनेकांच्या भुवया उंचावल्या जातात. नानाविध दुषने लावून तृतीयपंथीयांना अपमानित केलं जातं. बहुसंख्य तृतीयपंथी हे अशिक्षित असतात. त्यामुळे त्यांच्या व्यथा, वेदना त्यांना शब्दात मांडता येत नाहीत. ' कुरूप ' या कवितासंग्रहातून दिशा पिंकी शेख यांनी विद्रोही भूमिका मांडल्या आहेत. कवितासंग्रह वाचण्यापूर्वी त्यांनी लिहिलेली अर्पण पत्रिका वाचल्यानंतर त्यांच्या कवितेची भूमिका लक्षात येते. 'माझ्या समुदायातील ज्या मैत्रिणींना त्यांच्या व्यथा शब्दात मांडता आल्या नाहीत त्या सगळ्याजणींना...' अशा शब्दात त्यांनी अर्पण पत्रिका लिहिली आहे. दिशा पिंकी शेख यांच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या एकाही कवितेला शीर्षक नाही. शीर्षक वाचल्यानंतर कवितेचा सारांश लक्षात येतो कवितेच्या या पारंपरिकतेला बाजूला सारत कवितेलाही त्यांनी योग्य दिशा दिली आहे. अगदी निर्भीड, रोखठोक भाषेत त्यांनी तृतीयपंथीयांच्या वेदना मांडलेल्या आहेत. दिशाताई यांची कविता सहज, सोपी व अनुभवनिष्ठ आहे. एक तृतीयपंथी म्हणून समाजात वावरत असताना आलेले अनुभव त्यांनी स्पष्टपणे नोंदवले आहेत.

' कुरूप ' या कवितासंग्रहात एकूण ७६ कविता आहेत. पुस्तक हातात घेतले की वाचल्याशिवाय सोडूच नये असे वाचकांना वाटते. तृतीयपंथीयांच्या भावभावनांचे, समाजाने त्यांच्यावर लादलेल्या दुःखाचे, वेदनेचे कटू अनुभव टिपण्यात त्यांची कविता मग्न होते. त्यांच्यावर निसर्गाने लादलेल्या जगण्याचा त्यांनी स्वीकार केलाय. पण समाज त्यांना स्वीकारत नाही. समाज त्यांना वाकडा म्हणून हिणवत असतो. मी वाकडी आहे याचा मला सार्थ अभिमान आहे. पण तुमचा वाकडा असलेला सरळपणा तुम्ही का झाकता ? असा प्रश्न दिशाताई सरळ माणसांना विचारताना लिहितात,

'मी विचारलं
तू सरळ,
की वाकडा?
तू म्हणालास
मी सरळ.
मी स्वीकारलं,
अगदी सहजतेने.

तूही विचारलं,
मी सांगितलं,
मी वाकडी.
तू उडालाच,
मग बसलास,
सरळ लोकांमध्ये,
आणि रंगली

चर्चा माझ्यावर.' (पृ. १४)दिशा ताईंची कविता सहज जन्माला आलेली नाही. प्रचंड वेदनेतून त्यांच्या कवितेने जन्म घेतलेला आहे. प्रत्येक कविता त्यांनी जगलेली आहे, भोगलेली आहे. म्हणून तर ती उत्कटतेने बाहेर येताना दिसते. निसर्गावर, पाना- फुलावर केलेलं लिखाण दिशा ताईंच्या कवितेत औषधालाही सापडत नाही. त्यांच्या कवितेची निर्मितीप्रक्रिया ही त्यांच्या आणि तृतीयपंथी समुदायाच्या डोळ्यांतून ओघळणाऱ्या आसवांपासून सुरू होते. त्यांच्या जगण्यासमोर असंख्य प्रश्न तोंड आ वासून उभे आहेत. प्रश्नांची योग्य उत्तरं त्यांना मिळत नाहीत. प्रत्येक प्रश्नाचं एक ठरलेलं उत्तर त्यांच्याकडे असतं. ते म्हणजे...कारण मी हिजडा आहे. तृतीयपंथी म्हणजे लोकांच्या मनोरंजनाचं साधन. त्यांना स्वतःचे हक्क, अधिकार गाजवता येत नाहीत. एवढेच काय तर दु:ख झाल्यावर रडण्याचाही अधिकार त्यांना नाही याबाबत त्या लिहितात,

'माय मरो नाहीतर मावशी
दु:ख कवटाळून रडण्याचा
अधिकार मला नाही
तोंडावरचं हासू आणि
हातातली टाळी सतत
खिदळत राहिली पाहिजे
कुठलीच शिकांतिका गाण्याचा
अधिकार मला नाही
कारण मी हिजडा आहे.' (पृ.२०)

इथल्या व्यवस्थेच्या भोंगळ कारभाराबाबत कवयित्री चिंता व्यक्त करतात. व्यवस्थेच्या विरोधात, पुरुषप्रधान संस्कृतीच्या विरोधात, शोषणाच्या विरोधात त्या त्यांच्या समुदायासह पेटून उठल्या आहेत. त्या विद्रोह करू इंच्छितात. संतापाने त्यांच्याही मुठी आवळल्या जातात. पण इथल्या हुकूमशाहीपुढे त्यांना हार मानावीच लागते. इथे फक्त नावालाच लोकशाही आहे. अजूनही मनासारखे बोलण्याचा, जगण्याचा अधिकार त्यांना नाही. म्हणून व्यवस्थेच्या भोंगळ कारभाराबाबत त्या लिहितात,

' मादक पुरुषांच्या मनोरंजनात
स्वतःला धन्य मानणाऱ्या
माद्या पाहून स्वतःवरच हसले
आवळलेल्या मुठी सैल सोडल्या
निपचित पडले अंथरुणात
व्यवस्थेचा भोंगळा कारभार पाहत' (पृ.५६)

माणसांनी जगताना इतरांना मदतीचा हात दिला पाहिजे. पण असे न घडता तृतियपंथियांच्या नावाचा वापर करून जगणारी बांडगुळंच समाजात खूप वाढली आहेत. तुमचे आशीर्वाद चांगले असतात म्हणत लोक त्यांना आशीर्वाद दया म्हणून विनवणी करतात आणि तेच लोक पुन्हा त्यांची टिंगळ-टवाळी करतात. भीक मागताना अपमान करतात. तुम्हाला काम करायला काय झालं असे विचारतात. पण प्रत्यक्षात मात्र कोणीही काम देत नाही. काम मागायला गेलेल्या तृतियपंथियांना लोकांचे अनपेक्षित बोलणे सहन करावे लागते. लोकांच्या बोलण्याच्या पद्धतीचा पुरावा देताना त्या लिहितात,

'काय करणार हायेस गं काम करून?
२०० रुपये कमवशील
बाजूला चाल थोडं
दोन मिनिटांचं काम हाय
लगेच २०० रुपये देतो
आक्का देवमाणूस तुम्ही...' (पृ.५७)

अशा नीच मानसिकतेच्या लोकांकडून चांगुलपणाची अपेक्षा करावी तरी कशी? अशा लोकांच्या ढोंगीपणावर दिशाताईंनी अचूकतेने बोट ठेवलेले आहे. विषमतावादी व्यवस्थेचा वारसा चालवणारी माणसं कवयित्रीला गिधाडंच वाटतात. अशा गिधाडांना परिवर्तनवादी विचारांद्वारे, संघर्षाद्वारे कवयित्री धडा शिकवण्याचा प्रयत्न करतात. तरीही समाजाकडून त्यांना सतत डागण्या देण्याचा प्रयत्न केला जातो. तुम्ही वर्तुळातच राहावं, वर्तुळाबाहेर येऊन जगण्याचा प्रयत्न करू नये. असं तृतीयपंथीयांना नेहमी सांगण्याचा प्रयत्न केला जातो. सीमारेषेत जगण्याचा सल्ला देणाऱ्यांची कानउघाडणी करताना दिशाताई लिहितात,

'मी अशीच आहे बघ...
बाई काळजी करू नका
मी अशीच राहीन
आपटतील जेव्हा इथली गिधाडं
तरी विझणार नाही
माझ्या शब्दांतली धग...' (पृ.६७)

बहुसंख्य तृतीयपंथी अशिक्षित असल्यामुळे 'शिकूण काय होणार?' हा नैरास्यजनक प्रश्न त्यांच्या मनात असतो. शिक्षण नाही म्हणून त्यांना नोकरी मिळत नाही. नोकरी नाही म्हणून किंवा त्यांच्या नावे शेती नाही म्हणून त्यांना कर्जही मिळत नाही. मग त्यांनी उद्योगधंदा तरी कसा करावा? महिलांना, पुरुषांना नोकरीत राखीव जागा असतात. तशा राखीव जागा तृतीयपंथीयांना नसतात. सार्वजनिक ठिकाणी तृतीयपंथीयांसाठी वेगळे शौचालय नसते. जर ते स्त्रियांच्या शौचालयात गेले तर गोंधळ निर्माण होतो. स्त्रियांचा आरडाओरडा पाहायला मिळतो. जर ते पुरुषांच्या शौचालयात गेले तर त्यांना लैंगिक शोषणाचे बळी व्हावे लागते. राज्यघटनेने स्त्री-पुरुषांना समान हक्क दिलेला आहे. पण तृतीयपंथीयांचा राज्यघटनेत उल्लेखच नाही याबाबत सतीश सोनक लिहितात, "स्वतंत्र भारताच्या भाग्यविधात्या संविधानात हिजड्यांचा उल्लेख नाही. जनरल क्लॉज अँक्ट या कायद्यानुसार 'व्यक्ती' या शब्दाची व्याप्ती 'तो' किंवा 'ती' इतकीच मर्यादित असते. त्यातही तृतीयपंथीयांचा समावेश नाही, म्हणजे आपल्या अवतीभवती वावरणारे हजारो लाखो तृतीयपंथी जणू अस्तित्वातच नाही. त्यांना अदृश्य करण्याची जादुई करामत आपल्या राज्यघटनेने केली आहे.'५ राज्यघटनेपासूनच वंचित राहिलेल्या या समुदायाचे ज्वलंत प्रश्न मांडणारी दिशाताईंची कविता आहे. त्यांची प्रत्येक कविता मला क्रांतीची हाक देणारी वाटते. कितीही क्रांती करण्याचा प्रयत्न केला तर शोषणचक्र कालच्यासारखे आजही चालू राहील याबाबत कवियत्री लिहितात,

'क्रांती होईल म्हणून
त्याच्या विद्रोह ओकण्यानं
काही बदलणार नाही
जास्तीत जास्त डिझाईन बदलेल
या शोषणचक्राचं
जे होतं काल आणि आजही...' (पृ.६९)

बाजारात, रेल्वेत पैसे मागणाऱ्या तृतीयपंथीयांना अनेक वाईट अनुभव येत असतात. असंख्य वासनांध नजरेचा त्यांना सामना करावा लागतो. त्यांची छेडछाड केली जाते. अनेक तृतीयपंथीयांवर बलात्कारही होतात. अशावेळी न्याय मागण्यासाठी ते पोलीस स्टेशनला जातात. तेव्हा रक्षक असणारे पोलीसही भक्षक होतात. असे अनुभव अनेक तृतीयपंथीयांना आलेले आहेत. टाळी वाजवून पोट भरणाऱ्यांनाही पोलीस सोडत नाहीत. त्यांच्या भिकेतला काही वाटा हप्ता म्हणून वसूल केला जातो. त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केलेजातात. ज्यांच्याकडून न्यायाची अपेक्षा करावी तेच अन्याय करत असतील तर न्याय कोणाकडे मागवा? लैंगिक सुखाची अपेक्षा करणाऱ्या रेल्वे पोलिसाचा प्रसंग मोठ्या ताकतीने कवियत्रीने मांडला आहे.

'भेनचोद लय नाटक झाले तुमचे,
चल साइडला
त्यानं असं म्हणत
रपकान् दांडा ठेवून दिला पायावर तिला...
लोकं तोंडाकडं पाहत होती
पण कुणी काही बोललं नाही
रडत हातबल होऊन
साहेबांच्या मागं गेली ती...

त्यानं रेल्वेतल्या स्वच्छालयात कोंबलं तिला
आणि तोही आत गेला' (पृ.७७)

कानाने ऐकू नयेत आणि डोळ्यांनी वाचू नयेत अशा कितीतरी भयानक प्रसंगांना तृतीयपंथीयांना तोंड द्यावे लागते. आत्मसन्मानाचे प्रेत पदरात लपवत एकेक दिवस त्यांना ढकलावा लागतो. जगण्यासाठी पुन्हा ओठावर हसू आणत लिपस्टिकचा रंग डार्क करावा लागतो. संवेदनशीलतेचा आव आणणाऱ्या निर्लज्ज व्यवस्थेला अशा भयानक प्रसंगाची चीड येईल का कधी? बाजार मागताना तृतीयपंथीयांचा गर्दीतून अपमान केला जातो. त्यांच्यासोबत विनाकारण भांडण काढली जातात. तृतीयपंथीयांना विवस्त्र करून त्यांना मारत फोटो, व्हिडिओ काढल्याच्या घटनाही अनेक बाजारात घडल्या आहेत. अशावेळी घटनेची शहानिशा न करता तृतीयपंथीयांचा लोकांना त्रास अशा आशयाची पत्रकार बातमी देतात. पत्रकारांनी लेखणीचं भान ठेवावं यासाठी कवयित्री लिहितात,

'बाजार समदा गोळा झाला
पोरं फोटु काढाया लागली...
ती तशीच नागवी रडत निघाली
तिच्या रडण्याला कोण खातंया
लोकास्नी वाटण्यासाठी किलीप
अन् तृतीयपंथीयांचा बाजारात लोकांना तरास
अशी पत्रकाराला बातमी मिळाली...' (पृ.८३)

कवयित्रीला स्वतःबद्दल आणि तृतीयपंथी समुदायाबद्दल अनेक प्रश्न पडतात. मी काय आहे? का आहे? आणि मीच का? अशा असंख्य प्रश्नांपासून त्यांचा समूह दिवसभर तोंड लपवून फिरतो. तरी प्रश्न त्यांचा पिच्छा सोडत नाहीत. अशावेळी कवयित्री समाजवास्तव अधोरेखित करताना लिहितात,

'पण सारे माझ्याकडेच असं का पाहतात
उपहासक
विनोदी
विक्षिप्त
कामूक
दया
तिरस्कारयुक्त नजरेने
या नजरा झोपू देत नव्हत्या
तेव्हा या सगळ्यांच्या
उत्तरासाठीकरायचे मी जागरण रातभर...' (पृ.९२)

खरेतर रात्रभर जागरण करून, चिंतन करून प्रश्न मिटणार नाहीत. जागरण आणि चिंतनाशिवाय त्या स्वतःच्या न्यायासाठी अजून कोणते प्रयत्न करतील? इथली व्यवस्था दिवसेंदिवस त्यांच्या जगण्याला लाजिरवाणे करत आहे. व्यवस्थेमुळे झालेल्या वेदना त्यांना ढसाढसा रडवतात. त्यांच्या मनातली स्वप्न पावला पावलाला ढासाळतात. त्यांच्या स्वप्नांना जागोजागी सुरुंग लावला जातोय. म्हणूनच दिशाताईंची कविता चीड, संताप आणि विद्रोहाने तुडुंब भरलेली आहे. कधी साध्या भाषेत तर कधी चक्क शिव्या हसडत त्यांनी मनातला संताप व्यक्त केला आहे. मेल्या मुड्द्यायहो, ढोंगी साले, तुम्हाला गड्डा उठो फुकनळ्यांनो, फुकट माराल चुत्यानो, वैतागवाडी साला अशा गावरान शिव्यांचा वापर दिशाताईंच्या लेखनशैलीत केलेला दिसतो.

तृतीयपंथीयांच्या दुःख, वेदनेचा प्रवास सुरू होतो तो स्वतःच्या घरातूनच. स्वतःच्या अशा संततीची आई वडिलांना चीड येते. समाज काय बोलेल या भीतीपोटी ते आपल्या मुलाला दडपणात ठेवतात. त्याच्यात सुधारणा होईल म्हणून ढोंगी बाबाकडे जातात, दवाखान्यात घेऊन जातात. पण मुलाच्या शरीरात कसलेही अपेक्षित बदल घडून येत नाहीत. घरी कोणी नसल्यावर अशी मुले मुलीसारखे वागण्याचा प्रयत्न करतात. मुलाचे शरीर असले तरी आपल्याला मुलीसारखे राहायला आवडते अशी त्यांना जाणीव होते. काही मुलांचे पालक त्यांना स्वातंत्र्य देऊन तृतीयपंथी समुदायात पाठवतात तर काही पालक आपल्या घराण्याची लाज राखण्यासाठी मुलाला कुटुंबातच ठेवून घेतात. मुलासारखे त्याचे लग्नही लावून देतात. अशा मुलांच्या मनातील विद्रोही भावना दिशाताई मांडताना लिहितात,

'हळदीच्या अंगाने
तो बसला होता

मांडवाच्या कोपऱ्यात
रात्रभर रडून लाल झालेल्या
डोळ्यांवर काळा चष्मा लावून
प्रत्येक काही मिनिटांत
त्याला असं वाटायचं
मरु दे साल्यांना
जावं पळून मांडवातून
परत स्वतःला सावरायचा
आईच्या डोळ्यात काठावर
थांबलेलं पाणी
त्याला जाऊ देत नव्हतं वाहवून...' (पृ.१०६)

अशा मुलांवर पालकांनी आणि समाजाने अपमानाचा शिक्का न मारता त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. दिशाताईंच्या कवितेतून तृतीयपंथीयांचे अनेक प्रश्न जगासमोर आलेले आहेत.

**समारोप :**

एकंदरीत साठोत्तरी काळातील कवयित्री दिशा पिंकी शेख यांच्या कविता त्यांच्या अनुभवातून, चिंतनातून तावून-सुलाखून निघालेल्या आहेत. तृतीयपंथीयांच्या विद्रोही भावना सूक्ष्मपणे मांडणाऱ्या मराठी भाषेतील पहिल्या कवयित्री म्हणून दिशाताईंची ओळख निर्माण झाली आहे. स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरणाऱ्या आजच्या आधुनिक काळात तृतीयपंथीयांनाही समानतेचा हक्क मिळाला पाहिजे हा मुख्य विचार कविता संग्रहातून वाचावयास मिळतो. प्रत्येकाच्या संग्रही असावा असाच हा कवितासंग्रह मराठी कवितेत मोलाची भर घालणारा आहे. तृतीयपंथीयांच्या विद्रोही भूमिकेचा समाजाने विचार केला पाहिजे व त्यांनाही समानतेची वागणूक दिली पाहिजे.

**संदर्भ :**

१) https://maharashtratimes.com/editorial/ravivarmata/gay/articleshow/30868570.cms
२) https://kolaj.in/published_article.php?v=Disha-Pinky-Shaikh-collection-of-poems-KurupDF0020393
३) https://www.tv9marathi.com/opinion/international-transgender-day-special-article-on-poetry-book-by-transgender-disha-shaikh-kurup-by-freelance-journalist-sharmishta-bhosle-674129.html
४)https://maharashtratimes.com/editorial/column/revolt/articleshow/65057650.cms
५) https://web.bookstruck.in/book/chapter/35580

# २१ व्या शतकातील मराठी कादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**नर्मदा रामा कूराडे**
संशोधक
राणी चन्नम्मा विध्यापीठ ,बेळगावी

**प्रस्तावना:**

संस्कृती ही समजाला शुध्द करण्याचे काम करत असते. अशा समाज जीवनाचा छाप साहित्यात जसा आहे तसा पडत असतो. असे अनेक सामाजिक संदर्भ आपण मराठी कादंबरीमधून पाहत आलो आहे. मराठी सामाजिक कादंबरीची सुरुवात बाबा पद्मनजी यांच्या "यमुना पर्यटन" या कादंबरीपासून झाली असली तरी, आतापर्यंत मराठी साहित्यात अनेक प्रकारच्या कादंबऱ्यांची निर्मिती झाली आहे. सामाजिक, घटनात्मक, वर्णनात्मक, समस्यात्मक असा कादंबरीचा विषय लेखनकार हाताळत असतो. त्या काळातील सामाजिकच नव्हे तर ,भौतिक वातावरणाचा सुद्धा लेखनकार विचार करून लिहित असतो. "कोणतीही कादंबरी आपल्या प्रदेशातील रुजलेल्या नव्या-जुन्या विचारांची शिदोरी असते". वाचक, समीक्षक व कादंबरीकार समजून घेताना त्या कलाकृतीचा समकालीन आणि पूर्वकालीन भारतीय साहित्य परंपरेत सामाजिक व संस्कृतिक विषयाला अंत्यत महत्व प्राप्त झाल्याचे पाहतो. **साहित्य हा समाजाचा आरसा असतो'**. जे समाजात घडते ते साहित्यात नकळतपणे येते, तसा साहित्य आणि संस्कृती हा विषय खूप व्यापक आहे. संस्कृती म्हणजे त्या प्रादेशातील धर्म, पंथ, कला, चाली-रीती लोक परंपरा, भाषा व साहित्य विकसित अवस्थेतील विशिष्ट जीवनपद्धत अर्थात त्या सर्व प्रदेश व संस्कृतीचा समाजावर परिणाम झाल्याचे आढळून येते. ती तसेच सध्यस्थितीचा मर्म उकलल्याशिवाय कादंबरी कळत नाही. म्हणून कादंबरीचे संदर्भ हे काळानुसार अभ्यासताना त्या त्या काळातील एकूण सामाजिक, आर्थिक ,धार्मिक, राजकीय, धर्म, पंथ, समाज, संस्कृती, परंपरा, संप्रदाय व इतिहास डोळ्यासमोर येतो. कादंबरीचा कथात्मक भागाचा चढ-उतार विस्तार वाटा वळणे आकलन करताना त्या त्या काळातील अनेक चांगल्या वाईट संदर्भ यांचा परामर्ष घेता येतो. म्हणून खालील प्रमाणे काही कादंबऱ्यांचा आढावा घेतलेला आहे. 21 व्या शतकातील कादंबऱ्या कशा वाटतात हे पाहणे आवश्यक आहे.

**उध्देश:**

आधुनिक तरूण वर्ग व सामाजिक कोणते बदल होत आहेत. तसेच भारतीय संस्कृतीचा —हास व परिणाम समाजावर कसा होत आहे. याचा विचार करण्यात येईल पुढील कांही कादंब-यांच्या अभ्यासांती तरूण वर्ग सामाजिक नितिमुल्ये, माणूसकी विसरते की काय याची भिती वाटत आहे. या अनुशंगाने उहापोह करण्यात येणार आहे. या सर्वातून आपला धर्म, संस्कृती, परंपरा व पाश्चातिकरणाचा भडीमार आधूनिक तरूण पिढीला पार बद्लून टाकले आहे. यामुळे समाजात कोणते परिणाम होत आहेत, ते पाहणार आहोत. मराठी साहित्यातील कादंबरीमधून अनेक कादंबरीकारांनी आधुनिक वास्तव चित्रण केल्याचे आढ्ळून येते त्यापैकी- डॉ. दादा गोरे, भीमराव वाघचौरे, सुशील धसकटे, प्राध्यापक शिवाजीराव गणपत बागल, प्रसाद कुमठेकरांची, नंदू साळोख, रसूल सोलापुरे इ. कादंबरीकारांच्या कलाकृतीतून काय मांडलेले आहे ते पाहण्यात येणार आहे.

संस्कृती ही मानवी समाज किंवा मानवी समुहाची स्वतंत्र संस्कृती असते. कारण प्रत्येक समुहाचा वेगवेगळा नमुना पाहायला मिळतो. यांच्यातील हे भिन्नत्व भौगोलिक,सामाजिक, आर्थिक, धार्मिक घटकांमुळे समजते. एका विशिष्ट समाजाच्या संस्कृतीमध्ये असणारी माहिती, विश्वास,परंपरा,मुल्ये, संकेत हे दुस-या समाजाच्या संस्कृतीमधे सारखेच असतील, हे सांगता येते नाही. प्रत्येक समाजाच्या संस्कृतीनुसार त्यांची जान, विश्वास ,परंपरा ,मुल्ये ,प्रमाणके इ. मध्ये फ़रक आढळून येतो. जसे भारतीय संस्कृती आणि पाश्चात्य संस्कृतीमधिल जानवतो. अशाप्रकारे मानवी गटा-गटामध्ये देखिल भिन्नत्व दिसून येते. अशा भिन्न-भिन्न संस्कृतीची छाप मराठी साहित्यावर पडलेला आहे. कर्नाटक महाराष्ट्र सीमाभागातील तरूण लेखक विचारवंत श्री चंद्रकांत खामकर यांच्या लिखानातून **"वारी"** लेखनातून सीमाभागातील आध्यात्मिक कलेचा रंग ,पारंपरिक थाट, एक वेगळया परिवेशात आढळून येते. जनमानसात देव, धर्म,कला, साहित्याची झलक वेगळ्या स्वरूपात दिसून येते.

**कादंबरी व सध्यस्थिती:**

भारतातील कोणत्याही साहित्यिक व सामाजिक आढावा घ्यावयाचा असेल तर 21 व्या शतकातील स्थिती जाणून घेणे महत्वाचे ठरते. आधुनिकीकरणाच्या वाहत्या प्रवाहाचे वेग असल्याचे चित्रण आपण पाहतो, त्यातून उदात्तीकरण्याचा मोह वाढत जात आहे. आणि याचा परिणाम आधुनिक समाजावर होत आहे. या सर्वांची छाप साहित्यावर होत असते, अशी एक न सोडवता येणारी गुंतागुंत वाटू लागते. अर्थात या सर्वांची झळ सर्वसामान्य मानवी मनावर व त्यांच्या जगण्यावर होऊ लागले आहे. यात

शंकाच नाही साहित्यिक दृष्टिकोनातून विचार करायचा झाला तर, शहरी जीवन पद्धत आणि ग्रामीण जीवन पद्धत अशा दोन विभागण्यात झाल्याचे चित्र डोळ्यासमोर दिसू लागते. तेव्हा अशा कादंबरीचे संदर्भ पूर्णतः वेगवेगळ्या असू शकतात शहरी जीवनपद्धतीची एक वेगळी वैशिष्टये पाहायला मिळतात. कारण इथे माहिती व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे इंटरनेट, उपग्रह, मोबाईलसारख्या अनेक साधनयुक्त समाज आज जुन्या रुढी परंपरा सोडून दिल्याचे चित्र दिसू लागले आहे. जुन्या नियमांना जखडून न राहता स्वतंत्रपणे आचार विचार करण्याचे बळ प्रत्येकाकडे येत आहे. असे चित्र अनेक लेखनाद्वारे सामाजिक, भौतिक स्थितीचे चित्र बदलले असल्याचे संदर्भ- डॉ. दादा गोरे यांच्या **"21 व्या शतकातील मराठी कादंबरी"** या ग्रंथाची आपल्याला साक्ष पटते.

ग्रामीण समाजातील जीवनशैली कशी आहे त्याचे जगणे त्यांच्या आचार विचार पाहताच या समाजातील जगण्याची पद्धत फक्त पोट भरले की झाले इथे विज्ञान कितीही पुढे जाऊदे, त्याच्याशी काही देणे-घेणे नसते. स्वतंत्र आचार-विचार आपली प्रतिष्ठा जपणे हा प्रकार अशा समाजात पाहायला मिळत नाही. सतत कष्ट उपसत असताना जगण्यातील चढउतार व्यापक असतो. अशा ग्रामीण भागातील सध्यस्थितीचे चित्रण करणा-या कादंबरीतील संदर्भ पाहणे आवश्यक आहे.

**२१ व्या शतकातील सामाजिक चित्रण करणा-या कांही कादंब-यांचा आढावा:**

पोटच्या पोरांनी हाकलेल्या वृद्धांच्या कारुण्यमय भाव-भावना, वेदना, वास्तविक चित्रण असणारी कादंबरी **"पिंडीवरचे विंचू"** 2019 मध्ये प्रकाशित झाली आहे. ही कादंबरी भीमराव वाघचौरे यांनी लिहिलेली आहे.

या कादंबरीमध्ये तंत्रज्ञानाच्या युगात स्वतंत्र आचार विचारात मग्न झालेला तरुण वर्ग हा वृद्धांच्या बरी-वाईट वेळ आणत असल्याचे सामाजिक चित्र, अर्थात पोटच्या लेकरांकडून अत्यंत कृतघ्नतेने वागणूक मिळते. असे विदारक रूप कादंबरीत मांडलेले आहेत. **"पिंडीवरचा विंचू"** ओरखडे ओढत लोककलावंत शंभू वाघ्या आणि त्यांची कस्तुरी यांच्या परवडीची ही दुःखद कहानी चित्रीत झाली आहे. जन्मदात्यांचे मुडदे लपवून आपल्या भावंडाकडे जबाबदारी ढकलण्यापर्यंत आजची तरुण पिढी अत्यंत हीन पातळीवर जाऊन विचार करते आहे. याचे चित्र वरील कादंबरीतून चित्रित होते. शेवटी इतकेच सांगता येईल माहिती तंत्रज्ञानामुळे तरुण वर्गाला कोणाची गरज भासू लागत नाही. एकटे राहण्याचे बळ आले आहे. सहज सुंदर ऐशरामी जीवन घालविण्यास आजची तरुण पिढी व्यस्त झाली आहे. वृद्ध मंडळींची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. अशा प्रकारचे सामाजिक चित्रण रेखाटणारी ही कादंबरी मनाला हादरून टाकणारी आहे.

**जोहार** ही कादंबरी 2015 मध्ये प्रकाशित झाली लेखक **सुशील धसकटे** यांनी या कादंबरीमधून विध्यापीठातील जातीय, राजकारण्याच्या संबंधावरून हल्ला चढवला जातो, याचे चित्रण केलेले आहे.

**"बारकूल्या बारकूल्या" स्टोऱ्या-** लेखक **प्रसाद कुमठेकरांची** कादंबरी आहे . काहीच न येणाऱ्या शिक्षण व्यवस्थेवर प्रहार करून जीवनातल्या अंतरंग ओळखणारी कादंबरी आहे. या कादंबरीचा बंध हा अत्यंत खोलवर असून त्या खोलीचा तळ शोधणारे अशी आहे. ती एक व्यक्ती जीवनावर आधारित नसून अख्या गावातल्या जीवनातील मनमोकळे निसर्ग, त्यातील सौंदर्य तसेच भौतिक वातावरणाचा शोध माणसाच्या गरजा अशा विविध दृष्टिकोनातून व्यक्त होते. त्यामध्ये अनुभूती मनाला थक्क करायला लावणारी आहे. श्रीमंती, पैसा हा जीवनाचे स्वप्न होऊ शकत नाही. त्यात ध्येयवादाचा धागा सापडत नाही, ती एक उपभोग्य संस्कृती आहे. मानवी जीवन हे या उपभोग्य संस्कृतीच्याही पलीकडे जाणारी आहे. कादंबरीतील सूक्ष्म निरीक्षणाने निसर्गाचे सौंदर्य लक्षात येते, मानवनिर्मित सौंदर्य आणि निसर्गनिर्मित सौंदर्य ही जीवा शिवाची भेट झाल्यासारखे अवतरतात, आणि हेच या कादंबरीचे यश आहे. त्यातील बोलीचा गोडवा, नाद, स्पर्श केल्याशिवाय राहत नाही. अशीही कादंबरी आधुनिक तरुण पिढीचे चित्रन करणारी आहे.

आधुनिक शिक्षणामुळे शहराचा ध्यास लागलेली तरुण पिढी वेगळ्या वळणावर जात आहे. जेंव्हा आपल्याच वावरात यायची लाज वाटते; तेंव्हा त्याच्या बापाच्या मनाची झालेली कालवा कालव चित्रन करणारी **"येडी बाभळ"** ही कादंबरी ही आपल्याला अशीच वाटते. तरुण मनावर झालेला सामाजिक परिणाम व त्यातून आपली संस्कृती विसरत चालेला तरुण वर्ग याचे विदारक रुपे आपल्याला पाहायला मिळतात.

**आनंदाने जगूया आनंदाने देवाजीच्या गावा जाऊया, तोपर्यंत माणुसकीचा मंत्र जपूया-** असे सांगणारी **"अनंताचे प्रवासी"** ही कादंबरी प्राध्यापक शिवाजीराव गणपत बागल यांनी लिहिली आहे.

"ईश्वर के हर फैसले खुश रहो
क्योंकि ईश्वर वो नही देता
जो आपको अच्छा लगता है
बल्की ईश्वर वो देता है
जो आपके लिये अच्छा होता है" १

ईश्वराने आपल्याला काय हवे ते कधीच नाही देणार पण आपल्याला कशाची गरज आहे, जेणेकरून आपल्याशी चांगलेच होईल ते ईश्वर देत असतो.असे सांगणारे **प्राध्यापक शिवाजी बागल** यांनी कादंबरीतून सामाजिक, निरक्षण, मानसशास्त्रीय विश्लेषण, तार्किक विवेचन व वस्तुनिष्ठ मांडणी ते करताना दिसतात. त्याचबरोबर धर्म वेगवेगळा असला तरी, त्यांचे ध्येय मात्र एकच आहे. मानवी जीवाला मृत्यू अटळ आहे. अशा प्रकारचे तत्व कादंबरीकार सांगतो. गरीब- श्रीमंत, स्त्री - पुरुष अशा कोणत्याही जीवाला मरण अटळ आहे. मृत्यूनंतर आनंदात जाण्याचा प्रवास कसा असतो. यावर भाष्य केल्याचे दिसून येते. ही कादंबरी निव्वळ सामाजिकता, रूढी परंपरा, धर्म यातून एक वेगळे वळण घेताना दिसते. आधुनिक तंत्रनिष्ठेने एका वेगळ्या विचारातून प्रकट केलेली ही कादंबरी आहे.

**" संकटाच्या वेळी रडायचं नाही लढायचं , नैसर्गिक संकटाला सामोरे जायचं"** असे डॉ. श्रीकांत श्रीपती पाटील यांनी **"पाणी फेरा"** या कादंबरी मधून व्यक्त केलेले आहे. 21 व्या शतकातील अनेक नैसर्गिक आपत्ती तसेच निसर्गाचा कोप, पूर, भूकंप, अवेळी पाऊस या सर्व ज्वलंत समस्यांना सामोरे जाण्यास वेगळे बळ देणारी कादंबरी या कादंबरीत गावगाडा सोबत घेऊन चालणारा सकारात्मक विचारसरणीचा उमदा नायक सुरेश या कादंबरीचा बलस्थान आहे. पाठीवरती हात ठेवून लढायचं बळ देणारी नाना आणि दादांसारखी खंबीर पात्रे या कादंबरीत आहेत. तशी सगळीच पात्र अतिशय उठावदार आहेत. अकराळ-विक्राळ रूपात अवतरलेला निसर्गही या कादंबरीतील एक पात्र आहे. संकटाच्या वेळी गावाची एकी बघितल्यावर **"गाव करील तिथे राव काय करेल"** या विधानाची प्रचिती येते वारंवार उद्भवणारे पूर परिस्थिती टाळण्यासाठीचे शास्त्रशुद्ध उपाय संवादातून उलगडताना जात उलगडत जातात. कोरोनाच्या नियमावळीमुळे पंधरा ऑगस्टची ग्रामसभा आता ऑनलाईन होते. भूमिपुत्रांनी अर्थात शेतक-यांनी केलेला हा तंत्रज्ञानाचा स्वीकार मोठा आश्वासक आहे.

अशाप्रकारे आधुनिक काळातील सामाजिक परिवर्तन गगनाला भिडलेले आहे. असे दर्शवणारी कादंबरी असली, तरी संकटावर मात करण्यास प्रवृत्त करणारी आहे. ग्रामीण भागातील शेतकरी खूप कष्टाचे जीवन जगत असल्याचे चित्रण करत असताना शेतकऱ्यांच्या भौतिक, आर्थिक, धार्मिक, सामाजिक परिस्थितीचा आढावा प्राध्यापक **रसूल सोलापुरे** यांनी **"पोटावरच्या आसूडाचा वळ"** या कादंबरीत घेतले आहे. या कादंबरीतून खऱ्या अर्थाने शेतकऱ्याचे जीवन त्यांच्या व्यथा, वेदना समस्या काय आहेत, त्यांच्या आयुष्यातील खडतर वाटचाली कशा प्रकारचे आहेत. अशा अनेक समस्या प्रधान विषयाचा शोध कादंबरीकार घेतल्याचे दिसून येते. जीवन फार अवघड आहे हे चित्र पुसले न जाणारे दृश्य अवतीभवती जिवंतपणे पाहायला मिळते. ग्रामीण समाजातील स्त्रियांचे जगणे त्यांच्या दु:ख, वेदना मनाला अंतर्मुख करतात 21 व्या शतकातील स्त्रियांच्या समस्येचे चित्रण मांडताना **नंदू साळोख** यांनी **'इपळाप'** कादंबरी लिहिलेली आहे. समाजातील स्त्रियांचे स्थान काय आहे. याचा ते शोध घेताना कादंबरीतील घटना अत्यंत हृदयगम्य अशा रीतीने मांडलेले आहेत. तिचे अत्यंत कष्टमय आयुष्य दिसते. तिच्या जीवनात नातेमंडळीकडून जाच नात्यातील प्रेम, वाईट परिस्थितीचे चटके अशा समस्या खेड्या भागात जास्त प्रमाणात घडतात. कादंबरीतील नाहक आयुष्याचे चटके सहन करता करता माहेरची ओढ, त्या आठवणीच्या सुखद अनुभवांना कवटाळून बसते. तिला आता फक्त माहेर दिसते, तिला वाटते. आई-वडिलांसोबत जगणं म्हणजे सुख आहे असे नाही. नंतरच्या काळातील नाईकेच्या जीवनात उसवलेली नाती रक्तातील नात्यांमधील उथळ आणि सखोल प्रेम दिसते असे नाही त्यामध्ये दु:खाचा डोंगर दिसू लागतो. अखंड स्त्री जीवन काबाडकष्ट व मानसिक यातना सहन करण्यात गेले. विसाव्याचे सुखद दिवस कधी दिसलेच नाही तिला आनंद काय असतो. याची जाणीव देखील आयुष्यात झालेले नाही. अशा सामाजिकतेचा आढावा घेताना कादंबरीकार स्त्रियांच्या अवतीभवतीचे जग अत्यंत खोलवर जाऊन टिपलेले आहे.

**समारोप:**

संस्कृती एक चांगले जीवन जगण्याचे तसेच चांगले विचार, आदर्श आणि मूल्ये शिकविते. त्यातून पूढील समाज घडतो, त्याला स्वच्छ सूंदर आयुष्य जगण्याची कला अवगत होते, समाज सूधारणा होऊन मानवी संबध स्वच्छंद व निर्भिडपणे जीवनाची वाटचाल करण्यास प्रवृत करणारी संस्कृती प्रत्येक समाजात रूजविली पाहिजे. दूस-यांच्या भावना तसेच अधिकार अत्यंत उदार हृदयाने बहाल करणे म्हणजेच आपली भारतीय संस्कृती होय. अशा संस्कृतीचा समजावर चांगला परिणाम झाला पाहिजे, ही काळाची गरज आहे. आपल्या संस्कृतीचे मूल्ये समजात रूजविली पाहिजेत या मूल्यांचा परिणाम समाजावर होऊन याची चांगली किंवा वाईट फ़ळे शेवटी ज्या त्या प्रदेशातील संस्कृती ठरविते. यात शंका नाही. जसे की चंद्राचा शीतल प्रकाश पृथ्वीवर पडल्यावर काही ठिकाणी कुमुदिनी विकसित होते, तर काही ठिकाणी दारिद्र्याची वेदना असह्य करते. अशाच प्रकारे भारतीय संस्कृती समानतेने नांदविणारी असली तरी काही ठीकाणी असमानाता, दुष्टता, क्रूरता, निराशता आढळून येते २१ व्या शतकातील आपली संस्कृती काही अंशी बदलते रूप घेतल्याचे आपण पाहतो. पाश्चात्य संस्कृतीचा अवलंब करत असल्याने

अंशीक परिणामे समाजात आपण पाहतो. आपली संस्कृती टीकवायची असेल तर आपण आपले सण वार ,उत्सव जत्रा ,यात्रा , आपला धर्म, यांचे अनुकरन केले गेले पाहिजे.

**संदर्भ सूची:**

१. दु.का.संत – 'साहित्य आणि संस्कृती', रत्नागिरी,
२. भालचंद्र नेमाडे- 'साहित्याचे समाजशास्त्र',प्रतिमा प्रकाशन,२००७
३. हरिश्चंद्र ठोरात-'साहित्याचे साम्जिक संदर्भ' ,शब्दालय प्रकाशन,२००४
४. नागनाथ कोतापल्ले- 'साहित्य आणि समाज', प्रतिमा प्रकाश्न,२००७
५. अनंताचे प्रवासी'-शिवाजीराव बागल
६. 'इपळाप' नंदू साळोखे
७. 'पाणिफ़ेरा'- डॉ. श्रीकांत पाटील
८. 'पोटावरच्या आसुडाचा वळ'-प्रा. रसूल सोलापुरे

# मराठी कवितेतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**नमिता अनिलकुमार पाटील**
संशोधक विद्यार्थी,
मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रास्ताविक**

साहित्य हा संस्कृतीचा एक घटक म्हणून जशी काही एक मीमांसा केली जाते. त्याचप्रमाणे संस्कृती आणि समाज हे साहित्याचा घटक म्हणून विचार केला जातो. संस्कृती, समाज आणि साहित्य यांच्यात प्राध्याविवेक करून मीमांसेच्या दिशा निर्माण होतात. साहित्यातून समाजाचे आणि संस्कृतीचे रूप व्यक्त होते. समाजाचे व संस्कृतीचे बाह्यरूपच केवळ नव्हे तर त्यांच्या प्रेरणा अंतर्यामी असलेल्या विशिष्ट समूहमनातील प्रवृत्ती, परंपरा यादेखील साहित्यातून सूचित होतात. काव्य म्हणजे संस्कृती टीका असे मथ्यू आर्नल्ड यांचे वचन आहे. समाजातील प्रथा, परंपरा, विचार-आचार, रूढी एकूणच समाजजीवनाचे प्रतिबिंबच साहित्यातून प्रतिबिंबित होते. कोणत्याही साहित्यातून तेथील लोकसंस्कृतीचे संदर्भ दिसून येतात. एखाद्या समाज घटकाचे साहित्य त्याला त्याच्या व्यापक समाजात सांस्कृतिक प्रतिष्ठा प्राप्त करून देत असते.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये**

१) २१ व्या शतकातील मराठी कविता अभ्यासणे.
२) मराठी कवी आणि त्यांच्या कविता याविषयी माहिती घणे.
३) कवितेतील आशय शोधणे, संदर्भ शोधणे.
४) कवितेतील सामाजीक आणि सांस्कृतिक संदर्भ यांचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती**

२१ व्या शतकातील मराठी कवितेतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ या शीर्षकाच्या शोधनिबंधाचे अभ्यासपूर्ण लेखन करीत असताना वर्णनात्मक संशोधन पद्धती आणि समाजशास्त्रीय संशोधन पद्धतींचा वापर करून शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

समाजाच्या स्थितीगतीशी व प्रतिभाशक्तीच्या प्रेरणेशी साहित्यनिर्मिती निगडीत असते, जिला समाजाची संस्कृती समजण्यात येते. ती समाजातील विचारकल्पनांनी व कला वाङ्मयीन आविष्कारांनी रुपास येते. जागतिकीकरणाच्या सार्वत्रिक प्रभावी यंत्रणेमुळे मानवी जीवनशैली बदलून गेली आहे. बदलत्या जीवनशैलीबरोबर एक नवी मूल्यव्यवस्था अस्तित्वात आली. भाषा आणि संस्कृतीवर याचा मोठा परिणाम जाणवतो.

२१ व्या शतकातील बदलेला मानवी समाज त्याचबरोबर बदलेली संस्कृती याचा अचूक वेध समकालीन कवी घेताना दिसत आहेत. या कवींनी आपल्या आजच्या वर्तमान काळातील तसेच भविष्यातील चाहूल खुणांना ओळखले आहे. प्रभावित संवेदनेचे जग कवींनी आपल्या कवितेतून व्यक्त केले आहे. महानगरातल्या कवींपासून ते तळकोकण, डोंगर कपारीतील कवींनी मानवी संस्कृती कवितेतून साकारली आहे. नवा कालावकाश आणि त्याने भारित झालेल्या माणसाचे जगणे या कवींनी मोठ्या तळमळीने उभे केले आहे. कविता ही वास्तवाची पुनर्रचना वा रूपांन्तरण करत असते. म्हणूनच कविता व वास्तव यांच्यातील संबंध नेहमीच गुंतागुंतीचे सूक्ष्म असतात.

श्रीधर तिळवे, मंगेश काळे, अनुराधा पाटील, कल्पना दुधाळ, अजय कांडर-वीरधवल परब, अरुण काळे, प्रज्ञा पवार, कविता महाजन, महेन्द्र भवरे, नीरजा, सचिन केतकर, संजीव खाडेकर, प्रवीण बांदेकर या कवींनी अनेकविध जाणिवा, कल्पना, भावना कवितेतून व्यक्त केल्या आहेत. या जाणिवांमध्ये भीतीची, चिंतेची, असुरक्षिततेची, ताण-तणाव जाणीव केंद्रवर्ती आहे. तशीच ती जाणीव आर्थिक-सामाजिक-सांकृतिक स्वरुपाची आहे. उदा.- नोकरी, व्यवसायातील असुरक्षितता, आपल्या संस्कृतीची, सांस्कृतिक अस्मितेची, सांस्कृतिक अराजकतेची चिंता व्यक्तित्वलोपाची चिंता अशा अनेकविध चिंतांनी व्यापलेले समाजजीवन आपल्याभोवती पहावयास मिळते. या वास्तवाचे सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ हे कवितेमधून जाणवतात.

महानगरापासून ते गावपातळीपर्यत बोकाळत चाललेल्या बाजारू व्यवस्थेमध्ये सामान्य माणूस त्याने आजवर पिढ्यानपिढ्या जिवापाड जपलेली मूल्ये, परंपरा व पूर्वचिंतापासून उखडला जात आहे. अशा सांस्कृतिक पडझडीच्या वर्तमानाचे चित्रण प्रवीण बांदेकर 'खेळखंडोबाच्या नावानं' या कवितेतून चित्रित करतात.

तशा मग माणसं जाळल्याच्या घटनाही असतात.
रांड मुंड बायकांवर सहानुभूतीचे कॅमेरे फिरतात
आणि आपल्या मायबाप सरकारच काम काय अशा दिवसांत, तर
तिजोरीत देवळांबिवळांसाठी दगडबिगड साठवून ठेवणं
आणि शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यावर चौकशा समित्या नेमणं
(खेळखंडोबाच्या नावानं-११)

समाजात घडणाऱ्या घटना बेरोजगारांच्या आत्महत्या महिलांवरील अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, जाळपोळ, सरकारी धोरण असे सर्व वास्तव मांडणारी कविता प्रवीण बांदेकर यांनी रेखाटली आहे. उध्वस्त होतायत गावं, मोहल्ले शेतं, घरं, दुकानं आणि मनं आणि यातून पिढ्यानपिढ्या उध्वस्त होऊन भविष्यकाळ संस्कृती याविषयीची खंत कवी व्यक्त करतात.

कवयित्री कल्पना दुधाळ यांची 'धग असते आसपास'या कविता संग्रहातून खेड्यापाड्यांपर्यंत पोहोचलेले आधुनिकतेचे वारे आणि त्यातून हरवत चाललेली नात्यांमधील ओल, कस, हरवलेली माती आणि नाती, झपाट्याने लोप पावणारी माणुसकी त्यामुळे समाजामध्ये झालेले बदल आणि बदलती संस्कृती आणि यातून वाढणारा वैरभाव याविषयीचे वास्तवचित्रण या कवितांमधून दिसून येते. पोटची पोरगी पळून गेल्यावर आई शरमेने मान खाली घालून भावकीतून, सोयरिकीच्या कार्यातून, नात्यागोत्यातून बाहेर पडते. गाव त्या माऊलीला पळून गेलेल्या पोरीची मुस्काडतोंडी आई असे हिणवते.आज एकविसाव्या शतकामध्ये वावरत असताना पुढारलेला समाज म्हणत असतानाही समाजामध्ये मुलगीही घरची पाहुणी असते अशी संस्कृती रूढ आहे. त्याचप्रमाणे 'अधांतरी' या कवितेतून कल्पना दुधाळ लिहितात की, सासर असो वा माहेर दोन्हीकडे बाई परकीच असते. या दोन्हीमध्ये हेलकावे खाणारे तिचे जगणं अधांतारीच असते. भारतीय संस्कृतीमध्ये सण-समारंभामध्ये माहेरवाशिणीला लुगडे चोळी आहेर करणे अशी प्रथा- परंपरा रूढ आहे. पण कवितेतील मुलगीने नवे लुगडे मागितले तेव्हा बाप म्हणतो, "तुला जिथे दिली तिथेच तू मेलीस". या ओळीतून मुलीचे कन्यादान केल्यानंतर मुलगी ही माहेरची घटक नसून सासर हेच तिचे सर्वस्व आहे असा सांस्कृतिक-सामाजिक संदर्भ दिसून येतो.

अनुराधा पाटील यांच्या कवितेतील गावाकडच्या आईचा मृत्युकडे पाहण्याच्या एक वेगळा दृष्टीकोन आहे आणि परंपरेने तिनं तो जात्यावरच्या गाण्यात नोंदवून ठेवलेला आहे. जात्यावरील ओवी 'जीवाला जडभारी', 'आहेत मरण' आणि 'गेला माझा जीव' अशा तीन प्रकारच्या गाण्यात या बायांनी मृत्युशी संवाद साधला आहे.अनुराधा पाटील यांच्या कविततील आई ही याच बायकांची प्रतिनिधी असल्यामुळे मृत्युपूर्वीची निरवानिरव करताना ती जे बोलते ते जात्यावरच्या अनुभवाचे धन आहे. जन्मापासून मृत्युपर्यंत माणसाचे आयुष्य हे वाळूच्या पात्रात मांडलेला खेळच असतो. या कवितेतून स्त्री जीवनाचे एक शाश्वत सत्य प्रतिमाबद्ध होते. या प्रतिमातून साऱ्या स्त्री जीवनाचे एक कारुण्यमय संवेदन त्या शब्दबद्ध करतात.

पण पुढं अबाधित राहील तिचं
हे टिकली-बांगडीचं
चिमूटभर स्वातंत्र्य
की बाप नवरा मुलगा
परंपरेच्या या काटेरी कुंपणातच
अडकून पडेल तिचा पदर (वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ, पृ. १९)

समाज आणि संस्कृती यामध्ये परंपरेने बाप, नवरा, मुलगा या पुरुषप्रधान व्यवस्थेतील दु:खद भविष्य सूचकता आणि स्त्री आयुष्यातील विदारकता कवयित्री टिपते आणि पुरुष संस्कृतीची झोपलेली चिंतनावस्था जागृत करते. अनुराधा पाटील यांच्या कवितेतून एकाकीपणाचे-परात्मजाणिवेचे प्रकटीकरण होते. तिच्या वाट्याला हे एकाकीपण तुटलेपण विविध कारणांमुळे आले आहे. समाज संस्कृतीची विशिष्ट चौकट परंपरेने स्त्रियांना दिलेले गौणत्व यातून वाट्याला येणारे दु:ख व आपण या साऱ्यांशी एकरूप होऊ शकत नाही ही जाणीव तिला अस्वस्थ करते.

एकविसाव्या शतकातील मराठी कविता ही महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर उभी आडवी छेदत जाते.

कविता महाजन यांच्या 'समुद्र आहे एक विज्ञान जाळं'या कवितेतून एका मासळीचे समुद्रातील जीवन चित्रित करण्यात आले आहे. मत्स्यजीवनाचे चित्र हे अंतिमत: मानवी जीवनाचेच चित्र बनून जाते. मानवी जीवनाचे समाजाचे रूपक बनून मासळी येते. मानव ज्या जगात जगत असतो त्याच्या पलिकडे जाऊन वेगळ्या जगाची वाटणारी ओढ आणि या जगापलीकडे जे अज्ञान आहे ते जाणून घेण्याची मानवाच्या ठिकाणी असलेली धडपड, जिज्ञासा, समाजाशी तुटत जाणारा संबंध, त्यातून होणारी परकेपणाची जाणीव याचा संदर्भ या कवितेमध्ये सापडतो.

श्रीधर तिळवे यांच्या कवितेतूनही जागतिकीकरणाच्या काळातील एक नवी चिन्ह संस्कृती अधोरेखित झाली आहे. महानगरातील आकर्षित करणारे महाकाय मॉल्सचे दर्शन या कवितेतून होते आणि महानगरातील मनुष्य या मॉल्सला आपोआप न कळतपणे खेचला गेला आहे ही जाणीव या कवितेतून व्यक्त झाली आहे. प्रचंड महाकाय इमारती, गर्दी आणि मॉल्स यातून मानवी चेहरा अदृश्य झाला आहे. श्रीधर तिळवे यांच्या कवितेतून नव्या जगाचे दर्शन मोठ्या प्रमाणात घडते. महानगरातील गुंते आणि तेथील भयाण वास्तव हे त्यांच्या कवितेचे विषय ठरले आहेत. या पार्श्वभूमीवर अस्मिता विन्मुख मानवी चेहरा विसंवाद, परात्मता, तुटलेपण व हरवलेपण आणि एकूण मनुष्यातील दुरावलेपणा यांचे संवेदन या कवितेतून व्यक्त झाले आहे.

आधुनिक मराठी समाजजीवनाच्या विकासाला जसजशी नवी दिशा लाभत गेली तसतसे मराठी कवितेचे क्षेत्र ही विशाल होत गेलेले दिसते. या विकसनशील मराठी मनाचे ताणेबाणे व्यक्त होताना त्यावर सभोवतालच्या वाङ्मयीन प्रवृत्तीचे पडसाद उमटत राहिले आणि साहित्यिक कल्पनाप्रधान केवळ रंजक साहित्य निर्मितीपेक्षा जिवंत स्वानुभवच तो प्रभावीपणे कवितेतून मांडू लागला. त्यामुळे मराठी कविता विविध वाटा व वळणे घेत घेत वाटचाल करीत आहे.

## समारोप

२१ व्या शतकातील कवितेच्या भोवतालचे वास्तव निर्देश करते. या काळात आपल्या आर्थिक-सामाजिक-स सांस्कृतिक जीवनात प्रचंड प्रमाणात आणि अत्यंत वेगाने बदल झाले आहेत. जागतिकीकरणाच्या अर्थव्यवस्थेबरोबरच विज्ञान-तंत्रज्ञानामध्ये वेगाने बदल झाले इ-विस्तार, माहितीचा स्फोट,दळणवळण क्रांती या गोष्टी या बदलाची महत्त्वाची अंगे आहेत. यामुळे सामाजिक आणि विशेषत: सांस्कृतिक जीवनात तिच्यामुळे अभूतपूर्व बदल झाले आहेत. हा बदल त्याचा मानवी समाजावर आणि संस्कृतीवर झालेला परिणाम याचा लेखाजोखा कवितेमधून मांडण्याचा पर्यंत २१ व्या शतकातील कवी करताना दिसत आहेत.

## संदर्भसूची

१) प्रा. कोत्तापल्ले नागनाथ, प्रा. भगत दत्ता (संपा), जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य, सायन पब्लिकेशन्स, पुणे, २०१७.
२) डॉ. गोरे, दादा - अनुराधा पाटील यांची कविता प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६.
३) जाधव, रा. ग., - साहित्य व सामाजिक संदर्भ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००३.
४) प्रधान, ग. प्र., जाधव रा. ग. (संपा), निवडक साधवा सामाजिक व सांस्कृतिक, साधना प्रकाशन, पुणे, २००७.
५) यादव, आनंद, - मराठी साहित्य समाज आणि संस्कृती मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८५.

# २१ व्या शतकातील मराठी साहित्यातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**मयुरी ऋषिकेश मोरे**
स्कूल ऑफ स्कॉलर्स , अमरावती .

**प्रास्ताविक : -**

"साहित्य हे मानवी जीवनाचे प्रतिबिंब आहे "."साहित्य हा समाजाचा आरसा आहे." "संस्कृती ही विविध समुदायाची सुजीवन पद्धती आहे." अशी विविध मते आपण ऐकतो साहित्य समाजआणि संस्कृती हे एकमेकांना परस्पर पूरक घटक आहेत या साहित्य समाज व संस्कृतीचा एकमेकांमध्ये सहसंबंध आढळतो समाज व संस्कृती तर साहित्यावर प्रचंड प्रभाव आहे या प्रभावाचा व्यापक विचार करावा लागतो.

साहित्य समाज आणि संस्कृती :-

कला ,समाज आणि संस्कृती यांच्या अभ्यासाचे 'साहित्य' हे महत्त्वाचे माध्यम आहे तर साहित्य, समाज आणि संस्कृती यांचे अत्यंत घनिष्ठ संबंध असून ते परस्परांना पूरक असतात. "साहित्यनिर्मिती हा मानवाच्या सामाजिक जीवनातील सांस्कृतिक उपक्रम ,आहे तसाच तो संस्कृतीचा एक घटकही आहे विवाह संस्थेपासून राज्यसंस्थेपर्यंत सर्वसामाजिक संस्था या संस्थांच्या लिखित अलिखित नियमांपासून निर्माण झालेल्या चालीरीती रूढी परंपरा आणि रिवाज तसेच कला आणि साहित्य हे संस्कृतीचे चार घटक आहेत .या चार घटकांनी मिळून संस्कृती ही लघुसंख्या परिचित झालेली आहे .पुष्कळदा संस्कृती आणि समाज असे म्हणतो तेव्हा आपल्याला लोकांचे वर्तन अभिप्रेत असते .समाज हा ओळखता येण्यासारखा लोकसमुदाय असतो तो आदिम समाज भटका विमुक्त समाज खेड्यातील कृषी जीवनाशी निगडित ग्रामीण समाज अथवा आधुनिक समाज असेल पण समाज म्हणजे एक अर्थी परिमीठ लोकांची संस्थाच असते आणि 'संस्कृती' म्हणजे विवेक्षित लोकसमुदायाच्या अथवा समाजाच्या जीवनाची विवेक्षित पद्धती असते या जीवनपद्धतीत कला आणि 'साहित्य' यांना अविभाज्य आणि अपरिहार्य असे स्थान आहे ."

साहित्यकृतीची निर्मिती ही लेखकांनी लेखकाची व्यक्तिनिष्ठ निर्मिती असली तरी त्याला त्याच्या समाज जीवनातून आणि संस्कृतिक वातावरणातून साहित्याच्या निर्मितीच्या प्रेरणा व स्तोत्र मिळत असतात.

**साहित्य :-**

संस्कृत साहित्य मीमांसकांनी काव्याच्या / साहित्याच्या केलेल्या व्याख्येवरून असे म्हणता येते की, साहित्य हा शब्द संस्कृत वाङ्मयात 'ललित वाङ्मय' या अर्थाने उपयोगात आणलेला आहे वाङ्मय सारस्वती साहित्याची पर्यायी संज्ञा आहे .

साहित्य म्हणजे असे लेखन की ज्यात शब्दार्थांना एक रमणीय अर्थ असतो भाव, कल्पना, विचार, शैली इत्यादीपासून हे रमणीयत्व ,लालीत्य आलेले असते त्यामुळे हे लेखन लक्षणीय बनते वाचकांना त्यांच्या आस्वादातून एक प्रकारचा आनंद प्रत्येक नियत असतो .काव्य, कथा, कादंबरी, नाटक यांचा समावेश साहित्याचा असतो. साहित्य ही एका व्यक्तिमत्त्वाची नवनिर्मित असते लेखक कवी आपली अनुभूती आपले अनुभव विश्व साहित्यातून व्यक्त करत असतो. साहित्यही एक अशी शक्ती आहे. मनासंबंधीच्या अनुभवातून एक मन तिची निर्मिती करते आणि अनेक मन तिचा आस्वाद घेतात साहित्य शब्दांमधून साकार होते शब्द अनुभव प्रगट करतात अनुभव अनेक मूल्यदर्शी भाव घटकांनी संघटित होते .यावरून लक्षात येते की साहित्यकृती मधील अनुभूती लेखकांना समाज परिसरातून घेतलेले असते .त्यामुळे लेखकांची अनुभव सृष्टी म्हणून जी संकल्पना मान्य केली जाते तिच्यावर समाज आणि संस्कृती यांचा प्रभाव दिसून येतो.

**समाज : -**

एका समाज उद्दिष्टांसाठी एका विशिष्ट भूभागावर राहणाऱ्या व्यक्तीच्या समुदाय म्हणजेच 'समाज' होय. निवडणूक एकत्रित आले म्हणजे समाज बनत नाही. समाज बनण्यासाठी त्या लोकांमध्ये संबंधांची व्यवस्था असली पाहिजे.समाजा एका विशिष्ट भूभागावर वसलेला असतो समाज स्थायी असतो त्यात निरंतरता असते .समाजातील सदस्यांमध्ये आपलेपणाचे जी भावना असते समाजाचे वैशिष्ट्यपूर्ण जीवन पद्धती असते. पुराना त समाजाचा उल्लेख 'समाज' म्हणजे उत्सव असा आढळतो.

प्रत्येक समाजाची धारणा त्यामागील रचना तत्वे वेगवेगळी असतात धर्म, संकल्पना ,रुढी ,तत्व ,प्रणाली, आचार, विचार दृष्टिकोन संकेत शिष्टाचार नीती कल्पना इत्यादी विषय स्वतंत्र व्हा वेगळे असतात. त्या सर्वांवरच त्या -त्या समाजाची संस्कृती निश्चित होत असते त्यावरून साहित्य हे जसे मानव सापेक्ष आहे तसाच मानव हा समाजापेक्ष आहे आणि समाज हा संस्कृती सापेक्ष आहे हे जर आपण मान्य करणार असून तर साहित्य आणि समाज यांच्यातील मूलभूत संबंध कोणालाच नाकारता येणार नाही .

**संस्कृती :-**

केवळ मानव हाच संस्कृती असणारा मुल भूतलावरील एकमेव प्राणी आहे .संस्कृती ही मानवाने स्वतः निर्माण केलेली आहे .संस्कृती हा शब्द 'कल्चर' या शब्दाच्या प्रतिशब्द म्हणून रूढ झाला आहे .संस्काराने संस्कृती हे दोन्ही सम +कृत या एकाच धातूपासून बनलेले आहे .त्यांचा अर्थही व्याकरणी दृष्ट्या एकच आहे पण संस्कार हा शब्द धार्मिक क्षेत्रापुरताच मर्यादित राहिला धर्मासह समग्र अंत र्बाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कृती हा शब्द वापरला जातो."मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय." डॉक्टर इरावती कर्वे यांच्या संस्कृतीच्या व्याख्यानावरून संस्कृतीची संकल्पना पूर्ण स्पष्ट होते.

**साहित्य समाज आणि संस्कृतीचा संदर्भ : -**

जीवन हा साहित्याचा विषय आणि भाषा हे साहित्याचे माध्यम आहे .जीवन व भाषा या दोन्ही गोष्टींमध्ये समाजातील आहेत तर प्रत्येक समाजाजवळ एक संस्कृतीचा ठेवा असतो ,शिवाय साहित्य हे वाचक शोध श्रोते व प्रेक्षक यांच्याकरिता निर्माण होते .आणि साहित्य हा समाजाचा एक घटक असून साहित्य निर्मितीने त्याला समाधान संपत्ती व कीर्ती प्राप्त होते या सर्व गोष्टीत साहित्याचा समाजाशी असलेला संदर्भ दिसून येतो. साहित्याचे समाजावर व समाजाचे साहित्यावर बरे वाईट परिणाम होत असतात .त्यांचे एक कारण असे देता येते की लेखक ,वाचक आणि भाषा हे साहित्य कृतीच्या संदर्भात लक्षात घ्यायला हवे ते तिन्ही घटक सामाजिक म्हणूनच एकच कारण असे देता येते की लेखक वाचक आणि भाषा हे साहित्य कृतीच्या संदर्भात लक्षात घ्यायला हवे तसे तिन्ही घटक सामाजिक म्हणून अशा एका वस्तूचे भाग असतात .त्यामुळे साहित्याला एक सामाजिक परिणाम प्राप्त होत असतो ,त्यामुळेच तेथे कलात्मकते बरोबरच सामाजिकतेचा विचाररही महत्त्वाचा ठरतो .

"लेखक ही निर्मितीक्षम कलावंत असाच असला तरी, तो नेहमीच एका विशिष्ट समाजाचा घटक असतो व्यक्ती आणि समाजांच्या संदर्भाबाबतचे सर्व प्रश्न त्यांच्याही बाबतीत उपस्थित होत असतात .त्यांच्या कृतीला नेहमीच एक सामाजिक परिणाम असतो. व्यक्तीचे ऐकले पण आणि सामाजिकता यातही एक गुण संबंध असतो त्यातील प्रश्नांची सोडवणूक साध्या सरळ नियमांनी करता येत नाही हे खरे असले तरी या दोहोतही असलेला संदर्भ अमान्य करता येत नाही."

'साहित्य' आणि 'संस्कृती' यांचा निकट संदर्भ आहे. साहित्य आणि संस्कृत साहित्य हा संस्कृतीचाच एक भाग आहे .संस्कृती म्हणजे विशिष्ट काळातील समाजातील जगण्याची विशिष्ट रिती .पद्धती .धाटणी होय .संस्कृतीत सामावलेल्या कोणत्याही गोष्टीचे ज्ञान उपजत नसते .संस्कृतीचा वारसा पूर्वजांकडून मिळतो ,परंतु प्रत्येक पिढी तेवढ्यावरच समाधान मानत नाही .परिस्थितीशी समायोजन करताना व चिकित्सक बुद्धीने निर्माण केलेल्या प्रश्नांचे उत्तर शोधताना प्रत्येक पिढीला नवीन अनुभव येतात नवनवीन संस्कृतीची निर्मिती होते ,मूळ संस्कृतीत भर पडते या प्रक्रियेमुळेच मानवी संस्कृतीचा सतत विस्तार होत आलेला आहे.

लेखकाच्या साहित्य निर्मितीत त्याचे सारे व्यक्तिमत्व सामावलेले असल्याने साहित्याचा विचार करताना त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार तितकाच महत्त्वाचा असतो. सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरण हा समाजिक घटक वांग्मय निर्मिती आणि अभिरुची सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणातच घडत असते .लेखक आणि वाचक हे समाजाचे घटक असतात जे त्यांच्या समाजाच्या पर्यावरणात वावरतात पर्यावरणाचा त्यांचा चांगलाच वाईट परिणाम होत स्वभाविक असते, शिवाय प्रत्येक समाजाची आपली म्हणून एकास एक संस्कृती असते या संस्कृतीची जडणघडण परंपरेने झालेली असते .समाजाच्या आचार विचार उडी प्रथा यातून संस्कृतीला पहिली प्राप्त होत असतात लेखक आणि वाचक या सामाजिक सांस्कृतिक पर्यावरणात वाढलेला असतो, त्यामुळे या समाजाच्या जीवन पद्धतीचे चित्र साहित्यकृतीतून येणे जसे स्वाभाविक असते तसेच ते वाचकालाही आपले वाटणे स्वाभाविक असते काळ बदलला आणि सामाजिक आणि सांस्कृतिक स्थिती बदलते आणि बदलत्या परिस्थितीत परिणाम साहित्यावर झालेला दिसून येतो स्वातंत्र्योत्तर काळानंतर दलित साहित्य स्त्री साहित्य इत्यादी साहित्य प्रकारात झालेल्या बदल हे काळाच्या सामाजिक आणि संस्कृतीत बदलाचे उदाहरण आहे यावरून सामाजिक सांस्कृतिक परिस्थिती बदलली म्हणजे साहित्यातूनही बदल घडून येतात असे सिद्ध होते.

**निष्कर्ष:-**

सर्व विवेचनावरून असा निष्कर्ष निघतो की साहित्य हे समाजाचे संस्कृतीच्या प्रभावातून निर्माण होणारी एक कला आहे. साहित्याचा अनुबंध राष्ट्रीय धर्म वंश प्रदेश इत्यादी दृष्टीने तपासला असतो. त्यातून समाजाचे व संस्कृतीचे प्रतिबिंब अनुभवता येते, साहित्याची भाषा ही दलित ग्रामीण अभिजात आदिवासी इत्यादी दृष्टीने आधुनिक काळात बोली रूप झालेली दिसते. त्यामुळे या सर्व साहित्यातून त्या त्या बोलीच्या परंपरा लोकतत्त्व आणि त्या त्या समाजाचे संस्कृतीचा आलेख स्पष्ट होतो.

# लक्ष्मण गायकवाड यांच्या 'चिनी मातीतील दिवस' प्रवासवर्णनामधील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**शैला आनंदराव क्षीरसागर**
संशोधक विद्यार्थी
पत्ता – मु .पो. सोनवडी (बु), ता. फलटण ,जि. सातारा

**प्रास्ताविक –**

कोणताही साहित्यप्रकार विचारात घेतला गेला तरी त्या प्रकारात लेखक हा समाजाचा घटक म्हणून सामाजिक संदर्भ देऊन कलाकृती आकारास आणत असतो . साहित्याची निर्मिती ही सामाजिक वातावरणात होत असते . तो समाजातील वास्तव चित्रण करीत असताना विविधांगाचा शोध घेत ते वास्तव कलात्मकतेने रेखाटत असतो .

समाजाचा इतिहास ,राजकारण, समाजकारण , धार्मिकजीवन , सांस्कृतिक जीवन , शैक्षणिक जीवन, रूढी – परंपरा या सर्व सामाजिक संदर्भामुळे त्या-त्या प्रदेशातील समाजजीवनाची ओळख होते . साहित्य म्हणजे जीवनभाष्य असे जेव्हा अर्नोल्ड म्हणतो तेव्हा साहित्यात कोणताही प्रकार असला तरी त्या प्रकारात सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ येत असतो .

कथा , कविता , कांदबरी, नाटक , प्रवासवर्णनया सर्वच साहित्य प्रकारामध्ये सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ येत असतात . प्रवासवर्णन हा साहित्यप्रकार ललित गद्याचा एक उपप्रकार मानला जातो. प्रवासी लेखकहा प्रवास करीत असताना तिथल्या समाजाकडे एका वेगळ्या दृष्टीकोनातून पाहत असतो. चिंतन, मनन करून तिथे आलेल्या अनुभवातून सौंदर्य उलगडत असतो. प्रवासात भेटलेल्या व्यक्ती , तिथला समाज, तिथले सांस्कृतिक जीवनसंदर्भ यामुळे प्रवासातील आठवणी नव्याने जागृत होत असतात. या आठवणी जेव्हा प्रवासवर्णनात येतात तेव्हा या प्रवासवर्णनाला अधिक उठावदारपण येत असते.

प्रवासवर्णन या साहित्य- प्रकाराचा विचार करता अनेक लेखक – लेखिकांनी समाजजीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यापैकीच एक लेखक लक्ष्मण गायकवाड यांचे एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी म्हणजे २००५ मध्ये 'चीनी मातीतील दिवस ' या प्रवासवर्णनाने मराठी साहित्य प्रकारात मोलाची भर घातलेली दिसून येते.

**उद्दिष्ट –**

१ .प्रवासवर्णनातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भाचा शोध घेणे .
२ . चीन व भारतीय संस्कृतीमधील साम्य भेदाचा मागोवा घेणे.

**चिनी मातीतील दिवस-**

लक्ष्मण गायकवाड यांच्या 'चिनी मातीतील दिवस 'या प्रवासवर्णनाने वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे. लक्ष्मण गायकवाड यांची साहित्य अकादमीकडून सांस्कृतिक खात्यामध्ये निवड झाली होती . भारत आणि चीन यांच्यातील सांस्कृतिक देवाण-घेवाण करण्यासाठी ते चीनला भेट देणार असतात. लेखकाला मिळालेली ही फार मोठी संधी होती.
एकीकडे चीनला जायची उत्सुकता तर दुसरीकडे पासपोर्ट काढण्यासाठी करावी लागलेली धडपड आणि पैसे जमविण्यासाठी करावी लागलेली कसरत याचे वर्णन लेखकाने केले आहे. पहिला विमानप्रवास, नवीन जग, चीनमध्ये लेखकाचे झालेले स्वागत ,वेळेला महत्त्व देणारे, शिस्तबद्ध कायदे व नियम,नियमितसायकल चालवणारे चिनी लोक , तिथला शेतकरी , विद्यापीठ, राजकारणी लोक , रेल्वेस्टेशन, बुद्धमूर्ती दर्शनभेटअशी लेखकाची पंधरा दिवसांची सफर होती.

**सामाजिक जीवन–**

पंधरा दिवसाच्या प्रवासामध्ये लेखकाने आपल्या सूक्ष्म निरीक्षणशक्तीने समाज न्याहाळला आणि त्या समाजाचे दर्शन प्रस्तुत प्रवासवर्णनात घडविले. चीनचा प्रवास करीत असताना लेखकाला भेटलेली माणसे, तिथले कायदे, शिस्त , स्वच्छता, समाजातील स्त्रियांचे स्थान, नियमितपणे सायकल वापरणारे चिनी लोक या साऱ्या गोष्टीतून चीनचे सामाजिक दर्शन घडते .

**शिस्त-**

चिनी नागरिकांच्या अंगी वक्तशीरपणा, शिस्त तसेच स्वच्छता पहायला मिळते, ती तिथल्या कडक कायद्याच्या धाकामुळे. याशिवाय ही माणसे वेळेला अधिक महत्त्व देतात. लेखक वेळेवर पोहोचले नाहीत म्हणून चीनचे सांस्कृतिक अकादमीचे सदस्य वांगलू हे लेखकावर नाराज होतात तेव्हा लेखक त्यांची माफी मागतात. प्रत्येक बाबतीत तिथे टापटीपपणा पहायला मिळतो .

**नियम—**

चीनमध्ये सरकारी कायदे व नियम कटाक्षाने पाळले जातात. कोणतीही व्यक्ती कितीही मोठ्या पदावर काम करीत असली तरी स्वत: चे काम त्या व्यक्तीला स्वत:च करावे लागते. नोकरीच्या ठिकाणी वेळेवर जाणाऱ्या, कधीही रजा न घेणाऱ्या प्रामाणिकपणे काम करणाऱ्या माणसाचा वा शेतकऱ्याचा पुतळा उभारला जातो. कोणी सरकारी पाहुणा असेल त्याचाच खर्च सरकार करते . जर त्यांच्याबरोबर चीनी अधिकारी असेल तर त्याला स्वत:च खर्च करावा लागतो असा तिथे नियम आहे. ग्रंथालयातील पुस्तकेही वेळेत परत करण्याचा नियम काटेकोरपणे पाळला जातो.

**आरोग्य**

माणसाचे आरोग्य उत्तम रहावे यासाठी सर्व नागरिक सायकलचा वापर नियमितपणे करतात . त्यामुळे प्रदूषणही कमी होते. अगदी शेतकऱ्यापासून कुलगुरूपर्यंत सर्वजण सायकलचा वापर करताना दिसतात. ही बाबही तितकीच महत्त्वाची वाटते.

**स्वच्छता—**

चीनमध्ये शिस्ततेबरोबर स्वच्छताही पहायला मिळते. सार्वजनिक ठिकाणी सगळीकडे स्वच्छता असते. रस्ते अतिशय सुंदर व चकचकीत असतात. रस्त्याच्या आजूबाजूला रस्त्यावर कुठेही कचरा वा ढिगारे दिसत नाहीत. रस्त्याच्या दोन्ही बाजूला हिरवीगार झाडे पाहून डोळे तृप्त होतात. रस्त्याच्या मध्येच कुठेतरी रंगीबेरंगीफुलांचे गुच्छ पहायला मिळतात. रस्त्यावर भटकी कुत्री,मांजरे दिसत नाहीत. एवढेचनव्हे तर पान वा सिगारेट फुंकणारी बिनकामी माणसे लेखकाच्या नजरेस दिसत नाहीत. प्रवास करताना रस्त्यावर कोणीही रिकाम्या बाटल्या वा प्लास्टिकच्या पिशव्या टाकत नाहीत. लेखकाने आपल्या भारतीय सवयीप्रमाणे रिकामी पाण्याची बाटली बाहेर टाकली असता गाडीचा ड्रायव्हर त्याची विचारपूस करतो तेव्हा आपली चूक लेखकाच्या लक्षात येते . मग ती बाटली त्याने मातीत पुरली. स्वच्छतेच्या बाबतीतला हा अनुभव लेखकाने स्वत: घेतलेला आहे . केवळ रस्त्यावरच नव्हे तर रेल्वेच्या बाबतीतहीशिस्तता व स्वच्छता दिसते. कुणीही भिकारी तिथे दिसत नाही. सामान कुठेही पडलेले दिसत नाही. या गोष्टीची नोंद लेखकाने आवर्जून घेतली आहे.

**कृषीजीवन -**

चीनमध्ये सरकारकडून खूप चांगल्या चांगल्या सुविधा दिल्या जातात. कुटुंबात एकूण माणसे किती आहेत , हे लोक किती जमीन करू शकतात याचा विचार करून शेती दिली जाते. जमिनीचा एकही तुकडा पडीक ठेवायचा नाही असा तिथे नियम असतो . शेतकऱ्याने त्या जमिनीतून उत्पन्न घ्यायचे व होणाऱ्या उत्पन्नापैकी २० % स्थानिक सरकारला व ८० % स्वत: कडे ठेवायचे. शेतकऱ्याच्या मुलांसाठी शिक्षण, आरोग्य , स्वच्छता, स्वतंत्र हॉस्पिटल अशा सोयी पुरवते . शिवाय शेतकऱ्याना कमी किमतीत ट्रक्टर दिला जातो . प्रत्येक शेतकऱ्याला सरकारकडून घर दिले जाते. चार-पाच शेतकरी एकत्रित येऊन शेती करतात . खरे पाहता चिनी स्त्रिया ह्याच खऱ्या शेतकरी आहेत. त्यांनी शेतीचे तंत्रज्ञान अवगत केले आहे . मार्केटींगचे कामही शेतकरी महिलाच करतात .

**स्त्रीजीवन—**

चीनमधील स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत . शेती करण्यापासून ते वैमानिक होण्यापर्यंतची त्यांची झेप उत्तुंग अशी आहे. या स्त्रियांचे राहणीमान अत्यंत साधे असते . या स्त्रिया अंगावर एका मोत्याच्या माळेशिवाय दुसरा कोणताही दागिना घालत नाहीत. विशेष म्हणजे प्रत्येक स्त्रीकडे सायकल असते. दैनंदिन जीवनात सर्व व्यवहार ती सायकलवरूनच करीत असते. चीनमध्ये मुलगा —मुलगी असा कोणताच भेदभाव मानला जात नाही. याउलट मुलगी होण्यासाठी देवाकडे प्रार्थना केली जाते. चीनमध्ये पुरुषापेक्षा स्त्रिया अधिक कर्तबगार, दक्ष वाटतात . चीनच्या स्वातंत्र्य लढ्यात पुरुषाबरोबर स्त्रियांना सहभागी करून घेतले असल्याने त्यांनी फार मोठी क्रांती केलेली दिसून येते.

**चिनी संस्कृती -**

लेखक लक्ष्मण गायकवाड यांनी चीन व भारतीय संस्कृती या विषयावर शोधनिबंध सादर केला.या शोधनिबंधात चीन व भारतीय संस्कृतीचा मागोवा घेतला आहे. लेखकाला चिनी माणसे अधिक कष्टाळू वाटतात . ते श्रमाला महत्त्व देतात. मात्र भारतीय माणसे चिनी लोकांच्या मानाने कमी कष्टाळू वाटतात . एकीकडे कष्ट करणाऱ्यांना सरकार खूप साऱ्या सवलती देत

असते. शिपाई नावाचा प्रकारच तिथे अस्तित्वात नाही. प्रत्येकाने स्वयं श्रमाला महत्त्व दिलेले असते. तर दुसरीकडे बुद्धिवादी लोकांची कुचंबना होत असते. आर्थिक परिस्थिती नसलेल्या बुद्धिवंत विद्यार्थांना परदेशात शिक्षणासाठी जाता येत नाही. त्या विद्यार्थाला जायचे असेल तर अगोदरच्या शिक्षणाचा खर्च परत द्यावा लागतो.भारतात मात्र परिस्थिती वेगळी आहे. अनेक भारतीय तरुण परदेशात जाऊन स्थिरावतात ,स्वत : चे नाव कमावतात. हा फरक लेखकाने आवर्जून सांगितला आहे . चीनमध्ये सर्व धर्मियांना समानतेची वागणूक दिली जाते. प्रत्येक दांपत्याला एकच मूल हा कायदा आहे. फक्त मुस्लिम धर्म याला अपवाद आहे. त्यांना दोन अपत्ये जन्माला घालण्याची परवानगी होती. या साऱ्या अनुभवातून चीनमधील समाजाचे जीवन दर्शन घडते.

**सांस्कृतिक जीवनदर्शन -**

भारत आणि चीन या दोन देशातील सांस्कृतिक तुलना लेखकाने या प्रवासवर्णनात केलेली दिसून येते. प्रत्येक देशाची संस्कृती ही वेगवेगळी असते . ही संस्कृती जतन आणि वृद्धींगत करण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्न करीत असतो. लेखकाला चिनी स्त्रिया सुंदर वाटतात. या स्त्रिया मुळातच सौदर्य घेऊन आलेल्या असतात. टाय, कोट ,गळ्यात मोत्याची माळ अशी वेशभूषा करून समाजामध्ये बिनधास्तपणे वावरताना दिसून येते. त्या स्वत: पालेभाजी मार्केटमध्ये सायकलवर जाऊन विकतात. भारतात शेतकऱ्याच्या बायकोने सायकल वा बैलगाडी चालवली तर लोक नावे ठेवतात. भारतीय स्त्री मात्र आपला परीघ सोडून जाऊ शकणार नाही ही भारतीय संस्कृती आहे. संस्कृतीच्या नावाखाली तिला अनेक बंधनांनी बांधून ठेवले आहे.
चीनमध्ये सांस्कृतिक अमूल्य ठेवा जतन करीत असते. तर भारतामध्ये दुर्लक्ष केले जाते. चिनी लोक अतिशय लढाऊ वृत्तीचे आहेत. ही माणसे देशहितासाठी , संस्कृतीसाठी एकजुटीने एकत्रित येतात. याउलट परिस्थिती भारतात आहे. मानवी मूल्ये, संस्कृती,स्त्री-पुरुष समानतेसाठी एकत्र येऊन संघर्ष करीत नाहीत. तसे पाहता भारत हा देश सांस्कृतिकदृष्ट्या चीनपेक्षा कुठेच कमी नाही हे सत्य असून भारतातील धर्म,जात ,प्रांत हे सगळे भेद संपून जावेत असा आशावाद लेखकाने बाळगला आहे.

**निष्कर्ष —**

१) लेखकलक्ष्मण गायकवाड यांनी सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टी ठेवून हे प्रवासवर्णन लिहिले आहे असे वाटते .
२) या प्रवासवर्णनातून लेखकाने भारतीयांना चीनमधील चांगल्या गोष्टीचा स्वीकार करण्याचा उपदेश केला आहे असे म्हणावे लागेल .

**सारांश —**

लक्ष्मण गायकवाड यांनी 'चीनी मातीतील दिवस'या प्रवासवर्णनात सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. चिनी संस्कृती व भारतीय संस्कृतीतील साम्य- भेद टिपून घेऊन दोन्ही संस्कृतीचे महत्त्व समजावून सांगितले आहे.

**संदर्भ —**

१ आधुनिक मराठी साहित्य स्वरूप , आकलन आणि आस्वाद — (संपादन ) प्रा. डॉ. संदीप सांगळे , डायमंड पब्लिकेशन्स, पुणे , जुलै-२०१०
२ चिनी मातीतील दिवस - लक्ष्मण गायकवाड, दिलीपराज प्रकाशन , पुणे २००५
३ प्रवासवर्णन एक वाङ्मयप्रकार — सं. ग. मालसे , महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृतीमंडळ , मुंबई , १९८७

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# मराठी साहित्यातील चरित्र आत्मचरित्रलेखन : एक अवलोकन

संशोधक विद्यार्थी
**कु . आशा संभाजी पांढरे**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ.सोलापूर

संशोधक मार्गदर्शक
**डॉ गायकवाड.आर .डी.**
प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय.सोलापूर

चरित्र व आत्मचरित्र, चरित्र व चरित्रात्मक कादंबरी, चरित्र व चरित्रात्मक नाटक, चरित्र व ऐतिहासिक कादंबरी, चरित्र व पौराणिक कादंबरी तसेच चरित्र व व्यक्तिचित्र असा विचार यामध्ये केला जाऊ शकतो. प्रारंभी चरित्र व आत्मचरित्र यांच्यातील परस्पर संबंधाचा तसेच साम्यभेदाचा विचार प्रथम करू. चरित्र व आत्मचरित्र यांचा परस्पर संबंध अत्यंत जवळचा आहे. किंबहूना आत्मचरित्र हा चरित्राचाच एक भाग वा उपप्रकार म्हणून ओळखला गेल्याचे दिसून येतो, तसेच अनेक अभ्यासकांनी या दोन लेखनप्रकारांचा एकत्रित विचार केल्याचा दिसून येतो. चरित्र व आत्मचरित्र यांच्यात अत्यंत जवळचा संबंध आहे त्यांच्यातील परस्पर संबंधाविषयी तसेच साम्य व भेदाविषयी थोडक्यात चर्चा पुढीलप्रमाणे:-

**चरित्र :-**

चरित्र ही एका व्यक्तीच्या संपूर्ण जीविताची वा त्यातील विशिष्ट कालखंडाची कहाणी असते. चरित्रलेखनात पहिली शर्त वस्तुनिष्ठेची प्रत्यक्ष घडलेल्या घटना - प्रसंगांशी व प्रत्यंतर -पुराव्यांशी चरित्रकारास, प्रामाणिक रहावे लागते. त्यामुळे चरित्र ही इतिहासाची शाखा मानली जाते.इतिहाससंशोधकाप्रमाणे येथेही चरित्रकारासगौणप्रधान सर्व

प्रकारची साधने गोळा करावी लागतात. इतिहासकाराप्रमाणे त्यांतून नेमकी निवड आणि सुसंगत जुळणी करावी लागते. पण चरित्र म्हणजे इतिहास नव्हे. इतिहासात व्यक्ती हे साधन व कालपट हे साध्य असते, तरचरित्रात पार्श्वभूमीसारखाकाळ हे साधन व व्यक्तिदर्शन हे साध्य असते. व्यक्तिदर्शन जिवंत होण्यासाठी चरित्रकारास एखाद्या कादंबरीप्रमाणे अंर्तविश्वाचा ठाव घेणारी सहभावना व कल्पकता यांचीही गरज असते.

या साहित्यप्रकाराची प्रेरणा आदरणीय व्यक्तीची स्मृती जागवणे त्याचप्रमाणे स्वतः च्या आदर्शाचे सातत्य टिकवणे अशा स्वरुपाची असते. त्यामागे आत्मीयतेची, कृतज्ञतेची व विभूतिपूजेची भावनाच, बलवत्तर असते. धर्म, राजकारण, समाजकारण, साहित्य, कला, संशोधन इक्षेत्रांतील अलौकिक व्यक्तीच बहुधा चरित्रविषय बनतात. हळूहळू ही गोष्ट बदलत आहे. मानवी स्वभावाविषयीच्या निखळ कुतूहलातून सध्या चखिलेखन होऊ लागले आहे. त्यामुळे माहात्म्ये व स्तोत्रे यांच्या अंगाने जाणारे चरित्रलेखन मागे पडत आहे. मानवी स्वभाव व वर्तन यांविषयीची सुजाण वाचकांची जिज्ञासापूर्ती करणे, हे चरित्रवाङ्मयाचे उद्दिष्ट ठरू पाहत आहे. मात्र ही जिज्ञासा कथा-कादंबरीहून अर्थातच भिन्न असते. कथा कादंबरि कल्पितभावसत्याची, तर चरित्रात घटित भावसत्याची जिज्ञासा असते. सत्य जाणून घेण्याची कुतूहल हे येथे मूलभूतच असते.

"एखादी क्षुद्र घटनासुद्धा मानवी मनावर मोठा प्रकाश टाकू शकते, हे सत्य ध्यानात घेता, चरित्रविषयासंबंधी जे जे म्हणूनउपलब्ध होण्यासारखे असेल ते ते साधन सामग्री म्हणून जमविणे, हे चरित्रकाराचे आद्य कर्तव्य ठरते. अशा साधनसामग्रीत पूर्वी लिहिलेली चरित्रे वा चरित्रलेखन, आत्मचरित्र, दैनंदिनी, पत्रव्यवहार, व्याख्यानादी कार्यक्रमांची प्रतिवृत्ते,आप्त स्नही तसेच समकालीन व्यक्ती यांच्या आठवणी, प्रतिस्पर्ध्यांच्या प्रतिक्रिया, चरित्रनायक स्वकालीन असल्यास स्वतः च्या प्रतिक्रिया, चरित्रनायकाच्या सर्जनशीलअथवा अन्य कृती, संबंधित स्थळे, छायाचित्रे, वैयक्तिक शेषवस्तू इ. विविध स्वरुपाच्या गोष्टींचा अंतर्भाव होतो. सुप्रसिद्ध चरित्रनायकांच्या बाबतीत ही साधनसामग्री विपुल प्रमाणात सहज उपलब्ध असते. तेथे एकूण फापटपसाऱ्यात आपने उद्दिष्ट हरवणार नाही, याची दक्षता घ्यावी लागते. साधनाची विपुलता हीच तेथेचिंतेची बाब साहजिकचग्राह्याग्राह्यतेच्या,निवडीच्या तत्वाला त्यात महत्त्व येते. ऐकीव वा हस्ते - परहस्ते मिळालेल्या माहितीपेक्षा सरकारी वा निमसरकारी दप्तरखान्यातील माहितीवर व दस्तैवजी पुराव्यावर साधनांच्या बाबतीत भिस्त ठेवणे अधिक श्रेयस्कर असते. लेखकाला चरित्रनायकाचा प्रत्यक्ष सहवास ज्या प्रमाणात लाभलेला असेल, त्या मानाने त्याच्या लेखनाची प्रत्ययकारिता वाढत असते, "शूर मर्दाचा पोवाडा, शूर मदाने गावा",या म्हणण्यात थोडेफार तथ्य आहे. लेखक नायकाचा समानधर्मी तरी असावा. तसे नसेल तर नायक ज्या कार्यक्षेत्रातून मार्ग काढीत पुढे गेला, त्या कार्यक्षेत्रांचा, कल्पनेच्यापातळीवर तरी, माग काढण्याची कुवत त्याच्या ठायी असणे आवश्यक आहे. नायकाविषयी आधीच जे लेखन झालेले असते, ते स्वीकारताना जागरुक राहणे अगत्याचे ठरते. हे लेखन जिव्हाळा, कृतज्ञता वा विभूतिपूजा या भावनांतून वा प्रासंगिक गौरव करण्याच्या निमिताने पुष्कळदा झालेले असते. हे लेखनहेतू सत्य राबवित करतात. नायकाचे कर्तृत्व उठून दिसावे , म्हणून समकालीनांच्या वा प्रतिस्पर्ध्यांच्या कर्तृत्वाचे

अवमूल्यन केलेले असते. दोष गुणरूपाने मांडलेले असतात.उणिवांचीझाकपाक करून आक्षेपाइतकी वर्तनाला समर्थनाचा मुलामा दिलेला असतो स्वतःची माहिती स्वतः इतकी इतरांना कोठून असणार, या समजुतीतून व्यक्तिगत साधनांकडे पाहण्याची प्रवृत्ती असते. यामुळे आत्मपर लेखन अव्वल दर्जाचे साधन समजून त्याला अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. पण अशा लेखनावर डोळे मिटून विसंबणे धोक्याचे असते शिवाय अशा लेखनाची जननीजी स्मृती तीच स्खलनशील असते तिची गतिशीलता इच्छापूर्तीच्या दिशेने नकळत नेत असते. आपण असे आहो, यापेक्षा आपण इतरांना कसे दिसू यावरच अशा लेखनात दृष्टी असण्याचा संभव असतो. सारांश, प्रगत आणि आत्मगत साधनांची योग्यायोग्यता ती अन्य अधिकृत वा निःपक्षपाती साधनांवर कितपत टिकतात, हे पाहून ठरवावी लागते.

**मराठी चरित्रे :-**

महानुभवीय आदय चरित्रकार महिंद्रभट्ट याने चक्रधर व गोविंद प्रभू या पंथ संस्थापकांच्या'लीला' किंवा आठवणी अनुक्रमे लीळाचरित्र (१२७६) आणि गोविंद प्रभु चरित्र (१२८८) या ग्रंथांत संग्रहीत केल्या आहेत या ग्रंथामधून या पंथाचार्याच्या लौकिक व अलौकिक व्यक्तिमत्त्वाचेयथार्थ दर्शन घडते त्याबरोबरच यादवकालीन मराठीगद्यशैलीच्या स्वाभाविक गोडव्याचाही प्रत्यय येतो. नागदेवाचार्यादी अन्य पंथाचार्यांच्यास्मृती सांगणारा स्मृतिस्थळ हा नरेंद्र व परशुराम यांचा ग्रंथही याच धर्तीचा आहे.

प्राचीन मराठी संतापैकी ज्ञानदेव व रामदास यांच्यासंबंधीचरित्रपर लेखन मोठ्या प्रमाणावर झालेले दिसून येते. विशेषत: संत नामदेवकृत ‘आदी' ‘समाधी' व ‘तीर्थावळी' ही ज्ञानेशांचे अभंगात्मक चरित्र सांगणारी प्रकरणे विशेष लोकप्रिय आहेत. महीपतीबुवा ताहराबादकरांनी उत्तर पेशवाईत मराठीचरित्रवाङ्मयाला, भरघोस हातभार लावला. त्यांच्यापूर्वी नाभाजी, उद्धवचिदधन, दासोदिगंबर असे काही चरित्रकार होऊन गेले. महीपतींनी १७६२ ते १७८८ या काळात भक्तविजय, संतलीलामृत, भक्तलीलामृत व संतविजय (अपूर्ण) हे ओवीबद्ध व विस्तृत चरित्रपर ग्रंथ लिहिले. एकनाथ तुकारामादी संताची चरित्रे गाताना महीपतींची दृष्टीभाविकाची होती. भीमास्वामीकृत भक्तलीलामृत (१७९८) व राजाराम प्रासादीकृत भक्तमंजरी (१८३४) हे ग्रंथ याच पठडीतले आहेत. रामदासांच्याचरित्रात गिरिधरकृत समर्थप्रताप, उध्दवसुतकृत रामदामचरित्र, आत्मारामकृत दासविश्रामधाम व हनुमंतस्वामीची बखर हे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. जुन्या काळच्या बखरीत एका अर्थाने चरित्रगुण अधिक आढळतात. कृ.अ. सभासदकृत सभासदी बखर (१६९७), चित्रगुप्ताची बखर व मल्हार रामराव चिटणीस यांच्या शिवाजी, संभाजी व राजाराम यांच्या बखरी (१८१०-१२) या दृष्टीने खास उल्लेखनीय ठरतात.त्यात पौराणिक दृष्टी संपूर्णतया लुप्त नसली, तरी एकंदरीत चरित्रनायकांच्या कार्यकर्तृत्वाचे दर्शन घडविण्याकडे विशेष कलदिसून येतो.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी जॉनसन (१८७६) हे प्रदीर्घ निबंधवजा चरित्र लिहून चरित्रलेखनाचा एक वेगळा नमुना लोकांसमोर ठेवला आणि ‘इतिहास' या आपल्या निबंधाने स्वकीय ऐतिहासिक थोर पुरुषांच्या चरित्रलेखनाची प्रेरणा दिली. त्यानंतर इतिहासाभिमानी वृत्तीतून वासुदेवशास्त्रीखरेकृत नाना फडणीस (१८९२) पारसनीसकृत झाशीची राणी (१८९४) व ब्रह्मेंद्रस्वामी, धावडशीकर (१९०१), वि. को, ओककृत बालबोधातील स्फुटचरित्रे व धनुर्धारीकृत छोटेखानी, चटकदार, ऐतिहासिक चरित्रमाला यासारखी चरित्रवाङ्मयात बरीच भर पडली.

संतपंतांच्या चरित्रांची पूर्वपरंपरा बा. म. हंस यांनी तुकाराम (१८८०), मोरोपंत (१८८२) व वामनपंडित (१८८४) ही चरित्रे रचून पुनरुज्जीवित केली. ज.र. आजगावकरांनी महाराष्ट्र, कविचरित्र माला (९ भाग, १९०७-२५) सुरू करून तसेच पांगारकरांनी मोरोपंत (१८०८), एकनाथ (१९१०), ज्ञानेश्वर (१९१२), तुकाराम, (१९२०), मुक्तेश्वर (१९२२)ही चरित्रे लिहून ही परंपरा चांगलीच परिपुष्ट केली. या उपयतांच्या चरित्रकृतींत नवे संशोधन व अध्ययन आढळले, तरी त्यांची दृष्टी भाविकच होती. कवीच्या चरित्रविषयक साधनांच्या अभावी, त्याच्या काव्यरचनेवरून मनोरचनेचा वेध घेण्याचा मोरोपंतः चरित्र आणि काव्यविवेचन ग्रंथातील पांगारकरांचा प्रयत्न मात्र खचितच अभिनव म्हणता येईल. पुढील काळातील बा. अ. भिडे आणि न. र. फाटक यांची कविचरित्रे पांगारकर व आजगावकर यांच्या चरित्रांपेक्षा अधिक चिकित्सक उतरलेली आहेत.फटकांच्या ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदासया संतांच्या चरित्रांपैकी एकनाथ:वाङ्मय आणि कार्य (१९५०) हा ग्रंथ खास उल्लेखनीय आहे.

**आत्मचरित्र :-**

आपल्या जीवनविषयक अनुभवांचेव तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्वाचे स्वतः लेखकाने लेखनरुपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय. आत्मचरित्राप्रमाणे इतरही अनेक लेखनप्रकारांनी असे दर्शन घडविता येते. त्यांत खाजगी पत्रव्यवहार, मुलाखती, दैनंदिनी, रोजनामे (जर्नल्स) ख्रिस्ती धर्मकल्पनेनुसार केलेली पापनिवेदने, स्मृतिचित्रे रेमिनिसन्सेस व संस्मरणिका (मेम्वार्स) यांसारखे आत्मचरित्रपर लेखनप्रकार अंतर्भूत होतात.

आत्माविष्काराची मानवी प्रवृत्ती नैसर्गिक व सार्वत्रिक असल्याने आत्मचरित्रपर लेखन सर्वच भाषांत आढळून येते. एक साहित्यप्रकार म्हणून त्यास आत्मचरित्र म्हटले जाते. तेआणि उपर्युक्त आत्मचरित्रपर लेखनप्रकार यांत फरक आहे. आत्मचरित्रामागे आत्माविष्काराची प्रेरणा, आत्मजीवनाच्या अपूर्णतेची अभिज्ञता, स्वानुभवांतील निवडीची दृष्टी आणि लेखनशैलीविषयक भान् अशा गोष्टी प्रेरक असतात. तसेच ऐतिहासिक साहित्यकृतीप्रमाणे विशिष्टतेकडून सामान्यत्वाकडे जाण्याची क्षमता त्यातअसते. म्हणूनच आत्मचरित्र एक ललित गदयप्रकार मानला जातो. खाजगी पत्रादी आत्मचरित्रपर लेखनप्रकार पुष्कदा विशिष्ट व्यक्तींसांठी व विशिष्ट व्यक्तिगत संदर्भात हाताळले जातात.

या लेखनप्रकारांना तात्कालिक व प्रासंगिक पार्श्वभूमी असल्याने त्यांचा आशय आणि अर्थवत्ता ही मर्यादित असतात. संस्मरणिका आणि स्मृतिचित्रे यांत बरेचसे साम्य असले, तरी संस्मरणिकेत लेखक जे व्यापक अनुसंधान ठेवतो, तसे ते काहीशा त्रोटक आणि स्वायत्त स्मृतिचित्रांत नेहमीच आढळेल, असे नाही. तरीदेखील हे दोनही लेखनप्रकार पुष्कळदा परस्परपर्यायी ठरू शकतात. आत्मचरित्र आणि संस्मरणिका यांतही फरक आहे. अनेकदा त्यांचा निर्देश समानार्थी होतो हे खरे; परंतु सूक्ष्मपणे पाहिल्यास, संस्मरणिकेत लेखकाचा भर बहुधा इतर व्यक्तींवर व त्यांच्या अनुभवांवर असतो, असे दिसून येईल.

याउलट आत्मचरित्राचे केंद्र लेखक स्वतःच असतो, म्हणजे असे, की आत्मचरित्र एककेंद्री असते आणि संस्मरणिका एककेंद्री नसते. आत्मचरित्रास पत्रव्यवहारादी आत्मचरित्रपर लेखनप्रकारांचा एक प्रकारचीकच्ची सामग्री म्हणून उपयोग होऊ शकतो आणि आत्मचरित्रकार तथा लेखनप्रकारांचा स्वेच्छेने उपयोग करू शकतो. सारांश, आत्मचरित्रपर लेखनाचे जे अनेक प्रकार संभवतात, ते एकमेकांस पूरक असले तरी एकमेकांचे पर्याची ठरू शकत नाहीत.

**मराठी आत्मचरित्रे :-**

ज्यास आत्मचरित्रात्मक लेखन अशी व्यापक संज्ञा देता येईल, अशा पश्चिमी वाङ्मयातील लेखनाचा प्राचीनतम पुरावा मार्कस ऑरिलियस (१२१-१८०) याच्या ग्रीक भाषेतील आध्यात्मिक चिंतनात आढळतो.ख्रिस्तोत्तर काळातील अत्यंत महत्त्वाचे पहिले आत्मचरित्रपर लेखन म्हणजे सेंट ऑगस्टीनचे (३५४-४३०) Confessions (इं. शी. कन्फेशन्स) हे होय. पापनिवेदनपर आत्मलेखनाची एक स्वतंत्र परंपराच ऑगस्टीनच्या प्रस्तुत लेखनामुळे सुरु झाली. इंग्रज लेखक डे क्विन्सी(कन्फेशन्स ऑफ ॲन इंग्लिश ओपियम इटर१८२२) व फ्रेंच लेखक आल्फ्रेद दू म्यूसे (१८३६, इ. शी. कन्फेशन्स ऑफ अ चाइल्ड ऑफ द सेंचरी) यांनी हा लेखनप्रकार हाताळला आहे. जॉन बन्यनचे ग्रेस अबाउंडिंग टू द चीफ ऑफ सिनर्स (१९६६ रिचर्ड बँक्स्टरचे ReliquiaeBaxteriane (१६९६) व क्वेकर पंथीय जॉर्ज फॉक्सचा रोजनामा (१६९४) यांसारख्या आध्यात्मिक आत्मकथनात प्रांजळपणा आढळतो.

पश्चिमी आत्मचरित्रपर लेखनास प्रबोधनकाळापासून विशेष चालना मिळाली. आध्यात्मिक स्वरुपाच्या आत्मकथनातील ऋजुता व साधेपणा लोप पावून लौकिक दृष्टिकोनाप्रमाणेच त्या काळी विकसित झालेल्या विविध प्रकारच्या वाङ्मयाचा परिणामही आत्मचरित्रपर लेखनावर उमटला. इटालियन शिल्पकार बेनव्हेनूतो चेल्लीनी (१५००-१५७१) यांचे आत्मचरित्र प्रबोधन कालीन आत्मचरित्राचे एक नमुनेदार उदाहरण आहे.भडक शैलीच्याआत्मचरित्रपर लेखनाचा प्रारंभ इंग्रज नट कॉली सिबर यांच्या अपॉलाजी फॉर द लाइफ ऑफ कॉली सिबर(१७४०) या ग्रंथाने झाला. बेंजामिन फ्रँकलिनचे आत्मचरित्र (१८६८) हे अमेरिकन वाङ्मयातील पहिले महत्वाचे गदयलेखन होय. सेंट ऑगस्टीन- प्रमाणेच रुसोचे कन्फेशन्स हे (१७८१ व १७८८) आत्मचरित्र कठोर आत्मपरीक्षण व निर्भय आत्मशोधन या गुणांनी संपन्न आहे. त्यात प्रच्छन्न आत्मसमर्थन दिसले, तरी अनुभवांना विकृत केलेले नाही. डेव्हिड ह्यूम याचे तात्विक स्वरूपाचे आत्मचरित्र (माय ओन लाइफ, १७७७) उल्लेखनीय आहे.

जागतिक आत्मचरित्रपर वाङ्मयात ज्यांना निर्विवादपणे उच्च स्थान आहे, असे भारतीय साहित्य म्हणजे महात्मा गांधीचे 'सत्याचे प्रयोग' (१९२७-१९२९) आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांचे 'आत्मकथन' (१९३६) हे होय.

प्राचीन मराठीतील त्रोटक, प्रासंगिक व नोंदीवजाआत्मकथन नामदेव-तुकारामादी संतांच्या काव्यात व अन्य काव्यग्रंथांच्या उपोध्दात- उपसंहारांत आढळते. तुकारामाचे अभंग म्हणजे एक प्रकारचे त्याचे आध्यात्मिक आत्मचरित्र होय. बहिणाबाई, कचेश्वर व निरंजन रघुनाथ यांसारख्यांच्या स्वतंत्र, प्रांजळ व भावोत्कट आत्मकथा काहीशा विस्तृत आहेत. वाङ्मयीन व ऐतिहासिक महत्त्व असलेली गदय आत्मचरित्रे नाना फडणीस,गंगाधरशास्त्री पटवर्धन व बापू कान्हो खांडेकर यांनी उत्तर पेशवाईत लिहिली. अव्वल इंग्रजी कालखंडात नोंदीवजा आत्मकथन विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांच्या वेदोक्त धमप्रकाशात (१८५९ - २५ वे प्रकरण) आढळते. वासुदेव बळवंतांच्या कैफियतीत (१८७९) त्यांची संक्षिप्त जीवनकहाणी आहे दादोबा पांडुरंगांचे आत्मचरित्र (१८८२)व बाबा पदमनजींचे अरुणोदय (१८८८) ही या कालखंडातील दोन उल्लेखनीय आत्मचरित्रे होत. यापैकी दादोबांचे आत्मचरित्र सामाजिक दर्शनाच्या दृष्टीने व बाबा पदमनजींचे आत्मचरित्र धर्मांतर विषयक मानचित्रणाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. संपूर्ण चरित्रदर्शनाच्या दृष्टीने उपर्युक्त सर्व आत्मचरित्रांत न्यूनताजाणवते.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला वि.दा. सावरकरांनी जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राचे भाषांतर केले (१९०७) राजकीय जागृती करण्याचा हेतू त्यामागे होता. माझी जन्मठेप (१९२७) व शत्रूच्या शिबिरात (१९६५) हे सावरकरांचे लेखन संस्मरणकेवजा आहे. त्यांच्या आत्मचरित्राचा पहिला खंड १९४९ त प्रसिद्ध झाला.प्रेरकता हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य होय.

व्यक्तीच्या आत्मचरित्रांत न. वि. गाडगिळांच्या दोन खंडांतील पथिकाला (१९६४, १९६५) विशेष महत्त्व आहे.

कृ.पा. कुलकर्ण्यांचे कृष्णाकाठची माती (१९६१), मा.दा. आळतेकरांचे उलटलेली पाने (१९६१), वा. गो. मायदेवांचे वेचलेले क्षण (१९६२) व के. ना. वाटल्यांचे माझी वाटचाल (१९६४) हो प्राध्यापकांची आत्मचरित्रे होत. शिक्षकी जीवनातील अनुभव व शैक्षणिक क्षेत्रातील माहिती सांगणारी आत्मचरित्रे ना.म पटवर्धन (विरगुंळा, १९६०), कृ .भा बाबर (एका शिक्षकाची आत्मकथा, १९६२) ना. वि. पाटणकर (समाधान, १९६३) यांनी लिहिलेली आहेत. यांखेरीज धर्मानंद कोसबींचे निवेदन (१९२४), नानासाहेब शिंद्यांचे एका शिपायाचे आत्मवृत्त (१९३५), ल. बा. चितळ्यांचे मी दारूड्या कसा झालो? (१९३५), कॅप्टन चाफेकरांचे चाळिशीच्या चष्म्यातून (१९४९) व गं.नी. गोखल्यांचे माझे आयुष्याचा चित्रपट (१९५०), रा रं पैंगीणकर यांचे मी कोण (१९६९), सेतुमाधवराव पगडी यांचे जीवनसेतु (१९६९) अशा विविध' क्षेत्रांतील व्यक्तींच्या आत्मकथा आहेत. हंसा वाडकरांचे संस्मरणिकेवजा असलेले सांगत्ये ऐका व आनंद साधले लिखित मातीची चूल यांसारखे उल्लेखनीय आत्मचरित्रपर लेखन १९७० साली प्रकाशितझाले आहे. विषय व लेखनतंत्र या बाबतीत मराठी आत्मचरित्रपर साहित्य प्रगत झाले असले, तरी ते प्राधान्याने वर्णनपर वाटते. 'सत्यअसत्याची मन केले ग्वाही' हा दृष्टिकोन त्यात कमी आढळतो आणि आपल्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाचा वेधही त्यात अल्पांशानेच घेतलेला दिसतो.

**निष्कर्ष -**

सारांश रुपाने असे म्हणता येते, की चरित्र-आत्मचरित्र, आत्मकथन हे तसे चरित्र वाङ्मयाच्या पोटातील वाङ्मय प्रकार आहेत. तरीही प्रत्येकाचे अस्तित्व, त्यामागे असणारा दृष्टिकोन हा स्वतंत्र आहे.

१) आत्मचरित्र का चरित्राचाच एक भाग वा उपप्रकारमानन्यात आला असला तरी या दोन साहित्य प्रकारातमूलभूत फरक असून ते दोन्ही स्वतंत्र व स्वयंपूर्ण आहेत.

२) दोन्ही ही व्यक्ती प्रधान साहित्यप्रकार असूनचरित्रात एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तिचा शोध घेत असते तरआत्मचरित्रात लेखक असणारी व्यक्ती स्वतःच स्वतःच्याजीवनाचा शोध घेत असते. दोन्हीतील नायक हे वास्तवातील असतात.

३) चरित्राची निर्मिती अत्यंत प्राचीन घटना असून त्या तुलनेत आत्मचरित्राची निर्मिती अगदी अलीकडची घटना आहे.

४) आत्मचरित्रात स्वतःच स्वतःच्या जीवनाचा शोध घेत असल्यामुळे जीवनानुभव अधिक प्रभावीपणे, सूक्ष्मपणे व समर्थपणे मांडले जाऊ शकतात. त्यामुळे व्यक्तिमत्त्व तसेच भावना, विचार व विकारांच्या मांडणीला, प्रकटनाला अधिक वाव असतो. तसा वाव चरित्रलेखनात असत नाही.

५) सत्यकथन हा या दोन्ही लेखनप्रकाराचा प्राणआहे.

६) चरित्रापेक्षा आत्मचरित्र लेखन कठिण होय.

(७) चरित्र व्यक्ती जीवनाचा संपूर्ण इतिहास असतो. तर आत्मचरित्र स्वतः लेखकाकडूनच लिहिले जात असल्यामुळे तो संपूर्ण जीवन वृत्तांत असत नाही, असू शकत नाही.

८) चरित्र लेखनासाठी प्रचंड व्यासंगाबरोबच परिश्रमाची आवश्यकता असते तर त्या तुलनेत आत्मचरित्राच्या निर्मितीसाठी चांगल्या स्मृती बरोबरच कठोर आत्मपरिक्षणाची आवश्यकताअसते.

९) चरित्र अधिकाधिक वस्तुनिष्ठ असते तर आत्मचरित्रआत्मनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ असते.

१०) चरित्राची भाषा गौरवशीलतेकडे झुकलेली तर आत्मचरित्र वा आत्मकथन ही प्रामुख्याने बोली भाषेतून लिहिली गेलेली आहेत.

११) स्वातंत्र्यानंतरच्या काळात या दोन्ही लेखनप्रकारात प्रचंड विविधता जाणवते.

१2) आत्मचरित्र व चरित्र हे दोन्ही साहित्यप्रकार,स्वरुप, हेतू,प्रेरणा तसेच निर्मितीप्रक्रिया व आस्वादाच्या अंगाने भिन्न आहेत. ते स्वतंत्र व स्वयंपूर्ण आहेत.

# ‘लमाण’ आत्मचरित्रातील सामाजिक संदर्भ

**शीतल योगेश पाटील,**
शिराळा

चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन हा व्यक्तीचा त्या काळचा सामाजिक सांस्कृतिक राजकीय इतिहासच असतो.नव्वदनंतरच्या कालखंडात सामाजिक, सांस्कृतिक सर्वच संदर्भ बदलले. त्यामुळे बदलतजाणा-या मूल्यशी आत्मचरित्रामधून एक नवी दृष्टीव वर्तनव्यवहार आकाराला येवू लागले. आपणयशस्वी कसे झालो,याची मांडणी या काळातील आत्मचरित्रामधून झाली. अलीकडच्या काळात भारतीय इतर भाषांसह पाश्चात्य भाषेतील अनुवादित चरित्र, आत्मचरित्राची संख्या वाढली आहे. लोकांमध्ये एक प्रकारचे कुतूहल आत्मचरित्राविषयी आहे. प्रसारमाध्यमामध्ये अल्पकाळामध्ये उल्लेखनीय कार्य करणारे पैसा, प्रसिद्धी मिळवणारे सुंदर पिचाई-गूगल, बिल गेट्स - संगणक हे चरित्रनायक नव्या पिढीसाठी आयडॉल ठरले आहेत. त्यांच्या चरित्रांना खूप मागणी आहे. आत्मचरित्रच हा वाङ्मयप्रकार नव्वदनंतरच्या कालखंडात अधिक लोकप्रिय झाला आहे. कोण सांगतो यापेक्षा काय सांगतो याला या काळात अधिक महत्व आले. अन्न, वस्त्र, निवारायासाठी करावा लागणारा संघर्ष मागे पडून जागतिकरणाच्या रेट्यात स्वतःच्या अस्तित्वाचा शोध या आत्मचरित्रात घेतला आहे. राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीने आत्मपर लेखन केले आहे. वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय काम करना-या अनेक डॉक्टर मंडळीनी वेगवेगळ्या रुग्णांचे अनुभव लेखन केले आहेत. समाजसेवक, खेळाडू, राजकारणी, कलावंत अशा विविध क्षेत्रातील कामगिरीबरोबरचवाङ्मयीनदृष्ट्याही आत्मचरित्र सकस झाली आहेत. त्यांची भाषा अधिक धुवाधार वादळासारखी आहे. त्यांचे कथन वास्तवातील घटनांशी घनिष्ठ संबंध साधत गतकाळातील कडू गोड आठवणीतूनव्यक्त होत राहते. वाचकाला अंतर्मुख होण्यास भाग पाडते.

माणसाच्या व्यक्तिमत्व विकासात एक महत्त्वाचा भाग म्हणजे आजूबाजूचा समाज व सामाजिक दृष्टीकोन या समाजाला समृद्ध, सुबोध, सुसंस्कृत बनवण्याचं काम समाजातील प्रत्येक घटकाचं असतं. समाजाने रूढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा याला महत्त्वाचे स्थान दिले आहे. अंधश्रद्धे पुढे माणुसकी प्रेम, दया, क्षमता यांना महत्त्व नसते. काहीही झाले तरी श्रद्धा - अंधश्रद्धेचे पालन समाजात केले जाते. रूढी, परंपरा या कालबाह्य अनावश्यक आहेत हे समजत असूनही त्याविरुद्ध फार मोठा उठाव होत नाही. समाजाला अंधश्रद्धेच्या विळख्यातूनबाहेर काढण्यासाठी नीळू फुले, सदाशिव अमरापूरकर, श्रीराम लागू, सुधीर फडकेअशा अनेक समाजसुधारक कलावंतांनी काम केले.

डॉ. श्रीराम लागू यांचा जन्म 16 नोव्हेंबर इ. स. 1927 रोजी साता-याला त्यांच्याआजोळी झाला.त्यांचे पूर्ण नावडॉ. श्रीराम बाळकृष्ण लागू मूळ कोकणातील असणारे हे कुटुंब काही कारणाने पुण्यात स्थायिक झाले. लागूंच्या घरचे वातावरण. अतिशय सुसंस्कृत, धार्मिक, घरंदाज होते.ब्राह्मण कुटुंब असल्यामुळे त्यांची आई अतिशय शिस्तीची होती. दांडेकरवाडयात ते राहायला होते पण तिथे चांगले संस्कार होणार नाहीत म्हणून आईच्या आग्रहावरून वडिलांनी स्वतःचे घर घेतले. या वाड्यातील जुजबी आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत. श्रीराम लागूंचा सामाजिक क्षेत्राशी संबंध आला. पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, खान्देश, मराठवाडा या विविध भागातून समाज प्रबोधनाचे कार्य ते करू लागले. त्यामुळे जनसंपर्क वाढला. आर्थिक अडचण निर्माण होत होती. समाज बदलण्याच्या मार्गात आपला खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न ते करत होते. सामाजिक कार्यकर्त्याच्या कामाला निधीच्या माध्यमातून डॉ. लागू मदत करू लागले. नीळू फुले, सदाशिव अमरापूरकर यांनी ही ट्रस्टचा माध्यमातून आर्थिक मदत करण्याचे ठरवले. यामध्ये ग्रामीण साहित्यिक ना. धों. महानोर या उपक्रमात सहभागी झाले. सिनेमा, नाटक, साहित्य, सांस्कृतिक संगीत, अभिनय, राजकारण अशा अनेक क्षेत्रातील माणसांचा संपर्क त्यांच्याशी आला.

डॉ. श्रीराम लागू, निळू फुले यांनी ‘लग्नाची बेडी’ या नाटकाचे प्रयोग रात्रभर करून समाज प्रबोधवादी चळवळीसाठी आर्थिक मदत केली. त्यांच्या बरोबर अशोक सराफ, सदाशिव अमरापूरकर असे अभिनेते या नाटकाच्या प्रयोगात सहभागी झाले होते. डॉ. श्रीराम लागू व निळू फुले आपल्या कमाईतील काही रक्कम चळवळीसाठी देणगी म्हणून देत होते. नंतर मराठीतील नाटकेहिंदी व इंग्रजीमध्ये बसवून देशासह परदेशातही त्यांचे प्रयोग करून आर्थिक मदत करत होते.‘लमाण’ आत्मचरित्रात नाट्यप्रवासाचाव सामाजीककार्याचा सविस्तर आढावा घेतला आहे. डॉ. श्रीराम लागूंच्या या अंधश्रद्धा निर्मूलन कामामुळे समाजाची मानसिकता बदलण्यास हातभार लागला म्हणावयास हरकत नाही. कट्टर धर्मवादी लोकांकडून विरोध प्रचंड प्रमाणात व्हायचापरंतु या सर्वाला ते संयम व शांतपणे सामोरे जातात.

डॉ. श्रीराम लागू यांचे इंग्लंड, कॅनडा, अफ्रिकेला ब-याचदा जाणं झालं. 1959 साली नाक, कान, घसा या सर्जरीच्या उच्च शिक्षणा करीता कॅनडाला गेले. प्रवासात सुंदर स्थळे पाहिली तेथील निसर्ग सौंदर्य न्याहळले मेडीटेरियन समुद्राचे भुरळ

घालणारे पाणी हे त्यांचे आकर्षण ठरले. तसेच न्यूयार्कमध्येही एकूणच भारतीय आणि पाश्चात्त्य संस्कृतीतील तफावत जाणवली. तेथील नाट्यगृहे, प्रेक्षक, नाटक यातील वेगळेपण फरक त्यांना अस्वस्थ करत असे, कॅनडियन हॉस्पिटल मध्ये फारसे काही शिकायला मिळत नसल्याने डॉ. लागू पुढच्या शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. इंग्लंडला खूप नाट्यगृह असल्याने व निसर्गाचे वरदान लाभलेले त्यामुळे लागूना इंग्लंड फार आवडले. इ.स. 1965 साली आर्थिक संघर्षातून बाहेर पडण्यासाठीलागूनी आफ्रिकेत काही काळासाठी नोकरी करण्याचा निर्णय घेतला. आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हावे हा यामागील हेतू होता. सण 1965 साली ते आफ्रिकेला रवाना झाले. या आधीच 1 वर्ष त्यांच्या पत्नीचे अपघाती निधन झाले होते. दोन मुलांची व आईची जबाबदारी त्यांच्यावर होती. म्हणूनच पैशासाठी ते आफ्रिकेला गेले . आफ्रिकेतील त्यांचा दौराही दोन टप्प्यात झाला. पहिला टप्पा होता. दारे-ए-सलाम मध्ये ते 1 वर्ष राहिले पण नाटकाविना तेथे राहणे त्यांना अवघड वाटू लागले. या शहरात सांस्कृतिक जीवनाची असणारी उदासीनता, या शहराचा पूर्व इतिहास, सध्यपरिस्थिती या सा-यांचे वर्णनआले आहे.

दारे-ए-सलाम च्या अधिका-यांना व सरकारला सांगून त्यांची बदली टंबोरा या गावी करण्यात आली.हा अफ्रिकेतील वास्तव्यातील त्यांचा दुसरा टप्पा होता. टंबोरा हे शहर अतिशय दुर्गम भागात असून, तो संपूर्ण प्रदेश जंगलयुक्त होता. लोकसंख्या ही जेमतेम होती. फार सुख सोयी नव्हत्या तिथल्याकालूडे हॉस्पिटल मध्ये ते रमले. या हॉस्पिटलच्या प्रमुख डॉ. नुसरत बेगम मूळचा पाकिस्तानी असणा-या नुसरतशी त्यांची चांगली मैत्री झाली. तिथल्या वास्तव्याबद्दल तिच्या कामाबद्दल लगूनी लिहिले आहे. तिथला त्यांचा मित्र क्रिसब्रूमफिट हा शिक्षक असून नाटकवेडा होता. एक दिवशी तो लागूना भेटला. मॅकबेथ नाटक करण्याचाविचार सांगितला. यातील लागूना त्यांनी मॅकबेथची भूमिका दिली. प्रतिकूल परिस्थितीत का असेन पण नाटक करायला मिळत आहे. याचा लागूना खूप आनंद झाला. दिग्दर्शक व नट या दोन्ही प्रकारे काम करून त्यांनी नाटक सादर केले. त्यांचे खूप कौतुक झाले. यासा-याचे अतिशय सुंदर वर्णन आत्मचरित्रात आले आहे.

लागूनच्या'नटसम्राट' नाटकाने इतिहास निर्माण केला.त्याच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वपूर्ण असे हे नाटक. या काळात लागूनकडे ते करण्याचे आव्हान होते. त्यातील अप्पासाहेब बेलवलकरांच्या भूमिकेने त्यांना झपाटून टाकले. नाटकाच्या तालमी, भूमिका हे सारे होऊन प्रयोगासाठी सज्ज झाले. 23 डिसेंबर 1970 ला बिर्ला मातोश्री सभागृहात याचा पहिला प्रयोग झाला आणि त्याच्या आयुष्यातील सुवर्णपर्णाला सुरूवात झाली. एक लोकविलक्षण प्रसिद्धी लागूना मिळाली. अनेक जाणकारांच्या शाब्बासकीची थाप मिळाली. त्यांनी नाट्यक्षेत्रात स्वतःचे स्वतंत्र असे स्थान निर्माण केले. याशिवाय 'गिधाडे','आधे अधुरे','उद्याचा संसार','काचेचा चंद्र' अशी अनेक उल्लेखनीयनाटके करून यशाचे शिखर गाठले. याच बरोबर चित्रपटातही त्यांनी काम केले, पण मूळ पिंड नाटकाचा होता. यामुळे ख-या अर्थाने ते नाटकातच रमले असे आत्मचरित्र वचताना लक्षात येते. श्रीराम लागू यांचे 'लमाण' हे आत्मचरित्र म्हणजे एका झपाटलेला नाट्य जीवनाचा व समाज जीवनाचा इतिहास आहे. परदेशात व भारतात शिक्षण घेताना नाट्यजीवनाचा त्यांनी अचूक अभ्यास केला. पाश्चात्त्य साहित्यात रंगभूमीवर नाटकाला असणारे स्थान, पोषक वातावरण, पाश्चात्त्य नाटककार, नाटकातील वातावरण, आपल्याकडील नाटक, प्रेक्षक, भूमिका, नाट्यलेखन, नाट्यतंत्र या आणि अशा अनेक घटकांचा अतिशय सूक्ष्म अभ्यास केलेला पाहायला मिळतो.

कलावंत हा समाजाचा एक घटक असून समाजासाठी काही तरी केले पाहिजे, या ऊर्मीतून त्यांनी 'सामाजिक कृतन्यता निधी' ही सामाजिक संस्था उभी करून त्या माध्यमातून निधी गोळा करून गरजू लोकांसाठी दरमहा500 रुपये मानधनाची व्यवस्था केली. 'रूपगंध' ही स्वतःची नाट्यसंस्था त्यांनी काढली होती. त्याचबरोबर लगूनी नाटकाचे उत्पन्न खर्च वजा जाता 'नर्मदा बचाव आंदोलन' आणि 'साने गुरुजी स्मारक' या ही दोन मोठ्या कार्यांना 40 ते 50 हजार रुपये दिले. वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात शिकत होते हे वर्ष असहकार चळवळीचे होते. महात्मा गांधीच्या प्रेरणेतून त्यांनीकाही काळअसहकार चळवळीत सहभाग घेतला. श्रीराम लागूंचा सामाजिक क्षेत्राशी संबंध आला. अनेक ठिकाणी विविध भागांतून समाज प्रबोधनाचे कार्य त्यांनी केले हे आत्मचरित्रात वाचायला मिळते.

रंगभूमीशी संबंधितअसणाऱ्या प्रत्येक कलाकाराने रंगधर्मी होण्याचा ध्यास घेतला पाहिजे. 'लमाण'मध्ये आयुष्यातील घटनांचा जमाखर्च मांडला आहे. रंगभूमीवर डॉ. लागूंच्या वाट्याला एक वेगळं आयुष्य आले ते लोकांसमोर मांडण्यासाठी लागूनी आत्मचरित्र लिहिले. लहान भूमिकेचेही ते सोनं करत.यशापयशाचा विचार न करता ते नाटकासाठी, नाटकातील अभिनयासाठी, समाजकार्यासाठी झटत राहिले . 'लमाण' मध्ये हा सर्व इतिहासमांडला आहे.

**संदर्भ —**

१ . डॉ. श्रीराम लागू - 'लमाण', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथम आवृत्ती,२००४
२. डॉ. श्रीराम लागू —मुलाखत - साप्ताहिक सकाळ - ऑक्टोबर १९९५
३ . प्रभाकर पणशीकर — 'तोच मी', राजहंस प्रकाशन, पुणे
४ . मधुकर तोडमल - तिसरी घंटा, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९८५

# एकविसाव्या शतकातील मराठी वैचारिक साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक कार्य

**श्री. विलास सखाराम सुर्वे**
सहा.प्राध्यापक, मराठी विभाग
महिला महाविद्यालय, कराड
survevilas48@gmail. com

## प्रस्तावना

ज्ञानाधिष्ठित समाज निर्मितीमध्ये वैचारिक साहित्याचे महत्त्वाचे योगदान असते. समाज जीवनाला कृतिशील बनवण्याचे आणि गतिशील करण्याचे काम वैचारिक साहित्य करत असते. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापासून सुरू झालेला मराठी वैचारिक साहित्याचा प्रवाह अखंडपणे वाहत आहे. तो सतत विस्तृत आणि विकसित होत राहिलेला आहे. कालखंडागणिक सामाजिक सांस्कृतिक स्थित्यंतरे घडली असली तरी त्यांना भिडण्याचा प्रयत्न वैचारिक साहित्याने केलेला दिसून येतो.

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठीत जे वैचारिक वाङ्मय निर्माण झाले ते समाज सुधारक क्रियाशील विचारवंतांनी लिहिलेले आहे. हे सर्व विचारवंत तत्कालीन सामाजिक, राजकीय चळवळीशी संबंधित होते. म. फुले, गोपाळ गणेश आगरकर, न्याय. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक, राजर्षी शाहू महाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांचा यामध्ये उल्लेख करावा लागतो. याशिवाय काळ कर्ते शि. म. परांजपे यांनीही वैचारिक गद्य लेखन करून एक विशिष्ट ठसा उमटविला होता. साठोत्तरी कालखंडात व्यापक प्रमाणावर स्थित्यंतरे घडून आली व त्यातून चळवळी उभा राहिल्या. दलित, ग्रामीण, स्त्रीवादी , आदिवासी, कामगार, भटक्या विमुक्त यासारख्या विविध चळवळींनी समाजाचे अंतरंग ढवळून निघाले. या चळवळींना गतिमान करण्यासाठी वैचारिक साहित्याने अधिष्ठान प्राप्त करून दिले. अनेक विचारवंत लिहिते झाले.

धर्म, शिक्षण, राजकारण, पत्रकारिता, शेती, अर्थकारण अशा अनेकविध क्षेत्रात वैचारिक लेखन करून सामाजिक प्रबोधन करण्याचे मौलिक स्वरूपाचे कार्य विचारवंत मंडळींनी केले. य. दि. फडके, रावसाहेब कसबे, आ.ह. साळुंखे, गंगाधर पानतावणे, शरद पाटील, भा. ल.भोळे, सदानंद मोरे, हरी नरके, स.रा. गाडगीळ ही काही नावे प्राधान्यक्रमाने घेता येतील. प्रस्तुत लेखात मराठी वैचारिक साहित्याच्या निवडक कलाकृतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

## उद्देश

१) एकविसाव्या शतकातील मराठी वैचारिक साहित्यातील सामाजिक जाणीव अधोरेखित करणे.
२) एकविसाव्या शतकातील मराठी वैचारिक साहित्यातील सांस्कृतिक स्वरूप ध्वनित करणे.
३) जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या प्रभावातून निर्माण झालेल्या विविधांगी समस्यांचा शोध घेणे आणि वैचारिक लेखनातील अनुबंध तपासणे.
४) मराठी वैचारिक साहित्याच्या प्रवाहाचे स्वरूप अभ्यासणे आणि प्रभावाची कारण मीमांसा करणे.

## साहित्याचे सामाजिक व सांस्कृतिक स्वरूप

साहित्याचा विचार म्हणजे केवळ एकेका साहित्यकृतीच्या कलात्मकतेचा विचार नसतो. साहित्यकृती ही जरी कलावंत निर्मित कलावस्तू असली तरी साहित्यकृतीतील आशय, भाषा या विशिष्ट समाजाचाच भाग असतात .त्यामुळे त्या साहित्याला सामाजिक अंग प्राप्त होते. लेखक- वाचक आणि साहित्यकृती समाजाचेच घटक असतात. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण, त्याची साहित्यविषयक भूमिका व त्याची निर्मिती समाजसापेक्ष असते. याशिवाय लेखकाच्या प्रत्येक कृती -उक्तीचा सामाजिकतेशी संबंध असतो. लेखकाच्या सामाजिकतेचा हा संदर्भ लक्षात घेतला की त्याच्या अनुषंगाने तो निर्माण करीत असलेल्या साहित्यकृतीतून व्यक्त होणाऱ्या जीवनाशयाला सामाजिक संदर्भ येतोच.

समाजातील जीवनपद्धती, भाषा, प्रथा - परंपरा, श्रद्धा, रुढी, मूल्ये या घटकांचा समावेश संस्कृती या संकल्पनेत होतो. संस्कृती ही व्यापक संकल्पना आहे. " मनुष्य समाजाची डोळ्यांना दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय. संस्कृती मग ती द्रव्यमय असो व मनोमय असो हे सगळे इंद्रियांना लावलेले एक विशिष्ट वळण असते" १ अशा शब्दात इरावती कर्वे यांनी संस्कृतीचे वर्णन केले आहे. म्हणजेच संस्कृती म्हणजे विशिष्ट मानवी समाजाची एकंदर जीवनपद्धती आणि साहित्य म्हणजे भाषेच्याद्वारे व्यक्त झालेला वैशिष्ट्यपूर्ण जीवन व्यवहार मानले तर सांस्कृतिक संदर्भाशिवाय साहित्य संभवतच नाही. याचा साहित्य समाज आणि संस्कृती यामध्ये घनिष्ठ संबंध असतो.

**वैचारिक साहित्यातील सामाजिक सांस्कृतिक संदर्भ**

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी उदयास आलेल्या खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या संकल्पनामुळे सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल झाला. कुटुंबव्यवस्था, नाती, पर्यावरण, व्यवसाय अथवा उद्योग, सेवा, भांडवल, ज्ञान-विज्ञान आणि तंत्रज्ञान, वाहतूक, दूरसंचार यामध्ये वेगाने बदल घडून आला. महामार्ग, शाळा महाविद्यालयांचे आधुनिकीकरण होऊ लागले. अभ्यासक्रमामध्ये बदल केले जाऊ लागले. आरोग्य आणि मालमत्तेच्या संदर्भात सजगता निर्माण झाली. काही अनुकूल तर काही प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली त्यामुळे सामाजिक ताण- तणावही वाढत गेले. आधुनिक आणि जागतिकीकरणाच्या काळात धर्माचा संदर्भ राहिलेला नसला तरीही आज त्याचे पुनरुज्जीवन झालेले दिसून येते.

महाराष्ट्रात आधुनिक काळात सर्वाधिक सामाजिक सुधारणांच्या चळवळी झाल्या आहेत. संतांनी सुधारणांसाठी अनुकूल भूमी तयार करून ठेवली व पुढे अनेक समाजसुधारकांनी त्या स्वरूपाचे कार्य करत समाजात आधुनिक दृष्टी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. समाजाची संवेदनशीलता व मूल्यदृष्टी निर्माणासाठी लेखन केले. विविध चळवळींना वैचारिक बळ, अधिष्ठान प्राप्त करून दिले. धर्म, जातीनिरपेक्ष लेखन करून समाजभान प्रकट करण्याचा प्रयत्न केला. ऐतिहासिक लेखनाची पुनर्मांडणी करत संशोधनपर लेखनाद्वारे सांस्कृतिक परिवर्तनाला गती देण्याचे कार्य केले. हे सर्व लेखन मौलिक स्वरूपाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाचशे मर्मभेदक भाषणांचा संग्रह असलेले बोल महामानवाचे हे पुस्तक सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. अस्पृश्यता व जातिव्यवस्था, धर्म, शिक्षण याविषयीचे विचार त्यात समाविष्ट असून न्याय हक्कासाठी विधायक मार्गाने संघर्ष करण्यावरील भाष्य, स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वत्रयीवर आधारित नवसमाज निर्मितीचा ध्यास या ग्रंथांमधील भाषणांचा मुलाधार आहे." ब्राम्हणी त्रास जन्मसिद्ध अयोग्यतेचा मारा आहे. त्यांच्यात विद्या नाही म्हणून ते आज मागे राहिले आहेत. तरीपण विद्या व द्रव्य मिळवण्याचे मार्ग त्यांना मोकळे आहेत" २ हा डॉ. आंबेडकरांचा विचार सामाजिक प्रबोधन करणारा आहे. आधुनिक समाजाला दिशादर्शक असा आहे.

विचार तर कराल, तिमिरातून तेजाकडे ही डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची अनेकांपैकी काही महत्त्वपूर्ण वैचारिक पुस्तके आहेत. विचार तर कराल या पुस्तकाच्या पहिल्या भागात अंधश्रद्धा निर्मूलन समिती ज्या वैचारिक पायावर उभी आहे त्या वैज्ञानिक दृष्टिकोन आणि धर्मविषयक चिकित्सा व विवेक वाद या विषयावर विस्तृत विवेचन केलेले आहे. समाज अंधश्रद्धेच्या दुर्दैवी फेऱ्यातून मुक्त होईल असा विचार त्यांनी मांडला आहे.

तिमिरातून तेजाकडे या पुस्तकाने अंधश्रद्धा विरोधी विचारांना बळ दिले आहे. अनिष्ट व नीतिमान विवेकवादी व्यक्ती निर्माण व्हावी यासाठी प्रयत्नशील आहे. सदर विचार दृढमूल करण्यासाठी प्रस्तुत पुस्तकातून प्रयत्न होताना दिसतो. चळवळीचे सम्यक व सैद्धांतिक रूप समोर येण्याच्या दृष्टीने प्रस्तुत ग्रंथाची मांडणी केलेली आहे.

डॉ.आ.ह.साळुंखे यांच्या संशोधन साहित्याने मराठी वैचारिक लेखनात मोलाची भर घातली आहे. त्यांच्या लेखनाने सांस्कृतिक परिवर्तनाला गती दिली. याशिवाय वैचारिक संशोधनाला चेहरा प्राप्त करून दिला. 'धर्म की धर्मापलीकडे', 'विद्रोही तुकाराम', 'बळीवंश', 'सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्ध' या काही संशोधन साहित्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय तथा पौराणिक संघर्षाची सप्रमाण मांडणी केलेली आहे. महात्मा बळीला पुराणांच्या कपोकल्पित भाकडकथांमधून बाहेर काढून त्यास वास्तवाच्या पातळीवर उभे करण्याचे ऐतिहासिक काम प्रथम महात्मा फुले यांनी केले. साळुंखे यांनी राजा बळी आणि त्याच्या समतावादी कृषक संस्कृतीची अतिशय भेदक मांडणी केली.

कृषिप्रधान भारताचा राजा बळी हा दानी म्हणून विख्यात होता. बळीने या देशातील अमानुष चातुर्वर्ण्याला विरोध करून तत्कालीन समाजात वर्णसंकर घडवून समता प्रस्थापित करण्याचा क्रांतिकारी प्रयत्न केला. आद्य गनमाता निरुता हिच्या स्त्री सत्ताक राज्याची संकल्पना देखील उचलून धरली. बळीच्या सुधारणावादी कृतीने पुरुषसत्ताक व्यवस्थेचे समर्थन असलेले वैदिक संतापले. त्यांनी विष्णूकडे कैफियत मांडली .विष्णू ने वामन बटूचा अवतार धारण करून नेहमीच्या कपटाने बळीचा काटा काढला.

बळीराजाचे महाभारत, रामायणात ही उल्लेख आहेत. त्याच्या योग्य-अयोग्यते संदर्भात संशोधन होणे आवश्यक होते. वाल्मिकी रामायणात बळीचा गौरव करणारे अनेक श्लोक आढळतात. तो अत्यंत उदार पराक्रमी, सद्गुणी, योद्धा, काळावर प्रभाव असणारा व्यक्ती, सत्यवक्ता असे वर्णन आढळते म्हणूनच हजारो वर्षापासून 'बळीचे राज्य पुन्हा यावे' हा ध्यास बहुजन समाजाला लागलेला दिसून येतो.

मानव आणि धर्मचिंतन हे असेच एक रावसाहेब कसबे यांचे वैचारिक मांडणी असलेले पुस्तक आहे. हिंदू राष्ट्रवाद, झोत, गांधी पराभूत राजकारणी आणि विजयी महात्मा, धर्मग्रंथ आणि मानवी जीवन प्रवाह, डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना ही काही त्यांची वैचारिक मंथन करणारी साहित्यसंपदा आहे.

'मानव आणि धर्मचिंतन' हा ग्रंथ माणूस प्राणीसृष्टीतून मानवी सृष्टीत कसा आला असा प्रश्न उपस्थित करून सुरू होतो आणि मानवी विकासक्रमातील कलियुगाच्या अंताच्या तपशिलाने संपतो. माणूस प्राणी हा माणूस झाल्यापासून ते मध्ययुगाच्या प्रारंभ पर्यंतच्या काळात त्याने त्याच्या जीवन अस्तित्वाच्या सुरक्षिततेसाठी आणि अर्थपूर्णतेसाठी कोणकोणत्या संस्था स्थापल्या त्यापैकी कोणत्या स्वतःच मोडल्या आणि कोणत्या विकसित करून निसर्ग व माणसा- माणसातील नाती विकसित केली त्याचा सामान्य वाचकाला समजेल असा तपशील हा ग्रंथ देतो. माणसाच्या मुळाचा आणि त्याच्या विकासाचा शोध घेण्यासाठी जगातील प्रमुख धर्माच्या प्राचीन वाङ्मयाचा आणि आधुनिक ज्ञान विज्ञानातील विविध ज्ञान शाखांचा व्यासंग पूर्ण केलेला मराठी भाषेतील अभूतपूर्व असा प्रयत्न आहे." रावसाहेब कसबे यांनी अनेक वर्षाच्या परिश्रमातून माणसासंबंधीचे केलेले हे चिंतन जितके व्यापक तितकेच सखोल आहे हे चिंतन मराठी विचार विश्वाचे भाषेचे वैभव अधिक वाढवणारे ठरावे असेच आहे" ३ असा अभिप्राय मलपृष्ठावर नोंदविलेला आहे. यावरून हे स्पष्ट होते की कसबे यांचे प्रस्तुत लेखन विचारदृष्ट्या मौलिक स्वरूपाचे असून समाजभान जागृत करणारे आहे.

प्रा.हरी नरके यांच्या महात्मा फुले यांच्या संदर्भातील वैचारिक संशोधनपर साहित्याने पुरोगामी महाराष्ट्राला चेहरा प्राप्त करून दिला हे निर्विवाद सत्य आहे. महात्मा फुले समग्र वाड्मय, महात्मा फुले गौरव ग्रंथ, आम्ही पाहिलेले महात्मा फुले, महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, महात्मा फुले साहित्य आणि चळवळ हे त्यांचे महत्त्वपूर्ण वैचारिक लेखन होय. त्यांच्या या साहित्याने स्त्री-पुरुष समता, जाती निर्मूलन, ज्ञान निर्मिती, धर्मचिकित्सा, सामाजिक न्याय या संस्कृतीचा पुनर्विचार सुरू झाला. लोक जागृती झाली बहुजन समाजामध्ये महात्मा फुले यांनी राबविलेल्या पर्यायी उपक्रमांच्या पद्धती प्रचलित झाल्या स्त्रीमुक्ती चळवळ गतिमान होण्यास आरंभ झाला.

**समारोप**

प्रस्तुत निबंधात साहित्याची सामाजिकता आणि सांस्कृतिकता स्पष्ट करून वैचारिक साहित्याची आवश्यकता नोंदवलेली आहे. काळ जसा बदलतो तसा वैचारिक प्रवाही बदलत असतो. समाज जीवनातील संबंधित भोवताल त्यामधून सिद्ध केला जातो. जात, धर्म, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा या घटकांबरोबरच इतिहास आणि वर्तमान यावर भाष्य केले जाते. खरेतर साहित्यिक हा समाजापासून दूर राहूच शकत नाही. त्याला तीव्रतेने जाणवलेले विषय तो आपल्या साहित्य कृतीतून मांडत असतो. साहित्यिकांची समाजाभिमुखताच त्याच्या कलाकृतीच्या केंद्रस्थानी येते. याचा शोध वरील आशयातून घेतलेला आहे.

**निष्कर्ष**

१) जीवनवादी दृष्टिकोन हा वैचारिक साहित्य लेखनाचे अधिष्ठान दिसून येते.

२) धर्मचिकित्सा व विवेकवादाची रुजवणूक करण्याकरिता डॉ.नरेंद्र दाभोळकर यांनी वैचारिक लेखन केले असून समाजाला नवी दृष्टी दिली आहे.

३) इतिहासाची पुनर्रचनात्मक मांडणी करत बहुजन समाजाची अस्मिता जागृत करत मानवतावादी तत्त्वज्ञान मांडून समाजाला सत्यान्वेषण दृष्टी प्रदान करण्याचे कार्य आ. ह साळुंखे यांच्या वैचारिक लेखनाने केलेले आहे.

**संदर्भ**

१) पाध्ये दिगंबर, साहित्य समाज आणि संस्कृती, लोक**वाड्मय**गृह प्रकाशन, मुंबई १९९८, पृष्ठ ३२

२) जाधव नरेंद्र, बोल महामानवाचे ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१२, पृष्ठ ३२

३) कसबे रावसाहेब, मानव आणि धर्मचिंतन,संशय प्रकाशन, पुणे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# ‘ठष्ट’ नाटकातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**स्मिता कोंडिबा कालभूषण**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
आर्टस अँण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे
ई.मेल : smitakalbhushan@gmail.com

**प्रास्ताविक :-**

साहित्य प्रकारात ‘नाटक’ हा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मय प्रकार आहे. तो दृकश्राव्य असा कलाप्रकार आहे. ‘नाटक’ या वाङ्मयप्रकाराला भारतात प्राचीन परंपरा आहे. प्राचीन काळापासून हा वाङ्मयप्रकार रूढ आहे. मराठी नाटकाला समृध्द अशी परंपरा लाभली आहे. सन १८४३ पासून ते आजपर्यंत नाटकाची वाटचाल विचारात घेतली तर नाटकाची वैविध्यपूर्ण परंपरा आपल्याला दिसून येते. नाटकाचे स्वरूप, प्रेरणा, विशेष यात खूप बदल झालेला दिसतो. सुरुवातीच्या काळात नाटकाच्या प्रेरणा पौराणिक कथा, देवदेवता असल्या तरी नंतर त्यात बदल झालेला दिसतो. लोकरंजन, संस्कृती, सामाजिक, ऐतिहासिक प्रेरणेतून नाट्यलेखन होताना दिसते. तसेच इंग्रजी, संस्कृत नाट्य वाङ्मयाचा परिचय व त्याचा अनुवाद करण्यातून देखील नाट्यलेखन झाले आहे. पुढे मराठी रंगभूमी ही एक सामाजिक संस्था म्हणून उदयाला आली. आज मराठी नाटकाचा चेहरा बदलला आहे. पूर्वीच्या नाट्यलेखनामागील प्रेरणा आणि अलीकडच्या काळातील नाट्यलेखनाच्या प्रेरणांमध्ये अनेक स्थित्यंतरे घडून आली. प्रारंभीच्या टप्प्यात मनोरंजन आणि प्रबोधन यावर तर भर होता. पण अलीकडे समाजाचे, जीवनाचे, वास्तव दर्शन नाटकातून घडते. २१व्या शतकात नाट्यलेखनातून भारतीय संस्कृती व संस्कृती संघर्षाचे, सामाजिक भान प्रकर्षाने जाणवते. प्रस्तुत शोध निबंधात याचाच अभ्यास करण्याच्या दृष्टीने ‘२१व्या शतकातील ‘ठष्ट’ नाटकातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ यांचा शोध घेणार आहोत

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. २१ व्या शतकातील मराठी नाट्यवाङ्मयातील ‘ठष्ट’ नाटकाचे स्थान.
२. ‘ठष्ट’ नाटकातून आलेले सामाजिक संदर्भ शोधणे.
३. ‘ठष्ट’ नाटकातून आलेले सांस्कृतिक संदर्भ शोधणे.

**संशोधन पध्दती :-**

सदर शोधनिबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला आहे.

**संशोधन स्त्रोत :-**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी दुय्यम साधनसामुग्रीचा उपयोग केला असून यातील स्पष्टीकरणासाठी संदर्भग्रंथ, इंटरनेट इत्यादीचा उपयोग योग्य प्रमाणात केला आहे.

**समाज आणि संस्कृती यांच्या संकल्पना :-**

◆ **सामाजिकता -**

‘नाटकात दाखवलेला समाज, त्यामधील पात्रांचा सामाजिक वर्ग, त्यांची आर्थिक स्थिती, राजकीय स्थिती, त्यांचा भोवताल तसेच ऐतिहासिक - भूतकाळातील घटना ज्या वर्तमान परिस्थितीवर किंवा वर्णनावर परिणाम करतात या सर्व घटनांना सामाजिकता असे म्हणता येईल’

समाज म्हणजे परस्परांशी आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्ती आणि समुहांची मिळून बनलेली एक व्यापक संघटना - व्यवस्था होय. सामाजिक आंतरक्रियेमुळे व्यक्ती आणि समुहात निश्चित स्वरूपाचे सामाजिक संबंध निर्माण झालेले असतात. केवळ लोकांचा समूह म्हणजे समाज नव्हे! व्यक्तीहून निराळे असे स्वतंत्र अस्तित्व समाजाला असते. अशा या समाजाचे साहित्यामध्ये सामाजिक चित्रण येते यालाच सामाजिक संबंध म्हणता येईल.

- **संस्कृती -**

मानवाच्या जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी 'संस्कृती' हा शब्द वापरला जातो. 'मनुष्य समाजाची डोळ्याने दिसणारी भौतिक वस्तुरूप निर्मिती व डोळ्यांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमन सृष्टी म्हणजे संस्कृती होय.' डॉ. इरावती कर्वे

मानवाचे जीवन जगण्याची पद्धती म्हणजे संस्कृती होय. वैद्य नि.स. व भांडारकर पु.ल. यांनी समाजशास्त्र या पुस्तकात मानवी जीवन जगण्याच्या पद्धतीला संस्कृती म्हटले आहे.

साहित्य हे सामाजिक व सांस्कृतिक संचित आहे. समाजातील घटना, गोष्टी या साहित्य निर्मितीचा स्त्रोत आहेत. त्यामुळेच 'साहित्य हा समाजाचा आरसा आहे.' असे मत मांडले जाते. तसेच 'साहित्य हे मानवी जीवनाचे प्रतिबिंब आहे.' असेही मत मांडले जाते. यावरून असे म्हणता येईल की, साहित्य हे सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भातूनच निर्माण होत असते. साहित्य, समाज आणि संस्कृती हे एकमेकांना परस्पर पूरक आहेत. समाज व संस्कृतीचा साहित्यावर प्रभाव असतो. साहित्य हे तत्कालीन लेखकाची त्याच्या सभोवतालच्या घटना, प्रसंग, परिस्थिती आणि व्यवस्थेबद्दलची निर्मिती असते.

- **साहित्य, समाज, संस्कृती यांचा सहसंबंध :-**

साहित्य आणि समाज यांचे अतूट नाते आहे. तत्कालीन समाज जसा असतो त्याप्रमाणे त्या काळातील साहित्य आणि साहित्य व्यवहार हा त्यानुरूप आकार धारण करीत असते. तत्कालीन समाजातील घटना, गोष्टीचे पडसाद साहित्यात उमटत असतात. त्यामुळे साहित्य निर्मितीमध्ये 'समाज' हा अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. साहित्य समाजात निर्माण होत असते आणि साहित्यात समाज प्रकटत असतो. त्यामुळे समाजाचा विचार केल्याशिवाय साहित्याचा अर्थ कळत नाही. कोणत्याही साहित्यकृतीचा निर्मितीसंदर्भ हा लेखकाचा वर्तमान असतो. त्याच्या सभोवतालची सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती त्याला निर्मितीसाठी उद्युक्त करते. कोणताही लेखक विशिष्ट स्थळी, विशिष्ट काळी, विशिष्ट समाजात जन्माला येतो व जगत, वाढत, विकसित होतो. त्याच्या विचारांवर व भावविश्वावर सभोवतालच्या सामाजिक परिस्थितीचे अनुकूल-प्रतिकूल संस्कार होत असतात. या संस्कारांपासून त्याची सुटका होत नाही. याच संस्काराचे पडसाद त्याने लिहिलेल्या साहित्यातून देखील उमटत असतात. म्हणूनच म्हटले जाते साहित्य आणि समाज यांचं अतूट नातं आहे.

- **'ठष्ट' नाटकातून आलेले सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ :-**

सामाजिक बांधिलकी व मानवतावादी मूल्य जपणारे संजय पवार हे आजच्या पिढीतील एक महत्वाचे नाटककार आहेत. आधुनिक मराठी साहित्यविश्वात यांच्या नाटकांनी आपला वेगळा ठसा उमटविला आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय व मानवता ही मूल्ये त्यांच्या नाटकातून प्रकटतात. महात्मा ज्योतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव संजय पवार यांच्यावर व त्यांच्या लेखनावर आहे. भारतीय समाज व्यवस्थेतील स्तराचा अंर्तगत आणि बाह्य संवेदनाचा आलेख संजय पवार आपल्या नाटकातून मांडतात. सद्ध्यस्थितीतील समस्या, आजचे ज्वलंत प्रश्न, आजच्या काळावर ते नाटक लिहितात. पवार यांनी आपल्या विद्रोही लेखणीने सामाजिक समस्यांवर वेधक पध्दतीने नाट्यलेखन केले आहे. सामाजिक बांधिलकी जपणारे नाटककार म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. 'दोन अंकी नाटक', 'कोण म्हणत टक्का दिला!', 'आम्ही जातो आमुच्या गावा', 'साती साती पन्नास', '४७ एके ४७', 'न दिलेला नकार', 'गायीच्या शापानं', 'ठष्ट' इत्यादी नाटकांचे लेखन त्यांनी केलेले आहे. 'दोन अंकी नाटक' पासून 'ठष्ट' या नाटकापर्यंत त्यांची सामाजिक प्रश्नांची जाणीवपूर्वक मांडणी करण्याची वृत्ती गोचर होताना दिसते. विषयाची वेगळी मांडणी, समाजवास्तव जीवनावरची भाष्ये आग्रहीपणे मांडणारे पवार समकालीन नाटककारांपेक्षा वेगळे वाटतात.

२०१४ मध्ये प्रकाशित झालेले 'ठष्ट' नाटक एका वेगळ्या विषयावरचे आहे. 'ठष्ट' नाटकाचे शीर्षक हे 'ठरलेलं लग्न मोडलेल्या मुलीची गोष्ट' यातील पहिले व शेवटचे अक्षर घेऊन ठेवलेले आहे. २१ व्या शतकात शिक्षणामुळे स्त्रियांच्या क्षमतांचा विकास झाला. त्या नोकरी करू लागल्या. काही स्त्रिया आर्थिक स्वावलंबी झाल्या. पण तरी आजही स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन दुय्यमच आहे. त्यामुळे २१ व्या शतकातही स्त्रियांचे विविध प्रश्न आहेत. लग्न न झालेल्या मुलींचे प्रश्न, प्रौढ कुमारीकांचे प्रश्न, लग्न मोडलेल्या मुलींचे प्रश्न, बलात्कारी स्त्रियांचे प्रश्न, आर्थिकदृष्या दुर्बल असलेल्या स्त्रियांचे प्रश्न, उच्चजीवनमानातील स्त्रियांचे प्रश्न, निम्नस्तरीय जीवन जगणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न आणि या सर्वच स्तरात शोषण होणाऱ्या

स्त्रियांचे प्रश्न मराठी नाटकातून माडण्यात आले. २०१४ मधील 'ठष्ट' नाटक अशाच एका वेगळ्या विषयावर, आशयावर लिहिलेले आहे. मराठी नाट्यवाङ्मयात आजपर्यंत जो विषय आलेला नाही. अशाच विषयाला, प्रश्नाला 'ठष्ट' मधून वाट करून दिली आहे. स्त्रियांचे लैंगिक भाव व त्यावरील अधिकाराची जाणीव, स्त्रीचे लग्न झाले नाही किंवा ठरलेले लग्न मोडले तरीही काही बिघडत नाही या आशयावर आधारीत संजय पवार यांनी 'ठष्ट' नाटकाची निर्मिती केली. मराठीतील हे पुरूषपात्र विरहित नाटक आहे. या नाटकात एकूण सहा स्त्री पात्रे आहेत. सुलभा, अनामिका, प्रीती, अक्षता, शिंदेबाई व कावेरी इत्यादी. या सर्वच स्त्रिया आर्थिक स्वावलंबी, नोकरी करणाऱ्या आहेत. शिंदेबाई व कावेरी ही दुय्यम पात्र आहेत. हे नाटक मुंबईमधील महिला निकेतन वर्कींग वुमन्स हॉस्टेल मधील रूम नं. ३०२ मध्ये घडते. सुलभा, अनामिका, प्रीती, अक्षता या चौघी स्वतंत्र विचारांच्या वेगवेगळ्या स्वभावाच्या, नोकरीनिमित्त एकत्र आलेल्या आहेत. प्रत्येकीचे प्रश्न वेगळे तसेच जीवन जगण्याची दृष्टी वेगळी आहे.

सुलभा ही साताऱ्याच्या ग्रामीण भागातून मुंबईला आली. वडील एस.टी. ड्रायव्हर होते. तीन मुलींनाच जन्माला घातलं, मुलगा नाही म्हणून आईशी रोज वाद घालत, मारहाण करत. या त्रासाला कंटाळून आई पेटवून घेते. नंतर सावत्र आई या मुलींना त्रास देते. सर्व लाड सावत्र लहान भावाचे होत. सुलभाची बारावी होते. आईला तिच्या लग्नाची घाई होते. सुलभाला पाहुणे बघायला येतात तेव्हा पोटात अन्न नसलेल्या उपाशी सुलभाला चक्कर येते. पण सुलभाला आवडी येते अशी बातमी सगळीकडे पसरते व तिच लग्न मोडते. या घटनेनंतर आई तिला खूप त्रास देते. लहान बहिणींच्या लग्नाला हिचा अडथळा नको म्हणून तिला मुंबईला पाठवले जाते. वडिलांच्या मित्रामुळे तिला को-ऑपरेटिव्ह बँकेत नोकरी लागते व हॉस्टेलला रहायची सोय होते. लहान बहिणींना शिकवावं व त्यांची लग्न करून द्यावी यासाठी सुलभा प्रामाणिक प्रयत्न करते. पण स्वत: मात्र लग्न न करण्याचा निर्णय घेते. मात्र तरूण वयामुळे शरीरात लैंगिक भावना प्रबळ होते. अशावेळी शरीर शांत करण्यासाठी रात्री-अपरात्री ती गार पाण्याने आंघोळ करते. नंतर सुलभाची लग्न करण्याची इच्छा मरते. तिच्या लहान बहिणींना सावत्र आईला लग्न करून लवकर घरातून हकलायचे असते. पण लग्न ठरत नाही म्हणून ती त्यांना त्रास देत असते. 'या मरत का नाहीत?' असे सतत बोलत असते. या त्रासाला कंटाळून शेवटी त्या दोघी पाठीच्या दप्तरात दगड भरून नदीत उडी घेऊन जीव देतात. बहिणींच्या मृत्यूने सुलभा अस्वस्थ होते. राख सावरण्याच्या रात्री मुलींच्या आत्महत्येचा कोणताही परिणाम न झालेले आई-वडिल शरीर सुखात मग्न असतात. याचा सुलभाला राग येतो, आणि आई वडिलांची चाकूने हत्या करते. भावाचीही हत्या करते आणि रात्रीच मुंबईला निघून येते. ३०२ मधील मैत्रिणींना सर्व घटना सांगते व अनामिकेला म्हणते, 'अनामिका, तू जाशील कुठे-कुठे तेव्हा माझ्या बहिणींची गोष्ट सांग नि ओरडून सांग, लग्नासाठी पोरींना मारू नका. पोरीशी माणसासारख वागा!' नंतर सुलभाला वाटते ज्यांच्यासाठी आपण जगत होतो त्या आता नाहीत. आता कशाला आपण जगायचं असा विचार करून ती बाथरूममध्ये जाऊन शीर कापून जीवन संपवते.

पुण्याची प्रीती गुंदे ही बँकेतील प्रोबेशनरी ऑफिसरच्या ट्रेनिंगसाठी मुंबईला येते. ती देखील या ३०२ नंबर रूम मध्ये रहायला येते. अनामिका, सुलभा, अक्षता यांची कंपनी तिला आवडते. तिची एम.कॉमच्या प्रथम वर्षाला असतानाच प्रविणशी ओळख होते व त्यांची एंगेजमेंट होते. लवकर प्रविणशी लग्न होण्याची स्वप्न पाहणाऱ्या प्रीतीला मुंबईमध्ये या अविवाहित मुलींसोबत राहून तिलाही बॅचलर आयुष्य एन्जॉय करावं वाटते आणि लग्न थोड लांबवाव वाटतं. प्रविण तिच्याकडे शरीर सुखाची मागणी करतो. ती विरोध करते. नंतर प्रविणचं वागण बदलतं. त्याच्या जुन्या, पारंपरिक विचारांमुळे त्यांच्यात वाद होतात. 'घरच्यांशी जुळवून घे!, त्यांना समजून घे!, मुल झाल्यावर प्रसंगी नोकरी सोडावी लागेल.' या प्रविणच्या विचारांनी प्रीती अस्वस्थ होते. सुरवातीला लव्हर बॉय असणाऱ्या प्रविणमधला मूळ पुरुष जागा होतो. प्रीती गोंधळून जाते. प्रविणच्या त्रासानंतर ती संदीप नावाच्या जुन्या मित्राला भेटते. त्याचे पुरोगामी विचार, प्रगल्भता प्रीतीला आवडते आणि ती संदीपशी लग्न करण्याचा निर्णय घेते.

नाशिकची अक्षता वेलणकर पुण्यात मासकॉम करून चॅनलच्या इंटर्नशिपसाठी मुंबईला येते. घरच्यांच्या आग्रहामुळे लग्न करते. सासरच्यांची अपेक्षा असते. तिनं घरचं सर्व करावं. पण ती घरेलू नसल्यानं ती तसं करत नाही. तिचं लग्न तुटतं. अक्षता ही स्वतंत्र विचारांची, आयुष्यातील अनुभवानं तिची काही ठाम मत झालेली आहेत. हवं तसं आयुष्य जगणारी आहे. तिचे विचार भडक, प्रक्षोभक वाटतात. पण ते वास्तवही वाटतात. ती म्हणते, "लग्नापर्यंत थांब म्हणजे काय? पुरूष थांबतात! बरं ते थांबले न थांबले कळायला मार्ग नाही." सुलभाच्या प्रश्नावर ती म्हणते, सोसायटीचे नियम पाळून शरीर आवरायचं कसं?

पुरूषांसाठी वेश्या आहेत अशा तरूण मुलींचं काय? अक्षताच्या विचारातून तत्कालीन समाजातील वास्तव संदर्भ येतात. स्त्रीच्या आयुष्यातील वरवर दिसणारे प्रश्न वेगळे व न दिसणारे प्रश्न वेगळे याची जाणीव होते.

शिकलेली आणि देश-विदेशात हिंडणारी अनामिका ही स्वतंत्र विचाराची मनाला पटेल तसं वागणारी, जगणारी, स्पष्ट व्यक्ती आहे. तिला पुरुषप्रधान व्यवस्थेविषयी प्रचंड चीड आहे. सर्व बंधने स्त्रीलाच का? याचा तिला त्रास होतो. तोकडे कपडे घालते, सिगारेट ओढते, दारू पिते, बॉयफ्रेंड बरोबर फिरते, शरीर सुखाचा आनंद घेते. पुरुष कसा असावा याविषयी ती म्हणते, 'खरंतर किती सिम्पल आहे. निगेटिव्ह-पॉझिटिव्ह हे तत्व आहे सृष्टीचं. एकमेकांतलं न्यून भरत एकमेकांना पॉझिटिव्ह करायचं बस. मला ना मातृभक्त. स्त्री दाक्षिण्य दाखवणारा. स्त्रीचा आदर करणारा टेम्पररी पुरुष नकोय. रंगीला, नटखट, स्वतंत्र व्यक्तिमत्व समजून तिच्या शरीर व मनाचा आदर करणारा, खांद्याला खांदा लावून चालणारा, कसलेच गंड नसलेला एक विचार सहप्रवासी म्हणून पुरुष हवा.' अनामिकाचे हे मत समाजातील अनेक स्त्रियांचे प्रतिनिधित्व करते. इतरांच्या वैवाहिक जीवनातील बेरंग पाहून ती लग्न न करण्याचा निर्णय घेते. स्वतःला व्यक्ती म्हणून जगण्याचा आनंद, अधिकार घेते. याविषयी ती म्हणते, 'आम्ही ते लहानपणी वडिलांनी, तरुणपणी नवऱ्याने, म्हातारपणी मुलाने सांभाळायची वस्तू नाही समजत. स्वतःला इंडिपेंडेंट आयडेंटिटी आहे मला.' अनामिका ही स्वतंत्र विचाराची, परखड मतांची आहे. 'ठष्ट' नाटकातील सुपरवायझर शिंदे बाई व झाडूपोच्या करणारी कावेरी या दोन्ही स्त्रिया देखील नवऱ्याने सोडलेल्या परंपरावादी व अंधश्रद्धाळू आहेत.

संजय पवार यांनी 'ठष्ट' या नाटकातून तत्कालीन समाजातील अनेक संदर्भांची टिपणी केली आहे. भारतीय संस्कृतीतील वंशाला दिवा मुलगा हवा, ताठर विवाह संस्था, चौकटीतील बंदिस्त स्त्री, पुरुषप्रधान कुटुंब संस्था, यावर भाष्य करून तत्कालीन प्रश्न, समस्या, घटना, गोष्टींना या नाटकात वाचा फोडली आहे. लग्न मोडलेल्या किंवा लग्न न झालेल्या स्त्रीला दिलेली वागणूक, स्त्रीने फक्त घर, कुटुंब सांभाळावे यासाठी वेळ प्रसंगी त्यांनी नोकरी सोडून द्यावी हा तत्कालीन समाजातील विचार या नाटकातून प्रकटताना दिसतो, पण याला विरोध करणाऱ्या स्त्रिया देखील समाजात आहेत याचे दर्शन अनामिका, प्रीती यांच्या रूपाने आलेले दिसते. जागतिकिकरणानंतर भारतीय समाजावर, संस्कृतीवर पाश्चात्य विचाराचा झालेला परिणाम अनामिकेच्या रूपाने दिसतो. २१ व्या शतकात देखील सुलभा व तिच्या लहान बहिणी या समाज संस्कृतीचा बळी ठरतात. हे भयावह चित्रण या नाटकात आलेले आहे.

**समारोप :-**

'ठष्ट' या नाटकामधून संजय पवार यांनी भारतीय समाज चौकटीत बंदिस्त असणाऱ्या स्त्रीच्या भाव-भावनांना, प्रश्नांना वाचा फोडली आहे. भारतीय संस्कृतीत विवाह संस्था - लग्नसंस्था महत्वाची आहे. याविषयी दुमत नाही. पण ज्यांचे लग्न होत नाही किंवा ज्यांना लग्न करायचेच नाही अशा स्त्रियांच्या लैंगिक भावनांची मांडणी केली आहे. स्त्रीचे लग्न न होणे, अविवाहित असणे हा समाजात गुन्हा का समजला जातो? यावर या नाटकात प्रकाश टाकला आहे. स्त्री-पुरूष समानतेचा नारा लावून उपयोग नाही तर तिच्या इतर गरजांसोबत लैंगिक गरज देखील लक्षात घेतली पाहिजे. हे नाटक स्त्रीयांच्या लैंगिक समस्या व ठरलेले लग्न मोडणे या गंभीर सामाजिक समस्येवर भाष्य करून भारतीय संस्कृतीत स्त्रीची होणारी कुचंबणा यावर मांडणी करते.

**निष्कर्ष :-**

१. 'ठष्ट' या नाटकामधून २१ व्या शतकातील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ प्रकट झालेले दिसतात.
२. 'ठष्ट' या एका वेगळ्या आशय-विषयावरच्या नाटकामधून स्त्रियांचे डोळ्याला दिसणाऱ्या प्रश्नांबरोबरच न दिसणारे प्रश्न देखील आलेले आहेत.
३. संजय पवार यांनी या नाटकातून स्त्रियांच्या इतर गरजांबरोबरच तिची लैंगिक गरजही विचारात घेतली पाहिजे याविषयी मांडणी केली आहे.
४. स्त्रीला एक माणूस म्हणून सामाजात स्थान मिळावे हा विचार या नाटकातून व्यक्त केला आहे.

५. २१ व्या शतकात शिक्षणाने स्त्रियांच्या क्षमतांचा विकास झाला, काही स्त्रिया आर्थिक स्वावलंबी झाल्या, पण समाजात-संस्कृतीत तिला अजूनही दुय्यमच स्थान आहे हे या नाटकातून दिसून येते.

**संदर्भसूची :-**

१) कऱ्हाडे सदा - साहित्य आणि समाज
२) कर्वे इरावती - मराठी लोकांची संस्कृती
३) जोशी माधवशास्त्री - भारतीय संस्कृती कोश खंड
४) यादव आनंद - मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती
५) राऊत यशवंत - दलित नाट्यवाङ्मय
६) पवार संजय - ठष्ट

# 'देवबाभळी' या नाटकातील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ

**प्रा. लक्ष्मी नरहरी पवार**
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज.

'देवबाभळी' या नाटकाचे लेखक प्राजक्त देशमुख हे स्वतः दिग्दर्शक आहेत. त्यातही ते युवा साहित्यिक आहेत. अशावेळी 'देवबाभळी' या नाटकाचा आशय-विषय-मांडणी पाहता समकालीन नाटकांपेक्षा या नाटकाचे वेगळेपण न जाणवेल तर नवलच ! वास्तविक दोन स्त्रिया जेंव्हा एकत्र येतात तेंव्हा त्यांच्यातील संवादाचे विषय फार तर कौटुंबिक अथवा लौकिक स्वरूपाचे दिसतात हे वास्तव सत्य आजूबाजूला असताना लौकिक आणि पारलौकिकाच्या स्तरावर उतरून आवली आणि लखुबाई या दोन पात्रांच्या माध्यमातून लेखकाने 'आवली'ला झालेला पारलौकिकाचा (लखुबाई) परिसस्पर्श आणि लखुबाईला (पारलौकिक) पडलेले लौकिकाचे प्रश्न आणि त्याची उकल हे लेखकाने अत्यंत मार्मिक संवादाच्या साह्याने उत्कृष्टपणे मांडलेले आहे. मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या माध्यमांच्या काळात जिथे संगीत नाटकाची परंपराच थांबते की काय असे वाटत असतानाच प्राजक्त देशमुख यांच्यासारख्या युवा साहित्यिकांने 'देवबाभळीच्या' रूपाने साकारलेली संगीत नाटकाची परंपरा खरोखरच कौतुकास्पद आहे. या नाटकाला अनेक कलाकार आणि साहित्यिक, रसिक यांनी दिलेली दाद वाखाणण्यायोग्यच आहे. म्हणूनच 'देवबाभळी' या नाटकाच्या अनुषंगाने त्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ येथे मांडावयाचे आहेत.

## विषयाची उद्दिष्टे

१) 'देवबाभळी' या नाटकाच्या निमित्ताने स्त्री मनाच्या भावविश्वाचा उलगडा करणे.
२) प्रस्तुत नाटकाच्या अनुषंगाने परंपरेचे पालन करणाऱ्या स्त्रियांच्या भाव संवादातून संस्कृतीचा परामर्श घेणे.
३) प्रस्तुत नाटकाच्या अनुषंगाने कौटुंबिक स्तरावर परंपरांचे पालन करणाऱ्या स्त्रियांच्या भावसंवादातून सामाजिक संदर्भ लक्षात घेणे.
४) लौकिक आणि पारलौकिकाच्या स्तरावर लेखकाच्या विचाराची वेगळीकता लक्षात घेणे.
५) युवा साहित्यिक म्हणून समकालीन नाटककारामध्ये प्राजक्त देशमुख यांचे स्थान निश्चित करणे.
६)'देवबाभळी' या नाटकाचे महत्त्व अधोरेखित करणे.

## विषयाची व्याप्ती

समकालीन नाटकांचा विचार करता 'देवबाभळी' या नाटकाचे वेगळेपण आपल्याला निश्चितच लक्षात येते. या नाटकातील विषय-आशय-मांडणी पाहता या नाटकाचा सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, नैतिक, व्यावहारिक, कौटुंबिक, ऐतिहासिक आणि वाङ्मयीनदृष्ट्या भाषिक स्तरावर अभ्यास केला जाऊ शकतो. मात्र येथे विषयाच्या अनुषंगाने 'देवबाभळी' या नाटकातील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ येथे मांडावयाचे आहेत.

## 'देवबाभळी' या नाटकातील सामाजिक संदर्भ

'देवबाभळी' या नाटकातून संत तुकाराम कालीन ग्रामीण समाजाचे चित्रण आले आहे. मातीने शाकारलेली घरे, चुलीवरचा स्वयंपाक, शेणाने सडासारवण, कपिला गाय, मंदिरे, पूजा-पाठ, कीर्तन, देवभोळी माणसे, घाट, घाटावरील धुणी, सावकारी पाश, भामरा डोंगरावरील तुकोबारायांचे स्थान या सर्वांचे दर्शन म्हणजे जणू काही ग्रामीण समाजव्यवस्थेचे, संस्कृतीचे ठळक दर्शन आहे. या समाज व्यवस्थेत 'विवाह' ही एक सामाजिक संस्था आणि याच व्यवस्थेतील विवाहाअंतर्गत नियमांचे पालन करणारी जोडपी यांचे दर्शन आहे. यामध्ये तुकाराम- आवली, विठ्ठल-रुक्मिणी या जोडींचे दर्शन आहे. या परिस्थितीतही नवऱ्याशी पटो अथवा न पटो वरकरणी पत्नीच्या मनात राग आहे मात्र अंतर्यामी पतीप्रेम जागृत असल्याचे दिसून येते. स्वतःचे पातिव्रत्य जपणाऱ्या या स्त्रिया आहेत. एकमेकांना सहाय्य करणारी जशी सद्गुणी, सेवाभावी, परोपकारी मंडळी आहेत तसे संत सज्जनांना त्रास देणारी दुष्ट प्रवृत्तीचे लोकही आहेत. हे आपणास आवलीला देवबाभळीचा काटा मोडल्यानंतर मदतीसाठी धावून

येणारे श्री विठ्ठल, आवलीची सेवा करणारी लखुबाई, तुकोबारायांच्या वह्या इंद्रायणीने तारणे या प्रसंगातून लक्षात येते. तुकोबाराय विठ्ठल भक्तीत रममाण असल्यामुळे घरी दारिद्य आहे. अशावेळी तुकारामांना कर्जबाजारी होण्याची वेळ येते. अर्थातच श्रीमंतांचे वर्चस्व आणि सावकारी या समाजव्यवस्थेत दिसून येते. दोन स्त्रियांच्या संवादातून स्त्रीचे समाजातील स्थान, स्त्रियांचे भावविश्व आणि स्त्री मनाच्या इच्छा-आकांक्षा व्यक्त होताना दिसतात. वास्तविक हा संवाद एवढ्या पुरता मर्यादित नसून विशिष्ट काळाचे द्योतक आहे. शिवाय समाजातील हर एका स्त्रीचे प्रतिनिधित्व ही पात्रे करताना दिसून येतात.

'देवबाभळी' या नाटकातील सांस्कृतिक संदर्भ

'देवबाभळी' हे नाटक खऱ्या अर्थाने सांस्कृतिक नाटक आहे असेच म्हणावे लागेल. भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान आहे. या संस्कृतीत पती आणि पत्नी ही एका रथाची दोन चाके आहेत. यापैकी तुकाराम हे विठ्ठलाच्या भक्तीमध्ये रममाण आहेत तर संसाराचा अधिकतर भार आवली पेलत आहे. त्यामुळे आजवर आवली ही कजाग आणि खाष्ट स्त्री म्हणून जनसामान्यांसमोर आली आहे. मात्र 'देवबाभळी' या नाटकाने आवलीच्या या समूळ रूपाला बाजूला सारून तिचे भावविश्व समर्थपणे उघडले आहे. आपला पती विठ्ठलाच्या भक्तीमुळे संसारापासून अलिप्त होत असताना देखील ती स्वतःचा संयम सोडत नाही. मोठ्या चिकाटीने तुकारामांना पुन्हा प्रपंचात आणण्याचा तिचा प्रयास पदोपदी दिसतो. आवली श्री विठ्ठलाला दुषणे देत असली तरी श्री विठ्ठलाचे अस्तित्व तिला कुठेच अमान्य होताना दिसत नाही. भामरा डोंगरावर नित्य विठ्ठलाचे भजन करणाऱ्या तुकोबारायांना आवली गर्भारशी असतानाही भाकरी करून नेऊन देते हे सर्व करताना तिची दमछाक होते पण चिकाटी सोडत नाही. अशातच देवबाभळीचा काटा रुतल्यानंतर ती बेशुद्ध पडते आणि श्री विठ्ठल अशावेळी तिच्या मदतीसाठी धावून येतात. त्याच क्षणी विठ्ठलावर राग करून दिंडीरवनात फिरणाऱ्या लखुबाईला (रखुमाई) श्री विठ्ठल आवलीची सेवा करण्यास सांगतात. इथे देखील पतीवर राग असतानाही त्याची आज्ञा लखुबाई (रखुमाई) पाळते. इथे अंतर्ज्ञानाने तुकोबाराय लखुबाईला ओळखतात आणि काही दिवस आवलीच्या सेवेसाठी थांबण्याची विनंती करतात. मनात राग असूनही विठ्ठलाच्या भक्तांचे स्वरूप जाणून घेण्यासाठी लखुबाई (रखुमाई) तयार होतात. अशा प्रसंगी आवली पदोपदी विठ्ठलाला दुषणे देताना पाहून लखुबाई (रखुमाई) स्वतःचा संयम राखतात. आवली आणि लखुबाई दोघींच्या संवादातून सुरुवातीला नकार आणि नंतर प्रेम असेच स्वरूप पुढे येते. आवलीचे तुकाराम प्रेम पाहून लखुबाईला लौकिकाविषयी जे असंख्य प्रश्न पडलेले असतात त्या प्रश्नांची उकल होते आणि तुकोबाराय लखुबाईला 'आई' संबोधतात म्हणजेच ती परोपकारी आहे याची जाणीव आवलीला होते. इथेच पारलौकिकाचा स्पर्श होऊन आवली तिच्या भक्तीच्या परीक्षेत उत्तीर्ण होते. या नाटकात तुकोबाराय उपदेश वाणी करतात पण आवली मात्र ते प्रत्यक्षात जगताना दिसते. अगदी तुकोबारायांना सोडण्याचा उपदेश लखुबाई करतात तेव्हा 'माझ्याशिवाय त्यांना कोण जेवण देणार?' असा प्रश्न आवली करते. पावसात भिजताना देखील आवली तुकोबारायांना हाक मारताना दिसते. विवाहानंतर पती हेच सर्वस्व मानणाऱ्या आपल्या परंपरेचा हा किस्सा असला तरी मनाने आवली तुकोबामय, विठ्ठलमय झाली असल्याचे जाणवते. फणसाप्रमाणे वरून काटेरी आणि आतून गोड असणारी आवली लखुबाईला उमगते.

अर्थातच भक्त -परमेश्वर, पती-पत्नी यांच्या माध्यमातून संस्कृतीचे विशिष्ट स्तरावर दर्शन होते. या अनुषंगाने 'ह्या नाटकातून मराठी संस्कृतीचा स्वच्छ असा तळ आपल्याला दिसतो आणि संस्कृती म्हणजे काय आणि त्याची अभिरुची म्हणजे काय असं जर मला कोणी विचारलं तर मी ह्या नाटकाकडे बोट दाखवेन' हे या नाटकाच्या मलपृष्ठावरील सतीश आळेकर यांचे विधान या ठिकाणी यथार्थ वाटते. आपल्या भारतीय संस्कृतीचा उत्तम ठेवा म्हणजे हे 'देवबाभळी' नाटक होय हे येथे नमूद करावेसे वाटते.

**सारांश**

१) 'स्त्री हीच स्त्रीची शत्रू आहे' या विधानाला कलाटणी देणारे हे नाटक आहे.

२) स्त्री मनाचे विविध पदर उलगडणारे आणि स्त्री सद्गुणांचा आदर करणारे हे नाटक आहे.

३) दोन स्त्रियांच्या संवादातून लौकिकाला पारलौकिकाचा स्पर्श होतो. अर्थात मानवाच्या अध्यात्मिक उन्नतीचा प्रवास येथे विशद होतो.

४) लखुमाई (रखुमाई) यासारख्या पारलौकिकाला जेंव्हा लौकिकाविषयी प्रश्न पडतात तेंव्हा संसारात राहून भक्ती करणे म्हणजे भक्ती ही सुळावरची पोळी असल्याचे उमगते.

५) दोन स्त्रियांच्या भाव संवादातून स्त्री मनाचे भावविश्व अलगदपणे उलगडले आहे. या भावविश्वाच्या मुळाशी पती-पत्नीच्या नात्याची घट्ट वीण दिसून येते की जी वीण सामान्य माणसाला ही उलगडणे कठीण आहे.

६) लखुबाई (रखुमाई)सारख्या देवत्वाला जेंव्हा विकार जडतात तेव्हा त्यांची उत्तरे शोधण्यासाठी लौकिकाकडे वळावे लागते.

७) विशिष्ट स्तरावर भारतीय संस्कृतीचे दर्शन या नाटकातून होते.

८) स्त्रियांचे भावविश्व समजून घेण्याचा लेखकाचा वेगळा दृष्टिकोण येथे प्रकट होतो.

**संदर्भ ग्रंथ**

1. देवबाभळी- प्राजक्त देशमुख, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. प्रथम आवृत्ती २०१८.

# ‘औरंगजेब आणि जोशी’ या कथासंग्रहातील सामाजिक व सांस्कृतिक समाजजीवनाचे चित्रण

**प्रा. फकरूद्दीन न. पटेल**
सहा. प्राध्यापक,
नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स,
इचलकरंजी.
ई-मेल : rajpatel6822@gmail.com

मुस्लिम मराठी साहित्याचे अभ्यासक प्रा. जावेद पाशा कुरेशी हे परिवर्तनवादी विचारसरणीचे आणि सामाजिक बांधिलकी मानणारे कथाकार आहेत. त्यांनी १९९२ मध्ये ‘औरंगजेब आणि जोशी’ हा कथासंग्रह प्रकाशित केलेला आहे. ते कवी, कथाकार, नाटककार, वक्ता, कार्यकर्ता, अभिनता या सर्व भूमिकामध्ये कार्य करताना जे अनुभव आलेले आहेत, ते अनुभव त्यांनी आपल्या ‘औरंगजेब आणि जोशी’ या कथासंग्रहातून मांडलेले आहेत. जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, रूढी, परंपरा, सण-समारंभ, गरीबी, लाचारी, अगतिकता, अज्ञान, हिंदू-मुस्लिम दंगलीचे होणारे परिणाम, राजकाणामुळे मुस्लिम समाजाची होणारी फसवणूक, मंदीर-मस्जिद, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक अशा विविध प्रश्नांना घेऊन त्यांची कथा वाचकांना अस्वस्थ करते. वाचकांना वास्वत जाणीवपूर्वक दाखवते. कथा आकाराने छोट्या आहेत तरी आशयसंपन्न व वास्तव कथा असलेल्या दिसून येतात.

**१) ‘ममदू खाटिक’ :**

या कथेतून प्रामाणिकपणे आपल्या कुटुंबाचे पालन-पोषण करणारा, मनाने-स्वभावाने सजन्न असणारा होता. खाटीक असलेने उपजिविकेचा प्रश्न निर्माण झाला. गावात ‘गोहत्या बंदी’ चे फर्मान येते. ममदू आपला व्यवसाय बंद करतो. उपासमारीमुळे कुटुंबाची हेळसांड होते. त्यातच त्याची बायको आजारी असते. उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. आणि अचानक त्याच रात्री महादेव कुणबी आपला आजारी बैल विकायला घेऊन येतो. पण ममदू खाटीक बैल विकत घेण्यास नकार देतो. व गोहत्या बंदीची माहिती देतो. पण महादेव कुणबी विनंतीकरतो की हा बैल आजारी आहे. मी माझ्या मर्जीने हा बैल विकला असे सांगतो. शेवटी ममदू खाटीक कुटुंब जगविणेसाठी हा बैल सहाशे रुपयात सौदा करतो. पण जवळ पैसे नसलेने बायकोच्या दागिन्यातील सोन्याचे मणी महादेव कुणब्याला देतो. महादेव तेथून निघुन जातो.

काही वेळातच त्या वस्तीत गोहत्याबंदी करणारे येतात. ममदूला पोलीसांच्या स्वाधीन करतात. पोलीस ममदू खाटीकास मारहाण करतात. दुसऱ्या दिवशी खाटीकांचा प्रमुख ममदूची जमानत करतो. पण ममदू घरी जाण्यापूर्वीच ममदू खाटीकची बायको झालेल्या आघाताने मरण पावलेली असते. या कथेत ममदूला कसे मुद्दामहून टार्गेट करून त्याच्या कुटुंबाची वाताहत कशी होते, याचे जीवंत चित्रण आले आहे.

**२) ‘जीन’ :**

या कथेत ‘रशिदा’ ही लग्न करायला तयार नसते. पण तिच्या घरची परिस्थिती खुपच गरिबीची व हलाखीची असते. ही गावातील दर्ग्यात जाते. तिथे नसीमाच्या अंगी ‘जीन’ येतो. हे पाहून गरीबीचे चटके खावून लाचार व अगतिक होवून आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असणाऱ्या बीजवराशी लग्न करण्यास तयार होते. असे जळजळीत अनुभव कथन करतात.

**३) ‘हकिकत’:**

या कथेतील विषय हा क्रिकेटसारख्या संवेदनशील विषयावर आधारीत आहे. आपल्या देशात धर्मापेक्षा जास्त महत्त्व क्रिकेटला दिले जाते. भारत-पाकिस्तान सामना असला की संवेदनशीलतेची सीमाचं पार होत असते. कथेतील नायक मेहमूद हा मॅच पहात होता. भारताने पाकिस्तान विरूद्धची मॅच जिंकली तेव्हा बाजूचा देशपांडे मेहमूदला म्हणतो की आज तूने नमाज पढली नसावी. मेहमूद गरीबीत राहणारा मोलमजूरी करून आपला उदरनिर्वाह करणारा, त्याला पाकिस्तान कोठे आहे? हे ही माहिती नाही, तो आपल्या बाबांना विचारतो, कोट्यावधी मुसलमान की त्यांचे पाकिस्तानशी कधीही संबंध नाहीत, देण-घेणं नाही क्रिकेटच्या नावाने मुस्लिमांवर शंका घेऊन त्यांच्या अस्तित्वावर व देशनिष्ठेवर प्रश्न निर्माण केले जातात. त्याचे प्रत्ययकारी चित्रण जावेद पाशा कुरेशी करतात.

**४) 'करामत' :**

या कथेत मुसलमानी नेत्याचे चित्रण करणारी प्रतिनिधिक कथा आहे. मुस्लिम समाजातील हाजी गुलाब शेठ मंत्र्याची कथा मार्मिकपणे लेखक सांगतात. तीन वेळा मंत्रीपदावर काम करत असताना दोनदा त्याने 'हजयात्रा' देखील केलेली असते. तो गावातील दर्ग्यात येतो तेव्हा दोन लाख रुपये दान देतो. मुजावर पुजारी हा देखील त्यांच्या जवळ हांजीहांजी करतो. पण गरिबीत खितपत पडलेल्या जनतेचा विसर पडतो. दर्ग्याच्या आजू-बाजूला मुस्लिम बिरादरी असते. ज्यांच्या बळावर तो तीनदा निवडून येतो पण त्यांनाच तो विसरतो. पण गरीब लोकांना जाणीवपूर्वक विसरतो. समाजात असलेला विरोधाभास प्रकट केलेला आहे. समाजातील नेते स्वत:च्याच समाजातील लोकांची दखल घेत नाहीत. अश्या करामती मुस्लिम नेत्याचे चित्रण करणारी प्रतिनिधिक कथा दिसून येते.

**५) औरंगजेब आणि जोशी:**

या कथेत 'अनवर' हा झोपडपट्टीत राहणारा व शाळेत जाणारा निरागस मुलाच्या भावविश्वाची कथा आहे. अनवर हा मुस्लिम असून तो मराठी माध्यमाच्या शाळेत शिकतो. त्या शाळेत सर्व मूले हिंदूची होती. ते सर्व अनवरचे वर्ग मित्र होते. अनवर ईदच्या दूसऱ्या दिवशी आपल्या मित्रांसाठी आईने बनवून दिलेली सेवई घेवून जातो. त्याचे मित्र ही त्यांनी आणलेला डबा अनवरला देतात. असे सामंजस्याचे वातावरण असते.

शाळेत जोशी मास्तर इतिहास विषय शिकवित होते. ते मूलांना सांमतात औरंगजेबची सत्ता ही धर्मांध होती. त्यांने हिंदूची देवळे पाडली. मुस्लिम राजे जुल्मी व कपटी होते. जोशी मास्तर मुद्दाम वर्गात औरंगजेबच्या संदर्भात मूलांना प्रश्न विचारतात आणि अनवर कडे पाहतात. जणू काही औरंगजेबचा प्रतिनिधी हा अनवर आहे. मराठी माध्यमाच्या शाळेत शिकणाऱ्या मुस्लिम मुलांना येणारा दाहक अनुभव जावेद कुरेशी या कथेत वास्तवदर्शीपणे सांगितलेला आहे. ज्या मित्रांनी तासापूर्वी सेवया मोठ्या आनंदात खाल्या होत्या तीच मूले जोशी मास्तरांच्या शिकविण्यानंतर अनवरला औरंगजेबची अवलाद म्हणून हिणवतात. कोवळ्या बालमनामध्ये धर्मांधतेचे विष कालवणारे अनेक प्रतिनिधी जोशी मास्तरसारखे या देशात आहेत. त्यामुळे समाज व्यवस्थेने निर्माण केलेल्या विषमतेचे दाहक चटके त्यांना पहावयास मिळतात.

अशा अनेक कथातून मुस्लिम मराठी साहित्यिक लिहीते होवू लागल्याने समाज्याची सुख-दु:खे भीषण दारिद्रय, विचार, शिक्षणाचा अभाव, अन्याय, अत्याचार, दहशत यासारख्या अनेक विषय कथेमध्ये येवू लागले. जावेद कुरेशींनी आपल्या लेखणीच्या आधारे अनुभव विश्व प्रकट केलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात हमीद दलवाई, प्रा. डॉ. यु. म. पठाण, बशीर मुजावर, मुबारक शेख, खलील खान, रफीक सूरज, सलीम शेख, एहतेरखाम देशमुख यासारखे लेखक मुस्लिम मराठी साहित्य समृद्ध करताना दिसत आहेत.

**निष्कर्ष :**

१) कथेतून वेदना, विद्रोह, प्रक्षोप दिसून येतो.
२) मुस्लिम समाजातील अज्ञान, गरिबी, दारिद्रय, उपासमार याचे चित्रण येते.
३) माणूसकीचे चित्रण येते.
४) उपजिविकेसाठी कराव्या लागणाऱ्या व्यवसायावर बंदी आल्याने होणारी जीवघेणी घुसमट दिसून येते.
५) हिंदू-मुस्लिमांचे संघर्ष, दंगल, धर्मांधता, मुस्लिमेतर समाजाशी संबंध या घटनेवर कथालेखन केलेले दिसून येते.

**संदर्भ :**

1. जावेदपाशा कुरेशी : औरंगजेब आणि जोशी, प्रकाशन १९९२
2. रफीक सूरज : मुस्लिम मराठी कथा, मुस्लिम मराठी साहित्य, परंपरा स्वरूप आणि लेखक सूची, संपा. फ.म. शहाजिंदे
3. फ. म. शहाजिंदे : मुस्लिम मराठी कथा, मराठी वाङ्मयातील प्रवाह
4. फ. ह. बेन्नूर : मऱ्हाठवाणी साहित्य संमेलन विशेषांक २००२

# फकिरा : एक आकलन सांस्कृतिक संदर्भान्वे

**प्रा. डॉ. विपीन नारायण वैराट**
एम.ए.एम.फिल.पीएच.डी.सेट.
शंकरराव जगताप आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, वाघोली
ता. कोरेगाव. जि. सातारा

अण्णा भाऊ साठे यांचा जन्म सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध अशा वारणा खोऱ्यातील वाटेगावात झाला. बालपणापासून सण, उत्सव, यात्रा, जत्रा यांमध्ये मोठ्या उत्साहाने अण्णा भाऊ सहभागी होत. गावात आणि आजूबाजूच्या खेड्यात आलेला तमाशा असो, कुस्तीचे फड असो, मर्दानी खेळ असो, त्यांनी कधी चुकविले नाहीत. स्वतः अण्णा भाऊ देहभान हरपून त्याचा आस्वाद घेत. साहजिकच बालपणापासून या सांस्कृतिक वातावरणाचा परिणाम त्यांच्या व्यक्तिमत्वावर झालेल्या दिसतो. वारणा परिसरातील लोकररूढी,लोक परंपरा लोकश्रद्धा यांच्याशी अण्णा भाऊ साठेंचा खूपच जवळचा संबंध होता. मोठ्या उत्कटतेने ते त्या साऱ्याशी एकरूप होत. त्यामुळेच अण्णा भाऊंच्या कथा कादंबऱ्यातून सांस्कृतिक घटकांचे दर्शन जोरकसपणे होताना दिसते. यात्रा, जत्रा, सण, उत्सवांची रसभरी वर्णने त्यांच्या साहित्यात येतात. ग्राम संस्कृतीचे दर्शन अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य घडविते.

वैर कादंबरीच्या प्रस्तावनेत आपली साहित्यिक भूमिका मांडताना अण्णा भाऊ लिहितात,"जुन्या चालीरीती दूर कराव्या आणि जुन्या पण लोप पावलेल्या प्रगत प्रथांना पुन्हा पुढे आणावे, हेवेदावे, दुष्टावे, वैर यांचा घोर परिणाम दाखवावा आणि या नवमहाराष्ट्रात प्रेम सलोखा यांची वाढ व्हावी, इथली जनता सुखी संपन्न व्हावी. नि समाज सत्तावादाचा अरुणोदय झालेला आपण पाहावा. अशी श्रद्धा हृदयात घेऊन मी लिहितो."१ प्रस्तुत विचारांतून अण्णा भाऊंच्या सामाजिक जाणिवे बरोबर चांगल्या परंपरा, रुढीं विषयींची आस्था देखील व्यक्त होते. सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय प्रगल्भ विचार अण्णा भाऊ साठे आपल्या साहित्यात मांडतात. समाजामध्ये वैचारिक मूल्यांची रुजवणूक सांस्कृतिक मूल्यांच्या जागरणातून करतात.त्यासाठी आपल्या साहित्याचा चपखळ वापर ते करतात. त्यांच्या संस्कारी मनाने नीती मूल्यांचा ध्यास घेतलेला साहित्यातून स्पष्ट होतो. लढवय्या वृत्तीचे चित्रण,पराक्रमाची पूजा त्यांनी आपल्या साहित्यातून मांडलेली दिसते. एकूणच अण्णा भाऊंच्या साहित्यात परंपरेने चालत आलेले सांस्कृतिक वैभव अनुभवायास मिळते.

अण्णा भाऊ साठे यांची फकिरा ही अशीच एक पराक्रमाची गाथा. मानवी जीवनातील झुंजार वृत्तीचा आणि त्या झुंजार वृत्तीचा संस्कृतीने केलेला सन्मान अण्णा भाऊ फकिराच्या रूपाने साहित्यात करतात. राणोजी मांग आणि फकिरा नावाच्या शूरवीर तरुणाची संघर्ष गाथा. फकीराच्या निमित्ताने गावगाड्यातील धर्म जीवन,जत्रा, यात्रा सण-उत्सव, लोक समजुती ग्रामव्यवस्था,सवर्ण, दलित यांचे परस्पर संबंध,त्यांचे जीवन ह्या साऱ्यांचे वास्तववादी दर्शन सांस्कृतिक अंगाने घडते. प्रस्तुत कादंबरी एकूण १५ प्रकरणात विभागलेली आहे. अतिशय आशय संपन्न कादंबरीतून सांस्कृतिक घटकांचे दर्शन रसपूर्ण होते. कादंबरीचे कथानकच लोक जीवनातील जोगणी प्रथेवर थाटलेले आहे. संपूर्ण कादंबरीमध्ये जोगणी प्रतीचा आदर श्रद्धा आणि तिच्यासाठी चाललेला संघर्ष व्यक्त होत राहतो. " जोगणी!जोगणी हा बारा बलुत्यांचा खेळ आहे. दोन बलुती नवरा नवरी होत असतात. नि त्यांची वरात निघत असते. नवरी जवळ असलेली खोबऱ्याची वाटी पिवळ्या फडक्यात असते. जर ती खोबऱ्याची वाटी कोणी पळविली, तर त्या गावची जत्रा बंद होते आणि ती वाटी ज्या गावात जाईल त्या गावात जोगणीची जत्रा भरते; पणही खोबऱ्याची वाटी पळविणारा जर आपल्या हद्दीत वेशीच्या आत गावकऱ्यांना सापडला, तर त्याचे डोके उडवायचे असाही रिवाज असतो. जोगणी भरली की गावाचे दु:ख दारिद्र्य टळते"२ अशी ही एक श्रद्धा आहे.

फकीरा कादंबरीत गावच्या शंकर पाटलाला शिगावच्या बाबाजी खोताबद्दल हेवा वाटे. तिथली जोगणी जत्रा, तिथली लोकांची गर्दी, जत्रेमुळे निर्माण झालेला गावातला उत्साह, जत्रेचे वातावरणअसलं काही आपल्या गावात नाही. कारण शिगावची जोगणी यात्रा त्या खोताने भरवली होती. तरुणपणी त्यांन काळगावच्या जोगणी यात्रेत उभ्या गावाशी कलागत करून ती जोगणी जबरीने आणली. त्या दिवसापासून काळगाव ची जोगणी यात्रा बंद पडून ती शी गावात सुरू झाली होती. म्हणून शिगावची सारखी

भरभराट होत होती. वर्षात तीन यात्रा होत होत्या. शिगावात दाजीबा खोतान काळगावच्या जोगणी दंगल केली. जोगणीच्या हातातली वाटी पळून आणली. तसा आमच्या गावात कोण हाय?हे पाटलाचं दु:ख राणोजी मांग ऐकून व्यथित होतो. "जर आपण ती जोगणी आणली, तर या गावावर अनंत उपकार होतील. जे बाबाजी ने केलं ते एका मांगानं केलं असं लोक म्हणतील. आपल्या गावात जत्रा भरेल. भोवतालचे लोक जत्रेत येतील. प्रत्येक माणूस म्हणेल,'राणोजीन ही जत्रा भरवली'शंकर पाटील शाब्बास म्हणेल. जग जगलो तर पाठ थोपटिलआणि जर आपण. . . नाव होईल डंका वाजेल. गावासाठी गेला म्हणतील. मरण कधीतरी येणारच. ते जर जोगणी आणीत असता आलं तर उलट गावावर उपकार होतील."३ या लोक भावनेतून जोगणीसाठीचा संघर्ष कादंबरीत सुरू होतो. कादंबरीतील राणोजीच्या प्रस्तुत चिंतनातून जोगणी विषयक लोक जीवनातल्या श्रद्धा व्यक्त होतात. जोगणीची जत्रा ज्या गावात भरते त्या गावची भरभराट होते. जोगनी साठी जीवाची ही परवा न करता लढणाऱ्या राणोजी फकिराच्या माध्यमातून अण्णा भाऊ लोकमानस रेखाटतात. ग्रामदेवतेची जत्रा, त्यातील उत्साह, चैतन्यपूर्ण वातावरण या साऱ्यांचे वर्णन जोगणीच्या जत्रेच्या निमित्ताने फकीरा कादंबरीत रेखाटतात. परंपरेने चालत आलेला खूप मोठा सांस्कृतिक ठेवा साहित्यरुपाने खुला होताना दिसतो. "आणि अमावस्येचा दिवस उगवला. गावात त्या दिवसाबरोबर आनंदही उगवला. प्रत्येक घरात पोळी चरचरू लागली. झक पक कपडे करून पोरं बळं मिरवू लागली. घराघरावर आनंदाचा धूर तळून लागला. पै पाव्हणं येऊन गाव गजबजला. सकाळी न्हावी लुगडं नेसून झडपिण झाला आणि दारोदार फिरू लागला. प्रत्येक दारात त्याला खोबऱ्याची वाटी आणि एक पैसा मिळू लागला. पुढचं वर्ष सुखाचे जावो म्हणून कोणीही माग पाहिलं नाही. तो दिवस गावच्या इतिहासात प्रथमच उगवत होता. नवा पायंडा पडत होता. नव्याने जत्रा भरत होती. त्या धुंदीत लहान थोर धुंद झाले होते."४ प्रस्तुत वर्णनातून जत्रेतील उत्साह अण्णा भाऊ साहित्यात जिवंत करतात. सारं काही त्या जोगणीसाठी जीवसुद्धा उदार त्या जोडणीसाठी, ह्या लोकश्रद्धेचे चित्रण वास्तववादीपणे अण्णा भाऊ फकीरा कादंबरीत करतात. गावच्या रक्षणाची जबाबदारी परंपरेने ज्या शूरवीर गणल्या जाणाऱ्या मांग जातीकडे दिली आहे. त्याच मांगांकडे जोगणीच्या रक्षणाची धुरा दिलेली असते. " जोगणी निघायची वेळ झाली. लवकर या असा पंतांचा निरोप आला. पारगावच्या पाहुण्यांसह ढिम-हलगी लावून वाजत मांगांच्या तलवारी गावात निघाल्या. तलवारी कुऱ्हाडी भाले या ह्या हाताऱ्यांनी गल्ली भरली. पन्नास जवान कडेकोट तयारी करून जीवावर उदार झाले होते. बारीक मोठा शे दोनशे माणूस तलवारी बरोबर चालत होतं. हलगीच्या निनादाणं हवेत जोर मांडला. गाव भरल्यासारखे दिसू लागलं. सनदशीर शिपाई म्हणून दौलती मांग गर्दीत खंबीर चालत होता"५ कादंबरीतील प्रस्तुत वर्णन वीर रसपूर्ण येते. त्यातून संस्कृतीने, परंपरेने चालत आलेल्या मांग जातीचा लढवय्या, शूर बाणा इत्यादी वैशिष्ट्यांची साक्ष मिळते. गावगाड्यातील परंपरेने चालत आलेल्या सांस्कृतिक सामाजिक जबाबदाऱ्या यांचे प्रत्यक्ष दर्शन फकिरा कादंबरीच्या अनुषंगाने घडते.

लोक संस्कृतीतील लोक मानसाचे सूक्ष्म निरीक्षण अण्णा भाऊ साठे यांचे आहे. याची प्रचिती फकिरा कादंबरीतील घटना प्रसंगातून, संवादातून येते. आजच्या आधुनिक काळात ही कामानिमित्ताने, वेगवेगळ्या कारणाने समाज घटक मूळ गावापासून दूर जातो आहे. मात्र मृत्यूनंतर त्याचा अंत्यविधी जन्म गावी करावा असा संकेत आहे. त्या समाज घटकाची, व्यक्तीची तशीच इच्छा असते. जन्मभूमीला मातृभूमीचा दर्जा असतो. माय पंढरीचा दर्जा असतो. फकिरा कादंबरी सावळा देखील "आठ नऊ वर्स काढली. लई वंगाळ काढली. वतनदार असून वनवासी झालोय. आता. . . मला परमुलखात मरू देऊ नगा. माझी हाड हातंमाझ्या पांढरीत पडावी."६ अशी विनंती करतो. अण्णा भाऊ कादंबरीत सावळ्याच्या रूपाने लोकमानस व्यक्त करतात. एवढेच नव्हे तर माय पंढरी विषयीची जी आदराची भावना आहे,आस्था आहे. ती शब्दबद्ध करतात. सृष्टीचा करता करविता सूर्य. त्याविषयी सुद्धा लोकमाणसात आदराचे श्रद्धेचे स्थान आहे. संस्कृतीने सूर्याला दैवत्व बहाल केले आहे. याची नोंद अण्णा भाऊ फकिरा कादंबरीच्या निमित्ताने घेतात. कादंबरीत "रवी नारायण आपल्या दारात उभा होता. 'पूर्वेला सूर्यनारायण वर आला"असा उल्लेख येतो. कादंबरीत फकिरा आणि त्याचे साथीदार आंघोळीनंतर सूर्यनारायणाला नमस्कार करतात. यातून लोकश्रद्धा व्यक्त होताना दिसते. निसर्गातील गोष्टींना मानवाने आपल्या संस्कृतीमध्ये ऋणत्व बहाल करण्यासाठी, श्रद्धा व्यक्त करण्यासाठीआदराचे स्थान दिले आहे. त्यामध्ये नदीला जिच्यावर आपला देह पोहोचला जातो. जिच्या पाण्यामुळे अक्का गाव पोसतो. तिला माय म्हटले जाते. मातृ सम मानून तिची पूजा केली जाते. म्हणूनच फकिरा कादंबरीत "मरू या नेरल्याच्या माळाला आमची अब्रू आमची आवलाद नि आमची आई कृस्ना दावणीला बांधणाराची छावणी कापून काढीत मरू"असा उल्लेख येतो.

तर बेडस गावचा सरकारी खजिना लुटल्या नंतर या यशाचे ऋण म्हणून वारणेला नमस्कार करून पुढील वाटेला लागतात. सांस्कृतिक जीवनातील लोक भावना, त्यांच्या श्रद्धा यानिमित्ताने अण्णा भाऊ फकिरा कादंबरीत रेखाटतात.

यात्रा उत्सव बरोबर अण्णा भाऊ सांस्कृतिक परंपरा जोपासणारे प्रसंग चित्रित करतात. फकिरा कादंबरी त्यातून जिवंत वातावरण निर्मिती होते. "गोठ्यातील बैलांच्या गळ्यातील चाळ गुणगुणत होते. जाती फिरत होती. आणि शेतकरणींची गीतंमंजुळ नाद काढीत होती. बायांच्या गळ्यातून निघालेला धारदार स्वरतलवारीप्रमाणे आरपार जात होता. दत्तू नांदगावच्या पेठेत आला आणि पहिला कोंबडा आरवला,लगेच एका घरातून गीतांची ओळ आली,

*"नसेल जरी माहेर,भाऊ असावा पाठीचा।*
*गरिबांचा वाली,जसा सत्याबा कुमंजचा।।*
*सगळं माझं दळण,घास घाली ते शेवटला।*
*आळविते देवा,आवुक्ष सत्यबाला।।७*

हे वर्णन गीतातून भाऊबीजेचे वातावरण निर्माण करते. पहाटेचा प्रहर चित्रीत करते. दिवसाची जी परंपरागत सुरुवात आहे. त्याची प्रचिती येते. सत्तू देखील भाऊबीज म्हणून पाच लुगडी, काकणंआणि सुरती रुपयांनी तिची ओटी भरतो. लोक रुढींचा मोठा ठेवा या निमित्ताने अण्णा भाऊ फकीरा कादंबरीत रेखाटतात.

कादंबरीत येणारे सह्याद्री पर्वताचे वर्णन एक खूप मोठी सांस्कृतिक परंपरा, इतिहासाची नोंद कादंबरीत व्यक्त करते. अण्णा भाऊंनी सह्याद्री वर्णनासाठी जी बिरुदे वापरली आहेत, त्यातून अनेक लढाया, लढाया साठी लागणारा कणखरपणा,लढायला मिळालेला विजय, त्या विजयातून मराठी माणसाला मिळालेली स्फूर्ती या साऱ्या साऱ्याच वर्णन अण्णा भाऊ कादंबरीत करतात. सह्याद्रीविषयीची मराठी माणसाच्या मनातील आदराची भावना प्रकट होते. "तो महाराष्ट्राचा, बंडखोर महाराष्ट्राचा-आत्मा सह्याद्री अचल बसला होता. आज युगानुयुगं त्यानं कैक बंडखोरांना त्या एका जागी बसून-अचल बसूनच अमोल सहाय्य केलं होतं. तो देशभक्तांचा अग्रणी, तो मराठी शाहिरांचा स्फूर्तीदाता आज जणू फकिराचा शब्द न शब्द ऐकत होता आणि गालात हसत होता. त्यानेच कैक देशभक्तांना आपल्या कुशीत जागा दिली होती आणि केक बलाढ्य पुंडांना आक्रमकांना गारद केलं होतं. तो महाराष्ट्राचा कुलदैवत सह्याद्रीगिरी आज भलताच शांत नि गंभीर भासत होता."८ प्रस्तुत वर्णनांतून अण्णा भाऊ फकीरा कादंबरीमध्ये इच्छित परिणाम साधतात. कुलदैवत संकल्पना संस्कृतीमध्ये खूप मानाची आणि श्रद्धेची मानली जाते. कोणाचे रक्षण करणारी दैवता, अशा देवतासम सह्याद्री ठेवून अण्णा भाऊ साहित्यातील आजपर्यंतच्या सह्याद्री वर्णनातवरचे स्थान प्राप्त केले आहे. त्यानिमित्ताने एक सांस्कृतिक नोंद करून ठेवली आहे.

"भाषा हा सामूहिक अविष्कार असल्यामुळे तिथला परिसर, त्या परिसरातील देवदेवता, संस्कृती आणि माणसांची ठेवण त्यामधून प्रकट होते. त्या त्या प्रदेशातील भाषेमधून वेगवेगळे वाक्यप्रचार म्हणी येतात."९ डॉ. वासुदेव मुलाटे यांचे प्रस्तुत विचार ग्राम संस्कृतीच्या चित्रणासाठीची लोक भाषेची अपरिहार्यता व्यक्त करते. अण्णा भाऊ साठे आपल्या फकीरा कादंबरीमध्ये लोक भाषेचा पुरेपूर वापर करतात. कादंबरीमध्ये म्हणी वाक्यप्रचार यांच्या वापराने अपेक्षित परिणाम साधतात. वारणा परिसर आणि अवतीभवतीच्या प्रचलित असलेल्या लोकभाषेशी त्यांची फकिरातील भाषा अनुबंध राखते. प्रभावी लोकशैलीचा वापर फकिरा कादंबरीत झालेला आढळतो. त्यांनी कादंबरीत केलेल्या विविध उपमांचा वापर ग्राम जीवनाशी निगडित असाच आहे. उदा: डोंगराएवढं काळीज, ढोरासारखी पोर ढेकळावाणी काळीज विरघळलं चिखल तुडवा तसा अंधाराला तुडवीत, मारुतीची अवलाद, यमपुरीच अवतरली होती इत्यादी. म्हणींचा वापर, वाक्प्रचारांचा वापर फकिरा कादंबरीचे साहित्यिक सौंदर्य वाढवतात. शेंडी तुटो का पारंबी तुटो, शेणातला किडा शेनात राहत न्हाय, गव्हा सोबत किडं रगडणं, मेलेलं मेंढरू अग्नीला भीत नसतं, अंगावर मुठभर मांस चढल्यासारखं झालं, आनंद गगनात माविनासं झालं, आकाश पाताळ एक केलं होतं, काळजात आग लागली, जगण्यात राम उरला नाही, अशा लोकोक्तींचा वापर प्रसंगांना उठावदार पण आणतो. कादंबरीच्या लेखनशैली वरील लोकभाषेचा प्रभाव स्पष्ट करतो. त्यातून समाजमनावरील सांस्कृतिक प्रभाव व्यक्त होतो. आशयाशी त्यांची लेखन शैली एकरूप झालेली आढळते.

**समारोप :**

वारणा आणि वारणा परिसरातील लोक संस्कृतीचा सूक्ष्म अभ्यास असणारे अण्णा भाऊ साठे. आपल्या फकिरा कादंबरीतून लोक संस्कृतीचे विविध पदर चित्रित करतात. कादंबरीचे कथानकच मुळात ग्राम संस्कृतीमधील जोगणी प्रथेवर आधारलेले आहे. त्याच्यावर थाटलेले आहे. जोगणीच्या निमित्ताने येणारे ग्रामजीवन, लोक परंपरा, लोक रूढी फकिरा कादंबरीत अण्णाभाऊ रेखाटतात. ह्या लोकसंस्कृतीच्या घटकांच्या माध्यमातून कादंबरीचा आशय संपन्न होत जातो. मांगजातीच्या पूर्वपार चालत आलेल्या गुणवैशिष्टांची मांडणी अण्णा भाऊ फकीरा कादंबरी करतात.लोक जीवनातील सांस्कृतिक घडामोडी आणि कथानक एकरूप झालेले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील इंग्रजी राजवटीतील सांस्कृतिक संदर्भाने फकिरा कादंबरीचे आकलन त्यामुळे गरजेचे ठरते.

**संदर्भ**

१ ) साठे अण्णा भाऊ, वैर,नव महाराष्ट्र प्रकाशन , पुणे, दुसरी आवृत्ती, १९७५ , प्रस्तावना
२ ) सकटे मच्छिंद्र,अण्णा भाऊ साठे : एक सत्यशोधक,प्रज्ञा प्रकाशन ,कोल्हापूर. प्रथम आवृत्ती, २००५ पृष्ठ. २८
३ ) डांगळे अर्जुन व इतर(संपा.), लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वांग्मय,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई,प्रथमावृत्ती ,१९९८ पृष्ठ. ९५०
४ ) तत्रैव,पृष्ठ,९७९
५ ) तत्रैव,पृष्ठ,९८०
६ ) तत्रैव,पृष्ठ,१०७६
७ ) तत्रैव पृष्ठ,१०१७
८ ) तत्रैव पृष्ठ,१०७५
९ ) मुलाटे वासुदेव, ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद. द्वितीय आवृत्ती, २००५ , पृष्ठ २८८

# 'ठोंब्या'या बालकादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ

**श्री.सोमेश्वर बबन ढगे**
पीएच.डी संशोधक विद्यार्थी
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
ईमेल - sbdhage52@gmail.com

**प्रास्ताविक –**

मानवी जीवनव्यवहारा विषयीचे चित्रण, विवरण, अर्थनिर्णयन, भाष्य अशा स्वरूपाच्या भाषिक अभिव्यक्तीस स्थूल मानाने 'साहित्य' असे म्हणता येईल. साहित्य हा समाजाचा आरसा मानला जतो. साहित्यामध्ये समाजाचे, संस्कृतीचे प्रतिबिंब उमटत असते. साहित्याचे अनेक प्रकारात वर्गीकरण केले जाते. जसे कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इ. आधुनिक साहित्य प्रवाहाचा विचार केला तर बालसाहित्य हा एक महत्वाचा साहित्य प्रवाह मानावा लागेल. मुलांनाही स्वतःचे अस्तित्व असते. त्यांच्याही काही गरजा असतात. त्या पूर्ण करण्याचे काम बालसाहित्यातून होत असते.

बालसाहित्यास अनेक साहित्यकारांची परंपरा लाभली आहे. ही परंपरा समृद्ध करत २१ व्या शतकात आपल्या लेखनाचा एक वेगळा ठसा उमटवण्यात यशस्वी ठरलेले बालसाहित्यिक म्हणून आबा महाजन यांचा उल्लेख करता येईल. त्यांनी लिहलेल्या ठोंब्या या किशोरवयीन कादंबरीतील सामाजिक व संस्कृतिक संदर्भाचा शोध घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधाच्या माध्यमातून केला आहे.

**लेखकाचा परिचय –**

जळगाव जिल्ह्यातील एरंडोल या छोट्याश्या खेडेगावात जन्मलेले आबा महाजन हे बालसाहित्य क्षेत्रात नावलौकिक असलेले एक लेखक, कवी आहेत. महसूल सारख्या व्यस्त क्षेत्रात कार्यरत असूनही त्यांनी मुलांसाठी विपुल प्रमाणात लेखन केले आहे. त्यांनी लिहलेल्या आबाची गोष्ट या कथासंग्रहास भारत सरकारच्या साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. तसेच त्यांच्या कविता संग्रहास महाराष्ट्र राज्य शासनाचा तीन वेळा पुरस्कार देखील मिळाला आहे. बालसहित्यात कथा, कादंबरी, कविता, बालनाट्य, पोस्टर कविता अश्या विविध प्रकारात त्यांनी केलेले लेखन हे मुलांसाठी मनोरंजन, संस्कार करणारे आहे. ग्रामीण जीवन जवळून अनुभवल्यामुळे तेथील समाज, संस्कृती यांचे देखील विविधांगी दर्शन त्याच्या साहित्यात घडते. एक प्रयोगशील बालसाहित्यिक म्हणून त्यांची विशेष ओळख आहे.

**कादंबरीचे विशेष –**

ठोंब्या ही आबा महाजन यांनी लिहलेली पहिलीच कादंबरी २१ व्या शतकातील पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल अशीच आहे. कादंबरीचा बालनायक ठोंब्या आपल्या मित्रांच्या साथीने व स्वतःच्या नवनवीन कल्पना शक्तीने गावात अनेक चांगली कामे करणारा व सामाजिक जाणीवेचा प्रकाश देण्याचे धैर्य दाखवणारा आहे. दिलीपराज प्रकाशनने प्रकाशित केलेली ही कादंबरी बालमनाचा वेध घेतेच शिवाय समाजातील चुकीच्या प्रथा, परंपरा यांना या कादंबरीचा बालनायक छेद देतो. बालसाहित्यात आजवर बालनायक ठरलेल्या श्याम, गोट्या, फास्टर फेणे, धर्मा, बोक्या सातबंडे ही समृद्ध परंपरा पुढे न्यायचे काम ठोंब्या या कादंबरीचा नायक करत आहे.

**'ठोंब्या'या बालकादंबरीतील सामाजिक व सांस्कृतिक संदर्भ -**

ठोंब्या हे या कादंबरीच्या बालनायकाचे नाव आहे. हा नायक टिव्हीवर शक्तिमान ही मालिका पाहतो असतो त्याला वाटते आपणही शक्तिमान व्हावे एका रात्री आपण शक्तिमान झाल्याचे स्वप्नही त्याला पडते, पण जाग आल्यावर तो नाराज होतो. नंतर आपण शक्तिमान बनू शकलो नाही तरी धाडशी, डॅशिंग बनून अडचणीत, संकटात सापडलेल्यांना मदत करणारे तर होवू होवू शकतो. याची जाणीव त्याच्या मनात निर्माण होते आणि त्याप्रमाणे तो वागायला सुरुवात करतो. आणि या ना त्या प्रकारे अनेकांना मदत करतो. काहीं गोष्टीं प्लॅन करुन यशस्वी करतो. या कादंबरीतील बालनायकाला शक्तिमान, जुनिअरजी या

सिरीयल पाहायचे खूप वेड असते. हे पाहत असताना ज्यावेळी लाईट जाते त्यावेळी तो चिडतो वायरमनला शिव्या देतो. गावाकडे लाईट जाणे ही ग्रामीण समस्या या निमित्ताने अधोरेखित होते.

या नायकाच खरं नाव बबलू असते परंतु आजीने मूल जगावं म्हणून ठोंब्या ठेवीन असा नवस गावातील जोगेश्वरी मातेकडं केलेला असतो आणि आजी तो नवस पूर्णही करते यातून देवाला नवस बोलणे व तो पूर्ण करणे ही समाजातील प्रथा दिसून येते.

कादंबरीत नायकाच्या गावाचे वर्णन येते, खेड्यापेक्षा मोठं आणि शहरापेक्षा लहान, नदीकाठी असलेलं, आजूबाजूला झाडांची गर्दी असलेले हिरवं गाव. गावाबाहेर असणारी कौलारु, जुनी एल आकाराची शाळा, बाजूला छान बगीचा, पाठीमागे निंबाचं झाड असे गावाचे मनमोहक वर्णन कादंबरीत येते. इतर नातेवाईकांच्या गावापेक्षा आपले गाव खूप आवडत असल्याचेही बालनायक सांगतो. गावातील मारोतीचा पार म्हणजे नायकाच्या गँगची खेळायची जागा. लपाछपी, छापाकाटा या खेळाचा उल्लेख कादंबरीत येतो.

स्वतःचे भविष्य काय आहे हे माहित नसणारे काहीजण गावात पोटासाठी भविष्य पाहण्याचा धंदा करतात. पिंजरा आणि त्यामध्ये असणाऱ्या पोपट बाहेर येऊन एक चिट्ठी काढत असतो आणि ते गिऱ्हाईकला वाचून दाखवतो आणि त्यांच्याकडून पैसे घेतो. कधी एखादा बेरोजगार तरुण नोकरीच्या शोधासाठी, कुणी श्रीमंतीचा योग पाहण्यासाठी तर कुणी विहरीला पाणी कधी लागेल यासाठी हे भविष्य पाहत असतात. या कादंबरीतील नायकाचा मित्र टिल्लू देखील अभ्यास न करता परीक्षेत पहिला येण्यासाठी गावात आलेल्या भविष्यवाल्याकडून भविष्य पाहतो घरुन चोरुन आणलेले दहा रुपये तिथे देतो आणि भविष्यवाला टिल्लूला सांगतो कुणी कितीही अभ्यास केला तरी तूच पहिला येशील, तुझा अभ्यास कसाही असो, हा पोपट साधासुधा नाही, देवाचा आहे, याचे भविष्य शंभर टक्के खरे ठरते असे सांगून त्याला उजव्या हाताच्या बोटात एक तांब्याची अंगठी घालायला देतो. परीक्षेत कसलाही अभ्यास न करता टिल्लू आनंदाने परीक्षा देतो परंतु जेव्हा निकाल लागतो तेव्हा तो नापास झाल्याचे समजते. तो खूप रडतो. सत्य घटना आपल्या मित्रांना सांगतो. हे ऐकून बालनायक ठोंब्या आणि त्याचे मित्र त्या ज्योतिषाला चांगलीच अद्दल घडवतात, त्याचे पितळ उघडे पडतात. त्याला गावातून हकलून देतात. भविष्यावर विश्वास न ठेवता प्रयत्न करुन यश मिळवण्याचा संदेश तरुणांना ही कादंबरी देते.

नायकाचा दुसरा एक मित्र गणू. शेतीवाडीची आवड असणारा. रविवारच्या दिवशी शेतात जातो. शेतातली कामं करतो. गुरं चरायला नेतो. अचानक त्याला तिथे साप चावतो. वेदनेने तो रडू लागतो. विष पूर्ण शरीरात पसरु नये म्हणून त्याचे वडील पायाला करकचून उपरणं बांधतात. बैलगाडीत बसवून गावात पारावर आणतात आणि मांत्रिकबुवाला बोलावून विष उतरण्याचा प्रयत्न करतात. पण काही फरक पडत नाही इतक्यात बालनायक ठोंब्या डॉक्टरांना घेऊन तेथे पोहचतो. डॉक्टर तपासतात आणि लगेच ग्रामीण रुग्णालयात न्यायला सांगतात. तेथे त्याच्यावर उपचार होतो आणि गणूचा जीव वाचतो. सर्वजण नायकाचे कौतुक करतात. अंधश्रद्धेवर विश्वास न ठेवता वैज्ञानिक दृष्टिकोन समाजाने स्वीकारायला हवा असा संदेश या प्रसंगाने मिळतो.

नायकाचे आजोबा त्यांच्या लहानपणीच्या आठवणी नायकाला सांगताना म्हणतात, आमच्या काळी गुरुजी एकदम शिस्तप्रिय, कडक स्वभावाचे. गल्लीतून समोरुन येताना दिसले तरी आम्ही मुलं पळत सुटायचो. घाबरुन लपून रहायचो. गुरुजींचा प्रचंड धाक होता.एकदा श्लोक पाठ केले नाहीत म्हणून गुरुजींनी खूप मारलं मी इतका धास्तावलो की नंतर शाळेत कधी पाय ठेवलाच नाही. शाळेपेक्षा शेतीवाडीकडं लक्ष देवू लागलो आणि त्यातच रमलो. माझ्याबरोबरचा राम्या मात्र शिकला. जिल्ह्याला गेला पुढे मोठा साहेब झाला. माझी मात्र शाळा सुटली ती कायमचीच. शिक्षकाने मुलांना शाळेची, शिक्षणाची गोडी लावायला हवी. शिक्षा हवी पण माफक असावी. त्यातून ममता दिसावी. तरच मुलं आनंदाने शाळेत येतील आणि शिकतील. समाजाला यातून शिक्षणाचे महत्व समजते.

नायकाचा मित्र दिनूला जेव्हा गुरुजी खूप मारतात त्यामुळे तो आजारी पडतो. हे जेव्हा नायक गुरुजींना सांगतो तेव्हा मात्र गुरुजी घाबरतात. एवढं मारायला नको व्हतं असे त्यांना वाटते. पेपरात छापून आले तर अवघड होईल याची जाणीव त्यांना होते आणि ते दिनूला घरी भेटायला जातात व आपली चूक कबूल करतात. हात जोडून माफी मागतात त्यावेळी दिनूचे वडील गुरुजींनाच म्हणतात " अहो गुरुजी माफी कशाला? अहो म्हटलंय ना कुणीतरी की, छडी लागे छमछम... विद्या येई घमघम. " या

प्रसंगावरुन शिक्षकांप्रती समाजात असणारा आदर दिसतो. शिक्षक देखील छडीशिवाय शिक्षण देणे हा बदल स्विकारताना दिसतात.

कादंबरीत शेतीजीवनाचे अनेकदा वर्णन येते. नायक हा गुरा ढोरांवर प्रेम करणारा आहे. ज्यावेळी नायकाच्या शेतातून गाडीसह बैलजोडी चोरीला जाते त्या वेळी नायकाला दु:ख होते बैलपोळ्याला केलेली धमाल आठवते. शिंगाना दिलेला लाल भडक रंग, पाठीवर घेतलेली झूल, पुरणपोळीचा नैवेद्य आठवतो. यातून ग्रामीण जीवनातील सण व संस्कृतीचे देखील दर्शन होते. हरवलेली बैलजोडी ज्यावेळी सापडते त्यावेळी बैल नायकाचा हात चाटू लागतात. शेपूट हालवत प्रतिसाद देतात. बैलांच्या डोळ्यातून देखील अश्रू टपकतात. माणूस जेवढा प्राण्याला जीव लावतो त्या बदल्यात प्राणी देखील माणसाला जीव लावताना कादंबरीत दिसते. दुसऱ्या प्रसंगात कुत्रा माणसासाठी कसा फायदेशीर ठरतो हे पाहायला मिळते.

बालनायक ठोंब्या जेव्हा मुबंईला मावसबहिणीच्या लग्नाला जातो त्यावेळी तेथे त्यांच्याकडे असणारा टॉमी नावाच्या कुत्र्याचा लळा त्याला लागतो. दोघंही मित्र होतात. नायक जिकडे तिकडे टॉमी. पायाशी लोळणं घ्यायचा, पाय चाटायचा, हातावर पंजा ठेवून शेकहॅंड करायचा. हाच टॉमी ज्यावेळी नायकाला सोडवताना मावशीबरोबर स्टेशनवर येतो त्यावेळी रेल्वेस्टेशनवर कचराकुंडीत असणारा बॉम्ब शोधून काढतो. त्यात तो मरण पावतो. टॉमीचा मृत्यू हा नायकाबरोबर वाचकांनाही मनाला चटका लावतो. प्राणी आणि मानवी जीवन यांचा असणारा संबंध कादंबरीत अधोरेखित होतो.

कादंबरीत धुणी भांडी करणाऱ्या कष्टाळू स्त्रीचे वर्णन येते. सुलभाबाई हे त्यांचे नाव. नायकाच्या घरी त्या धुणीभांड्याचे काम करत असतात. त्या विधवा असल्याने गावातल्या आठ दहा घरची धुणी भांडी, मोलमजुरी करत आपलं जीवन जगत असत. पण तरीही आपल्या मुलीला शिकवण्याची त्यांची जिद्द दिसून येते. मुलीला डॉक्टर करण्याची त्यांची इच्छा असते. एकदा जेव्हा बालनायकाची कडक स्वभावाची आत्या नायकाच्या घरी येते त्यावेळी स्वभावाप्रमाणे सुलभाबाईवर

ओरडते. काम व्यवस्थित कर, पगार फुकटचा घेते का? असे बरेच काही बोलते. सोबत आणलेल्या तिच्या अबोली या मुलीबाबत म्हणते, तुझ्यासोबत रोज आणत जा तिला भांडी घासायला. आतापासूनच तिला कामाला लाव. यावरच न थांबतात पुढे त्या म्हणतात, अगं मुलीची जात ती... चूल अन मूलच सांभाळायचं आहे तिला आयुष्यभर... मग कश्याला एवढं शिक्षण? " विमलआत्याचे हे बोलणे म्हणजे गरीब घरच्या मुलींनी शिकू नये. चार घरची धुणी भांडीच करावी अश्या संकुचित विचाराचे आहे. हे सर्व नायक ऐकत असतो आणि ज्यावेळी आत्या आजारी पडते त्यावेळी नायकाला वाटते चांगली संधी आली आहे विमलआत्याच्या जुनाट विचारांना बदलण्याची... या संधीचा फायदा घेऊन नायक अबोलीला आत्याची सेवा करण्यासाठी हॉस्पिटलला पाठवतो आणि त्यातून आत्याचे मतपरिवर्तन होते. ठोंब्याचे आजोबा शिक्षणाला महत्व देताना दिसतात तर आत्या मात्र मुलींनी जास्त शिकून काय उपयोग? या मताची दिसते. तरीही ठोंब्या यांचे मतपरिवर्तन करण्यात यशस्वी होतो.

गावची जत्रा, ग्रामसभा, गावाकऱ्यांची मानसिकता याचे चित्रण देखील कादंबरीत येते. गाव हागणदारी मुक्त करण्यासाठी नायक एक युक्ती लढवतो. स्वप्नात ग्रामदैवत मुंजोबा आल्याचे सांगतो आणि गावातील सारेजण जिथं उघड्यावर बसून घाण करतात तिथे पूर्वी देवाचं जुनं देऊळ असल्याचे सांगतो. हे बंद झाले पाहिजे तरच यात्रा साजरी होणार अशी गावाकऱ्याला शपथ घ्यायला सांगतो. त्यातून गाव हागणदारीमुक्त होते. गावाला मोठा पुरस्कार मिळतो. धार्मिकतेला महत्व देणारा समाज आणि भीतीपोटी का होईना बदल स्विकारण्यास तयार होताना दिसतो.

**समारोप –**

आबा महाजन लिखित ठोंब्या या कादंबरीचा नायक २१ व्या शतकातील बालनायकाची परंपरा समृद्ध करणारा आहे. वयाने मोठ्या असणाऱ्या वडीलधाऱ्यांचा मान राखून समाजात असणाऱ्या अनेक वाईट रुढी, प्रथा, परंपरा मोडून काढण्याचा प्रयत्न करतो. संस्कृती जपण्याचा प्रयत्न करतो. बैल, कुत्रा या प्राण्यावर प्रेम करतो. इतर पाहुण्यांच्या गावापेक्षा त्याला आपले गाव अधिक आवडते. गावाला आदर्श, निर्मलग्राम पुरस्कार मिळण्यासाठी त्याची धडपड दिसते. जुनाट विचाराच्या आपल्या आत्याला बदवण्याचा देखील तो प्रयत्न करतो. एकूणच ठोंब्या ही कादंबरी बालनायकाच्या कृतीतून घडणाऱ्या सामाजिक व संस्कृतिकतेवर सक्षमपणे प्रकाश टाकते.

**संदर्भ —**

१. ठोंब्या - आबा महाजन, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
२. आबा गोविंद महाजन बालसाहित्य आकलन आणि समीक्षा - संगीता म्हसकर, कविता महाजन (संपा.), अथर्व पब्लिकेशन, धुळे.
३. आबा गोविंद महाजन बालसाहित्य आकलन आणि परिचय - कु. मैत्री लांजेवार (संपा.), अथर्व पब्लिकेशन, धुळे.
४. बालसाहित्य निर्मितीचा अनुभव, आबा महाजन, दिलीपराज प्रकाशन, पुणे.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

# संत साहित्यातील पर्यावरण प्रेम : कुणबीपणाच्या विशेष संदर्भात

संशोधिकेचे नाव
**प्रा. मनिषा एस. पाटील**
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूर, जि. सांगली
ईमेल आयडी – patilsmanisha2013@gmail.com

मराठी मन आणि मराठी माती यांचा शोध घ्यायचा असेल तर भक्ती परंपरेकडे वळावे लागते. संत साहित्याचा विचार करता वारकरी संप्रदायाचा विचार महत्वाचा ठरतो. कारण हा संप्रदाय महाराष्ट्रीयन समाज आणि संस्कृतीचा मूलाधार आहे. या संत साहित्यात असणारे कुणबीपण आणि पर्यावरण प्रेम हे ठायी ठायी जाणवत रहाते. 'शिवकालीन राजकीय आंदोलनाची वैचारिक आणि भावनात्मक पार्श्वभूमी मंडळाच्या कार्यातून तयार झालेली दिसते. असा निष्कर्ष न्या. रानडे 'राईज ऑफ मराठा पॉवर' या महत्वपूर्ण संशोधन ग्रंथात मांडताना दिसतात. 'रंजल्या गांजल्या जिवांची खंत बाळगणारा संत नाठाळाच्या माथ्यावर काठी हाणण्याचे बळही देतो.[1] संत परंपरेत सातत्याने पर्यावरण शेती कुणबीपण याबाबतचे संदर्भ येत रहातात आणि संत कुणबी परंपरेशी एकरूप झालेले दिसतात. निसर्गप्रेम, निसर्गाचा निर्मळ भाव हा त्यांच्या साहीत्यातून येतच रहातो. शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा, दुष्काळ याबद्दलही वारकरी संप्रदायात त्यांच्या साहित्यात उल्लेख येतात. आज महाराष्ट्रात 'कुणबी आहोत, आरक्षण द्या' यासाठी आंदोलन सुरू आहे. यासाठी दाखले हवे आहेत असे दाखले संत साहित्यात वारंवार येतात.

ज्या काळात कर्मकांड भक्तीचं अतोनात स्तोम माजविले जात होते. तेव्हा केवळ कष्टाला प्राधान्य देवून संतानी कष्ट करीतही भक्तीमार्ग स्विकारला जावू शकतो हे दाखवून दिले. शेत पिकं माती, वन-अरण्य, झाडं वेली यांच्याबरोबर रमत त्यानी जगण्याची सोपी पद्धत रूढ केली. संत तुकाराम, सावता माळी, नामदेव, गोरा कुंभार, जनाबाई हे खऱ्या अर्थाने श्रमिक संस्कृतीचे पालक करणारे संत होते. तसेच चोखोबाही त्याच परंपरेचे पाईक होते आपलं कुणबीपण मानाने मिरवणारी ही संतपरंपरा आपणास दिसते.

**संत साहित्यातील कुणबीपण:-**

चोखोबा हे महार समाजातले, चोखोबां ची गाणी कारूण्यपूर्ण आहेत. त्यामध्ये वरील सौंदर्यास न भूलावे यासाठी ते ऊसाचे उदाहरण देतात

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ।।[2]

सतत पीक-पाण्याचे सान्निध्यात असणारे हे संत होते. तसेच चोखोबांची पत्नी सोयराबाईंच्या रचनाही प्रसिद्ध आहेत.

अवघा रंग एक झाला। रंगी रंगला श्रीरंगा ।।[3]

विठ्ठलाचे नामस्मरण करता सर्व रंग एक होतो. या दृष्टांत देताना पुराणाचे दाखले देतात द्रोपदीच्या भाजीच्या देठाने देव तृप्त होतो. विदुराच्या घरच्या कण्याही तो गोड मानतो गरीब शेतकऱ्याच्या घरी जसा देव जाईले तशीच उदाहरणे देतात. संत कबीरही मध्ययुगीन भक्ती चळवळीतील महान संत होते. ते एकेश्वरवादी होते त्यांनी हिंदू- मुस्लिम भेद मानत नाहीत. ते म्हणत दगडांची पूजा करून ईश्वर प्राप्त होत असेल तर मी पर्वताची पूजा करायला तयार आहे. देव एकच आहे असे ते म्हणत. कबीर मूर्तीपूजा मानत नाहीत. कबीर पंथीयात तुळशी माळ गळ्यात घालतात. कबीरांच्या दोहयातून सर्वसामान्य जीवनाचा पुरस्कार केलेला दिसतो. कबीर बुद्धीवादी होते. आर्थिक विषमता मानवी संघर्षाचे मुळ कारण होते असे मानत.[4] ते श्रमप्रतिष्ठेला महत्व देत असत.

'आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुल झाडा ।।
शांति शेवंती फुलली । प्रेम जाई जुई व्याली ।।

सावता माळी यांचे साधे तत्वज्ञान, शेती संस्कृतीचं अस्सल तत्वज्ञान सावता माळींच्या रचनेत मिळते. तसेच 'मला' हे बृहत रुपक कल्पून श्रमसंस्कृतीचा सार्थ गौरव ही त्यानी केला आहे.[5]

पापामुळे । झाले सत्याचे वाटोळे

दोष झाले बळिवंत । नाही ऐसी झाली नीत ।
मेघ पडो भीती । पिके सांडियली क्षिती ।।
तुका म्हणे कांही । वेदा वीर्य शक्ती नाही ।।

मनुष्य सत्यापासून ढळला तर ऋतूचक्रावर परीणाम होतो. पाऊस पडत नाही. धरणी पीक धरत नाहीत. असे तुकोबा सांगून सचोटीचा सल्ला देताना दिसतात.[6] उदाहरणे देतानाही हे संत शेती, ऋतु, पानं, पीके यांचीच देतात. आणी आपलं शेतकीपण, कुणबीपण जपतात.

"बरा कुणबी केलो । नाहीतरी दंभे असतो मेलों ।।1।।
गा भले केले देवराय । नाचे तुका लागे पाया ।।2।।"

हा तुकाराम महाराजांचा अभंग आपणास कुणबी बनविले याचे परमेश्वराजवळ आभार मानतानाचा आहे. शेतकरी ऊन, वारा, पाऊस, दुष्काळ कर्जबाजारीपण झेलतो. त्याला दंभ- अहंकार, होत नाही असे तुकोबानाही वाटते, 'बरे झाले देवा निघाले दिवाळे । बरी या दुष्काळे पीडा केली।' यावरूनही तुकाराम महाराज देवाचे आभार मानून दुष्काळाशी सामना करीत चिंतनात मग्न राहतात. आणि या संकटामुळे मला तुझी नित्य आठवण आहे असे म्हणतात.

**संतांचे निसर्गाबद्दलचे प्रेम**:-

संत नामदेव व कबीरपुत्र कमाल यांच्या दोन कथा सांगितल्या जातात. त्यामध्ये नामदेव थंडीच्या दिवसात रस्त्याने जात असतात. त्यांना रस्त्यात एक दगड दिसतो त्या दगडाला ते अंगावरचे पांघरून घालतात. तसेच कमाल देवासाठी फुले आणण्यात बाहेर जातात. त्यांना फुलावर दवबिंदु दिसतात. त्यांना वाटते आपण फुले तोडतो म्हणून ते अश्रु ढाळतात. कमाल फुले न तोडताच घरी जातात.[8] वृक्षवल्ली यांच्याबद्दलचे प्रेम यात दिसुन येते. सर्वानुभूतीची जाणीव या प्रसंगावरून दिसते.

**मराठी संतांचं कुणवीषण** :-

कुणबी ही विश्वव्यापी संकल्पना आहे. वेगवेगळ्या जातीतून संत पुढे आले आपापल्या जात व्यवसायाच्या पर्यावरणासह पाय घट्ट रोवून उभे राहीले. श्रमण संस्कृतीचा पुरस्कार इ.स. पूर्व 5 व्या शतकातल्या आजीवकांपासून सांगितला जातो. श्रमण शब्द 'समण' असा अर्धमागधीत आढळतो. श्रम करणारे समानता जोपासणारे असा अर्थ आहे. जैन व बौद्ध या दोन्ही परंपरा श्रमण संस्कृतीच्या आहेत. त्यांनी श्रम आणि श्रमिक या दोन्हीप्रती सन्मान व आदर जोपासला[9] जगाच्या इतिहासात जे जे नैसर्गिक आहे ते ते शोषणाच्या भक्ष्यस्थानी पडलं. कुणबीपणही याला अपवाद नाही. "तुकाराम नावाचा साधू शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाला." असे जोतिबा म्हणतात त्यावेळी तुकोबां बरोबरच संत परंपरेचे शेतकरीपण अधोरेखित होते. निसर्गाचे शोषण करण्यापेक्षा निसर्गाच्या सर्जन प्रक्रियेत सहभागी होण्याची प्रक्रिया होती. कुणबीपण ही संतवृत्ती मानली तर सर्व संतांचा पूर्वज शेतकरी मानता येईल.

बलुतेदारीचा कणा असणारा कुणबी गावगाडयातील कुणालाही मरु देत नव्हता. मराठी संतांचं गावगाड्याशी शेती मातीशी अभिन्न नातं होतं.

"रात्री दिवसा वाहतसे चिंता । केशवा धडौता होईन मी।।
खिरजट धोंगडे। फाटके ते कैसे। वेचले तैसे भोगिजे ।।
वित्त नाही गाठी । जिवित्वा आटी। उघडी पाठी हीव वाजे।।[10]

हे शेतकऱ्यांचं आणि शेती व्यवस्थेचे वर्णन महत्वाचे आहे. तुकोबा हे उजळ माथ्याने कुणबीपण मिरवणारे पहीले संत मानावे लागतील. 1630 मध्ये दुष्काळ पडला होता. तेंव्हा तुकोबा म्हणतात, "मढे झाकुनिया करिती पेरणी । कुणबियाचे वाणी लवलाहे। तुकोबा पेरणीचं महत्व सांगतात 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी। असे निखलासपणे तुकोबा म्हणतात- 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे। पक्षी ही सुस्वरे आळविती। हे सांगताना तुकोबा भंडारा डोंगरावर पृथ्वी आणि आकाश यात सामावून गेलेले दिसतात.[11] पेरणी किती गरजेची आणि ती वेळेत करावी लागते. अगदी कोणाचा मृत्यू झाला तरी. हे स्पष्ट करताना दिसतात.

भक्ती संप्रदायाचं साहित्य आणि शेती याच नातं अतुट आहे. मराठी मातीतल्या शेतकऱ्याना जगण्याचं बळ येथिल अभंग, ओव्या, गवळणी, भारूडं, लोकगीते यांनी दिले आहे. 'कांदा मुळा भाजी अवघी विठाई माझी' या संत सावतामाळी यांच्या अभंगात शेतमळ्यात फुलणाऱ्या भाजीपाल्यात ते परमेश्वरा चें दर्शन घेतात. शेती शेतीची परंपरा मानणारे संत आणि त्यांचे साहित्य हे मनास उभारी देणारे आहे. महाराष्ट्राचे कुणबीपण सिद्ध करण्यास संत साहित्य हे पूरक साहित्य म्हणता येते. आज आरक्षणास 'कुणबी' प्रमाणपत्राची आवश्यकता निर्माण झालेली दिसते. मराठा कुणबी होताच आणि महाराष्ट्राच्या राजाला छ. शिवाजी महाराजानाही महात्मा जोतिराव फुले 'कुळवाडी भूषण' म्हणून आपल्या लेखनात सन्मान देताना दिसतात.

**निकर्ष:-**

1) संत परंपरा ही उच्च नीच, गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष भेदाभेद न मानणारी संत हे गावगाडयामध्येच असणारे काम करणारे श्रमिक परंपरेचे पाईक होते. त्यांनी त्यांचे कुणबीपण त्यांचा साहित्यातही जपले आहे.
2) शुद्रातिशुद्र समाजास दैनंदिन आयुष्य जगताना खुप करावे लागत. अवहेलना ही सहन करावी लागत. दुष्काळ, सावकारी, कर्जबाजारीपणा असूनही संतांनी शेती पिके, निसर्ग, पशु पक्षी यांच्यावर नितांत प्रेम केले.
3) विद्वत्ता कोणत्याही जाती-धर्माची गुलाम नसते. पढत मुर्ख असणाऱ्या उच्चवर्णीय समाजास चपराक देत श्रमाचे श्रमिकाचे महत्व आपल्या रचनेतून संतांनी मांडले. आपण केलेल्या कष्टात, शेतमळ्यात रावणाऱ्या हातात फुलापानात ईश्वर मानणाऱ्या कुणबीपण जपणाऱ्या संतांची परंपरा महाराष्ट्रास लाभली.
4) मध्ययुगातील संतसाहित्य पर्यावरणाचे महत्व जाणणारे निसर्गाची महती मानणारे आनंददायी आणि जीवनास उभारी देणारे होते.
5) आपण शेतकरी आपण कुणबी आणि भगवंत देखिल श्रमकरणारा आपणास सातत्याने मदत करणारा तसेच गावगाड्यातील प्रत्येक काम विठोबाही करतो. असा गाढ विश्वास संत परंपरेने दिला.

**संदर्भ :-**

1. 'रिंगण' संत सावता माळी विशेषांक, संपादन परब सचिन, आषाढी 2019, पृष्ठ क्र.78
2. महाराष्ट्रातील संत परंपरा: डॉ. दातार आरती, डायमंड पब्लिकेशन पुणे प्रथमावृत्ती, जाने 2010, 25BN 978-81-8483-236-5-पृष्ठ क्र. 19
3. कित्ता पृष्ठ क्र -23
4. भारताचा इतिहास व संस्कृती: प्रा. मार्डीकर मदन विद्या बुकस पब्लिशर्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जून 2008, पृष्ठ क्र. 31
5. 'रिंगण' संत सावता माळी विशेषांक, पृष्ठ क्र - 103.
6. 'रिंगण'- 'जोहार' चोखोबा - रिंगण आषाढी 2015 या विशेषांक संपादन-परब सचिन । गायकवाड- श्रीरंग, नाग नालंदा प्रकाशन, प्रथमावृत्ती, 14 नोव्हे. 2016 पृष्ठे 67
7. संत तुकाराम, केळुसकर अर्जुन, संत तुकारामांचे पहिले चरित्र साकेत प्रकाशन पुणे. प्रथमावली - 1896 पृष्ठ क्र. 33, 40
8. 'रिंगण' संत जनाबाई विशेषांक, आषाढी 2021 - संपादन परब सचिन। गायकवाड श्रीरंग प्रथमावृत्ती 1 जुलै 2015, पृष्ठ क्र. 79
9. 'रिंगण' संत नरहरी सोनार विशेषांक -संपादन परब सचिन- आषाढी 2021, पृष्ठ क्र - 83.
10. 'रिंगण' संत सावता माळी विशेषांक, पृष्ठ क्र. 82
11. कित्ता, पृष्ठ क्र. 85

# शिवारमातीतल्या सुखदु:खांचे संकेतस्थळ : 'शिवार माती डॉट कॉम'

**प्रा.डॉ.मानसी जगदाळे**
मराठी विभाग प्रमुख,
आदर्श कॉलेज, विटा.

**प्रस्तावना:**

भारतीय खेड्याची रचना स्वतंत्र,स्वयंपूर्ण आहे. ग्रामीण भागामध्ये काळी आणि पांढरी असे दोन शब्द जुन्या काळापासून प्रचलित आहेत. काळी म्हणजे भूमी,शेती आणि पांढरी म्हणजे गाव.ग्रामीण भागातील स्वतंत्र रचनेला गावगाडा असे संबोधले जाते. या गावगाड्यांमध्ये कारू - नारू हे महत्त्वाचे घटक आहेत. शेती केंद्रस्थानी असून त्याला अनुरूप अशी इतर सर्व रचना असते.

**'शिवार माती डॉट कॉम'**

' शिवार माती डॉट कॉम' या मुकुंद वलेकर यांच्या काव्यसंग्रहात बदलत जाणाऱ्या खेड्यातील जीवन जाणिवा शब्दबद्ध झालेल्या आहेत. कवी वर्तमान वास्तवाचे भान ठेवतो. शेतकऱ्याच्या श्रमाला प्रतिष्ठा नसणे ,जगाच्या पोशिंद्याची आत्महत्या याचे वास्तव चित्र मुकुंद वलेकर यांनी आपल्या कवितेतून केले आहे. ' श्रमाची चोरी' या कवितेत कवी म्हणतो-

**"अरे मातीत राबणारा माणूस मरतोय.....**
**पोरकी होतेय माती...!**
**तरीही, तुमची कशाने फुगतेय रोज छप्पन इंच छाती?**
**... किंवा**
**मातीतले बळी आता, मातीत गाडून नाहीत घेणार....**
**वामनांची तंगडी तोडून, तुमच्याच हातात रोज देणार!**

कविचा शेतकऱ्याबद्दलचा कळवळा,पोटतिडीक यातून दिसते. कवी केवळ शेतकऱ्यांबद्दल कळवळा व्यक्त करून थांबत नाही तर वामनांची तंगडी तोडून त्यांच्या प्रतिष्ठेला सुरूंग लावण्याची भाषा बोलतो.

मुकुंद वलेकर यांनी आपल्या कवितेतून शेतकऱ्यांची व्यथा, वेदना मोठ्या ताकदीने मांडली आहे. कवीने 'कृषी संजीवनी ॲप' तयार करा असे सुचविले आहे.कवी म्हणतो-

**'शेती, माती, नाती आणि आर्थिक उन्नती ...**
**साध्य करून देणार...**
**आमच्यासाठीही एखाद कंगालमुक्तीचं......**
**' कृषी संजीवनी' ॲप तयार करा...**
**......**
**कृषी संजीवनी ॲपवरून शेतकऱ्यांच्या दु:खांचा रोज**
**रोज न चुकता निचरा करा**
**मग, तुमच्या प्रत्येक वाक्याला आम्ही लाईक करू..... कमेंट करू... शेअर करू...**
**आणि अख्खी संसदच हृदयापासून सबस्क्राईबही करू!**

कवीने वर्तमान वास्तवतेचे भान ठेवून काव्यलेखन केले आहे. काळाबरोबर आता शेतकरीही बदलला आहे, नवे त्याने बदललेच पाहिजे. तरच तो जागतिकीकरणात टिकणार आहे. कवीने आपल्या मनोगतात म्हटल्याप्रमाणे 'भारत महासत्ता म्हणून पुढे येतोय याचा आनंद सर्वच शेतकऱ्यांना आहेच. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची लोकल दु:खे आता ग्लोबल विश्वासमोर नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने मांडावीत, असे कवीला वाटल्यामुळे त्यांनी 'शिवार माती डॉट कॉम' हे नवे संकेतस्थळ कवितासंग्रहाच्या रूपाने जगाच्या व साहित्यविश्वाच्या समोर ठेवले आहे. (मनोगत- शिवार माती डॉट कॉम) कवी मुकुंद वलेकर

त्यांच्या 'शिवार माती डॉट कॉम' या पहिल्या काव्यसंग्रहाबद्दल म्हणतात- "शेती मातीतल्या श्रमिक माणसांच्या भावभावनांचा परीघ या कवितेतून प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. रात्रंदिवस शेतात राबूनही शेतकऱ्यांच्या घामाला आणि श्रमाला प्रतिष्ठा का मिळत नाही? याचा शोध घेण्याचा प्रयत्न कवीने केला आहे. इथली व्यवस्था शेतकऱ्यांचा विचार किती निर्दयतेने करते हे कवीच्या संवेदनशील मनाला सहन होत नाही. नोकरदारांच्या पगारांची हमी देणारे सरकार स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात देखील शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देत नाही, याच्यासारखी शोकांतिका असू शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या स्वप्नांना तडा जातो. याची शासन व्यवस्थेला ना दु:खा ना खंत.

**"डोईफ फाटक मुंडास**
**पाय अनवाणी उदास**
**डोळ्या भरल्या दु:खांची**
**बापहो, मांडतो आरास!**

शेताची नांगरणी करताना मातीचे चिंतन - मंथन कवीने अनेक अंगाने केले आहे. कवी म्हणतो,, सध्या शेती हे शेतकऱ्यांसाठी 'शाश्वत मरण'असताना काही जणांना ते 'शाश्वत कुरण'वाटत आहे.कवी म्हणतो, एकीकडे मोठ्या उत्साहात देशात स्वातंत्र्याचा 'अमृतमहोत्सव' साजरा होतोय, तर दुसरीकडे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आज शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत, पण त्या सहजासहजी सुटणार नाहीत. त्यासाठी व्यवस्थेशी भांडावेच लागेल. कवी म्हणतो, राजकीय पक्षांच्या नेत्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या एकत्र येऊन सोडविल्यास त्या नक्कीच सुटतील. परंतु राजकीय लोक याचेच भांडवल करून सत्तेचा उपभोग घेतात.

जागतिकीकरणा नंतर खेडे कसे बदलत गेले याचे वास्तव चित्रण त्यांच्या 'शेती आणि जागतिकीकरण' या विभागात आले आहे त्यामध्ये 'लोकलायझेशनची माती', 'मातीच्या कवितेचे पसायदान', 'जागतिकीकरणानंतरचे गाव', 'अँड्रॉइड मोबाईलच्या वेशीतून', 'स्मार्ट शेतीतील स्मार्ट मरण', 'मानाचा सॅल्यूट' इत्यादी कवितेतून खेड्यातील बदल आपणास दिसतो.

मुकुंद वालेकर यांच्या ' शिवार माती डॉट कॉम' या काव्यसंग्रहातील कविता एकूण तीन भागांमध्ये विभागलेल्या आहेत. त्यामध्ये पहिला भाग 'माती आणि मंथन',, दुसरा भाग 'शेती आणि राजकारण', तिसरा भाग 'शेती आणि जागतिकीकरण' असा आहे. यामध्ये शेतीची, शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांची मांडणी करणारी कविता आहे. शेतकरी पूर्वीही सुखी नव्हता आणि आजही नाही. शेतकऱ्यांच्या विदारक जीवनाकडे आजपर्यंत कोणताही राजकीय पक्ष लक्ष देत नाही.केवळ राजकीय निवडणुका जवळ आल्या की शेतकऱ्याबद्दल कळवळा येतो. शहरीकरणाच्या हव्यासापोटी आज शेती जमीन संपुष्टात येत आहे यावरही चिंता व्यक्त करणाऱ्या कविता मुकुंद वलेकर यांच्या काव्यसंग्रहात आहेत.याविषयी विश्वनाथ शिंदे म्हणतात-" मुकुंद वलेकर यांची कविता वाचताना शेतकऱ्यांच्या स्थितीगतीचे त्यांच्या अगतिकतेचे ,अस्वस्थतेचे आणि वेदना आक्रोशंचे अनेक तपशील कळतात आणि आपण अंतर्मुख होऊन शेती आणि शेतकरी याविषयी विचार करू लागतो. असे वाचकांना विचार प्रवृत्त करणे हे कोणत्याही चांगल्या कलाकृतीचे बलस्थान असते. अशी बलस्थाने प्रस्तुत संग्रहातील काही कवितांमध्ये आपणास निश्चितच आढळतात. या दृष्टीने 'भाकरीचा परमेश्वर' ही कविता लक्षवेधक आहे. आजही शेतकरी आत्महत्या करीत आहेत आणि हे आत्महत्यांचे सत्र संपतच नाही.. गेल्या चार-पाच वर्षात लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत .त्याचे सोयरसुतक कुणालाच नाही. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्याने आत्महत्या केली म्हणजे आपण काय काय हरवून बसलो. हे सांगणारी वलेकर यांची कविता महत्त्वाची वाटते.

**' मातीचं काळी सांभाळणारा महान योद्धा गेला,**
**लेकरा बाळांच्या जीवनातला उजेड गेला**
**चिमण पाखरांच्या चोचीतला भरवशाचा फलाहार गेला ,**
**नालायक दुनियेतला भाकरीचा परमेश्वर गेला.**

असं सांगणारी ही मुकुंद वलेकर यांची कविता कोणत्याही संवेदनशील माणसाच्या काळजाला घरे पाडणारी कविता आहे"(प्रस्तावना: शिवार माती डॉट कॉम) कवीने 'देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या कवितेतून आपली व्यथा -वेदना मांडली आहे .ते म्हणतात-

**' हे माझ्या भारत देशा...! शिवारात उभे राहून अशाळभूतपणे ....**
**आम्ही कसा साजरा करावा तुझा अमृत महोत्सव?**
**अमृत दिसलंही नाही नि प्यायलाही मिळालं नाही.**

ही खंत कवीने व्यक्त केली आहे. प्राचार्य डॉ.सयाजीराजे मोकाशी म्हणतात-" हराम झालेल्या संसदेला स्वातंत्र्यानंतर उजाडलं की अंधारलं हेच कळत नाही. म्हणून तासा-आडतासात शोषकाला मातीत गाडण्याची भाषा करणारी ही कविता शेतकऱ्यांचे क्रांतीगीत गाते. कवी मुकुंद वलेकरांची कविता मुळापासून वेगळे आहे. नवे युगभान घेऊन अवतरलेली ही कविता हातात कासरा घेऊन झाडाकडे जाणारी नाही तर, फसविणाऱ्या टोळीची टाळकी सडकून काढायला, रुमन आणि नांगराचा फाळ हातात घेणारी आहे. (मलपृष्ठ : शिवार माती डॉट कॉम) नव्या दमाचा , नव्या युगाचा साक्षीदार म्हणून कवी मुकुंद वलेकर यांची कविता अवतरते. त्यांची कविता वाचकाला आणि बळीराजाला लढण्याचे बळ देते. पण कधी- कधी कविचा संयम सुटतो आणि तो संपूर्ण व्यवस्थेवर राग काढतो.राजकर्त्यांना त्यांच्या लायकी ठेवले पाहिजे हे नवीन पिढीचे प्रतिनिधित्व कवीने केले आहे. त्यांच्या कवितेतून धगधगती आग दिसते.बंडखोरपणा दिसतो, हीच आग आणि बंडखोरपणा उद्या शेतकऱ्यांच्या मनातूनही आणि शेतीतूनही उगवल्याशिवाय राहणार नाही याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही. 'मानाचा सॅल्यूट' या कवितेत कवीने अतिशय पोटतिडकिने वर्णन केले आहे.कवी म्हणतो- 'मातीचे फेसबुक तयार करावे,

**आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यासाठी ....**
**आत्मसंजीवनीचं नव ग्लोबल ग्रीन हाऊस उभारावे,**
**मूर्दाड, बधिर व्यवस्थेतही ....**
**स्वत:ला विद्वान समजून मिळवणाऱ्यांच्या बुडाला....**
**जोराचा सुरंगी हादरा द्यावा म्हणतो....**
**रात्रंदिवस ब्रेकिंग बातम्यांचा रतीब घालणाऱ्या**
**माध्यमांचा मलीन कॅमेरा ....**
**मातीसाठी एकदा सर्फ एक्सेलने पुसावा म्हणतो ....!**
**मातीचं वाढलेलं ब्लडप्रेशर कंट्रोल करण्यासाठी**
**महात्मा फुल्यासारखा नवा धन्वंतरी शोधावा म्हणतो....! शिवारमातीचं भंगार करणाऱ्या अतिरेकी कंसासाठी...**
**श्रमिकांच्या रक्तात नवा कृष्ण पेरावा म्हणतो.....!**
**मातीचं चिंतनमंथन करून शेतीचा नवा ब्रँड संसदेच्या आवारात धुमधडाक्यात लॉन्चिंग करावा म्हणतो ...!**
**मातीत राबून .....मातीत गेलेल्या...., मातीत राबणाऱ्या लाखो मायबापांना एकदा गर्वाने मानाचा सॅल्यूट करावा म्हणतो .... !**

याविषयी प्रा.डॉ.विश्वनाथ शिंदे म्हणतात-" बाजारपेठेचे, बिनडोक व्यवस्थेचे,मातीत विष कालवणाऱ्या प्रवृत्तीचे, माणसातल्या गिधडांचे ,कृषिप्रधान भारताचे, ब्रेकिंग न्यूज सांगणाऱ्या न्यूज चॅनेलांचे सर्विसिंग करायला कवी प्रवर्त होतो.लोकसभा, राज्यसभा ,विधानपरिषद, विधानसभांमध्ये सिंहासनारूढ झालेल्या कुणब्यांच्या लोकप्रतिनिधींचा जाहीरनामा मांडून त्यांना सावध होण्याचे आवाहन करणारी कविता या संग्रहात आढळते. देश स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्यात गुंतलेला आहे. सत्ताधाऱ्यांचा जयजयकार करताना कवी स्वत:साठी मात्र मुर्दाबादच्या घोषणा देत आहे. या कवितेमधील उपरोध जीवघेणा आहे. (प्रस्तावना: शिवार माती डॉट कॉम) शेतकऱ्यांच्या जीवनाचे विदारक आणि वास्तव चित्रण या कवितेत केले आहे. कवी फक्त शेतकऱ्यांचे चित्रण करत नाहीत तर त्यावर उपायही सुचवितो. शेतात ढोराप्रमाणे राबणारे आई-वडील असो किंवा कवीची स्वत:ची अनुभूती असो, याविषयी कवीने आत्मियतेने लेखन केले आहे.

'शिवार माती डॉट कॉम' हे शीर्षक खूपच आकर्षक आणि समर्पक आहे. 'शिवार माती डॉट कॉम'म्हणजे शिवारमातीतल्या सुखदु:खांचे संकेतस्थळ होय. कवी स्वत: म्हणतो-" भारत महासत्ता म्हणून पुढे येतोय याचा आनंद सर्व शेतकऱ्यांना आहेच. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची लोकल दु:खे आता ग्लोबल विश्वासमोर नव्या तंत्रज्ञानाच्या मदतीने

मांडावीत असे मला मनोमन वाटले म्हणून मी शेतकऱ्यांची सुख दु:खे मांडणारे 'शिवारमाती डॉट कॉम' हे नवे संकेतस्थळ कवितासंग्रहाच्या रूपाने जगाच्या व साहित्यविश्वाच्या समोर ठेवले आहे.

जगाचा पोशिंदा म्हणून शेतकऱ्याला 'शेतकरी राजा' म्हटले जाते. पण हा राजा स्वतः मात्र उपाशी राहतो. सतत दुसऱ्यासाठी काबाडकष्ट करतो, परंतु त्या कष्टाची कुणीही दखल घेत नाही.त्याच्या कष्टाला योग्य तो मोबदला मिळत नाही. हाडाची काडे करून सतत कष्ट, कष्ट आणि कष्ट करण्याचे पाप त्यांच्या नशीब येते. परंतु कवी मुकुंद वलेकर यांच्या कवितेतून केवळ शेतकऱ्यांच्या दु:खाचे वर्णन आले नाही तर बळीराजाला लढवय्या योद्धाचे बळ देते.याविषयी प्राचार्य सयाजीराजे मोकाशी म्हणतात --"आजन्म शेतकऱ्याला कन्हत ठेवणाऱ्या राजकर्त्यांची जिरवली पाहिजे, हे नव्या पिढीचे मनोगत चित्रदर्शी रूपात, एका स्फोटकाच्या ठिणगीत बंद करून ठेवले आहे. एका धगधगत्या ,रसरशीत क्रांतीप्रवण शेतकऱ्याला भेटण्याची अनुभूती ही कविता देते. म्हणूनच बंडखोर, काव्यात्म, लोकविलक्षण जाणीव, संयमाने हाताळताना कवीचा कस लागतो". (मलपृष्ठ:शिवार माती डॉट कॉम)

शेतकरी जीवनाचा उभा -आडवा छेद घेणारा,शेतकऱ्यांना न्याय देणारा ,त्यांच्या मनामध्ये हक्काची जाणीव पेरणारा, आंदोलनाला बळ देणारा, शिवार मातीतल्या सुखदु:खांचे नवे संकेतस्थळ निर्माण करणारा एक उदयोन्मुख ग्रामीण कवी म्हणून मुकुंद वलेकर यांचे नाव आग्रहाने घेता येते. कवी 'अँड्रॉइड मोबाईलच्या वेशीतून'या कवितेत '- कृषी प्रधान भारताची वाताहत... बेरोजगा,र सुशिक्षित तरुणांचे रुद्रकरण आक्रंदन गुगलवर सर्च करूनही कोणतेच उत्तर मिळत नाही. याविषयी खंत व्यक्त केली आहे.

**समारोप:**

कवी मुकुंद वलेकर यांनी 'शिवारमाती डॉट कॉम' या कवितासंग्रहातून शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे त्यांच्या अगतिकतेचे, अस्वस्थतेचे आणि व्यथा-वेदनांचे विविध कंगोरे मांडले आहेत. वाचक अंतर्मुख होऊन शेती आणि शेतकरी याविषयी विचार करू लागतो.खरे तर,फार पूर्वीपासून शेतकऱ्यांच्यावर अन्याय अत्याचार होत आहे. त्यामध्ये फार बदल झाला आहे असे नाही. हा बदल व्हावा ही अपेक्षा मुकुंद वलेकर यांच्या कवितेतून जाणवते. कवीच्या मनातील शेतकऱ्यांच्यावर होणाऱ्या अन्याय -अत्याचाराची धगधगती आग कवितेच्या माध्यमातून रौद्र ज्वालामुखीचे रूप धारण करते. या ज्वालामुखीच्या असंख्य ठिणग्यातून बळीराजाला न्याय मिळवून देणारे भूमिपुत्र निर्माण व्हावेत.

**निष्कर्ष :**

1) मुकुंद वालेकर यांची कविता शेतीची आणि शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांची मांडणी करणारी कविता आहे.
2) जागतिकीकरणानंतर शेतकऱ्यांपुढे नव्यानेच उभे राहिलेले प्रश्न आणि त्या प्रश्नानी निर्माण झालेली गुंतागुंत आणि शेतकऱ्यांच्या जीवनातील उध्वस्तपण यांचे चित्रण आलेले आहे.
3) मुकुंद वलेकर यांनी शेतकऱ्यांची दु:खे मांडणारे 'शिवारमाती डॉट कॉम' हे नवे संकेतस्थळ कविता संग्रहाच्या रूपाने जगाच्या व साहित्यविश्वाच्या समोर ठेवले आहे.
4) जागतिकीकरणानंतर शहरे आणि खेडी यांच्यातील दरी कमी झाल्याचे वास्तव चित्रण कवीने केले आहे.